

जळगाव महानगरपालिका

जळगाव

लेखा परीक्षण अहवाल

2016-2017 ते 2017-2018

उपसंचालक, महानगरपालिका लेखा लेखापरीक्षा, उपविभाग - 3, स्थानिक निधी

लेखापरीक्षा कार्यालय, छत्रपती संभाजी नगर

लेखा कोष भवन, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ

अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे जळगाव महानगरपालिका यांनी 2016-2017 ते 2017-2018 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

जळगाव शहर महानगरपालिका ,जळगाव सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.स्था-18 ब/लेखापरीक्षण अहवाल/2016-17 व 2017-18/ 399 दिनांक :- 28/11/2024

उपसंचालक (मनपा लेप)
स्थानिक निधी लेखापरिक्षा ,छ संभाजीनगर
उपविभाग क्र 3 यांचे कार्यालय,
तिसरा मजला,लेखा कोष भवन ,
फाजीलपुरा, छ संभाजीनगर .

प्रति,

मा.आयुक्त .

जळगाव शहर महानगरपालिका ,जळगाव.

जळगाव शहर महानगरपालिका ,जळगाव, सन 2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्री. दि.ने.भारंबे ,जिल्हा लेखापरिक्षा अधिकारी, यांच्या पथकाने दि.17/04/2023 ते 30/05/2024 या कालावधीत पूर्ण केले व श्री. महेश देशमुख , उपसंचालक (मनपा लेप), स्थानिक निधी लेखापरिक्षा,छ. संभाजीनगर,उपविभाग क्र 3 यांनी दिनांक 08/10/2024 रोजी मा.आयुक्त , जळगाव शहर महानगरपालिका ,जळगाव यांचेशी चर्चा करून अंतिमीकरण केले.लेखापरीक्षण कालावधीत खालील पदाधिकारी व अधिकारी कार्यरत होते.

अ क्र	नाव	पदनाम	कालावधी
1	श्री.नितीन बालमुकुंद लढढा	महापौर	01/04/2016 ते 06/09/2017
2	श्री. ललित विजयराव कोल्हे	महापौर	07/09/2017 ते 31/03/2018
3	श्री.संजय जयराम कापडणीस	आयुक्त	01/04/2016 ते 17/06/2016
4	श्री.किशोर बोर्डे	आयुक्त	17/06/2016 ते 07/07/2016
5	श्री.जीवन नामदेवराव सोनवणे	आयुक्त	07/07/2016 ते 30/06/2017
6	श्री.किशोर राजे निंबाळकर	आयुक्त	01/07/2017 ते 31/03/2018

जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

सन 2016-2017 व 2017-2018

लेखापरीक्षण प्रक्रीयेमधील उल्लेखनिय बाबी व महत्वाच्या अनियमितता

प्रस्तावना -

जळगांव शहर महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या दोन वर्षांचे लेखापरीक्षण मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवीन मुंबई यांचे पत्र क्र.स्था.18ब/प्रतिनियुक्ती/जळगांव मनपा लेप/आस्था-5/638, दिनांक 28/03/2023 नुसार करण्यात आले. मा.उपसंचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरीक्षा उपविभाग क्र.3, छ.संभाजीनगर पत्र क्र.स्था.18/ब/ले.प.नोटीस/मनपा/जळगांव/16-17, 17-18/ 102, दिनांक 31/03/2023 अन्वये मा.आयुक्त, जळगांव महानगरपालिका, जळगांव यांना लेखापरीरक्षण सूचना पत्र पाठविण्यात आले व त्यानुसार दिनांक 17/04/2023 पासून प्रत्यक्ष लेखापरीक्षणास सुरुवात करण्यात येऊन दिनांक 30/05/2024 रोजी पूर्ण करण्यात आले. लेखापरीक्षणादरम्यान 274 अर्धसमास पत्रे देण्यात आली असून 187 परिच्छेद नोंदविण्यात आलेले आहेत. लेखापरीक्षण करीत असतांना लेखापरिक्षणातील निरीक्षणे, महानगरपालिका हद्दीमधील घडामोडी, प्रत्यक्ष पाहणी, वृत्तपत्रांमधील प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या या अनुषंगानेही लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

प्रशासकीय इमारत -

जळगांव शहर महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत ही 17 मजली उंच इमारत असून सदर इमारतीचे बांधकाम 2001 मध्ये तत्कालीन नगरपालिका कालावधीत पूर्ण करण्यात आलेले आहे व तेंव्हापासून सदर इमारतीमध्ये नगरपालिकेचे व नंतर सन 2003 पासून महानगरपालिकेचे कामकाज सुरु झालेले आहे. सदर इमारतीची खालून सुरुवात ही पहिल्या मजल्यापासून असून, इमारतीमधील बैठक व्यवस्था पाहता ज्या विभागांमध्ये किंवा ज्या अधिकाऱ्यांकडे नागरिकांची कामे जास्त असतात असे विभाग किंवा अशा अधिकाऱ्यांची बैठक व्यवस्था ही खालील मजल्यांवर असणे आवश्यक आहे, जसे जन्म-मृत्यू विभाग, प्रभाग समिती क्र.1 करसंकलन विभाग, किरकोळ वसुली विभाग, महिला बालकल्याण विभाग, एनयुएलएम विभाग, नगररचना विभाग, मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.आयुक्त यांची कार्यालये ही खालील मजल्यांवर असणे आवश्यक आहे, जेणे करुन कार्यालयात येणाऱ्या नागरिकांकडून लिफ्टचा वापर कमीत कमी होईल व पर्यायाने विजेचा खप कमी होऊन विज देयकांमध्ये बचत होऊ शकेल, तसेच त्यामुळे नागरिकांचा वेळही वाचेल व त्यांची कामेही लवकरात लवकर होऊ शकतील. तथापी असे विभाग/कार्यालये ही तिसऱ्या, सहाव्या, तेराव्या, पंधराव्या, सतराव्या मजल्यांवर कार्यरत आहेत तर दुसऱ्या मजल्यावर दोन्ही विंगमध्ये सभागृह, तिसऱ्या मजल्यावर अलाहाबाद बँक, चौथ्या मजल्यावर निवडणूक साहित्य असल्यामुळे अशा मजल्यांचा नागरिकांना त्यांचे कामाचे दृष्टीने काहीही उपयोग होत नाही.

प्रशासकीय बाबी -

जळगांव शहर महानगरपालिकेची स्थापना 21/03/2003 पासून झालेली असून महानगरपालिकेचा दर्जा हा नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण 1005/वर्गीकरण/प्र.क्र.379/05/नवि-24, दिनांक 04/05/2006 नुसार "ड" वर्ग आहे. प्रशासकीय सोईच्या दृष्टीने जळगांव शहराचे 4 प्रभागांमध्ये विभागणी करण्यात आली असून त्या अंतर्गत 37 वार्डांची रचना करण्यात आलेली आहे. लेखापरीक्षण कालावधीमध्ये प्रत्येक वार्डमध्ये निवडून आलेले प्रत्येकी 3 नगरसेवक असून त्याव्यतिरिक्त महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण 5 स्विकृत सदस्य होते. निवडून आलेल्या सदस्यांमधूनच मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.स्थायी समिती सभापती, मा.महिला व बालकल्याण समिती सभापती, विरोधी पक्ष नेता, 4 प्रभाग समित्यांचे सभापती यांची निवड करण्यात आलेली होती.

प्रशासकीय कामकाजाचे दृष्टीने महानगरपालिकेचा लेखापरीक्षण कालावधीत निश्चित असा आकृतीबंध दिसून आला नाही, नगरपालिका अस्तित्वात असतांना व महानगरपालिका रुपांतरीत झाल्यानंतर वेळोवेळी शासनाकडून पदांना मंजूरी प्राप्त करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत अनेक पदे रिक्त असल्याचे दिसून येते. आता नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जमपा - 2020/प्र.क्र.184/नवि-25, दिनांक 18/03/2023 नुसार विविध पदांचा निश्चित असा आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. सदर मंजुर पदांनुसार सेवा प्रवेश नियमावली व बिंदू नामावली मंजूर करुन घेणे, त्यानुसार नियमानुसार पद भरतीची प्रक्रीया राबवून रिक्त पदांवर नियुक्त्या करणे आवश्यक आहे, जेणे करुन प्रशासकीय कामकाज सुरळीत होईल, तसेच नागरिकांना आवश्यक सोई-सुविधा पुरविणेस मदत होईल.

महानगरपालिका कर्मचाऱ्यांची अंतर्गत बदल्या झाल्यामुळे किंवा सेवानिवृत्ती/स्वेच्छा सेवानिवृत्तीमुळे संबंधित कर्मचारी हा पदभार इतर कर्मचाऱ्यांकडे सोपवित असतो. अशा प्रकारे पदभार सोपवित असतांना त्यांचेकडे असलेल्या पूर्ण/अपूर्ण प्रकरणांबाबत एक स्वतंत्र यादी तयार करुन संबंधित विभाग प्रमुखांसमोर पदभार सोपविणे/स्विकारणेची कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे नव्याने पदभार स्विकारणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्या पदाकडील संचिका/प्रलंबित प्रकरणांची माहिती नसते. यामुळे लेखापरीक्षणाचे वेळीही अभिलेखे उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास येते.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-1005/34/प्र.क्र.8/2005/18 (र.व का.) दिनांक 07/04/2005 मधील अ.क्र.(2) नुसार साधारणपणे कोणतीही फाईल विभागातील किंवा कार्यालयातील कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांच्या टेबलावर सात कामाच्या दिवसांचे वा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही, अ.क्र.(4) अन्वये दुसऱ्या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यकता नसलेल्या फाईलींच्या संबंधात विभागाने त्या प्रकरणावर पंचेचाळीस दिवसांचे आत निर्णय घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी अशा सूचना आहेत. तथापी सदर शासन निर्णयानुसार महानगरपालिकेमध्ये प्रशासकीय कामकाज करतांना पालन होत नसल्याचे निदर्शनास येते. काही प्रकरणांमध्ये मा.महासभा/मा.स्थायी समिती सभा/मा.आयुक्त यांचे अंतिम निर्णय झाल्यानंतरही आदेश निर्गमित करणेबाबत विलंब झालेला असल्याचे निदर्शनास येते.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 1000/प्र.क्र.30/2000/18 दिनांक 23/11/2000 अन्वये अभिलेखांचे वर्गीकरणाबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत, तथापी त्याप्रमाणे अभिलेखे ठेवण्यात येत नसल्याचेही निदर्शनास येते.

त्याचप्रमाणे अभिलेखे सहा गठ्ठा पद्धतीने ठेवण्यात येत नसल्यामुळे निर्णयाधीन असलेल्या प्रकरणांवर लक्ष देणे शक्य होत

नाही. तसेच लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांकडे कार्यविवरण नोंदवही ठेवली जात नाही, परिणामी अशा प्रकरणांवर विहित कालावधीमध्ये अंतिम निर्णय होत नसल्याने प्रकरणे बराच काळ प्रलंबित राहत असल्याची बाबही निदर्शनास आलेली आहे. याकरिता महानगरपालिकेची अंतर्गत टपाल-ट्रॅकिंग संगणक आज्ञावली तयार करण्यात आल्यास संबंधित विभाग प्रमुख, उपायुक्त, अपर आयुक्त, मा.आयुक्त यांचेमार्फत तपासणी होऊन प्रलंबित प्रकरणांबाबत आढावा घेतला जाऊ शकतो व परिणामी प्रकरणे विहित वेळेमध्ये निकाली काढण्यास मदत होऊ शकेल.

काही विभागांमध्ये त्यांचे आवश्यकतेनुसार संगणक आज्ञावली तयार करण्यात आलेल्या आहेत, तथापी त्यांचे देखभालीअभावी सदर आज्ञावली बंद पडलेल्या असल्याचे दिसून येते. त्यामुळे जुने आवश्यक अभिलेखांची आवश्यकता भासल्यास ते उपलब्ध करण्यास अडचणी निर्माण होतात. उदा.नगररचना विभागाकडील अभिलेखे स्कॅनिंग करुन आज्ञावलीमध्ये साठवणूक करण्यात आलेले आहेत, तथापी सदर आज्ञावली काही काळ बंद पडलेली होती व आज्ञावली सुरळीत करण्याकरिता योग्य ती उपाययोजना महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही, तसेच आज्ञवलीमध्ये साठविण्यात आलेले अभिलेखांबाबत योग्य त्या नोंदवह्याही तयार करण्यात आलेल्या नाहीत, त्यामुळे सदर आज्ञावलीमध्ये साठविण्यात आलेले अभिलेखे किंवा संबंधित संचिका शोधणे अत्यंत अडचणीचे असल्याचे निदर्शनास आले आहे.

शासकीय/निमशासकीय संस्थांकडील मालमत्तांचा विमा हा शासकीय विमा संचालनालयाकडेच काढणेबाबत शासन निर्देश आहेत. महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध चल व अचल मालमत्ता आहेत, सदर मालमत्तांचा कोणताही विमा काढण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येते, त्यामुळे भविष्यात काही नुकसान झाल्यास त्यांची भरपाई मिळू शकणार नाही व पर्यायाने महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महानगरपालिकेच्या वाहनांचा विमा काढण्यात येतो तथापी सदरचा विमा हा शासकीय विमा संचालनालयाकडे न काढता खाजगी विमा कंपनीकडे काढण्यात येत आहे, त्यामुळे शासकीय विमा निधीचा महसुल वाढविणेचा शासनाचा उद्देश सफल होत नसल्याने शासन महसुलाची हानी होत आहे, तसेच शासन नियमांचे पालनही करण्यात येत नाही.

महानगरपालिकांतर्गत विविध कामांचे दिर्घ कालावधीचे कंत्राट देण्यात आलेले आहेत. अशा कंत्राटामध्ये संबंधित कंत्राटदारासमवेत करारनामेही करण्यात आलेले आहेत, तथापी असे करारनामे करतांना कंत्राटाचा कालावधी हा दिर्घ कालावधीचा असल्याने त्यामध्ये कोणत्याही कायदेशिर त्रृट्या राहणार नाही याबाबत पडताळणी करण्याकरिता विधी सल्लागार यांचेकडून करारनाम्याचे प्रारुप तपासणी करणे आवश्यक आहे, जेणेकरुन भविष्यात संबंधित कंत्राटदारामार्फत त्यामधून काही पळवाटा काढण्यात येऊन कायदेशिर बाबी निर्माण होऊ नये व पर्यायाने महानगरपालिकेचे नुकसान होऊ नये. तथापी अशा प्रकारे कार्यवाही होत नसल्याचीही बाब निदर्शनास येते. उदा.जलतरण तलाव चालविणेस देणे, जैव वैद्यकीय कचरा संकलन, घनकचरा व्यवस्थापन अशा प्रकारची कंत्राटे.

त्याचप्रमाणे असे दिर्घ कालावधीचे कंत्राट कालावधीमध्ये कंत्राटदारामार्फत कोणत्याही कायदेशिर बाबींचे उल्लंघन होत नसल्याबाबत संबंधित विभाग प्रमुखांमार्फत ठराविक कालांतराने पडताळणी होणे आवश्यक आहे. उदा.जलतरण तलाव चालविणेच्या कंत्राटामध्ये संबंधित कंत्राटदार यांनी महानगरपालिकेच्या जागेमध्ये रेस्टॉरेंट चालवून स्वत:चे उत्पन्नाचे साधन निर्माण केलेले आहे. तसेच जैव वैद्यकीय कचरा संकलनामध्ये महानगरपालिका क्षेत्रामध्ये सतत दवाखाने/हॉस्पीटल यांची संख्या वाढत आहे, तथापी

कचरा संकलनामध्ये अशा वाढीव दवाखाने/हॉस्पीटल यांनुसार परिगणना करण्यात येत नसल्याची बाबही निदर्शनास येते आहे त्यामुळे संबंधित कंत्राटदार हा महानगरपालिकेकडे योग्य त्या सेवा शुल्काची रक्कम भरणा करीत नसल्याने महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

काही प्रकरणांमध्ये दोन व जास्त विभागांचा समावेश असतो, अशा बाबतीत अशा विभागांमध्ये योग्य तो समन्वय असणे आवश्यक आहे, अन्यथा प्रत्येक विभागामार्फत जबाबदारी टाळण्याची प्रवृत्ती दिसून येते. उदा.जैव वैद्यकीय कचरा संकलनामध्ये कर संकलन विभागाकडून तसेच आरोग्य विभागाकडून नव्याने निर्माण झालेल्या दवाखान्यांची माहिती वेळोवेळी उपलब्ध करणे, महानगरपालिकेच्या विविध मालमत्तासंबंधी अभिलेखे ठेवण्याकरिता बांधकाम विभाग, नगररचना विभाग व मिळकत व्यवस्थापन विभाग यांचेमध्ये योग्य तो समन्वय असणे, रस्ते/नाल्या बांधकाम करतांना पाणीपुरवठा विभागाशी समन्वय ठेवणे, नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी, भोगवटा प्रमाणपत्र, अभिन्यास मंजुरी प्रकरणासंबंधी नगररचना विभाग व कर संकलन विभाग यांमध्ये समन्वय ठेवणे, विविध विभागांमार्फत करण्यात आलेले करारामध्ये रकमा वसुलीबाबत संबंधित विभाग व किरकोळ वसुली विभाग यांमध्ये समन्वये असणे, अनामत व अग्रिम रकमांच्या बाबतीत संबंधित विभाग व लेखा विभाग यांमध्ये समन्वय असणे अशा प्रकारे इतरही अनेक कामांमध्ये अंतर्गत समन्वय राखणे आवश्यक आहे.

लेखापरीक्षण अहवाल -

महानगरपालिकेचे वार्षिक लेखापरीक्षण मा.महालेखापाल महाराष्ट्र राज्य तसेच स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग यांचेमार्फत करण्यात येत असते. स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागामार्फत करण्यात येणारे लेखापरीक्षणाचे प्रलंबित परिच्छेदांची माहिती लेखापरीक्षण अहवालामधील भाग-1 मध्ये देण्यात येते. मागिल लेखापरीक्षण अहवाल भाग-1 मधील प्रलंबित परिच्छेदांची स्थिती पाहता मोठ्या प्रमाणात प्रलंबित परिच्छेदांची संख्या दिसून येते. प्रलंबित परिच्छेदामध्ये महानगरपालिकेचे सन 2011-12 ते 2015-16 दरम्यानचे एकूण 648 परिच्छेद तसेच शिक्षण मंडळाकडील सन 1956-57 ते 2015-16 चे 1290 परिच्छेद प्रलंबित आहेत. प्रलंबित परिच्छेदांमुळे प्रशासकीय बाबींमधील अनियमिततांमध्ये सुधारणा न होता त्या तशाच कायम राहत असल्याचे निदर्शनास येते, तसेच वसुलपात्र रकमांच्या वसुलीअभावी मोठ्या प्रमाणात महानगरपालिका स्व:निधी तसेच शासन निधीच्या रकमा अडकून पडलेल्या आहेत त्यामुळे महानगरपालिकेचे तसेच शासनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

त्याचप्रमाणे लेखापरीक्षण सुरु असतांना लेखापरीक्षणातील निदर्शनांबाबत अर्धसमास पत्रान्वये माहिती विचारणा करण्यात येते. अशा अर्धसमास पत्रांन्वये विचारणा करण्यात येणाऱ्या अनियमिततांची पूर्तता करण्याबाबत अधिकारी/कर्मचारी यांचेमध्ये उदासिनता दिसून येते. त्यामुळे अर्धसमास पत्रान्वये कळविण्यात येणाऱ्या अनियमितता परिच्छेदांमध्ये कायम करण्यात येतात, पर्यायाने त्रृट्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढत जाते. त्याचप्रमाणे अभिलेखे मागणी संदर्भात निर्गमित करण्यात येणारे अर्धसमास पत्रांचे अनुषंगाने आवश्यक अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबतही उदासिनता दिसून येते.

लेखाविषयक निरिक्षणे -

महानगरपालिकांकरिता शासनामार्फत लेखा संहिता अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. तथापी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 93 नुसार महानगरपालिकेने ठेवावयाचे लेखे हे स्थायी समिती निर्देश देईल त्या पद्धतीने व त्या नमुन्यांमध्ये ठेवण्यात आले पाहिजेत असे नमुद आहे. तथापी लेखापरिक्षण कालावधीमध्ये ठेवण्यात येत असलेले लेखे व नमुने हे महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नमुन्यांमध्ये ठेवण्यात येत असल्याचे दिसून येतात, असे नमुने नगरपरिषद लेखासंहितेमधील नमुन्यांमध्ये ठेवण्यात येत असल्यास महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नुसार सुधारित नमुन्यांमध्ये लेखे ठेवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.लेखासु-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31 दिनांक 06/07/2005 मधील अ.क्र.(i) अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपालिकांना उपर्जित पद्धतीने दुहेरी नोंद लेखापद्धतीची (Accrual Based Double Entry Accounting System) अंमलबजावणी सुरु करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे, अ.क्र.(ii) अन्वये दुहेरी नोंद लेखा पद्धतीच्या अंमलबजावणीसाठी राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार होईपर्यंत राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिकेचा उपयोग करावा, यामध्ये नगरपरिषद प्रशासन संचालनालयातील लेखा सुधारणा कक्षचे पूर्व सहमतीने त्यात किरकोळ बदल करता येतील असे निर्देश देण्यात आलेले आहे. तथापी राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिकेतील नमुन्यांमध्येही लेखे/अभिलेखे ठेवण्यात आलेले नसल्याचेही लेखापरीक्षणात निदर्शनास येते.

वरील शासन निर्णय दिनांक 06/07/2005 नुसार महानगरपालिका/नगरपालिकांना उपर्जित पद्धतीने दुहेरी नोंद लेखापद्धतीमध्ये लेखे ठेवणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण वर्षामध्ये महानगरपालिकेचे मुळ लेखे हे एकेरी नोंद पद्धतीने व रोख पद्धतीमध्ये ठेवण्यात आलेले आहे. दुहेरी नोंद पद्धतीचे लेखे हे सनदी लेखापाल यांचेकडून तयार करुन घेण्यात आलेले आहे. तथापी असे लेखे तयार करण्याकरिता आवश्यक प्राथमिक अभिलेखे हे परिपूर्ण नसल्यामुळे सनदी लेखापाल यांनी तयार केलेले लेखे हे निश्चितच अचूक असल्याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी होऊ शकली नाही.

महानगरपालिकेचे स्व:निधीचे रोखपुस्तकामध्ये विविध प्रकारचे अनेक लेखे ठेवण्यात आलेले आहे. त्यांचे बँक खातेही स्वतंत्र ठेवण्यात आलेले आहे. रोखपुस्तकामध्ये मासिक व वार्षिक ताळमेळ घेण्यात येत नाही त्यामुळे रोखपुस्तकामध्ये दर्शविण्यात आलेली शिल्लक व बँक खात्यामधील शिल्लक यांमध्ये तफावत दिसून येते, या तफावतीमध्ये खातेनिहाय नोंदीं चुकीच्या पद्धतीने घेणे, अरोखीकृत धनादेश तपशिल न दर्शविणे, बँकेने जमा केलेले व्याज व बँकेने खर्ची टाकलेले विविध प्रकारचे चार्जेस रोखपुस्तकामध्ये त्या-त्या वेळी न नोंदविणे यांमुळे दिसून येतात, तथापी ताळमेळ अभावी तफावतींचा शोध घेणे कठीण होते. त्याकरिता विभागनिहाय किंवा इतर सोईस्कर पद्धतीने स्वतंत्र रोखपुस्तके ठेवल्यास जमा-खर्चाच्या नोंदी घेण्यातील चूका टाळणे व दरमहा ताळमेळ घेणे सुकर होऊ शकेल.

विविध विभागांकडून खर्चाची प्रकरणे मंजुर झाल्यानंतर देयके प्रदानाकरिता लेखा विभागाकडे सादर करण्यात येतात. अशी प्रदानाची कार्यवाही लेखा विभागामार्फत पूर्ण झाल्यानंतर प्रदानाची नोंद रोखवहीमध्ये करण्यात येऊन त्यांना प्रमाणक क्रमांक देण्यात येतात. अशा प्रमाणकांची नोंद संबंधित विभागांनी त्यांचेकडील संचिकेमधील देयकांच्या स्थळ प्रतीवर, मोजमाप पुस्तिकेमध्ये घेणेची जबाबदारी त्या-त्या विभागाची आहे. तथापी अशा प्रकारे प्रदानाच्या प्रमाणकांची माहिती संबंधित विभागांकडून घेण्यात येत नसल्यामुळे देयकांचे प्रदान झाले किंवा नाही, झाले असल्यास कसे झाले व योग्य त्या योजनेच्या खात्यामधून झाले किंवा नाही याबाबत संबंधित विभागांकडे माहिती उपलब्ध नसते. परिणामी खर्चासंबंधीत माहिती तयार करतांना, उपयोगिता प्रमाणपत्र

पाठविणेकरिता, अंदाजपत्रक/सुधारित अंदाजपत्रक तयार करतांना त्या-त्या विभागांना त्यांची माहिती तयार करणेकरिता लेखा विभागावरच अवलंबून राहावे लागते व पर्यायाने अशा व इतर प्रकारच्या कामकाजाकरिता विलंब होतो. त्यामुळे संबंधित विभागांनी लेखा विभागाकडे सादर करण्यात येणाऱ्या देयकांची एक नोंदवही ठेवणे, लेखा विभागाकडे देयके सादर केल्यानंतर लेखा विभागाशी समन्वय ठेवून किमान प्रत्येक महिन्याच्या अखेरीस अशा सर्व प्रदानांची प्रमाणक क्रमांक, दिनांक यांची माहिती लेखा विभागाकडून प्राप्त करुन घेणे व नोंदवहीमध्ये तसेच संबंधित संचिकांमधील स्थळ प्रतींवर नोंद घेण्याची कार्यवाही करणेबाबत लेखापरिक्षणात सुचविण्यात येत आहे.

गुंतवणूक - नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.213 नुसार शासनाच्या गुंतवणूक धोरणात शासनाने वेळोवेळी केलेल्या बदलाच्या अनुषंगाने शिल्लक रकमांची गुंतवणूक करणे आवश्यक आहे. अशी गुंतवणूक करतांना विविध बँकांकडून व्याज दर मागविणे व त्यानुसार जास्तीत जास्त व्याज देणाऱ्या बँकेमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे, तसेच अशी गुंतवणूक करतांना त्या-त्या योजनेच्या खात्यातील रकमेची भविष्यातील आवश्यकतेचा विचार करुन जास्त कालावधीकरिता व विविध टप्प्याच्या रकमांमध्ये गुंतवणूक केल्यास जास्तीत जास्त व्याज प्राप्त होऊ शकेल या पद्धतीने गुंतवणूक करणे आवश्यक आहे. तथापी अशा प्रकारे गुंतवणूक करण्यात आलेले नसल्यामुळे व्याजाचे नुकसान झालेले आहे, तसेच योजनांच्या खात्यामध्ये मोठ्या प्रमाणात रकमा पडून राहतात. कर्मचाऱ्यांना देय असलेल्या रकमा जसे भविष्य निर्वाह निधी, परिभाषीत अंशदायी निवृत्ती वेतन योजना, मृत्यू निधी यांच्या रकमा संबंधित अदा करतांना शासन नियमानुसार व्याज परिगणीत करुन देणे आवश्यक असते. अशा निधींमधील शिल्लक रकमा गुंतवणूक करतांना कर्मचाऱ्यांना देय व्याज दर किंवा त्यापेक्षा जादा व्याज दरानुसार मुदत ठेवीत गुंतवणूक करणे आवश्यक असते, अन्यथा अशा संबंधित निधींचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लेखापरीक्षणामध्ये अशा प्रकारच्या गुंतवणूका ह्या देय व्याजदरापेक्षा कमी व्याज दराच्या मुदत ठेवीमध्ये गुंतवणूक केलेल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

ज्या योजनांचा कालावधी संपलेला आहे अशा योजनांची खाती तात्काळ बंद करुन शिल्लक रक्कम व व्याज शासनाच्या खाती भरणा करणे आवश्यक आहे, तथापी 10वा वित्त आयोग, 11वा वित्त आयोग, 12वा वित्त आयोग, 13वा वित्त आयोग, विविध आमदार व खासदार निधी, ठराविक प्रकल्प किंवा योजनेकरिता उघडण्यात येणारी खाती लेखापरिक्षण वर्षांमध्ये सुरु असून योजनांचा कालावधी संपल्यानंतरही खाते बंद न केल्यामुळे रकमा शिल्लक आहे व परिणामी शासनाचा निधी मोठ्या प्रमाणात विनावापर अडकून पडलेला आहे. अखर्चित निधी शासन खाती भरणा करण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी निर्देश देण्यात येत असतात, तरी त्याप्रमाणे शासकीय योजनांच्या मुळ अनुदानाच्या रकमा व त्यावर प्राप्त व्याजाच्या रकमा यांचे योग्य वर्गीकरण करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन खाती भरणा करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

लेखापरीक्षण कालावधीमध्ये हुडको व जळगांव जनता सहकारी बँक जळगांव या वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची दरमहा परतफेड करण्यात येत होती. याबाबत कर्ज नोंदवही ठेवण्यात आलेली आहे, तथापी कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्थांकडून दरमहा शिल्लक व देणे असलेल्या कर्जाच्या मुद्दल व व्याज रकमांचे विवरण मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे वित्तीय संस्थेकडील शिल्लक मुद्दल व व्याज याबाबत लेखा विभागात अद्यावत माहिती उपलब्ध होऊ शकत नाही.

अर्थसंकल्प - महानगरपालिकेचा अर्थसंकल्प हा वास्तववादी नसल्याचे निदर्शनास येते. अर्थसंकल्प तयार करतांना मागिल

तीन वर्षांची सरासरी विचारात घेऊन चालू अर्थसंकल्प तयार करणे आवश्यक आहे. तथापी संपूर्ण मागणी विचारात घेऊन त्यानुसार जमा व खर्चाचे अंदाज तयार करण्यात येत असल्याचे निदर्शनास येते. तसेच प्रत्यक्ष जमेपेक्षा प्रत्यक्ष खर्च जास्त असल्याचे निदर्शनास येते. जमेच्या अंदाजानुसार खर्चाचे अंदाज तयार करण्यात येतात, तथापी जमा रकमांच्या म्हणजे कर संकलनाच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना करणेत येत नाही, त्यामुळे जमेची टक्केवारी ही अत्यल्प असल्याचे दिसून येते, त्यामुळे महानगरपालिका हद्दीमधील विकास कामांवर त्याचा परिणाम होत असून नागरिकांना योग्य त्या प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही.

खर्चामध्ये बचत करणे -

मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 57 व 58 मध्ये वित्तीय औचित्याची सुत्रे विषद करण्यात आलेली आहे. त्यानुसार सर्वसामान्य व्यक्ती आपला स्वत:चा पैसा खर्च करतांना जी जागरुकता दाखवतो तीच जागरुकता शासनाचा/सार्वजनिक पैसा खर्च करतांना दाखविणे आवश्यक आहे. या नियमानुसार महानगरपालिकेच्या निधीमधून पैसा खर्च करतांना सर्वसाधारणपणे जागरुकता दाखविणे आवश्यक आहे.

कामांची अंदाजपत्रके तयार करतांना महानगरपालिका अभियंतांकडून प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण करुन वास्तविक अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत नसल्यामुळे अनावश्यकरित्या जादा किंमतीची अंदाजपत्रके तयार करण्यात येत असतांत. कमी दराच्या निविदा स्विकृत करण्यात आल्यास शिल्लक राहणाऱ्या निधीमधून वाढीव कामे करुन अंदाजपत्रकीय किंमतीइतका खर्च करण्यात येत असल्याचेही निदर्शनास येते. त्यामुळे शासनाचा निधी अनावश्यकरित्या जादा प्रमाणात खर्च होत आहे. तसेच अनेक वेळा प्रत्यक्ष काम करतांना कामाचे ठिकाणी अतिक्रमण झालेले असल्यामुळे प्रस्तावित काम करतांना अडचणी येतात व परिणामी प्रस्तावित मुळ काम रद्द करण्यात आलेले असल्याचेही निदर्शनास आलेले आहे, व त्यामुळेही तेवढ्या कालावधीकरिता शासनाचा निधी अनावश्यकरित्या अडकून पडतो.

वारंवार कराव्या लागणाऱ्या एकसारख्या प्रकारच्या छोट्या-छोट्या कामांकरिता स्वतंत्र निविदा प्रक्रीया राबविण्यात येत असल्याचेही निदर्शनास येते. त्याऐवजी एकत्रित वार्षिक निविदा करुन दर निश्चित करुन कामे करता येऊ शकतील, त्यामुळे खर्चामध्ये बचत होण्यास मदत होऊ शकेल, उदा.विद्युत पोल उभारणे, विद्युत दुरुस्ती, पाणी पुरवठा दुरुस्ती, विविध ठिकाणी पाण्याचे बोअर करणे इत्यादी.

इतर विभांगांकडे जमा करावयाच्या रकमा जसे विद्युत देयके, जलसंपदा विभागाकडील पाणी देयके, दुरध्वनी देयके यांची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. देयकांचा भरणा करतांना ठराविक कालावधीमध्ये रकमा भरणा केल्यास सुट देण्यात येते अशा सुटीचा लाभ न घेणे, रकमा दुबार भरणा होणे, दंडात्मक रकमांचा भरणा यांमुळे महानगरपालिकेचा किंवा शासनाचा जादा निधी खर्च होत असल्यामुळे नुकसान होत असल्याचेही निदर्शनास येते.

काही विभागांकडे अनामत रकमांचा भरणा करण्यात येत असतो जसे विज मंडळाकडे, पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, रेल्वे प्रशासन इत्यादी. अशा भरणा करण्यात आलेल्या अनामत रकमांबाबत स्वतंत्र नोंदवही ठेवणे, अनामत रकमांची वार्षिक तपासणी संबंधित विभागांकडून करुन काम पूर्ततेनंतर अनामत रकमांचा परतावा मिळविणे आवश्यक आहे, अन्यथा अशाप्रकारे मोठ्या प्रमाणात अनामत रकमा बिनव्याजी अडकुन पडतात व पर्यायाने महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत

असल्याचे दिसून येते. तसेच याकरिता महानगरपालिकेच्या ज्या विभागामार्फत अशा प्रकारच्या रकमा अनामत म्हणून भरणा करण्यात येतात त्या संबंधित विभागांनीही अशा प्रकारच्या नोंदी स्वतंत्र नोंदवहीमध्ये ठेवणे व कामाच्या पूर्ततेनंतर अनामत रकमा परत मिळविणेच्या दृष्टीने पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

लेख्यांमध्ये दर्शविण्यात आल्यानुसार मोठ्या प्रमाणात पूर्वी कंत्राटदारांना/पुरवठादारांना अग्रिम रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत. तथापी अशा अग्रिम रकमांची वसुलीची कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात महानगरपालिकेचा/शासनाचा पैसा अशा कंत्राटदारांकडे/पुरवठादारांकडे अडकून पडलेला दिसून येतो. सदर रकमा वसुलीची ठोस कार्यवाही करणे, येणे रकमांवर दंड/व्याज आकारणी करणे आवश्यक आहे. याबाबत अशा अग्रिम रकमा प्रदान करण्याचे प्रस्ताव ज्या विभागांमार्फत सादर करण्यात आले त्या संबंधित विभागांनीही अशा कंत्राटदारांकडून/पुरवठादारांकडून रकमा वसुलीबाबत पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

नगरसचिव विभागाकडे ठेवण्यात आलेल्या संविदा नोंदवहीची संपूर्णत: तपासणी करण्यात आली असता महानगरपालिकेच्या अधिकारी निवासस्थानांच्या बांधकाम दुरुस्तीवर व विद्युतीकरणावर वा दुरुस्तीवर वारंवार निविदा करण्यात असल्याचे दिसून येते, म्हणजेच या बाबींवर वारंवार खर्च करण्यात येत असल्याचे निदर्शनास येते. निवासस्थानांची दुरुस्ती व विद्युतीकरण व त्यांची दुरुस्ती ही एकदाच व योग्यरित्या केल्यास वारंवार होणारा खर्चामध्ये बचत होऊ शकेल.

वातानुकूलीत यंत्र वापराबाबतही शासनाने मर्यादा व नियम घालून दिलेले आहे. तथापी महानगरपालिकेमधील अधिकाऱ्यांच्या दालनामध्ये, निवासस्थानांमध्ये महानगरपालिकेने वातानुकूलीत यंत्रे बसविलेली आहे, सदर यंत्रांच्या दुरुस्त्या, वारंवार स्थलांतरण करणे, यंत्राच्या वापरापोटी विद्युत देयके यांवर मोठ्या प्रमाणावर आवर्ती खर्च होत असल्याचे लेखापरीक्षणादरम्यान आढळून आले.

याबाबत असेही नमुद करण्यात येते की, नागरिकांकडून गोळा करण्यात येणारा करांचा विनियोग हा नागरिकांना प्राथमिक सुविधा जसे रस्ते, नाल्या, स्वच्छता, पाणी, पथदिवे इत्यादींकरिता देण्यावर करणे आवश्यक आहे. तथापी लेखापरीक्षण करित असतांना विविध वृत्तपत्रांमध्ये शहरातील विविध समस्यांबाबत प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांवरुन त्याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे आढळून आले.

निविदा प्रक्रीयाविषयक -

महानगरपालिकेमार्फत विविध साहित्य खरेदी करणे, योजना राबविणेची कार्यवाही करण्यात येत असते. अशा कार्यवाहीच्या अनुषंगाने दरपत्रके मागविणे किंवा निविदा मागविणेची कार्यवाही करण्यात येते. निविदा मागविणेपूर्वी 3 सदस्यीय निविदा समिती स्थापन करणे, निविदा सूचना प्रसिद्ध करतांना रु.50 लक्षपर्यंत किंमतीच्या निविदा ह्या राज्यस्तरीय 1 वृत्तपत्र व जिल्हास्तरीय 1 वृत्रपत्र यांमध्ये प्रसिद्ध करणे, रु.50 लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या निविदा ज्या राज्यस्तरीय 1 वृत्तपत्र, जिल्हास्तरीय 1 वृत्तपत्र व राष्ट्रीय स्तरावरील 1 वृत्तपत्र यांमध्ये प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. प्राप्त निविदांची तपासणी सूची तयार करुन त्यावर निविदा समितीच्या सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे, निविदा उघडते वेळी निविदाधारक स्वत: किंवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांचेसमक्ष निविदा उघडणे, विहित कालावधीमध्ये निविदा प्रक्रीया पूर्ण करुन कामाचे/पुरवठ्याचे आदेश देणे आवश्यक आहे. तथापी याप्रमाणे

निविदा समिती स्थापन करण्यात येत नाही, 2 किंवा 3 वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिद्ध न करता एकाच वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत असल्याने योग्य तो प्रतिसाद प्राप्त होत नाही व त्यामुळे निविदांना वेळोवेळी मुदतवाढ देण्याची वेळ येते, निविदा समिती सदस्य व निविदाधारक यांचे उपस्थितीत निविदा उघडण्यात येत नाही. त्यामुळे निविदा प्रक्रीयेस विलंब होऊन विकास कामे पूर्ण करण्यासही विलंब होत आहे व परिणामी नागरिकांना प्राथमिक सुविधा प्राप्त होणेसही विलंब होत आहे.

महानगरपालिकेमध्ये सर्व विभागांमध्ये लागणारे साहित्य तसेच योजना राबविण्याकरिता आवश्यक साहित्यांची खरेदी ही एकत्रितरित्या भांडार विभागामार्फत करण्यात येते व त्यानंतर साहित्य संबंधित विभागांना पुरविण्यात येत असल्याचे निदर्शनास येते, तथापी त्यामुळे संबंधित विभाग हे फक्त योजना राबवितात मात्र खरेदीबाबतची कोणतीही माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसते. त्यामुळे अशा प्रकारे साहित्य खरेदी करणेसाठी निविदा प्रक्रीया राबवितांना संबंधित विभागांचे प्रमुख यांचाही समावेश निविदा प्रक्रीयेमध्ये असणे आवश्यक आहे, जेणेकरुन साहित्यांचा दर्जाबाबत योग्य ती पडताळणी करता येऊ शकेल तसेच खरेदीविषयक संपूर्ण माहिती विभागाकडे उपलब्ध होईल व याचा उपयोग शासनास माहिती सादर करणे, लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन देणे, माहितीच्या अधिकारात मागविण्यात आलेल्या माहिती पुरविणे या व अशा इतर प्रसंगी निश्चितच होऊ शकेल.

कर संकलन -

महानगरपालिकेमार्फत घरपट्टी, पाणीपट्टी, जाहिरात, गाळे भाडे, मार्केट, बाजार व इतर विविध प्रकारचे कराची वसुली करण्यात येत असते. कर संकलनाची टक्केवारी ही अत्यंत अल्प असल्याचे लेखापरीक्षण कालावधीमध्ये दिसून येते. जे नागरीक करांचा भरणा दरवर्षी करत नाहीत त्यांच्या करांच्या रकमा वाढत जातात, वाढणाऱ्या करांच्या बोजामुळेही त्यांचे कर भरण्याचे प्रमाण दिवसें-दिवस कमी होत जाते. कर संकलन वाढविण्याकरिता अशा नागरिकांना अभय योजनेसारख्या योजना राबवून व शास्तीच्या रकमा माफ करुन कर संकलन करण्याची वेळ महानगरपालिकेवर येते. अभय योजना राबविणे, शास्तीच्या रकमा माफ करणे यामुळे कर संकलन तर होते, मात्र नागरिकांच्या मनात अशा प्रकारची नकारात्मक भावना निर्माण झाल्यामुळे अशा व इतर नागरिकांमध्येही कर न भरण्याची प्रवृत्ती वाढत जाते. दरवर्षी त्या-त्या वर्षातील कर वसुलीचे प्रमाण वाढविणेच्या दृष्टीने प्रभावी उपाययोजना राबविणे, नागरिकांमध्ये जनजागृती करणे, कर संकलनासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण व प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, त्यामुळे कर संकलनाचे प्रमाण वाढविणेस मदत होईल.

लेखापरीक्षण कालावधीमध्ये कर संकलनाचे दृष्टीने मालमत्ता सर्वेक्षण करणेकरिता कंत्राट निश्चित करण्यात आलेले आहे. सदर कंत्राटाकरिता ठराव करतांना 13व्या वित्त आयोग निधीमधील शिल्लक रक्कम वापरणे व उर्वरित रक्कम 14व्या वित्त आयोगाचे निधीमधून खर्च करणेकरिता मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. 13व्या वित्त आयोगाची मुदत ही दिनांक 31/03/2015 रोजी संपलेली असल्याने व योजनेस कोणतीही मुदतवाढ मंजूर करण्यात आलेली नसल्याने सदर योजनेचा निधी शासनाकडे जमा करणे आवश्यक होते, तसेच 14व्या वित्त आयोगाच्या निकषामध्ये या प्रकारचे काम अनुज्ञेय ठरत नाही. त्यामुळे लेखापरीक्षण कालावधीमध्ये 13व्या वित्त आयोगामधून करण्यात आलेला खर्च तसेच भविष्यात 14व्या वित्त आयोगामधून खर्च करण्यात आला असल्यास याबाबत गंभीर अनियमितता झालेली असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

शहरामध्ये अनेक भागात जाहिरातीचे फलक लावण्यात येत असतात. अशा लावण्यात येणाऱ्या जाहिरातींवर नियमित

देखरेख ठेवणे, लावण्यात येणाऱ्या जाहिरातींवर महानगरपालिकेच्या मंजुरीचा संदर्भ व कालावधी नमूद करण्याचे बंधन टाकणे, कालावधी संपल्यानंतर जाहिरात काढून न घेतल्यास किंवा अनधिकृत जाहिराती आढळून आल्यास अशा जाहिराती काढून टाकणे व संबंधितांविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करणेच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे, जेणेकरुन महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये भर पडू शकेल. तसेच अशा जाहिरातींकरिता उभारण्यात आलेल्या स्ट्रक्चरचे नियमित स्ट्रक्चरल ऑडीट करणे आवश्यक आहे जेणेकरुन अशा प्रकारचे स्ट्रक्चर पडून जिवीत व वित्त हानी होणार नाही.

जळगांव शहरामध्ये महानगरपालिकेच्या मालकीचे अनेक शॉपींग गाळे आहेत. अशा गाळेधारकांकडून गाळे भाडे वसुली होत नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास येते. यासंबंधीत ठोस उपाययोजना आखणी करणे, गाळे धारकांच्या बैठका घेऊन त्यांना थकित रकमेसह नियमित गाळे भाडे भरण्याकरिता प्रोत्साहित करणे, गाळे भाडे न भरणाऱ्या गाळे धारकांविरुद्ध कायदेशिर कारवाई करणे, गाळे सिल करणे अशा प्रकारच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. गाळे भाड्याबाबत अनेक केसेस दाखल आहेत, त्या गाळे धारकांसोबत समन्वय साधून व त्यांचेसोबत योग्य ती तडजोड करुन अशा केसेस निकाली काढणे व नियमित भाडे वसुलीची कार्यवाही करणेत येणे आवश्यक आहे.

शहरामध्ये विविध ठिकाणी भाजी बाजार, किरकोळ विक्रेते त्यांचे साहित्य विक्रीकरिता बसत असतात. अशा विक्रेत्यांकडून बाजार फी वसुली करण्यात येते. तथापी अशा फीची वसुली ही अत्यंत कमी प्रमाणात असल्याचे निदर्शनास येते. त्याकरिता कर्मचाऱ्यांची प्रभागनिहाय पथके तयार करुन देखेरेख ठेवणे, त्यांची नियमित वसुली होईल याकरिता विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.

किरकोळ वसुली विभागाकडील जमिन भाडे नोंदवहीची तपासणी करण्यात आली असता नोंदवहीनुसार सेवाभावी संस्था, खाजगी शाळा यांना महानगरपालिकेच्या जागा भाडे तत्वावर देण्यात आलेल्या आहेत. तथापी सदर जागांचे भाडे वसुलीची कार्यवाही होत नसल्याचे महानगरपालिकेचे उत्पन्नाचे नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास येते. यापैकी काही संस्था/शाळा यांच्या करारनाम्याचा कालावधी संपलेला असून पुढील कालावधीचा करारनामा करण्यात आलेला नसल्यामुळे सदर वसुलीची कार्यवाही होत नसल्याची बाबही निदर्शनास येते, याकरिता संबंधित विभाग जसे नगररचना विभाग, बांधकाम विभाग यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करुन यासंबंधी करारनाम्याच्या प्रतींसह वसुलीकरिता किरकोळ वसुली विभागाकडे करारनाम्याचा कालावधी, भाडे दर यासंबंधी सविस्तर अहवाल पाठविणे आवश्यक आहे, तथापी याबाबत संबंधित विभाग व किरकोळ वसुली विभाग यांच्यामध्ये योग्य तो समन्वय नसल्याचे निदर्शनास येते.

वृत्तपत्रांमधील बातम्या प्रसिद्धीबाबत -

स्थानिक वृत्तपत्रांमध्ये दररोज जळगांव शहरातील विविध भागातील समस्या उदा.रस्ते, नाल्या, विद्युत व्यवस्था, साफसफाई, अतिक्रमण इत्यादीबाबत बातम्या प्रसिद्ध करण्यात येत असतात. सदर बातम्यांच्या अनुषंगाने एकत्रित कात्रणे ठेवणे, बातम्यांच्या अनुषंगाने संबंधित विभागांनी योग्य ती कार्यवाही करुन समस्येचे निराकरण करणे आवश्यक आहे. तसेच त्यानंतर अशा प्रकारच्या समस्यांचे निवारण झाले असल्यास त्याबाबत कुठलीही प्रसिद्धी महानगरपालिकेकडून देण्यात येत नाही. त्यामुळे दिवसेंदिवस महानगरपालिकेच्या समस्या वाढत असून महानगरपालिकेची नागरीकांच्या नजरेमध्ये प्रतिमा जास्तच मलीन होत आहे

व परिणामी नागरीकांमार्फत महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना घेराव घालणे, अधिकाऱ्यांना समस्या असलेल्या भागामध्ये पायी चालविणे, लोक प्रतिनिधींना घेराव घालणे यासारखे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच नागरीकांमार्फत कर भरण्यात येतो मात्र महानगरपालिकेमार्फत आवश्यक त्या प्राथमिक सुविधा पुरविण्यात येत नाही अशी भावना त्यांचे मनामध्ये निर्माण होते व याचा परिणाम हा कर भरणा करण्यावरही होत असल्याचे दिसून येतो व त्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न हे विहित वेळेमध्ये प्राप्त होत नाही व पर्यायाने भविष्यातील योजना राबविणे व नागरिकांना सोई-सुविधा पुरविणे यांवरही वितरित परिणाम होतो.

या अनुषंगाने प्रभावी उपाययोजना करणे, महानगरपालिकेच्या हद्दीमधील सर्व भागांमध्ये समप्रमाणात कामे करणे, कामांचा दर्जा योग्य राखणे जेणेकरुन कामे दर्जात्मक होऊन त्यांचा टिकाऊपणा राहून वारंवार दुरुस्तीवरील खर्चामध्ये बचत होईल, नागरीकांच्या समस्यांबाबत तक्रार नोंदवही ठेवणे व त्यानुसार त्यांचे वेळोवेळी निराकरण करणे आवश्यक आहे.

अतिक्रमण/वाहतुक समस्या -

जळगांव शहरामध्ये विविध ठिकाणी शॉपींग मार्केट बांधण्यात आलेले आहे, तथापी अशा ठिकाणी वाहनांच्या पार्कींगची सुविधा ही अत्यंत कमी प्रमाणात आहे. तसेच शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात किरकोळ विक्रेते, भाजीपाला विक्रेते, फेरीवाले विक्रेते, रिक्षा चालकांची वाहने, नागरीकांची चार चाकी/दोन चाकी वाहने लावण्यात आलेली असतात. त्यामुळे रहदारीसही अडथळा निर्माण होतो व शॉपींग मार्केटमध्ये येणारे नागरीकांना त्यांची वाहने लावण्याकरिता जागा उपलब्ध होत नाही व परिणामी अशा नागरीकांना जागा मिळेल त्या ठिकाणी वाहने लावावी लागतात. त्यामुळे जळगांव शहराच्या मुख्य रस्त्यांवर व मुख्य चौकांमध्ये वाहतुक कोंडी होत असल्याचे निदर्शनास येते, तसेच याबाबतही अनेक वेळा वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिद्ध होत असतात.

मार्केट परिसर व गर्दीच्या ठिकाणापासून जवळ असलेल्या महानगरपालिकेच्या विविध मालमत्तांचा शोध घेऊन त्यामध्ये मोकळ्या जागांवर बहुमजली पार्कींगची सोय केल्यास पे-ॲण्ड पार्कींगसाठी, तसेच काही जागा किरकोळे विक्रेते, भाजीपाला विक्रेते, फेरीवाल्यांच्या गाड्या-स्टॉल लावण्यासाठी वापरात येऊ शकतात, त्यामुळे महानगरपालिकेस एक उत्पन्नाचे साधनही निर्माण होईल व अतिक्रमण कमी होऊन रहदारीस होणारे अडथळेही कमी होऊ शकतील. जागा निश्चित करुन दिल्यानंतरही अशा प्रकारे रहदारीस अडथळे निर्माण होईल अशी परिस्थिती आढळल्यास पोलीस विभागाकडील वाहतुक शाखेच्या सहकार्याने असे अडथळे निर्माण करणाऱ्यांवर कार्यवाही करणे व त्यामध्ये सातत्य ठेवणेही आवश्यक आहे.त्यामुळे महानगरपालिकेला उत्पन्नाचा स्त्रोतही निर्माण होऊ शकतो व अतिक्रमण व वाहतुक समस्याही सुटण्यास मदत होऊ शकते.

त्याचप्रमाणे अशा समस्यांवर तोडगा काढण्यासाठी विकास आराखडा सुधारित करणे, त्यामध्ये भूसंपादनांचा समावेश करुन भूसंपादन करणे व अशा संपादित केलेल्या जागांवर वरीलप्रमाणे हॉकर्स झोन तयार करणे, पार्कींगची व्यवस्था करणे शक्य होऊ शकेल. तसेच यामध्ये हॉकर्स झोन, पार्कींगच्या जागांवर ठराविक दर निश्चित केल्यास महानगरपालिकेस उत्पन्नाचे साधनही निर्माण होऊ शकेल.

प्रदुषण स्तर -

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करित असतांना असे निदर्शनास येते की,

महानगरपालिका हद्दीमध्ये रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुर्दशा झालेली असून त्यामुळे धुळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. तसेच महानगरपालिका हद्दीमध्ये वृक्ष लागवडीचे प्रमाण अत्यल्प असल्याचे निदर्शनास येते. परिणामी जळगांव शहराचा प्रदुषण स्तर खालावलेला दिसून येतो. याबाबत दैनिक दिव्य मराठी या वृत्तपत्रामध्ये दिनांक 13/01/2024 रोजी प्रसिद्ध झालेल्या बातमीनुसार वीस वर्षांपूर्वी नावलौकीक असलेल्या जळगांव शहराचा स्वच्छ सर्वेक्षणामध्ये कचरा अन धुळीमुळे देश पातळीवर जळगांवचा क्रमांक 84 वरुन 167 वर घसरला आहे.

याबाबत योग्य ती उपाययोजना करणे, रस्त्यांची कामे विविध योजनांमधून लवकरात लवकर पूर्ण करुन ती दर्जात्मकरित्या करणे, रस्त्यांची कामे करत असतांना सांडपाणी/पावसाचे पाणी वाहून जाण्याकरिता योग्य ती उपाययोजना करणे जेणेकरुन पाणी रस्त्यांवर साचून रस्त्यांचे आयुष्यमान घटणार नाही याकडे लक्ष पुरविणे, मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करणे, लागवड करण्यात आलेल्या वृक्षांचे जतन करणे व त्यांची पूर्ण वाढ होईल याची काळजी घेणे, वृक्ष लागवडीमध्ये विविध संघटनांचा/नागरीकांचा सहभाग नोंदविणे, वाहतुक यंत्रणेचा सहभाग घेऊन अति प्रमाणात धूर सोडणाऱ्या वाहनांवर कार्यवाही करणे यांसारख्या उपाययोजना करता येऊ शकतात. याकरिता महानगरपालिका बांधकाम विभाग, पर्यावरण विभाग, आरोग्य विभाग तसेच शहर वाहतुक शाखा यांच्या संयुक्त कार्यवाहीमधूनही प्रदुषण स्तर उंचावण्याबाबत ठोस उपाययोजना आखता येऊ शकेल.

महानगरपालिका मिळकती -

महानगरपालिकेच्या मालकीच्या अनेक स्थावर व जंगम मालमत्ता आहेत. तथापी महानगरपालिकेकडे त्याबाबतचे अभिलेखे मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे परिपूर्ण ठेवण्यात आलेले नाही, यामध्ये फक्त एक यादी तयार करण्यात आलेली असून ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या किती व कोणत्या प्रकारच्या मालमत्ता अस्तित्वात आहेत याबाबत अद्ययावत माहिती उपलब्ध होऊ शकत नाही.

महानगरपालिकेच्या मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तांबाबत फक्त एक संगणीकृत यादी तयार करण्यात आली असून त्यामध्ये 30 मनपा मार्केट, 38 समाज मंदीर, 50 शाळा, 29 व्यायाम शाळा, 5 अधिकारी निवासस्थाने, 126 कर्मचारी निवासस्थाने, 4 वाचनालय, 9 दवाखाने, 11 घरकुल योजना, 27 मनपा बगीचे, 10 स्मशानभूमी, 4 जलतरण तलाव, 1 नाट्यगृह, 34 बालवाडी, 19 पाण्याच्या टाक्या, 15 अंगणवाडी, 40 विविध कार्यालये व युनिट कार्यालये, 4 अग्निशमन केंद्र, 14 इतर मिळकती, 9 जुने जकात नाके, 69 सार्वजनिक शौचालये, 19 मुताऱ्या यांची नोंद आहे. तथापी अशा मालमत्ता ह्या प्रत्यक्षात केंव्हा बांधकाम करण्यात आल्या, त्यांचे बांधकाम करतेवेळीचे मुल्य, त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांमुळे त्यांचे फेरमुल्यांकन यांचा तपशिल महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नमुना 16 मध्ये ठेवण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध मोकळ्या जागा, रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा योजना, घनकचरा प्रकल्प व अशाच प्रकारचे इतर प्रकल्प यांची स्वतंत्र नोंदवही ठेवणेत आलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेची मालकी असलेल्या अशा प्रकारच्या मालमत्तांची नोंदवही ठेवणे, त्यामध्ये मालमत्तेचा प्रकार, त्यांचे संपादनाचे वर्ष, बांधकामाचे वर्ष, त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा, त्यांचे मुल्यांकन/फेर मुल्यांकन, वार्षिक घसारा यांची माहिती महानगरपालिकेकडे उपलब्ध होत नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या मालमत्तांची संख्या व त्यांचे मुल्यांकन याबाबत द्विनोंद लेख्यांमध्ये दर्शविण्यात येणारे मुल्य हे वास्तविक नसल्याचे निदर्शनास येते.

उमाळा ता.जि.जळगांव येथे सन 2002 मध्ये खरेदी करण्यात आलेल्या शेतजमिनींपैकी एका शेतजमिनीच्या उताऱ्यावर अद्यापही मुळ मालकाचे नांव असून त्याने सदर उताऱ्यावर त्याच्या कुटुंबातील सदस्यांची नांवे वाढवलेली असल्याचे व वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊन कर्जाचा बोजा नमूद केल्याचे अद्यायावत उताऱ्यावरुन दिसून आले. सदर बाब अत्यंत गंभीर असून याकडे मा.आयुक्त यांनी गांभीर्याने लक्ष देणे व उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

मालमत्ता व्यवस्थापन विभागाने महानगरपालिका हद्दीमध्ये असलेल्या महानगरपालिकेच्या मालमत्ता जसे मोकळ्या जागा, रस्ते, नाल्या, इमारती, शाळा, व्यायामशाळा, समाजमंदीर, स्वच्छतागृहे, सार्वजनिक शौचालये व इतर असल्यास यांचा शोध घेऊन त्यांचे उतारे प्राप्त करणे, अशा मालमत्ता संपादनाचे वर्ष निश्चित करणे, त्यांचे मुल्यांकन/फेरमुल्यांकन करणे, रेखांकन मंजूर केल्यानंतर मोकळ्या सोडण्यात आलेल्या जागांवर महानगरपालिकेचे नांव लावले नसल्यास त्याबाबत कार्यवाही करणे या व अशा प्रकारच्या कार्यवाही करणे, आवश्यक त्या नोंदवह्यांमध्ये त्यांच्या योग्य त्या नोंदी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे बांधकाम विभागामार्फत नव्याने तयार करण्यात येणाऱ्या मालमत्तांसंबधात माहिती उपलब्ध करणे, नगररचना विभागाकडून आवश्यक माहिती उपलब्ध करणे याबाबत तीनही विभागांमध्ये समन्वय ठेवणे आवश्यक आहे, अन्यथा योग्य त्या समन्वयाअभावी इतर विभागांकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अभिलेखे अपूर्ण ठेवणेत येत असल्याचे निदर्शनास येते.

नगररचना विभाग -

महानगरपालिका हद्दीमध्ये नागरिकांमार्फत, बांधकाम व्यावसायिकांमार्फत रहीवासी, व्यावसायिक इमारतींची बांधकामे करण्यात येतात. अशी बांधकामे करण्यापूर्वी बांधकाम परवानगी घेणे आवश्यक असते. बांधकाम परवानगी घेतांना आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर शासन नियमानुसार आकारणी करण्यात येणारे विकास शुल्क, प्रशमन शुल्क, छाननी फी, आग सुरक्षा निधी, कामगार कल्याण उपकर, टीडीआर आयआयसी शुल्क इत्यादींबाबत परिगणना नमूद करणे आवश्यक आहे, तथापी अशी परिगणना नमूद करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते. बांधकाम परवानगीची कार्यवाही पूर्ण करण्यात आल्यानंतर त्याबाबत कर संकलन विभागास कळविणे आवश्यक आहे. बांधकाम सुरु करण्यात आल्यानंतर बांधकामाचे ठिकाणी महानगरपालिका अधिकाऱ्यांना तपासणी करण्याचे अधिकार असतांना त्याप्रमाणे तपासणी करण्यात येत नाही. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करणे आवश्यक आहे, भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याचे प्रमाण अत्यंत अल्प असल्याचे निदर्शनास येते.

महानगरपालिकेतील लेखापरीक्षण विभागामार्फत पूर्व लेखापरीक्षण करण्यात येत असल्याने बांधकाम परवानगी तसेच रेखांकन मंजुरी देतांना आकारण्यात येणारे विविध प्रकाराचे शुल्कांची आकारणी केल्यानंतर आकारणीबाबत अंतर्गत लेखापरीक्षण विभागामार्फत पडताळणी करणे आवश्यक आहे. तथापी याबाबतच्या संचिका अंतर्गत लेखापरीक्षण विभागामार्फत सादर होत नसल्याची बाब निदर्शनास येते.

तात्पुरते व त्यानंतर अंतिम रेखांकन मंजूर करण्यात आल्यानंतर रेखांकनाचे क्षेत्रामध्ये नियमानुसार 10% मोकळी जागा सोडणे, रस्ते/नाल्या/पथदिवे यांची सुविधा करणे संबंधित जागा मालकावर बंधनकारक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्यानंतर मोकळी जागा, रस्ते, नाल्या, पथदिवे यांच्या नोंदी महानगरपालिका मालमत्ता व्यवस्थापन विभागास कळविणे, महसुल

विभागाकडील उताऱ्यांवर महानगरपालिकेचे नांव लावणेची कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबतही नगररचना विभागामध्ये उदासिनता दिसून येते, त्यामुळे अशा प्रकारे मोकळया सोडण्यात आलेल्या जागांवर, रस्ते/नाल्या यांवर अद्यापही मुळ मालकाचीच नांवे असल्याचे ऑनलाईन उतारे तपासणी करता निदर्शनास आली आहे.

विकास शुल्क, गुंठेवारी शुल्क यांचे लेखे स्वतंत्र ठेवण्यात येतात. अशा खात्यांमध्ये जमा झालेल्या रकमा ह्या शासन निर्देशानुसार जमिन संपादन, रेखांकनाचे जागेमध्ये विज पुरवठ्यासह अन्य पायाभूत सुविधा पुरविण्याकरिता वापरणे आवश्यक आहे. त्यानुसार आवश्यक कार्यवाही करणेबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते. याबाबतही बांधकाम विभाग/पाणीपुरवठा विभाग/विद्युत विभाग व नगररचना विभाग यांच्यामध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत नसल्याने सदर निधीच्या खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निधी विनावापर पडून आहे व परिणामी नागरिक आवश्यक त्या सुविधांपासून वंचित राहत आहेत.

बांधकाम परवानगी, भोगवटा प्रमाणपत्र, रेखांकन मंजुरी याप्रकारच्या मंजुरीबाबत टिपणी सादर करतांना अत्यंत मोघम व त्रोटक स्वरुपात टिपणी लेखन करण्यात येते व त्यावर संबंधित सहायक नगररचनाकार, नगररचनाकार, सहायक संचालक यांचे शेरे नमुद करण्यात न येता फक्त स्वाक्षऱ्या करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येते. संबंधित वरिष्ठ अधिकारी यांचेकडे टिपणी सादर करतांना मंजुरीचे संपूर्ण स्वरुप, त्यापोटी जमा करण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या रकमांचे सविस्तर विवरण, मंजुरीचे प्राधिकार, मंजुरीबाबत परवानगी देणे किंवा नाकारणे अशा प्रकारच्या बाबींची स्पष्टता टिपणीमध्ये असणे आवश्यक आहे.

कोणतेही मंजुरीचे प्रकरण तयार करण्यात आल्यानंतर त्यासंबंधितची संचिका कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांच्या टेबलावर सात कामाच्या दिवसांचे वा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही, तसेच कोणत्याही प्रकरणामध्ये 60 दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागता कामा नये. तथापी अनेक संचिकांमध्ये मा.आयुक्त यांची मंजुरी प्रदान करण्यात आल्यानंतर त्यासंबंधीचे आदेश निर्गमित करण्याकरिता मोठ्या प्रमाणात कालावधी लोटलेला दिसून येतो. उदा.श्री.पांडुरंग रघुनाथ काळे यांचे अभिन्यास मंजुरीच्या प्रकरणामध्ये मा.आयुक्त यांची मंजुरी प्रदान झाल्यानंतर प्रत्यक्ष आदेश 8 महिन्यांच्या कालावधीनंतर निर्गमित करण्यात आलेले आहेत.

पाणीपुरवठा विभाग -

जळगांव शहर महानगरपालिकेंतर्गत शहरामध्ये पाणीपुरवठ्याकरिता वाघूर धरणाजवळ पंपींग मशिनरी बसविण्यात आली असून अशा पंपींग मशिनरीद्वारे पाणी उचलण्यात येते. त्यानंतर ते उमाळा गांवाजवळील जलशुद्धीकरण केंद्रामध्ये नेण्यात येते. जलशुद्धीकरण केंद्रामध्ये पाण्यावर तुरटी, क्लोरीन यांद्वारे प्रक्रीया करुन शहरामधील विविध पाण्याच्या टाक्यांपर्यंत पाणी पोहचविण्यात येते. सदर योजनेमध्ये सद्य:स्थितीत तुरटीचे खडे व क्लोरीन गॅसचे नळकांड्या वापरण्यात येतात, भविष्यात सदर बाबीसाठी द्रवरुपातील तुरटी व क्लोरीन वापरण्यासाठी बांधीव टाक्यांची तरतुद करण्यात आलेली आहे, जलशुद्धीकरण केंद्रामधून शहरातील पाण्याच्या टाक्यांपर्यंत नैसर्गिक उताराचा लाभ घेण्यात येऊन विना मोटर/पंपींग मशिनरी पाणी पोहोच करण्यात येत असल्यामुळे विजेची मोठ्या प्रमाणात बचत होत आहे, असे संबंधित अभियंता यांचेमार्फत सांगण्यात आले, एकदा पाणी शुद्ध केल्यानंतर अशुद्ध स्वरुपातील पाणी पुन्हा रि-सायकल करुन शुद्धीकरण केले जाते त्यामुळे पाण्याचा व्यय कमी होतो, जलशुद्धीकरण

केंद्रामध्ये नियंत्रणाचे दृष्टीने SCADA प्रणालीचा वापर सुरु करण्यात आलेला आहे, त्यामुळे प्रशासकीय इमारतीमध्ये पाणीपुरवठा अभियंता यांना संगणकावर जलशुद्धीकरण व वाघूर धरणाजवळील पंपींग स्टेशन येथील कार्यप्रणाली तपासणी करुन त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य होते, जलशुद्धीकरण केंद्र व वाघुर धरण स्थळी सोलर सिस्टीम बसविण्यात आलेल्या असून कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे विज देयकांमध्ये बचत होत असल्याचे संबंधीत अभियंता यांनी निदर्शनास आणून दिले अशा प्रकारच्या जमेच्या बाजू निदर्शनास येतात. सदर प्रकारची यंत्रणा भविष्यातही नियमित योग्यरित्या कार्यान्वीत राहील व त्यामध्ये भविष्यातील गरजांनुसार आवश्यक ते बदल करण्यात येतील याकडे पाणीपुरवठा विभागाने लक्ष पुरविणे आवश्यक राहील.

लेखापरीक्षण करत असतांना निदर्शनास येते की, शहरातील विविध भागात वारंवार पाईप लाईन फुटल्यामुळे पाणी गळतीच्या समस्या उद्भवतात व परिणामी नागरिकांना मुळातच 2 दिवसांआड होणारा पाणीपुरवठा हा 1 दिवसाने लांबतो. त्याचप्रमाणे अशा प्रकारे वारंवार करण्यात येणाऱ्या दुरुस्त्यांमुळे नव्याने बांधकाम झालेल्या रस्त्यांमध्ये खोदकाम करण्यात येते व परिणामी रस्त्यांची पुन:श्च दुर्दशा होत असल्याचे दिसून येते. अशा प्रकारच्या गळतीच्या समस्या उद्भवणार नाही याबाबत महानगरपालिकेमार्फत कायमस्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील इतर महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रांमध्ये अशा प्रकारच्या समस्यांवर करण्यात येत असलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने अभ्यास करता येऊ शकेल. नव्याने कार्यान्वीत होत असलेल्या अमृत जलवाहीनीमध्ये गळतीचे प्रमाण कमी असले तरी व्हॉल्व्ह दुरुस्तीची कामे वारंवार उद्भवत आहेत, असे लेखापरीक्षणादरम्यान निदर्शनास आले. अशा व्हॉल्व्हच्या ठिकाणी रस्ते बांधकाम करतांना चेंबर तयार करुन त्यावर झाकण बसविणेची तरतुद करता येऊ शकेल, जेणे करुन अशा व्हॉल्व्हच्या दुरुस्तीची कामे करतांना रस्ता खोदकाम करण्याची आवश्यकता पडणार नाही व परिणामी रस्ते खराब होण्याचे प्रमाणही कमी करता येऊन रस्त्यांचे आयुष्यमान वाढवता येऊ शकेल.

बांधकाम विभाग -

बांधकाम विभागामार्फत विकास कामे जसे रस्ते, नाल्या, विविध योजनांतर्गत कामे करण्यात येत असतात. सदर कामे प्रस्तावित करतांना प्रस्तावित ठिकाणी याच प्रकारचे काम यापूर्वी कोणत्या वर्षी करण्यात आले होते याबाबतचा उल्लेख प्रस्तावामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. कामांची अंदाजपत्रके तयार करतांना प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण करुन प्रस्तावित कामाची जागा योग्य व अतिक्रमित विरहीत असल्याबाबत खात्री करता येऊ शकेल व आवश्यक मापे नोंदवून वास्तविक अंदाजपत्रक तयार करणे शक्य होईल. अंदाजपत्रक तयार करतांना सार्वजनिक बांधकाम नियमावली, रेड बुक स्पेसिफिकेशन, दरसूची व वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय यांमधील निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे. प्रत्येक कामाचे अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करण पत्रक, कामाची मोजमाप पत्रक, खदाण दर्शक नकाशा, कामाचा नकाशा जोडणे आवश्यक आहे. कामाचे आदेश, कंत्राटदारासमवेत करण्यात येणारा करारनामा यांमध्ये कोणत्याही त्रृट्या राहणार नाही याबाबत दक्षता घेणे, कंत्राटाचा कालावधी योग्य नमूद करणे, दोष निवारण कालावधी शासन नियमानुसार नमूद करणे, विहित कालावधीमध्ये काम पूर्ण न झाल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतुद नमूद करणे व इतर आवश्यक त्या बाबी करारनाम्यामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. कामामध्ये वापरण्यात येणाऱ्या गौण खनिजाची परिगणना सार्वजनिक बांधकाम विभागाचे दरसूचीमध्ये दिलेल्या गुणकानुसार योग्य त्या रितीने करुन स्वामित्वधनाची रक्कम योग्य ती परिगणना करुन वसुल करणे आवश्यक आहे. शासकीय विमा निधीच्या रकमा संबंधित कंत्राटदार यांनी विमा निधीकडे विमा काढला नसल्यास विमा संचालनालयाचे व नगरविकास विभागाचे निर्देशानुसार प्रथम धावते देयकामधून करार किंमतीवर 1% प्रमाणे विमा

रक्कम वसुल करणे व विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे. कामामध्ये वापरण्यात येणाऱ्या साहित्यांचे चाचणी अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाचे निकषांनुसार व निर्देशांनुसार शासकीय प्रयोगशाळेकडूनच करणे आवश्यक आहे.

रस्ता डांबरीकरणामध्ये वापरावयाचे डांबराची खरेदी ही शासकीय रिफायनरीमधून करणे आवश्यक आहे व त्याकरिता त्याबाबतचे खरेदीचे देयके कंत्राटदाराकडून प्राप्त करणे, अशी देयके प्राप्त केल्यानंतर त्यांच्या मुळ प्रतींवर कामनिहाय डांबर वापराबाबतचा तपशिल नमूद करणे, प्राप्त करण्यात आलेल्या डांबराची योग्य ती तपासणी करणे व त्यानंतरच डांबर वापरास परवानगी देणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकामध्ये डांबर खरेदीकरिता मुंबई येथील शासकीय रिफानयरीचे अंतर दर्शविण्यात येऊन त्यानुसार वहनावळीचे दर देण्यात येतात, तथापी संबंधित कंत्राटदाराकडून मुळ देयके प्राप्त करण्यात येत नसल्यामुळे कंत्राटदाराने मुंबई येथून डांबर खरेदी न करता स्थानिक बाजारातून डांबर खरेदी केल्यास अशा बाबतीत डांबराचे वहनावळीच्या अंतराचे जादा प्रदान संबंधित कंत्राटदारांना होऊ शकते. त्याचप्रमाणे डांबर खरेदीची देयके प्राप्त करण्यात आल्यानंतर अशा देयकांनुसार आवश्यक माहिती संबंधित कंपनीकडे मेलद्वारे पाठविण्यात येऊन खरेदीबाबत खात्री करणे आवश्यक आहे, जेणेकरुन सादर करण्यात आलेली देयके ही बनावट नसल्याबाबत पडताळणी करता येऊ शकेल. ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे निर्देशानुसार व त्या धर्तीवर एका कामासाठी एक मोजमाप वही ठेवण्यात यावी, काम मोठे असल्यास एक मोजमाप वही संपल्यानंतर दुसरी वही सुरु करता येऊ शकेल. कामानुसार पुस्तकाचा आकार 20 पानी, 50 पानी, 100 पानी ठरविता येईल.

सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक दिनांक 26/05/2014 अन्वये डांबरीकरणाचा प्रस्ताव तयार करण्यापूर्वी जलनिस्सारणाच्या कामांचा सविस्तर ड्रेनेज प्लॅन तयार करुन त्याप्रमाणे डांबरीकरणाची कामे करण्यापूर्वी जलनिस्सारण सुधारण्याची कामे मंजूर ड्रेनेज प्लॅननुसार पूर्ण करण्यात यावी असे निर्देश आहेत. तथापी कोणत्याही रस्ते डांबरीकरणाच्या प्रस्तावामध्ये जलनिस्सारणाबाबतच्या कामांचा समावेश केलेला दिसून येत नाही. त्यामुळे सद्य:स्थितीतही म्हणजे लेखापरीक्षण करीत असतांना जळगांव शहरामध्ये मोठ्या प्रमाणात पावसाळ्यामध्ये रस्त्यावर पाणी साचत असल्याची परिस्थिती आहे व त्यामुळे डांबरी रस्त्यांचे आयुष्यही कमी होऊन रस्ते तयार झाल्यानंतर काही महिन्यांमध्येच रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुर्दशा होत असल्याचे दिसून येत आहे.

महिला व बालकल्याण विभाग -

महानगरपालिकांतर्गत महिला व बालकल्याण विभाग कार्यरत असून सदर विभागामार्फत महानगरपालिका क्षेत्रांतगत महिला व बालकांविषयक योजना राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी शासन निर्देशांनुसार 5% महिला व बालकल्याण, 3% दिव्यांग कल्याण, 5% मागासवर्गीय कल्याण याबाबत अंदाजपत्रकामध्ये तरतुदी करणे व त्यानुसार खर्च करणे करणे आवश्यक आहे. याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये तरतुद करण्यात येतात, तथापी प्रत्यक्षात योजना राबविण्याबाबत उदासिनता दिसून येते, त्यामुळे लाभार्थी उचित लाभ मिळण्यापासून वंचित राहतात.

आरोग्य विभाग -

महानगरपालिका हद्दीमधील नागरिकांना प्राथमिक सुविधा पुरवितांना आरोग्य विषयक सुविधा पुरविणे आवश्यक आहे त्यामध्ये सार्वजनिक साफसफाई, घनकचरा संकलन, नाल्या सफाई, कचरा कुंड्या सफाई इत्यादी कामे आरोग्य विभागामार्फत करणे आवश्यक आहे. घनकचरा संकलनामध्ये कंत्राटदारास पुरविण्यात आलेल्या गाड्यांना जीपीएस प्रणाली बसविणे, प्रत्येक घराच्या दर्शनी भागावर विशिष्ट प्रकारचे क्यूआर कोड बसविणे व त्यांचे स्कॅनिंगची संगणक आज्ञावली तयार करणे व त्यानुसार गाड्यांच्या व कचरा संकलनाबाबतचे रिपोर्ट तयार करणे आवश्यक आहे, सदर रिपोर्टद्वारे संबंधित कंत्राटदाराची देयके तपासणी करुन प्रदान करणे आवश्यक आहे, जेणेकरुन कचरा संकलनापोटी कंत्राटदारास जादा प्रदान होणार नाही त्याचप्रमाणे कचरा संकलनाबाबत नागरिकांच्या तक्रारी निर्माण होणार नाहीत. नागरी वस्त्यांमध्ये असलेल्या नाल्या वेळोवेळी साफसफाई होणे, विविध ठिकाणी टाकण्यात येणारा कचऱ्यांची उचल होणे आवश्यक आहे, तथापी लेखापरीक्षण कालावधीमध्ये वृत्तपत्रांमधील बातम्या वाचनात आल्या असता याबाबत योग्य ती कार्यवाही होत नसल्याची बाब निदर्शनास येते.

01) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011, प्रकरण क्रमांक 30, कलम 415 अन्वये एकूण खर्चाचे अंदाजपत्रक हे मागील तीन वर्षांच्या प्रत्यक्ष प्राप्त रकमांची सरासरी किंवा अर्थसंकल्पीय वर्षाच्या अंदाजित प्राप्त रकमा,यापैकी जे कमी असेल,यापेक्षा अधिक असणार नाही.सन 2014-2015, 2015-2016 आणि 2016-2017 मधील प्रत्यक्ष प्राप्त रकमांची सरासरी 165.26 कोटी एवढी आहे. याप्रमाणे सरासरी असताना सन 2017-2018 चे अर्थसंकल्पीय अंदाज प्रचंड प्रमाणात फुगवण्यात आले आहेत. सबब सन 2017-2018 चा अर्थसंकल्प हा वस्तुस्थितीवर आधारित असल्याचे दिसून येत नाही.

02) शासन निर्णय क्र. संकीर्ण-2009/प्र.क्र.20/09/न.वि. दि.02/08/2010 नुसार पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे. पाणी पुरवठा योजनेचा मागील तीन वर्षातील जमा व खर्च खालीलप्रमाणे आहे.

अक्र	तपशील	वर्षवार जमा/खर्च रक्कम (रु. लाखात)		
		2014-15	2015-16	2016-17
1	जलदाय व्यवस्थेमुळे मिळालेल्या रकमा			
अ	महसुली जमा	1686.78	1695.10	1896.44
2	जलदाय वितरण व्यवस्था			
अ	महसुली खर्च	1925.24	2199.15	2126.07

	जलदाय वितरण व्यवस्थेवर खर्च झालेल्या रक्कमेच्या तुलनेत वसुल रक्कमेची टक्केवारी			

उपरोक्त वरून असे दिसून येते कि मागील तीन वर्षातील पाणीपुरवठा योजनेतील खर्च हा प्रत्यक्ष जमेपेक्षा अधिकच झालेला आहे. शासन निर्णय क्र. संकीर्ण-2009/प्र.क्र.20/09/न.वि. दि.02/08/2010 नुसार पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण असणे आवश्यक आहे परंतु अर्थसंकल्पात त्या दृष्टीने कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाहीत.

03) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-1081/6056/64-10 दिनांक 03/07/1982 अन्वये महानगरपालिकेने महसुली उत्पन्नाच्या 5 टक्के दुर्बल घटकांसाठी खर्च करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्रमांक जीईएन-1093/325/प्र.क्र. 24 दिनांक 17/04/1993 आणि शासन निर्णय, क्रमांक जीईएन-1093/1198/नवि-14 दिनांक 14/07/1993 नुसार महानगरपालिकेने महसुली उत्पन्नाच्या 5% उत्पन्न महिला व बालविकास कार्यक्रमासाठी आणि त्यासाठीच्या विविध लाभांच्या योजनांसाठी खर्च करणे आवश्यक आहे.

तसेच महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीईएन-1655/प्र.क्र.46/नवि-33 दिनांक 14/02/2002 नुसार महापालिकेने महसुली उत्पन्नाच्या 3% उत्पन्न अपंगासाठी कल्याणकारी योजनावर खर्च करणे अपेक्षित आहे.तसेच तशी तरतूददेखील अर्थसंकल्पात करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेचे सन 2017-18 चे सुधारीत अंदाजपत्रकानुसार महिला व बालविकास कल्याण, अंपग, मागासवर्गीय कल्याणकारी योजना करीता तरतूद - त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे. (रु. लाखा मध्ये)

अ.क्र.	लेखाशिर्ष	सन 2017-18 केलेली तरतूद	सन 2017-18 केलेला प्रत्यक्ष खर्च	कमी खर्च
1.	महिला व बालकल्याण कार्यक्रम 5 टक्के	200	12.89	187.11
2.	अपंग पुनर्वसन 3 टक्के	100	1.11	98.89
3.	दुर्बल घटक कल्याणकारी योजना ndash; 5 टक्के	255	---	255

वरील उपलब्ध माहितीवरून असे लक्षात येते कि महानगरपालिकेने शासन निर्णयानुसार व अंदाजपत्रकिय तरतुदीप्रमाणे खर्च केलेला नाही, त्यामुळे लाभार्थी अपेक्षित लाभापासून वंचित राहिले आहेत.

04) महाराष्ट्र नागरी क्षेत्र झांडाचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 अन्वये झाडे तोडण्याचे नियमन करुन राज्याच्या नागरी क्षेत्रातील झाडांचे जतन करण्यासाठी अधिक चांगली तरतूद करण्यासाठी आणि त्या क्षेत्रात समुचित प्रमाणात नविन झाडे लावण्याची तरतूद करणे अंर्तभुत करण्यात आलेले आहे. या अधिनियमातील कलम 2 (क) मध्ये झाडांचे

जतन करणे म्हणजे केवळ नविन झाडे लावणे आणि झाडे जिवंत राहण्यासाठी आणि त्यांच्या संख्येत वाढ होणे करीता इतर कामे करणे असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. तसेच प्रकरण सहा कलम 15 अन्वये एकुण जमा रकमेच्या frac12; % रकमेची वृक्ष प्राधिकरण खाती तरतूद करणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. जळगाव महानगरपालिकेने सदर केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	लेखाशिर्ष	सन 2017-18 आवश्यक तरतूद	सन 2017-18 च्या सुधारीत अंदाजपत्रकानुसार केलेली तरतूद	सन 2017-18 केलेला प्रत्यक्ष खर्च
1	वृक्ष प्राधिकरण	निरंक	निरंक	निरंक

वरील माहितीवरून असे लक्षात येते कि महानगर पालिकेने शासन अधिनियमांतील तरतुदींचे पालन केलेले नाही.

05) सन 2017-18 च्या मुळ मंजूर अर्थसंकल्पात सन 2016-2017 मधील स्पिल ओव्हर कामांचे दायित्व रक्कमेचा तपशील उपलब्ध करुन देण्यात आला नाही. तरी याबाबत योग्य कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

06) अंदाजपत्रक रकमेपेक्षा कमी जमा खालीलप्रमाणे दिसून येतात

अ क्र	तपशील	जमा अंदाज	प्रत्यक्ष जमा	जमा टक्केवारी
1	मालमत्ता कर (जमिनीवरील)	265222311	18428536	6.94 %
2	मालमत्ता कर (इमारती व जमिनीवरील)	379457000	202188553	53.28 %
3	वैद्यकीय सेवा	2388000	1004952	42.08 %
4	मनपा मिळकती पासूनचे उत्पन्न	277412193	215509887	77.68%
5	पाणीपुरवठा कर	348952446	161438016	46.26%
6	मलनिस्सारण कर	42780647	14728501	34.42%
	एकूण	1316212597	613298445	46.59%

अंदाजपत्रक रकमेनुसार जास्तीत जास्त रकमा वसूल करणेबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.तथापि त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने जमेची टक्केवारी अत्यल्प दिसून येते.जमेच्या अंदाजानुसार खर्चाचे अंदाज तयार करण्यात येत असतात.तथापि वसुलीचे प्रमाण अत्यल्प असल्याने विकास कामांवरही त्याचा परिणाम होऊन सामान्य नागरिकांना सुविधांपासून वंचित राहावे लागलेले आहे.

07) अंदाजपत्रक रकमेपेक्षा जादा खर्च खालीलप्रमाणे दिसून येतो.

अ क्र	तपशील	खर्च अंदाज	प्रत्यक्ष खर्च	जादा खर्च
1	कर्ज फेड रक्कम	480500000	520000000	39500000

अंदाजपत्रक रकमेपेक्षा जादा खर्च होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तथापी वरीलप्रमाणे कर्ज फेडीकरिता जादा खर्च करण्यात आलेला दिसून येतो. कर्जफेड वेळोवेळी करण्यात न आल्यास कर्जाचा बोजा वाढून पुढील अंदाजपत्रकीय तरतुदींवर परिणाम होऊन इतर बाबींकरिता निधीची कमतरता भासणे व विकास कामावर विपरित परिणाम झालेला दिसून येतो.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 235 दिनांक 19/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 138, Hmm No : 235)

3 द्विनोंद लेखे सन 2016-2017 मधील त्रृट्यांबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी **कलम** : 9अ **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान जळगांव शहर महानगरपालिकेने तयार केलेले सन 2016-2017 या आर्थिक वर्षांच्या द्विनोंद लेख्यांची तपासणी करण्यात आली. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.लेखासु-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31 दिनांक 06/07/2005 मधील अ.क्र.(i) अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपालिकांना उपर्जित पद्धतीने दुहेरी नोंद लेखापद्धतीची (Accrual Based Double Entry Accounting System) अंमलबजावणी सुरु करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे, अ.क्र.(ii) अन्वये दुहेरी नोंद लेखा पद्धतीच्या अंमलबजावणीसाठी राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार होईपर्यंत राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिकेचा उपयोग करावा, यामध्ये नगरपरिषद प्रशासन संचालनालयातील लेखा सुधारणा कक्षचे पूर्व सहमतीने त्यात किरकोळ बदल करता येतील असे निर्देश देण्यात आलेले आहे.

सन 2016-2017 या आर्थिक वर्षांच्या द्विनोंद लेख्यांची तपासणी करण्यात आली असून त्याअनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) वरील शासन निर्णय दिनांक 06/07/2005 नुसार राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिकेमधील नमुन्यांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 93 नुसार स्थायी समितीच्या निर्देशानुसार नमुन्यांमध्ये

लेखे/अभिलेखे ठेवण्यात येत नसून नगरपालिका लेखासंहिता 1971 मध्ये लेखे ठेवण्यात येत आहेत.त्यामुळे शासन निर्देशांनुसार सुधारित नमुन्यांमध्ये लेखे ठेवण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते.

02) राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिका 2004 मधील परिशिष्ट-1 मधील नमुन्यांमध्ये महानगरपालिकेचे सर्व नमुने ठेवणे आवश्यक आहे. सन 2016-2017 च्या वार्षिक लेख्यांची तपासणी दरम्यान प्रामुख्याने खालील नमुने मागणी करण्यात आले होते, तथापी अशा नमुन्यांमध्ये अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

अ. क्र.	तपशिल	नमुना नंबर
1	Register of Advance	GEN-16
2	Register of Permanent Advance	GEN-17
3	Deposit Register	GEN-18
4	Statement of outstanding liabilities for expenpenses	GEN-38
5	Register of Immovable Properties	GEN-30
6	Register of Movable Properties	GEN-31
7	Register of Lands	GEN-32
8	Asset Replacement Register	GEN-35
9	Register of Public Lighting System	GEN-36
10	Investment Ledger/Register	IN-1
11	Summary Statement of Capaital Work in progress	PW-1
12	Register of Loans	BR-1
13	Register of Sinking Fund	BR-3

03) राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिका 2004 मधील प्रकरण 31 मधील वित्तीय विवरणपत्रे व विहित नमुन्यांमध्ये वार्षिक वित्तीय विवरणपत्रे तयार करणे आवश्यक आहे, त्यामध्ये प्रामुख्याने ताळेबंदपत्रक (Balance Sheet), उत्पन्न व खर्च विवरणपत्र (Income Expenditure Statement), रोख प्रवाह विवरणपत्र (Statement of Cash flow), जमा व प्रदाने विवरणपत्र (Receipt Payments Account), लेख्यांवरील भाष्य (Notes to Accounts), वित्तीय कार्यक्षमतेबाबतचे निर्देशक (Financial Performance Indicators) तयार करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिका 2004 मधील परिशिष्ट-1 मधील नमुने व नोंदवह्या ठेवणे आवश्यक आहे. तथापी द्विनोंद लेख्यांच्या पुस्तकांमध्ये फक्त ताळेबंदपत्रक, उत्पन्न व खर्च विवरणपत्र तयार करण्यात आलेले आहे, अनुषंगिक इतर नोंदवह्या व नमुने ठेवण्यात आलेले नाहीत. त्यामुळे ताळेबंदपत्रक, उत्पन्न व खर्च विवरणपत्र यांची योग्य ती तपासणी

करणे शक्य झाले नाही.

04) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 94, 105 व 106 नुसार महानगरपालिकेने तयार केलेले लेखे मुख्य लेखापरीक्षक यांचेकडून तपासणी करुन असे तपासणी झालेले लेखे त्यांचे अभिप्रायासह स्थायी समितीसमोर ठेवणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे वार्षिक लेखे स्थायी समितीसमोर मान्यतेकरिता ठेवण्यात आले असल्यास त्याबाबतचे अभिलेखे व मंजूर ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास येते.

05) सन 2016-2017 च्या द्विनोंद लेख्यांमध्ये दर्शविण्यात आलेल्या सुरुवातीच्या शिल्लक रकमा ह्या सन 2015-2016 च्या द्विनोंद लेख्यांमधील अंतिम शिलकेसोबत पडताळणी करण्यात आली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आढळून आली, त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे,

Particulars	Closing Balance as per 2015-16	Opening Balance as per 2016-17	Difference
Liabilities			
Municipal Fund Reserves	803811883.58	803881946.63	-70063.05
Grants contribution for specific purpose	738174958.60	738174958.60	0.00
Secured Unsecured Loans	1792639899.00	1792639899.00	0.00
Interest on Loan	1994025627.00	1994025627.00	0.00
Employers Liability	287709817.78	287709817.78	0.00
Suppliers, contractors Other Liabilities	342187646.53	331517257.53	10670389.00
Liability to Citizens	175000.00	175000.00	0.00
Amount payable to Government	9067420.50	9067420.50	0.00
Others liabilities	62456298.00	73056627.00	-10600329.00
Total Liabilities	**6030248550.99**	**6030248554.04**	**-3.05**
Assets			
Fixed Movable Assests	5949806750.80	5949806750.80	0.00
Less Accumulated Depreciation	-1880197740.16	-1880197740.16	0.00
Caital Works in progress	0.00	0.00	0.00

Investments	245133855.73	245133855.73	0.00
Stock in hand all	0.00	0.00	0.00
Sundry Debtors all	734933116.65	734933116.65	0.00
Loans Advances (Asset)	177791523.99	177791523.99	0.00
Cash at Bank	766510377.98	766510381.03	-3.05
Cash in hand	35826734.00	35826734.00	0.00
Other Assets	443932.00	443932.00	0.00
Total Assets	**6030248550.99**	**6030248554.04**	**-3.05**

वरीलप्रमाणे तफावतींबाबत सोबतच्या शेड्युल्सची तपासणी करण्यात आली असता खालीलप्रमाणे तफावती दिसून येतात.

Schedule No.	Particulars	Closing Balance as per 2015-16	Opening Balance as per 2016-17	Difference
B-1	3110 - Municipal Fund	627671636.58	627741699.63	-70063.05
B-6	3600 - General Bill (Waghur Dam Water Bill Payable)	10670329.00	0.00	10670329.00
B-6	3690 - Other suppliers and contractors liability	137506381.03	137506321.03	60.00
B-9	3900 - Other liabilities (Subhash Marathe)	70000.00	0	70000.00
B-9	3990 - (Waghur Dam Water Bill)	0	10670329.00	-10670329.00
	Total	775918346.61	775918349.66	-3.05

06) शेड्युल बी-1 हे मनपा निधी व राखीव निधीचे आहे, तथापी त्यामध्ये खालील योजनांच्या रकमा नमुद करण्यात आलेल्या आहेत. सदर निधींच्या रकमा ह्या शेड्युल बी-2 ठराविक कामांकरिता अनुदान यामध्ये दर्शविणे आवश्यक होते.

अ.क्र.	तपशिल	शिल्लक रकमा
1	अल्पसंख्याक अनुदान	6045888.00

2	एकात्मिक गृहनिर्माण योजना (IHDSP)	29515949.00
3	नागरी दलीत वस्ती सुधार योजना (पाणीपुरवठा)	167539.00
4	राजीव आवास योजना	1241546.00
5	विशेष निधी	19573262.00
6	वृक्ष संवर्धन निधी	25373.65
	एकूण	56569557.65

तसेच राखीव निधीमध्ये खालीलप्रमाणे निधींची तरतुद नमुद करण्यात आलेल्या नाहीत.

1	3% किंवा 5% महिला बालकल्याण निधी
2	5% अपंग कल्याण निधी
3	3% क्रिडा निधी

07) शेड्युल बी-2 विशिष्ट उद्दिष्टांकरिता अनुदान यामध्ये 3224 अंतर्गत अमृत बगीचा ग्रीन स्पेस योजनेची शिल्लक रक्कम रु.6177952/- इतकी दर्शविण्यात आलेली आहे, तथापी रोखपुस्तकानुसार अखेरची शिल्लक रु.4677952/- अशी दिसून येते व रु.1500000/- इतकी रक्कम मुदत ठेवीमध्ये गुंतविण्यात आलेली आहे, सदर गुंतवणुकीची रक्कम रु.1500000/- शेड्युल बी-2 मध्ये दर्शविण्यात आलेली नाही, शेड्युल बी-15 बँक खाते मध्ये रु.6177952/- इतकी दर्शविण्यात आलेली आहे, तर द्विनोंद लेख्यांच्या पुस्तकामध्ये जोडण्यात आलेल्या ताळमेळ पत्रकामध्ये रु.1500000/- इतकी रक्कम Amount not reflected in bank अशी दर्शविण्यात आलेली आहे. सदर तफावतीचा शोध घेण्यात येऊन योग्य त्या दुरुस्त्या करणे आवश्यक आहे.

08) शेड्युल बी-2 अमृत पाणीपुरवठा योजना खात्यामध्ये रु.430589912/- इतकी दर्शविण्यात आली असून रोखपुस्तकानुसार अलाहाबाद बँक खात्यामध्ये रु.230589912/- अधिक आयसीआयसीआय बँक खात्यामध्ये रु.2000000/- असे एकूण रु.430589912/- अशी शिल्लक असून शेड्युल बी-15 बँक खाते रक्कम एकत्रित रु.430589912/- इतकी दर्शविण्यात आलेली आहे. तसेच द्विनोंद लेख्यांच्या पुस्तकामध्ये जोडण्यात आलेल्या ताळमेळ पत्रकामध्ये राष्ट्रीय रस्ते प्राधिकरण धुळे यांना अदा करण्यात आलेल्या एकूण रकमा रु.3357999/- अखर्चित दर्शविण्यात आलेली असून बँकेच्या खात्यानुसार अखेरची शिल्लक रु.233947911/- अशी दर्शविण्यात आलेली आहे. सदर रकमा योजनेच्या रोखपुस्तकानुसार प्रमाणक क्र.2 व 3 दिनांक 3/12/2016 अन्वये अदा करण्यात आलेल्या आहे व तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटलेला असल्याने सदरचा धनादेश रद्द करुन रोख पुस्तकामध्ये पुन:श्च जमा घेणे

आवश्यक होते. तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही.

09) शेड्युल बी-15 बँकेतील रोख रकमा मध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजनेची शिल्लक रक्कम रु.5479270/- इतकी दर्शविण्यात आली असून रोखपुस्तकानुसारही रु.5479270/- इतकी आहे, त्यामुळे तफावत दिसून येत नाही, तथापी सदर खात्यामध्ये दिनांक 11/07/2016 रोजीचे 5 धनादेश रक्कम रु.30000/- बँकेमार्फत खर्ची टाकलेले नसल्याचे रोखपुस्तकामध्ये नमुद आहे, तथापी द्विनोंद लेखा पुस्तकामधील ताळमेळ पत्रकामध्ये सदर खात्याचे विवरणपत्र जोडण्यात आलेले नाही.

10) शेड्युल बी-2 अनुदान मध्ये जिल्हा वार्षिक योजनेची रक्कम रु.461021/- दिसून येते, तथापी शेड्युल बी-15 बँक शिल्लक तपशिलामध्ये सदर रक्कम दिसून येत नाही. त्यामुळे सदर रक्कम फक्त दायित्व बाजूला दिसून येते तथापी मत्ता बाजूला दिसून येत नाही.

11) गुंतवणूक नोंदवहीनुसार स्टेट बँक ऑफ हैद्राबाद यांचेकडील पावती क्रमांक - (नमूद नाही), दिनांक 16/01/2016 रक्कम रु.3050533/- नमूद असून द्विनोंद लेख्यांमध्ये दिनांक 06/02/2016 व रक्कम रु.3050534/- असा नमूद आहे, त्यामुळे तारखेमध्ये तफावत असून रकमेमध्येही रु.1/- ची तफावत दिसून येते.

12) गुंतवणूक नोंदवहीनुसार परिभाषिक निवृत्ती वेतन योजनेच्या लेख्यांमध्ये अ.क्र.17 वर आयडीबीआय बँकेची पावती क्र.7207717 दिनांक 13/6/2015 अन्वये रु.3403935/- परिणत होण्याचा दिनांक 25/10/2016 अशी नोंद दिसून येते, तथापी द्विनोंद लेख्यांमधील शेड्युल बी-12 मध्ये सन 2015-16 चे अंतिम शिलकेच्या रकमेच्या रकान्यामध्ये सदर रक्कम दिसून येत नाही. सदर पावती 2015-16 चे नोंदवहीमधील नोंदीनुसार शेरा रकान्यामध्ये मुदतपूर्व व्याजासह जमा डेबुक पान नं.63 सन 2015-16 अशी नोंद घेण्यात आलेली आहे मात्र सदर नोंदीवर पेन्सीलने काट मारण्यात आलेले आहेत, त्यामुळे सदर नोंदीबाबत लेखापरीक्षणात योग्य ती खात्री करता आली नाही.

13) गुंतवणूक नोंदवहीनुसार परिभाषिक निवृत्ती वेतन योजनेच्या लेख्यांमध्ये अ.क्र.22 वर अलाहाबाद बँकेची पावती क्र.826915 दिनांक 10/4/2016 रक्कम रु.18290/- अशी नोंद असून परिपक्वतेचा दिनांक 11/04/2017 असा नमूद आहे. सदर पावती द्विनोंद लेख्यांमध्ये दिसून येत नाही, किंवा मुदतपूर्व जमा घेतली असल्यास तशी नोंद घेण्यात आलेली नाही.

14) गुंतवणूक नोंदवही पृष्ठ क्र.141 वर जेडीसीसी बँक शेअर्स नमुद करण्यात आलेले असून दिनांक 14/06/1984 पासून दिनांक 12/11/2001 पावेतो विविध तारखांना एकूण रु.28178100/- इतक्या शेअर्सच्या रकमा दिसून येतात. सदरच्या शेअर्सच्या रकमा डिव्हीडंट/बोनस/व्याजासह संबंधित बँकेकडून परत प्राप्त करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचा मोठ्या प्रमाणात निधी विनावापर अडकून पडलेला आहे.

15) द्विनोंद लेख्यांमधील शेड्युल बी-12 नुसार जनरल फंड गुंतवणूकीच्या खालील पावत्या ह्या गुंतवणूक नोंदवहीमध्ये

दिसून येत नाही.

बँक	पावती क्रमांक	दिनांक	गुंतवणूक कालावधी (दिवस)	रक्कम
अलाहाबाद बँक (संत गाडगेबाबा अभियान)	--	03/03/2017	-	1500000
अलाहाबाद बँक	107854	03/03/2017	90	9000000
अलाहाबाद बँक	107855	03/03/2017	90	9000000
अलाहाबाद बँक	107856	03/03/2017	90	9000000
अलाहाबाद बँक	107857	03/03/2017	90	9000000
अलाहाबाद बँक	107858	03/03/2017	90	9000000
अलाहाबाद बँक	107859	03/03/2017	45	9000000
अलाहाबाद बँक	107860	03/03/2017	45	9000000
अलाहाबाद बँक	107861	03/03/2017	45	9000000
अलाहाबाद बँक	107862	03/03/2017	45	9000000
अलाहाबाद बँक	107863	03/03/2017	45	9000000
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ गॅरंटी	-	-	-	1500000
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ	-	-	-	50000
पोष्ट सेव्हींग बँक (स्मॉल सेव्हींग)	-	-	-	33143.73
एकूण				93083143.73

त्याचप्रमाणे वरील यादीनुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे एकूण रु.1550000/- इतकी पडून राहिलेली दिसून येते, सदर रक्कम परत मिळविणे आवश्यक आहे. तसेच पोस्ट ऑफीस खात्यामध्येही रु.33144/- रक्कम पडून आहे, सदर रक्कम विनावापर पडून असल्यास खाते बंद करुन निधीच्या नियमित खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सदर रकमा ह्या गुंतवणूकीच्या नसल्यास सदर लेखाशिर्षामधून कमी करण्यात येऊन योग्य त्या

लेखाशिर्षाखाली दर्शविणे आवश्यक आहे.

16) अमृत ग्रीन स्पेस योजना रोखपुस्तकानुसार दिनांक 03/03/2017 रोजी रु.1500000/- इतकी गुंतवणूक करण्यात आल्याबाबत नोंद आहे, तथापी सदर रकमा गुंतवणूक नोंदवहीमध्ये तसेच द्विनोंद लेख्यांमध्ये दर्शविण्यात आलेल्या नाहीत.

17) ताळेबंद पत्रकामध्ये मत्ता (Assets) बाजूला Fixed Movable Assets व Accumulated Depreciation समोर रकमा दर्शविण्यात आलेल्या असून त्याबाबत अनुक्रमे शेड्युल B-10 व B-11 जोडण्यात आलेले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.44, दिनांक 28/8/2023, क्र.57 दि.5/1/223, क्र.66 दिनांक 01/11/2023, क्र.91 दिनांक 24/11/2023 व क्र.180 दिनांक 27/02/2024 नुसार स्थावर मालमत्ता/जमिनींच्या नोंदवही व त्यासंबंधित अभिलेखांची मागणी करण्यात आली. त्यानुसार महानगरपालिकेचे मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचे पत्र क्र.3714 दिनांक 20/03/204 अन्वये सन 2021 पासून मालमत्ता व्यवस्थापन विभाग स्वतंत्र निर्माण करण्यात आला असून नगररचना विभाग व बांधकाम विभाग यांनी मनपाच्या विविध मालमत्तांबाबत असणारी कागदपत्रे, धारिका इत्यादी मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरीत केलेली नाही अशा आशयाचे अनुपालन सादर केलेले आहे. म्हणजेच महानगरपालिकेकडे असलेल्या मालमत्तांबाबत आवश्यक अभिलेखे तसेच त्याबाबतच्या आवश्यक नोंदवह्या ठेवण्यात आलेल्या नसल्यामुळे शेड्युलमध्ये दर्शविण्यात आलेल्या चल व अचल मालमत्ता यांचे सविस्तर तपशिल, संपादनाचे वर्ष, संपादनापासून आकारण्यात येणारा घसारा व त्यामुळे सध्याची किंमत याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही. याबाबत Accounting policies and notes to account मधील अ.क्र.14(a) मध्ये मालमत्ता संपादनाच्या रकमांबाबतचा तपशिल उपलब्ध न झाल्यामुळे आर्थिक वर्षामध्ये वाढ झालेल्या मालमत्तांवर घसारा आकारणी करण्यात आलेला असल्याबाबत नमुद करण्यात आलेले आहे. शेड्युल बी-10 तपासणी करण्यात आली असता वर्षामध्ये मालमत्तांमध्ये रु.115339164/- इतकी वाढ झालेली दिसून येते, तर शेड्युल बी-11 नुसार घसारामध्ये रु.1165341/- इतकी वाढ झालेली आहे, म्हणजे वर्षामधील मालमत्ता संपादनाच्या प्रमाणात घसारा रक्कम आकारणी करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास येते.

18) ताळेबंद पत्रकामध्ये मत्ता (Assess) बाजूला Capital work progress समोर रक्कम शून्य (0) दर्शविण्यात आलेली आहे. बांधकाम विभागाचे लेखापरीक्षणादरम्यान अनेक कामे ही अपूर्ण असल्याचे आढळून आलेले असून अशा अपूर्ण कामांवर काही प्रमाणात खर्च करण्यात आलेला आहे. अशा प्रकारच्या 31 मार्च अखेर अपूर्ण म्हणजेच प्रगतीपथावरील कामांवर झालेल्या खर्चाच्या अनुषंगाने अशा रकमा सदर लेखाशिर्षाखाली दर्शविणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे शासकीय निधीच्या रकमा दायित्व बाजूला शेड्युल बी-2 अनुदाने व मत्ता बाजूला शेड्युल बी-15 बँकेतील रकमा या शिर्षांमधून कमी झालेल्या आहेत, तथापी त्यामधून अंशत: निर्माण होणाऱ्या मालमत्तांच्या रकमा लेख्यांमध्ये दर्शविण्यात आलेल्या नसल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे संबंधित विभागांनी प्रगतीपथावरील कामांच्या नोंदवह्या/नमुने ठेवलेले नाही, त्यामुळे याबाबत अचूक पडताळणी करता आली नाही.

19) ताळेबंद पत्रकामध्ये दायित्व (Liabilities) बाजूला विविध देणे रकमा जसे Interest on Loan (Schedule B-4), Employers Liabilities (B-5), Suppliers, Contractors Other liabilities (B-6), Liability to citizen (B-7), Amount payable to Government (B-8), Other Liabilities (B-9) या शिर्षासमोर रकमा दर्शविण्यात आलेल्या आहेत, सदर रकमांबाबत अभिलेखे मागणी करण्यात आली तथापी लेखापरीक्षणास आवश्यक अभिलेखे उपलब्ध झाली नाही, त्यामुळे याबाबत पडताळणी करता आली नाही.त्यामुळे सदरच्या रकमा कोण-कोणत्या बाबींच्या देय आहेत याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. तसेच यामध्ये कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी/अंशदायी निवृत्ती वेतन योजनेच्या रकमा यांचा समावेश असणे आवश्यक आहे, तथापी त्याबाबतचे विवरण जोडलेले नसल्याने लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होत नाही.

20) ताळेबंद पत्रकामधील शेड्युल बी-6 नुसार पुरवठादार, कंत्राटदार व इतर यांचे दायित्व म्हणजेच देय सुरक्षा रकमांपोटी रु.332675492.53 इतकी रक्कम दर्शविण्यात आलेली आहे, ह्या तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीच्या सुरक्षा रकमा व्यपगत करणे आवश्यक असून अशा व्यपगत रकमा उत्पन्न व खर्च विवरणपत्रामध्ये दर्शविणे आवश्यक आहे, तथापी उत्पन व खर्च विवरणपत्रामधील शेड्युल आय-8 नुसार व्यपगत सुरक्षा रकमा निरंक दर्शविण्यात आलेल्या आहेत. उत्पन्न व खर्च विवरणपत्र शेड्युल आय-7 मध्ये युवराज चंद्रकांत वाघ यांचे सुरक्षा रकमेवर रु.2000/- व्याज प्राप्त झाल्याचे दर्शविण्यात आलेले आहे, सदर व्याज कसे प्राप्त झाले याबाबत अभिलेखे ठेवण्यात आलेले नाहीत त्यामुळे याबाबत पडताळणी करता आली नाही. सदर अग्रिमाच्या रकमा ह्या महानगरपालिका निधीमधून देण्यात आलेल्या कि शासन निधीमधून देण्यात आलेल्या आहे याबाबतही लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होत नाही. सदर अग्रिम रकमांमुळे शासनाचे तसेच महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. तसेच विकास कामांवरही परिणाम होत असल्याचे लेखापरिक्षणाचे मत आहे. प्रलंबित असलेल्या अग्रिमाच्या रकमा ह्या ज्या विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या-त्या विभागांनी सदरच्या रकमा वसुलीबाबतची ठोस कार्यवाही करणे आवश्यक असतांना त्या-त्या विभागाने विहित मुदतीमध्ये वसुलीची किंवा पुढील देयकांमधून समायोजनाची कार्यवाही पार पाडलेली नसल्यामुळे प्रलंबित रकमांची थकबाकी मोठ्या प्रमाणात दिसून येते, तरी संबंधित विभागांनी सदर रकमा वसुलीची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व योग्य निधीच्या खात्यामध्ये किंवा शासन निधीच्या बाबतीत योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करणे आवश्यक आहे.

21) मत्ता बाजूला शेड्युल बी-14 नुसार कर्मचारी, कंत्राटदार व शासनाने विविध विभाग यांना अग्रिम रकमा देण्यात आलेल्या असून सन 2016-2017 अखेर एकूण रु.176303932/- इतक्या रकमा प्रलंबित आहेत. सदर यादीनुसार काही रकमांमध्ये सुरुवातीच्या शिल्लक व अखेरची शिल्लक या सारख्यांच दिसून येतात, म्हणजेच आर्थिक वर्षामध्ये कोणत्याही रकमा वसुल करण्यात आलेल्या नाही. त्यामध्ये काही रकमा ह्या फार मोठ्या प्रमाणात असल्याने महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. उदाहरणादाखल काही मोठ्या रकमांबाबत तपशिल खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे. सदर रकमा संबंधितांकडून लवकरात लवकर वसुल करणे आवश्यक आहे, अन्यथा महानगरपालिकेचे कायमस्वरुपी मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अ. क्र.	तपशिल	रक्कम
1	ए.पी.एजन्सी	150000
2	ॲटलांटा कंस्ट्रक्श प्रा.लि.	82672889
3	सेंच्युरी सिमेंट	188250
4	गोलाणी ब्रदर्स भुसावळ	6021445
5	जहागिरदार ॲग्रो प्रॉडक्टस्	175000
6	जैन एरिगेशन सिस्टीम	100000
7	जळगांव कंस्ट्रक्शन्स	2414000
8	जळगांव एंटरटेंटमेंट चॅनेल	200000
9	जे.जे.ओसवाल	100000
10	जे.व्ही.शर्मा	400000
11	के.बी.देसर्डा	125000
12	खांदेश बिल्डर्स	75533624
13	महेंद्र इलेक्ट्रीकल्स स्टोर पुणे	200000
14	माणिकगढ सिमेंट	265847
15	एम.एम.अग्रवाल	154500
16	नंदकिशोर कंस्ट्रक्शन्स	200000
17	ओम खेतान	150000
18	पिक्सेल पॉईंटस् लि. मुंबई	1500000
19	प्रमोद जोशी शिल्पकार मुंबई	165000

20	प्रशांत सुरेश वाघ	150000
21	राजा ट्रॅक्टर	123825
22	रुस्तमजी इन्फोटेक सर्व्हीसेस	277100
23	सामाजिक वनीकरण	100000
24	एस.बी.इंजिनिअरींग	101675
25	सर्वोदय सर्व्हीस सेंटर	100000
26	सुयोग इंडस्ट्रीज वर्क्स जळगांव	158357
27	वेर्गो स्पोर्टस् पुणे	710000
28	विशाल एजन्सीज	250000

22) महानगरपालिकेचे सन 2016-2017 चे द्विनोंद लेख्यांचे पुस्तक हे एस.एस.लोढा अॅण्ड असोसिएटस्, सनदी लेखापाल, जळगांव यांचेकडून तयार करुन घेण्यात आलेले असून पुस्तकातील प्रत्येक पृष्ठावर सनदी लेखापाल यांचे गोल शिक्के उमटविण्यात आलेले असून ताळेबंद पत्रकावर त्यांची स्वाक्षरी करण्यात आलेली आहे. तथापी महानगरपालिकेचे लेखे असल्याने त्यावर मा.मुख्य लेखा अधिकारी तसेच मा.आयुक्त महानगरपालिका यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सदर द्विनोंद वार्षिक लेख्यांचे प्रमाणीकरण करणे शक्य होणार नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.242, दिनांक 26/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 161, Hmm No : 242)

4 द्विनोंद लेखे सन 2017-2018 मधील त्रृट्यांबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी **कलम** : 9अ **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान जळगांव शहर महानगरपालिकेने तयार केलेले सन 2017-2018 या आर्थिक वर्षांच्या द्विनोंद लेख्यांची तपासणी करण्यात आली.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.लेखासु-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31 दिनांक 06/07/2005 मधील अ.क्र.(i) अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपालिकांना उपर्जित पद्धतीने दुहेरी नोंद लेखापद्धतीची (Accrual Based Double Entry Accounting System) अंमलबजावणी सुरु करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे, अ.क्र.(ii) अन्वये दुहेरी नोंद लेखा पद्धतीच्या अंमलबजावणीसाठी राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार होईपर्यंत राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिकेचा उपयोग करावा, यामध्ये नगरपरिषद प्रशासन संचालनालयातील लेखा सुधारणा कक्षचे पूर्व सहमतीने त्यात किरकोळ बदल करता येतील असे निर्देश देण्यात आलेले आहे.

सन 2017-2018 या आर्थिक वर्षांच्या द्विनोंद लेख्यांची तपासणी करण्यात आली असून त्याअनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) वरील शासन निर्णय दिनांक 06/07/2005 नुसार राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिकेमधील नमुन्यांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 93 नुसार स्थायी समितीच्या निर्देशानुसार नमुन्यांमध्ये लेखे/अभिलेखे ठेवण्यात येत नसून अद्यापही नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नमुन्यांमध्ये लेखे ठेवण्यात येत आहेत. त्यामुळे शासन निर्देशांनुसार सुधारित नमुन्यांमध्ये लेखे ठेवण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

02) राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिका 2004 मधील परिशिष्ट-1 मधील नमुन्यांमध्ये महानगरपालिकेचे सर्व नमुने ठेवणे आवश्यक आहे. सन 2016-2017 च्या वार्षिक लेख्यांची तपासणी दरम्यान प्रामुख्याने खालील नमुने मागणी करण्यात आले होते, तथापी अशा नमुन्यांमध्ये अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

अ. क्र.	तपशिल	नमुना नंबर
1	Register of Advance	GEN-16
2	Register of Permanent Advance	GEN-17
3	Deposit Register	GEN-18
4	Statement of outstanding liabilities for expenpenses	GEN-38
5	Register of Immovable Properties	GEN-30
6	Register of Movable Properties	GEN-31
7	Register of Lands	GEN-32
8	Asset Replacement Register	GEN-35
9	Register of Public Lighting System	GEN-36
10	Investment Ledger/Register	IN-1

11	Summary Statement of Capaital Work in progress	PW-1
12	Register of Loans	BR-1
13	Register of Sinking Fund	BR-3

03) राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिका 2004 मधील प्रकरण 31 मधील वित्तीय विवरणपत्रे व विहित नमुन्यांमध्ये वार्षिक वित्तीय विवरणपत्रे तयार करणे आवश्यक आहे, त्यामध्ये प्रामुख्याने ताळेबंदपत्रक (Balance Sheet), उत्पन्न व खर्च विवरणपत्र (Income Expenditure Statement), रोख प्रवाह विवरणपत्र (Statement of Cash flow), जमा व प्रदाने विवरणपत्र (Receipt Payments Account), लेख्यांवरील भाष्य (Notes to Accounts), वित्तीय कार्यक्षमतेबाबतचे निर्देशक (Financial Performance Indicators) तयार करणे आश्यक आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिका 2004 मधील परिशिष्ट-1 मधील नमुने व नोंदवह्या ठेवणे आवश्यक आहे. तथापी द्विनोंद लेख्यांच्या पुस्तकांमध्ये फक्त ताळेबंदपत्रक, उत्पन्न व खर्च विवरणपत्र तयार करण्यात आलेले आहे, अनुषंगिक इतर नोंदवह्या व नमुने ठेवण्यात आलेले नाहीत. त्यामुळे ताळेबंदपत्रक, उत्पन्न व खर्च विवरणपत्र यांची योग्य ती तपासणी करणे शक्य झाले नाही.

04) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 94, 105 व 106 नुसार महानगरपालिकेने तयार केलेले लेखे मुख्य लेखापरीक्षक यांचेकडून तपासणी करुन असे तपासणी झालेले लेखे त्यांचे अभिप्रायासह स्थायी समितीसमोर ठेवणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे वार्षिक लेखे स्थायी समितीसमोर मान्यतेकरिता ठेवण्यात आले असल्यास त्याबाबतचे अभिलेखे व मंजूर ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास येते.

05) सन 2017-2018 च्या द्विनोंद लेख्यांमध्ये दर्शविण्यात आलेल्या सुरुवातीच्या शिल्लक रकमा ह्या सन 2016-2017 च्या द्विनोंद लेख्यांमधील अंतिम शिलकेसोबत पडताळणी करण्यात आली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आढळून आली, त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे,

Particulars	Closing Balance as per 2016-17	Opening Balance as per 2017-18	Difference
Liabilities			
Municipal Fund Reserves	615179748.13	542844652.44	72335095.69
Grants contribution for specific purpose	1378640111.60	1250975385.29	127664726.31
Secured Unsecured Loans	1790765605.00	1790765605.00	0.00
Interest on Loan	1994025627.00	1994025627.00	0.00

Employers Liability	383152227.78	383171865.78	-19638.00
Suppliers, contractors Other Liabilities	332675492.53	332892569.38	-217076.85
Liability to Citizens	200000.00	200000.00	0.00
Amount payable to Government	77964580.50	77964580.50	0.00
Others liabilities	91366577.00	91156277.00	210300.00
Total Liabilities	**6663969969.54**	**6463996562.39**	**199973407.15**
Assets			
Fixed Movable Assests	6065145914.80	6065145914.80	0.00
Less Accumulated Depreciation	-1884970143.16	-1884970143.16	0.00
Caital Works in progress	0.00	0.00	0.00
Investments	374300181.73	375800181.73	-1500000.00
Stock in hand all	0.00	0.00	0.00
Sundry Debtors all	736678531.65	736678531.65	0.00
Loans Advances (Asset)	176303931.99	176336274.34	-32342.35
Cash at Bank	1178623838.03	977118088.53	201505749.50
Cash in hand	17443782.50	17443782.50	0.00
Other Assets	443932.00	443932.00	0.00
Total Assets	**6663969969.54**	**6463996562.39**	**199973407.15**

06) शेड्युल बी-1 हे मनपा निधी व राखीव निधीचे आहे, सदर शेड्युलच्या राखीव निधीमध्ये खालीलप्रमाणे निधींची तरतुद नमुद करण्यात आलेल्या नाहीत.

1	3% किंवा 5% महिला बालकल्याण निधी
2	5% अपंग कल्याण निधी
3	3% क्रिडा निधी

07) शेड्युल बी-15 नुसार अमृत बगीचा ग्रीन स्पेस खात्याची बँकेतील शिल्लक रु.6858158.00 इतकी दर्शविण्यात

आलेली आहे, तथापी रोखपुस्तकानुसार रु. 6928495.00 इतकी आहे. त्यामुळे रु.70337/- ची तफावत दिसून येते. सदर तफावतीबाबत ताळमेळ पत्रक तयार करण्यात आलेले नाही, त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता येत नाही.

08) शेड्युल बी-12 ची तपासणी केली असता सन 2016-17 चे शेड्युलमध्ये अमृत बगीचा ग्रीन स्पेस योजनेची पावती रक्कम रु.1500000/- दर्शविण्यात आली नव्हती, तथापी सन 2017-18 चे शेड्युलमध्ये मागिल शेवटची शिलकेमध्ये म्हणजे सन 2016-17 चे रकान्यामध्ये सदर पावती दर्शविण्यात आली असून सन 2017-18 चे रकान्यामध्ये रु.70337/- जादा दर्शविण्यात आलेली दिसून येते. तसेच सदर रक्कम सन 2017-18 मध्ये पुनर्गंतवणूक केल्याबाबत रोखपुस्तकामध्ये दर्शविण्यात आलेली दिसून येत नाही, त्याचप्रमाणे गुंतवणूक नोंदवहीमध्येही सदर पावतीची नोंद नाही. मुलभूत सुविधा योजनेच्या रोखपुस्तकानुसार दिनांक 06/03/2018 रोजी व्याजासह रक्कम रु.26150806/- पुनर्गुंतवणूक केल्याबाबत नमूद करण्यात आलेले आहे, तथापी शेड्युल बी-12 नुसार सदर रक्कम रु.26387239/- अशी नमूद करण्यात आलेली आहे, त्यामुळे रु.236433/- इतकी तफावत दिसून येते.

09) द्विनोंद लेख्यांमध्ये शेड्युल बी-12 मध्ये भविष्य निर्वाह निधीच्या गुंतवणूकांमध्ये खालीलप्रमाणे गुंतवणूका दिसून येतात, तथापी त्यांचा तपशिल गुंतवणूक नोंदवहीमध्ये दिसून येत नाही, तर गुंतवणूक नोंदवहीमध्ये नोंदविलेल्या पावत्यांचा तपशिल द्विनोंद लेख्यांच्या शेड्युल-बी-12 मध्ये दिसून येत नाही, तथापी एकत्रित बेरजा जुळत असल्याचे दिसून येते. त्यामुळे लेख्यांमध्ये दर्शविलेल्या रकमांबाबत योग्य तो ताळमेळ होत नाही.

द्विनोंद लेखे शेड्युल बी-12 नुसार		गुंतवणूक नोंदवही नुसार	
गुंतवणूक तपशिल	रक्कम	गुंतवणूक तपशिल	रक्कम
अलाहाबाद बँक पावती दि.01/09/2016	7391871	अलाहाबाद बँक पावती क्र.9278871 दि.3/11/2015	14848906
नवीन एफडी	36325860	अलाहाबाद बँक पावती क्र.927883 दि.18/12/2015	10286040
		अलाहाबाद बँक पावती क्र.107702 दि.2/09/2016	6499041
		अलाहाबाद बँक पावती क्र.927874 दि.14/11/2016	1012485
		अलाहाबाद बँक पावती क्र.927882	4241106

		दि.14/11/2016	
		अलाहाबाद बँक पावती क्र.927875 दि.14/11/2016	6830153
एकूण	43717731		43717731

10) गुंतवणूक नोंदवहीमध्ये जनरल फंड निधीमधून दिनांक 03/03/2018 रोजी अलाहाबाद बँकेमध्ये पावती क्र.107842 रु.16077789/- एक वर्षांच्या कालावधीकरिता गुंतवणूक केलेली आहे, सदर पावती द्विनोंद लेखा शेड्युल बी-12 मध्ये दर्शविण्यात आलेली नाही.

11) द्विनोंद लेखा शेड्युल बी-12 मध्ये खालील पावत्या दर्शविलेल्या आहेत, तथापी त्यांच्या नोंदी गुंतवणूक नोंदवहीमध्ये घेण्यात आलेल्या नाहीत.

बँक	पावती क्रमांक	दिनांक	गुंतवणूक कालावधी (दिवस)	रक्कम
अलाहाबाद बँक (टीपी एफडीआर)	--	02/11/2017	90	30451234
अलाहाबाद बँक (टीपी प्रिमियम एफडीआर)	--	02/11/2017	90	15223151
अलाहाबाद बँक (टीपी टीडीआर एफडीआर)	--	02/11/2017	90	30451234
अलाहाबाद बँक (संत गाडगेबाबा अभियान)	--	03/03/2017	-	1500000
अलाहाबाद बँक	107854	03/03/2017	90	9544540
अलाहाबाद बँक	107855	03/03/2017	90	9544540
अलाहाबाद बँक	107856	03/03/2017	90	9544540
अलाहाबाद बँक	107857	03/03/2017	90	9544540
अलाहाबाद बँक	107858	03/03/2017	90	9544540
अलाहाबाद बँक	107859	03/03/2017	45	9544540
अलाहाबाद बँक	107860	03/03/2017	45	9544540

अलाहाबाद बँक	107861	03/03/2017	45	9544540
अलाहाबाद बँक	107862	03/03/2017	45	9544540
अलाहाबाद बँक	107863	03/03/2017	45	9544540
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ गॅरंटी	-	-	-	1500000
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ	-	-	-	50000
पोष्ट सेव्हींग बँक (स्मॉल सेव्हींग)	-	-	-	33143.73
एकूण				1583143.73

त्याचप्रमाणे वरील यादीनुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे एकूण रु.1550000/- इतकी पडून राहिलेली दिसून येते, सदर रक्कम परत मिळविणे आवश्यक आहे. तसेच पोस्ट ऑफीस खात्यामध्येही रु.33144/- रक्कम पडून आहे, सदर रक्कम विनावापर पडून असल्यास खाते बंद करुन निधीच्या नियमित खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सदर रकमा ह्या गुंतवणूकीच्या नसल्यास सदर लेखाशिर्षामधून कमी करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली दर्शविणे आवश्यक आहे.

12) गुंतवणूक नोंदवही पृष्ठ क्र.141 वर जेडीसीसी बँक शेअर्स नमुद करण्यात आलेले असून दिनांक 14/06/1984 पासून दिनांक 12/11/2001 पावेतो विविध तारखांना एकूण रु.28178100/- इतक्या शेअर्सच्या रकमा दिसून येतात.zwj; सदरच्या शेअर्सच्या रकमा डिव्हीडंट/बोनस/व्याजासह संबंधित बँकेकडून परत प्राप्त करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचा मोठ्या प्रमाणात निधी विनावापर अडकून पडलेला आहे.

13) ताळेबंद पत्रकामध्ये मत्ता (Assets) बाजूला Fixed Movable Assets व Accumulated Depreciation समोर रकमा दर्शविण्यात आलेल्या असून त्याबाबत अनुक्रमे शेड्युल B-10 व B-11 जोडण्यात आलेले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.44, दिनांक 28/8/2023, क्र.57 दि.5/1/223, क्र.66 दिनांक 01/11/2023, क्र.91 दिनांक 24/11/2023 व क्र.180 दिनांक 27/02/2024 नुसार स्थावर मालमत्ता/जमिनींच्या नोंदवही व त्यासंबंधित अभिलेखांची मागणी करण्यात आली. त्यानुसार महानगरपालिकेचे मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचे पत्र क्र.3714 दिनांक 20/03/204 अन्वये सन 2021 पासून मालमत्ता व्यवस्थापन विभाग स्वतंत्र निर्माण करण्यात आला असून नगररचना विभाग व बांधकाम विभाग यांनी मानपाच्या विविध मालमत्तांबाबत असणारी कागदपत्रे, धारिका इत्यादी मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरीत केलेली नाही अशा आशयाचे अनुपालन सादर केलेले आहे. म्हणजेच महानगरपालिकेकडे असलेल्या मालमत्तांबाबत आवश्यक अभिलेखे तसेच त्याबाबतच्या आवश्यक नोंदवह्या ठेवण्यात

आलेल्या नसल्यामुळे शेड्युलमध्ये दर्शविण्यात आलेल्या चल व अचल मालमत्ता यांचे सविस्तर तपशिल, संपादनाचे वर्ष, संपादनापासून आकारण्यात येणारा घसारा व त्यामुळे सध्याची किंमत याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही. याबाबत Accounting policies and notes to account मधील अ.क्र.14(a) मध्ये मालमत्ता संपादनाच्या रकमांबाबतचा तपशिल उपलब्ध न झाल्यामुळे आर्थिक वर्षामध्ये वाढ झालेल्या मालमत्तांवर घसारा आकारणी करण्यात आलेला असल्याबाबत नमुद करण्यात आलेले आहे. शेड्युल बी-10 तपासणी करण्यात आली असता वर्षामध्ये मालमत्तांमध्ये रु.8013154/- इतकी वाढ झालेली दिसून येते, तर शेड्युल बी-11 नुसार घसारामध्ये रु.7272220/- इतकी वाढ झालेली आहे, म्हणजे वर्षामधील मालमत्ता संपादनाच्या प्रमाणात घसारा रक्कम जादा दिसून येते.

14) ताळेबंद पत्रकामध्ये मत्ता (Assess) बाजूला Capital work in progress समोर रक्कम शून्य (0) दर्शविण्यात आलेली आहे. बांधकाम विभागाचे लेखापरीक्षणादरम्यान अनेक कामे ही अपूर्ण असल्याचे आढळून आलेले असून अशा अपूर्ण कामांवर काही प्रमाणात खर्च करण्यात आलेला आहे. अशा प्रकारच्या 31 मार्च अखेर अपूर्ण म्हणजेच प्रगतीपथावरील कामांवर झालेल्या खर्चाच्या अनुषंगाने अशा रकमा सदर लेखाशिर्षाखाली दर्शविणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे शासकीय निधीच्या रकमा दायित्व बाजूला शेड्युल बी-2 अनुदाने व मत्ता बाजूला शेड्युल बी-15 बँकेतील रकमा या शिर्षांमधून कमी झालेल्या आहेत, तथापी त्यामधून अंशत: निर्माण होणाऱ्या मालमत्तांच्या रकमा लेख्यांमध्ये दर्शविण्यात आलेल्या नसल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे संबंधित विभागांनी प्रगतीपथावरील कामांच्या नोंदवह्या/नमुने ठेवलेले नाही, त्यामुळे याबाबत अचूक पडताळणी करता आली नाही.

15) ताळेबंद पत्रकामध्ये दायित्व (Liabilities) बाजूला विविध देणे रकमा जसे Interest on Loan (Schedule B-4), Employers Liabilities (B-5), Suppliers, Contractors Other liabilities (B-6), Amount payable to Government (B-8), Other Liabilities (B-9) या शिर्षासमोर रकमा दर्शविण्यात आलेल्या आहेत, सदर रकमांबाबत अभिलेखे मागणी करण्यात आली तथापी लेखापरीक्षणास आवश्यक अभिलेखे उपलब्ध झाली नाही, त्यामुळे याबाबत पडताळणी करता आली नाही.त्यामुळे सदरच्या रकमा कोण-कोणत्या बाबींच्या देय आहेत याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. तसेच यामध्ये कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी/अंशदायी निवृत्ती वेतन योजनेच्या रकमा यांचा समावेश असणे आवश्यक आहे, तथापी त्याबाबतचे विवरण जोडलेले नसल्याने लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होत नाही.

16) शेड्युल बी-7 Liability of citizen मध्ये Public Accident Insurance ची सुरुवातीची देणे रक्कम रु.200000/- अशी दर्शविण्यात आलेली आहे, तर अखेरची शिललक शुन्य (0) अशी दर्शविण्यात आलेली आहे. सदर देणे देण्यात आले असल्यास त्याबाबतचे प्रमाणक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही, त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणात योग्य ती पडताळणी करता आली नाही.

17) ताळेबंद पत्रकामधील शेड्युल बी-6 नुसार पुरवठादार, कंत्राटदार व इतर यांचे दायित्व म्हणजेच देय सुरक्षा

रकमांपोटी रु.334370293.56 इतकी रक्कम दर्शविण्यात आलेली आहे, ह्या तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीच्या सुरक्षा रकमा व्यपगत करणे आवश्यक असून अशा व्यपगत रकमा उत्पन्न व खर्च विवरणपत्रामध्ये दर्शविणे आवश्यक आहे, तथापी उत्पन व खर्च विवरणपत्रामधील शेड्युल आय-8 नुसार व्यपगत सुरक्षा रकमा निरंक दर्शविण्यात आलेल्या आहेत.

18) मत्ता बाजूला शेड्युल बी-14 नुसार कर्मचारी, कंत्राटदार व शासनाने विविध विभाग यांना अग्रिम रकमा देण्यात आलेल्या असून सन 2017-2018 अखेर एकूण रु.178586643/- इतक्या रकमा प्रलंबित आहेत. सदर यादीनुसार काही रकमांमध्ये सुरुवातीच्या शिल्लक व अखेरची शिल्लक या सारख्यांच दिसून येतात, म्हणजेच आर्थिक वर्षामध्ये कोणत्याही रकमा वसुल करण्यात आलेल्या नाही. त्यामध्ये काही रकमा ह्या फार मोठ्या प्रमाणात असल्याने महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. उदाहरणादाखल काही मोठ्या रकमांबाबत तपशिल खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे. सदर अग्रिमाच्या रकमा ह्या महानगरपालिका निधीमधून देण्यात आलेल्या कि शासन निधीमधून देण्यात आलेल्या आहे याबाबतही लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होत नाही. सदर अग्रिम रकमांमुळे शासनाचे तसेच महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. तसेच विकास कामांवरही परिणाम होत असल्याचे लेखापरिक्षणाचे मत आहे. प्रलंबित असलेल्या अग्रिमाच्या रकमा ह्या ज्या विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या-त्या विभागांनी सदरच्या रकमा वसुलीबाबतची ठोस कार्यवाही करणे आवश्यक असतांना त्या-त्या विभागाने विहित मुदतीमध्ये वसुलीची किंवा पुढील देयकांमधून समायोजनाची कार्यवाही पार पाडलेली नसल्यामुळे प्रलंबित रकमांची थकबाकी मोठ्या प्रमाणात दिसून येते, तरी संबंधित विभागांनी सदर रकमा वसुलीची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व योग्य निधीच्या खात्यामध्ये किंवा शासन निधीच्या बाबतीत योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करणे आवश्यक आहे.

अ. क्र.	तपशिल	रक्कम
1	ए.पी.एजन्सी	150000
2	ॲटलांटा कंस्ट्रक्श प्रा.लि.	82672889
3	सेंच्युरी सिमेंट	188250
4	गोलाणी ब्रदर्स भुसावळ	6021445
5	जहागिरदार ॲग्रो प्रॉडक्टस्	175000
6	जैन एरिगेशन सिस्टीम	100000
7	जळगांव कंस्ट्रक्शन्स	2414000

8	जळगांव एंटरटेंटमेंट चॅनेल	200000
9	जे.जे.ओसवाल	100000
10	जे.व्ही.शर्मा	400000
11	के.बी.देसर्डा	125000
12	खांदेश बिल्डर्स	75533624
13	महेंद्र इलेक्ट्रीकल्स स्टोर पुणे	200000
14	माणिकगढ सिमेंट	265847
15	एम.एम.अग्रवाल	154500
16	नंदकिशोर कंस्ट्रक्शन्स	200000
17	ओम खेतान	150000
18	पिक्सेल पॉईंटस् लि. मुंबई	1500000
19	प्रमोद जोशी शिल्पकार मुंबई	165000
20	प्रशांत सुरेश वाघ	150000
21	राजा ट्रॅक्टर	123825
22	रुस्तमजी इन्फोटेक सर्व्हीसेस	277100
23	सामाजिक वनीकरण	100000
24	एस.बी.इंजिनिअरींग	101675
25	सर्वोदय सर्व्हीस सेंटर	100000
26	सुयोग इंडस्ट्रीज वर्क्स जळगांव	158357
27	वेर्गो स्पोर्टस् पुणे	710000

28	विशाल एजन्सीज	250000

19) महानगरपालिकेचे सन 2017-2018 चे द्विनोंद लेख्यांचे पुस्तक हे एस.एस.लोढा ॲण्ड असोसिएटस्, सनदी लेखापाल, जळगांव यांचेकडून तयार करुन घेण्यात आलेले असून पुस्तकातील प्रत्येक पृष्ठावर सनदी लेखापाल यांचे गोल शिक्के उमटविण्यात आलेले असून त्यांचे पत्र दिनांक 07/12/2018 अन्वये महानगरपालिकेस लेखे सादर केलेले आहेत. तथापी महानगरपालिकेचे लेखे असल्याने त्यावर मा.मुख्य लेखा अधिकारी तसेच मा.आयुक्त महानगरपालिका यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सदर द्विनोंद वार्षिक लेख्यांचे प्रमाणीकरण करणे शक्य होणार नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.243, दिनांक 26/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 162, Hmm No : 243)

5 पाणी पुरवठा विभागाकडील लेखे व नोदवहया उपलब्ध करणेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9अ **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या कालावधीतील पाणी पुरवठा विभागाचे लेखापरीक्षण करणे कामी संबधीत कर्मचारी व अधिकारी यांना प्रत्यक्ष बोलावुन लेखापरिक्षण कालावधीतील आवश्यक ते लेखे व नोंदवहया उपलब्ध करणे बाबत वेळोवेळी तोंडी सांगीतलेले असतांनाही खालीलप्रमाणे लेखे व नोंदवह्या परिपूर्ण नसल्याने लेखापरीक्षणात याबाबत योग्य ती पडताळणी करता आली नाही.

01) योजना निहाय पुर्ण विकास कामे आणि दुरुस्तीची कामे यांच्या स्वाक्षरी सह सन 2016-2017 व 2017-2018 मधील यादया

02) निरुपयोगी वस्तुंची साठा नोंद वही व लिलाव नस्ती.

03) आमदार निधी मोंजमाप पुस्तीका क्रमांक F 44 , A 104, A 181, A 107

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 120 दिनांक 03/01/2024 अन्वये अभिलेखे मागणी कऱण्यात आले होते, तथापि मागणीकृत अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहित, त्यामुळे लेखपरिक्षणात योग्य ती पडताळणी करता आली नाही.

DATPRAM6701 (Ref No : 108, Hmm No : 120)

6 अकृषक सारा बाबत सविस्तर माहिती मिळणेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9अ **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगाव शहर महानगरपालिकाचे सन 2016-2017 व 2017-2018 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण वेळी तहसीलदार जळगाव यांचेकडे सन 2016-17 या वर्षात प्रमाणक क्र.3368 दिनांक 31.03.2017 रु.15325340/- आणि प्रमाणक क्र 3369 दिनांक 31.03.2017 रु.12769700/- अशी एकूण रक्कम रु 28095040/- इतकी रक्कम महानगरपालिकेने अकृषक सारा म्हणून भरणा केल्याचे दिसते. सदर प्रमाणकासोबत मा.आयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका यांचे प्रमाणपत्र नुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने महानगरपालिकाकडे सन 2001 ते 2016 या आर्थिक वर्षातील अकृषक सा?याची थकबाकी रक्कम रु.7,31,91,398/- ची मागणी केलेली आहे. तरी अकृषक सारा बाबत मा.जिल्हाधिकारी जळगाव यांचेकडील अकृषक सारा मागणी पत्र, अकृषक सारा कोणत्या मालमत्तांचा आहे त्याचा सविस्तर तपशील, सन 2016-2017 व 2017-2018 या वित्तीय वर्षात भरणा केलेली एकूण रक्कम, दिनांक 31.03.2018 अखेर भरणा करणे बाकी रक्कम याबाबत अभिलेखांअभावी लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 240 दिनांक 19/04/2024 अन्वये माहिती मागविण्यात आली होती, तथापी विभागाकडून कोणती ही माहिती प्राप्त झालेली नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 131, Hmm No : 240)

7 भूसंपादन करणेकामी भरावयाच्या 50% रक्कम भरणा करणेबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9अ **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान विकास शुल्क खात्याची पडताळणी करण्यात आली असता खालीलप्रमाणे खर्च करण्यात आली आहे.

प्रमाणक क्रमांक व दिनांक	रक्कम	तपशिल
2499, दि.31/12/2016	12205000	भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव यांना मौजे मेहरुण शिवार स.नं.462/4/2 पैकी 30.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याखालील जागेच्या भूसंपादन प्रस्तावास 50 टक्के आगाऊ मोबदला रक्कम

		(भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव यांचे पत्र क्र.भूसंपा/एसआर/64/2016, दि.17/10/2016 अन्वये)

वरील विषयाच्या अनुषंगाने लेखापरीक्षणासाठी आवश्यक अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.108, दिनांक 07/12/2023 व अर्धसमास पत्र क्र.254, दिनांक 03/05/2024 अन्वये सूचित करण्यात आले होते. तथापी अभिलेखे उपलब्ध न झाल्याने वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. त्यामुळे करण्यात आलेला खर्च लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 176, Hmm No : 254)

8 आरक्षण क्र.139 सार्वजनिक विस्थापितांकरिता घरकुल योजनेकरिता जमिन संपादनाबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9अ **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान वित्त विभागाकडील प्रमाणकांची तपासणी करण्यात आली असता खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेले आहेत.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशिल
612	15/07/2016	2311747	भूसंपादन प्रस्ताव क्र.60/98 मौजे जळगांव प्रयोजन मंजुर विकास योजना जुनी हद्दीमधील आरक्षण क्र.139 सार्वजनिक विस्थापितांकरिता घरकुल योजनेकरिता संपादन मे.ना.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठ येथील रिट याचिका क्र.938 सिव्हील ॲप्लीकेशन नं.3391/2016 मध्ये पहिले/7559/2016 श्री.रविंद्र यशवंत नाईक व इतर अन्वये न्यायालयात निकाल दि.16/03/2016 पासून 12 आठवड्याचे आंत भरावयाची रक्कम

			एलएआर नं.1095/2005
613	15/07/2016	24013607	भूसंपादन प्रस्ताव क्र.60/98 मौजे जळगांव प्रयोजन मंजुर विकास योजना जुनी हद्दीमधील आरक्षण क्र.139 सार्वजनिक विस्थापितांकरिता घरकुल योजनेकरिता संपादन मे.ना.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठ येथील रिट याचिका क्र.938 सिव्हील ॲप्लीकेशन नं.3391/2016 मध्ये पहिले/7559/2016 श्री.रविंद्र यशवंत नाईक व इतर अन्वये न्यायालयात निकाल दि.16/03/2016 पासून 12 आठवड्याचे आंत भरावयाची रक्कम एलएआर नं.28/2005
614	15/07/2016	15290683	भूसंपादन प्रस्ताव क्र.60/98 मौजे जळगांव प्रयोजन मंजुर विकास योजना जुनी हद्दीमधील आरक्षण क्र.139 सार्वजनिक विस्थापितांकरिता घरकुल योजनेकरिता संपादन मे.ना.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठ येथील रिट याचिका क्र.938 सिव्हील ॲप्लीकेशन नं.3391/2016 मध्ये पहिले/7559/2016 श्री.रविंद्र यशवंत नाईक व इतर अन्वये न्यायालयात निकाल दि.16/03/2016 पासून 12 आठवड्याचे आंत भरावयाची रक्कम एलएआर नं.27/2005
	एकूण	**41616037**	

वरील रकमांच्या अनुषंगाने प्रमाणकांसोबत नगररचना विभागाकडील एकत्रित टिपणी दिनांक 30/03/2016 अन्वये नमुद करण्यात आले आहे की, भूसंपादन प्रकरणी मा.जिल्हाधिकारी यांनी म.प्रा.व न.र. अधिनियम 1966 चे कलम 124(4) सह भूसंपादन अधिनियम 1894 चे कलम 6 अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करुन पुढील कार्यवाही केल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम 11 खालील निवाडा दिनांक 24/05/2000 रोजी घोषित करण्यात आला होता. तद्नंतर उक्त अधिनियमाच्या कलम 12 अन्वये नोटीस दिल्यानंतर संबंधित जमिन मालकाने भूसंपादनाची मोबदला रक्कम तक्रार कायम ठेवून स्विकारलेली होती. अंतिम निवाड्यात दर्शविलेल्या जमिन मोबदल्याच्या रकमेवर नाराजी व्यक्त करुन संबंधित जमिन मालकाने उक्त अधिनियमाच्या कलम 18 खाली भूसंदर्भ क्र.1095/05 हा.मे.जिल्हा न्यायालयात दाखल केला होता. मे.जिल्हा न्यायालयाने या भूसंपादल प्रकरणी दिनांक 02/05/2015 रोजी न्यायनिवाडा देऊन रु.121.10 प्रति चौमी म्हणजे रु.1211000/- प्रती हेक्टर हा दर विचारात न घेता अर्जदार यांना रु.790/- प्रती चौमी म्हणजे रु.7900000/- प्रती हेक्टर या दराने मोबदला रक्कम देणेबाबत निकाल दिला आहे. या निकालाचा विचार करता भूसंदर्भ क्र.1095/05 यामध्ये निवाडा दिनांकापर्यंत रु.721214/- द्यावे लागतील तसेच दिनांक 24/05/2000 पासून प्रथम वर्षाकरिता 9 टक्के व तद्नंतर रक्कम देईपर्यंत 15 टक्के व्याज वरील रकमेवर द्यावे लागेल. सदरची रक्कम ही फार

मोठी आहे तसेच सदर दाव्यांमध्ये मे.न्यायालयाने अर्जदार यांना वाढवून दिलेली मोबदला रक्कम अवाजवी व अवास्तव असल्याचे मत आहे. त्या अनुषंगाने मे.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यामध्ये महानगरपालिकेने अपिल दाखल केलेले आहे.

तसेच पुढे असेही नमुद आहे की, एलएआर नं.27/2005 मध्ये मे.जिल्हा न्यायालयाने निकाल दिल्यानंतर संबंधित जमिन मालकाने जिल्हा न्यायालयात रेग्युलर दरखास्त क्र.348/2015 ही दाखल करुन महानगरपालिकेवर वसुली वारंट बजावलेले आहे, तसेच एलएआर नं.28/2005 मध्ये मे.जिल्हा न्यायालयाने निकाल दिल्यानंतर संबंधित जमिन मालकाने जिल्हा न्यायालयात रेग्युलर दरखास्त क्र.376/2015 दाखल करुन महानगरपालिकेवर वसुली वारंट बजाविलेले आहे. सदर वारंटप्रमाणे सदरची रक्कम एक तर जिल्हा न्यायालयात भरावी लागेल किंवा मे.उच्च न्यायालयाच्या अपिलाच्या अनुषंगाने दिलेल्या आदेशानुसार मे.उच्च न्यायालयात भरावी लागेल. वरीलप्रमाणे रु.4,16,16,037/- इतकी रक्कम मे.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांनी रिट याचिका क्र.938 सिव्हील ॲप्लीकेशन नं.3391/2016 मध्ये पहिले/7559/2016 रविंद्र यशवंत नाईक व इतर अन्वये न्यायालयात निकाल दिनांक 16/03/2016 पासून 12 आठवड्याचे आत भरणे आवश्यक आहे, अन्यथा मे.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेश आपोआप रद्द होईल व महानगरपालिकेस जप्तीच्या कार्यवाहीस सामोरे जावे लागेल. याप्रमाणे टिपणी सादर केल्यानुसार विधी सल्लागार यांचा शेरा ना.उच्च न्यायालयाचे आदेश दिलेला असल्यामुळे आदेशाची पूर्तता त्वरीत करणे गरजेचे आहे, यानुसार मे.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठ यांचेकडे वरीलप्रमाणे रक्कम ठेव स्वरुपात भरणा करण्यात आली.

याबाबत लेखापरीक्षणामध्ये खालीलप्रमाणे अभिलेखे अर्धसमास पत्रान्वये मागणी करण्यात आले होते.

01) संबंधित जमिन मालकाने भूसंपादनाची मोबदला रक्कम तक्रार कायम ठेवून स्विकारलेली होती असे टिपणीमध्ये नमुद करण्यात आलेले आहे, याबाबत संबंधित जमिन मालकाची कोणती तक्रार होती याबाबतचे अभिलेखे.

02) सदर प्रकरणांच्या अनुषंगाने मे.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठ यांचेकडून काय निकाल देण्यात आला याबाबतचा मुळ संचिकासह सर्व अभिलेखे.

03) सदर प्रकरणांच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे रु.4,16,16,037/- मे.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठ यांचेकडे ठेव स्वरुपात ठेवण्यात आलेली आहे, सदर रक्कम परत मिळणेकरिता व प्रकरणांमध्ये त्वरीत निर्णय मिळणेबाबत महानगरपालिकेकडून करण्यात आलेली उपाययोजना/पाठपुरावाबाबत अभिलेखे.

04) महानगरपालिकेकडून अशा प्रकारे लवकरात लवकर निकाल लावण्याबाबत उपाययोजना/पाठपुरावा करण्यात आलेला नसल्यास व त्यामुळे महानगरपालिकेचा मोठ्या प्रमाणात निधी विनावापर अडकून पडलेला असल्याने याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे किंवा कसे याबाबतचे अभिलेखे.

05) महानगरपालिकेची अंतर्गत लेखापरीक्षण शाखेमार्फत पूर्वलेखापरीक्षण करण्यात येते. सदर प्रकरण हे रकमा प्रदान

करण्यासंबंधीत असल्याने संचिकेवर मा.मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय घेणे आवश्यक होते असे लेखापरीक्षणाचे मत आहे. तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबत अभिलेखे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.108, दिनांक 07/12/2023 व अर्धसमास पत्र क्र.258, दिनांक 03/05/2024 अन्वये आवश्यक अभिलेखे सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून मागणीकृत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नसल्यामुळे वरीलप्रमाणे खर्चाबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे करण्यात आलेला खर्च लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 180, Hmm No : 258)

9 भूमी अभिन्यास व सिमांकित भूमी अभिन्यास मंजुर करतेवेळी भरलेल्या रकमा परत करणेबाबत श्री.युसूफ नुरुद्दीन मकरा व इतर तीन याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9अ **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान वित्त विभागाकडील प्रमाणकांची तपासणी करण्यात आली असता खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेले आहेत.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशिल
2314	16/12/2016	5191133	श्री.युसूफ नुरुद्दीन मकरा व इतर तीन सुधारित भूमी अभिन्यास व सिमांकित भूमी अभिन्यास मंजुर करतेवेळी भरणा केलेल्या रकमा परत करणे

श्री.युसूफ नुरुद्दीन मकरा व इतर तीन यांनी जळगांव मनपाविरुद्ध दिवाणी मु.नं.172/2002 हा जळगांव येथील मे.सिव्हील जज्ज सो. यांचे कोर्टात दाखल केलेला होता. सदर दाव्यात वादी यांनी जळगांव शिवार स.नं.304/1/1 व 304/1/2 या ठिकाणी सुधारित भूमी अभिन्यास व सिमांकित भूमी अभिन्यास मंजुर करतेवेळी खालील नमुद रकमांचा भरणा केलेला आहे.

जमिन विकास शुल्क	628142
खुला भूखंड कर सन 1999 ते 2001	70463
पाणीपुरवठा व दिवाबत्ती कर	237747
रस्ते, गटारी चार्जेस	785178
एकूण	**1721530**

श्री.मकरा यांनी भरलेली एकूण रक्कम रु.1721530/- तत्कालीन नगरपालिकेने वसुल केलेल्या रकमेवर 14% व्याजासह परत देणेबाबत मे.न्यायालयाचा हुकूमनामा झालेला आहे. सदर हुकुमनाम्याचे विरुद्ध अर्जदार यांनी 01/10/2016 रोजी महानगरपालिकेविरुद्ध स्पेशल दरखास्त दाखल केलेली असून सदरची दरखास्त नुसार मे.न्यायालयाच्या निर्णय आर्डर नं.21 नियम क्र.43 प्रमाणे दिलेल्या निकालानुसार रक्कम रु.5191133/- अदा करणेत आलेली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिलेखे/अनुपालन लेखापरीक्षणास तात्काळ सादर करण्याबाबत अर्धसमास पत्रान्वये कळविण्यात आले होते.

01) संबंधित अर्जदार यांनी वरीलप्रमाणे रकमा भरणा केल्यानंतर परत मागणी करण्याबाबतचे कारण व त्याबाबत संबंधित अर्जदार यांनी तत्कालीन नगरपालिकेकडे किंवा महानगरपालिकेकडे अर्ज दिला असल्यास सदरचा अर्ज व त्याबाबत नगरपालिका/महानगरपालिका यांचेमार्फत करण्यात आलेली कार्यवाहीबाबतचे अभिलेखे.

02) अर्जदार यांनी मनपाविरुद्ध दिवाणी मु.नं.172/2002 हा जळगांव येथील मे.सिव्हील जज्ज सो. यांचे कोर्टात दाखल केलेला होता त्यावेळी महानगरपालिकेने काय कार्यवाही केली याबाबतचे अभिलेखे.

03) वरीलप्रमाणे 2002 मध्ये मुकदमा दाखल केल्यानंतर संबंधितांना देय रकमा वेळीच दिल्या न गेल्यामुळे महानगरपालिकेवर व्याजाचा बोजा वाढलेला आहे, याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात आली किंवा कसे याबाबतचे अभिलेखे.

04) संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली असल्यास त्यांचेविरुद्ध प्रशासकीय कार्यवाही तसेच वरीलप्रमाणे व्याजाच्या रकमा वसुल करणे याबाबत काय कार्यवाही करण्यात आली याबाबतचे अभिलेखे.

05) वरील प्रकरण निकाली निघाले असल्यास त्याबाबतचे अभिलेखे.

06) सदर प्रकरणी विधी सल्लागार यांचे अभिप्राय नोंदविणेसाठी दिनांक 24/09/2015 रोजी संचिका विधी शाखेकडे पाठविण्यात आले होते. तथापी विधी शाखेने दिर्घकालावधीनंतर सुमारे 15 महिन्यानंतर सदर अहवालावर केवळ मा.आयुक्त सो यांची स्वाक्षरी नसल्याचे कारण देऊन विधी शाखेने विधी सल्लागार यांचे अभिप्राय न घेता नस्ती

नगररचना विभागाकडे परत पाठविली होती. यावर मा.आयुक्त यांनी 15 महिने नस्ती प्रलंबित राहीली, चौकशी सुरु करा असे अभिप्राय नमुद केले आहे. विधी शाखा प्रमुख यांचेकडे प्रकरण प्रलंबित राहिल्यामुळे व्याजाचा बोजा वाढलेला असल्याने तत्कालीन विधी शाखा प्रमुख यांचेवर काय प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली तसेच याबाबत व्याजाची जादा देय रक्कम वसुलीची कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबतचे अभिलेखे.

07) महानगरपालिकेची अंतर्गत लेखापरीक्षण शाखेमार्फत पूर्वलेखापरीक्षण करण्यात येते. सदर प्रकरण हे रकमा प्रदान करण्यासंबंधीत असल्याने संचिकेवर मा.मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय घेणे आवश्यक होते असे लेखापरीक्षणाचे मत आहे. तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबत अभिलेखे.

08) त्याचप्रमाणेसदर प्रकरणाची नस्ती विधी विभागाकडे जरी प्रलंबित होती, तरी नगररचना विभागाने प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने विधी विभागाकडे पाठपुरावा करुन नस्ती मागणीबाबत कार्यवाही करणे आवश्यक होते, तथापी नगररचना विभागानेही याबाबाबत दुर्लक्ष केल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. त्यामुळे प्रशासनाने याबाबत योग्य ती खात्री करुनच प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करणे अपेक्षित आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.108, दिनांक 07/12/2023 व अर्धसमास पत्र क्र.259, दिनांक 03/05/2024 अन्वये आवश्यक अभिलेखे सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून मागणीकृत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नसल्यामुळे वरीलप्रमाणे खर्चाबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे करण्यात आलेला खर्च लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 181, Hmm No : 259)

10 जमिन संपादन प्रकरणी जमिन मालक श्रीसागरमल ओंकारदास न्याती यांनी दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणाबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	:	9अ	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान वित्त विभागाकडील प्रमाणकांची तपासणी करण्यात आली असता खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेले आहेत.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशिल
1453	19/09/2016	9497365	स.नं.274/8 मौजे जळगांव क्षेत्र 1718.12 चौमी हे मंजूर विकास योजना (जुनी हद्द) मधील 80 फुट रिंगरोड या करिता संपादन करणेकामी जमिन मालक श्री.सागरमल ओंकारदास न्याती दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणी रक्कम भरणा करणेकामी देयक अदा करणे

स.नं.274/8 मौजे जळगांव क्षेत्र 1718.12 चौमी हे मंजूर विकास योजना (जुनी हद्द) मधील 80 फुट रिंगरोड या करिता संपादन करणेकामी जमिन मालक श्री.सागरमल ओंकारदास न्याती यांनी दुसरे सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर जळगांव यांच्या न्यायालयात रेग्युलर दरखास्त क्र.178/15 दाखल केल्याने व मे.जिल्हा न्यायालयाने दिनांक 31/08/2016 रोजी प्रकरणी रु.9497365/- इतकी रक्कम भरणेकामी समन्य जारी केलेले आहे. सदरची रक्कम तक्रार कायम ठेवुन (अंडर प्रोटेस्ट) भरणेकामाचे बील वरीलप्रमाणे अदा करणेत आलेले आहे. याबाबत नगररचना विभाग टिपणी दिनांक 19/08/2016 अन्वये जमिन मालक श्री.सागरमल ओंकारदास न्याती दुसरे सहदिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर जळगांव यांच्या न्यायालयात रेग्युलर दरखास्त क्र.178/15 ही यापूर्वीच दाखल करण्यात आली होती व त्या अनुषंगाने मे.जिल्हा न्यायालयाने दिनांक 31/08/2016 रोजी या प्रकरणी रु.9497365/- इतकी रक्कम भरणेकामी समन्स जारी केलेले आहे. त्यासोबत त्यांनी एक्झीबी-6 ची प्रत जोडून त्यामध्ये मे.जिल्हाधिकारी सो यांचे ताब्यातील जंगम मालमत्ता म्हणून संगणक 12, लोखंडी आलमारी 15, लोखंडी टेबल खुर्च्या 20, रॅक लोखंडी 15, सरकारी मोटर कार 15 नग इत्यादी जंगम माल सापडेल तो जप्त करण्यात यावा असे नमुद केलेले आहे. सदरचा जप्ती आदेश हा मनपास प्राप्त झलेला नाही मात्र अर्जदारांचे वकील यांनी दिनांक 07/09/2016 रोजी तो मा.आयुक्तांना सादर केलेला आहे. त्यानुसार मा.आयुक्त यांनी त्वरीत सादर करावे असे लेखाधिकारी यांना कळविलेले होते. सदरचे पत्र हे नगररचना विभागस दिनांक 15/09/2016 रोजी प्राप्त झालेले आहे. मे.जिल्हा न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने मनपाने मे.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यामध्ये अपील दाखल करण्याची पूर्ण कार्यवाही केलेली असून विधीतज्ञ यांचेमार्फत सदरचे अपील दाखल होणे बाकी आहे. सदरचे अपील हे मे.उच्च न्यायालयामध्ये सद्य:स्थितीत दाखल नलसल्याने त्याला कोणताही स्टॅम्प नंबर अथवा अपील नंबर पडलेला नसल्याने सदरची रक्कम ही मे.उच्च न्यायालयात भरता येत नाही त्यामुळे सदरची रक्कम ही मे.जिल्हा न्यायालयात तक्रार कायम ठेवून भरण्यास हरकत नाही. यावर मा.आयुक्ती यांनी डिक्री असल्याने त्वरीत रक्कम भरा अशा सूचना दिल्या. त्यानुसार रक्कम भरणा करण्यात आली.

याबाबत खालीलप्रमाणे अभिलेखे/अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत अर्धसमास पत्रान्वये कळविण्यात आले होते.

01) जमिन मालक श्री.सागलमल ओंकारदास न्याती यांनी सदर प्रकरणी रेग्युलर दरखास्त दाखल केलेली आहे. सदर

दरखास्तबाबतचा तपशिल.

02) सदर प्रकरणी एक्झीबी-6 ची प्रत जोडून म.जिल्हाधिकारी यांचे ताब्यातील जंगम माल जप्त करण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहे. जप्ती आदेश देण्यापूर्वी मे.न्यायालयाकडून रकमा भरणेबाबतचे आदेश प्राप्त झाले असल्यास आदेशांच्या प्रती. त्यानुसार रकमा विहित वेळेत भरणा न करण्याबाबतची कारणमिमांसा.

03) मे.जिल्हा न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत मे.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे अपील दाखल करण्यात आले किंवा कसे याबाबतचे अभिलेखे

04) सदर प्रकरणी अंतिम निर्णय लागला किंवा कसे याबाबतचे अभिलेखे, तसेच वरीलप्रमाणे विकास योजनेनुसार जमिन महानगरपालिकेच्या ताब्यात मिळाली किंवा कसे याबाबतचे अभिलेखे.

05) रकमा विलंबाने भरणा करण्याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात आली असल्यास काय कार्यवाही करण्यात आली याबाबतचे अभिलेखे.

06) महानगरपालिकेची अंतर्गत लेखापरीक्षण शाखेमार्फत पूर्वलेखापरीक्षण करण्यात येते. सदर प्रकरण हे रकमा प्रदान करण्यासंबंधीत असल्याने संचिकेवर मा.मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय घेणे आवश्यक होते असे लेखापरीक्षणाचे मत आहे. तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबत अभिलेखे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.108, दिनांक 07/12/2023 व अर्धसमास पत्र क्र.260, दिनांक 03/05/2024 अन्वये आवश्यक अभिलेखे सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून मागणीकृतअभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात न आल्यामुळे वरीलप्रमाणे खर्चाबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे करण्यात आलेला खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 182, Hmm No : 260)

11 अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी(रमाई) घरकुल योजना अभिलेखे लेखापरीक्षण उपलब्ध न झालेबाबत

योजना	:	अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी (रमाई) घरकुल योजना	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9अ	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले.

अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी (रमाई) घरकुल योजनेच्या रोखपुस्तकाची तपासणी करण्यात आली असता सन 2016-2017 व 2017-2018 मध्ये अनुक्रमे रु.1199185/- व रु.350000/- असे एकूण रु.1549185/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.87 दिनांक 7/11/2023, क्र.89 दिनांक 24/11/2023, पत्र क्र.109 दिनांक 11/12/2023, पत्र क्र.134, दिनांक 03/01/2024, पत्र क्र.145, दिनांक 24/01/2024 अन्वये सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांची संचिका, निविदा संचिका, देयके, मोजमाप पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखांची मागणी करण्यात आली. पांच अर्धसमास पत्रे देऊनही सदर योजनेचे कोणतेही अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयांनुसार लाभार्थ्यांचे निकष, उत्पन्न मर्यादा, देय अनुदानाची मर्यादा, योजना राबविणेकरिता नियुक्ती अभिकर्ता यांचे नियुक्ती व त्यांना प्रदान करण्यात आलेल्या रकमा यांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे अर्धसमास पत्रांन्वये आवश्यक अभिलेखे मागविण्यात आले होते. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा तसेच आवश्यक अभिलेखे प्राप्त झालेले नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 132, Hmm No : 145)

12 कै.राजाराम आत्माराम कोकीळ गुरुजी जलतरण तलाव कंत्राटी पद्धतीने चालविणेस देणे

योजना :		**लेखाशीर्ष** : 0		**वसुलपात्र** :	15000.00/-
निधी :	महानगरपालिका स्व- निधी	**कलम** : 9अ		**अंतिम अमान्य** :	0.00/-

जळगांव शहर महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षांचे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. कै.राजाराम आत्माराम कोकीळ गुरुजी जलतरण तलाव हा महानगरपालिकेच्या मालकीची मेहरुण शिवार सर्व्हे नं.424/ए/1 (भाग) सीटीएस 5572 या जागेवर बांधण्यात आलेला आहे. सदर तलाव हा गतकाळात कंत्राटी पद्धतीने चालविणेसाठी देण्यात आलेला होता मात्र मक्तेदार यांच्याद्वारे तलावाची सुव्यवस्थितरित्या देखभाल दुरुस्ती होत नसल्याने व जलतरणप्रेमी यांना योग्य त्या सुविधा उपलब्ध न करुन देण्यात येत असलेमुळे मक्ता रद्द करुन महापालिकेने जलतरण तलाव स्वत:च्या ताब्यात घेतलेला आहे, सदर तलाव सुरु करणेची आग्रहाची मागणी लक्षात

घेता पुन:श्च जलतरण तलाव योग्य मक्तेदारास कंत्राटी पद्धतीने चालविणेसाठी देणेच्या अनुषंगाने महासभा क्र.31 दिनांक 19/01/2016 आयत्या वेळेचा विषय क्र.02 ठराव क्र.374 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली. सदर विषयाच्या अनुषंगाने संचिका तपासणी करण्यात आली असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

तपशिल	कै.राजाराम आत्माराम कोकीळ गुरुजी जलतरण तलाव कंत्राटी पद्धतीने चालविणेस देणे
कंत्राटदार	मे.एस.जी.एन. कंस्ट्रक्शन जळगांव (प्रोपा- श्री.सपन सुशिल झुनझुनवाला)
करारनामा	रु.500/- चे मुद्रांकावर दिनांक 18/07/2017 रोजी. लिज डिड दुय्यम निबंधक वर्ग-2 जळगांव-3 यांचेकडे दस्त क्र.2690/2017 दिनांक 06/10/2017 अन्वये नोंदणी करण्यात आला.
कार्यादेश	मनपा सा.बां.वि. आदेश क्र.47, दिनांक 25/07/2017
कालावधी	30 वर्षे (म्हणजे 24/07/2047 पावेतो)
मंजूर दर	रु.251000/- प्रती वर्ष (दर दोन वर्षांची 10% वाढीसह)
भरणा रक्कम	रु.251000/- मनपा पावती क्र.41990 दिनांक 27/07/2017 (प्रथम वर्ष)

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

01) वरीलप्रमाणे जलतरण तलाव चालविणेचे कामाकरिता महासभेमध्ये ठराव पारित करण्यात आला व त्यानुसार निविदा प्रक्रीया राबविण्यात आली. तथापी सदर कामापोटी महानगरपालिकेस वार्षिक किती उत्पन्न येणे अपेक्षित राहील याबाबत कोणतीही आधारभूत रक्कम निश्चित करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे निविदेमध्ये प्राप्त दरांमध्ये वाटाघाटी करुन अंतिम दर निश्चित करण्यात आलेले आहे. परिणामी महानगरपालिकेस अपेक्षित उत्पन्न प्राप्त झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

02) सदरचे कंत्राट हे मे.एस.जी.एन. कंस्ट्रक्शन जळगांव यांना देण्यात आलेले आहे. निविदा सादर करतांना सदर कंत्राटदाराने त्यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्यामुळे नोंदणीकृत कंत्राटदारांना कंत्राट देण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

03) वरीलप्रमाणे जलतरण तलाव चालविणेकरिता कंत्राटदार मे.एस.जी.एन. कंस्ट्रक्शन जळगांव यांचेसमवेत दिनांक 18/07/2017 रोजी रु.500/- चे मुद्रांकावर करारनामा करण्यात आला. सदर वाटाघाटी अंती व करारनाम्यानुसार मंजुर दर रु.251000/- प्रतिवर्ष असा असून करारनामा अट क्र.71 नुसार दर दोन वर्षांनी त्यामध्ये 10% वाढ निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार 30 वर्षांची कंत्राटाची एकूण रक्कम रु.1,59,49,794/- इतकी येते. कामाचे आदेश

देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कंत्राटाची वरीलप्रमाणे एकूण किंमत रु.159.50 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.15500/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.500/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे मुद्रांक वापरापोटीचा शासनाचा रु.15000/- चा कमी भरणा झालेला आहे. सदर कमी भरणा रक्कम रु.15000/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

04) वरीलप्रमाणे कंत्राटदारासमवेत करण्यात आलेल्या करारनाम्याची मुळ प्रत संचिकेमध्ये लावण्यात आलेली नाही, तथापी दुय्यम निबंधक वर्ग-2 जळगांव-3 यांचेकडे नोंदणी केलेल्या दस्त क्र.2690/2017 ची रंगीत छायांकित प्रत संचिकेमध्ये लावण्यात आलेली आहे. करारनाम्याची मुळ प्रत करारनामा लिहून घेणार (First Party) यांचेकडे जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

05) सदरचे कंत्राट हे 30 वर्षे इतक्या दिर्घ कालावधीचे देण्यापूर्वी करारनाम्यामधील अटी व शर्ती महानगरपालिकेच्या प्रमुख विधी सल्लागार यांचेकडून तपासणी करुन घेणे व त्यांचे सल्ल्यानुसार आवश्यक अटी/शर्ती समाविष्ट करणे आवश्यक होते, तथापी याप्रमाणे प्रमुख विधी सल्लागार यांचेकडून तपासणी करण्यात आलेली असल्याचे संचिकेवरुन दिसून आले नाही. यामुळे काही किचकट बाबींच्या अभावी भविष्यात काही कायदेशिर अडचणी उद्भवल्यास महानगरपालिकेस आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

06) करारनामा अट क्र.19 नुसार कंत्राटदाराने जलतरण तलावासंबंधी प्रत्येक तिमाहीमध्ये कमीत-कमी एक वेळेस महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करावी अशी अट नमुद करण्यात आलेली आहे. तथापी कंत्राटदाराने अशा प्रकारे बैठक घेतलेली असल्याबाबतचे कोणतेही कागदपत्रे संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाहीत.

07) करारनामा अट क्र.65 नुसार यशस्वी निविदाकाराने कामाचे आदेश देण्यापूर्वी रु.2.00 लक्ष रोख किंवा बँक गॅरंटीच्या स्वरुपात सुरक्षा अनामत रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे, तरी त्याप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम संबंधित कंत्राटदार यांनी भरणा केली असल्याबाबत संचिकेमध्ये मुळ पावती किंवा छायांकित प्रत किंवा बँक गॅरंटीची मुळ प्रत लावण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधित कंत्राटदार यांचेकडून सुरक्षा अनामत रक्कम घेण्यात आलेली नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास येते. सदर कंत्राटाचा कालावधी हा सन 2047 पर्यंत असल्याने अशा प्रकारची सुरक्षा रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून जमा करुन घेण्यात यावी.

08) करारनामा अट क्र.56 नुसार कंत्राटदाराने जागेचा ताबा घेतेवेळी जलतरण तलावाचे क्षेत्रामध्ये असलेल्या साहित्यांची एक यादी तयार करावी व सदर कंत्राटाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर सदर यादीनुसार साहित्य महानगरपालिकेच्या ताब्यात देणे आवश्यक राहील, कोणतेही साहित्य नादुरुस्त/खराब किंवा कमी आढळल्यास सदर

साहित्याची बाजारभावानुसार नुकसान भरपाई करण्यात येईल अशी अट नमुद आहे. तथापी अशा प्रकारे कोणतीही यादी तयार करुन त्यानुसार ताबा देण्यात आल्याबाबत महानगरपालिकेचे प्रतिनिधी व कंत्राटदार यांनी स्वाक्षरी घेण्यात आलेल्या नाही. त्यामुळे कंत्राटदारास कोणते साहित्य ताब्यात दिले याबाबत लेखापरिक्षणात पडताळणी होत नाही. तसेच यामुळे भविष्यात महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

09) करारनामा अट क्र.04 नुसार कंत्राटदार जलतरण तलाव क्षेत्रामध्ये बेसिक कोचिंग फी, ॲडव्हान्स कोचिंग फी, कॅम्प, क्लब यांचेद्वारे जलतरण व इतर खेळांचे उपक्रम राबविणेकरिता मेंबरशिप फी गोळा करु शकेल अशी अट नमुद आहे. त्यानुसार जलतरण क्षेत्रामध्ये जलतरण व इतर खेळांचे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. तसेच असे उपक्रम राबविणेकरिता करारनामा अट क्र.8 नुसार जलतरण तलावाचे क्षेत्रामध्ये इतर उपक्रम चालविण्याच्या अनुषंगाने त्यामध्ये अनुषंगिक बदल, बांधकामे, दुरुस्त्या जळगांव शहर महानगरपालिकेच्या पूर्वपरवानगीने करु शकेल अशी अट नमुद केलेली आहे. कंत्राटदाराने जलतरण तलाव क्षेत्रामध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर केला. याबाबत महानगरपालिका नगररचना विभागाकडील बांधकाम परवानगीची संचिका तपासणी करण्यात आली. प्रस्तावानुसार महानगरपालिका नगररचना विभागाकडील आदेश क्र.684 दिनांक 29/09/2017 अन्वये सदर जागेचे एकूण क्षेत्रफळ 3817.71 चौमी असे असून त्यामध्ये अस्तित्वातील बांधकामामध्ये स्विमींग टँक 885.33 चौमी, चेंजिंग रुम 258.06 चौमी, फिल्टरेशन प्लँट 111.64 चौमी असे दर्शविण्यात आले आहे व प्रस्तावित योगा हॉल तळमजला, मल्टीपर्पज हॉल पहिला मजला (योगा हॉल व मल्टीपर्पज हॉल), स्विमिंग पुल एकूण क्षेत्रफळ 447.13 चौमी. बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच वरीलप्रमाणे प्रस्तावित बांधकाम पूर्ण करुन भोगवटा प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना तसे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. त्याउलट संबंधित कंत्राटदार यांनी कोविड कारणामुळे बांधकाम करता आले नाही असे नमूद करुन दिनांक 12/10/2022 रोजी सुधारित बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावानुसार जुन्या नकाशामध्ये दर्शविण्यात आलेले लॉन व कॅफेटेरिया या भागातील बांधकाम (25 x 10 mtr. व 17.5 x 6.30 mtr) काढून त्या ठिकाणी रेस्टॉरेंट हॉल, मल्टीपर्पज हॉल, नोकरांचे निवासस्थान, शेड, किचन, खुली जागा इत्यादी कामे प्रस्तावित केलेले असून त्याचे क्षेत्रफळ 847.33 चौमी दर्शविण्यात आलेले आहे, म्हणजेच मुळ प्रस्तावित परवानगी 447.13 ऐवजी सुधारित 847.33 चौमी प्रस्तावित केले असून त्यामध्ये 400.20 चौमी जादा बांधकाम प्रस्तावित केलेले आहे. जलतरण तलावाचे क्षेत्रामध्ये स्विमींग, योगा व इतर खेळांचे उपक्रम राबविणे आवश्यक असतांना कंत्राटदाराने रेस्टॉरेंट व त्या अनुषंगिक बांधकामाकरिता परवानगी मागितलेली दिसून येते. म्हणजेच महानगरपालिकेच्या जागेवर महानगरपालिकेने ठरवून दिलेले उपक्रम न राबविता कंत्राटदार हे त्यांना स्वत:ला लाभदायक असे रेस्टॉरेंट चालविण्याचे प्रस्तावित करीत आहे. सदर सुधारित प्रस्तावास नगररचना विभागाकडून परवानगी देण्यात आली किंवा कसे याबाबत अर्धसमास पत्र क्र.232 दिनांक 10/04/2024 अन्वये विचारणा केली असता त्यांचेकडून अनुपालन/खुलासा सादर करण्यात आला नाही. तथापी बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने नगरविकास विभागाकडून सादर टिपणीवर मा.आयुक्त यांनी दिनांक 21/02/2023 रोजी लिज ॲग्रीमेंटमधील क्लॉज नमूद करावे, नकाशावर मालक/शहर अभियंता यांची स्वाक्षरी नाही अशा त्रृट्या नमूद केलेल्या आहेत. सुधारित बांधकाम परवानगी देण्याच्या अनुषंगाने करारनाम्यामधील अटी/शर्तींचा सखोल अभ्यास करुन

सुधारित परवानगी द्यावी किंवा कसे याबाबतचे स्पष्ट अभिप्राय नमुद करुन टिपणी सादर करणे आवश्यक असतांना नगररचना विभागाने बांधकाम परवानगी देण्याच्या अनुषंगाने टिपणी सादर केलेली असून zwj;टिपणीमधील अ.क्र.8 नुसार प्रस्तावित बांधकाम परवानगी देता येईल असे नमूद केलेले आहे. म्हणजेच यामध्ये नगररचना विभागामार्फत कंत्राटदाराचे हित जोपासले जाण्याचे दृष्टीने टिपणी सादर केलेले असल्याचे स्पष्ट होते. तसेच मा.आयुक्त यांनी टिपणीवर मुद्दे उपस्थित केले त्यावरही नगररचना विभागाकडून पुढे कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, म्हणजेच नगररचना विभागामार्फत मा.आयुक्त यांचे निर्देशांचे पालन करण्यात आलेले नाही तसेच सदर परवानगीच्या अनुषंगाने पुढे कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही, यावरुन सुधारित बांधकाम परवानगी देण्यात आलेली नसल्याचेही उपलब्ध संचिकेवरुन स्पष्ट होते.

10) करारनामा अट क्र.52 नुसार स्विमिंग टँक परिसरामध्ये चहा, नाश्त्याचे व खाद्य पदार्थ नेण्यास मनाई करण्यात आलेली आहे, अशा प्रकारे खाद्यपदार्थ आढळून आल्यास कंत्राटदारास दंड आकारण्यात येईल अशी अट नमूद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सदर जलतरण तलाव कंत्राटी पद्धतीने चालविण्यामागिल मुळ उद्देश शहरातील नागरिक व जलतरण पटू पोहण्यासाठी व सरावासाठी येत असतात त्याकरिता आवश्यक सुविधा त्यांना उपलब्ध करुन देणे व त्यातून महापालिकेस उत्पन्नाचे स्त्रोत सुद्धा निर्माण व्हावा असा होता. तथापी नागरिकांना पोहणे व इतर खेळांच्या सुविधा उपलब्ध करुन देणे हा मुळ उद्देश असतांनाही मुळ बांधकाम परवानगी क्र.684 दिनांक 29/09/2017 मध्ये लॉन व कॅफेटेरिया करिता परवानगी देण्यात आलेली असल्याचे दिसून येते. सदर बाब ही महानगरपालिकेकडून कंत्राटदाराचे हित जोपासले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. तसेच सदर विषयाबाबत बांधकाम विभाग व नगररचना विभाग यांनी परस्पर समन्वय ठेवलेला नसल्याचेही लेखापरीक्षणाचे मत आहे.

11) सदर बांधकाम परवानगीच्या संचिकेमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी फाऊंडेशन जळगांव यांचे दिनांक 04/12/2023 चे पत्रान्वये कोकीळ गुरुजी जलतरण तलाव येथे नव्याने बांधकाम करण्यात आलेल्या व्हेज ॲरोमा हॉटेलच्या बांधकाम संदर्भातील नकाशे नगररचना विभागाकडून परवानगी घेऊन बांधकाम केले आहे कां, असल्यास कोणाच्या परवानगीने नकाशे मंजूर करण्यात आले, परवानगी व मंजूर नकाशाची छायांकित प्रत मिळावी अशा आशयाचा अर्ज सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीबाबतचे अभिलेखे संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे सदर जागेवर प्रत्यक्ष पाहणीनुसार व वरील तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कंत्राटदार यांनी सुधारित बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार रेस्टॉरेंट, किचन, नोकरांचे निवासस्थान, शेड इत्यादींचे बांधकाम हे महानगरपालिकेची परवानगी देण्यात आलेली नसतांनाही पूर्ण केलेले असल्याचे निदर्शनास येते. यामुळे कंत्राटदार हे महानगरपालिकेची परवानगी नसतांना महानगरपालीकेची फसवणूक करुन व महानगरपालिकेच्या मालमत्तेचा गैरवापर करीत आहे व करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग करुन अतिरिक्त उत्पन्न प्राप्त करीत असल्याचे दिसून येते व परिणामी महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचेही लेखापरीक्षणाचे मत आहे. कंत्राटदाराने महानगरपलिकेची कोणतीही परवानगी नसतांना महानगरपालिकेच्या जागेवर अशा प्रकारे स्वत:च्या उत्पन्नाचे दृष्टीने हॉटेल व्यवसाय उभारणे ही बाब करारनाम्याचा भंग करणारी असून गैरकायदेशिर ठरते, त्यामुळे अशा

कंत्राटदाराविरुद्ध योग्य ती कायदेशिर कारवाई होणे तसेच दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.246, दिनांक 29/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 175, Hmm No : 246)

13 जळगाव शहर महानगरपालिका सन2016-17 व 2017-18 या वित्तीय वर्षातील आस्थापना खर्च विहित मर्यादेपेक्षा जास्त होत असलेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9अ **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगाव शहर महानगरपालिका सन 2016-2017 व 2017-2018 या वित्तीय वर्षातील आस्थापना खर्चाचे लेखापरिक्षण वेळी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अधिनियम 2011 मधील कलम 6 (3) अनुसार अर्ध समास पत्र क्र 208 दिनांक 02/04/2024 अन्वये आस्थापना खर्च नस्तीची मागणी करण्यात आली होती. संबंधित विभागाने दिलेल्या माहिती नुसार आस्थापना खर्च विहित केलेल्या टक्केवारी पेक्षा जास्त केलेला असल्याचे दिसून आले आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -1005 वर्गीकरण /प्र क्र 379 /05/नवि-24 दि.04.05.2006 अन्वये महानगरपालिका क्षेत्रफळ इत्यादी बाबी विचारात घेऊन अ,ब,क व ड प्रमाणे वर्गीकरण करण्यात आले असून जळगाव शहर महानगरपालिकेचा ड वर्ग महानगरपालिकेत समावेश करण्यात आला आहे. सदरील शासन निर्णयातील परिच्छेद 2 (1) अन्वये आस्थापना खर्चावर नियंत्रण ठेवण्यात आलेले असून ड वर्ग महानगरपालिका साठी आस्थापना खर्च महसुली उत्पन्नाच्या 35% एवढी मर्यादा ठेवण्यात आलेली आहे. असे असताना सन 2016-2017 मध्ये विहित मर्यादेपेक्षा जादा खर्च करण्यात आलेला असल्याचे दिसून येते. (आकडे रु.कोटीमध्ये)

अ क्र	तपशील	2016-2017	2017-2018
1	एकूण महसुली जमा रकमा	126.81	186.23
2	आस्थापना खर्च मर्यादा 35%	44.38%	65.18%
3	प्रत्यक्ष एकूण आस्थापना खर्च	61.28	67.38
4	आस्थापना खर्च टक्केवारी	48.32 %	36.18%

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 239 दिनांक 19/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला

होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 133, Hmm No : 239)

14 आरोग्य विभागाने 14व्या वित्त आयोगातुन केलेल्या खर्चासंबंधी अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करणेबाबत

योजना : 14वा वित्त आयोग **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9अ **अंतिम अमान्य** : 2653200.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-18 चे लेखापरीक्षणदरम्यान आयोग्य विभागाचे लेखापरीक्षण करण्यांत येत आहे. 14वा वित्त आयोग योजनेमधुन खालील प्रमाणे खर्च करण्यांत आलेला आहे. तरी त्यासंबधी निवीदा नस्ती, ठराव इत्यादी अभिलेखे लेखापरीक्षणांस तात्काळ सादर करणे बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 164 दिनांक 05/02/2024 नुसार सुचीत करण्यात आलेले होते. त्यापैकी खालील नमुद प्रमाणके लेखापरिक्षणास उपलबध करुन देण्यात आले नाहीत

अ.क्रं.	प्रमाणक क्रं. व दिनांक	रक्कम रुपये	तपशील
1	54/04.03.2017	2364000	सुहरिद केमिकल्स जंतुनाशक व दुर्गधी नाशकाची खरेदी
2	306/15.02.2018	259200	दामिनी आर. चौधरी,डोझरच्या सहाय्याने कचरा रस्त्यावरुन बाजुला करणे
3	348/23.3.2018	30000	श्री.महेंद्रं दत्ताराम पवार (सिटी को ऑर्डीनेर) माहे फेब्रु-2018 चे परिश्रमिक भत्ता
	एकुण	**2653200**	

वरील प्रमाणे अभिलेखे अर्धशासकीय पत्र कमांक 164 दिनांक 05/02/2024 अन्वये मागणी करुनही उपलब्ध झाली नाहीत. मागणीकृत अभिलेखे लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाहीत, त्यामुळे खर्च करण्यात आलेली एकूण रक्कम रु.26,53,200/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 164 दिनांक 05/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATSHBM6701 (Ref No : 147, Hmm No : 164)

15 कृषी उत्पन्न बाजार समिती मधील घनकचरा सकंलन कार्यपध्दती बाबतची माहिती सादर करणेबाबत

योजना	:	**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	: महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9अ	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-18 चे लेखापरीक्षण प्रगतीत असुन, आरोग्य विभागाचे लेखापरीक्षण करण्यांत येत आहे. या विभागांतर्गत वॉर्डनिहाय घनकचरा संकलनाचे काम बचत गटांना दिलेले आहे. महानगरपालिका क्षेत्रात कृषी उत्पन्न बाजार समिती आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 137 अन्वये मा.आयुक्तास, जेव्हा जेव्हा त्यास योग्य वाटेल तेव्हा तेव्हा हॉटेल क्लब, तबेला किंवा अन्य मोठी जागा यांच्याबाबतीत घ्यावयाच्या साफसफाई कर स्थायी समिती याबाबत सामान्यत: मान्य करील अशा विशेष दरांनी निश्चिती करता येईल. त्याअनुषंगाने सदर बाजार समिती आवारातील कचरा संकलनाबाबत कोणती कार्यपध्दती अवलंबिण्यांत आली होती, जसे की बचत गटांना ठेका किंवा महानगर पालिकेमार्फत कचरा संकलनाबाबत कार्यवाही इ. कृषी उत्पन्न बाजार समितीकडुन कचरा संकलनाबाबत कर आकारणी करण्यांत येत होती किंवा कसे, असल्यास, त्याबाबतचे दर व आकारणी, कर आकारणी करण्यांत येत असल्यास त्याबाबतची पावती पुस्तके व किर्द याबाबतची माहिती व अभिलेखे लेखापरिक्षणास सादर करण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 274 दिनांक 28/05/2024 अन्वये कळविण्यांत आले होते. अर्धसमास पत्र क्र.01 दिनांक 17/04/2023 अन्वये तसेच लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने दिनांक 21/06/2023 रोजी मा.उपसंचालक (मनपालेप) यांचे उपस्थितीत घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये लेखापरीक्षणास आवश्यक अभिलेखे वेळोवेळी तात्काळ सादर करण्यात यावे, अन्यथा दंडात्मक व प्रशासकीय कार्यवाही होऊ शकते याबाबत सूचित करण्यात आलेले होते. तथापी आवश्यक अभिलेखे मागणी करुनही उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे याबाबत लेखापरिक्षणात योग्य ती तपासणी करता आली नाही. तसेच अशा प्रकारचे उत्पन्न प्राप्त होत नसल्याने महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे असे लेखापरीक्षणाचे मत आहे. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

DATSHBM6701 (Ref No : 190, Hmm No : 274)

16 14वा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दतीमधील अनियमितता

योजना	:	14वा वित्त आयोग	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9अ	**अंतिम अमान्य**	: 3076000.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-18 चे लेखापरीक्षण प्रगतीत असुन,आरोगय विभागाचे लेखापरीक्षण करण्यांत येत आहे. या विभागांतर्गत स्वच्छ भारत अभियांनातंर्गत मुलभुत अनुदान प्राप्त आहे. त्यातुन घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (Detail Project Report) तयार करणे बाबत खालील प्रमाणे तांत्रिक फी प्रदान करणेस मान्यता दिलेली आहे.

1**) प्रशासकिय मान्यता** :- 1.स्थायी समिती ठराव नं.773 दिनांक 16/102017 मा.आयुक्त यांचेप्रशासकिय मान्यता आदेश क्रं.30 दिनांक 14.12.2017

2) **तांत्रिक मान्यता** :- कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक यांची क्रं.94/2017 दिनांक 27.10.2017

3) **प्राकलन** :- 3115.69 लाख

4**) खर्च** :- प्रमाणक क्रमांक प्रमाणक क्रमांक 236 दिनांक 16/12/2017 रककम रुपये 30.76 लाख

वरीलप्रमाणे तांत्रिक फी अदा करणे करीता टिपणी दिनांक 24/11/2017 नुसार सादर करण्यांत आले असता मा.अप्पर आयुक्त, यांनी 14 वा वित्त आयोगाच्या व्याजातुन खर्च देता येईल का विचारणा केली असता मा.मुख्य लेखा अधिकारी, यांनी दिनांक 4.12.2017 अखेर रुपये 22530319 व्याजाची एकुण रककम जमा आहे. शासन निर्णय दिनांक 3.6.2015 मध्ये व्याजाची रककम खर्च करणेबाबत कार्यपध्दती मध्ये नमुद नाही, असा शेरा नमुद केला त्यावर मा.अप्पर आयुक्त यांनी रुपये 30 कोटी अनुदान प्राप्त होणार आहे सबब 14वा वित्त आयोग निधीच्या व्याजाच्या निधीमधुन रककम देता येइल असा शेरा नमुद केला आहे. त्यानुसार वरील प्रशासकिय मान्यता आदेशामध्ये 14वा वित्त आयोगाच्या प्राप्त निधीच्या व्याजामधुन रककम देता येईल त्यासाठी येणारा खर्च रुपये 30.76 लक्ष मात्र रकमेस प्रशासकिय मान्यता देण्यांत आली आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

01) स्वच्छ भारत अभियांना अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनचा सविस्तर प्रकलप अहवाल (Detail Project Report) तयार करणेसाठी 14वा वित्त आयोगातील प्राप्त व्याजाच्या रकमेचा विनियोग कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक यांना तांत्रिक फी पोटी अदा केली आहे. वास्तवीक नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 3416/प्रं.क्रं.40/नावि-04 दिनांक 27/5/2016 मधील अ.क्रं.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजुर केलेला निधीवर प्राप्त झालेला व्याजाचा वाढीव खर्च भागविणेसाठी वापरता येईल मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय मंजुर झालेला निधी व त्यावरील उपर्जीत व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार

नाही तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये जमा व्याजाची रकमेमधुन सदर खर्च करण्यांत आलेला आहे व त्यास शासनाची पुर्व मंजुरी घेण्यांत आलेली नाही त्यामुळे शासन परिपत्रकाचे उल्लंघन झाले आहे.

02) मा.मुख्य लेखा अधिकारी यांनी व्याजाची रक्कम खर्च करणेबाबत कार्यपद्धतीमध्ये नमुद नाही असे नमूद केलेले असतांना रुपये 30 कोटी अनुदान प्राप्त होणार आहे सबब 14वा वित्त आयोग निधीच्या व्याजाच्या निधीमधुन रककम देता येइल असा शेरा मा.अप्पर आयुक्त सारख्या जबाबदार अधिकारी यांनी नमूद करणे हे अनुचित व नियमबाह्य आहे.

03) वरीलप्रमाणे व्याजाच्या रकमेमधून वापरण्यात आलेली रक्कम कशा प्रकारे समायोजित करण्यात आली याबाबत लेखापरीक्षणामध्ये खुलासा सादर करण्यात आलेला नसल्याने सदर रकमेचे समायोजन झालेले नसल्याने नियमबाह्यपणे व्याजाची रक्कम खर्ची टाकण्यात आलेली आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 224 दिनांक 05/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATSHBM6701 (Ref No : 151, Hmm No : 224)

17 शासकीय/निमशासकीय मालमत्तांचा विमा उतरविणेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9अ	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. नगरपरिषदांना स्थावर मालमत्तेच्या उभारणीसाठी शासनाकडून अनुदान रुपाने निधी प्राप्त होत असतो. तसेच नगरपरिषद क्षेत्रातील नागरिकांनी कर रुपाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीमधूनही स्थावर मालमतंची निर्मिती होत असते. या मालमत्तांचे योग्य रितीने जतन होणे अत्यंत गरजेचे असून ते नगरपरिषदांच्या हिताच्या दृष्टीने त्याचा विमा उतरविणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्रातील नगरपरिषदांनी विमा उतरविलेला नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असल्याबाबतच्या घटना घडलेल्या आहेत. वित्त विभाग शासन निर्णय क्र.विमासं-1098/प्र.क्र.28/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 अन्वये शासकीय/निमशासकीय मालमत्तांचा विमा शासन विमा निधीकडे उतरविणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे पत्र क्र.डीएमई 102000/प्र.क्र.6/2000/1, दिनांक 14/11/2000 अन्वये नगरपरिषदांनी त्यांचे स्थावर व इतर मालमत्ते संदर्भात विमा संचालनालयाकडे विमा उतरविणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. विमा संचालनालयाकडे आग विमा, संकीर्ण विमा, मोटार विमा, घरफोडी विमा, वाटचालीतील रोख रकमेचा विमा, इमान हमी विमा, श्रमिक भरपाई विमा, वैयक्तीक अपघात विमा, कंत्राटदारांच्या संपूर्ण जोखमीचा विमा, संगणकांचा विमा, वाहतुकीतील मालाच्या वाहतुकीचा विमा इत्यादी विमा प्रकार कार्यान्वीत आहेत. तसेच सदर पत्रान्वये नगरपरिषदांनी त्यांच्या स्थावर मालमत्तेचा विमा न उतरविता जर

भविष्यात काही नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित नगरपरिषदांवर राहिल, मुख्याधिकारी यांनी अधिक जागृत राहून त्यांच्या सर्व मालमत्तेचा विमा उतरविण्याचे दृष्टीने कारवाई करावी व त्याकरिता अंदाजपत्रकामध्ये या खर्चासाठी योग्य ती तरतुद करण्यात यावी, शासकीय विमा निधीकडे विमा उतरविल्यास विमा हप्त्यांमध्ये इतर सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या तुलनेत सुट दिली जाते याचाही फायदा घेण्यात यावा, तसेच इतर कंपन्यांकडे विमा उतरविल्यास व त्यांना शासकीय विमा निधीतून मिळणाऱ्या संभाव्य सुटीमुळे नगरपरिषदेचे नुकसान झाल्यास संबंधित मुख्याधिकारी यांना याकरिता वैयक्तीकरित्या जबाबदार धरले जाईल अशा सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन आदेशाची अंमलबजावणी न केल्यास त्यासंबंधीचे समर्थन संबंधित प्रशासकीय विभागामार्फत शासनाच्या आदेशासाठी वित्त विभागाकडे सादर करणेत यावे असेही आदेश आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या अनेक चल व अचल मालमत्ता आहेत. वरील शासन तरतुदीनुसार शासकीय विमा संचालनालयाकडे त्यांचा विमा उतरविण्यात आला असल्यास त्याबाबतची अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.271 दिनांक 17/05/2024 अन्वये कळविण्यात आले होते. तथापी कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. वाहन विभागाचे लेखापरीक्षणादरम्यान महानगरपालिकेच्या वाहनांचे विमा हे खाजगी विमा कंपनीकडे काढण्यात आलेले असल्याचे निदर्शनास येते, त्यामुळे शासकीय विमा निधीचे नुकसान होत आहे, तसेच शासन निर्देशांचे पालन होत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या इतर मालमत्तांचा विमा उतरविण्यात येत नसल्यामुळे शासन नियमांचे पालन करण्यात येत नसल्याचेही लेखापरीक्षणाचे मत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 183, Hmm No : 271)

कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

18 जळगाव महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक1 ते 4 मधील घरपट्टी / पाणीपट्टी व इतर कर मालमत्ता धारकांकडे सन2017-18 अखेर मोठया प्रमाणावर थकबाकी प्रलंबित असलेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 360355092.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

महानगरपालीका जळगावचे सन 2016-2017 ते 2017-2018 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण मा.उपसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (मनपालेप), औरंगाबाद यांचे अधिनस्त पथकामार्फत करण्यात आले.
1.घरपट्टी /पाणीपट्टी मालमत्ता धाराकाकडील सन 2016-17 ते 2017-2018 या कालावधीचे नोंदवह्या तपासणी केली असता दिनांक 31 मार्च 2018 अखेर प्रभाग क्रमांक 1 ते 4 मध्ये मोठ्या प्रमाणात थकबाकी असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र	वर्षे	प्रभाग कार्यालय	मागणी रक्कम	वर्षात वसुल रक्कम	थकीत रक्कम
2016-2017					
1		प्रभाग क्र. 1	270202859	161305164	108897695
2		प्रभाग क्र. 2	163267062	82396438	80870624
3		प्रभाग क्र. 3	307206672	150688817	156517855
4		प्रभाग क्र. 4	134811018	93503900	41307118
				एकुण थकबाकी	387539292
2017-2018					
1		प्रभाग क्र. 1	287899946	192705045	95194901
2		प्रभाग क्र. 2	157544646	76841067	80703579
3		प्रभाग क्र. 3	272963431	134624146	138339285
4		प्रभाग क्र. 4	135207908	89090581	46117327

				एकुण थकबाकी	360355092

वरीलप्रमाणे घरपट्टी /पाणीपट्टी मालमत्ता धाराकाकडील सन 2016-17 ते 2017-2018 या कालावधीचे नोंदवह्या तपासणी केली असता दिनांक 31 मार्च 2018 अखेर प्रभाग क्रमांक 1 ते 4 मध्ये एकुण 360355092/- इतकी थकबाकी प्रलंबित असल्याचे दिसून येते. वरील तक्त्याचे अवलोकन केले असता जळगाव महानगरपालिकामधील घरपटटी/ पाणीपटटी व इतर करांची मोठ्या प्रमाणामध्ये थकबाकी असल्यामुळे महानगरपालिकेस अपेक्षित उत्पन्न प्राप्त झालेले नाही, त्यामुळे महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. सदर थकीत रकमा वसुलीबाबत प्रभावी उपाययोजना केल्याचे दिसून येत नाही. याबाबत ठोस उपाययोजना करुन प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट महानगरपालिका अधिनियमाचे कलम 129 अन्वये दर पाच वर्षाला मालमत्ता करामध्ये वाढ करण्याची तरतुद असतांना देखील मागील 20 वर्षपासून मालमत्ता करात वाढ न केल्याचे निर्दशनास आले आहे. त्यामुळे महानगरपालिका उत्पनात वाढ न होता आर्थिक स्थिती निश्चितच खालावलेली आहे. तसेच वरीलप्रमाणे जळगाव महानगरपालिका मधील मालमत्ता / पाणीपटटी कर व इतर करांची थकबाकी रक्कम रुपये 360355092/- लवकरात लवकर वसुल करून शासन खाती व महानगरपालिका निधीत रक्कम जमा करणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

३) जळगाव शहरामध्ये अनेक दवाखाने आहेत ज्या ठिकाणी खाली काही मजल्यांवर दवाखाने असून वरच्या मजल्यावर संबंधित वैद्यकीय व्यावसायिक यांचे निवासस्थान आहे. अशा इमारतींचा वापर हा व्यावसायिक होत असल्याने कर आकारणीमध्ये व्यावसायिक दराने कर आकारणी करणे आवश्यक आहे. याबाबत काही दवाखान्यांचे (उदा. मालमत्ता क्र.930 प्रिझम हॉस्पीटल, 928 गणपती एमआरआय, 925 खडके हॉस्पीटल, 960 गोदावरी हॉस्पीटल) कर आकारणी तपासणी करण्यात आली असता व्यावसायिक दराने करण्यात आलेली असल्याचे आढळून आले. तथापी शहरातील सर्व दवाखान्यांचे कर आकारणीबाबत तपासणी करणे शक्य नसल्याने महानगरपालिका स्तरावर याबाबत तपासणी करण्यात येऊन ज्या ठिकाणी व्यावसायिक दराने आकारणी करण्यात आली नसल्यास अशा दवाखान्यांची कर आकारणी ही व्यावसायिक दराने करण्यात येऊन फरकासह वसुलीची कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा त्यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत राहील.

उपरोक्त त्रुटी बाबत अर्धसमास पत्र क्र. 25, दि. 11/08/2023 अन्वये खुलासा मागविला असता विभागाकडून कोणताही खुलासा सादर केला नसल्याने वरील प्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहेत.

19 जळगाव महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक1 ते 4 मधील मोबाईल टॉवरची सन2017-18 अखेर मोठया प्रमाणावर थकबाकी प्रलंबित असलेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 34656136.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

महानगरपालीका जळगावचे सन 2016-2017 ते 2017-2018 या वित्तीय वर्षांचे लेखापरीक्षण मा.उपसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (मनपालेप), औरंगाबाद यांचे अधिनस्त पथकामार्फत करण्यात आले. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016-2017 ते 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणा अंतर्गत प्रभाग कार्यालय 1 ते 4 कडील मोबाईल टॉवरबाबतच्या माहे मार्च 2018 अखेर प्रभागनिहाय मोबाईल टॉवरची खालीलप्रमाणे थकबाकी असल्याचे दिसून आली आहे.

अ.क्र	वर्षे	प्रभाग कार्यालय	खाजगी मालमत्तेवर मोबाईल टॉवरची संख्या	मागणी रक्कम	वर्षात वसुल रक्कम	थकीत रक्कम
	2016-2017					
1		प्रभाग क्र. 1	49	15696446	3936830	11759616
2		प्रभाग क्र. 2	34	2982587	202636	2779951
3		प्रभाग क्र. 3	42	10690548	1250776	9439772
4		प्रभाग क्र. 4	36	5688435	2419264	3269171
					एकुण थकबाकी	27248510
	2017-2018					
1		प्रभाग क्र. 1	53	18249595	3097453	15152142
2		प्रभाग क्र. 2	40	3895647	1390038	2505609
3		प्रभाग क्र. 3	42	15606263	2279773	13326490
4		प्रभाग क्र. 4	38	5518986	1847091	3671895

					एकुण थकबाकी	34656136

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टिपीएस 1810/1950/ प्र.क्र. 2417/10/नवि 13, दिनांक 26/07/2011 नुसार शासनाने मोबाईल टॉवर उभारणी बाबत धोरण निश्चित केलेले आहे. मोबाईल टॉवर व्यवसायिकांकडून माहे मार्च 2018 अखेर रुक्कम रु. 34656136/- एवढया कराची वसुली करण्यात आलेली नाही. मोबाईल टॉवर व्यवसायिकांकडून माहे मार्च 2017 अखेर रक्कम रु.27248510/- इतकी होती तर माहे मार्च 2018 अखेर रकमेमध्ये वाढ होऊन रु. 34656136/- एवढया कराची वसुली थकीत दिसून येते, म्हणजेच वसुलीची योग्य ती कार्यवाही वेळोवेळी होत नसल्याचे थकबाकी दरवर्षी वाढत जात आहे, असे लेखापरीक्षणाचे मत आहे. वरील तक्त्याचे अवलोकन केले असता जळगाव महानगरपालिकामधील मोबाईल टॉवरची मोठ्या प्रमाणामध्ये थकबाकी असल्यामुळे महानगरपालिकेस अपेक्षित उत्पन्न प्राप्त झालेले नाही, त्यामुळे महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. सदर थकीत रकमा वसुलीबाबत प्रभावी उपाययोजना केल्याचे दिसून येत नाही. याबाबत ठोस उपाययोजना करुन प्रसंगी आवश्यक तेथे कायदेशीर कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. करीता जळगाव महानगरपालिका मधील मोबाईल टॉवरची एकुण थकबाकी रककम रुपये 34656136/- रुपये वसुल करून शासन खाती व महानगरपालिका निधीत रक्कम जमा करणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त त्रुटी बाबत अर्धसमास पत्र क्र. 26 दि. 11/08/2023 अन्वये खुलासा मागविला असता विभागाकडून कोणताही खुलासा सादर केला नसल्याने वरील प्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहेत.

HCDHSJM8002 (Ref No : 2, Hmm No : 26)

20 जळगाव महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक1 ते 4 मधील मालमत्ता कर व पाणीपट्टी करांबाबतच्या अनियमितताबाबत

योजना : | **लेखाशीर्ष** : 0 | **वसुलपात्र** : 3000.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी | **कलम** : 9ब | **अंतिम अमान्य** : 0.00/-

महानगरपालीका जळगावचे सन 2016-2017 ते 2017-2018 या वित्तीय वर्षांचे लेखापरीक्षण मा.उपसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (मनपालेप), औरंगाबाद यांचे अधिनस्त पथकामार्फत करण्यात आले. जळगाव महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्रमांक 1 ते 4 यांचे जमा बाजू लेखापरीक्षण केले असता विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्याच्या आधारे खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.
01) जळगाव महानगरपालिकेचे सन 2016-2017 ते 2017-2018 मध्ये प्रभाग क्रमांक 1 ते 4 मधील मालमत्ता करांसंबंधीच्या पावती पुस्तके तपासणी करण्यात आली असता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 8 मधील कलम क्रमांक 40 (1) नुसार " एकाच मालमत्तेवर बसवलेल्या सर्व किंवा कोणत्याही मालमत्ता कराबदद्ल

कोणत्याही एका व्यक्तीकडून कोणत्याही प्रत्येक कालावधीसाठी येणे असलेल्या सर्व रकमा अशा व्यक्तीवर एकाच बिलात आकारण्यात आल्या पाहीजेत आणि त्या त्याच्याकडून ठोक रकमेत वसूल करण्यात येतील. " अशी तरतूद आहे, असे असतानाही सन 2016-2017 ते 2017-2018 मध्ये मालमत्ता व इतर करासाठी एक व पाणीपटटी करीता एक स्वतंत्र पावतीपुस्तके बनविण्यात आलेले होते व मालमत्ता करासाठी वेगळे बिल व पाणीपट्टी साठी वेगळे बिल देण्यात आलेले आहे.

02) भरणा किर्द व सर्वसाधारण किर्द सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरी घेतली जात नाही. दैनदिन वसुली नोंदवही वर निरीक्षक व सक्षम अधिकाऱ्याची वसुलीची पडताळणी केल्याची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे त्याखाली नाव व पदनाम लिहिणे आवश्यक असताना लिहिले जात नाही.

03) नवीन नळ संयोजन किर्दनुसार नवीन नळ कनेक्शन घेतेवेळी रुपये 500/- रक्कम ही अनामत रक्कम म्हणुन वसुली केली जाते. सदरची रक्कम प्रभागनिहाय असणा-या जनरल किर्दमधून अनामत रक्कम या शिर्षाखाली मुख्य लेखापाल यांचेकडे जनरल रोखवहीमध्ये जमा केली जाते. परंतु जनरल रोखवहीची पडताळणी केली असता सदरची रक्कम स्वतंत्र न दर्शविता इतर किर्द या शिर्षाखाली एकत्रितरित्या जमा केली जात असल्याने मनपाकडे नळ संयोजनाची किती रक्कम अनामत म्हणुन जमा आहे याचा बोध होत नाही.परिणामी अनामत खाती जमा होणाऱ्या रकमा ह्या चुकीच्या वर्गीकरणामुळे मनपा निधीमध्येच जमा करण्यात येत आहेत, त्यामुळे भविष्यात अशा रकमा परत करण्याची वेळ आल्यास लेख्यांची तपासणी करणे कठीण होईल व संबंधितांना परताव्यास विलंब होईल.

04) 150 चौमीटर वरील इमारतीच्या वसुल करण्यात आलेला मालमत्ता कर हा शासनास भरणा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे माहे सप्टेंबर 2016 च्या रोखवहीमध्ये सप्टेंबर 2016 ची जमा रक्कम 176957/- इतकी असुन शासनास भरणा केलेल्या माहे सप्टेंबर 2016 च्या चलनाची पडताळणी केली असता रक्कम रुपये 173957/- इतका भरणा केलेला दिसून येत असून रुपये 3000/- चा कमी भरणा केल्याचे दिसून आले त्यामुळे शासन भरणा कमी झालेला असल्याने शासन निधीचे नुकसान झालेले आहे.

05) सन 2016-17 ते 2017-2018 या कालावधीमध्ये महानगरपालिका यांचेकडुन सदर वर्षाच्या आगावु मालमत्ता व पाणीपटटी भरणा केल्यास 10 टक्के सुट देण्यात येते. त्यामुळे बरेच मालमत्ताधारक मालमत्ता/पाणीपटटीचा आगावु भरणा करतात. त्यामुळे त्यांचेकडे त्यावर्षीकरीता मालमत्ता/पाणीपटटी प्रलंबित रहात नाही. परंतु असे निर्दशनास आले आहे की, सदरप्रमाणे भरणा केल्यानंतरदेखील महानगरपालिका सदर मालमत्ताधारकांना त्यावर्षीच्या मालमत्ता/पाणीपटटीच्या मागणीचे देयके वितरीत करते. जर मालमत्ताधारक यांनी सदर वर्षाच्या मालमत्ता/पाणीपटटीचा भरणा आगावू केलेला असतांना त्यांचेकडे कोणतीही मागणी प्रलंबित नसतांना पुन्हा मागणी देयके वितरीत करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. त्यामुळे महानगरपालिकाचे देयके प्रिंट करण्यासाठी आर्थिक नुकसान होत आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिका कर्मचारी यांना सदर देयके वाटप करण्यासाठी वेळ वाया जात आहे.

उपरोक्त त्रुटी बाबत अर्धसमास पत्र क्र. 27दि. 11/08/2023 अन्वये खुलासा मागविला असता विभागाकडून कोणताही

खुलासा सादर केला नसल्याने वरील प्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहेत.

HCDHSJM8002 (Ref No : 3, Hmm No : 27)

21 मेहरुण तलावाच्या पेरीफेरीवर ठिकठिकाणी12.5 मीटर हायमास्ट पोल उभारुन प्रखर प्रकाश व्यवस्था करणे कामातील अनियमितता

योजना : स्थानिक विकास कार्यक्रम **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 535.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव यांचेकडील आदेश क्र.जिनिस/जिवायो/नाविन्य/जशमनपा/हायमास्ट/प्रमा/2016-17/संस-5/2082, दिनांक 19/7/2016
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, जळगांव महानगरपालिका यांचे आदेश क्र.08 दि. 17/06/2016
निधी	स्थानिक विकास कार्यक्रम
कामाची अंदाजित किंमत	रु.28,80,037/-
निधी वितरण	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव यांचेकडील आदेश क्र.3014, दिनांक 04/11/2016
कंत्राटदाराचे नांव	वरद इलेक्ट्रीकल्स, जळगांव
देयक तपशिल	प्रमाणक क्रमांक - 2292, दिनांक 8/12/2016 (मनपा निधी रोख पुस्तक) एकूण रक्कम - रु.2866481/- कपाती - सुरक्षा रक्कम - 286649 आयकर - 65929

	मुल्यावर्धीत कर - 57330 विमा - 28665 कामगार उपकर - 28665 निव्वळ प्रदान - 2399243
मोजमाप पुस्तिका	क्र.142 पृष्ठ क्र.96 ते 103 व 104 ते 106

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) निविदेसोबत तीनही निविदाकारांनी उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत ठेकेदारांचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्र जोडलेले आहे, तथापी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले नाही. त्यामुळे निविदाकारांची काम करण्याची क्षमतेबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता येत नाही. तसेच निविदा प्रक्रीयेमध्ये संबंधित विभागामार्फत निविदाकारांची काम करण्याची क्षमताबाबत पडताळणी करण्यात येत नसल्याने योग्य त्या कंत्राटदारास काम देण्यात आले किंवा कसे याबाबत खात्री होत नाही.

02) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची किंमत रु.28.80 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.2400/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.2000/- चे फ्रँकिंग मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन शासन खाती भरणा करण्यात यावी.

03) सदर कामाचे आदेशामध्ये किंवा करारनाम्यामध्ये कामाचा दोष निवारण कालावधी किंवा वॉरंटी कालावधी कुठेही नमूद करण्यात आलेला दिसून येत नाही. त्यामुळे अशा कालावधीमध्ये काही दोष निर्माण झाल्यास त्याबाबत कंत्राटदारावर जबाबदारी न राहता दुरुस्तीबाबतचे दायित्व महानगरपालिकेवर वाढू शकेल.

04) मुख्य अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांचे पत्र क्र.CE (Eelc)/Desk-3-5/HDM/206/2016 दिनांक 28/07/2016 अन्वये Rayon Illuminations या कंपनीचे साहित्य वापरास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापी सदर कामामध्ये सदर कंपनीचे किंवा इतर ISI मार्क असलेले साहित्य वापरण्यात आलेले असल्याबाबतचा कोणताही अहवाल किंवा तांत्रिक चाचणी अहवाल जोडण्यात आलेला नाही, त्यामुळे कंत्राटदाराने वापरलेले साहित्य हे योग्य दर्जाचे वापरलेले असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये खात्री करताआली नाही, व परिणामी अशा प्रकारे योग्य दर्जाचे साहित्य वापरलेले नसल्यास महानगरपालिकेचे नुकसान होण्याची शक्यताही

राहते.

05) वित्त विभाग शासन निर्णय क्र.विमास-1098/प्र.क्र.28/शासन हमी दिनांक 19/8/1998, नगरविकास विभाग शासन पत्र क्र.जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक 3/11/2003 तसेच शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र.2314 दिनांक 31/3/2015 नुसार कंत्राटदाराने कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविल्याबाबतचा पुरावा काम सुरु करणेपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. तथापी तशी कार्यवाही न करता काम पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराचे देयकामधून विमा रक्कम कपात करण्यात आलेली आहे. त्यामुळे कामगारांचा विमा उतरविण्याचा उद्देश सफल होत नाही. तसेच कपात करण्यात आलेला विमा रक्कम ही कंत्राट रकमेवर म्हणजे रु.28,80,037/- वर 1% प्रमाणे रु.28,800/- इतकी कपात करणे आवश्यक असतांना देयक रक्कमेवर रु.28665/- इतकी कपात करण्यात आलेली आहे, त्यामुळे रु.135/- इतकी रक्कम कमी कपात करण्यात आलेली असल्याने शासकीय विमा निधीचे नुकसान झालेले आहे, तरी सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन विमा निधीकडे भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह अनुपालन दर्शविण्यात यावे. तसेच देयकामधून कपात करण्यात आलेली विमा रक्कम शासकीय विमा निधीकडे भरणा करण्यात येऊन त्याबाबतचा चलनासह अहवाल विमा संचालनालयाकडे सादर करणेबाबतची कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबतचे कागदपत्रे संचिकेमध्ये लावण्यात आलेले नसल्याने कपात करण्यात आलेली विमा रक्कम शासकीय विमा संचालनालयाकडे भरणा करण्यात आली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्याचप्रमाणे विमा कपातीबाबत शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास येते.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.37 दिनांक 23/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 4, Hmm No : 37)

22 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत मिनी हायमास्ट तसेच विद्युत पोल उभारणी करुन एलईडी लाईट बसविणे कामातील अनियमितता

योजना	:	महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरात्थोन महाअभियान	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये खालील कामे करणेत आलेली असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

काम क्रमांक	01

कामाचे नांव	प्रभाग क्र.37 मध्ये 12 ठिकाणी विविध चौकात मिनी हायमास्ट पोल उभारणे	
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.867 दिनांक 2/12/2016	
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, जळगांव महानगरपालिका यांचे आदेश क्र.81 दि. 03/11/2016	
निधी	महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरात्थोन महाअभियान	
कंत्राटदाराचे नांव	वरद इलेक्ट्रीकल्स, जळगांव	
मोजमाप पुस्तिका	क्र.186 पृष्ठ क्र.88 ते 91 व 96 ते 97	
देयक तपशिल	नगरोत्थान निधी हिस्सा	मनपा हिस्सा
प्रमाणक क्रमांक	01, दिनांक 3/5/2017	05, दिनांक 24/10/2019
स्थूल रक्कम	695844	298220
कपाती- सुरक्षा रक्कम	69584	29822
आयकर	16004	6859
मुल्यावर्धीत कर	13917	6964
विमा	6958	2983
कामगार उपकर	6958	2983
निव्वळ देय	582844	249609
काम क्रमांक	02	
कामाचे नांव	जळगांव शहरात प्रभा क्र.8 (5 पोल), प्रभाग क्र.20 (5 पोल), प्रभाग क्र.31 (4 पोल) असे एकूण 14 विद्युत पोल उभारुन त्यावर एलईडी लाईट बसवून प्रकाश व्यवस्था करणे	
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.867 दिनांक 2/12/2016 रु.999396/-	

तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, जळगांव महानगरपालिका यांचे आदेश क्र.80 दि. 03/11/2016 रु.982394/- (दरसूची 2015-2016)	
कंत्राटदाराचे नांव	न्यू आर.के.इलेक्ट्रीकल्स जळगांव	
मोजमाप पुस्तिका	क्र.04 पृष्ठ क्र.121 ते 135	
देयक तपशिल	नगरोत्थान निधी हिस्सा	मनपा हिस्सा
प्रमाणक क्रमांक	03, दिनांक 20/5/2017	लेखा परिक्षण कालावधीत प्रदान झाले नाही.
स्थूल रक्कम	668969	
कपाती- सुरक्षा रक्कम	66897	
आयकर	15386	
मुल्यावर्धीत कर	13380	
विमा	6690	
कामगार उपकर	6690	
निव्वळ देय	559926	

वरील कामांच्या संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) सदर काम क्र.1 ची प्रशासकीय मान्यता आदेश प्रत व तांत्रिक मान्यता प्रदान अंदाजपत्रकाची प्रत संचिकामध्ये लावण्यात आलेली नसल्याने कामाच्या अंदाजीत रकमेबाबत पडताळणी होऊ शकली नाही.

02) निविदेसोबत तीनही निविदाकारांनी उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत ठेकेदारांचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्र जोडलेले आहे, तथापी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले नाही. त्यामुळे निविदाकारांची काम करण्याची क्षमतेबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता येत नाही. तसेच निविदा प्रक्रीयेमध्ये संबंधित विभागामार्फत निविदाकारांची काम करण्याची क्षमताबाबत पडताळणी करण्यात येत नसल्याने योग्य त्या कंत्राटदारास काम देण्यात आले किंवा कसे याबाबत खात्री होत नाही .

03) दोन्ही कामांच्या निविदांमध्ये जोडण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये वरद इलेक्ट्रीकल्स जळगांव यांचे विद्युत

ठेकेदाराची अनुज्ञप्तीची मुदत दिनांक 28/9/2016 पर्यंत आहे. त्यामुळे सदर निविदेमध्ये ते अपात्र ठरतात. उर्वरित दोन निविदाकारांमध्ये स्पर्धा होऊ शकत नसल्याने महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 466(4) खालील परिशिष्ट-3 मधील खंड 28 नुसार निविदेस मुदतवाढ देणे आवश्यक होते. तथापी मुदतवाढ न देता दोन्ही कामांच्या सर्व तीनही निविदाकारांचा दराचा लिफाफा उघडण्यात येऊन निविदा प्रक्रीया पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. तसेच काम क्र.1 मध्ये वरद इलेक्ट्रीकल्स जळगांव हे अपात्र ठरत असतांनाही त्यांचे दर कमी असल्याने त्यांना कामाचे आदेश देण्यात आलेले आहे. सदर बाब अत्यंत गंभीर असून नियमबाह्यही ठरते.

04) निविदा मंजूरीनंतर प्रथम करारनामा करुन देणेबाबतचे पत्र देण्यात येऊन नंतर कामाचे आदेश देण्यात आले व त्यानंतर करारनामे करण्यात आलेले आहेत, तसेच काम पूर्णत्वाचे अहवालामध्ये काम सुरु केल्याचा दिनांक हा करारनामा करण्यापूर्वीचे नमूद करण्यात आलेले आहेत. यावरुन असे दिसून येते की, करारनामा करण्यापूर्वीच कामाचे आदेश देण्यात आलेले आहे तसेच कामांची सुरुवातही करण्यात आलेल्या आहेत. सदर बाब अत्यंत गंभीर असून नियमबाह्यही ठरते.

05) वरील कामांचे आदेशामध्ये किंवा करारनाम्यांमध्ये कामाचा दोष निवारण कालावधी किंवा वॉरंटी कालावधी कुठेही नमूद करण्यात आलेला दिसून येत नाही. त्यामुळे अशा कालावधीमध्ये काही दोष निर्माण झाल्यास त्याबाबत कंत्राटदारावर जबाबदारी न राहता दुरुस्तीबाबतचे दायित्व महानगरपालिकेवर वाढू शकेल.

06) सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना कोणत्या ठिकाणी विद्युत पोल/एलईडी लाईटची व्यवस्था उभारण्यात येणार आहे त्याबाबत उल्लेख करण्यात आलेले नाहीत, तथापी काम अंतिम केल्यानंतर मोजमाप पुस्तिकेमध्ये पोल उभारणीची ठिकाणे नमूद करण्यात आलेली आहेत, त्यामुळे प्रस्तावित कामे व प्रत्यक्षात करण्यात आलेली कामे याबाबत पडताळणी करता आली नाही.

07) मुख्य अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांचे पत्र क्र.CE (Eelc)/Desk-3-5/HDM/206/2016 दिनांक 28/07/2016 अन्वये Rayon Illuminations या कंपनीचे साहित्य वापरास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापी सदर कामामध्ये सदर कंपनीचे किंवा इतर ISI मार्क असलेले साहित्य वापरण्यात आलेले असल्याबाबतचा कोणताही अहवाल किंवा तांत्रिक चाचणी अहवाल जोडण्यात आलेला नाही, त्यामुळे कंत्राटदाराने वापरलेले साहित्य हे योग्य दर्जाचे वापरलेले असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये खात्री करता आली नाही, व परिणामी अशा प्रकारे योग्य दर्जाचे साहित्य वापरलेले नसल्यास महानगरपालिकेचे नुकसान होण्याची शक्यताही राहते.

08) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.नगरो-2015/प्र.क्र.232/नवि-33, दिनांक 16/5/2016 मधील परिच्छेद क्र.4 नुसार शासनाने सुधारित आकृतीबंध निश्चित केलेला आहे. त्यानुसार ड-वर्ग महानगरपालिकांना 70 टक्के शासन अनुदान व 30 टक्के नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा असा आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे. तसेच परिच्छेद क्र.5(ii) नुसार वर नमुद वित्तीय आकृतीबंधानुसार देय होणारा शासन हिस्सा प्राप्त होण्यासाठी योजनेच्या स्वतंत्र

खात्यामध्ये नागरी स्वराज्य संस्थेने त्यांचा हिस्सा प्रथम जमा करणे आवश्यक राहील अशी अट नमुद करण्यात आलेली आहे. तथापी सदर दोन्ही कामांपोटी देय महानगरपालिकेचा हिस्सा योजनेच्या स्वतंत्र खात्यामध्ये विलंबाने जमा करण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे मनपा हिश्याची रक्कम काम क्र.1 बाबत दिनांक 24/10/2019 रोजी म्हणजे प्रथम देयकानंतर 17 महिन्यांच्या विलंबाने प्रदान करण्यात आलेले आहे व काम क्र.2 चे प्रदान लेखापरीक्षण कालावधीपर्यंत म्हणजे 31/03/2018 पर्यंतही करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.38 दिनांक 23/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 5, Hmm No : 38)

23 जळगांव शहरातील विज बचतीकरिता स्ट्रीट लाईट पॉईंटवर ऑटोमायझेशन व कंट्रोलींग सिस्टीम पुरविणे व बसविणे कामातील अनियमितता

योजना : महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 400.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

प्रशासकीय मान्यता	स्थायी समिती सभा क्र.58 विषय क्र.2 ठराव क्र.386 दिनांक 15/01/2016
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, जळगांव महानगरपालिका यांचे आदेश क्र.24 दि. 08/06/2015 रु.2046960/-
निधी	महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण
कंत्राटदाराचे नांव	आर.के. इलेक्ट्रीकल्स, जळगांव
मोजमाप पुस्तिका	क्र.142 पृष्ठ क्र.81 ते 95
सिस्टीम बसविणे	थ्री फेज पॉईटवर - 62 ठिकाणी, सिंगल फेज पॉईंटवर - 10 ठिकाणी
देयक तपशिल	
प्रमाणक क्रमांक	01, दिनांक 04/04/2016

स्थूल रक्कम	2026470
कपाती- सुरक्षा रक्कम	202647
आयकर	46609
कार्यकंत्राट कर	40529
विमा	20265
कामगार उपकर	20265
निव्वळ देय	1696155

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची किंमत रु.20.47 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.1600/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.1200/- चे फ्रँकिंग मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

02) अंदाजपत्रकानुसार प्रत्यक्ष करण्यात आलेल्या कामानुसार बाब क्र.1,2,3,4 मध्ये वेगवेगळ्या प्रमाणे MCB ची तरतुद करण्यात आली असून त्यानुसार काम करण्यात आलेले आहे. बाब क्र.1 व 3 मध्ये Input साठी अनुक्रमे 10+54=64 MCB बसविण्यात आलेले आहेत तर बाब क्र.2 व 4 नुसार output साठी 10+162= 172 MCB बसविण्यात आलेले आहेत. सदर चारही बाबींवर 10310+4330+ 13920+9750= 39310 इतका खर्च करण्यात आलेला आहे. एकूण 72 ठिकाणी सदर सिस्टीम बसविण्यात आलेली आहे, तथापी input व output साठी बसविण्यात आलेल्या MCB ची संख्या यांचा ताळमेळ जुळून येत नाही.

03) दरसुचीनुसार नव्याने तयार करण्यात आलेले अंदाजपत्रकामध्ये बाब क्र.8,9,10,11 ह्या बाबींचे दर हे प्रकरण 12 व 17 मधील घेण्यात आलेले असून सदर प्रकरणे हे पाण्याचे पंपसंबंधित असल्याने अंदाजपत्रकीय तरतुद जादा प्रमाणात करण्यात येऊन त्याप्रमाणे जादा खर्चही करण्यात आलेला आहे. सदर बाबींसाठी अंदाजपत्रकीय तरतुद रु.4,46,960/- अशी होती व प्रत्यक्ष खर्च रु.5,43,910/- इतका करण्यात आलेला असून त्यानुसार तरतुदीपेक्षा रु.96,950/- इतका जादा खर्च करण्यात आलेला दिसून येतो.

04) अंदाजपत्रकातील बाब क्र.25,26,27 PVC armoured cable ह्या एकाच प्रकारच्या बाबींवर दरसुचीनुसार वेगवेळया तीन तरतुदी करण्यात आलेल्या असून तीन बाबींमधील केबलची अनुक्रमे 300+1056+200 प्रमाणे एकूण लांबी 1556 मीटर साठी एकूण रु.187276/- इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात काम झाल्यानंतर मोजमाप पुस्तिकेमध्ये व देयकांमध्ये 270+800+200= 1270 मीटर केबल वापरण्यात आलेली असून त्यावर एकूण रु.153090/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. 72 ठिकाणी पोलवर सदर यंत्रणा बसवितांना इतक्या मोठ्या प्रमाणात वेगवेगळया प्रकारच्या केबल वापराबाबत लेखापरीक्षणात अनुपालन सादर करण्यात यावे.

05) दरसुचीमधील तरतुदीनुसार शासकीय कामासाठी वापरण्यात येणारे साहित्य हे ISI मार्कचे असावे, ISI मार्कचे साहित्य उपलब्ध नसल्यास वापरण्यात येणारे साहित्य हे मुख्य अभियंता (विद्युत) यांचेकडून मंजूर करुन घेण्यात यावे, ISI मार्कचे साहित्य असल्यास संबंधित अभियंता यांनी त्याबाबतची मुदत व प्रमाणीकरण तपासणी करण्यात यावी, तसेच ISI मार्क साहित्य नसल्यास त्याबाबत आवश्यकता वाटल्यास साहित्यांची ERDA किंवा CRPI किंवा केंद्र किंवा राज्य शासनाचे प्राधिकृत प्रयोगशाळेमधून तपासणी करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. तथापी वापरण्यात आलेल्या साहित्याबाबत प्रमाणिकरण करण्यात आलेले दिसून येत नाही. त्यामुळे सदर सिस्टीमध्ये वापरण्यात आलेले साहित्य हे योग्य दर्जाचे वापरण्यात आलेले असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये खात्री करता येत नाही.

06) वरीलप्रमाणे उर्जा बचत सिस्टीम पूर्णपणे बसविण्यात आल्यानंतर पूर्वीच्या देयकांमध्ये व सिस्टीम बसविण्यात आल्यानंतरच्या देयकांमध्ये किती बचत झाली व त्यामुळे महानगरपालिकेची मासिक तसेच वार्षिक किती बचत होणार आहे किंवा झाली याबाबतचा अहवाल संचिकामध्ये लावण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर सिस्टीम बसविणे लाभदायक ठरले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

07) वरील साहित्य हे महानगरपालिकेच्या मालकीची आहे, त्यामुळे सदर साहित्याची नोंद ही महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील जंगम मालमत्ता नोंदवही नमुना नं.17 मध्ये नोंद घेणे आवश्यक आहे, तथापी अशा प्रकारची मालमत्ता नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्याचे दिसून येत असून त्यामुळे महानगरपालिकेच्या वार्षिक लेख्यांमध्ये याबाबत नोंद घेण्यात आलेली नसल्याचेही दिसून येते.

08) निष्पादन लेखापरीक्षणामध्ये (Performance Audit) दिसून आले की, शहरातील वाढीव वस्त्यांमध्ये ठिकठिकाणी हायमास्ट लॅम्प बसविण्यात आलेले आहे, अशा ठिकाणी विज वितरण कंपनीची पथदिव्यांकरिता जोडणी झालेली नाही. अशा हायमास्ट लॅम्पकरिता जोडणी करतांना घरगुती विज वापराच्या लाईनवर जोडणी करण्यात येऊन त्यावर बटण लावण्यात आलेले आहे. अशा ठिकाणी परिसरातील नागरीक सदर बटण सुरु व बंद करतात. या ठिकाणी अनेक वेळा नागरीकांकडून सकाळी उशिराने लाईट बंद करण्यात येत असल्याचे निदर्शनास येते व त्यामुळे विज खप जास्त होतो व अनावश्यकरित्या देयकांमध्ये वाढ होत असते तसेच विजेचा अनावश्यकरित्या खप होत असल्याचे निदर्शनास येते. तसेच ज्या ठिकाणी पथदिव्यांची मिटर बंद आहेत व परिणामी मागिलप्रमाणे सरासरी मिटर रिडींग दर्शवून देयक प्राप्त होत असतात अशा ठिकाणी जरी महानगरपालिकेवर विज देयकांचा भार वाढत नसला तरीही राष्ट्रीय संपत्तीचा

ऱ्हास होत असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. त्यामुळे अशा ठिकाणी वरीलप्रमाणे बसविण्यात आलेल्या ऑटोमायझेशन सिस्टीमचा कुठलाही वापर होत नसल्याचे दिसून येते.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.39 दिनांक 23/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 6, Hmm No : 39)

24 जळगांव शहरातील 24 चौकातील स्वयंचलीत वाहतुक नियंत्रण देखभाल व दुरुस्ती कामातील अनियमितता

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 400.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये उपरोक्त कामाचे कंत्राटाने काम करण्यात आलेले असून कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

प्रशासकीय मान्यता	मा.आयुक्त यांचे आदेश क्र.01 दिनांक 27/6/20016		
अंदाजित रक्कम	6,13,440/-		
निधी	महानगरपालिका निधी		
कंत्राटदाराचे नांव	वरद इलेक्ट्रीकल्स जळगांव		
कामाचे आदेश	क्र.13, दिनांक 05/07/2016		
कंत्राट कालावधी	06/07/2016 ते 05/07/2016		
देयकांचा तपशिल	प्रमाणक क्रमांक	दिनांक	स्थूल रक्कम
सन 2016-2017	483	17/05/2016	131364
	1293	07/09/2016	170772
	2053	16/11/2016	143142
	2972	21/02/2017	143142

सन 2017-2018	625	22/06/2017	271830
	626	22/06/2017	48834
	627	22/06/2017	40712
	975	11/07/2017	143142
		एकूण	**790802**

वरील कामाचे वार्षिक कंत्राट करण्यात आले होते. त्यानुसार निविदा संचिका व काही देयकांची तपासणी करण्यात आले. त्यानुसार लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) निविदेसोबत तीनही निविदाकारांनी उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत ठेकेदारांचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्र जोडलेले आहे, तथापी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले नाही. त्यामुळे निविदाकारांची काम करण्याची क्षमतेबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता येत नाही. तसेच निविदा प्रक्रीयेमध्ये संबंधित विभागामार्फत निविदाकारांची काम करण्याची क्षमताबाबत पडताळणी करण्यात येत नसल्याने योग्य त्या कंत्राटदारास काम देण्यात आले किंवा कसे याबाबत खात्री होत नाही.

02) वरद इलेक्ट्रीकल्स जळगांव यांची निविदेसोबत सादर करण्यात आलेल्या विद्युत ठेकेदारांची अनुज्ञप्ती प्रमाणपत्राची मुदत ही दिनांक 28/9/2016 पर्यंत होती. तथापी त्यांची निविदा मंजूर झाली व त्यांना कामाचे आदेश देण्यात आले. कंत्राट कालावधीमध्ये त्यांची प्रमाणपत्राची मुदत संपलेली होती, तथापी त्यांचेकडून मुदतवाढ करण्यात आलेले प्रमाणपत्राची प्रत प्राप्त करण्यात आलेली नाही, त्यामुळे प्रमाणपत्राची मुदत संपल्यानंतरही त्यांना नियमबाह्यपणे काम करण्यास अनुमती देण्यात आलेली असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. सदर बाब अत्यंत गंभीर असून नियमबाह्यही ठरते.

03) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची किंमत रु.6.14 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.500/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.100/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

04) अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वी शहरातील किती सिग्नल सुरु आहे व किती सिग्नल बंद आहेत याबाबत संबंधित विद्युत अभियंता यांनी तपासणी करुन त्याप्रमाणे फक्त कार्यान्वीत असलेल्या सिग्नल व्यवस्थेकरिता अंदाजित रक्कम निश्चित करणे आवश्यक होते. सदर कामाची संचिका तपासणीदरम्यान देयक अदा करण्यापूर्वी कंत्राटदाराचा काम

केल्याचा अहवाल जोडण्यात आलेला असून त्यावर वाहतुक पोलीस निरिक्षक यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या आहेत. सदर अहवालानुसार एकूण 24 सिग्नल पैकी 12 सिग्नल हे सिग्नल मोडवर, 11 सिग्नल हे ब्लींकर मोडवर व 1 सिग्नल हा विद्युत पुरवठा बंद असल्याने बंद स्थितीत अशा प्रकारे स्थिती दिसून येते. याबाबत तत्कालीन मा.महापौर श्री.नितीन लढ्ढा यांचे पत्र क्र.214 दिनांक 18/02/2017 अन्वये बऱ्याच ठिकाणी सिग्नल बंद पडलेले असल्याचे दिसून येते याबाबत माहिती सादर करावी अशा आशयाचे पत्र देण्यात आले व त्यावर विद्युत विभागाचे पत्र क्र.458 दिनांक 21/02/2017 अन्वये वरील प्रमाणे 12 सिग्नल मोड, 11 ब्लींकर मोड व 1 बंद सिग्नल अशा प्रकारे अहवाल सादर करण्यात आला. तथापी 11 सिग्नल ब्लींकर मोडबाबत भविष्यात कोणतीही कार्यवाही करण्यात आल्याचे संचिकेवरुन दिसून येत नाही. 11 सिग्नल हे सतत ब्लींकर मोडवर होते, म्हणजेच त्या ठिकाणी वाहतुक नियंत्रणाचे दृष्टीने सिग्नल बंद स्थितीतच होते म्हणजेच सिग्नलचा वापर होत नव्हता, तथापी अशा 11 सिग्नलचे नियंत्रण व देखभालीकरिता खर्च करण्यात आलेला असल्याने असा खर्च हा अनावश्यक करण्यात आलेला असल्याचे निदर्शनास येते व त्यामुळे महानगरपालिकेचे तेवढ्या रकमेचे नुकसान झालेले आहे.

05) सदर कामासाठी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अट क्र.15 नुसार कार्यादेशाच्या दिनांकापासून तीन महिन्यानंतर एकदा सिग्नल पोल, कंट्रोलर केबीन, कंट्रोलर, सिग्नल हेड इलेक्ट्रीक केबीन यांना कलर करणे बंधनकारक राहील, म्हणजेच कार्यादेश दिल्यापासून कंत्राट कालावधीमध्ये दर तीन महिन्यांनंतर वरीलप्रमाणे कलरींगचे काम करणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे. तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्याबाबतचे अहवाल/पुरावे संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाहीत, त्यामुळे सदरचे काम कंत्राटदाराने केलेले नव्हते, तरीही नियमबाह्यपणे त्यांना देयकांचे प्रदान करण्यात आलेले आहे. तसेच अशा प्रकारे काम करण्यात आलेले नसल्याने कोणत्याही प्रकारची दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले असून याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.40 दिनांक 23/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 7, Hmm No : 40)

25 विद्युत विभागामार्फत विद्युत साहित्य खरेदीतील अनियमितता

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	900.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये खालीलप्रमाणे साहित्य खरेदीकरिता दरकरार करण्यात आलेले आहे.

काम क्र.1	सन 2016-17 करिता T5 EEFTL ट्युब व इलेक्ट्रॉनिक्स चोक साहित्य पुरवठा करणे		
प्रशासकीय मान्यता	महासभा क्र.33 विषय क्र.08 ठराव क्र.391 दिनांक 20/2/2016		
अंदाजित रक्कम	2095500/-		
निधी	महानगरपालिका निधी		
कंत्राटदाराचे नांव	न्यू.आर.के.इलेक्ट्रीकल्स, जळगांव		
देयकाचा तपशिल	प्रमाणक क्रमांक	दिनांक	स्थूल रक्कम
	3020	27/02/2017	96735
	3021	27/02/2017	92131
	3023	27/03/2017	99015
	3026	27/03/2017	97680
	621	22/06/2017	97378
		एकूण	482939
काम क्र.2	बल्ब, ट्युब, चोक पुरवठा करणे		
प्रशासकीय मान्यता	महासभा क्र.33 विषय क्र.07 ठराव क्र.390 दिनांक 20/2/2016		
अंदाजित रक्कम	3867700/-		
कंत्राटदाराचे नांव	न्यू.आर.के.इलेक्ट्रीकल्स, जळगांव		
देयकाचा तपशिल	प्रमाणक क्रमांक	दिनांक	स्थूल रक्कम
	3012	02/12/2016	97255
	3013	27/02/2016	98773
	3016	27/02/2016	76940
	3018	27/02/2017	97950

	3019	27/02/2017	98395
	3022	27/02/2017	99000
	3024	27/02/2017	98975
	3025	27/02/2017	99277
		एकूण	766565

वरील कामांचे वार्षिक कंत्राट करण्यात आले होते. त्यानुसार निविदा संचिका व काही देयकांची तपासणी करण्यात आले. त्यानुसार लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) निविदेसोबत तीनही निविदाकारांनी उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत ठेकेदारांचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्र जोडलेले आहे, तथापी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले नाही. त्यामुळे निविदाकारांची काम करण्याची क्षमतेबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता येत नाही. तसेच निविदा प्रक्रीयेमध्ये संबंधित विभागामार्फत निविदाकारांची काम करण्याची क्षमताबाबत पडताळणी करण्यात येत नसल्याने योग्य त्या कंत्राटदारास काम देण्यात आले किंवा कसे याबाबत खात्री होत नाही.

02) न्यू.आर.के.इलेक्ट्रीकल्स जळगांव यांची निविदेसोबत सादर करण्यात आलेल्या विद्युत ठेकेदारांची अनुज्ञप्ती प्रमाणपत्राची मुदत ही दिनांक 09/04/2016 पर्यंत होती. तथापी त्यांची दोन्ही कामांची निविदा मंजूर करण्यात आली आहे. कंत्राट कालावधीमध्ये त्यांची प्रमाणपत्राची मुदत संपलेली होती, तथापी त्यांचेकडून मुदतवाढ करण्यात आलेले प्रमाणपत्राची प्रत प्राप्त करण्यात आलेली नाही, त्यामुळे प्रमाणपत्राची मुदत संपल्यानंतरही त्यांना नियमबाह्यपणे काम करण्यास अनुमती देण्यात आलेली असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. सदर बाब अत्यंत गंभीर असून नियमबाह्यही ठरते.

03) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे वरील काम क्र.1 ची मंजूर दरानुसार किंमत रु.21.55 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.1700/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.1200/- चे फ्रँकीक मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.500/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, तसेच वरील काम क्र.2 ची मंजूर दरानुसार किंमत रु.38.31 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.3400/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.3000/- चे फ्रँकीक मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे. त्यामुळे वरील दोन्ही कामांमधील एकूण रु.900/- इतकी रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

04) निविदा मागणीपूर्वी अंदाजित साहीत्यांची आवश्यकता परिगणीत करतांना मागिल तीन वर्षांमध्ये किती साहित्य वापरात आलेले आहे, मागिल साहित्यापैकी किती साहित्य शिल्लक आहे, शहर परिसरामध्ये किती पोल असून त्यावर कोण-कोणत्या प्रकारचे व कोणते साहित्य वापरणे आवश्यक आहे याबाबतचा अहवाल तयार करण्यात आलेला नसून साहित्यांचे परिणाम अंदाजित नमूद करुन दरसूचीमधील दरांनुसार अंदाजित किंमत परिगणीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे आवश्यकतेपेक्षा जास्त साहित्य खरेदी करण्यात आले असल्यास महानगरपालिकेचा निधी अनावश्यकरित्या अडकून पडतो.

05) वरील दोन्ही कामांमध्ये दरकरारानुसार विविध साहित्य खरेदी करण्याचे प्रस्तावित होते. साहित्य पुरवठा आदेश देण्यापूर्वी वेळोवेळी प्रभाग समितीमधील संबंधित लाईन इन्स्पेक्टर यांचेकडून मागणीपत्रे घेऊन त्याप्रमाणे पुरवठादारास पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. तथापी अशा प्रकारे मागणी घेतांना प्रत्येक वेळी सर्व लाईन इन्स्पेक्टरकडील मागणी ही एकाच तारखेचे व एकसारखे साहित्यांचीच असल्याचे दिसून येते. म्हणजेच सर्व प्रभाग समित्यांमध्ये एका वेळी एकाच प्रकारच्या साहित्यांची मागणी सादर केलेली असल्याने मागणीपत्राबाबत लेखापरीक्षणामध्ये साशंकता निर्माण होते.

06) साहित्य पुरवठाचे डिलीव्हरी चलनमध्ये व देयकामध्ये साहित्य हे बजाज, सुर्या या कंपनीचे पुरविण्यात आलेले असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे, तथापी याबाबत साहित्य तपासणीबाबत अहवाल/पुरावे संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेलेच साहित्य पुरवठा झाले किंवा नाही याबाबत खात्री होत नाही व त्यामुळे योग्य दर्जाचे व किंमतीचे साहित्य पुरवठा झालेले नसल्यास महानगरपालिकेचे नुकसान झालेली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.41 दिनांक 23/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 8, Hmm No : 41)

26 शहरामध्ये विविध ठिकाणी विद्युत पोल उभारुन एलईडी लाईट बसविणे कामातील अनियमितता

योजना	:	14वा वित्त आयोग / आमदार निधी / खासदार निधी	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 2000.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये जळगांव शहरामध्ये विविध ठिकाणी विद्युत पोल उभारुन एलईडी लाईट बसविणेकरिता विविध योजनांमधून खर्च करण्यात आलेले आहेत. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	स्थूल रक्कम	तपशिल
	14वा वित्त आयोग		
140	06/11/2017	189981	वार्ड क्र.6,7,21,1 मधील लिधूरवाडा नाल्याजवळ, ममुराबाद नाल्याजवळ, श्री.गणेश सनकत यांच्या घराजवळ, शनिपेठ गुरुनानक नगर व श्री.शामलाल यांच्या घराजवळ मणराम चांगरे यांच्या घराजवळ, भिलपुरा दर्ग्याजवळ, बालाजी मंदीरामागे, इस्लामपुरा येथील सार्व. शौचालय पॅसेजमध्ये स्ट्रीट लाईट बसविणे
141	06/11/2017	242586	वार्ड क्र.21 मध्ये मन्यारवाडा, बालाजी मंदीरामागे, मन्यारवाडा (वाल्मीक नगर), वार्ड क्र.22 मध्ये कोल्हे गोडाऊन, वार्ड क्र.24 मध्ये कासमवाडी नाल्याच्या काठावर सार्व.शौचालय पॅसेजमध्ये स्ट्रीट लाईट पोल उभारणे
142	06/11/2017	60428	वार्ड क्र.24 कासमवाडी शौचालयाबाहेर 6 मी. उंचीचे 2 पोल व गुरुनानक नगर येथे पुरुष शौचालयाबाहेर 6 मी. उंचीचा 01 पोल व एलईडी लाईट बसविणे
143	06/11/2017	228512	वार्ड क्र.4 पार्वती ओक नगर, वार्ड क्र.5 खेडी परिसर, वार्ड क्र.23 पांझरपोळ, नशिराबाद रोड, वार्ड क्र.20 दिक्षीत वाडी, वार्ड क्र.07 ब्राम्हणसभा येथील सार्व. शौचालयांचे पॅसेजमध्ये स्ट्रीट लाईट उभारणे
144	06/11/2017	57446	वार्ड क्र.25 कंजरवाडा सार्व. शौचालयाबाहेर 9 मी. उंचीचा 1 पोल व एलईडी लाईट बसविणे
145	06/11/2017	57564	प्रभाग समिती क्र.2 प्र.क्र.7 मधील ममुराबाद रोड लेंडी नाला काठ सार्व. शौचालयाबाहेर 9 मी. उंचीचा 1 पोल व एलईडी लाईट बसविणे
146	06/11/2017	241682	वार्ड क्र.22 गोपाळपुरा मंदीरासमोर, वार्ड क्र.24 कासमवाडी, वार्ड क्र.25 कंजरवाडा, वार्ड क्र.26 नवल कॉलनी, वार्ड क्र.04 ममुराबाद नाका सार्व. शौचालय पॅसेजमध्ये पोल उभारणे
147	06/11/2017	60847	प्र.क्र.3 मधील लक्ष्मीनगर मधील रहिवाशांकरिता लाकूडपेठ पटेलवाडी

			येथे बांधलेल्या सार्व. शौचालय, कानळदा रोड ते पटेलवाडी पर्यंतचे रोडवर 6 मी. उंचीचे 4 पोल उभारुन एलईडी लाईट बसविणे
148	06/11/2017	259458	मेहरुण जोशी वाड्याजवळ भोई यांच्या घराजवळ, कुंभार वाडा जवळ, मिल्लत हायस्कूल मागे, महादेव मंदीराजवळ लक्ष्मीनगर, तांबापुरा, फुकटपुराजवळ टेकळे यांच्या ऑफीससमोर, सुप्रीम कॉली येथे सार्व. शौचालय स्ट्रीट लाईट बसविणे
149	06/11/2017	199654	शिवाजीनगर हमालवाडा, पटेलवाडा लाकूडपेठ, ख्रिश्चन कब्रस्थान मागे, अशोक परदेशी यांचे घराजवळ, खडकेचाळ, शिवाजीनगर व कांचननगर (रेल्वे लाईनलगत) सार्व. शोचालय पॅसेजमध्ये स्ट्रीट लाईट बसविणे
150	06/11/2017	241252	म्युनिसिपल कॉलनी, हरीविठ्ठल नगर, तडवी वाडा बाजारपट्टा, भिलाटी, खंडेराव नगर रेल्वे लाईनजवळ, पिंजारी वाडा, पिंप्राळा मठी चौक, कुंभारवाडा, बारीवाडा इ. ठिकाणी सार्व. शौचालय पॅसेजमध्ये स्ट्रीट लाईट उभारणे
151	06/11/2017	112188	समता नगर शिव मंदीराजवळ, वंजारी टेकडीजवळ, धामणगांव वाडा जवळ व मारोती मंदीराजवळ सार्व. शौचालय पॅसेजमध्ये स्ट्रीट लाईट पोल उभारणे
152	06/11/2017	29661	प्र.क्र.7 मध्ये बळीराम पेठ श्रीकृष्ण व्यायाम शाळा जवळ, शनिपेठ, ममुराबाद रोड, कालीकामाता मंदीर समोर सार्व. शौचालयाबाहेर 6 मी. उंचीचे 2 पोल एलईडी लाईट बसविणे
153	06/11/2017	154594	शाहूनगर मार्केटजवळ, पिंप्राळा रोड इंदिरानगर, पडकी शाळामागे, दंगलग्रस्त कॉलनी, गणेशनगर जेलमागे, धनगर वाडा पिंप्राळा इ. ठिकाणी सार्व. शौचालय पॅसेजमध्ये स्ट्रीट लाईट बसविणे
	एकूण खर्च	**2135853**	
	आमदार निधी		
86	01/03/2017	267066	प्र.क्र.16 रामानंद नगर घाट येथे 01 विद्युत पोल, प्र.क्र.19 आर्ट ऑफ

			लिव्हींग केंद्राजवळ हॉटेल केवल कुक येथे 01, प्र.क्र.21 भिलपुरा येथे 01 व प्र.क्र.19 डेमला कॉलनी येथे 01 हायमास्ट पोल व एलईडी लाईट बसविणे
87	01/03/2017	247884	प्रभाग समिती क्र.2 अंतर्गत प्रभाग क्र.23 विनोद खडके यांचे घराजवळ, प्र.क्र.24 हिरालाल भगीरथ तिवारी यांचे घराजवळ, प्र.क्र.30 पोलीस चौकी इच्छादेवी चौक, प्र.क्र.7 मा.नगरसेवक पप्पु भैय्या यांच्या घराजवळhellip;. हायमास्ट एलईडी लाईट बसविणे
88	01/03/2017	185750	प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत प्रभाग क्र.34 पोल फॅक्टरीमागे, अयोध्यानगर व चौधरी किराणा, हनुमान नगर, प्र.क्र.33 श्रीराम मंदीर चौक या विविध ठिकाणी 3 नग हायमास्ट एलईडी लाईट बसविणे
89	01/03/2017	266712	प्र.क्र.25 लक्ष्मीनगर येथे 01, प्र.क्र.31 मेहरुण येथे 1, प्र.क्र.35 रामेश्वर नगर येथे 1, एमडीएस कॉलनी येथे 1, प्र.क्र.13 मयुर हाऊसिंग सोसायटी पिंप्राळा येथे 1 मिनी हायमास्ट पोल व एलईडी लाईट बसविणे
90	01/03/2017	268128	प्र.क्र.36 ओपन स्पेस स.नं.450/1, येथे 1, प्र.क्र.11 आसाराम बापू आश्रममागे शिवरत्न चौक निवृत्ती नगर येथे 1, प्र.क्र.11 मुक्ताईनगर येथे 1, प्र.क्र.12 खोटेनगर पाण्याची टाकी येथे 1 मिनी हायमास्ट पोल व एलईडी लाईट बसविणे
91	01/03/2017	200624	प्र.क्र.36 आनंद नगर महाबळ परिसर येथे 2, प्र.क्र.37 प्लॉट नं.56 पवन हील्स, अनुराग स्टेट बँक कॉलनीच्या उत्तरेस 1 मिनी हायमास्ट व एलईडी लाईट बसविणे
92	01/03/2017	133315	प्र.क्र.9 प्रतापनगर (प्रजापिता ब्रम्हकुमारी विश्व विद्यालय)त्र येथे 1, प्र.क्र.10 श्रीराम स्टेट बँक कॉलनी शामची आई उद्यान) रिंग रोड येथे 1 मिनी हायमास्ट व एलईडी लाईट बसविणे
93	01/03/2017	135362	प्र.क्र.5 सागर नगर येथे 1, अयोध्या नगर येथे 1 मिनी हायमास्ट व एलईडी लाईट बसविणे

94	01/03/2017	134064	प्र.क्र.01 रेल्वे क्वॉर्टर शिवाजीनगर येथे 1, प्र.क्र.23 जुना नशिराबाद रोड येथे 1 मिनी हायमास्ट व एलईडी लाईट बसविणे
95	01/03/2017	188164	प्रभाग समिती क्र.1 अंतर्गत प्र.क्र.1 खडके चाळ, प्र.क्र.3 हमालवाडा परिसर, शिवाजीनगर व प्र.क्र.4 सोना नगर (प्रजापत नगर) नवीन ममुराबाद नाका या ठिकाणी 3 मिनी हायमास्ट पोल व एलईडी लाईट बसविणे
96	01/03/2017	250232	प्रभाग समिती क्र.1 अंतर्गत प्र.क्र.10 एलआयसी कॉलनी भरत व्हीला बिल्डींग समोर, गणेश कॉलनी ॲड चेतन पाटील यांच्या घराजवळ व प्र.क्र.13 पिंप्राळा शिवार समर्थ नगर गट क्र.5/1 सुलोचना निवासासमोर जिल्हा बँक कॉलनी साईप्रसाद अपार्टमेंट समोर 4 मिनी हायमास्ट व एलईडी लाईट बसविणे
97	01/03/2017	251406	प्रभाग समिती क्र.4 अंतर्गत प्र.क्र.18 हनुमान मंदीर चौक हरीविठ्ठल नगर, प्र.क्र.17 किरण बेंडाळे म्युनिसिपल कॉलनी यांचे घराजवळ, प्र.क्र.37 इरिगेशन क्वॉर्टर्स जवळ मायादेवी रोड, प्र.क्र.37 समता नगर डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ हायमास्ट एलईडी लाईट बसविणे
98	01/03/2017	289705	प्र.क्र.1 के.सी.पार्क जितेंद्र कोळी यांचे घराजवळ 1, प्र.क्र.3 शिवाजी नगर हुडको पिंटू कोळी यांचे घराजवळ 1, प्र.क्र.1 शिवाजीनगर (उस्मानिया नगर) 1, प्र.क्र.6 महर्षि वाल्मीक चौक येथे 1 मिनी हायमास्ट पोल व एलईडी लाईट बसविणे
99	01/03/2017	268954	प्र.क्र.30 बौद्ध वाडा जवळ 01, गवळी वाडा येथे 01, तांबापुरा येथे 01, प्लॉट नं.8 साईनगर खुला भूखंड येथे 01 मिनी हायमास्ट पोल व एलईडी लाईट बसविणे
100	01/03/2017	268069	प्र.क्र.4 पवन नगर येथे 01, प्र.क्र.4 हरी ओम नगर येथे 01, प्र.क्र.5 विनायक नगर खेडी येथे 01, प्र.क्र.5 शिव कॉलनी खेडी येथे 01 मिनी हायमास्ट पोल व एलईडी लाईट बसविणे
101	01/03/2017	268246	प्र.क्र.27 टागोर नगर बगीचा येथे 1, प्र.क्र.26 जोशी कॉलनी, सप्तश्रृंगी

			मंदीर जवळ 1, प्र.क्र.37 अनुराम स्टेट बँक कॉलनी महाबळ येथे 1, प्र.क्र.34 सद्गुरु नगर अयोध्या नगर येथे 1 मिनी हायमास्ट व एलईडी लाईट बसविणे
102	01/03/2017	266049	प्र.क्र.25 कासमवाडी-मासूमवाडी चौक 1, प्र.क्र.29 जे.के.पार्क परिसर मेहरुण येथे 1, प्र.क्र.14 हुडको येथे 1, प्र.क्र.32 मास्टर कॉलनी येथे 1 मिनी हायमास्ट व एलईडी लाईट बसविणे
103	01/03/2017	67622	प्र.क्र.19 गणेश कॉलनी रोड डॉ.बाबासाहेब उद्यानजवळ 1 मिनी हायमास्ट व एलईडी लाईट बसविणे
104	01/03/2017	66442	प्र.क्र.24 मनोरमा बाई जगताप शिंपी समाज मंगल कार्यालय जवळ, पांझरापोळ टाकीजवळ 1 हायमास्ट व एलईडी लाईट बसविणे
	एकूण खर्च	**4023794**	
	खासदार निधी		
03	04/10/2017	**285896**	पिंप्राळा रोड आसावा नगरमध्ये दुधाच्या बुथजवळ 12.5 मी. नॉन मोटोराईज्ड हायमास्ट पोल उभारुन त्यावर लाईट व्यवस्था करणे
	एकूण खर्च	**285896**	

वरीलप्रमाणे देयकांची तपासणी करण्यात आली असता लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) लेखापरिक्षणामध्ये अर्धसमास पत्र क्र.18 दिनांक 9/6/2023 अन्वये विचारणा करण्यात आल्याप्रमाणे अनुपालन सादर करण्यात आले नाही. वरील विवरणानुसार विद्युत पोल उभारणी करुन त्यावर एलईडी लाईट बसविणे तसेच हायमास्ट लाईट पोल उभारणे अशी दोन प्रकारची कामे करण्यात आलेली आहे, तथापी सदर कामांची अनेक अंदाजपत्रके तयार करुन त्यास वेगवेगळी प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेण्यात आलेल्या असल्याचे निदर्शनास येते. रु.3 लक्षपेक्षा जास्त कामांकरिता ई-निविदा प्रक्रीया राबविणे आवश्यक आहे, तथापी अशा प्रकारची ई-निविदा प्रक्रीया टाळण्याच्या दृष्टीने अशा प्रकारे विभागणी करण्यात आलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

02) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 3 मध्ये निविदा प्रक्रीया राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. त्यामधील अ.क्र.4 व 5 नुसार तीन महिन्यांच्या आंत पुन्हा करावयाच्या कामांकरिता स्वतंत्र निविदा मागविण्यात येणार नाही तर अशा स्वरुपाची कामे एकाच निविदेमध्ये एकत्रित करण्यात यावीत. तसेच वारंवार किंवा नियमित तत्वावर हाती घेण्यात येणाऱ्या कामांकरिता पुन्हा पुन्हा निविदा न मागविता निश्चित

कालावधीकरिता दर करार करणेत यावेत. तसेच असे दर करार करतांना कमी दराच्या बोलीदाराला कमीत कमी 50 टक्के काम देणे व उर्वरित कामे/कार्यादेश इतर बोलीदारांमध्ये कमी बोली लावणाऱ्यास जास्तीत जास्त काम देणेत यावीत अशी मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापी याबाबतची कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

03) वरीलप्रमाणे करण्यात आलेली कामे ही ठराविक दोन कंत्राटदार यांनाच देण्यात आलेली आहे. सदर कामांच्या निविदा प्रक्रीयेमध्ये एकसारखेच तीन निविदाकार भाग घेत असल्याचे दिसून येते. त्यापैकी दोन निविदाकारांनी आलटून-पालटून निविदा दर कमी भरुन कामे मिळविलेली आहेत. त्यामुळे संगनमताने कामे मिळविल्याचे दिसून येते.

04) निविदा मंजूर झाल्यानंतर करारनाम्याकरिता स्टॅम्प खरेदी ही एकाच दिवशी, एकाच स्टॅम्प वेंडर कडून व खरेदीकरिता हस्ते म्हणून एकाच व्यक्तीचे नांव नमूद असल्याचे दिसून येते. यावरुन निविदा प्रक्रीयेमध्ये निविदाकारांनी परस्पर संगनमताने निविदा भरलेल्या असल्याचे दिसून येते.

05) सदर योजनेची अंदाजपत्रके ही कोणत्या दरसूचीनुसार करण्यात आलेली आहे त्याबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही, त्यामुळे अंदाजपत्रकातील दरांबाबत लेखापरीक्षणात तपासणी करता आली नाही.

06) निविदेसोबत निविदाकारांनी उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत ठेकेदारांचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्र जोडलेले आहे, तथापी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले नाही. त्यामुळे निविदाकारांची काम करण्याची क्षमतेबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. तसेच निविदा प्रक्रीयेमध्ये संबंधित विभागामार्फत निविदाकारांची काम करण्याची क्षमताबाबत पडताळणी करण्यात येत नसल्याने योग्य त्या कंत्राटदारास काम देण्यात आले किंवा कसे याबाबत खात्री होत नाही.

07) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. वरील कामांपैकी आमदार निधीमधील 5 कामांचे (वरील यादीमधील प्रमाणक क्र.87, 88, 95, 96, 97 मधील कामांचे) करारनामे हे रु.100/- चे मुद्रांकावर करण्यात आलेले आहेत, त्यामुळे अशा कामांचे करारनाम्यामध्ये रु.400/- प्रत्येकीप्रमाणे एकूण रु.2000/- चे शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे, तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रकमा वसुल करुन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षा भरणा करण्यात यावी.

08) वरील साहित्य हे महानगरपालिकेच्या मालकीची आहे, त्यामुळे सदर साहित्याची नोंद ही महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील जंगम मालमत्ता नोंदवही नमुना नं.17 मध्ये नोंद घेणे आवश्यक आहे, तथापी अशा प्रकारची मालमत्ता नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्याचे दिसून येत असून त्यामुळे महानगरपालिकेच्या वार्षिक लेख्यांमध्ये याबाबत नोंद घेण्यात आलेली नसल्याचेही दिसून येते.

09) वरील कामांचे आदेशामध्ये किंवा करारनाम्यांमध्ये कामाचा दोष निवारण कालावधी किंवा वॉरंटी कालावधी कुठेही नमूद करण्यात आलेला दिसून येत नाही. त्यामुळे अशा कालावधीमध्ये काही दोष निर्माण झाल्यास त्याबाबत कंत्राटदारावर जबाबदारी न राहता दुरुस्तीबाबतचे दायित्व महानगरपालिकेवर वाढू शकेल.

10) मुख्य अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांचे पत्र क्र.CE (Eelc)/Desk-3-5/HDM/206/2016 दिनांक 28/07/2016 अन्वये Rayon Illuminations या कंपनीचे साहित्य वापरास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच दरसुचीमधील तरतुदीनुसार शासकीय कामासाठी वापरण्यात येणारे साहित्य हे ISI मार्कचे असावे, ISI मार्कचे साहित्य उपलब्ध नसल्यास वापरण्यात येणारे साहित्य हे मुख्य अभियंता (विद्युत) यांचेकडून मंजूर करुन घेण्यात यावे, ISI मार्कचे साहित्य असल्यास संबंधित अभियंता यांनी त्याबाबतची मुदत व प्रमाणीकरण तपासणी करण्यात यावी, तसेच ISI मार्क साहित्य नसल्यास त्याबाबत आवश्यकता वाटल्यास साहित्यांची ERDA किंवा CRPI किंवा केंद्र किंवा राज्य शासनाचे प्राधिकृत प्रयोगशाळेमधून तपासणी करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. तथापी वापरण्यात आलेल्या साहित्याबाबत प्रमाणिकरण करण्यात आलेले दिसून येत नाही. त्यामुळे सदर सिस्टीमध्ये वापरण्यात आलेले साहित्य हे योग्य दर्जाचे वापरण्यात आलेले असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये खात्री करता आली नाही. तसेच साहित्य योग्य दर्जाचे व देयकामध्ये नमुद दरांचे वापरण्यात आले नसल्यास त्यामुळे शासन निधीचे पर्यायाने महानगरपालिकेचे नुकसान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

11) देयक अदा केल्यानंतर देयकाच्या स्थळ प्रतीवर तसेच मोजमाप पुस्तिकेमध्ये देयकाचा तपशिल जसे प्रमाणक क्रमांक, दिनांक इत्यादी नमुद करण्यात आलेले नाही. त्यामुळे असे प्रदान दुबार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

12) वरील कामांसाठी प्रशासकीय मान्यतेनुसार निधी उपलब्ध झालेला आहे, तथापी प्राप्त निधीपेक्षा कमी खर्च झालेला असल्याने उर्वरित निधी शासनाकडे भरणा करण्यात आलेला आहे किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात योग्य त्या अभिलेख्यांसह अनुपालन दर्शविण्यात यावे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.42 दिनांक 23/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 9, Hmm No : 42)

27 वातानुकूलीत यंत्रे/संयंत्रे बसविणे अथवा दुरुस्त करणे कामातील अनियमितता

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	294034.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये वातानुकुलीत यंत्र नवीन बसविणे तसेच जुने संयंत्रे दुरुस्त करणेबाबत महानगरपालिका निधीमधून खर्च करण्यात आलेले आहेत. त्याबाबतचा

तपशिल खालीलप्रमाणे आहे.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशिल
965	11/07/2017	45800	मा.आयुक्त यांचे केबीन मधील, मा.आयुक्त यांचे मिटींग हॉलमधील, मा.परिवहन सभापती यांचे केबीनमधील, मा.आयुक्त यांचे बंगल्यामधील, पाचव्या माळ्यावरील वातानुकुलीत संयंत्रे निष्काषित करुन दुसरे संयंत्र बसविणे, दुरुस्त करणे
966	11/07/2017	186002	मनपा 17 मजली प्रशासकीय इमारतीच्या 17व्या माळ्यावरील छतावरील उद्वाहकांचे मशिन रुममध्ये वातानुकूलीत संयंत्रे बसविणे
967	11/07/2017	62232	मा.आयुक्त यांचे दालनातील वातानुकूलीत संयंत्र वारंवार नादुरुस्त होत असल्याने निष्कासित करुन त्या ठिकाणी नवीन वातानुकूलीत संयंत्र बसवून यंत्रणा अद्यावत करणे
	एकूण	**294034**	

वरीलप्रमाणे देयकांची व संचिकांची तपासणी करण्यात आली असता लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) लेखापरीक्षण अर्धसमास पत्र क्र.14 दिनांक 24/04/2023 अन्वये वातानुकुलीत यंत्र बसविणे, खरेदीचा तपशिल, दुरुस्तीचा तपशिल, साठा पुस्तकाच्या नोंदी इत्यादींबाबतची माहिती मागविण्यात आली होती, तथापी याबाबतची माहिती लेखापरीक्षणास सविस्तर माहिती उपलब्ध झाली नाही, फक्त दुरुस्तीबाबतची संचिका उपलब्ध करुन देण्यात आली. त्यामुळे महानगरपालिका अंतर्गत किती वातानुकूलीत संयंत्रे बसविण्यात आलेले आहेत याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

02) लेखापरीक्षण कालावधी सन 2016-2017 व 2017-2018 मध्ये वरीलप्रमाणे वातानुकूलीत संयंत्र दुरुस्ती तसेच नवीन बसविणे या बाबींकरिता खर्च करण्यात आलेले आहेत. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.शाकाजा-1012/प्र.क्र.2/2012/22, दिनांक 27/02/2012 अन्वये राज्यातील जे शासकीय अधिकारी वेतनबॅण्ड रु.37400-67000 अधिक ग्रेड वेतन रु.10000/- किंवा त्यापेक्षा अधिक वेतन बॅण्ड व ग्रेड वेतन अशा श्रेणीमध्ये काम करतात त्यांची दालने वातानुकूलीत करता येतील असे आदेश आहेत. तथापी वरील तपशिलावरुन मा.आयुक्त, परिवहन सभापती यांचे दालनांमध्ये, मिटींग हॉलमध्ये तसेच मा.आयुक्त यांचे निवासस्थानी वातानुकूलीत यंत्र बसविण्यात आलेले असल्याचे निदर्शनास येते, व अशा संयंत्रांवर दुरुस्तीपोटी खर्च करण्यात आलेला असल्याने तसेच नवीन वातानुकलीत यंत्र बसविण्यात आलेले आहे, असा दुरुस्तीवरील व नवीन संयंत्र बसविण्याकरिता करण्यात आलेले खर्च हा

लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येणार नाही.

3) प्रमाणक क्र.965 अन्वये पाचव्या माळ्यावरील वातानुकूलीत संयंत्र निष्काषित करुन दुसरे संयंत्र बसविण्यात आलेले आहे, तथापी असे संयंत्र कोणत्या अधिकाऱ्याचे बैठक कक्षामध्ये होते याबाबत संचिकेमध्ये तपशिल नमुद नाही. त्यामुळे संयंत्र वरील शासन निर्णय दिनांक 27/02/2012 अन्वये पात्र असलेल्या अधिकाऱ्याच्याच कक्षामध्ये बसविले असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

04) वरील प्रमाणक क्र.965 अन्वये मा.आयुक्त यांचे दालनातील संयंत्रे इतर ठिकाणांहून बदलविण्यात आले, त्याकरिता कार्यादेश क्र.2, दिनांक 19/5/2016 देण्यात आले, तथापी त्यानंतर पुन:श्च कार्यादेश क्र.22 दिनांक 19/8/2016 अन्वये मा.आयुक्त यांचे दालनामधील संयंत्र वारंवार नादुरुस्त होत असल्याने निष्कासित करुन नवीन संयंत्र बसविण्याबाबत आदेश देण्यात आले व त्यानुसार प्रमाणक क्र.967 अन्वये खर्चाचे प्रदान करण्यात आले, त्यामुळे अल्प कालावधीमध्येच वातानुकूलीत संयंत्र नव्याने बसविण्याचे प्रयोजनाबाबत लेखापरीक्षणात खुलासा सादर करण्यात आला नाही. तसेच दिनांक 19/5/2016 रोजीच्या आदेशान्वये मा.आयुक्त यांचे दालनातील बदलविण्यात आलेले संयंत्रांची दुरुस्तीही करण्यात आलेली असल्यामुळे असा दुरुस्तीवर करण्यात आलेला खर्चही वाया गेलेला आहे.

05) वरील प्रमाणक क्र.967 अन्वये मा.आयुक्त यांचे दालनातील जुने वातानुकूलीत संयंत्र निष्काषित करण्यात आल्यानंतर त्याबाबत पुढील कार्यवाही म्हणजे सदर संयंत्र इतर ठिकाणी बसविण्यात आले किंवा कसे किंवा सदर संयंत्र निर्लेखित करण्यात आले किंवा कसे याबाबत अभिलेखांअभावी लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

06) प्रमाणक क्र.966 अन्वये 17व्या माळ्यावरील उद्ववाहकाचे मशिन रुममध्ये वातानुकूलीत संयंत्र बसविण्यात आले आहे. अशा प्रकारे उद्ववाहकाचे मशिन रुममध्ये वातानुकूलीत संयंत्र बसविण्याची आवश्यकता असलेबाबत संबंधित यंत्रणेचे उदा.शासन निर्णय/विद्युत निरिक्षक यांचा अहवाल अशा प्रकारे कुठलेही अहवाल/अभिप्राय संचिकामध्ये लावण्यात आलेले नाही. तसेच यापूर्वी सदर मशिन रुममध्ये अशा प्रकारे वातानुकूलीत संयंत्र बसविण्यात आलेले होते किंवा कसे, यापूर्वी अशा प्रकारे संयंत्र बसविण्याची आवश्यकता नव्हती कां, बसविले असल्यास असे जुने वातानुकूलीत संयंत्राबाबत काय कार्यवाही करण्यात आली, याबाबत लेखापरीक्षणात अनुपालन सादर करण्यात आले नाही.

07) वातानुकूलीत संयंत्र दुरुस्तीबाबतची संचिका तपासणी करण्यात आली असता वरील प्रमाणकांव्यतिरिक्त महानगरपालिकांतर्गत इतर ठिकाणी असलेले संयंत्रांच्या दुरुस्तीची तसेच नवीन संयंत्र बसविण्याची कार्यवाही करण्यात येऊन त्याबाबतची देयके अर्थ विभागाकडे सादर करण्यात आलेली असल्याचे दिसून येते. सदर देयकांचे प्रदान लेखापरिक्षण कालावधी सन 2016-17 व 2017-18 मध्ये झालेले नसले तरी वरील शासन निर्णय दिनांक 27/02/2012 अन्वये पात्र नसलेल्या अधिकाऱ्यांचे दालनामध्ये अशी वातानुकूलीत संयंत्रे बसविण्यात आलेली असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

अ. क्र.	तपशिल	देयकाची रक्कम	अर्थविभागास देयक

			सादर केल्याचा दिनांक
1	मनपा 17 मजली प्रशासकीय इमारत दुसऱ्या माळ्यावरील सभागृहात 3 स्लीट व 2 विंडो असे एकूण 5 ए.सी. सर्व्हीसिंग करुन दुरुस्त करणे (गारवा रेफ्रीरेशन, जळगांव)	12300	15/09/2017
2	13व्या मजल्यावरील उपायुक्त यांचे कक्षातील ए.सी. अद्यावत करणे (गारवा रेफ्रीरेशन, जळगांव)	57664/-	04/08/2017
3	मा.आयुक्त बंगला येथील गेस्ट बेड रुममधील जुना स्लीट ए.सी. हॉलमध्ये स्थलांतर करणे, दुरुस्त करणे, तसेच उपायुक्त निवासस्थान (रिंगरोड) आणि शाहूनगर दवाखाना येथील ए.सी. दुरुस्त करणे (गारवा रेफ्रीरेशन, जळगांव)	45090	15/09/2017
4	प्रशासकीय इमारत 9व्या माळ्यावरील शहर अभियंता यांचे कक्षातील वातानुकूलीत यंत्रणा अद्यावत करणे (गारवा रेफ्रीरेशन, जळगांव)	57664	04/08/2017
5	प्रशासकीय इमारत 17वा/13वा/8वा/12वा/4था माळ्यावरील ए.सी. दुरुस्त करणे तसेच 18व्या माळ्यावरील लिफ्टचे 3 मशिन रुमचे ए.सी. बसविणे (गारवा रेफ्रीरेशन, जळगांव)	36800	06/03/2018

8) वरील शासन निर्णय दिनांक 27/02/2012 अन्वये महानगरपालिकेंतर्गत अनुज्ञेय नसतांना मोठ्या प्रमाणात वातानुकूलीत यंत्रणांचा वापर होत आहे, त्यामुळे महानगरपालिकेवर आवर्ती खर्चामध्ये जसे यंत्रणा वेळोवेळी दुरुस्ती करणे, सर्व्हीसिंग करणे, यंत्रणांच्या वापरामुळे विज खपामध्ये वाढ होऊन देयकांमध्ये जादा वाढ होणे अशा प्रकारे वाढ होत असल्याने महानगरपालिका निधीचा अनाठायी खर्च होत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.43 दिनांक 23/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 10, Hmm No : 43)

28 प्रशासकीय इमारतीचे विद्युत देयकांबाबत

योजना : **लेखाशीर्ष :** 0 **वसुलपात्र :** 0.00/-

निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये विद्युत विभागामार्फत प्रशासकीय इमारतीचे महानगरपालिका निधीमधून भरणा केलेल्या विद्युत देयकांची तपासणी करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे त्रृट्या निदर्शनास येतात.

01) लाईट मिटर साठी एमएसईबी कडे अनामत रक्कम भरणा करण्यात आलेले आहेत. सदर रकमांचा तपशिल स्वतंत्र नोंदवहीमध्ये ठेवणे आवश्यक आहे, तथापी अशा प्रकारची नोंदवही ठेवण्यात आली नाही व त्यामुळे महानगरपालिकेच्या इतर विभागांकडे जमा असलेल्या व येणे असलेल्या अनामत रकमांबाबत महानगरपालिकेकडे कोणतेही अभिलेखे ठेवण्यात आलेले नसल्याने अशा रकमांचा द्विनोंद वार्षिक लेख्यांमध्ये समावेश दिसून येत नाही.

02) विद्युत देयक नोंदवही नमुना नं.120 मध्ये ठेवण्यात आलेली आहे. सदर नोंदवहीमध्ये दरमहा नोंदी घेणे आवश्यक असतांना नोंदी अपूर्ण असल्याचे आढळून आले. त्यामुळे दरमहा देयके केंव्हा प्राप्त झाली, विहित मुदतीमध्ये भरणा करण्यात आली किंवा नाही, भरणा करण्यात आल्यानंतर त्याबाबतचा प्रमाणक क्रमांक याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

03) माहे जुलै 2016 चे विद्युत देयक संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही तसेच त्याबाबतच्या नोंदी नोंदवही मध्ये अपूर्ण आहेत. त्यानंतर माहे ऑगष्ट 2016 चे देयकाच्या नोंदी घेतांना मागिल थकबाकी रु.240476 + 233614 असे एकूण रु.474090/- चे देयक प्राप्त झाले असून त्याचे पूर्ण प्रदान करण्यात आले, त्याबाबतची पावती क्र.011734 दिनांक 30/9/2016 प्राप्त झालेली आहे. तसेच माहे जुलै 2016 चे विद्युत देयकाची पावती क्र.012519 दिनांक 1/9/2016 रक्कम रु.235760/- अशी जोडण्यात आलेली आहे. म्हणजेच माहे ऑगष्ट 2016 चे देयक भरतांना माहे जुलै 2016 चे दुबार प्रदान झालेले आहे. त्यानंतर माहे सप्टेंबर 2016 चे देयक रु.230033/- प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये विज वितरण कंपनीकडून मागिल देयक समायोजित करुन दुरुस्त करण्यात आली व उर्वरित रक्कम रु.8180/- चा भरणा करण्यात आलेला आहे. सदर तपशिलानुसार नियमित देयकांची रक्कम अनुक्रमे 235760+233614+23033 = 699370 इतका भरणा होणे आवश्यक असतांना प्रत्यक्ष भरणा नुसार रु.235760+474090+8180 = 718030 इतका भरणा करण्यात आलेला आहे. त्यामुळे रु.18660 चे जादा प्रदान झालेले आहे. याबाबत संबंधित विद्युत अभियंता यांनी त्या-त्या वेळी विद्युत देयकांची तपासणी केलेली नसल्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे.

04) महाराष्ट्र विज शुल्क अधिनियम 2016 मधील कलम 3(2) नुसार शासकीय कार्यालयांना विज शुल्क माफ करण्यात आलेले आहे. तथापी प्रशासकीय इमारतीचे विज देयकांची तपासणी करण्यात आली असता सदर देयकांमध्ये विज शुल्क दर्शविण्यात आलेले असून त्या रकमांचा भरणा करण्यात आलेला आहे व त्यामुळे महानगरपालिकेने एकूण रु.1004221/- इतक्या रकमेचे जादा प्रदान केलेले आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

विज देयकांचा महिना	विज देयकाची एकूण रक्कम	विज शुल्क रक्कम

एप्रिल 2016	303280	51410
मे 2016	282930	55655
जून 2016	314790	52339
जुलै 2016	Not Available	0
ऑगष्ट 2016	474090	40356
सप्टेंबर 2016	230033	41263
ऑक्टोबर 2016	242850	41915
नोव्हेंबर 2016	225630	38156
डिसेंबर 2016	229390	38687
जानेवारी 2017	215370	37225
फेब्रुवारी 2017	Not Available	0
मार्च 2017	282620	48352
एप्रिल 2017	282319	49104
मे 2017	315510	62634
जून 2017	341710	58357
जुलै 2017	272090	46990
ऑगष्ट 2017	259330	48813
सप्टेंबर 2017	282240	48757
ऑक्टोबर 2017	211620	40957
नोव्हेंबर 2017	249110	42589

डिसेंबर 2017	223420	38685
जानेवारी 2018	225470	38975
फेब्रुवारी 2018	209040	36140
मार्च 2018	269480	46862
एकूण विज शुल्क रक्कम		**1004221**

वरील देयकांमध्ये माहे जुलै 2016 व फेब्रुवारी 2017 ची देयके विद्युत विभागाकडे तसेच लेखा विभागातील प्रमाणकांच्या संचिकांमध्ये लेखापरीक्षणास आढळून आली नाही त्यामुळे त्यांच्या रकमा नमुद करता येत नाही.

त्याचप्रमाणे महानगरपालिका मालकीच्या इतर इमारतींच्या देयकांमध्येही अशा प्रकारे विज शुल्क रकमेचा समावेश असल्यास त्यामुळेही जादा प्रदान झालेले असण्याची शक्यता आहे. तरी ज्या देयकांमध्ये विज शुल्क आकारण्यात येत आहे अशा देयकांमधून विज शुल्काची रक्कम महावितरण कंपनीकडून तात्काळ कमी करुन घेण्यात यावे. अन्यथा यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत राहील.

05) प्रशासकीय इमारतीच्या विज देयकांची तपासणी करण्यात आली असता देयकांमध्ये मुदतपूर्व भरणा करण्यात आल्यास सुट दर्शविण्यात आलेली आहे. तथापी अशा प्रकारे मुदतपूर्व भरणा करण्यात आलेला नसल्यामुळे सुटीचा लाभ महानगरपालिकेस मिळालेला नाही व त्यामुळे रक्कम रु.54370/- इतक्या रकमांचा जादा भरणा झालेला आहे व पर्यायाने महानगरपालिकेची बचत होऊ शकलेली नाही. तसेच खालील देयकांमध्ये काही देयके उपलब्ध झाली नाही, त्यामुळे त्यांच्या रकमांचा समावेश करता येत नाही.

विज देयकांचा महिना	मुदतपूर्व भरणा करण्याचा दिनांक	भरणा केल्याचा प्रत्यक्ष दिनांक	विज देयकाची एकूण रक्कम	दर्शविण्यात आलेली सुट रक्कम
एप्रिल 2016	13/5/2016	19/5/2016	303280	2450
मे 2016	13/6/2016	28/6/2016	282930	6650
जून 2016	14/7/2016	26/7/2016	314790	2500
जुलै 2016	--	-	Not Available	0
ऑगष्ट 2016	14/9/2016	30/9/2016	474090	1920

सप्टेंबर 2016	13/10/2016	21/10/2016	230033	1970
ऑक्टोबर 2016	15/11/2016	24/11/2016	242850	1990
नोव्हेंबर 2016	15/12/2016	22/12/2016	225630	1820
डिसेंबर 2016	17/1/2017	30/1/2017	229390	4640
जानेवारी 2017	9/2/2017	14/2/2017	215370	1770
फेब्रुवारी 2017	-	-	Not Available	0
मार्च 2017	10/4/2017	2/5/2017	282620	2300
एप्रिल 2017	8/5/2017	16/5/2017	282319	2330
मे 2017	12/6/2017	23/6/2017	315510	2980
जून 2017	10/7/2017	13/7/2017	341710	2780
जुलै 2017	8/8/2017	11/8/2017	272090	2230
ऑगष्ट 2017	7/9/2017	15/9/2017	259330	2140
सप्टेंबर 2017	10/10/2017	6/10/2017	282240	2320
ऑक्टोबर 2017	9/11/2017	13/11/2017	211620	1930
नोव्हेंबर 2017	7/12/2017	11/12/2017	249110	2030
डिसेंबर 2017	9/1/2018	15/1/2018	223420	1810
जानेवारी 2018	7/2/2018	15/2/2018	225470	1850
फेब्रुवारी 2018	12/3/2018	13/3/2018	209040	1720
मार्च 2018	9/4/2018	17/4/2018	269480	2240
एकूण				**54370**

06) प्रशासकीय इमारत ही 17 मजली असून त्यासाठी एकूण 7 लिफ्टची व्यवस्था करण्यात आलेली आहे. ज्या विभागांमध्ये किंवा अधिकाऱ्यांकडे नागरिकांची सतत वर्दळ असते असे विभाग तसेच अधिकाऱ्यांच्या दालनांची व्यवस्था ह्या खालच्या मजल्यांवर असणे आवश्यक आहे. साधारणपणे मालमत्ता कर विभाग, किरकोळ वसुली विभाग, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, एनयुएलएम विभाग, महिला व बालकल्याण विभाग, नगर रचना विभाग, मा.आयुक्त कार्यालय, मा.महापौर कार्यालय इ. ठिकाणी नागरीकांची सतत वर्दळ असते, असे विभाग हे वरच्या मजल्यांवर असल्यामुळे नागरिकांद्वारे सतत लिफ्टचा वापर होत असतो व परिणामी विद्युत देयकांमध्येही वाढ होत होत असते व परिणामी महानगरपालिकेवर विद्युत देयकांचा अतिरिक्त भार वाढ होत असतो.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.16 दिनांक 09/06/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 11, Hmm No : 16)

29 पथदिवे विद्युत देयकांबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये विद्युत विभागामार्फत महानगरपालिका निधीमधून अदा केलेल्या महानगरपालिका अंतर्गत पथदिवे देयकांची तपासणी कराण्यात आली असून उदाहरणादाखल काही देयकांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	पथदिवे स्थळ	ग्राहक क्रमांक	देयकाचा महिना	चालू मीटर युनिट	देयक रक्कम	अदा केलेली रक्कम	व्याज/ दंडनीय व्याज
1	कांचन नगर	900010023468	जानेवारी 2017	Faulty	8263	8420	5.38
2	ममुराबाद नाका	900010023034	जानेवारी 2017	Faulty	11851	12070	5.96
3	स्टेडीयम हायमास्ट	900010023522	जानेवारी 2017	RNA	2642	2690	1.33
4	साईबाबा मंदीर हायमास्ट	900010023531	जानेवारी 2017	RNA	13887	14150	7.00

5	लेवा बोर्डींग	900010023158	जानेवारी 2017	INACCS	12819	13060	6.45
6	एफसीआय गोडाऊन	900010023140	जानेवारी 2017	RNA	57124	58190	202.38
7	रिंगरोड दर्ग्याजवळ	900010023123	जानेवारी 2017	INACCS	48424	49330	24.41
8	मित्रनगर रिंगरोड	900010023131	जानेवारी 2017	500	48048	48940	0.92
9	भोईटेनगर	900010023328	जानेवारी 2017	RNA	73	70	5.51
10	भिकमचंद जैन नगर	900020023182	जानेवारी 2017	RNA	16795	17100	8.45
11	प्रेम नगर	900010023174	जानेवारी 2017	INACCS	1111	1130	9.10
12	म्हाडा कॉलनी	900010023336	जानेवारी 2017	RNA	824	830	7.36
13	मुक्ताईनगर	900010023204	जानेवारी 2017	RNA	1530	1560	0.04
14	गुजराल पेट्रोल पंप	900010023212	जानेवारी 2017	Faulty	9968	10120	2.16
15	दादावाडी मंदीराजवळ	900010023417	जानेवारी 2017	RNA	7881	8030	3.97
16	खोटेनगर	900010023239	जानेवारी 2017	RNA	81326	82850	133.32
17	अनुपम सोसायटी	900010023247	जानेवारी 2017	Faulty	7227	7380	458.16
18	इंद्रनिल सोसायटी	900010023344	जानेवारी 2017	RNA	14175	14440	7.15
19	वाटीकाश्रम	110018838044	जानेवारी 2017	INACCS	154	160	0.00
20	उत्तमनगर (दिपक फुड)	900010023395	जानेवारी 2017	RNA	5835	5940	293.00
21	निमखेडी गावठाण	900010023301	जानेवारी 2017	RNA	895	910	0.45

22	हायवे (खोटरनगर)	900010023441	जानेवारी 2017	RNA	16183	16460	723.01
23	हायवे (दिपक फुड)	900010023450	जानेवारी 2017	Faulty	41769	42550	21.05
24	जोशी पेठ (सुर्या सॉ मिल)	900010022950	जानेवारी 2017	5987	221140	221140	13321.92
25	दत्त मंदीर जोशी पेठ	900010022968	जानेवारी 2017	RNA	251660	251660	22474.00
26	चौधरी वाडा/गोपाळपुरा	900010022976	जानेवारी 2017	RNA	47140	47140	1654.00
27	सरस्वती नगर	900010022992	जानेवारी 2017	RNA	33408	33410	3774.00
28	सदाशिवनगर	900010023000	जानेवारी 2017	RNA	229	240	11.00
29	संत गोधडीवाला मार्केट	900010023069	जानेवारी 2017	Faulty	12746	12960	214.00
30	शंकरराव नगर	900010105103	जानेवारी 2017	RNA	8126	8160	134.00
31	गणेश कॉलनी चौक	900010023166	जानेवारी 2017	9030	55057	55780	723.00
32	श्रीधर नगर/ रुक्मीणी नगर	900010883717	जानेवारी 2017	Locked	22488	22910	422.00
33	दांडेकर नगर	900010023255	जानेवारी 2017	RNA	39387	41170	1783.00
34	पिंप्राळा गावठाण	900010023263	जानेवारी 2017	RNA	14186	14450	265.00
35	खंडेराव नगर	900010023271	जानेवारी 2017	RNA	596	610	14.00
36	हरिविठ्ठल नगर	900010023280	जानेवारी 2017	RNA	13664	13750	86.00
37	बँक कॉलनी पिंप्राळा	900010023298	जानेवारी 2017	RNA	19272	19630	358.00

38	भवानी मंदीर पिंप्राळा	900010023252	जानेवारी 2017	Faulty	4423	4500	77.00
39	आशाबाबा नगर पिंप्राळा	900010023361	जानेवारी 2017	INACCS	235	260	25.00
40	मानराज पार्क	900010023379	जानेवारी 2017	RNA	10600	10730	130.00
41	मयुर नगर पिंप्राळा	900010023484	जानेवारी 2017	RNA	7155	7280	120.00
42	संत मिराबाई नगर	110010048010	जानेवारी 2017	Locked	3938	4030	92.00
43	रेल्वे ब्रीज शिवाजी नगर	900010023077	जानेवारी 2017	RNA	46752	47340	23.56
44	प्रतापत नगर जुना जकात नाका	900010023093	जानेवारी 2017	Faulty	10768	10970	60.19
45	खडके चाळ	900010023085	जानेवारी 2017	Meter Change	35592	36260	17.95
46	नेहरु पुतळयासमोर नवी पेठ	900010023107	जानेवारी 2017	RNA	36672	36950	18.46
47	शारदा बुक डेपो टॉवर चौक	900010899001	जानेवारी 2017	-	5367	5379	0.00
48	आर.वाय.पार्क	110013107467	जानेवारी 2017	Locked	12945	13190	989.00
49	राजा ट्रॅक्टरजवळ शिवाईनगर	110013133778	जानेवारी 2017	Locked	13139	13380	6.62
50	त्रिभुवन कॉलनी	900010023476	जानेवारी 2017	INACCS	6150	6260	3.16
			एकूण		1341639	1355919	48723.42

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) लाईट मिटर साठी विज वितरण कंपनीकडे अनामत रक्कम भरणा करण्यात आलेले आहेत. सदर रकमांचा तपशिल

स्वतंत्र नोंदवहीमध्ये ठेवणे आवश्यक आहे, तथापी अशा प्रकारची नोंदवही ठेवण्यात आली नाही व त्यामुळे महानगरपालिकेच्या इतर विभागांकडे जमा असलेल्या व येणे असलेल्या अनामत रकमांबाबत महानगरपालिकेकडे कोणतेही अभिलेखे ठेवण्यात आलेले नसल्याने अशा रकमांचा द्विनोंद वार्षिक लेख्यांमध्ये समावेश दिसून येत नाही.

2) देयके प्राप्त झाल्यानंतर मिटरनिहाय नोंदी ह्या नमुना नं.120 मध्ये ठेवण्यात आलेल्या आहेत. तथापी अशा नोंदी ह्या अपूर्ण म्हणजे दरमहा देयकाच्या नोंदी, चालू रिडींग, मागिल रिडींग, वापरलेले युनिट, बिलाचा तपशिल, प्रत्यक्ष खप झालेले युनिट संख्या घेण्यात येत नाहीत तसेच प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या, प्रदानानंतर प्रमाणक क्रमांक अशा परिपूर्ण नोंदी घेण्यात येत नाहीत, त्यामुळे त्या-त्या महिन्यांतील देयकांचा भरणा करण्यात आलेला असल्याबाबत लेखापरीक्षणात खात्री करत आली नाही.

3) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम क्र. 64 नुसार नोंदवहीच्या प्रत्येक पृष्ठावर पृष्ठ क्रमांक नोंद करुन एकूण पृष्ठांची संख्या नमुद करुन लेखा प्रमुखाने/विभाग प्रमुखाने प्रमाणित करणे आवश्यक आहे, तथापी वरीलप्रमाणे नमुना नं.120 मध्ये ठेवण्यात आलेल्या नोंदवह्या प्रमाणित करण्यात आलेल्या नाहीत.

4) वरील प्रमाणे देयके ही प्रलंबित रकमेसह असून देयकांचा विहित मुदतीतमध्ये भरणा करण्यात आलेली नसल्याने विलंब आकारासह देयके अदा करण्यात आलेली आहेत. वरीलप्रमाणे देयकाची मुळ रक्कम रु.1341619 असून भरणा केलेली रक्कम रु.1355919 अशी आहे, त्यामुळे रु.14300/- इतका जादा भरणा करण्यात आलेला आहे. अशाच प्रकारे इतर देयकांमध्येही व इतर महिन्यांचे देयकांमध्येही विलंब आकार भरणा करण्यात आलेला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकारे विलंब आकारच्या रकमा भरणा करण्यात आलेला असल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

5) विज वितरण कंपनीकडून देयके प्राप्त झाल्यानंतर मुदतीपूर्वी देयकांची अदायगी केल्यास विज वितरण कंपनीकडून सुट देण्यात येत असते व अशी सुटसह देय होणारी रक्कम देयकांमध्ये दर्शविण्यात येते, तथापी विलंबाने देयकांचा भरणा करण्यात आलेला असल्यामुळे अशा प्रकारे सुटचा लाभ महानगरपालिकेस मिळालेला दिसून येत नाही.

6) वरील विवरणपत्रामधील अ.क्र.8 मित्रनगर रिंगरोड येथील ग्राहक क्रमांक 900010023131 चे वरील विवरणपत्रामधील देयक तपासणी केली असता 500 युनिटचे देयक गणना करण्यात आलेली आहे, 500 युनिटकरिता विज आकार हा रु.45687.55 इतका दर्शविण्यात आलेला आहे, सदर विज आकार हा अवाजवी वाटतो, देयक भरणा करण्यापूर्वी संबंधित विद्युत अभियंता यांनी देयकाची तपासणी न करता देयकाचा जादा भरणा करण्यात आलेला असल्याने महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे.

7) वरील विवरणपत्रामधील अ.क्र.31 गणेश कॉलनी चौक ग्राहक क्रमांक 900010023166 चे देयकामध्ये मागिल देयकांच्या तपशिलामध्ये फेब्रुवारी 2016 ते जुन 2016 चे सरासरी युनिट 2425 प्रमाणे तर जुलै 2016 चे 14043 व त्यानंतर ऑगष्ट 2016 ते डिसेंबर 2016 चे सरासरी युनिट 143 प्रमाणे दर्शविण्यात आलेले आहे. माहे नोव्हेंबर 2016 चे

देयकाचा भरणा 1/2/2017 रोजी करण्यात आलेला आहे व त्यानंतर वरीलप्रमाणे जानेवारी 2017 चे देयकामध्ये मागिल युनिट 1000, चालू युनिट 10030 असे दर्शविण्यात येऊन निव्वळ युनिट 9030 चे देयक परिगणीत करण्यात आलेले आहे. मागिल सर्व देयकांनुसार मागिल युनिट 1000 दर्शविलेले असल्याने यापूर्वी भरणा करण्यात आलेले सर्व युनिटचे दुबार प्रदान होत असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे, याबाबत संबंधित विद्युत अभियंता यांनी देयकांची तपासणी न करता देयकाचा भरणा करण्यात आलेला असल्याने जादा भरणा करण्यात आलेला असल्याने महानगरपालिकेचे नुकसान झालेले असल्याचे निदर्शनास येते.

8) वरीलप्रमाणे देयकांची तपासणी करण्यात आली असता बऱ्याच देयकांमध्ये मागिल व चालू रिडींग दर्शविण्यात येत नसून त्याऐवजी RNA, Locked, INACCS, Faulty असे नोंदविण्यात येऊन देयक प्राप्त होत आहेत. त्यामुळे सदरची विद्युत मिटर ह्यांचे रिडींग घेण्यात येत नाही किंवा मिटर बंद स्थितीत असल्याचे निदर्शनास येते. विद्युत मिटर बंद असल्यास विज वितरण कंपनीकडून ती दुरुस्त करुन घेणे आवश्यक आहे जेणेकरुन योग्य अशी विद्युत देयके महानगरपालिकेस प्राप्त होतील व परिणामी महानगरपालिकेचे नुकसान किंवा भविष्यात होऊ संभाव्य नुकसान टाळता येऊ शकेल.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.20 दिनांक 04/07/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 12, Hmm No : 20)

30 महानगरपालिका इमारतींच्या विद्युत देयकांबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये विद्युत विभागामार्फत महानगरपालिका निधीमधून अदा केलेल्या महानगर पालिका अंतर्गत इमारतींच्या देयकांची तपासणी करण्यात आली असून उदाहरणादाखल काही देयकांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	इमारत तपशिल	ग्राहक क्रमांक	देयकाचा महिना	चालू मीटर युनिट	देयक रक्कम	अदा केलेली रक्कम	व्याज/ दंडनीय व्याज
1	आयुक्त निवासस्थान	110018378949	जानेवारी 2017	366	12870	12870	24.00
2	उपायुक्त निवासस्थान	110012095074	जानेवारी 2017	162	2450	2450	283.00

	(रिंगरोड)						
3	उपायुक्त निवासस्थान (भोईटे शाळा)	110013165726	जानेवारी 2017	NA	0	0	0.00
4	शाळा नं.45 (विवेकानंद नगर) निवासस्थान	110013164665	जानेवारी 2017	RNA	310	310	147.00
5	चौबे शाळा	110011136397	जानेवारी 2017	88	19850	19850	1764.00
6	दायमा शाळा	110011074834	जानेवारी 2017	100	63640	63640	14642.00
7	शाळा नं.28 (गंगुबाई यादव)	110011117589	जानेवारी 2017	93	10580	10580	1055.00
8	शाळा नं.22, 26 (रामपेठ)	110010120730	जानेवारी 2017	299	32660	32660	4546.00
9	शाळा नं.24 खेडी बु.	110015161582	जानेवारी 2017	36	2240	2240	199.00
10	शाळा नं.18 (फातीमाबी उर्दु शाळा)	110011173276	जानेवारी 2017	3	610	610	15.00
11	शाळा नं.3 (पांजरापोळ)	110019005186	जानेवारी 2017	180	3790	3790	242.00
			एकूण		149000	149000	22917

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) लाईट मिटर साठी एमएसईबी कडे अनामत रक्कम भरणा करण्यात आलेले आहेत. सदर रकमांचा तपशिल स्वतंत्र नोंदवहीमध्ये ठेवणे आवश्यक आहे, तथापी अशा प्रकारची नोंदवही ठेवण्यात आली नाही व त्यामुळे महानगरपालिकेच्या इतर विभागांकडे जमा असलेल्या व येणे असलेल्या अनामत रकमांबाबत महानगरपालिकेकडे कोणतेही अभिलेखे ठेवण्यात आलेले नसल्याने अशा रकमांचा द्विनोंद वार्षिक लेख्यांमध्ये समावेश दिसून येत नाही.

02) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम क्र. 64 नुसार नोंदवहीच्या प्रत्येक पृष्ठावर पृष्ठ क्रमांक नोंद करुन एकूण पृष्ठांची संख्या नमुद करुन लेखा प्रमुखाने/विभाग प्रमुखाने प्रमाणित करणे आवश्यक आहे, तथापी वरीलप्रमाणे नमुना नं.120 मध्ये ठेवण्यात आलेल्या नोंदवह्या प्रमाणित करण्यात आलेल्या नाहीत.

03) देयके प्राप्त झाल्यानंतर मिटरनिहाय नोंदी ह्या नमुना नं.120 मध्ये ठेवण्यात आलेल्या आहेत. तथापी अशा नोंदी ह्या अपूर्ण म्हणजे दरमहा देयकाच्या नोंदी, चालू रिडींग, मागिल रिडींग, वापरलेले युनिट, बिलाचा तपशिल, प्रत्यक्ष खप झालेले युनिट संख्या घेण्यात येत नाहीत तसेच प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या, प्रदानानंतर प्रमाणक क्रमांक अशा परिपूर्ण नोंदी घेण्यात येत नाहीत, त्यामुळे त्या-त्या महिन्यांतील देयकांचा भरणा करण्यात आलेला असल्याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही. उपायुक्त निवासस्थान (भोईटे शाळा आवार) येथील देयकांचा तपशिल नोंदवहीमध्ये पूर्णत: घेण्यात आलेल्या दिसून येत नाही त्यामुळे देयकांची तपासणी करता आली नाही.

04) विज वितरण कंपनीकडून देयके प्राप्त झाल्यानंतर मुदतीपूर्वी देयकांची अदायगी केल्यास विज वितरण कंपनीकडून सुट देण्यात येत असते व अशी सुटसह देय होणारी रक्कम देयकांमध्ये दर्शविण्यात येते, तथापी विलंबाने देयकांचा भरणा करण्यात आलेला असल्यामुळे अशा प्रकारे सुटचा लाभ महानगरपालिकेस मिळालेला दिसून येत नाही.

05) वरील देयकांची तपासणी करण्यात आली असता सर्व देयकांमध्ये मागील व चालू रिडींग सारखेच दर्शविण्यात आलेली असल्याने सरासरी युनिटनुसार देयकांची परिगणना करण्यात आलेली असल्याने दिसून येते, विद्युत मिटर बंद असल्यास विज वितरण कंपनीकडून ती दुरुस्त करुन घेणे आवश्यक आहे जेणेकरुन योग्य अशी विद्युत देयके महानगरपालिकेस प्राप्त होतील व परिणामी महानगरपालिकेचे नुकसान किंवा भविष्यात होऊ संभाव्य नुकसान टाळता येऊ शकेल.

06) अर्धसमास पत्र क्र.15 दिनांक 8/6/2023 नुसार आस्थापना विभागाकडून मा.आयुक्त, उपायुक्त यांचा कार्यकाळ, निवासस्थान वापर याबाबत माहिती मागणी करण्यात आला असता त्यानुसार फक्त मा.आयुक्त व उपायुक्त यांचा कार्यकाळ प्राप्त झालेला आहे, तथापी निवासस्थान वापराबाबत माहिती उपलब्ध झाली नाही. निवासस्थान जे अधिकारी वापरत असतील त्यांनीच विद्युत देयकांचा भरणा करणे आवश्यक आहे, तथापी वरील तपशिलामध्ये मा.आयुक्त व उपायुक्त यांचे निवासस्थानांचे विद्युत देयकांचा भरणा महानगरपालिका निधीमधून भरणा करण्यात आलेला दिसून येतो. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. अशा रकमा त्या-त्या कालावधीमध्ये निवासस्थान वापरत असलेले अधिकारी यांचेकडून वसुल करण्यात येऊन महानगरपालिका निधीमध्ये जमा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.21 दिनांक 04/07/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

31 म.न.पा. हद्दीतील संपूर्ण मिळकतींना जीआयएस आधारित नंबरींग करणे(जमिन व इमारती), सर्वेक्षण करणे, संपूर्ण मालमत्तांचे संगणीकृत करमुल्य निर्धारण व कर आकारणी करणेच्या कंत्राटाबाबत

योजना : 13वा वित्त आयोग **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या वर्षांचे लेखापरीक्षण प्रगतीत असून उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संचिका तपासणी करण्यात आली. कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	म.न.पा. हद्दीतील संपूर्ण मिळकतींना जीआयएस आधारित नंबरींग करणे (जमिन व इमारती), सर्वेक्षण करणे, संपूर्ण मालमत्तांचे संगणीकृत करमुल्य निर्धारण व कर आकारणी करणेच्या कंत्राटाबाबत
प्रशासकीय मान्यता	महानगरपालिका महासभा क्र.41 विषय क्र.03 ठराव क्र.541 दिनांक 03/12/2016, रु.10.00 कोटी
कंत्राटदार	स्थापत्य कंसल्टंट (इं) प्रा.लि. अमरावती
योजना	13वा वित्त आयोग
कामाचे आदेश	मनपा आदेश क्र.2253, दिनांक 04/01/2017
कामाची मुदत	15 महिने (म्हणजे दिनांक 03/04/2018 पर्यंत)
देयकांचा तपशिल	

अ.क्र.	तपशिल	प्रथम धावते देयक	द्वितीय धावते देयक	तृतीय धावते देयक
1	प्रमाणक क्रमांक	1	2	3
2	दिनांक	2/6/2017	5/10/2017	9/2/2018
3	स्थूल रक्कम	6677012	9404289	13246313
4	+ 18% जीएसटी	0	0	2384336
	+ 15% सेवा कर	0	2299695	0

5	एकूण	6677012	11703984	15630649
	वजाती -			
6	3% सुरक्षा रक्कम	-200310	-282129	-397389
7	1% विमा	-59270	-94043	0
8	2% आयकर	-133540	-188086	-264926
9	3% व्हॅट	-200310	-282129	-397389
10	निव्वळ देय रक्कम	6083582	10857597	14570945

शहरातील मिळकतींचे फेरमुल्यांकन 2002 पासून झालेले नसल्याने फेरमुल्यांकनाचे काम खाजगी संस्थेमार्फत करुन घेण्यासाठी प्रस्तावास उपरोक्तप्रमाणे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. सदरचा खर्च हा 13व्या वित्त आयोगांतर्गत शिल्लक निधीमधून करणेस मान्यता देण्यात आली. 13व्या वित्त आयोगामधून सन 2010-2011 पासून रु.52,68,20,422/- इतका निधी प्राप्त झाला, त्यामधून खर्च रु.48,27,44,041/- इतका करण्यात आला, उर्वरित निधी रु.4,40,76,381/- अधिक व्याज रु.1,76,86,904/- शिल्लक होती. सदर शिल्लक रकमेतून 13व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शिल्लक निधीमधून वरील काम करणेकामी वरील ठरावान्वये मान्यता देण्यात आली. 13व्या वित्त आयोगाच्या शिल्लक व्याजाची रक्कम या कामी खर्च करणेस शासनाकडून मान्यता घेणेची कार्यवाही करणे व उर्वरित आवश्यक रक्कम 14व्या वित्त आयोगामधून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. सदर खर्चास रु.8.50 कोटी खर्च अपेक्षित होते. सदर कामी वरील ठरावामध्ये उपरोक्त काम करणेकरिता रु.10 कोटी मात्रची तरतुद सन 2016-2017 चे अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे असे नमुद करण्यात आलेले आहे.

वरील बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्र.तेविका 2010/प्र.क्र.131/2010/नवि-4, दिनांक 25/10/2010 अन्वये तेराव्या वित्त आयोग निधी विनियोगाची कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे. तेराव्या वित्त आयोगाची मुदत ही दिनांक 2010-2011 ते 2014-2015 अशा पांच वर्षांकरिता निश्चित करण्यात आलेली होती, म्हणजेच सदर आयोगाची मुदत ही 31/03/2015 रोजी संपलेली होती. मुदत संपल्यानंतर सदर आयोगाच्या खात्यामध्ये शिल्लक असलेला व्याजासह निधी शासनाकडे योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक होते. तथापी दोन वर्षांनंतर म्हणजे 2016-2017 मध्ये सदर योजनेमध्ये शिल्लक असलेल्या निधीमधून काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे, सदर बाब लेखापरीक्षणाचे दृष्टीने नियामोचित नाही.

02) सदर काम करणेकरिता मुळ निविदेनंतर तीन वेळा मुदतवाढ व एक वेळा शुद्धीपत्रक देण्यात आल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 मधील नियम क्र.466(4) खालील परिशिष्ट-3 मधील खंड-19 नुसार रु.50 लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या निविदांना एक राष्ट्रीय स्तरावरील, एक राज्य स्तरावरील व दैनंदिन 20000 प्रतींची विक्री असणारे जिल्हास्तरीय प्रकाशन अशा एकूण तीन वृत्तपत्रांमध्ये निविदा जाहिरात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तथापी वरील प्रमाणे निविदा जाहिरात ही प्रत्येक वेळेस फक्त एकाच वृत्तपत्रामध्ये देण्यात आलेली असल्याने निविदेस व्यापक प्रसिद्धी देण्यात आलेल्या नाहीत, त्यामुळेच निविदेस योग्य तो प्रतिसाद मिळालेला दिसून येत नाही तसेच अंतिम निविदामध्ये स्पर्धात्मक दरांचा लाभही महानगरपालिकेस झालेला नाही, तसेच त्यामुळे जादा दर स्विकृत करण्यात आले असण्याची शक्यता नाकारता येत नाही व परिणामी शासन निधीचे नुकसान झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

03) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 मधील नियम क्र.466(4) खालील परिशिष्ट-3 मधील खंड-24 नुसार कंत्राटदार निविदा स्विकारल्यानंतर नेमून दिलेल्या कालावधीत आवश्यक सुरक्षा पुरविण्यास कसूर करीत असेल त्याबाबत निविदेसोबत जमा करावयाची इसाऱ्याची रक्कम ही, हानी झाल्यास तिचे संरक्षण करता यावी यासाठी पुरेशी मोठी असावी अशा सूचना आहेत. सदर कामाची अंदाजित किंमत रु.8.50 कोटीनुसार निविदेची इसारा रक्कम 1% प्रमाणे रु.8.50 लक्ष ठेवणे आवश्यक असतांना रु.1.50 लक्ष ठेवण्यात आलेली होती.

04) महासभा दिनांक 03/12/2016 मधील मंजूर ठराव क्र.541 नुसार सदर कामासाठी लागणाऱ्या खर्चापैकी 13व्या वित्त आयोगामधून करण्यात येणाऱ्या खर्चाची रक्कम वगळून उर्वरित रक्कम 14व्या वित्त आयोग निधीमधून खर्च करण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.टिएफसी 8015/प्र.क्र.106/नवि-4, दिनांक 03/08/2015 मधील खंड (II)(i) नुसार 14व्या वित्त आयोगाच्या मुलभूत अनुदानामधून करावयाचे कामांचा तपशिल नमुद करण्यात आलेला आहे, त्यानुसार सदर कामावरील खर्च हा अनुज्ञेय ठरत नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे ठरावानुसार व प्रशासकीय मान्यतेनुसार देण्यात आलेली मान्यता ही नियमबाह्य ठरते, तसेच पुढील कालावधीमध्ये 14व्या वित्त आयोग निधीमधून सदर कामाकरिता खर्च करण्यात आलेला असल्याचे तपासणीअंति दिसून येते, अशा प्रकारे खर्चसुद्धा नियमबाह्य ठरतो.

05) लेखापरीक्षण कालावधीमध्ये सदर कामाचे वरीलप्रमाणे तीन प्रमाणकांद्वारे प्रदान करण्यात आलेले आहेत. देयकाकरिता कंत्राटदार स्थापत्य कंसल्टंट अमरावती यांनी सादर केलेले इन्व्हाईसच्या प्रतींवर कुठेही दिनांक नमूद करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांनी इन्व्हाईस केंव्हा तयार केले याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी होत नाही.

06) करारनाम्यातील अट क्र.33 नुसार कंत्राटदाराकडील कर्मचाऱ्यांचे कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरणा करण्याची जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील. सदर कामाची सुरुवात ही माहे जानेवारी 2017 पासून झालेली आहे. त्यानुसार माहे जानेवारी 2017 पासून सर्व कालावधीतील कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरणा करुन त्यांच्या प्रती देयकासोबत सादर करणे आवश्यक होते, तथापी फक्त फेब्रुवारी 2017, डिसेंबर 2017 या दोनच महिन्यांच्या रकमा भरणा केल्याबाबतचे चलनाच्या प्रती जोडण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे कंत्राटदाराने प्रत्येक

महिन्यांचे कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या रकमा भरणा केल्या किंवा नाही याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही, तरी संबंधित कंत्राटदार यांनी रकमा भरणा केल्याबाबतच्या चलनाच्या प्रती लेखापरीक्षणात अर्धसमास पत्राद्वारे मागणी करुनही उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे संबंधित कंत्राटदार यांनी वरील महिन्यांव्यतिरिक्त इतर महिन्यांचे त्यांचे कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमा भरणा केल्या नसल्यास संबंधित कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होईल, तसेच महानगरपालिकेच्या संबंधित विभागाचे स्तरावरुन योग्य ती तपासणी न करता देयकांची अदायगी करण्यात येत नसल्याचीही बाब निदर्शनास येते.

07) तृतीय धावते देयकामध्ये देयक रकमेवर 18% जीएसटी आकारणी करण्यात येऊन कंत्राटदारास प्रदान करण्यात आलेले आहे. तथापी वस्तु व सेवा कर कायदा 2017 मधील कलम 51 नुसार 2% जीएसटी-टीडीएस कपात करण्यात आलेला दिसून येत नाही, त्याऐवजी वर्क कॉंट्रॅक्टर टॅक्स/व्हॅट कपात करण्यात आलेला आहे. सदर कपातीची रक्कम ही मुल्यावर्धीत कर (व्हॅट) खाती भरणा करण्यात आली किंवा जीएसटी खाती भरणा करण्यात आली याबाबत लेखापरीक्षणामध्ये योग्य ते अभिलेखे अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही दर्शविण्यात आले नाही.संबंधित कंत्राटदार यांनी जीएसटी कायद्यानुसार देयकामध्ये जीएसटीची रक्कम आकारणी केलेली आहे, त्यामुळे नियमानुसार जीएसटी-टीडीएस कपात करुन त्याबाबतचे चलन भरणा करणे व जीएसटीआर-7 सादर करणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षाखाली कपातीच्या रकमा भरणा करण्यात आलेल्या नाहीत. तसेच कंत्राटदारामार्फत जीएसटीची आकारणी करण्यात येत असल्यामुळे कामाचे अंदाजित रकमेमध्येही वाढ होऊन अतिरिक्त खर्चाचा बोजा वाढणार आहे. वस्तु व सेवा कर कायद्यानुसार जीएसटी करप्रणाली दिनांक 01/07/2017 पासून अंमलात आली. शासकीय कार्यकंत्राटामध्ये जीएसटी प्रणाली लागू करणेबात वित्त विभाग शासन निर्णय क्र.जीएसटी-1017/प्र.क्र.155/कराधान-1, दिनांक 11/09/2017 मधील अ.क्र.4 नुसार चालू कामांचे बाबतीत कराच्या भारामध्ये वृद्धी वा घट झाल्यामुळे कंत्राटाच्या किंमतीत वृद्धी वा घट होऊ शकते, त्यामुळे करावयाचा बदल कंत्राटामध्ये उल्लेख केलेल्या अटी व शर्तींवर अवलंबून असेल, कंत्राटाबाबत अटी व शर्ती वेगवेगळया असतील त्यामुळे प्रत्येक विभागाने कंत्राटाची प्रत विधी व न्याय विभागाकडून तपासून बदललेल्या कररचनेमुळे कंत्राटाच्या किंमतीतून कराचा भार कमी झाल्यामुळे वजावट करता येईल किंवा कराचा भार वाढल्यामुळे किंमत वाढवून देता येईल याबाबत अभिप्राय घ्यावेत अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. वरीलप्रमाणे कंत्राटदाराची देयके अदा करण्यापूर्वी सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

08) सदर कंत्राटानुसार महानगरपालिका हद्दीमधील संपूर्ण मालमत्तांचे सर्वेक्षण करुन त्यांना जीआयएस आधारित नंबरींग करणे, मालमत्तांचे संगणीकृत करमुल्य निर्धारण व कर आकारणी करण्याच्या कामाचे आदेश दिनांक 04/01/2017 रोजी देण्यात आले व कामाची मुदत 15 महिने म्हणजे 03/04/2018 अखेर होती. त्यानुसार जळगांव महानगरपालिका हद्दीमधील संपूर्ण मालमत्तांचे सर्वेक्षण करुन त्यांना जीआयएस आधारित नंबरींग करुन त्यांचे करमुल्य निर्धारण व कर आकारणी प्रत्यक्षात केंव्हा करण्यात आली, त्यानुसार करांच्या वसुलीची प्रक्रीया केंव्हापासून सुरु करण्यात आली याबाबत अर्धसमास पत्रान्वये विचारणा करण्यात येऊनही अनुपालन सादर करण्यात आले नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.50 दिनांक 11/09/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 14, Hmm No : 50)

32 खुल्या भुखंडावरील सामान्य मालमत्ता कर व इतर कराच्या वसुलीबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 339945397.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-18 चे लेखापरिक्षण केले असता खुला भुखंड विभागाचे लेखापरिक्षण करण्यात आले असून खुल्या जमिनीवरील/ भुखंडावरील सामान्य मालमत्ता कर व इतर अनुषंगिक कराच्या जमा रक्कमेची तपासणी केली असता माहे मार्च 2018 अखेर एकुण मागणी थकबाकीसह रुपये 33,99,45,397/- असल्याचे दिसून येते. सदर मागणी व वसुलीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क.	करांचे नाव	वित्तीय वर्ष्	एकूण मागणी रक्कम	एकूण वसुल रक्कम	वर्ष अखेर थकीत रक्कम	वसुलीचे प्रमाण
१	खुला भुखंड कर व इतर अनुषंगिक कर	2016-17	343971106	27649148	316321958	8.03 %
२	खुला भुखंड कर व इतर अनुषंगिक कर	2017-18	364362402	24417005	339945397	6.70 %

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) जळगाव शहर महानगरपालिकेची खुला भुखंड कर वसुली थकबाकी रक्कम रुपये 33,99,45,397/- इतकी असुन एकुण मागणीच्या तुलनेत वसुलीचे प्रमाण अगदी कमी प्रमाणात आहे. मालमत्ता कर हे महानगरपालिकेचे मुख्य उत्पन्नाचे साधन असून खुल्या भुखंडावरील कर वसुली मोठया प्रमाणात थकीत राहत आहे.वसुलीचे उदीष्ट साध्य करण्यासाठी महानगरपालिकेकडून विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे, अन्यथा महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊन विकास कामासाठी निधी उपलब्ध न झाल्याने नागरी व मुलभूत सोयी सुविधा मिळण्यापासून नागरीक वंचित राहिलेले आहेत.

02) महानगरपालिकेच्या खुला भुखंड विभाग, नगररचना, प्रभाग कार्यालये, मालमत्ता कर विभागात ताळमेळचा अभाव असल्याने खुल्या भुखंडावर बांधकाम करण्यास परवानगी दिल्याच्या प्रती, भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित

केल्याच्या प्रति खुला भुखंड विभागास प्राप्त होत नाहीत. तसेच नवीन बांधकामाच्या मालमत्ता कराची आकारणी सुरु होवूनही त्याबाबत खुला भुखंड विभागास अवगत करण्यात येत नसल्याने खुला भुखंड विभागातून सदरील मालमत्तेची आकारणी कमी करण्यात येत नाही, तसेच वसुली प्रलंबित दर्शविण्यात येत असून थकबाकीचा आकडा फुगलेला असल्याची शक्यता आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 49 दिनांक 01/09/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 23, Hmm No : 49)

33 मालमत्ता विभागकडील घरकुल निवासस्थाने सेवाशुल्क वसुली करणेबाबत झालेली अनियमितता बाबत.

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 135527049.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या कालावधीतील घरकुल विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले. तत्कालीन जळगांव शहर नगर पालिकेने जळगांव शहरातील झोपडपट्टी निर्मुलन करणेचे दुष्टीने झोपाडपट्टी भागात राहणा-या लोकांना पक्की घरे देणेसाठी पिंप्राळा गट क्र.219 मध्ये 1326 पक्की घरकुले बांधुन झोपडपट्टी धारकांना विनामुल्य पक्की घरे देण्यात आलेले असुन त्या बदल्यात घरकुल धारकांकडुन तात्कालीन जळगांव नगर पालिका ठराव क्र.97,दि.22/05/1999 अन्वये प्रतिदिन रु.5/- प्रमाणे सेवाशुल्क आकार लावण्यात आलेला आहे. तसेच माहे मार्च 2018 पावेतो रक्कम रु.13,55,27,049/- इतकी रक्कम वसुल होण बाकी असलेबाबत निर्दशनास येत आहे

सन 2016-2017 व 2017-2018 या दोन वर्षात नमुद घरकुल धारकांकडून खालीलप्रमाणे वसुली करण्यात आलेली आहे.

सन	मागील मागणी	चालू मागणी	एकूण मागणी	मागील वसुल	चालू वसुल	एकूण वसुल	थकबाकी	वसुलीचे प्रमाण
2016-17	120632158	8287325	128919483	668838	190081	858919	128060564	0.66%
2017-18	128060564	8287325	136347889	674190	146650	820840	135527049	0.60%

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) सन 2016-17 मधील घरकुल धारकांकडुन सेवाशुल्क वसुलीचे प्रमाण हे 0.66% व सन 2017-18 मधील घरकुल

धारकांकडून सेवाशुल्क वसुलीचे प्रमाणे हे 0.60% इतके अत्यल्प असुन दिवसेंदिवस नमुद घरकुल धारकांची सेवाशुल्काची थकबाकीही वाढत आहे. वरील प्रमाणे थकबाकीची रक्कम मोठया प्रमाणात असल्याने मनपा निधीचे नुकसान होत आहे परिणामी इतर विकासात्मक कामांवर परिणाम झाल्याचे लेखापिरक्षणाचे मत आहे. तरी सदर रक्कम वसुल करुन मनपा निधीमध्ये जमा करणेबाबत केलेला कार्यवाहीबाबत अर्धसमास पत्रान्वये विचारणा करण्यात आल्यानुसार सविस्तर खुलासा विभागामार्फत सादर करण्यात आलेला नाही.

02) नमुद घरकुल धारकांचे त्यांचे घरकुल नुसार करनिर्धारण करण्यात आलेले नाही. तरी सेवाशुल्क ऐवजी नमुद घरकुलासाठी घरपट्टी आकारण्यात आलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. याबाबत विभागाने अर्धसमास पत्रान्वये विचारणा करण्यात आल्यानुसार सविस्तर खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 62 दिनांक 20/10/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 24, Hmm No : 62)

34 मनपा गाळेचे नुतनीकरण करण्यात आलेले नसल्याने गाळे भाडे थकीत राहणे व इतर झालेले अनियमितते बाबत.

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	1687981970.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण आले. जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 या दोन आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करतांना किरकोळ वसुली विभागाकडील महानगर पालिकेच्या मालकीच्या व्यापारी संकुल, मार्केट इत्यादी ठिकाणी व्यावसायिक कारणाने भाडेपटटे कराराने देण्यात आलेली दुकाने / गाळे यांचे भाडे वसुली, मागणी नोंदवही इत्यादीची पडताळणी केली असता शहरात महानगर पालिकेचे एकूण 27 मार्केट असुन त्यात एकूण 4691 इतके दुकाने / गाळे आहेत. माहे मार्च 2018 अखेर मागणी नोदवहित नमुद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रुपये 1,68,79,81,970/- इतके भाडे संबंधीत गाळेधारकांकडून वसुल न झाल्याने थकीत राहिलेचे दिसुन आले आहे.

जळगांव शहर महानगरपालिका महासभा ठराव क्र.40 दि.19/12/2013 अन्वये गाळे धारकांची करारनामा मुदत संपलेले गाळे हे गाळा धारकांनी महानगपालिकेच्या ताब्यात न दिल्यास पुढील लिलाव प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी गाळा भाडे हे त्या वर्षाच्या रेडी रेकनर दरानुसार व नगर रचनाकार यांनी निश्चित केलल्या गाळा भाडेच्या 5 पट दराने मुळ गाळा धारकांकडुन वसुल करणे व लिलावाव्दारे गाळयांची भाडे करार करुन प्रति वर्षी

15% वाढ करणेबाबत ठराव करण्यात आलेला आहे.

जळगांव शहर महानगरपालिका महासभा ठराव क्र.135 दि.20/10/2014 अन्वये महानगरपालिकेच्या मालकीचे असलेले 4517 गाळया पैकी मुदत संपलेले 2175 गाळयाचे/दुकानाच्या नेट मुल्यावर 8% दुकानाचे भाडे विचारत घेवुन प्रिमियम रक्कम ही 10% दराने प्रति 5 वर्ष अशी वाढ विचारात घेवुन 30 वर्षाकरिता प्रचलित मुल्य लक्षात घेऊन येणा-या प्रिमियमची एक रक्कमी या प्रमाणे दरनिश्चिती करण्यात आलेली आहे.

मनपा महासभा ठराव क्र.135, दि.20/10/2014 यास उप सचिव नगर विकास महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.जमपा-2014/प्र.क्र.2014/नवि-25, दि.04/06/2015 अन्वये स्थगिती देण्यात आली.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील महात्मा फुले मार्केटमधील दि.31/03/2012 रोजी करार संपुष्टात आलेला असल्याने आयुक्त यांनी दि.08/10/2012 रोजी गाळा धारकांना गाळे रिक्त करुन मनपाचे ताब्यात देणेसाठी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे कलम 81ब प्रमाणे नोटीस देवुन दि.01/04/2012 ते 31/10/2012 या कालावधीचे नुकसान भरपाईची रक्कम मनपाकडे जमा करणेबाबत कळविले आहे. सदर नोटीसीस गाळा धारकांनी मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे दावा दाखल केला होता परंतु मा.जिल्हाधिकारी जळगांव यांनी दिनांक 26/11/2012 रोजी गाळा धारकांचा अर्ज फेटाळलेला आहे.

मा.जिल्हाधिकारी यांचे निर्णया विरुध्द गाळा धारकांनी मा.जिल्हा न्यायालयात अपील केले असुन सदर अपील दिनांक 30/12/2013 रोजी मा. जिल्हा न्यालयाकडुन फेटाळण्यात आले आहे. मा.जिल्हा न्यायालयाचे विरुध्द गाळा धारकांनी मा.उच्च न्यायालयात अपील केले असुन ते ही दिनांक 15/04/2015 रोजी मनपाचे बाजुने निर्णय देवुन गाळा धारकांकडुन नुकसाई भरपाई रक्कम भरुन घेवुन लिलावव्दारे गाळे भाडयाने देणेबाबत निर्णय देण्यात आलेला आहे.

मा.उपसचिव नगर विकास विभाग म.रा. यांचेकडील क्र.जमपा-2014/प्र.क्र.214/नवि-25, दि.23/07/2015 अन्वये ठराव क्र.135 दि.20/10/2014 यास त्यांचेकडील दि.04/06/2015 चे पत्राचा संदर्भ देवुन गाळे सिल करण्याची कार्यवाही अप्रत्यक्ष ठरत असल्याने कार्यवाही रद्द करण्याचा निर्णय देण्यात आला. नमुद शासनाचे कार्यवाही विरुध्द तात्कालीन महापौर/उप महापौर यांनी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाकडे जनहित याचिका क्र.7730/2015 दाखल केली असताना मा.उच्च न्यायालयाने दि.14/07/2017 रोजी मनपाचे बाजुने निर्णय दिलेला आहे. सदर निर्णयाचे विरुध्द गाळा धारकांनी मा.सर्वोच्च न्यायालयात अपील केले असता ते ही दिनांक 04/12/2017 रोजी फेटाळण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट शासनाचे पत्र क्रमांक जमपा-2017/प्र क्र.250/नवि-25 नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक 18 डिसेंबर 2017 चे पत्रानुसार मुदत संपलेल्या गाळेबाबत कार्यवाही करणे बाबत अवगत करण्यात आले होते.

जळगांव शहर महानगरपालिकेडील त्यांचे मालकीचे गाळयांपासुन सन 2016-2017 व 2017-2018 या वर्षातील गाळाधारकाकडून मागणी असलेले गाळाभाडे रक्कम वसुल करण्यात आलेली गाळाभाडे रक्कम व प्रलंबित अथवा थकीत

असलेली गाळाभाडे रक्कमेचा तपाशील खालील प्रमाणे असे.

सन	एकुण गाळा भाडे रक्कम रुपये	वसुल गाळा भाडे रक्कम रुपये	प्रलंबित गाळा भाडे रक्कम रुपये	वसुलीचे शेकडा प्रमाण
2016-2017	1,70,47,64,515/-	1,86,46,472/-	1,68,61,18,123/-	1.09%
2017-2018	1,91,40,17,434/-	22,60,35,464/-	1,68,79,81,970/-	11.80%

लेखापरीक्षण करतांना नमुद गाळे करार, गाळेभाडे व वसुलीच्या संदर्भात आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) मा.सर्वोच्च न्यायालयानेही मनपाचे बाजुने निर्णय देवुनही महानगरपालिका प्रशासनाने मुदत संपलेले गाळे अद्याप संबधित गाळा धारकाकडुन गाळे मनपाचे ताब्यात घेतलेले नाहीत.

02) त्यामुळे मुदत संपलेले गाळे मनपाचे ताब्यात घेवुन त्याचप्रमाणे रिकामे असलेले/जप्तीच्या कार्यवाहीने ताब्यात घेतलेले असल्यास असे गाळे यांची लिलावाव्दारे भाडे करार करण्यात आलेला नसल्याने लेखापरीक्षण कालावधीपर्यंत मनपाचे मोठया प्रमाणवर आर्थिक नुकसान झालेले आहे व त्यानंतरच्या कालावधीमध्येही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे याबाबत प्रथम प्राधान्याने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

03) गाळा धारकांकडुन येणे असलेले रेडी रेकनर नुसार भाडे व मार्च 2018 पावेतो थकीत रक्कम वसुली बाबत कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा उपाययोजना करण्यात आल्या त्याचा तपाशील सादर करण्यात आला नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 70 दिनांक 02/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 26, Hmm No : 70)

35 किरकोळ वसुली विभागातील कर वसुली बाबत

योजना : | **लेखाशीर्ष** : 0 | **वसुलपात्र** : 4594598.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी | **कलम** : 9ब | **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 या दोन आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करतांना किरकोळ वसुली विभागाचे लेखापरीक्षण केले असून त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

अ.क्र.	करांचे नांव	वित्तीय वर्ष	मागणी	वसुली	थकबाकी	वसुलीचे प्रमाण
1	किरकोळ जमीन भाडे	2016-2017	4340790	2152171	2188619	49.58%
2	हॉटेल टॅक्स	2016-2017	392197	5360	386837	1.36%
3	मटन मार्केट भाडे	2016-2017	1688601	48613	1639988	2.87%
		एकूण	6421588	2206144	4215444	

अ.क्र.	करांचे नांव	वित्तीय वर्ष	मागणी	वसुली	थकबाकी	वसुलीचे प्रमाण
1	किरकोळ जमीन भाडे	2017-2018	4982053	2484590	2497463	49.87%
2	हॉटेल टॅक्स	2017-2018	571515	9460	562055	1.65%
3	मटन मार्केट भाडे	2017-2018	1835678	300598	1535080	16.37%
		एकूण	7389246	2794648	4594598	

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत खालील मुदयांच्या आधारे लेखापरीक्षणाचे अभिप्राय आहेत.

01) किरकोळ वसुली विभागातील किरकोळ जमीन भाडे या करांचे वर्ष 2016-2017 मध्ये एकुण मागणी रक्कम रुपये 43,40,790/- पैकी एकुण वसुली रक्कम रुपये 21,52,171/- इतकीच असुन एकूण थकबाकी रक्कम रुपये 21,88,619/- इतकीच असुन वसुलीचे प्रमाण 49.58% आहे. तसेच वर्ष 2017-2018 मध्ये एकुण मागणी रक्कम रुपये 49,82,053/- पैकी एकुण वसुली रक्कम रुपये 24,84,590/- इतकी आहे. एकूण थकबाकी रक्कम रुपये 24,97,463/- इतकी आहे. वसुलीचे प्रमाण 49.87% इतके आहे . किरकोळ जमीन भाडे या करांचे मागणी प्रमाणे वसुली न झाल्यामुळे तसेच महानगरपालिकेने अर्थसंकल्पामध्ये गृहित धरलेले उत्पन्न प्राप्त होवू शकलेले नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ शकते असे लेखापरिक्षकांचे मत आहे.

02) किरकोळ वसुली विभागातील हॉटेल टॅक्स या करांचे वर्ष 2016-2017 मध्ये एकुण मागणी रक्कम रुपये 3,92,197/- पैकी एकुण वसुली रक्कम रुपये 5,360/- इतकीच असुन एकूण थकबाकी रक्कम रुपये 3,86,837/- इतकी आहे वसुलीचे प्रमाण 1.36% तसेच वर्ष 2017-2018 मध्ये एकुण मागणी रक्कम रुपये 5,71,515/- पैकी एकुण वसुली रक्कम रुपये 9,460/- इतकीच असुन एकूण थकबाकी रक्कम रुपये 5,62,055/- इतकी आहे वसुलीचे प्रमाण 1.65% इतके

आहे. हॉटेल टॅक्स या करांचे मागणी प्रमाणे वसुली अगदी नगण्य असून तसेच महानगरपालिकेने अर्थसंकल्पामध्ये गृहित धरलेले उत्पन्न प्राप्त होवू शकलेले नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ शकते असे लेखापरिक्षकांचे मत आहे.

किरकोळ वसुली विभागातील हॉटेल टॅक्स या करांचे मागणी नोंदवहीनुसार अत्यंत जुन्या मागणीनुसार नोंदी आढळल्या असून वर्ष 2016-2017 व 2017-2018 या वर्षापर्यंत नविन हॉटेल टॅक्स मागणीच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे असे लेखापरिक्षकांचे मत आहे.

किरकोळ वसुली विभागातील हॉटेल टॅक्स या करांचे मागणी नोंदवहीनुसार नगरपालिका असतांना हॉटेल टॅक्सचे जे दर होते तेच दर आता महानगरपालिका असतांना सुध्दा त्याच जुन्या दराने आकारणी करण्यात येत असून दर सुधारीत करण्यांत आलेले दिसून येत नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे असे लेखापरिक्षकांचे मत आहे.

ज्या हॉटेलस् करिता हॉटेल टॅक्स लावण्यात आलेले नाहीत अशा व नव्याने निर्माण झालेल्या हॉटेल करिता व्यावसायिक दराने घरपट्टी व पाणीपट्टीची आकारणी करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने काही इमारतींबाबत तपासणी करण्यात आली असता (उदा. मालमत्ता क्र.888 न्यू शालीमार हॉटेल, 2056 हॉटेल रामनिवास, 2052 हॉटेल न्यू अमरप्रेम, 1874+1894 हॉटेल भाई भाई) व्यावसायिक दराने घरपट्टी व पाणीपट्टी आकारणी करण्यात आलेली असल्याचे आढळून आले, तथापी याबाबत प्रभाग समितीनिहाय सर्वेक्षण करुन अशा हॉटेल इमारतींची यादी तयार करणे व त्यांचे घरपट्टी/पाणीपट्टी आकारणीबाबत तपासणी करुन आवश्यक तेथे हॉटेलचा व्यवसाय सुरु झाल्यापासून व्यावसायिक दराने आकारणी करणे व वसुली करणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा महानगरपालिकेचे नुकसान होत राहील. याबाबत प्रभाग समितीनिहाय कर संकलन विभागाकडून योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कल 383 अन्वये आयुक्तांच्या लायसन्सशिवाय किंवा लायसन्सच्या अटीस अनुसरुन असेल त्या व्यतिरीक्त अन्य रितीने शहरात दुग्धव्यवसाय किंवा दुधाचा धंदा करता येणार नाही. तसेच कोणतीही जागा दुग्धशाळा म्हणून किंवा कोणत्याही दुग्धशाळा उत्पादनाची विक्री करण्यासाठी वापरता येणार नाही अशी तरतुद आहे. तथापी मागणी नोंदवहीमध्ये अनेक डेअरींच्या मागणी नोंदी दिसून येतात. तरी संबधीत डेअरी व्यवसायीक यांची आवश्यक लायसन्स प्राप्त केले किंवा कसे याबाबत लेखापरिक्षणात पडताळणी करता आली नाही.

03) किरकोळ वसुली विभागातील मटन मार्केट भाडे या करांचे वर्ष 2016-2017 मध्ये एकुण मागणी रक्कम रुपये 16,88,601/- नुसार एकुण वसुली रक्कम रुपये 48,613/- इतकीच असुन एकूण थकबाकी रक्कम रुपये 16,39,988/- इतकी आहे. वसुलीचे प्रमाण 2.87% तसेच वर्ष 2017-2018 मध्ये एकुण मागणी रक्कम रुपये 18,35,678/- पैकी एकुण वसुली रक्कम रुपये 3,00,598/- इतकी अरहे. एकूण थकबाकी रक्कम रुपये 15,35,080/- इतकी आहे. वसुलीचे प्रमाण 16.37% इतके आहे. मटन मार्केट भाडे भाडे या करांचे मागणी प्रमाणे वसुली वसुली अगदी नगण्य असून तसेच

महानगरपालिकेने अर्थसंकल्पामध्ये गृहित धरलेले उत्पन्न प्राप्त होवू शकलेले नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ शकते असे लेखापरिक्षकांचे मत आहे.

04) वरील किरकोळ जमीन भाडे, हॉटेल टॅक्स, मटन मार्केट भाडे या तीन्ही करांची माहे मार्च 2018 पावेतो एकूण रक्कम रुपये 45,94,598/- इतकी प्रलंबित थकबाकी रक्कम वसुली करण्यासाठी ठोस उपाययोजना करणेकामी कोणती उपाय योजना केली त्याबाबत अनुपालन लेखापरिक्षणास सादर आले नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 95 दिनांक 28/11/2023 व अर्धसमास पत्र क्रमांक 229 दिनांक 10/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 27, Hmm No : 95)

36 घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम2006 नुसार घरोघरी कचरा संकलन व वहातुक यासाठी प्रती घरटी 20 रुपये वसुलीबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 2250640.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव शहर महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. महाराष्ट् शासन, निर्णय नगरविकास विभाग, क्रं.घ न क व्य./1006/प्रं.क्रं.53/नावि/16 दिनांक 26 ऑक्टोबर 2006 अन्वये नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नुसार घरोघरी कचरा संकलन व वहातुक यासाठी प्रतयेक घरामागे अंदाजे 20 रुपये वसुल करुन घेण्यात यावे. असा स्पष्ट उललेख आहे. घरपटटी विभागाने सन 2016-17 व 2017-2018 या आर्थिक वर्षात ज्या वार्डांना घनकचरा उचलण्याच्या ठेका दिलेला आहे. अशा प्रत्येक घराकडुन 20/- प्रमाणे वसुल करणे आवश्यक आहे तरी घरपटटी विभागाने खालील रक्कम रुपये 2250640/- वसुली बाबत कार्यवाही करणेत आलेचे दिसुन येत नाही .

वार्ड क्रमांक 1,3,5,11,12,13,14,15,16,17,18,21,22,23,24,25,26,27, 28, 29,36 व 37		वार्डातील एकुण मिळकती	शासन निर्णया प्रमाणे 20/- रु प्रती घर आकारलेली रक्कम रुपये	वसुल रक्कम रुपये	दिनांक 31/03/2018 अखेर येणे थकबाकी रक्कम रुपये
16-17	17-18				
55458	57074	112532	निरंक	निरंक	2250640

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 222 दिनांक 05/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATRSBM6601 (Ref No : 155, Hmm No : 222)

37 किरकोळ वसुली विभागातील किरकोळ जमीन भाडे मागणी नोंदवही मधील नोंदी बाबत अनियमीतता.

योजना :		**लेखाशीर्ष** : 0		**वसुलपात्र** :	0.00/-
निधी :	महानगरपालिका स्व- निधी	**कलम** : 9ब		**अंतिम अमान्य** :	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे किरकोळ वसुली विभागातील किरकोळ जमीन भाडे मागणी नोंदवही यांचे लेखापरीक्षण केले असुन अर्धसमास पत्र क्रमांक 273 दिनांक 27/05/2024 अन्वये खुलासा व आवश्यक अभिलेखे मागविण्यात आले होते. त्यानुसार उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अभिलेखांचे अनुषंगाने लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितताबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

01) किरकोळ वसुली विभागामार्फत दिनांक 18/02/2018 रोजीची कार्यालयीन टिपणी नुसार (1) अध्यक्ष श्री विजयकुमार रामदास वाणी मेहरुण सर्वे नं. 421/अ/1ब अंतीम भुखंड नगर रचना योजना क्रं.3 आरक्षण क्रं.145 जागा क्षेत्र 0.325 आर 3250 चौ.मी. जागा न.पा.ठराव क्रमांक 431 /23/12. (2) अध्यक्ष श्री विजयकुमार रामदास वाणी विदया फाऊडेशन जळगांव क्रिडांगणासाठी मेहरुण सर्वे नं. 421/अ/1ब आरक्षण क्रं.146 क्षेत्र 0.43 पैकी 0.30 आर क्रिंडागाणासाठी उपलब्ध न.पा. ठराव क्रमांक 431 दिनांक 21/12/2001. (3) खान्देश युनियन एज्युकेशन सोसायटी जळगांव (भगीरथ हायस्कुल) साने गरुजी कॉलनी जळगांव महरुण सेर्वे नं.477/ 5552 -52 आरक्षण क्रमांक 163 भुंखंड 29 ते 35.(4) अध्यक्ष श्री पांडरंग रघुनाथ काळे ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक मंडळ प्राथमिक शाळा व क्रिडांगण मेहरुण सर्वे नं. 10886 आरक्षण क्रमांक 47 जागा क्षेत्र 0.49 हेक्टर व (5) विवेकानंद प्रतिष्ठान प्राथमिक शाळा जळगांव मेहरुण सर्वे नं. 491/अ/1ब भुखंड क्रमांक 66 आरक्षण क्रं.164 जागा क्षेत्र 0.56 आर जागा इत्यादी एकूण 5 नमुद शिक्षणसंस्था यांचे करारनामा संपले असुन नगररचना विभागाने योग्य ती कार्यवाही करावी असे कळविले आहे. तथापी अदयापपावेतो नगररचना विभागाने कुठलाही खुलासा किंवा अभिलेखे दिलेले नाही. यावरुन नगररचना विभागाने सदर बाबीकडे गांभीर्याने घेतलेले दिसून येत नाही व त्यामुळे महानगरपालिकेला प्राप्त होऊ शकणाऱ्या महसुलापासून वंचित राहावे लागत असून परिणामी महानगरपालिकेचे नुकसान होत आहे, तसेच महानगरपालिकेच्या इतर विकास कामांवरही त्यामुळे विपरित परिणाम होत आहे. नगररचना विभागाकडून योग्य ती कार्यवाही करुन वसुली विभागाने संबधीत शिक्षणसंस्था यांचे बाबतीत मागिल थकबाकीसह मागणी नोंदवही अद्यावत करुन वसुलीची कार्यवाही करणे आवश्यक आहे, अन्यथा महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत राहील. याबाबत करारनामा करणारे संबंधित नगररचना विभागानेही योग्य ती दक्षता घेऊन महानगरपालिकेचे नुकसान होणार नाही व उत्पन्नामध्ये वाढ

होईल याबाबत जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

02) खालील संस्थांना/शाळांना मनपाच्या जागा भाडे कराराने दिलेल्या आहेत. सदर जागांच्या अनुषंगाने करारनामे किरकोळ वसुली विभागाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे कोणत्या जागेसाठी किती भाडे करार व कालावधी या बाबत लेखापरिक्षणास पडताळणी करता आली नाही. करारनामे ज्या विभागांमार्फत करण्यांत आले आहे. त्या विभागांमार्फत आवश्यक करारनाम्याच्या छायाकिंत प्रती प्राप्त करुन मागणी नोंदवही अदयावत करणे आवश्यक आहे. तसेच ज्या जागांचे करारनाम्याचा कालावधी संपलेला आहे. त्यांचे सुधारीत करारनामे करुन त्याप्रमाणे नोंदवही अदयावत करणे आवश्यक आहे. करारनामे संपलेले असल्याने वसुलीची कार्यवाही करण्यांत येत नसल्याचे निर्दशनास येते. त्यामुळे महानगरपालीकेचे मोठया प्रमाणांत नुकसान होत आहे.

अ.क्र.	संस्थेचे/शाळेचे नाव	मनपा जागा तपशील
1	कै.भंवरलाल ॲंड कांताबाई जैन मल्टीपर्पज फौडेशन जळगांव	म्युनसीपल शाळा क्रमांक 3 व त्या मागील खुली जागा शैक्षणीक प्रयाजनार्थ नगररचना योजना क्रं.2 अंतीम भुखंड क्रं. 189 सि.स.नं. 267 / अ 22 च क्षेत्र 1135 चौ.मी. तसेच शाळेचा मागील भागात अंतिम भुखंड क्रं.190 ज्याचे क्षेत्रफळ 982.10 चौ.मी. खुली जागा
2	म.अध्यक्ष जळगांव पिपल्स बॅक रामदास पाटील स्मृती सेवा ट्रस्ट जळगांव	मनपा मालकीची सि.स.नं. 2656/2 येथील शाळा क्रमांक 2 ची इमारत जागा
3	म.सेंट झेवियर एज्युकेशन ट्रस्ट जळगांव	राखीव फायनल प्लॉट नं. 515
4	म. प्रिन्सीपाल सेंट जोसेफ कॅन्हवॅट हायस्कूल जळगांव	सि.स.नं.491 अ/1 मधील मेहरुण शिवारातील जागा
5	डॉ. तेजोमयी एस भालेराव मॅनेजींग डायरेक्टर लीलावती इन्स्टीटयुट ऑफ सायन्स बांभोरी ता. धरणगांव	जळगांव शहर महानगरपालिका शाळा क्रमांक 14 व 28 मधील एक मजल्यावरील खोल्या
6	डॉ सुभाष भास्कर चौधरी (अध्यक्ष) लेवा एज्युकेशनल युनियन जळगांव	मनपा शाळा क्रमांक 45 मौजे महरुण शिवार येथील शाळा खोल्या
7	श्री अविनाश शिवाजी पाटील अध्यक्ष एकलती बु. शिक्षण प्रसारक व ग्रामीण	जळगांव शहर महानगरपालिका शाळा क्रमांक 50 शामनगर मेहरुण शिवार स.क्र 251/3 अ मधील तळ मजल्यावरील 4

	विकास मंडळ लि. एकलती बु. ता जामनेर जि. जळगांव	खोल्या

03) त्याचप्रमाणे बालविकास प्रकल्प अधिकारी जळगांव यांचेमार्फत प्राप्त अनुदानामधून बांधकाम करण्यात येणाऱ्या अंगणवाडी केंद्र बांधकामाच्या संचिका तपासणी करण्यात आल्या असता त्यामध्ये उपलब्ध असलेल्या नगररचना विभागाकडील विवरणपत्रामध्ये स.नं.463/3/4 येथील जागा आर्य चाणक्य संस्थेस व विर सावरकर संस्थेस देण्यात आलेल्या असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. सदर संस्थांकडून जागा भाडे वसुलीबाबत किरकोळ वसुली विभागाकडील अभिलेखांमध्ये माहिती दिसून आली नाही, त्यामुळे सदर संस्थांकडून जागा भाडे वसुल करण्यात येत आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करण्यात येणे आवश्यक आहे. सदर संस्था तसेच महानगरपालिका हद्दीमधील याप्रकारच्या इतर संस्थांनाही जागा देण्यात आल्या असल्यास अशा प्रकारच्या सर्व संस्थांच्या बाबतीत त्यांचे करारनामे तपासणी करण्यात येऊन वसुलीची कार्यवाही करणे, करारनामा कालावधी संपला असल्यास असा कालावधी संपल्याच्या दिनांकापासून दंडात्मक कार्यवाही करणे व नव्याने भाडे ठरवून करारनामे करणे किंवा जागा रिकामी करुन घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. अन्यथा महानगरपालिकेच्या जागांचा इतर खाजगी संस्थांकडून वापर करण्यात येत असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. याबाबत नगररचना विभागाने तपासणी करुन वरीलप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणे व त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 184, Hmm No : 273)

38 मेहरुण तलाव सुशोभिकरण कामातील अनियमितता

योजना	:	जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 474341.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) योजनेमधून मेहरुण तलाव सुशोभिकरणाचे काम प्रस्तावित करण्यात आले होते. सदर कामामध्ये जळगांव शहरातील मेहरुण तलावाजवळ जॉगिंग ट्रॅक, परिसर झाडे लावून सुशोभिकरण करणे, लाईट व्यवस्था इत्यादी कामांचा समावेश होता. सदर कामास मा.जिल्हा नियोजन समितीची प्रशासकीय मान्यता रु.99.52 लक्ष किंमतीस प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार महानगरपालिकामार्फत निविदा प्रक्रीया राबवून कामाचे आदेश देण्यात आले होते. कामाची सुरुवात करण्यापूर्वी सदर जागेची जिल्हा भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणी करण्यास सुरुवात करण्यात आली तथापी स्थानिक नागरिकांच्या हरकतीमुळे न्यायालयीन स्थगिती असल्याचे निदर्शनास आल्यामुळे या भागात काम करणे शक्य होणार नाही त्यामुळे सदर कामाची निविदा प्रक्रीया रद्द करुन मेहरुण

तलावाच्या बांधाच्या बाजूस गणेश मूर्ती विसर्जनासाठी घाट बांधकाम करणेकरिता सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेकरिता मनपा पत्र क्र.532 दिनांक 10/11/2015 अन्वये मा.जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. यावर मा.जिल्हा नियोजन समितीने पत्र क्र.107 दिनांक 06/01/2016 अन्वये प्रस्तावित नवीन काम हे सुशोभिकरणांतर्गत असल्यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान न करता सदरचे प्रस्तावित काम करण्यास हरकत नसल्याचे कळविले.

सदर विवेचनानसुार मुळ कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.99.52 लक्ष होती व नव्याने प्रस्तावित कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.98.06 लक्ष होती, तथापी मा.जिल्हा नियोजन समितीचे आदेशानुसार कामाची प्रशासकीय मान्यता रु.99.52 लक्ष म्हणजे अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा रु.1.46 लक्ष जास्त होती.

त्यानुसार उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.482, दिनांक 04/03/2014 रु.99.52 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.370, दिनांक 06/11/2015
कामाची अंदाजित किंमत	रु.9806243/-
दरसूची	2015-2016
निधी वितरण	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.540, दिनांक 12/03/2015 रु.9361778/-
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा पत्र क्र.07, दिनांक 07/04/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.विनय एस. बढे, भुसावळ (-7.77% दराने)
परफॉर्मन्स सिक्युरिटी	मनपा पावती.क्र.019 दिनांक 06/04/2016 रक्कम रु.98062/-
कामाचा कालावधी	09 महिने i.e. upto 06/01/2017
काम पूर्ण दिनांक	03/01/2017
दोष निवारण कालावधी	6 महिने

चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी जळगांव पत्र क्र.11-1 दि.28/6/2016 व पत्र क्र.11 दि.28/06/2016
त्रयस्थ तांत्रिक तपासणी	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव यांचेकडील पत्र क्र.2086, दि.03/08/2017
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	दुसरे धावते देयक	तिसरे धावते देयक	चौथे व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	01, दि.01/07/2016	02, दि.20/09/2016	03, दि.10/02/2017	01, दि.31/08/2017	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक (देयकावरील नोंदीनुसार)	156, पृ.क्र.53-56	156, पृ.क्र.62-67	156, पृ.क्र.75-87	156, पृ.क्र.85-90	
कामाची एकूण किंमत	2731643	3109590	3946044	519158	10306435
मंजूर निविदा दर	-212248	-241615	-306608	-40339	-800810
जादा बाब	0	0	0	239462	239462
देय रक्कम	2519395	2867975	3639436	718281	9745087
वजाती -					
1% विमा	25194	28680	36394	7183	97451
1% कामगार उपकर	25194	28680	36394	7183	97451
10% सुरक्षा रक्कम	251940	286797	363944	71828	974509
2% जीएसटी/व्हॅट	50388	57359	72789	14366	194902
2.33% आयकर	57946	65963	83707	16520	224136

एकूण वजाती	410662	467479	593228	117080	1588449
निव्वळ देय रक्कम	2108733	2400496	3046208	601201	8156638
+ थर्ड पार्टी ऑडीट फी	0	0	0	112771	112771
एकूण निव्वळ देय	2108733	2400496	3046208	713972	8269409

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.90.44 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.8600/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.8400/- चे फ्रँकिंग मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

02) सदर कामामध्ये P.C.C.1:2:4 ही जादा बाब घेण्यात येऊन त्यावर रु.239462/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. तसेच सदर बाबीवर खर्च करतांना सुधारित दरसूचीनुसार दर देण्यात आलेले आहे. बी-1 करारनामा अट क्र.14 नुसार ldquo;कामामध्ये कोणतेही बदल हे शहर अभियंता यांचे लेखी आदेशाशिवाय करता कामा नये. तसेच ज्या बाबींचा कंत्राटामध्ये समावेश नाही अशा बाबींसाठी दरसूचीमधील दरानुसार किंवा कंत्राटदार व शहर अभियंता यांचे परस्पर सहमतीने दर निश्चित करुन यापैकी जो दर कमी असेल त्या दरात काम करणेत येईल.rdquo; तथापी वरीलप्रमाणे जादा बाबीच्या दराबाबत कंत्राटदारासोबत कोणतेही लेखी पत्रव्यवहार करण्यात आलेला दिसून येत नाही, तसेच सदर बाबीबाबत कंत्राटदारास कोणतेही लेखी आदेश देण्यात आलेले नाहीत. सदर बाबीकरिता सुधारित दरसूचीनुसार दर देण्यात आलेले आहे, मुळ अंदाजपत्रकामध्ये याच प्रकारची इतर बाबींसाठी जो दर देण्यात आलेला आहे त्याच दरात कंत्राटदारासमवेत वाटाघाटी करुन काम करता येणे शक्य होते, तसेच मंजूर निविदेनुसार सदर बाबींच्या दरामध्ये कोणतीही कपात करण्यात आलेली नाही. तथापी त्याप्रमाणे काम करण्यात आलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे रु.55606/- इतके जादा प्रदान झालेले आहे.

बाब क्रमांक	तपशिल	परिणाम	दर	किंमत
Extra Item	P.C.C. 1:2:4	55.58	4308.42	239461.98
	मुळ अंदाजपत्रकीय दरानुसार देय दर	55.58	3586.63	199344.90

	मंजूर निविदा दरानुसार कमी केलेली किंमत (7.77% कमी दराने)			15489.10
	देय रक्कम			183855.80
	जादा प्रदान			55606.18

03) कामामधील बाब क्र.2 नुसार भरावाचे काम करण्यात आलेले आहे. स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रु.90187/- जादा प्रदान झालेले असून सदर रक्कम वसुल करण्यात यावी व शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

बाब क्र.	तपशिल	मोजमापा नुसार परिणाम	10% दबाईकरिता कमी करणे आवश्यक असलेले परिणाम	देय दर (336 वजा 7.77% निविदा दर कमी करुन)	वसुलपात्र रक्कम
2	Filling in plinth floors with contractors soil, sand or murum in 15 cm. to 20 cm. layers including watering compactdion complete.	2910.30	291.03	309.89	90187

04) कामामध्ये खोदकामामधून खालीलप्रमाणे मटेरियल काढण्यात आलेले आहे. स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशनमधील Bd.A.1.2 नुसार खोदकामातून निघालेले साहित्यामधून उपयोगी व निरुपयोगी साहित्य वेगळे काढण्यात येऊन उपयोगी साहित्य कामाचे जागेपासून 50 मीटर अंतराचे आंत स्टॅक करण्यात यावा व कामामध्ये भरावासाठी वापरण्यात यावा अशी तरतुद आहे. तथापी खोदकामातून काढण्यात आलेले खालीलप्रमाणे साहित्य एकूण 466.74 घमी. हे भरावाचे कामामध्ये वापरण्यात आलेले असल्याबाबत कुठलेही अभिलेखे ठेवण्यात आलेले नाही. याउलट भरावासाठी इतर ठिकाणाहून साहित्य आणण्यात आलेले आहे.

बाब क्रमांक	बाब	एकूण परिणाम
12	Excavation	135.83
17	Excavation	21.91
30	Excavation	308.99
	एकूण परिणाम	466.73

05) देयकासोबत गौण खनिज परवाने जोडण्यात आलेले आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	परवाना क्रमांक व दिनांक	साहित्य	परिणाम (ब्रासमध्ये)	परवानामध्ये कामाचे नमूद कारण
1	20, दि.24/06/2016	मुरुम	100	मेहरुण तलाव सुशोभिकरण (गणेश घाट)
2	21, दि.24/06/2016	मुरुम	48	मेहरुण तलाव सुशोभिकरण (गणेश घाट)
3	22, दि.24/06/2016	मुरुम	60	मेहरुण तलाव सुशोभिकरण (गणेश घाट)
4	55, दि.22/03/2016	मुरुम	200	मेहरुण गट नं.464/2 पैकी लेव्हलींग व भराव
5	10, दि.11/05/2016	मुरुम	60	मेहरुण तलाव खोलीकरण व सुशोभिकरण
6	12, दि.19/05/2016	मुरुम	60	मेहरुण तलाव खोलीकरण व सुशोभिकरण
		एकूण	528	

वरील तपशिलानुसार अ.क्र.1 ते 3 मधील परवानांनुसार सदर कामासाठी मुरुम आणण्यात आलेला असून अ.क्र.4,5,6 नुसार इतर कामांसाठी मुरुम उचलण्याची परवानगी देण्यात आलेली असल्याचे दिसून येते, म्हणजेच इतर कामांसाठी मुरुम उचलण्यात येऊन परवाना प्रत या कामाच्या संचिकेमध्ये लावण्यात येऊन मुरुम आणण्यात आल्याचे दर्शविण्यात आलेले आहे. सदर इतर कामांच्या परवानानुसार परिणाम 200+60+60 = 320 वजा जाता उर्वरित एकूण 208 ब्रास मुरुम याच कामासाठी आणण्यात आलेला आहे. देयकामध्ये बाब क्र.2 नुसार भरावासाठी एकूण परिणाम 2910.30 घमी म्हणजे 1028.37 ब्रास परिणाम नोंदविण्यात आलेले आहे, म्हणजेच 1028.37 ब्रास मुरुम आणणे आवश्यक असतांना फक्त 208 ब्रास मुरुम आणण्यात आलेला आहे, यावरुन 820.37 ब्रास मुरुम कमी आणलेला दिसून येतो, त्यामुळे 820.37 x 400 = 328148 इतकी रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

06) त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण हे काम सुरु असतांना किंवा काम पूर्ण झाल्यानंतर तात्काळ करुन घेणे आवश्यक आहे, जेणेकरुन कामामध्ये काही दोष राहिल्यास संबंधित कंत्राटदार यांचेकडून तात्काळ सुधारणा करणे शक्य होईल. तथापी काम दिनांक 03/01/2017 रोजी पूर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेने त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करणेबाबत पत्र दिनांक 13/6/2017 रोजी व त्यानंतर दिनांक 22/06/2017 रोजी तांत्रिक तपासणी म्हणजे 5 महिन्यांच्या विलंबाने करण्यात आलेली आहे.

07) सदर कामासाठी दिनांक 10/06/2015 अन्वये रु.9361778/- इतके अनुदान प्राप्त झालेले असून त्यानंतरच्या

कालावधीमध्ये दिनांक 31/03/2018 अखेर एकूण व्याज रु.560663/- अशी एकूण रु.9922441/- इतकी रक्कम जमा झालेली आहे. सदर कामावर एकूण खर्च रु.9745087/- करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्राप्त अनुदानापेक्षा रु.383309/- इतका जादा खर्च करण्यात आलेला असून सदरचा जादा खर्च हा व्याजाच्या रकमेमधून करण्यात आलेला असल्याचे दिसून येते. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीव्यतिरिक्त जादा झालेला खर्च हा परस्पर योजनेमधील कामावर वापरण्यात आलेला असल्याने शासन आदेशाचे उल्लंघन झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

08) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/नवि-20, दिनांक 02/03/2009 मधील अ.क्र.4 नुसार ड वर्ग महानगरपालिकांना रु.50.00 लक्षांपेक्षा अधिक किंमतीची सर्व कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करणे अनिवार्य राहील तसेच अ.क्र.6 नुसार त्रयस्थ तांत्रिक तपासणीवरील खर्च भागविण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतुद करावी अशा सूचना आहे. सदर कामाची किंमत रु.50.00 लक्षपेक्षा जास्त असल्याने वरील शासन निर्णयामधील सुचनांनुसार सदर कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करणे अनिवार्य असून त्यासाठी कामाच्या अंदाजपत्रकामध्ये त्याबाबत तरतुद करणे आवश्यक होते, तथापी अशा प्रकारे तरतुद करण्यात आलेली नसतांनाही सदर कामावर योजनेच्या खात्यामध्ये जमा व्याजाच्या रकमेमधून खर्च करण्यात आलेला आहे, त्यामुळे वरील मुद्यामध्ये नमुद केल्यानुसार मंजुरीशिवाय निधीचा वापर करण्यात आलेला असल्याने नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील आदेशांचे उल्लंघन झालेले आहे.

09) सदर कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.9806242/- इतकी असून निविदा 7.77% कमी दराने मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानुसार 7.77% रक्कम कमी करुन रु.9044297/- अधिक इतक्या किंमतीमध्ये काम करणे आवश्यक होते, तथापी बाबनिहाय कमी व जादा परिणाम करण्यात येऊन तसेच जादा बाबीवर खर्च करण्यात येऊन प्रकल्पावर एकूण खर्च रु.10306436/- इतके मुल्यांकन असून निविदा मंजुर दरानुसार रु.9745087/- इतका प्रत्यक्ष खर्च करण्यात आलेला असल्याने रु.700790/- इतका म्हणजे 7.75 % जादा खर्च करण्यात आलेला आहे. कंत्राटदाराने 7.77% दर कमी करणे व अंदाजपत्रकीय बाबींमध्ये कमी/जादा परिणाम व जादा बाब करुन 7.75% जादा खर्च करणे यावरुन कंत्राटदाराने हीत जोपासले गेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मते आहे.

10) टिपणी दिनांक 07/03/2017 अन्वये रु.98.06 लक्षचे काम मंजूर असून रु.93.61 लक्ष निधी प्राप्त झाले आहे, उर्वरित रु.4.45 लक्ष निधीची मागणी साठी पत्र सादर, त्यावर सहायक अभियंता व शहर अभियंता यांनी रु.99.52 लक्षचे रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून प्राप्त निधी रु.93.61 लक्ष मधून उर्वरित निधी रु.5.91 लक्ष

मागणी करणे आवश्यक आहे असे शेरे नमूद केलेले आहे व त्यानुसार महानगरपालिकेचे पत्र क्र.3141 दिनांक 9/3/2017 अन्वये रु.590222/- ची मागणी मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव यांचेकडे सादर करण्यात आलेले आहे. म्हणजेच मंजूर कामाच्या किंमतीपेक्षा जादा निधीची मागणी सादर करणे ही बाब नियमबाह्य असून शासनाचा निधी अनावश्यकरित्या अडकवून ठेवण्यात येण्याची शक्यता आहे.

11) सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे देयकामध्ये दर्शविलेले परिमाण, दर व रकमा याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही,परिणामी कामांवर करण्यात आलेला खर्च हा लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.29 दिनांक 22/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	400
03	जादा बाबीवरील खर्च	55606
04	10% दबाई	90187
06	मुरुम	328148
	एकूण वसुलपात्र रक्कम	474341

FDSDNBM7201 (Ref No : 15, Hmm No : 29)

39 मेहरुण तलावाचे बांधाचे मजबुतीकरण करुन स्टोन पिचिंग करणे कामातील अनियमितता

योजना : जलयुक्त शिवार **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 1837360.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	जलयुक्त शिवार

प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.1856, दिनांक 16/06/2016 रु.65.08 लक्ष	
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.34, दिनांक 08/06/2016	
कामाची अंदाजित किंमत	रु.6507866/-	
दरसुची	2015-2016	
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा पत्र क्र.80, दिनांक 23/12/2016	
कंत्राटदाराचे नांव	श्री.गजानन एंटरप्राईजेस जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)	
कामाचा कालावधी	06 महिने i.e. upto 22/06/2017	
काम पूर्ण दिनांक	अपूर्ण	
दोष निवारण कालावधी	6 महिने	
काम पूर्ण दिनांक	24/03/2018	
चाचणी अहवाल	शासकीय अभियांत्रिकीय महाविद्यालय जळगांव पत्र क्र.3251, दि.18/12/2017 व पत्र क्र.1233, दि.02/05/2018	
देयकांचा तपशिल		प्रथम धावते देयक
	प्रमाणक क्रमांक व दिनांक	01, दि.16/02/2018
	मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	क्र.16, पृ.क्र.100-104
	कामाची एकूण किंमत	1598139

	+ रॉयल्टी	372362
	देय रक्कम	1970501
	वजाती -	
	1% विमा	19705
	1% कामगार उपकर	19705
	10% सुरक्षा रक्कम	197050
	2% जीएसटी/व्हॅट	39410
	2.33% आयकर	45322
	एकूण वजाती	321192
	निव्वळ देय रक्कम	1649309

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) वित्त विभाग शासन निर्णय क्र.विमास-1098/प्र.क्र.28/शासन हमी दिनांक 19/8/1998, नगरविकास विभाग शासन पत्र क्र.जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक 3/11/2003 तसेच शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र.2314 दिनांक 31/3/2015 नुसार कंत्राटदाराने कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविल्याबाबतचा पुरावा काम सुरु करणेपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. तथापी सदरचे कामामध्ये निविदा स्विकृतीच्या वेळी किंवा प्रदानापूर्वी कंत्राटी कामाचा विमा उतरविला असल्याबाबतची खात्री न करता किंवा तसे विमापत्र प्राप्त न करता प्रथम धावते देयकामधून देयक रकमेच्या 1% प्रमाणे रु.19705/- विमा रक्कम कपात करण्यात आलेली आहे, त्यामुळे कामाचा विमा उतरविण्याचा उद्देश सफल होत नाही. तसेच निविदा रकमेवर विमा कपात न करता देयक रकमेवर विमा कपात केल्यामुळे कमी कपात करण्यात आलेली आहे. कामाची किंमत रु.6507866/- वर 1% प्रमाणे रु.65079/- इतकी विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते, त्यामुळे रु.45374/- इतकी कमी कपात करण्यात आलेली आहे. कामाचे उर्वरित देयकांमध्ये अशाच प्रकारे कपात करण्यात आलेली विम्याची रक्कम

परिगणीत करण्यात येऊन निविदा रकमेवर 1% पेक्षा कमी कपात करण्यात आली असल्यास अशी कमी कपात करण्यात आलेली रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन संबंधित लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात येऊन विमा संचालनालयाकडे सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

02) सदर कामाचे मातीकामासाठी कंत्राटदाराने मा.तहसिलदार जळगांव यांचे दोन परवानांनुसार कामाचे ठिकाणी मुरुम आणलेले आहे, त्यासाठी संचिकेमध्ये लावण्यात आलेल्या परवानानुसार दिनांक 20/03/2017 व 31/03/2017 या दिवशी अनुक्रमे 100 ब्रास व 150 ब्रास असे एकूण 250 ब्रास म्हणजे 88.34 घनमी. मुरुम आणलेले आहे. तसेच स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिमाणामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही. देयकानुसार मातीकामासाठी व गौण खनिज स्वामित्व धनापोटी रकमा जादा प्रदान करण्यात आलेल्या असून त्याची परिगणना खालीलप्रमाणे आहे, सदर जादा प्रदान रक्कम रु.480323/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी व अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे चलनाचे प्रतीसह सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	दर	दिलेले		देय		वसुलपात्र रक्कम
			परिमाण	रक्कम	परिमाण	रक्कम	
1	Earthwork	203.45	1403.79	285601	88.34 चे 10% कमी करुन 79.51	16176	269425
4	Royalty	141.34	1403.79	198412	88.34	12486	210898
	एकूण			484013		28662	480323

03) सदर कामाचे भराव कामासाठी कंत्राटदाराने गायत्री स्टोन क्रशर, मौजे सावदे प्र.च. ता.एरंडोल येथून दगड आणलेले आहे, त्यासाठी संचिकेमध्ये लावण्यात आलेल्या वाहतुक पासनुसार दिनांक 15/2/2017 ते 14/6/2017 या दरम्यान एकूण 398 ब्रास म्हणजे 140.63 घनमी. दगड आणलेले आहे. तथापी देयकानुसार भराव कामासाठी व गौण खनिज स्वामित्व धनापोटी रकमा जादा प्रदान करण्यात आलेल्या असून त्याची परिगणना खालीलप्रमाणे आहे, सदर जादा प्रदान रक्कम रु.1311663/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी व अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे चलनाचे प्रतीसह सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	दर	दिलेले		देय		वसुलपात्र रक्कम
			परिणाम	रक्कम	परिणाम	रक्कम	
2	Stone Pitching	1066.48	1230.72	1312538	140.63	149979	1162559

4	Royalty	141.34	1230.72	173950	140.63 x 1.25 = 175.79	24846	149104
	एकूण			1486488		169856	1311663

04) मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेशानुसार ग्रीन होप फाऊंडेशन एरंडोल यांचेकडून कामाचे मुल्यमापन व पर्यवेक्षण करण्यात येऊन त्यांचे पत्र क्र.13 दिनांक 18/10/2017 अन्वये अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानुसार अंदाजपत्रकातील काही बाबी कमी करणे व काही बाबी वाढविणेबाबत सुचविले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे. तथापी वरीलप्रमाणे बदलाबाबत सुधारित अंदाजपत्रक तयार न करता फक्त सुचविण्यात आलेल्या बदलानुसार होणारी बचत व वाढीव किंमत याबाबतचे विवरण दर्शवून मा.जिल्हा नियोजन समिती जळगांव यांना महानगरपालिका पत्र क्र.2760 दिनांक 08/01/2018 अन्वये अहवाल सादर करण्यात आला, त्यास मा.जिल्हा नियोजन समिती जळगांव यांचे पत्र क्र.771, दिनांक 16/03/2018 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यामुळे नियमांचे पालन करण्यात आलेली नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

05) नव्याने समाविष्ट करावयाच्या बाबींबाबत फक्त एक विवरणपत्र तयार करुन रकमा परिगणीत आलेल्या आहेत व अशा बाबींचे दर हे 2016-17 चे दरसुचीनुसार घेण्यात आलेले आहे, तथापी त्यास तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली नाही. तसेच अशा वाढीव बाबींकरिता मुळ अंदाजपत्रकानुसार सन 2015-2016 ऐवजी सन 2016-2017 चे दरसुचीनुसार दर घेण्यात आलेले आहे, त्यामुळे वाढीव कामाची किंमत जादा प्रदान झालेली आहे व परिणामी महानगरपालिकेवर पर्यायाने शासनावर जादा खर्चाचा बोजा वाढलेला आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही, तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही त्यामुळे शासन नियमांचे उल्लंघन झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

06) सदरचे काम दिनांक 24/03/2018 रोजी भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेले असले तरीही लेखा परिक्षण कालावधीमध्ये अंतिम देयकाचे प्रदान होणे बाकी आहे. सदर देयकाचे प्रदान केंव्हा व किती करण्यात आले याबाबत योग्य त्या अभिलेख्यांसह खुलासा सादर करण्यात यावा.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.30 दिनांक 22/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता.

तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	विमा	45374
02	मुरुम स्वामित्वधन	480323
04	खडी स्वामित्वधन	1311663
	एकूण वसुलपात्र रक्कम	1837360

FDSDNBM7201 (Ref No : 16, Hmm No : 30)

40 प्रभाग क्र.35 मेहरुण येथील स.नं.273/1+3 ते 5 व 273/2 मध्ये रस्ते डांबरीकरण कामातील अनियमितता

योजना : खासदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.ईश्वरलाल जैन) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 76195.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	खासदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.ईश्वरलाल जैन)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.2884, दिनांक 13/10/2016 रु.998822/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.32, दिनांक 26/5/2016
कामाची अंदाजित किंमत	रु.998822/-
निधी वितरण	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.1422, दिनांक 14/07/2017 रु.506893/-
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा पत्र क्र.140, दिनांक 22/2/2017

कंत्राटदाराचे नांव	श्री.सुशिलकुमार गणपत डोंगरे जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 21/08/2017
दोष निवारण कालावधी	6 महिने
कामाची स्थिती	अपूर्णावस्थेत रद्द करण्यात आले.
चाचणी अहवाल	उपलब्ध नाही.
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	दुसरे व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	02/03.08.2017	--
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	18/पृष्ठ क्र.172 ते 181	--
कामाची एकूण किंमत	506893	0
मंजूर निविदा दर	0	0
देय रक्कम	506893	0
वजाती -		
1% विमा	5069	0
1% कामगार उपकर	5069	0
10% सुरक्षा रक्कम	50689	0
2% जीएसटी/व्हॅट	10138	0
2.33% आयकर	11659	0
एकूण वजाती	82624	0
निव्वळ देय रक्कम	424269	0

+ थर्ड पार्टी ऑडीट फी	0	0
एकूण निव्वळ देय	424269	0

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) वित्त विभाग शासन निर्णय क्र.विमास-1098/प्र.क्र.28/शासन हमी दिनांक 19/8/1998, नगरविकास विभाग शासन पत्र क्र.जीईएन 1098/ 1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक 3/11/2003 तसेच शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र.2314 दिनांक 31/3/2015 नुसार कंत्राटदाराने कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविल्याबाबतचा पुरावा काम सुरु करणेपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. तथापी अशा प्रकारे कार्यवाही न करता प्रत्येक देयकामधून देयक रकमेवर विमा कपात करण्यात आलेला आहे, त्यामुळे त्यामुळे कामगारांचा विमा उतरविण्याचा उद्देश सफल होत नाही. तसेच कपात करण्यात आलेली विमा रक्कम शासकीय विमा निधीकडे भरणा करण्यात येऊन त्याबाबतचा चलनासह अहवाल विमा संचालनालयाकडे सादर करणेबाबतची कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणास अभिलेखे तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच सदर अटीनुसार कंत्राटी कामाची रक्कम रु.998822/- वर 1% नुसार रु.9988/- कपात करणे आवश्यक असतांना प्रथम धावते देयकामधून रक्कम रु.5069/- इतकी रक्कम कपात करण्यात आलेली आहे. त्यामुळे रु.4919/- इतकी रक्कम कमी कपात झालेली आहे. तरी सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन शासकीय विमा निधीकडे चलनाने भरणा करण्यात येऊन चलनाचे प्रतीसह व कामाचे तपशिलासह विमा संचालनालयाकडे अहवाल सादर करण्यात यावा.

02) दर पृथ:करणापत्रकानुसार डांबराचे बाबींमध्ये लीड चार्जेस 425 कि.मी. घेण्यात आलेले आहे, म्हणजेच सदरचे दर हे मुंबई रिफायनरीचे घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्रदान करण्यात आलेले बाब क्र.9 मध्ये लिड चार्जेस रु.3.35 + Heating Unloading Charges रु.0.23 असे घेण्यात आलेले आहे. याबाबत वरील शासन निर्णय दिनांक 08/10/2007 नुसार कंत्राटदाराने डांबर खरेदीची देयके जोडलेली नाहीत, त्यामुळे सदरचे दर देय ठरत नाहीत. तसेच या बाबीसाठी डांबराचे प्रत्यक्ष वापराचे वेळेचे दर विचारात घेण्यात आलेले नाहीत. या कामासाठी वापरण्यात आलेली सन 2015-16 ची जिल्हा दरसूची लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नसल्याने दरपृथ:करणबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही, सन 2014-15 व 2016-17 च्या जिल्हा दरसूचीमधील तरतुदीनुसार कमी दर असल्यास त्यानुसार वसुली करणे आवश्यक आहे. त्यामुळे देण्यात आलेले लिड चार्जेस तसेच अंदाजपत्रक तयार करतेवेळी शासकीय रिफायनरीचे दर कमी झालेले असल्यास दरसुचीतील दर व अंदाजपत्रकाचे वेळेचे दर यातील फरक वसुलपात्र ठरतात. तरी याबाबत योग्य ती परिगणना करण्यात येऊन संबंधितांकडून रकमा वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात याव्यात.

03) अंदाजपत्रकामध्ये गौण खनिजाची परिगणना करण्यात आलेली आहे, तथापी प्रथम देयकामध्ये गौण खनिजाची परिगणना करण्यात आलेली नाही. तसेच गौण खनिजाची स्वामित्वधनाची रक्कम संबंधित कंत्राटदार यांनी शासनाकडे

भरणा करुन त्याबाबतचे परवाने संचिकेमध्ये जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे गौण खनिज स्वामित्वधनाची रक्कम रु.61045/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन खाती भरणा करण्यात यावी व तसा अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे लेखी स्वरुपात सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	तपशिल	परिमाण
2	Supplying Hard Murum	162.45
3	Supplyihng 40 mm. Metal	201.60
4	Supplying Soft Murum	67.85
	एकूण	431.9
	गौण खनिज स्वामित्वधन दर	141.34
	गौण खनिज स्वामित्वधन रक्कम	61045

04) कामामधील बाब क्र.5 व 6 नुसार हार्ड मुरुम, सॉफ्ट मुरुम व खडी पसरविण्याचे काम करण्यात आलेले असून बाब क्र.7 व 8 नुसार दबाईसाठी स्वतंत्र दर देण्यात आलेले आहेत. स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिणामामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रु.1225/- जादा प्रदान झालेले असून सदर रक्कम जबाबदारी निश्चित करण्यात येऊन वसुल करण्यात यावी व शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

बाब क्र.	तपशिल	मोजमापा नुसार परिणाम	10% दबाईकरिता कमी करणे आवश्यक असलेले परिणाम	दर	वसुलपात्र रक्कम
5	Spreading of 40 mm. Metal	201.60	20.16	36.75	740.88
6	Spreading of H.M./S.M.	230.30	23.03	21.00	483.63
	एकूण				1224.51

05) कामामध्ये खोदकामामधून खालीलप्रमाणे मटेरियल काढण्यात आलेले आहे. स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशनमधील Bd.A.1.2 नुसार खोदकामातून निघालेले साहित्यामधून उपयोगी व निरुपयोगी साहित्य वेगळे काढण्यात येऊन उपयोगी साहित्य कामाचे जागेपासून 50 मीटर अंतराचे आंत स्टॅक करण्यात यावा व कामामध्ये भरावासाठी वापरण्यात यावा अशी तरतुद आहे. तथापी बाब क्र.1 नुसार खोदकामातून काढण्यात आलेले 63.72 घमी. साहित्य हे

कामामध्ये वापरण्यात आलेले असल्याबाबत कुठलेही अभिलेखे ठेवण्यात आलेले नाही. याउलट मुरुम व खडीकरणासाठी इतर ठिकाणाहून साहित्य आणण्यात आलेले आहे व त्यामुळे अशा कामासाठी जादा खर्च झालेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. सदरचे साहित्य कंत्राटदाराचे नेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे गौण खनिज स्वामित्वधन दराने म्हणजे 63.72 x 141.34 = 9006/- इतकी रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व त्याप्रमाणे चलनाच्या प्रतीसह मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे अहवाल सादर करण्यात यावा.

06) Hard Murum, Soft Murum, Rubble, Bitumen यांची कोणतीही टेस्ट घेण्यात आलेली असल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही. संबंधित अभियंता यांनी टिपणी दिनांक 03/05/2017 अन्वये मक्तेदार यांनी सदरचे कामी वापरलेल्या मटेरियलची चाचणी करण्यात येऊन चाचणी अहवाल सोबत सादर केलेले आहे असे नमुद केलेले आहे. तथापी अशा प्रकारचे कोणतेही चाचणी अहवाल संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे कामावर वापरण्यात आलेले साहित्य हे योग्य दर्जाचे होते किंवा नाही याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी झाली नाही. तसेच चाचणी अहवाल संचिकेमध्ये नसतांना संबंधित अभियंता यांनी वापरलेल्या मटेरियलची चाचणी करण्यात येऊन चाचणी अहवाल सोबत सादर केलेले आहे असे टिपणीमध्ये नमूद करणे म्हणजे वरिष्ठांची दिशाभूल करणेची बाब समोर येत आहे.

07) संचिकेमधील टिपणी दिनांक 23/01/2020 अन्वये तसेच नमुना 132 (नियम 176) नुसार काम पूर्णत्वाचा दाखला जोडण्यात आला असून त्यामध्ये काम पूर्ण झाल्याचा दिनांक 24/04/2017 असा नमुद करण्यात आलेला आहे. सदर टिपणीमध्ये व अहवालामध्ये शहरात अमृत योजनेच्या कामामुळे मक्तेदारास उर्वरित काम करणे शक्य झालेले नाही व कामाची मुदत देखील संपलेली आहे, त्यामुळे या कामाचे दुसरे व अंतिम देयक निरंक तयार करण्यात आले आहे व या कामी अंदाजित रकमेपेक्षा रु.491928/- मात्र रक्कम बचत झाली आहे असे नमुद करण्यात आलेले आहे, बचत/वाढ विवरणपत्रामध्ये कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत, फक्त बाबनिहाय saving or excess असे नमूद करण्यात आलेले आहे. काम थांबविणेबाबतचा कुठलाही पत्रव्यवहार संचिकामध्ये जोडण्यात आलेला नसून दिनांक 23/01/2020 रोजी म्हणजे जवळ-जवळ तीन वर्षांचे कालावधीनंतर टिपणी सादर करण्यात येऊन निरंक देयक सादर करण्यात आलेले आहे. प्रथम देयकातील शेवटचे मोजमाप दिनांक 24/04/2017 रोजी घेण्यात आले व त्यानुसार देयकाची परिगणना करण्यात येऊन दिनांक 03/08/2017 रोजी देयक अदा करण्यात आले. कामाची मुदत दिनांक 21/08/2017 पर्यंत होती, प्रथम देयकातील मोजमापे दिनांक 10/03/2017 ते दिनांक 24/4/2017 दरम्यान घेण्यात आल्यानंतर पुढील काम करणेत आलेले नाही, म्हणजेच या कालावधीमध्ये सदर ठिकाणी अमृत योजनेचे काम हाती घेण्यात येणार असल्याचे निश्चित झालेले असल्यास काम सुरु करणेची आवश्यकता नव्हती, व त्यामुळे सदरच्या कामावर झालेला खर्च निष्फळ ठरला आहे असे लेखापरीक्षणाचे मत आहे. त्याचप्रमाणे सदर काम अपूर्णावस्थेत सोडण्यात आले तसेच या ठिकाणी अमृत योजनेचे काम करण्यात येणार असल्याने खोदकाम करण्यात येण्याची शक्यता असल्याने कामावर झालेला संपूर्ण खर्च वाया गेलेला आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.31 दिनांक 22/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	विमा	4919
06	गौण खनिज स्वामित्वधन	61045
07	दबाई	1225
08	खोदकामातील साहित्य	9006
	एकूण वसुलपात्र रक्कम	76195

FDSDNBM7201 (Ref No : 17, Hmm No : 31)

41 हरिविठ्ठल नगर रेल्वे पुलाजवळ सार्वजनिक शौचालय बांधणे कामातील अनियमितता

योजना : स्थानिक विकास कार्यक्रम आमदार निधी (मा.आ.श्री.सुरेश दामू भोळे) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 843120.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	स्थानिक विकास कार्यक्रम आमदार निधी (मा.आ.श्री.सुरेश दामू भोळे)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.1602, दिनांक 13/08/2015 रु.14.18 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता तां.मा.क्र.184, दि.07/07/2015 रु.1418138/-
कामाची अंदाजित किंमत	रु. 1418138/-
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा पत्र क्र.99 दिनांक 20/1/2016

कंत्राटदाराचे नांव	बीएचआर कंस्ट्रक्शन्स, जळगांव (-2.11% दराने)
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 19/07/2016
दोष निवारण कालावधी	6 महिने
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 06/02/2017
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजि. टेक्नॉ. बांभोरी जळगांव पत्र क्र.61/119 दि. नमूद नाही
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	दुसरे व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	26, दि.14/07/2016	85, दि.27/02/2017	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	49 पृ.क्र.125 ते 132	49, पृ.क्र.173 ते 191	
कामाची एकूण किंमत	544459	794316	1338775
मंजूर निविदा दर (-2.11%)	-11488	-16760	-28248
देय रक्कम	532971	777556	1310527
वजाती -			
1% विमा	5330	7775	13105
1% कामगार उपकर	5330	7775	13105
10% सुरक्षा रक्कम	53297	77755	131052
2% जीएसटी/व्हॅट	10659	15551	26210
2.33% आयकर	12258	17884	30142
दंड	0	7775	7775

एकूण वजाती	86874	134515	221389
निव्वळ देय रक्कम	446097	643041	1089138

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) मंजूर दरानुसार कामाची किंमत रु.1388215/- इतकी येते, व त्यानुसार करारनामा रु.900/- चे मुद्रांकावर करणे आवश्यक असतांना रु.600/- चे मुद्रांकावर करण्यात आलेला आहे, त्यामुळे रु.300/- वसुल करण्यात येऊन चलनाने योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन खाती भरणा करण्यात यावी.

02) वित्त विभाग शासन निर्णय क्र.विमास-1098/प्र.क्र.28/शासन हमी दिनांक 19/8/1998, नगरविकास विभाग शासन पत्र क्र.जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक 3/11/2003 तसेच शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र.2314 दिनांक 31/3/2015 नुसार कंत्राटदाराने कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविल्याबाबतचा पुरावा काम सुरु करणेपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. तथापी अशा प्रकारे कार्यवाही न करता प्रत्येक देयकामधून देयक रकमेवर विमा कपात करण्यात आलेला आहे, त्यामुळे त्यामुळे कामगारांचा विमा उतरविण्याचा उद्देश सफल होत नाही. तसेच कपात करण्यात आलेली विमा रक्कम शासकीय विमा निधीकडे भरणा करण्यात येऊन त्याबाबतचा चलनासह अहवाल विमा संचालनालयाकडे सादर करणेबाबतची कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणास अभिलेखे तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच सदर अटीनुसार कंत्राटी कामाची रक्कम रु.1418138/- वर 2.11% कमी करुन रु.1388215/- च्या 1% नुसार रु.13882/- कपात करणे आवश्यक असतांना दोन्ही देयकांमधून रक्कम रु.5330 व 7772 अशी एकूण रु.13105/- इतकी रक्कम कपात करण्यात आलेली आहे. त्यामुळे रु.777/- इतकी रक्कम कमी कपात झालेली आहे. तरी सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन शासकीय विमा निधीकडे चलनाने भरणा करण्यात येऊन चलनाचे प्रतीसह व कामाचे तपशिलासह विमा संचालनालयाकडे अहवाल सादर करण्यात यावा.

03) करारनामा अट क्र.20 नुसार कामाकरिता लागणारी खडी, रेती, मुरुम, डबर इ. गौण खनिज मटेरियलची रॉयल्टी, लागू असलेला जकात कर व इतर कर मी स्वत: भरेल व तसे सर्टीफिकेट जळगांव महानगरपालिकेस सादर करेल, अन्यथा नियमानुसार रॉयल्टी धावत्या देयकातून कपात करण्याचा अधिकार जळगांव महानगरपालिकेस राहील. तथापी कंत्राटदाराने गौण खनिजांचे परवाने संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही तसेच दोन्ही देयकांमधून गौण खनिज स्वामित्वधनाची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. प्रथम धावते देयक अदा करण्याच्या टिपणीमध्ये मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी रॉयल्टी कपात करण्याच्या अधीन राहून पहिले धावते देयक मंजूरीस हरकत नसावी असा शेरा नमुद केलेला आहे, तथापी प्रथम व अंतिम देयकांमध्ये स्वामित्वधनाची कपात करण्यात आलेली नाही. तरी खालीलप्रमाणे स्वामित्वधनाची रक्कम रु.13987/- संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन शासन खाती चलनाने जमा करण्यात येऊन त्यासंबंधीचा अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सविस्तर तपशिल व चलनाच्या प्रतीसह सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	देयकानुसार परिमाण	फॅक्टर	स्वामित्वधनाचे परिमाण
2	PCC 1:4:8	16.984	0.45	7.64
3	PCC 1:2:4	8.594	0.45	3.87
7	Beam Lintel 1:3	4.981	0.025	0.13
8	Slab 1:3	22.46	0.025	0.56
10	20 mm Plaster 1:5	410.63	0.025	10.27
11	6 mm plaster 1:4	38.88	0.0076	0.30
4	BB Maso. 1:6	46.06	0.32	14.74
6	BB Maso. 1:4	162.75	0.32	52.08
12	12 mm plaster 1:4	585.65	0.016	9.37
	एकूण परिमाण			98.96
	स्वामित्व धन दर			141.34
	स्वामित्व धन रक्कम			13987

04) अंदाजपत्रकासोबत मोजमाप पत्रक तयार करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये खालीलप्रमाणे बाबनिहाय मापे परिगणीत करतांना काही बाबींकरिता मापे कपात करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कपात करण्यात आलेली नाही, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

बाब क्र.	तपशिल	कपात करणे आवश्यक असलेल्या बाबी
6	Half Brick thick wall	बाब क्र.15 नुसार जाळी बसविलेल्या आहे, त्यांची मापे कमी केलेली नाही.
14	Providing neeru finishing to all position except ceiling	बाब क्र.15 नुसार जाळी व बाब क्र.16 नुसार दरवाजांची मापे कमी केलेली नाहीत.
15	Providing fixing precast RCC Jali	दर्शक नकाशानुसार 18 युनिटची (9-9 प्रमाणे) एकच भिंत दिसून येते. अशा 18 युनिटमध्ये जाळी कोणत्या बाजूला बसविण्यात

		आली याबाबत स्पष्टता होत नाही.
18	Providing fixing white glazed tiles flooring	प्रत्येक युनिटमध्ये तळाला पांढऱ्या टाईल्स बसवितांना WC Pan ची मापे कमी केलेली नाहीत.

वरील बाबींच्या वजाती केलेल्या नसल्यामुळे अंदाजपत्रकामध्ये अनावश्यकरित्या वाढ झालेली असल्याचे दिसून येते. त्यामुळे शासनाचा निधीही तेवढ्या कालावधीकरिता अडकुन पडलेला आहे. सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नसल्यामुळे मोजमाप पुस्तिकांमध्ये अशा प्रकारे वजाती करण्यात आलेली आहे किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. प्रत्यक्ष काम केल्यानंतर मोजमापे घेतेवेळी अशा प्रकारे मापे कमी करण्यात आलेली नसल्यास कंत्राटदारास जादा प्रदान झालेली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी याबाबत पडताळणी करण्यात येऊन व परिगणना करण्यात येऊन वसुलीची कार्यवाही करण्यात यावी व योग्य त्या पुराव्यांसह/कागदपत्रांसह अनुपालन सादर करण्यात यावे.

05) अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही, त्यामुळे देण्यात आलेल्या दरांबाबत पडताळणी करता येत नाही. जिल्हा दरसुचीमधील सुचनांनुसार महापालिका हद्दीकरिता 5% वाढीव दर देणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे. त्यानुसार दरसुचीमधील दर अधिक वाढीव दर तसेच अंदाजपत्रकामध्ये देण्यात आलेले दर यांबाबत तुलना करण्यात आली असता जादा दराने दर देण्यात आलेले असून त्याबाबतचे विवरण खालीलप्रमाणे आहे. त्यानुसार संबंधित कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे रक्कम रु.50500/- वसुलपात्र ठरतात.

Item No.	Item	DSR Sr. No.	DSR Rate	Add 5% Mun. Corpn. Area	Total Rate	Rate as per Estimate	Difference	Qty. excuted	Recovery Amount
2	PCC 1:4:8	27	2373.00	118.65	2491.65	2738.89	247.24	16.984	4199.12
3	PCC 1:2:4	25	3613.00	180.65	3793.65	4056.39	262.74	8.594	2257.99
4	BB in Foundation	87	3765.00	188.25	3953.25	4039.56	86.31	46.060	3975.44
5	BB Super structure	91	3817.00	190.85	4007.85	4084.81	76.96	25.700	1977.87
6	Half Brick Masonary	97	663.00	33.15	696.15	707.73	11.58	162.750	1884.65
7	RCC Beam Lintel	46	5874.00	293.70	6167.70	6458.70	291.00	4.981	1449.47
8	RCC Slab	51	6019.00	300.95	6319.95	6612.76	292.81	22.460	6576.51

9	Steel	71	59388.00	2969.40	62357.40	63099.75	742.35	1.732	1285.75
10	20 mm thk plaster	136	167.00	8.35	175.35	235.99	60.64	410.630	24900.60
11	6 m,m thk plaster	128	73.00	3.65	76.65	77.89	1.24	38.880	48.21
12	12 mm thk plaster	133	111.00	5.55	116.55	118.84	2.29	585.650	1341.14
13	Neeru finish to ceilling	130	33.00	1.65	34.65	34.90	0.25	272.160	68.04
14	RCC Jali	140	24.00	1.20	25.20	25.38	0.18	9.720	1.75
15	RCC Door Frame	72	546.00	27.30	573.30	577.39	4.09	36.000	147.24
20	a) 15 mm dia. Pipe	455	163.00	8.15	171.15	172.37	1.22	40.000	48.80
	b) 20 mm dia. Pipe	456	182.00	9.10	191.10	192.47	1.37	40.000	54.80
	c) 25 mm dia. Pipe	457	201.00	10.05	211.05	212.55	1.50	25.000	37.50
	d) 40 mm dia. Pipe	459	303.00	15.15	318.15	320.42	2.27	12.000	27.24
21	a) 75 mm. dia SWR Pipe	555	164.00	8.20	172.20	173.43	1.23	54.000	66.42
	b) 110mm dia. SWR Pipe	556	203.00	10.15	213.15	214.67	1.52	36.000	54.72
	c) 160 mm. dia. SWR Pipe	557	443.00	22.15	465.15	468.47	3.32	6.000	19.92
25	White Wash	259	4.00	0.20	4.20	4.23	0.03	38.880	1.17
26	Oil bound distemper	268	26.00	1.30	27.30	27.50	0.20	272.160	54.43
30	W Bed Valve	486	452.00	22.60	474.60	479.99	5.39	4.000	21.56
	Total								50500.34

अंदाजपत्रकामध्ये बाब क्र.16,17 व 29 मध्ये बाजार भाव विचारात घेण्यात आलेले आहे, बाजारभाव विचारात

घेतांना दरपत्रके मागवून त्याप्रमाणे दर विचारात घेणे आवश्यक होते, तथापी अशा प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली नसल्यामुळे बाजारभावांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

बाब क्र.18, 19, 22, 23 बाबत दरसूचीमध्ये दर आढळून आले नाही. अंदाजपत्रक तयार करतांना बाब तपशिल नमुद करतांना त्याखाली दरसूचीमधील बाब क्रमांक नमुद करण्यात आलेले नाही, त्यामुळे याबाबत तपासणी करता आली नाही.

06) काही बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात बचत तर काही बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ दिसून येते, त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. त्यामुळे नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

बाब क्र.	तपशिल	अंदाजपत्रकीय किंमत	प्रत्यक्ष कामानुसार किंमत	बचत (+) / वाढ (-)
4	BB Masonary	282795	185602	97193
5	BB Super structure	89090	104980	-15890
6	Half Brick Wall	82047	115183	-33136
7	Beam Lintel	25576	32170	-6594
8	Slab	131131	148523	-17392
9	M.S.Steel	117366	109289	8077
12	12 mm Plaster	77297	69699	7598
31	Electric Fitting	11788	0	11788
32	Tube Light	16940	0	16940
33	Electric Meter	2000	0	2000

07) तुलनात्मक विवरणपत्रामध्ये रु.77689/- इतकी बचत झालेली असल्याचे दर्शविण्यात आलेले आहे. अशी बचत दर्शवितांना अंदाजपत्रकीय रकमेच्या रकान्यामध्येही मंजूर निविदा दराची रक्कम कपात करुन दर्शविण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात प्रशासकीय मान्यतेनुसार रु.14,18,138/- निधीमधून कामाचे एकूण प्रदान रु.1310527/- वजा जाता उर्वरित रक्कम रु.107611/- इतकी बचत होते. सदर कामापोटी अनुदान प्राप्त झालेबाबतचे आदेश संचिकेमध्ये जोडण्यात आलेले नाही, तसेच रोखपुस्तकामध्ये सविस्तर नोंदी नसल्यामुळे याबाबत पडताळणी करता आली नाही.

तरी वरीलप्रमाणे बचत रक्कम रु.107611/- अधिक त्यावरील व्याजाची रक्कम संबंधित लेखाशिर्षाखाली शासन खाती भरणा करण्यात यावी व तसे मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियेाजन समिती, जळगांव यांना तपशिल व चलनाच्या प्रतीसह अहवाल सादर करण्यात यावा.

08) कामाची मुदत 6 महिने म्हणजे दिनांक 19/7/2016 पर्यंत होती, तथापी काम पूर्ण दिनांक 6/2/2017 रोजी झालेले आहे. विलंबाबाबत संबंधित कंत्राटदार यांनी कोणतीही मुदतवाढीबाबत अर्ज सादर केलेले नाही, तसेच संबंधित अभियंता किंवा शहर अभियंता यांनी कंत्राटदारास नोटीस बजावलेली नाही. करारनाम्यामध्ये दंडात्मक कार्यवाहीबाबत कुठलीही अट नमुद करण्यात आलेली नाही. करारनामा अट क्र.2 नुसार मुदतीत काम न झाल्यास अशा कामाचे देयक अदायगी करणे महानगरपालिकेस बंधनकारक राहणार नाही, असे असतांना कामाचे अंतिम देयक कंत्राटदारास अदा करण्यात आलेले आहे. त्यामुळे कंत्राटदारास दुसरे व अंतिम देयकानुसार अदा करण्यात आलेले प्रदान रु.777556/- हे महानगरपालिकेनेच करारनाम्यामधील तरतुदींचे पालन न करता नियमबाह्य करण्यात आलेले असून सदरचे प्रदान वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावे.

09) चाचणी अहवाल हे फक्त M-15 CC Cube चे प्राप्त करण्यात आलेले आहे, दरसूचीमधील निर्देशांनुसार विट, टाईल्स, स्टील, पाईप यांच्या चाचण्या घेण्यात आलेल्या दिसून येत नाही, त्यामुळे सदरचे साहित्य हे योग्य दर्जाचे वापरण्यात आलेले असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये खात्री करता आली नाही.

10) सदर कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे देयकामध्ये दर्शविलेले परिमाण, दर व रकमा याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.32 दिनांक 22/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक	300
02	विमा	777
03	गौण खनिज स्वामित्वधन	13987
05	दरांमधील तफावत	50500

08	विलंब जादा प्रदान	777556
	एकूण वसुलपात्र रक्कम	843120

FDSDNBM7201 (Ref No : 41, Hmm No : 32)

42 प्रभाग क्र.8, 9 हौसिंग सोसायटीमधील रस्ते डांबरीकरण

योजना : विशेष निधी **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 84421.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	विशेष निधी
प्रशासकीय मान्यता	मा.विभागीयआयुक्त, नाशिक यांचे आदेश क्र.नपा/2/1/जमनपा/मुसो/2014, दिनांक 06/08/2014 रु.2922196/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.324, दिनांक 04/03/2014 रु.2922196/-
कामाची अंदाजित किंमत	रु.2922196/-
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा पत्र क्र.88, दिनांक 08/12/2015
कंत्राटदाराचे नांव	एस.एस.पाटील कंस्ट्रक्शन्स प्रा.लि. पाचोरा (7% जादा दराने रु.3126750/-)
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 19/07/2016
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.26)
कामाची स्थिती	काम पूर्ण
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग बांभोरी यांचेकडील पत्र क्र.67/20, दि.12/2/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	दुसरे व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	14, दि.22/3/2016 रु.1161984 05, दि.12/1/2017 रु.1324662/- एकूण रु.2486646/-	03, दि.4/10/2016 रु.266091/- व 04, दि.5/1/2017 रु.303343/- एकूण रु.569434/- +33605/- (त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण)	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	004, पृ.क्र.105 ते 107	004, पृ.क्र.107 ते 109	
कामाची एकूण किंमत	2323969	532182	2856151
मंजूर निविदा दर (+7%)	162677	37252	199929
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	33605	33605
देय रक्कम	2486646	603039	3089685
वजाती -			
1% विमा	24866	5694	30560
1% कामगार उपकर	24866	5694	30560
10% सुरक्षा रक्कम	248665	56943	305608
2% जीएसटी/व्हॅट	49733	11389	61122
2.33% आयकर	57193	13097	70290
गौण खनिज स्वामित्वधन	11166	0	11166
एकूण वजाती	416489	92817	509306
निव्वळ देय रक्कम	2070157	510222	2580379

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील वृत्त्या निदर्शनास येतात.

01) निविदा उघडतेवेळी म्हणजे माहे एप्रिल 2014 मध्ये एस.एस.पाटील पाटील कंस्ट्रक्शन्स प्रा.लि. पाचोरा यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्राची मुदत दिनांक 18/04/2015 पर्यंत होती. त्यानंतर प्रत्यक्षात कामाचे आदेश दिनांक 08/12/2015 रोजी देण्यात आले. संबंधित मंजूर निविदाकाराचे प्रमाणपत्राचे नुतनीकरण प्राप्त करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे प्राप्त करण्यात आलेले नाही, त्यामुळे कंत्राटदार नोंदणी संपलेली असतांनाही नियमबाह्यपणे सदर कंत्राटदारास कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत.

02) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 466(3) खालील परिशिष्ट-3 खंड 36 मधील तरतुदीनुसार निविदा उघडण्यात आल्यानंतर कोणताही टाळता येण्याजोगा विलंब करता येणार नाही, निविदा उघडल्यानंतर एक आठवड्याच्या आंत त्याची विल्हेवाट लावण्यात येईल, कोणत्याही परिस्थितीत एक महिन्यापेक्षा अधिक कालावधीमध्ये त्याची विल्हेवाट लावण्यात येऊ नये अशी तरतुद आहे. तथापी सदर कामाचे निविदा प्रक्रीयेमध्ये वित्तीय लिफाफा हा दिनांक 04/12/2014 रोजी उघडण्यात आली तथापी कामाचे आदेश हे दिनांक 08/12/2015 रोजी म्हणजे 12 महिन्यांचे विलंबाने कामाचे आदेश पारित करण्यात आलेले आहे. त्यामुळे कामास अत्यंत विलंब झालेला असून शासनाचा निधीही अडकून पडलेला आहे. तसेच त्या भागातील रहिवाशांना योजनेचा लाभ विलंबाने मिळालेला आहे.

03) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.31.27 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.2700/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.2300/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र करण्यात येऊन शासनाचे योग्य लेखाशिर्षाखाली भरणात करण्यात यावी.

04) वित्त विभाग शासन निर्णय क्र.विमास-1098/प्र.क्र.28/शासन हमी दिनांक 19/8/1998, नगरविकास विभाग शासन पत्र क्र.जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक 3/11/2003 तसेच शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र.2314 दिनांक 31/3/2015 नुसार कंत्राटदाराने कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविल्याबाबतचा पुरावा काम सुरु करणेपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. तथापी अशा प्रकारे कार्यवाही न करता प्रत्येक देयकामधून देयक रकमेवर विमा कपात करण्यात आलेला आहे, त्यामुळे त्यामुळे कामगारांचा विमा उतरविण्याचा उद्देश सफल होत नाही. तसेच कपात करण्यात आलेली विमा रक्कम शासकीय विमा निधीकडे भरणा करण्यात येऊन त्याबाबतचा चलनासह अहवाल विमा संचालनालयाकडे सादर करणेबाबतची कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबत अभिलेखे उपलब्ध न झाल्यामुळे लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही. त्याचप्रमाणे मंजूर दरानुसार निविदा कंत्राटाची किंमत रु.3126750/- असून त्यानुसार विमा रु.31268/- इतकी वसुल करणे आवश्यक असतांना प्रत्येक वेळेस देयक रकमेवर एकूण रक्कम रु.30560/- वसुल करण्यात आलेली आहे. त्यामुळे

रु.708/- चा कमी भरणा केलेला आहे. सदर रु.708/- संबंधित कंत्राटदार यांचकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या विमा लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी व तसेच चलन व अहवालासह विमा संचालनालयाकडे अहवाल सादर करण्यात यावा.

05) दर्शक नकाशामध्ये काम करावयाचे रोड लाल रेशा उमटवून दर्शविण्यात आलेले आहे, व एकूण लांबी नमूद करण्यात आलेल्या आहेत. तथापी नकाशामध्ये प्लॉटच्या लांबी व रुंदी नमूद केलेल्या नसल्यामुळे रस्त्याची एकूण लांबीबाबत तपासणी करता आली नाही. तसेच रोड एकमेकांना क्रॉस करतांना त्या ठिकाणची मापे कमी करण्यात आली किंवा कसे याबाबत नकाशामध्ये स्पष्ट उल्लेख केलेले नसल्याने लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. त्यामुळे अंदाजपत्रक अनावश्यकरित्या फुगवण्यात आलेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही व परिणामी शासनाची निधीही अडकून पडतो.

06) काही बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात बचत तर काही बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ दिसून येते, त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही.

बाब क्र.	तपशिल	दर	अंदाजपत्रकानुसार दिलेला दर		प्रत्यक्ष कामानुसार		फरक	
			परिमाण	रक्कम	परिमाण	रक्कम	परिमाण	रक्कम
1	Excavation for roadway	66.15	215.46	14252.67	187.62	12411.06	27.84	1841.62
2	Providing laying 50 mm. thk compated BBM (10% of Item No.3)	166.28	1078.00	179249.84	1318.92	219310.01	-240.92	-40060.18

3	Providing 25 mm. thk open graded premix bituminous carpet	198.31	10773.00	2134239.03	10550.39	2092247.84	222.61	44145.79
4	Providing bituminous liquid seal coat (Type A)	55.18	10773.00	594454.14	9644.47	532181.85	1128.53	62272.29
	Total			2922195.68		2856150.76		68199.51

त्याचप्रमाणे यावरुन असे दिसून येते की, अंदाजपत्रकामध्ये मोठ्या प्रमाणावर तरतुदी करण्यात येऊन अंदाजपत्रक वाढीव किंमतीचे तयार करण्यात आले. तसेच अंदाजपत्रकीय परिमाण व प्रत्यक्ष कामकाजाचे परिमाण यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्याने अंदाजपत्रक तयार करतांना प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण करण्यात आलेले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

अंदाजपत्रकामध्ये बाब क्र.2 Providing laying 50 mm. thk compated BBM मध्ये बाब क्र.1 च्या 10% परिमाण गृहीत धरण्यात आलेले आहे. त्यानुसार 1078 चौ.मी. ऐवजी 1318.92 म्हणजे 240.92 चौ.मी. चे जादा काम करण्यात आलेले आहे.

कारपेटचे काम 10550.39 चौ.मी. केलेले आहे, तथापी त्यावर सिलकोटचे काम 9644.47 चौ.मी.चे करण्यात आलेले आहे. म्हणजेच 905.92 चौ.मी. वर सिलकोटचे काम करण्यात आलेले नाही, त्यामुळे अशा 905.92 चौ.मी. रस्त्याच्या कामाचा टिकाऊपणा राहणार नाही व परिणामी या कामाचे भविष्यात लवकरच नुकसान होण्याची शक्यता राहील.

07) कामामध्ये खोदकामामधून मटेरियल काढण्यात आलेले आहे. स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशनमधील Bd.A.1.2 नुसार खोदकामातून निघालेले साहित्यामधून उपयोगी व निरुपयोगी साहित्य वेगळे काढण्यात येऊन उपयोगी साहित्य कामाचे जागेपासून 50 मीटर अंतराचे आंत स्टॅक करण्यात यावा व कामामध्ये भरावासाठी वापरण्यात यावा अशी तरतुद आहे. तथापी बाब क्र.1 Excavation for roadway नुसार 187.62 घमी. इतके साहित्य काढण्यात आलेले असून सदर साहित्याच्या वापराबाबत संचिकेमध्ये उल्लेख दिसून येत नाही. सदरचे साहित्य कंत्राटदाराचे नेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे गौण खनिज स्वामित्वधन दराने म्हणजे 187.62 x 141.34 = 26518/- इतकी रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात संबंधित गौण खनिज स्वामित्वधनाचे लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व त्याप्रमाणे चलनाच्या प्रतीसह मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे अहवाल सादर करण्यात यावा.

08) अंदाजपत्रक तयार करतांना 40 mm पेक्षा जादा तसेच 40 mm पेक्षा कमी मेटल करिता लिड चार्जेस घेण्यात आलेले आहे, तथापी याबाबत खदान दर्शक नकाशा जोडण्यात आलेले नाहीत त्यामुळे याबाबत पडताळणी होत नाही. तसेच दर पृथ:करणापत्रकानुसार डांबराचे बाबींमध्ये लीड चार्जेस घेण्यात आलेले आहे, म्हणजेच सदरचे दर हे मुंबई

रिफायनरीचे घेण्यात आलेले असल्याचे निदर्शनास येते. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2005/प्र.क्र.-187/रा.म.-2, दिनांक 08/10/2007 नुसार कंत्राटदाराने डांबर खरेदीची देयके जोडलेली नाहीत, त्यामुळे सदरचे दर देय ठरत नाहीत. तसेच या बाबीसाठी डांबराचे प्रत्यक्ष वापराचे वेळेचे दर विचारात घेण्यात आलेले नाहीत. या कामासाठी वापरण्यात आलेली सन 2012-13 ची जिल्हा दरसूची लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नसल्याने दरपृथ:करणबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही, त्यामुळे देण्यात आलेले लिड चार्जेस तसेच अंदाजपत्रक तयार करतेवेळी शासकीय रिफायनरीचे दर कमी झालेले असल्यास दरसुचीतील दर व अंदाजपत्रकाचे वेळेचे दर यातील फरक वसुलपात्र ठरतात. त्याचप्रमाणे डांबराचे लिड चार्जेस घेतांना अंतर नमूद करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे लिड चार्जेस लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. त्यामुळे देय दर व फरकानुसार खालीलप्रमाणे रु.56795/- इतकी रक्कम वसुलपात्र ठरते. तसेच दरसूचीमधील दर व प्रत्यक्ष खरेदीनुसार डांबराचे दरांमधील फरकानुसार दरपृथ:करण तयार करुन फरकाची रक्कम परिगणीत करण्यात येऊन वसुल करण्यात यावी.

बाब क्र.	मुळ दर	5% महानगरपालिका क्षेत्र दर	0.5% मुल्यावर्धीत कर	0.5% चाचणी अहवाल	एकूण
1	63.00	3.15	0	0	66.15
2	140.00	7.00	0.70	0.70	148.4
3	177.00	8.85	0.89	0.89	187.63
4	49.00	2.45	0.25	0.25	51.95

देय दरानुसार वसुलपात्र रक्कम

बाब क्र.	अंदाजपत्रकानुसार दिलेला दर	देय दर	दरामधील फरक	परिमाण	वसुलपात्र रक्कम
1	66.15	66.15	0	9644.47	0
2	166.28	148.4	17.88	187.62	3354.65
3	198.31	187.63	10.68	1318.92	14086.07
4	55.68	51.95	3.73	10550.39	39353.95
				Total	**56794.67**

09) कामाची अंदाजित किंमत रु.2922196/- अशी होती, शासन निर्णय क्र.जीईएन-2008/प्र.क्र.08/नवि-16, दिनांक 29/08/2008 अन्वये विशेष निधीअंतर्गत प्रस्तावित कामांची 50% रक्कम महानगरपालिकेने भरणा करणे आवश्यक आहे, त्यानुसार स्थायी समिती सभा क्र.36 दिनांक 13/3/2015 आयत्या वेळेचे विषय क्र.01 ठराव क्र.229 अन्वये

कामाची किंमत रु.2922196/- अधिक जादा दरामुळे एकूण रु.3126750/- खर्चापैकी 50 टक्के निधी रु.1461098/- शासनाकडून प्राप्त होणार असल्याने उर्वरित रु.1665652/- मनपा निधीमधून करण्यात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 7 संविदा अंतर्गत कलम 73(क) नुसार मान्यता प्रदान करण्यात आली. कामाची किंमत रु.2922196/- होती व त्यानुसार 50% रक्कम रु.1461098/- इतकी शासनाकडून प्राप्त झाली, तथापी प्रत्यक्ष काम हे रु.2856151/- इतक्या किंमतीत पूर्ण करण्यात आले, त्यानुसार शासन हिस्सा व मनपा हिस्सा 50-50 टक्के म्हणजे रु.1428076/- प्रत्येकी प्रमाणे व अधिक जादा दराची निविदा स्विकारल्यामुळे होणारा खर्च मनपा निधीमधून करणे अपेक्षित होते. तथापी शासन अनुदानाची जमा रक्कम रु.1461098/- वजा रु.1428076/- शिल्लक रु.33022/- शासनास परत न करता जादा दराची निविदा स्विकारणे व त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण यामुळे होणाऱ्या जादा खर्चाच्या बाबींमध्ये सदर रक्कम वापरण्यात आलेली असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. त्यामुळे शासन निधीचा वापर करतांना शासन निर्देशांचे पालन करण्यात आलेले नसल्याचे दिसून येते. तरी शासन अनुदानातून खर्च झालेली रु.33022/- इतकी रक्कम शासन खाती भरणा करण्यात यावी व त्याप्रमाणे सविस्तर अहवाल मा.विभागीय आयुक्त, नाशिक तसेच मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

10) सदर कामाची मोजमाप पुस्तिका क्र.004 लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविलेले परिमाण, दर व रकमा याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.45 दिनांक 28/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
03	मुद्रांक	400
04	विमा	708
07	खोदकाम साहित्य	26518
11	डांबर वहनावळ	56795
	एकूण वसुलपात्र रक्कम	84421

FDSDNBM7201 (Ref No : 42, Hmm No : 45)

43 जळगांव शहरातील प्र.क.36 मेहरुण तलाव पश्चिम बाजूस मल्हारा कम्युनिकेशन ते स.नं.408+409 समोरील रोड क्रॉसींग कल्व्हर्ट पर्यंत डबर पिचींग, रेलींग फ्लॉअर बेड, जॉगींग ट्रॅक तयार करणे

योजना : जिल्हा वार्षिक योजना (नाविन्यपूर्ण योजना) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 413130.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	विशेष निधी
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.458, दिनांक 9/3/2017 रु.70 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता तां.मा.क्र.478 दि.16/03/2017 रु.70,00,000/-
कामाची अंदाजित किंमत	रु.7000000/-
निधी उपलब्धता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियेाजन समिती, जळगांव पत्र क्र.2272, दि.16/11/2017 (पत्र संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही) रु.50 लक्ष, खात्यामध्ये जमा दि.4/12/2017
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा पत्र क्र.30 दिनांक 30/05/2017
कंत्राटदाराचे नांव	पराग बिल्डकॉन एलएलपी, जळगांव (-5.99% दराने)
परफॉर्मन्स सिक्युरिटी	जमा पावती क्र.41313 दि.30/5/2017 धनाकर्ष क्र.116031, दि.15/04/2017 रक्कम रु.70000/-
कामाचा कालावधी	9 महिने i.e. upto 28/2/2018
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम अपूर्ण
चाचणी अहवाल	दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (साबां) क्षेत्रिय प्रयोगशाळा जळगांव

	1) पत्र क्र.367, दि.14/06/2017 M-15- 3 tests. Date of cast 14/6/2017 2) पत्र क्र.841 दि.26/10/2017
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	दुसरे व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	01, दि.12/12/2017	02, दि.18/01/2018	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	200, पृ.क्र.33 ते 35	200, पृ.क्र.48 ते 52	
कामाची एकूण किंमत	1271988	1896047	3168035
मंजूर निविदा दर (-5.99%)	-76192	-113573	-189765
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	0	0
देय रक्कम	1195796	1782474	2978270
वजाती -			
1% विमा	0	0	0
1% कामगार उपकर	11958	0	11958
10% सुरक्षा रक्कम	119580	178247	297827
2% जीएसटी/व्हॅट	23916	0	23916
2.33% आयकर	27503	39755	67258
गौण खनिज स्वामित्वधन	0	0	0
एकूण वजाती	182957	218002	400959
निव्वळ देय रक्कम	1012839	1564472	2577311

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) वित्त विभाग शासन निर्णय क्र.विमास-1098/प्र.क्र.28/शासन हमी दिनांक 19/8/1998, नगरविकास विभाग शासन पत्र क्र.जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक 3/11/2003 तसेच शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र.2314 दिनांक 31/3/2015 नुसार कंत्राटदाराने कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविल्याबाबतचा पुरावा काम सुरु करणेपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार कंत्राटदाराने दिनांक 04/09/2017 अन्वये विमापत्र सादर केलेले आहे. सदर विमापत्रावर कामाची मुदत ही कामाचे आदेशानुसार दिनांक 27/02/2018 पर्यंत दर्शविण्यात आलेली आहे. तथापी त्यानंतर मुदतवाढ मंजूर करण्यात येऊन वाढीव मुदतीत म्हणजे दिनांक 28/04/2018 पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानुसार मुदतवाढीच्या कालावधीचे विमा पत्र प्राप्त करणे आवश्यक होते, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तरी विमा संचालनालयाशी संपर्क साधण्यात येऊन वाढीव मुदतीच्या विम्याची रक्कम परिगणीत करण्यात येऊन संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात यावी व विमा संचालनालयाकडे भरणा करण्यात यावी.

02) अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही, त्यामुळे दरसूचीमधील दर व अंदाजपत्रकामधील दर याबाबत पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामधील दर लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही, परिणामी खालीलप्रमाणे जादा प्रदान झाल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. तरी जादा प्रदान रक्कम रु.35756/- वसुलीची कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे बाब क्र.3 Rubble pitching चे दर दरसूचीमध्ये आढळून आले नाही तसेच अंदाजपत्रकामध्ये संदर्भ नमूद करण्यात आलेला नाही त्याचप्रमाणे बाब क्र.8 Supplying Red Soil चे दर हे बाजारभावानुसार घेण्यात आलेले असल्याबाबत गोषवाऱ्यामध्ये नमुद करण्यात आलेले आहे, तथापी बाजारभाव नमुद करतांना याबाबत दरपत्रके मागवून त्याप्रमाणे दर निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही, त्यामुळे सदर बाबीचे नमुद दराबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

Item No.	Item	DSR Sr. No.	DSR Rate	5% Mun. Corpn. Area	Lead	Total DSR Rate	Rate as per Estimate	Diff.	Qty. excuted	Recovery Amoount
1	Excavation for foundation	2	34.00	1.70	0.00	35.70	37.80	2.10	117.950	247.69
2	Earthwork for embankment	1530	74.00	3.70	128.93	206.63	206.63	0.00	1514.500	0.00
3	Rubble pitching in slope	0	0.00	0.00	0.00	0.00	1066.48	1066.48		0.00
4	C.C. 1:4:8 in foundation	1428	3305.00	165.25	0.00	3470.25	3670.01	199.76	51.240	10235.70
5	Rubble soling	24	390.00	19.50	0.00	409.50	685.25	275.75	91.650	25272.49

6	M-15 for elements	1459	4698.00	234.90	0.00	4932.90	5132.66	199.76	0.000	0.00
7	Supplying in HM/Kankar	1551	123.00	6.15	0.00	129.15	388.75	259.60	0.000	0.00
8	Supplying Red soil	0	0.00	0.00	0.00	0.00	889.39	889.39	0.000	0.00
9	Spreading gravel/ sand/ SM/HM over rubble soling	1556	20.00	1.00	0.00	21.00	21.00	0.00	0.000	0.00
10	Compacting sub base/blanketting of HM	1572	7.00	0.35	0.00	7.35	7.35	0.00	0.000	0.00
11	P L Paving block of 80 mm. thkh	347	820.00	41.00	0.00	861.00	861.00	0.00	0.000	0.00
12	Providing railing of mild steel	1404	2838.00	141.90	0.00	2979.90	2979.90	0.00	0.000	0.00
13	Providing applying two coats of polymer painth	394	210.00	10.50	0.00	220.50	229.50	9.00	0.000	0.00
14	Royalty	-	141.34	0.00	0.00	141.34	141.34	0.00	914.860	0.00
15	Providing TMT steel	124	49834.00	2491.70	0.00	52325.70	52325.70	0.00	7.320	0.00
16	Material Testing									0.00
	a) Comp. Strength	22	550.00	0.00	0.00	550.00	550.00	0.00	1.000	0.00
	b) liquit limit	34	900.00	0.00	0.00	900.00	900.00	0.00	0.000	0.00
	c) Crushing strength	31	1600.00	0.00	0.00	1600.00	1600.00	0.00	1.000	0.00
	d) Steel bar testing..	85	1000.00	0.00	0.00	1000.00	1000.00	0.00	1.000	0.00

17	Sign Bord	0	0.00	0.00	0.00	0.00	3201.00	3201.00	0.000	0.00
	Total									**35755.88**

03) बाब क्र.2 नुसार मातीकाम 1514.50 घमी चे काम करण्यात आलेले आहे. तथापी त्यासाठी लागणारे साहित्य जसे मुरुम कुठून आणणार याबाबत अंदाजपत्रकामध्ये Quary Chart दर्शविण्यात आलेला नाही, तसेच अंदाजपत्रकाचे गोषवारामध्ये वहनावळ (Lead) रु.128.93 इतके दर्शविण्यात आलेले आहे, त्यामुळे सदर रक्कम लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही. तरी खालीलप्रमाणे रक्कम रु.195264/- वसुलपात्र ठरते. सदर रक्कम वसुल करण्यात यावी व संबंधित लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात येऊन मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, नियोजन विभाग, जळगांव यांचेकडे सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	मोजमापा नुसार परिणाम	अंदाजपत्रका नुसार दर	वहनावळ दर	वहनावळ कमी करुन देय दर	देय दरानुसार देय रक्कम	दिलेली रक्कम	वसुलपात्र रक्कम
2	Providing Earthwork for embankment	1514.50	206.63	128.93	77.70	117677	312941	195264

04) स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिणामामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रु.29419/- जादा प्रदान झालेले असून सदर रक्कम वसुल करण्यात यावी व शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

बाब क्र.	तपशिल	मोजमापा नुसार परिणाम	10% दबाईकरिता कमी करणे आवश्यक असलेले परिणाम	देय दर (206.63 वजा 5.99% निविदा दर कमी करुन)	वसुलपात्र रक्कम
2	Providing Earthwork for embankment	1514.50	151.45	194.25	29419

05) संचिकेमध्ये जोडण्यात आलेल्या रेतीच्या वाहतुक पास व डबर चे वाहतुक पास यांची तपासणी वाहतुक पासनुसार तपशिल खालीलप्रमाणे आहे.

रेती -

Sr. No.	Book No.	TP No.	Date	Qty. in Brass	Qty. by Correction	Remarks

1	71	1759	29/05/2017	2	4	
2	72	1829	01/06/2017	2	4	
3	75	1955	03/06/2017	2	4	
4	8	225	30/06/2017	2	4	
5	72	1845	01/06/2017	2	4	
6	8	219	30/06/2017	2	2	
7	8	234	01/07/2017	2	2	
8	8	377	25/07/2017	2	4	
9	8	376	25/07/2017	2	4	
10	9	272	05/07/2017	2	4	
11	9	252	04/07/2017	2	4	
12	15	735	07/08/2017	2	4	रकाना क्र.11 खरेदीदाराचे नावामध्ये खाडाखोड.
13	15	745	08/08/2017	2	4	रकाना क्र.11 खरेदीदाराचे नावामध्ये खाडाखोड.
14	16	764	09/08/2017	2	4	रकाना क्र.11 खरेदीदाराचे नावामध्ये खाडाखोड.
15	52	1598	24/08/2017	2	2	
16	19	907	13/09/2017	2	4	रकाना क्र.11 खरेदीदाराचे नावामध्ये खाडाखोड.
		Total in Brass		32	58	
		Total in Cum		11.31	20.49	

डबर -

Sr. No.	Book No.	TP No.	Date	Qty. in Brass	Qty. by Correction	Remarks
1	4	335	05/07/2017	4	4	

2	4	336	05/07/2017	4	4	
3	4	337	05/07/2017	4	4	
4	4	338	05/07/2017	4	4	
5	4	339	07/07/2017	4	4	
6	4	340	07/07/2017	4	4	
7	4	341	07/07/2017	4	4	
8	4	342	08/07/2017	4	4	
9	4	343	08/07/2017	4	4	
10	4	344	08/07/2017	4	4	
11	4	345	09/07/2017	4	4	
12	4	346	09/07/2017	4	4	
13	4	347	10/07/2017	4	4	
14	4	348	10/07/2017	4	4	
15	4	349	10/07/2017	4	4	
16	4	350	11/07/2017	4	4	
17	4	351	11/07/2017	4	4	
18	4	352	12/07/2017	4	4	
19	4	353	12/07/2017	4	4	
20	4	354	12/07/2017	4	4	
21	4	355	14/07/2017	4	4	
22	4	356	14/07/2017	4	4	
23	4	357	14/07/2017	4	4	
24	4	358	15/07/2017	4	4	
25	4	359	15/07/2017	4	4	
26	4	360	16/07/2017	4	4	

27	4	361	16/07/2017	4	4	
28	4	362	16/07/2017	4	4	
29	4	363	17/07/2017	4	4	
30	4	364	17/07/2017	4	4	
		Total in Brass		120	120	
		Total in Cum		42.40	42.40	

वरीलप्रमाणे रेतीच्या काही पासमध्ये खाडाखोड करुन ठिकाण व खरेदीदाराचे नांवामध्ये बदल करण्यात आलेले असल्याने सदरचे पास लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येणार नाही. याबाबत गौण खनिज मोकळे केल्याबाबत मा.जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडून प्रमाणित करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच देयकानुसार साहित्य वापर व प्रत्यक्ष साहित्य आणल्याचा तपशिल यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे असून तफावतीनुसार गौण खनिज हे अधिकृतरित्या आणलेले नसल्याने याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात येऊन गौण खनिजाच्या तफावतीची रक्कम रु.137203/- वसुल करण्यात येऊन शासन खाती भरणा करण्यात यावी व त्याबाबतचा तपशिल व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	परिमाण	गौण खनिज वापराचा फॅक्टर	गौण खनिजाचे परिमाण	वाहतुक पासनुसार प्रत्यक्ष आणलेले परिमाण	तफावत
3	Rubble Pitching	608.85	1.25	761.06	42.40	833.22
5	Rubble Soling	91.65	1.25	114.56		
4	P.C.C. 1:4:8	51.24	0.45	23.06	11.31	137.51
6	M-15 CC	279.47	0.45	125.76		
	एकूण			1024.44		970.73
	स्वामित्व धन दर					141.34
	एकूण वसुलपात्र स्वामित्वधन रक्कम					137203

त्याचप्रमाणे दुसऱ्या धावत्या देयकाअखेर गौण खनिजाची परिगणना करतांना खालीलप्रमाणे तफावत दिसून येते.

त्यामुळे गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम शासन खाती कमी भरणा करण्यात आलेली आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येऊन सदरची कमी भरणा रक्कम शासन खाती भरणा करण्यात येऊन त्याबाबतचे चलन व सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	परिमाण	गौण खनिज वापराचा फॅक्टर	गौण खनिजाचे परिमाण
3	Rubble Pitching	608.85	1.25	761.06
5	Rubble Soling	91.65	1.25	114.56
4	P.C.C. 1:4:8	51.24	0.45	23.06
6	M-15 CC	279.47	0.45	125.76
	एकूण परिमाण			1024.44
	स्वामित्व धन दर			141.34
	स्वामित्व धन रक्कम			144794
	प्रत्यक्ष परिगणीत रक्कम			129306
	तफावत			15488

06) वस्तु व सेवा कर कायद्यानुसार जीएसटी करप्रणाली दिनांक 01/07/2017 पासून अंमलात आली. शासकीय कार्यकंत्राटामध्ये जीएसटी प्रणाली लागू करणेबात वित्त विभाग शासन निर्णय क्र.जीएसटी-1017/प्र.क्र.155/कराधान-1, दिनांक 11/09/2017 मधील अ.क्र.4 नुसार चालू कामांचे बाबतीत कराच्या भारामध्ये वृद्धी वा घट झाल्यामुळे कंत्राटाच्या किंमतीत वृद्धी वा घट होऊ शकते, त्यामुळे करावयाचा बदल कंत्राटामध्ये उल्लेख केलेल्या अटी व शर्तींवर अवलंबून असेल, कंत्राटाबाबत अटी व शर्ती वेगवेगळया असतील त्यामुळे प्रत्येक विभगाने कंत्राटाची प्रत विधी व न्याय विभागाकडून तपासून बदललेल्या कररचनेमुळे कंत्राटाच्या किंमतीतून कराचा भार कमी झाल्यामुळे वजावट करता येईल किंवा कराचा भार वाढल्यामुळे किंमत वाढवून देता येईल याबाबत अभिप्राय घ्यावेत अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. वरीलप्रमाणे कंत्राटदाराची देयके अदा करण्यापूर्वी सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे दुसरे धावते देयकामधून व्हॅट किंवा जीएसटी-टीडीएस कपात करण्यात आलेला नाही, त्यामुळे कंत्राटदारास जादा प्रदान करण्यात आलेले आहे. तरी शासन निर्णय दिनांक 11/09/2017 नुसार कार्यवाही करण्यात येऊन त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

07) कंत्राटदाराने दिनांक 15/02/2018 अन्वये कामाची सुरुवात दिनांक 09/05/2017 पासून सुरु करण्यात आलेले

असून मध्यंतरी गणेश उत्सव, दुर्गा उत्सव व शासनाने वाळू उचलवर बंदी घातल्यामुळे काम बंद ठेवण्यात आले होते व त्यामुळे मुदतीत काम पूर्ण होऊ शकेल नाही असे कारण नमुद करुन दिनांक 28/02/2018 पासून पुढे तीन महिने मुदत वाढ मागणी केलेली आहे व त्यावर विहित मुदतीमध्ये म्हणजे दिनांक 28/02/2018 पर्यंतची मुदत संपूण्यापूर्वी मुदतवाढीची कार्यवाही न करता दिनांक 07/03/2018 रोजी टिपणी सादर करण्यात येऊन कंत्राटदाराने दिलेली कारणांच्या अनुषंगाने गणेश उत्सव व दुर्गा उत्सव निमित्त विसर्जन कार्यक्रम करण्यात येतो व त्यामुळे जवळपास 30 ते 35 दिवसांच्या कालावधीपर्यंत काम करणे शक्य नव्हते तसेच शासनाने वाळू उचलवर बंदी घातल्यामुळे वाळू मिळत नसल्याने कामास अपेक्षित वेग येऊ शकला नाही असे नमुद केले आहे. वास्तविक गणेश उत्सव व दुर्गा उत्सव विसर्जनाचे कार्यक्रम हे काही कालावधीपर्यंत म्हणजे 3 ते 4 दिवस प्रत्येकी म्हणजे 8 दिवसांच्या कालावधीमध्ये होतात तथापी त्यासाठी संबंधित अभियंता यांनी 30 ते 35 दिवस नमूद करणे हे संयुक्तीक वाटत नाही, त्याचप्रमाणे संचिकेमध्ये लावण्यात आलेल्या रेतीच्या वाहतुक पासनुसार रेती ही यापूर्वीच म्हणजे दिनांक 13/09/2017 पर्यंत आणण्यात आलेली असून त्यानंतरच्या कालावधीमध्ये कोणतीही रेती आणण्यात आलेली दिसून येत नाही त्यामुळे सदरचे कारणही संयुक्तीक वाटत नाही. त्यानंतर मनपा पत्र क्र.1389 दिनांक 9/3/2018 अन्वये कंत्राटदारास 2 महिन्यांची मुदतवाढ मंजूर करण्यात आलेली आहे. यावरुन कंत्राटदाराने मुदतीमध्ये काम केलेले नाही तथापी निव्वळ कंत्राटदारास दंडात्मक कार्यवाही टाळण्याच्या हेतूने मुदतवाढ देणे ही बाब कंत्राटदाराचे हित जोपासण्यात आलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

08) दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (साबां) क्षेत्रिय प्रयोगशाळा जळगांव यांचेकडून सिमेंट काँक्रीटच्या चाचणी अहवाल दिनांक 14/6/2017 व दिनांक 26/10/2017 अन्वये प्राप्त करण्यात आलेला आहे. सदर चाचणी अहवालामध्ये सिमेंट काँक्रीट क्युबच्या कॉम्प्रेहेन्सीव्ह टेस्ट करण्यात आलेल्या आहे. जिल्हा दरसूचीतील सुचनांनुसार सिमेंट काँक्रीट क्युबच्या कॉम्प्रेहेन्सीव्ह टेस्ट ह्या क्युब तयार केल्यानंतर 28 दिवसांनंतर करणे आवश्यक आहे, तथापी वरील अहवालामध्ये क्युब तयार करण्याची तारीख व चाचणीची तारीख यांमध्ये फक्त 1 दिवसाचे अंतर दिसून येते व नमुन्याचे वय हे 21 दिवस दर्शविण्यात आलेले आहे तसेच नमुने चाचणीसाठी सादर करण्यात आल्याचा महानगरपालिकेच्या पत्राचा संदर्भ हा देखील एक दिवस अगोदरचा दिसून येतो. म्हणजेच शासनाचे निर्देशांनुसार विहित कार्यपद्धतीने चाचण्या घेण्यात आलेल्या दिसून येत नाही.

09) सदर कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक 200 लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे दोन धावते देयकामध्ये दर्शविलेले परिमाण, दर व रकमा याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.46 दिनांक 28/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा	तपशिल	वसुलपात्र रकमा

क्र.		
02	दरांमधील तफावत	35756
03	मुरुम वहणावळ	195264
04	दबाई	29419
05	गौण खनिज स्वामित्वधन	152691
	एकूण वसुलपात्र रक्कम	413130

FDSDNBM7201 (Ref No : 43, Hmm No : 46)

44 प्र.क्र.16 खंडेराव नगर रेल्वे पुलाजवळ हरिविठ्ठलनगरस्आशाबाबा नगर जोडणारा रस्त्यावर पुल बांधणे

योजना : स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी) (मा.श्री.सुरेश दामू भोळे) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 59776.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी) (मा.श्री.सुरेश दामू भोळे)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियेाजन समिती, जळगांव आदेश क्र.1602, दिनांक 13/08/2015 रु.15.00 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, मनपा जळगांव ता.मा.मं.120 दि.6/7/2015 रु.1499530/-
कामाची अंदाजित किंमत	रु.1499530/-
निधी उपलब्धता	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.87 दिनांक 8/12/2015

कंत्राटदाराचे नांव	श्री गजानन एंटरप्राईजेस, जळगांव (-7.88% दराने)
परफॉर्मन्स सिक्युरिटी	मनपा पावती क्र.45569 दि.29/10/2015 रक्कम रु.14995/-
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 07/06/2016
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27 नुसार)
कामाची स्थिती	काम पूर्ण
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी, बांभोरी जळगांव 1) पत्र क्र.67/21, दि.23/02/2016 2) पत्र क्र.67/21-1, दि.23/02/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	दुसरे व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	24, दि.01/07/2016	67, दि.25/11/2016	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	84, पृ.क्र.135 ते 163	84, पृ.क्र.165 ते 176	
कामाची एकूण किंमत	1495539	118262	1613801
मंजूर निविदा दर (-7.88%)	-117849	-9319	-127168
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	0	0
देय रक्कम	1377690	108943	1486633
वजाती -			
1% विमा	13777	1089	14866
1% कामगार उपकर	13777	1089	14866
10% सुरक्षा रक्कम	137769	10894	148663

2% जीएसटी/व्हॅट	27554	2179	29733
2.33% आयकर	31687	2506	34193
गौण खनिज स्वामित्वधन	3460	15901	19361
एकूण वजाती	228024	33658	261682
निव्वळ देय रक्कम	1149666	75285	1224951

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.1381367/- इतकी आहे, त्यानुसार रु.900/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.600/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.300/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.300/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन खाती जमा करण्यात यावे.

02) कंत्राटदारास देयकामध्ये भाग-अ नुसार रु.3460/- व भाग-क नुसार रु.15901/- अशी एकूण रु.19361/- इतकी रक्कम गौण खनिज स्वामित्वधनापोटी परिगणीत करण्यात आलेली आहे व कपात करण्यात आलेली आहे. शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे. तथापी अंदाजपत्रकामध्ये तरतुद करतांना व प्रत्यक्ष देयकामध्ये असुधारित दराने गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना करण्यात आलेली आहे, त्याचप्रमाणे काही बाबींवर गौण खनिज स्वामित्वधन परिगणना उदा.मुरुम, खडी, रेती यावर गौण खनिज स्वामित्व धनाची परिगणना करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.37679/- वसुलपात्र ठरत असून संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

भाग	बाब क्रमांक	बाबत	दर	परिणाम	Royalty (15/5/2015 पासून रु.141.34)			
					साहित्य	फॅक्टर	फॅक्टर नुसार परिमाण	रक्कम

A	4	Supplying Hard Murum/kankar at road side	440.24	48.96	मुरुम	1.00	48.96	6920.01
B	4	Providing laying M15 C.C.	4372.23	233.36	रेती	0.45	105.01	14842.40
B	7	Providing laying in situ M10 C.C. of trap/ granite/quartzite/gneiss metal in foundation	2776.93	18.86	रेती	0.45	8.49	1199.55
B	8	Providing laying in situ M20 C.C. of trap/granite/quartzite/gneiss metal for RCC caps over piers	4822.93	6.91	रेती	0.45	3.11	439.50
B	10	Providing laing in situ M25 C.C. hellip;. RDD work including ram-ming, vibrating finishing	6318.39	23.65	रेती	0.45	10.64	1504.21
B	11	Providing casting insute C.C of M15 .. RCC Pardi upto 150 mm. .thickness	7075.23	1.56	रेती	0.45	0.70	99.22
B	15	Providing laying in situ M20 C.C of trap/ granite/quartzite/gneiss metal including	4803.65	3.67	रेती	0.45	1.65	233.42
C	2	Supplying Hard Murum/kankar at road side	440.24	225.00	मुरुम	1.00	225.00	31801.50
		एकूण						**57039.81**
		कपात केलेली गौण खनिज रक्कम						**19361**
		वसुलपात्र गौण खनिज रक्कम						**37679**

03) सदर कामामध्ये मुरुम पसरविण्याचे काम करण्यात आलेले आहे. तथापी त्यासाठी लागणारे साहित्य जसे मुरुम कुठून आणणार याबाबत अंदाजपत्रकामध्ये Quary Chart दर्शविण्यात आलेला नाही, तसेच अंदाजपत्रकाचे गोषवारामध्ये वहनावळ (Lead) रु.128.93 इतके दर्शविण्यात आलेले आहे, त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता येत नाही. तसेच स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार मातीकाम किंवा भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिणामामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रकारे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रु.371/- जादा प्रदान झालेले असून सदर रक्कम वसुल करण्यात यावी व शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

भाग	बाब क्र.	तपशिल	मोजमापानुसार परिणाम	10% दबाईकरिता कमी करणे आवश्यक असलेले परिणाम	देय दर (7.88% निविदा दर कमी करुन)	वसुलपात्र रक्कम
A	5	Spreading of Hard Murum	48.96	4.896	13.54	66.29
C	6	Spreading Murum	225.00	22.50	13.54	304.65
		Total				370.94

04) अंदाजपत्रकामध्ये खोदकामाकरिता व भरावाकरिता बाबी दर्शविण्यात आलेल्या असून त्यानुसार प्रत्यक्ष कामामध्ये खालीलप्रमाणे खोदकामामधून साहित्य काढण्यात आलेले असून भरावाकरिता वापरण्यात आलेले आहे.

भाग	बाब क्र.	तपशिल	मोजमापानुसार काढलेले परिणाम
A	1	Excavation for foundation	14.40
B	1	Excavation for foundation	160.21
C	1	Excavation for roadway by manually in earth soil	0.00
D	1	Excavation in general in asphalt road in wet or dry condition	0.00
B	16	Filling in plinth floors with approved excavated materials	36.00

वरील तपशिलानुसार भाग-ए व भाग-बी मध्ये खोदकामाच्या बाबींमधून अनुक्रमे 14.40 व 160.21 असे एकूण 174.61 चौ.मी. इतके साहित्य काढण्यात आले. त्यापैकी भाग-बी मध्ये बाब क्र.16 साठी फक्त 36.00 चौमी इतके साहित्य वापरण्यात आले, उर्वरित 138.61 चौ.मी. इतके साहित्य वापरण्यात आलेले नाही असे दिसून येते. स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशनमधील Bd.A.1.2 नुसार खोदकामातून निघालेले साहित्यामधून उपयोगी व निरुपयोगी साहित्य वेगळे काढण्यात येऊन उपयोगी साहित्य कामाचे जागेपासून 50 मीटर अंतराचे आंत स्टॅक करण्यात यावा व कामामध्ये भरावासाठी वापरण्यात यावा अशी तरतुद आहे. तथापी खोदकामातून काढण्यात आलेले साहित्य हे कशासाठी वापरण्यात आले याबाबत कुठेही उल्लेख करण्यात आलेला दिसून नाही. त्यामुळे सदर साहित्य हे शासनाचे मालकीचे असल्याने याबाबत गौण खनिज स्वामित्वधन दराने कंत्राटदाराकडून वसुली करणे आवश्यक आहे. सदरचे साहित्याचे परिणाम 138.61 Cum x 141.34 = 19591/- इतकी रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात संबंधित गौण खनिज स्वामित्वधनाचे लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व त्याप्रमाणे चलनाच्या प्रतीसह मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे अहवाल सादर करण्यात यावा.

05) साहित्य चाचणीकरिता दरपृथ:करण पत्रकामध्ये 0.50 टक्के प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे, त्यानुसार

अंदाजपत्रकामध्ये एकूण तरतुद रु.5204/- इतकी करण्यात आलेली आहे. देयकामध्ये दरपृथ:करण पत्रकातील दरांनुसार रु.6280/- वजा 7.88% जाता रु.5785/- इतकी रक्कम प्रत्यक्ष प्रदान करण्यात आलेली आहे. तथापी संबंधित कंत्राटदार यांनी सादर केलेल्या चाचणी अहवालानुसार रु.2750 + 1200 = 3950/- इतकी रक्कम संबंधित संस्थेस प्रदान केलेली आहे. त्यामुळे रु.5785 - 3950 = रु.1835/- इतकी रक्कम संबंधित कंत्राटदार यांना जादा प्रदान झालेली असल्याने सदर रक्कम वसुल करण्यात येऊन योजनेच्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी व जिल्हा नियोजन समिती जळगांव यांचेकडे चलनाचे प्रतीसह अहवाल सादर करण्यात यावा.

06) अंदाजपत्रक चार भागांमध्ये तयार करण्यात आलेले आहे. अंदाजपत्रकीय तरतुद व कामावरील प्रत्यक्ष खर्च यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावती दिसून येतात. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

भाग	शिर्ष	अंदाजपत्रकीय तरतुद रक्कम	प्रत्यक्ष कामानुसार रक्कम	वाढ (+) / घट (-)	वाढ/घटीची टक्केवारी
A	Road Diversion cross drainage work	60608.00	60797.00	+189.00	+0.31%
B	Bridge	1203881.00	1434741.00	+230860.00	+19.18%
C	Approaches of WBM Asphalt Road	194239.00	118262.00	-75977.00	-39.12%
D	Shifting of PVC Pipeline	40800.00	0.00	-40800.00	-100.00%
	एकूण	1499528	1613800	+114272	+7.62%

वरील तपशिलावरुन भाग-बी पुलाचे कामामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ दिसून येते, तर भाग क्र.क व ड मध्ये मोठ्या प्रमाणात बचत झालेली आहे, भाग क्र.ड मध्ये कोणताही खर्च करण्यात आलेला नाही. बचत झालेल्या रकमा ह्या इतर बाबींवर वापरण्यात आलेल्या आहे. तसेच मुळ अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जादा रकमेचे काम करण्यात आलेले असल्याने वाढ झालेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. तसेच अंदाजपत्रक तयार करतांना प्रत्यक्ष स्थळ पाहणीही करण्यात आलेली नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

07) कमी दराची निविदा स्विकृत केल्यामुळे मुळ अंदाजपत्रकीय किंमत रु.1499530/- पेक्षा 7.88% कमी म्हणजे रु.1381367/- इतक्या किंमतीमध्ये काम पूर्ण करुन शासन निधीची बचत करणे अपेक्षित होते, तथापी तसे न करता प्रत्यक्षात काम रु.1613801/- किंमतीचे करण्यात येऊन त्यामधून वजा 7.88 टक्केप्रमाणे रु.127168/- वजा जाता रु.1486633/- एवढ्या किंमतीमध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. म्हणजेच कामाची मुळ किंमत रु.1499530/- ऐवजी रु.16134801/- मध्ये म्हणजे 7.62% जादा काम करण्यात येऊन अंदाजपत्रकीय रकमेच्या मर्यादेत काम करण्यात येत असल्याचे दर्शविण्यात येत आहे. यावरुन 7.88% कमी दराची निविदा स्विकृत करणे व प्रत्यक्षात 7.62% काम जादा करणेत आल्याने कंत्राटदाराचे हित जोपासले गेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.52 दिनांक 11/09/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	300
02	गौण खनिज	37679
03	दबाई	371
04	खोदकाम साहित्य	19591
05	चाचणी अहवाल	1835
	एकूण वसुलपात्र रक्कम	59776

FDSDNBM7201 (Ref No : 44, Hmm No : 52)

45 वार्ड क्र.34 अंतर्गत मेहरुण स.नं.42/1अ मधून हनुमान नगरकडे जाणाऱ्या रोडवर नाल्या ठिकाणी पुल बांधणे

योजना : स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी) (मा.श्री.सुरेश दामू भोळे) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 8005.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये

उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी) (मा.श्री.सुरेश दामू भोळे)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियेाजन समिती, जळगांव आदेश क्र.1602, दिनांक 13/08/2015 रु.15.00 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, मनपा जळगांव आदेश क्र.69, दि.06/07/2015 रु.1499982/-
कामाची अंदाजित किंमत	रु.1499982/-
निधी उपलब्धता	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.60 दि.26/11/2015 (2.11% कमी दराने)
कंत्राटदाराचे नांव	बीएचआर कंस्ट्रक्शन्स, जळगांव (2.11% कमी दराने)
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 25/5/2016
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27 नुसार)
कामाची स्थिती	काम पूर्ण
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी, बांभोरी जळगांव पत्र क्र.67/25-1, दि.17/2/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	दुसरे व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	24, दि.01/07/2016	67, दि.25/11/2016	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	84, पृ.क्र.135 ते 163	84, पृ.क्र.165 ते 176	
कामाची एकूण किंमत	1069698	429829	1499527

मंजूर निविदा दर (-7.88%)	-22571	-9070	-31641
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	0	0
देय रक्कम	1047127	420759	1467886
वजाती -			
1% विमा	10431	4208	14639
1% कामगार उपकर	10431	4208	14639
10% सुरक्षा रक्कम	104713	42076	146789
2% जीएसटी/व्हॅट	20943	8415	29358
2.33% आयकर	24084	9677	33761
इतर वजाती	80	0	80
गौण खनिज स्वामित्वधन	17668	22897	40565
एकूण वजाती	188350	91481	279831
निव्वळ देय रक्कम	858777	329278	1188055

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.1468332/- इतकी आहे, त्यानुसार रु.1000/-

किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.600/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन चलनाने योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन खाती भरणा करण्यात यावी.

02) साहित्य चाचणीकरिता दरपृथ:करण पत्रकामध्ये 0.50 टक्के प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे, देयकामध्ये दरपृथ:करण पत्रकातील दरांनुसार रु.6260/- वजा मंजूर निविदा दर 2.11% जाता रु.6128/- इतकी रक्कम प्रत्यक्ष प्रदान करण्यात आलेली आहे. तथापी संबंधित कंत्राटदार यांनी सादर केलेल्या चाचणी अहवालानुसार रु.800 + 2750 = 3550/- इतकी रक्कम संबंधित संस्थेस प्रदान केलेली आहे. त्यामुळे रु.6128 - 3550 = रु.2578/- इतकी रक्कम संबंधित कंत्राटदार यांना जादा प्रदान झालेली असल्याने ती वसुल करण्यात येऊन चलनाने योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन खाती भरणा करण्यात यावी.

03) करारनामा अट क्र.27 नुसार काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम संपल्यानंतर कामाचे फोटो काढणे तसेच माहिती फलक लावणे आवश्यक आहे. तथापी कामामध्ये काम सुरु असतांनाचे फोटो लावलेले आहे, काम सुरु करण्यापूर्वी, व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो लावलेले नाही. तसेच कामाचे फोटोमध्ये माहितीफलक लावण्यात आलेला दिसून येत नाही, तथापी देयकामध्ये बाब क्र.16 अन्वये माहिती फलक लावण्यापोटी रु.5027/- इतकी रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे, तरी सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन चलनाने योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन खाती भरणा करण्यात यावी.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.53 दिनांक 11/09/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	400
02	चाचणी अहवाल	2578
03	माहिती फलक	5027
	एकूण वसुलपात्र रक्कम	8005

FDSDNBM7201 (Ref No : 45, Hmm No : 53)

46 मेहरुण तलाव येथे गणेश घाटाच्या उत्तरेकडील चौथऱ्यावर भराव करुन पेव्हर ब्लॉक बसविणे व आसन व्यवस्था करणे

योजना : स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी) (मा.श्री.सुरेश दामू भोळे) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 128263.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी) (मा.श्री.सुरेश दामू भोळे)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.2788, दि.03/10/2016 रु.5.00 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, महानगरपालिका जळगांव आदेश क्र.251, दि.30/08/2016 रु.499898/-
कामाची अंदाजित किंमत	रु.499898/-
निधी उपलब्धता	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.110, दिनांक 02/01/2017
कंत्राटदाराचे नांव	श्री गजानन एंटरप्राईजेस, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	4 महिने i.e. upto 01/05/2017
दोष निवारण कालावधी	6 महिने
कामाची स्थिती	काम पूर्ण
चाचणी अहवाल	शासकीय तंत्रनिकेतन जळगांव पत्र क्र.101, दि.13/4/2017
देयकांचा तपशिल	

	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	03, दि.20/05/2017

मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	91, पृ.क्र.171 ते 173
कामाची एकूण किंमत	492606
मंजूर निविदा दर	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0
देय रक्कम	492606
वजाती -	
1% विमा	0
1% कामगार उपकर	4926
10% सुरक्षा रक्कम	49261
2% जीएसटी/व्हॅट	9852
2.33% आयकर	11330
गौण खनिज स्वामित्वधन	0
एकूण वजाती	75369
निव्वळ देय रक्कम	417237

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39, दिनांक 26/11/2014 अन्वये रु.3.00 लक्षपेक्षा जादा किंमतीच्या कामांकरिता ई-निविदा प्रक्रीयेचा अवलंब करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे. सदर कामाची किंमत रु.3.00 लक्षपेक्षा जादा असूनही सदर कामाकरिता ई-निविदा प्रक्रीयेचा अवलंब करण्यात आलेला नसून त्याऐवजी बंद लिफाफा निविदा मागविण्यात आलेले आहेत, त्यामुळे शासन निर्देशांचे पालन करण्यात आलेले नाही.

02) गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना अंदाजपत्रकामध्ये तसेच देयकामध्ये करण्यात आलेली नाही तथापी कंत्राटदाराने गौण खनिज परवाने किंवा वाहतुक पास संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही. शासन अधिसूचना

क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे, त्याप्रमाणे खालीलप्रमाणे गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना करुन रु.109817/- वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्र.	बाब	परिणाम	गौण खनिज फॅक्टर	गौण खनिज परिमाण
1	Filling plinth floors with contractors soil, sand or murum	549.00	1.30	713.70
3	Providing Soling using 80 mm. size trap metal	40.83	1.25	51.04
4	Providing laying in situ, c.c. in M-10	20.42	0.45	9.19
5	Providing casting in situ c.c. M-20 of trap/granite/quartzite/gneiss metal for RCC Beams	6.75	0.45	3.04
	एकूण			776.97
	गौण खनिज दर			141.34
	गौण खनिज स्वामित्वधन वसुलपात्र रक्कम			109817

03) स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिणामामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रु.18446/- जादा प्रदान झालेले असून सदर रक्कम वसुल करण्यात यावी व शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

बाब क्र.	तपशिल	मोजमापा नुसार परिणाम	10% दबाईकरिता कमी करणे आवश्यक असलेले परिणाम	देय दर	वसुलपात्र रक्कम
1	Filling plinth floors with contractors soil, sand or murum	549.00	54.90	336.00	18446

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.54 दिनांक 11/09/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
02	गौण खनिज स्वामित्वधन	109817
03	दबाई	18446
	एकूण वसुलपात्र रक्कम	128263

FDSDNBM7201 (Ref No : 46, Hmm No : 54)

47 एकात्मीक गहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रमIHSDP योजने अंतर्गत पिंप्राळा गट नं 214/2 पार्ट येथे 472 घरकुल बांधणे व प्रभाग समिती क्रं४ अंतर्गत गट नं 214/2 पार्ट अ, जागेवरील नविन घरकुल ठिकाणी 6 मीटर उंचीचे पोल उभारुन लाईट व्यवस्थाकरणे इत्यादी कामात झालेली अनियमितते बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 5652661.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षाचे **बांधकाम विभागाचे** लेखापरीक्षण करण्यात आले आहे. त्या विभागातील **एकात्मीक गहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम IHSDP योजने** अंतर्गत पिंप्राळा गट नं 214/2 पार्ट येथे **472 घरकुल बांधणे व प्रभाग समिती क्रं.४ अंतर्गत गट नं 214/2 पार्ट अ, जागेवरील नविन घरकुल ठिकाणी 6 मीटर उंचीचे पोल उभारुन लाईट व्यवस्था करणे** या कामाची नस्ती व देयकांची तपासणी करण्यात आली असुन **लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.**

कामाचे नांव	**एकात्मीक गहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम IHSDP योजने अंतर्गत पिंप्राळा गट नं 214/2 पार्ट येथे 472 घरकुल बांधणे**
योजना / लेखाशिर्ष	**आय.एच.एस.डी.पी योजने अंतर्गतचे निधीतुन**
प्रशासकीय मान्यता	मा.कार्यकारी अभियंता -1 जे.एन.एन.यु.आर.एम ndash; कक्ष / प्रा. म्हाडा कार्यालय मुंबई पत्र क्रमांक जा.क्रं.मु.अ./1/3 मु.अ./का.अ.-1/ जे.एन.एन.यु.आर.एम कक्ष/प्रा./न.क्रं. 108/140 दिनांक 30/07/2011
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता यांचे पत्र क्रमांक टीएस/पी.डब्लू.डी./1560/ दि.09/09/2011

निविदा रक्कम	1094.33 लक्ष दिनांक 21/10/2011 रोजीच्या नोटीसनुसार 1053.21 लक्ष दिनांक 04/11/2011 रोजीच्या नोटीसनुसार	
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	क्र.73, दिनांक 01/01/2013	
कंत्राटदाराचे नांव	मे. निर्माण गोल्ड स्टक्चर्स प्रा.लि. औरंगाबाद (निविदा रक्कमेवर 5 टक्के जास्त दराने रु.110587050/-)	
कामाचा कालावधी	11 महिने i.e. upto 30/11/2013	
दोष निवारण कालावधी	6 महिने	
करारनामा तपशिल	रु.100000/- स्टॅम्पवर दिनांक 17/03/2012	
मुदतवाढ	आदेश क्रमांक व दिनांक 01/12/2013 ते 31/03/2015 आदेश क्रमांक व दिनांक 01/04/2015 ते 31/12/2016	
काम पूर्णत्वाचा दाखला	काम अपूर्ण	
फोटो/बोर्ड जोडले आहे	काम सुरु असतांनाचे फोटो जोडलेले आहे, काम करण्यापूर्वीचे व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो जोडण्यात आलेले नाही. माहितीफलक लावण्यात आलेला नाही,	
तुलनात्मक विवरणपत्र	जोडले आहे.	
	अंदाजपत्रकानुसार	
	प्रत्यक्ष कामानुसार	
	तफावत	प्रत्यक्ष विवरणपत्रानुसार/- दर्शविली आहे)
टेस्ट रिपोर्ट	1. शासकीय अभियंत्रीकी महाविदयालय, जळगांव 2. शासकीय तंत्रनिकेतन , जळगांव	
मोजमाप पुस्तीका क्रमांक	क्र. 182 (पृष्ठ क्र. 4 ते 200) क्र. 201 (पृष्ठ क्र. 1 ते 65)	

दे यक क्र.	देयकाची रक्कम	विमा	उपकर	सुरक्षा अनामत	जीएसटी/ व्हॅट/ एलबीटी	आयकर	दंड रक्कम	निव्वळ प्रदान रक्कम
10	6003023	60030	60030	480242	15008	138070	0	5249643
11	5542264	55423	55423	443381	13856	127472	0	4846709
12	4348530	43485	43485	347882	10871	100016	0	3802791
13	5151826	51518	51518	412146	12880	118492	0	4505272
14	6082851	60829	60829	486628	0	139906	0	5334659
15	9820402	98204	98204	785632	0	225869	100000	8512493
16	3950289	39503	0	316023	0	90857	0	3463906
17	1983067	19831	0	158645	0	45611	20000	1738980
ए कू ण	42882252	428823	369489	3430579	52615	986293	120000	

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) महाराष्ट नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 466(4) मधील परिशिष्ट-3 मधील खंड 19 नुसार रु.50 लक्ष पर्यन्तच्या कामाच्या निविदा हया राष्टीय स्तरावरील कोणतेही एक वर्तमानपत्र, राज्यस्तरीय कोणतेही एक वर्तमानपत्र व दैनंदिन 20000 प्रतींची विक्री असणारे एक वुत्तपत्र अशा प्रकारे तीन वर्तमान पत्रांमध्ये निविदेस प्रसिध्दी देणे आवश्यक असतांना दोन्ही वेळेस लोकमत जळगाव (जळगांव आवुत्ती) हया एकाच जिल्हास्तरीय वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. त्यामुळे निविदेस अल्प प्रतिसाद मिळालेला दिसून येतो व त्यामुळे दोन वेळा निविदा प्रसिध्द करावी लागली. परिणामी कामास विलंब झालेला दिसुन येतो.

02) दिनांक 21/10/2011 रोजीच्या लोकमत या दैनिकात टेडरची जाहिरात प्रसिध्द केल्यानुसार एकात्मीक गहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम IHSDP योजने अंतर्गत प्रिंपाळा गट नं. 214/2 पाट येथे 472 घरकुल बांधणेकामी अंदाजपत्रकांची रक्कम रु.1094.33 लक्ष निविदा रक्क्म होती. परंतु सदर टेडर यास प्रतिसादर न मिळाल्याने दिनांक 04/11/2011 रोजीच्या लोकमत या दैनिकात फेरनिविदेची जाहिरात पसिध्द केली. त्या जाहिरातीनुसार निविदा रक्कम रु.1053.21 लक्ष अशी दर्शविण्यात आलेली आहे. तरी फेरनिविदेची निविदा रक्कम कमी केल्याचे निर्दशनास येत असुन त्या बाबतचा खुलासा लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

03) महाराष्ट शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती 2010/प.क.34/39 दि. 06/08/2010 अन्वये रुपये 2 कोटी व त्यापेक्षा अधिक निविदा दर असेल तर ई टेंडरिंग प्रणाली अवलंबीण्याचा दिनांक 1 ऑक्टोबर 2010 आहे परंतु उपरोक्त कामासाठी ईनिविदा प्रसिध्द करुन निविदा मागविणे आवश्यक असतांना

नियमोचीत कार्यवाही न करता केवळ बंद लिफाफा मागवून काम देण्यात आलेले आहे. त्यामुळे शासननिर्णयाची अंमलबजावणी केलेली दिसुन येत नाही. त्याबाबतचा खुलासा लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

04) करारनामानुसार कामाचा दोष निवारण कालावधी (Defect Liability Period) हा 6 महिन्यांचा ठेवण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र. संकिर्ण 2011 / प्र.क. 467/ रस्ते-1 दिनांक 21/11/2011 नुसार असा दोष निवारण कालावधी हा 2 वर्षाचा असणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कालावधीमध्ये कामामध्ये काही दोष निर्माण झाल्यास व त्यावर दुरुस्तीकरीता खर्च करण्याची आवश्यकता भासल्यास महानगरपालीकेवर दायित्व वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

05) सदरकामाचा करारनामा हा दि.17/03/2012 रोजी करण्यात आलेला आहे. परंतु उपरोक्त कामाचा कार्यादेश हा क्रमांक/ ज.श.म.न.पा. /पवडी/73/2012 दिनांक 01/01/2013 रोजी देण्यात आलेला आहे. तरी करारानामा केल्यानंतर 8 महिने व 13 दिवस इतक्या उशीराने कार्यादेश देण्यात आलेला आहे . महाराष्ट नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 466(4) मधील परिशिष्ट-3 मधील खंड 36 मधील तरतुदीनुसार निविदा उघडल्यानंतर एक आठवडयाच्या आंत त्याची विल्हेवाट लावण्यात येईल, कोणत्याही परिस्थीत एक मिळन्यापेक्षा जास्त कालावधीमध्ये त्याची विल्हेवाट लावण्यात येऊ नये अशी तरतुद आहे. तथापि या प्रमाणे कार्यवाही करण्यात ओलली नाही.

06) सदर जागा महानगरपालीकेच्या ताब्यात असलेबाबत पुरावा दाखल सदर जागेचा 7/12 उतारा संचिकेमध्ये लावण्यात आलेला नाही.

07) एकात्मिक गुहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत 472 घरकुलाचे बांधकाम करणे या कामासाठी मे.निर्माण गोल्ड स्टक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांना नियुकत करण्यात आले होते. सदरील कामासाठी दिलेली बॅक गॅरटी क्रमांक OBR-1352/2012 दिनांक 27/12/2016 पर्यतची असून त्यानंतर जवळपास 1 वर्षानंतर काम सुरु असतांना त्यांचेकडून वाढीव मुदतीची बॅक गॅरंटी न घेता मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

08) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28/शासन हमी दिनांक 19/08/1998, नगरविकास विभाग शासन पत्र क्रमांक जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24 दिनांक 03/11/2003 तसेच शासकीय विमा निधी महाराष्ट राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक 2314 दिनांक31/03/2015 नुसार कंत्राटदाराने कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविल्याबाबतचा पुरावा काम सुरु करणेपुवी सादर करणे अन्यथा कंत्राट रक्कमेच्या 1% प्रमाणे विमा रक्कम कपात करणे व विमा संचालयनाकडे भरणा करणे आवश्यक आहे. मंजुर दरा नुसार प्रथम देयाकामधून 1% प्रमाणे रु.11,05,871/- इतकी विमा रक्कम कपात करुन विमासंचालनाकडे भरणा करणे आवश्यक होते. तथापी या प्रमाणे कार्यवाही न करता प्रत्येक देयकामधून देयक रक्कमेवर 1% प्रमाणे विमा कपात करण्यात आलेला आहे.सदरील रक्कम विमा संचालनालयास जमा केल्याची खात्री होत नाही.

09) संचिकेमध्ये सदर कामाचे तांत्रिक मान्यता प्रदान केलेले विभागाचे मुळअंदाजपत्रक जोडण्यात आलेले नाही.

त्यामुळे याबाबत लेखापरिक्षणात पडताळणी करता येत नाही.

10) मे निर्माण गोल्ड स्टक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांना मेटेरीयल सिक्युरीटी ॲडव्हॅन्स रक्कम रु.36,86,209 /- इतकी रक्कम प्रमाणक क्रमांक 06 दिनांक 14/02/2014 अन्वये अदा करण्यात आलेली आहे. पंरतु करारनामाधील अटी/ शर्ती मध्ये मेटेरीयल सिक्युरीटी ॲडव्हॅन्स देणेबाबत तरतुद करण्यात आलेली नाही. कंत्राटदाराच्या मेटेरीयल सिक्यरीटी ॲडव्हॅन्स रक्कम देयकातुन वसुल करण्यात आलेली नाही.. त्यामुळे सदर एकूण रक्कम संबधीतांकडून व्याजासह वसुल होणे आवश्यक आहे.

11) सदर कामाची मोजमाप पुस्तीका क्रमांक 182 व 201 लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे धावते देयकांद्वारे कामावर झालेला खर्च रक्कम रु.4,28,82,252/- बाबत लेखापरिक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

12) वस्तु व सेवा कर कायदयानुसार जीएसटी करप्रणाली दिनांक 01/07/2017 पासून अंमलात आली. शासकीय कार्यकंत्राटामध्ये जीएसटी प्रणाली लागू करणेबाबत वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक जीएसटी 1017/प्र.क्र. 155/कराधान-1 दिनांक 11/09/2017 मधील अ.क्र.4 नुसार चालू कामांचे बाबतीत कराच्या भारामध्ये वुध्दी वा घट झाल्यामुळे कंत्राटाबाबत अटी व शर्ती वेगवेगळया असतील त्यामुळे प्रत्येक विभागाने कंत्राटाची प्रत विधी व न्याय विभागाकडून तपासून बदललेल्या कररचनेमुळे कंत्राटाच्या किमंतीतुन कराचा भार कमी झाल्यामुळे वजावट करता येईल किंवा कराचा भार वाढल्यामुळे किंमत वाढवून देता येईल याबाबत अभिप्राय घ्यावेत अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. वरील प्रमाणे कंत्राटदाराची देयके अदा करण्यापुर्वी सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे धावते देयक क्रमांक 14 वे देयकातुन 2% व्हॅट रक्क्म रु.1,21,657/- व 15 वे देयकातुन 2% व्हॅट रक्कम रु.1,96,408/- व्हॅट वसुली करण्यात आलेली नाही. तसेच धावते देयक क्रमांक 16वे देयका मधुन जीएसटी रक्कम रु.79,005/- व 17वे देयका मधुन जीएसटी रक्कम रु.39,661/- वजावाट करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदरच्या रक्कमांचे जादा प्रदान कंत्राटदारास झालेले आहे. तरी सदरची रक्कम रु.4,36,731/- वसुल करण्यात यावी

13) कामामध्ये खोदकामामधून खालीलप्रमाणे मटेरियल काढण्यात आलेले आहे. स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशनमधील Bd.a.1.2 नुसार खोदकामातुन निघालेले साहित्यामधून उपयोगी व निरुपयोगी साहित्य वेगळे काढण्यात येऊन उपयोगी साहित्य कामाचे जागेपासुन 50 मिटर अंतराचे आत स्टॅक करण्यात यावा व कामामध्ये भरावासाठी वापरण्यात यावा अशी तरतुद आहे.तथापी लेखापरिक्षण कालवधी मध्ये धावते **देयक क्रमांक 10वे ते 17 वे देयका अखेर बाब क्रमांक 1 Excavation in S.M.and Excavation of roadway नुसार एकूण 4577.05** घमी. इतके सहित्य काढण्यात आलेले असुन सदर साहित्यांचा वापराबाबत संचिकेमध्ये उल्लेख दिसुन येत नाही. सदर साहित्य कंत्राटदाराने नेले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत योग्य ती कायर्वाही करुन अनुपालन सादर करावे.

14) लेखापरिक्षण कालाधीतील धावते देयक क्रमांक 10वे ते 17वे पावेतो देयकाची तपासणी केली **असता** उपरोक्त कामाचा करारनामा मधील अट क्रमांक 22 मधील तरतुदी नुसार धावते देयकातुन रॉयल्टीची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. त्यामुळे करारनामा मधील अट क्रमांक 22 चे उल्लधन झाले असुन अहवाला **सोबत जोडलेल्या परिशीष्ट**

क्र.01 मधील परिगणनेप्रमाणे रक्कम रु.10,31,703/- संबधीत कंत्राटदार यांचे कडून वसुल करुन शासन खाती चलनाने भरणा करण्यांत यावी.

15) महाराष्ट्र नगरपपरीषद लेखासंहीता,2011 मधील प्रकरणे 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजुरीशिवाय मुळ अंदाजपत्राकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही. संकल्प चित्र किंवा आराखडयामध्ये बदल होणार असेल तर सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सुचना आहेत. तथापि याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका मधील नियम 261 नुसार विशीष्ट प्रकल्पासाठी मंजुर केलेल्या अंदाजीत अपेक्षीत व प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकरा असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये. शासनाने मंजुर केलेल्या प्रकल्पाचा बराचसा भाग सोडुन दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामांसाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही. **सबब सोबत जोडलेल्या परिशीष्ट क्र.03 मधील केलेला खर्च** रक्कम रु. 5,47,018/-लेखापरीक्षणत अमान्य करण्यात येत आहे.

16) एकात्मीक गहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम IHSDP योजने अंतर्गत प्रिंपाळा गट नं. 214/2 पाट येथे 472 घरकुल बांधणे यातील मे निर्माण गोल्ड स्टक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांचे निविदा फॉर्म मधील अंदाजपत्रकात दर्शविलेले काम व देयकात नमुद करण्यात आलेले काम यांची तुलना व तपासणी केली असता खालील दर्शविलेले कामाचे अंदाजपत्रकात नमुद दर व देयकात नमुद करण्यात आलेले दर यात तफावत असुन अंदाजपत्रकातील दरापेक्षा जादा दराची आकारणी करण्यात आलेली आहे. त्यामुळे संबधीत कंत्राटदारास यास जादा रक्कम अदा करण्यात आलेली आहे. त्यामुळे करारनामाचे उल्लघन झाले असुन अहवाला **सोबत जोडलेल्या परिशीष्ट क्र.02 मधील** परिगणनेप्रमाणे रक्कम **रु. 1,74,742/-** संबधीत कत्रांटदार यांचेकडून वसुल करुन शासनखाती चलनाने भरणा करण्यांत यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल लेखापरिक्षणास सादर करण्यांत आलेला नाही.

17) एकात्मीक गहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम IHSDP योजने अंतर्गत प्रिंपाळा गट नं. 214/2 पाट येथे 472 घरकुल बांधणे यातील अंदाजपत्रकाचे Sub Est No. 1 मध्ये बाब क्रमांक 26d नुसार विदयुतीकरणाचे कामा करीता रक्कम रु.71,844.890/- इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच abstract of electrical work for transit camp मध्ये तरतुद करण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकात दश्रविलेले इलेक्टीक तरतुद व देयकात नमुद करण्यात आलेले इलेक्टीक काम यांची तुलना व तपासणी केली असता अंदाजपत्रकातील कामाच्या रक्कमेपेक्षा जास्त काम करण्यात आलेले असुन रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तरी सदर खर्च रक्कम रु.15,90,273.67/- बाबत सुधारीत प्रशासकीय मंजुरी घेवुन अनुपालन दर्शविण्यात आलेले नाही.

बाब क्रमांक	**बाब**	**रक्क्म**
D) Abstract of Electrical Work forTtransit Camp		
12 वे देयक	इलेक्टीक काम	221260.55

Sub Est NO 1		
13 वे देयक	इलेक्टीक काम	367656.00
Sub Est NO A		
14 वे देयक	इलेक्टीक काम	558837.12
D) Abstract of Electrical Work forTtransit Camp		
14 वे देयक	इलेक्टीक काम	221260.55
D) Abstract of Electrical Work forTtransit Camp		
17 वे देयक	इलेक्टीक काम	221260.55
	एकूण	**15,90,273.67**

महाराष्ट्र नगरपपरीषद लेखासंहीता,2011 मधील प्रकरणे 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजुरीशिवाय मुळ अंदाजपत्राकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही. संकल्प चित्र किंवा आराखडयामध्ये बदल होणार असेल तर सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सुचना आहेत. तथापि याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका मधील नियम 261 नुसार विशीष्ट प्रकल्पासाठी मंजुर केलेल्या अंदाजीत अपेक्षीत व प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकरा असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये. शासनाने मंजुर केलेल्या प्रकल्पाचा बराचसा भाग सोडुन दिल्यामुळे खर्चात अचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामांसाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही.

18) सदरचे काम दि. 31.03.2018 अखेर अपुर्ण आहे याबाबत पुढील लेखापरीक्षणात अंतिम अभिप्राय देण्यात येतील.

19) अर्धसमास पत्र क्रमांक 186 दिनांक 07/03/2024 व 196 दिनांक 12/03/2024 अन्वये एकात्मीक गहनिर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम (IHSDP) योजने अंतर्गत पिंप्राळा गट नं 214/2 पार्ट येथे 472 घरकुल बांधकाम करण्याकरीता योजनेच्या अनुषंगाने 472 लाभार्थीची निवड करण्यात आली आहे. त्याबाबतच्या नस्ती, कागदपत्रे लाभार्थी हिस्सा जमा करणे बाबतचे पावती पुस्तके, किर्द नोंदवही, चलन, येणे वसुली व प्रलंबित लाभार्थी हिस्सा विवरण व अभिलेखे लेखापरिक्षणास तात्काळ सादर करणेबाबत सुचित करण्यात आले असुन अदयापावेतो वर नमुद आवश्यक ती सर्व कागदपत्रे व इतर सर्व **नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे लाभार्थी निवडीबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.**

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 186 दिनांक 07/03/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुददा क्रमांक	तपशील	वसुलपात्र रक्कम
11	सिक्युरीटी ॲडव्हान्स रक्कम	36,86,209/-
12	जीएसटी व व्हॅट रक्कम	4,36,731/-
14	गौण खनिज स्वामीत्व धन	10,31,703/-
15	अंदाजपत्रकात तरतुद नसलेल्या बाबी	3,23,276/-
16	दराची तफावत	1,74,742/-
एकूण एकंदर		56,52,661/-

HCDGSCM8301 (Ref No : 55, Hmm No : 186)

48 प्र.क्र.13/14, गट नं.312 हिंदू स्मशानभूमी येथे अंत्यविधीसाठी आरसी.सी. शेड बांधणे

योजना : स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी) (मा.श्री.सुरेश दामू भोळे) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 483809.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी) (मा.श्री.सुरेश दामू भोळे)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.1602, दि.13/08/2015 (अ.क्र.16) रु.13.57 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, महानगरपालिका जळगांव आदेश क्र.70, दि.06/07/2015 रु.1356695/-
दरसूची वर्ष	2014-2015
कामाची अंदाजित किंमत	रु.1356695/-

निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.94, दिनांक 16/12/2015
कंत्राटदाराचे नांव	श्री.सुशिलकुमार गणपत डोंगरे (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	4 महिने i.e. upto 01/05/2017
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी जळगांव पत्र क्र.68/02, दि.9/4/2016

	प्रथम धावते देयक	द्वितीय व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	04, दि.13/04/2016	54, दि.16/02/2018	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	51, पृष्ठ क्र.62 ते 72	51, पृष्ठ क्र.76 ते 84	
कामाची किंमत	637629	325344	962973
अधिक जादा बाब परिमाण	0	39999	39999
कामाची एकूण किंमत	637629	365343	1002972
वजाती -			
गौण खनिज स्वामित्वधन	0	0	0
1% विमा	6376	3653	10029
1% कामगार उपकर	6376	0	6376
10% सुरक्षा रक्कम	63763	36534	100297
2% जीएसटी/व्हॅट	12753	7307	20060

2.33% आयकर	14665	8403	23068
दंड	0	7307	7307
एकूण वजाती	103933	63204	167137
निव्वळ देय रक्कम	533696	302139	835835

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) निविदा सादर करतेवेळी सदर कामाचे कंत्राटदार यांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्राची मुदत ही दिनांक 12/12/2016 पर्यंत होती, तथापी त्यानंतर काम दिनांक 10/09/2017 पर्यंत सुरु होते, तथापी संबंधित कंत्राटदार यांनी पुढील कालावधीचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही किंवा संबंधित विभागाने याबाबत कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

02) निविदा उघडली दि.10/5/2015, मा.आयुक्त यांचे आदेश क्र.49, दिनांक 17/10/215 अन्वये दरास मान्यता प्रदान, मनपा पत्र क्र.464 दिनांक 20/10/2015 अन्वये रु.500/- च्या मुद्रांकावर करारनामा करणे व अनामत रक्कम भरणेबाबत कळविण्यात आले व त्यानुसार 16/12/2015 रोजी करारनामा करण्यात आला. म्हणजेच दि.10/5/2015 रोजी निविदा दराचा लिफाफा उघडल्यानंतर करारनामा दिनांक 16/12/2015 रोजी म्हणजे 5 महिन्यांच्या विलंबाने करण्यात आला व त्यानंतर दिनांक 16/12/2015 रोजी कामाचे आदेश निर्गमित करण्यात आले. त्यामुळे कामास अत्यंत विलंब झालेला असून शासनाचा निधी अडकून पडलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. महाराष्ट नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 466(4) मधील परिशिष्ट-3 मधील खंड 36 मधील तरतुदीनुसार निविदा उघडल्यानंतर एक आठवडयाच्या आंत त्याची विल्हेवाट लावण्यात येईल, कोणत्याही परिस्थीत एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीमध्ये त्याची विल्हेवाट लावण्यात येऊ नये अशी तरतुद आहे, तथापी यानुसार नियमाचे पालन करण्यात आलेले दिसून येत नाही.

03) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.13.57 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.900/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.400/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

04) करारनामा अट क्र.27 नुसार कामाचा दोष निवारण कालावधी (Defect Liability Period) हा 6 महिन्यांचा

ठेवण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण 2011/प्र.क्र.467/रस्ते-1, दिनांक 21/11/2011 नुसार असा दोष निवारण कालावधी हा 2 वर्षांचा असणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कालावधीमध्ये कामामध्ये काही दोष निर्माण झाल्यास व त्यावर दुरुस्तीकरिता खर्च करण्याची आवश्यकता भासल्यास महानगरपालिकेवर दायित्व वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास येते.

05) सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये सन 2014-2015 ची दरसूची वापरण्यात आलेली आहे. अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही. दरसूचीमधील दर व अंदाजपत्रकांसोबतच्या गोषवाऱ्यामध्ये दर्शविण्यात आलेले दर यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते, त्यामुळे सदरचे दर हे लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.454254/- वसुलपात्र ठरतात. याबाबत जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुलीची कार्यवाही करण्यात यावी व संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात येऊन त्याप्रमाणे चलनाच्या प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियेाजन समिती, जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

It. No.	Item	Rate as per estimate	Qty. Excuted		Rate As per DSR				Diff. in rate	Recovery Amount
			Qty.	Amount	Sr No	Rate	5% Mun corpn	Total		
1	Excavation for foundation in Hard murum.	63.00	89.20	5619.60	3	119	5.95	124.95	-61.95	0
2	P L in situ CC 1:4:8	2738.89	20.45	56010.30	27	2373	118.65	2491.65	247.24	5056.058
3	P L in situ CC M-14/1:2:4	4246.57	9.80	41616.39	25	3613	180.65	3793.65	452.92	4438.616
4	Prov. casting in situ CC M-15 RCC Column	6205.82	12.98	80551.54	42	5636	281.8	5917.8	288.02	3738.5
5	Prov. casting in situ CC M-15 RCC Beam	6458.70	17.28	111593.42	46	5874	293.7	6167.7	291.00	5027.898
6	Prov. casting in situ CC M-15hellip; RCC slab landing	6612.76	14.18	93768.94	51	6019	300.95	6319.95	292.81	4152.046

7	Providing fixing fan hoo box	63099.75	4.27	269499.03			0	0	63099.75	269499
8	Providing brick masonary in Cement Mortir 1:6..	4029.56	12.97	52263.39	91	3817	190.85	4007.85	21.71	281.5787
9	Providing sand faced plaster	255.76	396.74	101470.22	143	239	11.95	250.95	4.81	1908.319
10	Providing inter cement plaster 6 mm. thk	77.89	100.00	7789.00	129	79	3.95	82.95	-5.06	0
11	Providing neeru finish to plaster surface	25.38	0.00	0.00	140	24	1.2	25.2	0.18	0
12	C.I. Vertical guard for cremation platform.. (Market rate)	71.00	1690.00	119990.00			0	0	71.00	119990
13	Filling in plinth floors with contractor#39;s material approved by engineer	251.69	90.59	22800.60	14	238	11.9	249.9	1.79	162.1561
14	Providing fixing ceramic tiles of aproved quality.	486.35	0.00	0.00			0	0	486.35	0
12	Electric Fitting	LS	0.00	0.00			0	0	0.00	0
13	Sintex water tank including water stand plumbing	LS	0.00	0.00			0	0	0.00	0
	Total			**962972.43**						**414254.20**
	Extra Item									
1	Fire Bricks..	6861.00	5.83	39999.63					6861.00	39999.63
	Total of Extra Item			**39999.63**						**39999.63**

	Total			**1002972.06**						**454253.83**
	Round off			**1002972.00**						**454254.00**

06) सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये व तसेच देयकामध्ये गौण खनिज स्वामित्व धनाची परिगणना करण्यात येऊन शासन खाती भरणा करण्यात आलेली नाही किंवा संबंधित कंत्राटदाराने गौण खनिज वाहतुक पास व परवाना पत्र सादर केलेले नाही. शासन अधिसूचना दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.**23737**/- वसुलपात्र ठरत असून संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	दर	परिमाण	Royalty (15/5/2015 पासून रु.141.34)			
				साहित्य	फॅक्टर	फॅक्टर नुसार परिमाण	रक्कम
2	P L in situ CC 1:4:8	2738.89	20.45	रेती	0.45	9.20	1300.68
3	P L in situ CC M-14/1:2:4	4246.57	9.80	रेती	0.45	4.41	623.31
4	Prov. casting in situ CC M-15 RCC Column	6205.82	12.98	रेती	0.45	5.84	825.57
5	Prov. casting in situ CC M-15 RCC Beam	6458.70	17.28	रेती	0.45	7.78	1098.93
6	Prov. casting in situ CC M-15 RCC slab landing	6612.76	14.18	रेती	0.45	6.38	901.89
8	Providing brick masonary in Cement Mortor 1:6..	4029.56	12.97	रेती	0.32	4.15	586.62
9	Providing sand faced plaster	255.76	396.74	रेती	0.0250	9.92	1401.88
10	Providing inter cement plaster 6 mm. thk	77.89	100.00	रेती	0.0250	2.50	353.35
13	Filling in plinth floors with contractor#39;s material approved by engineer	251.69	90.59	रेती	1.30	117.77	16645.19

	एकूण						**23737.42**
	कपात केलेली गौण खनिज रक्कम						**0.00**
	वसुलपात्र गौण खनिज रक्कम						**23737.00**

07) बाब क्र.13 Filling in plinth floors with contractor#39;s material approved by engineer नुसार ओटा भरावाचे कामाकरिता साहित्य 90.59 घमी चे काम करण्यात आलेले आहे. तथापी त्यासाठी लागणारे साहित्य जसे मुरुम कुठून आणणार याबाबत अंदाजपत्रकामध्ये Quary Chart दर्शविण्यात आलेला नाही, त्यामुळे सदर बाबीकरिता वापरण्यात आलेले साहित्याचे वहनावळ बाबत पडताळणी करता आली नाही. तसेच स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिणामामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रु.2280/- जादा प्रदान झालेले असून सदर रक्कम जबाबदारी निश्चित करण्यात येऊन वसुल करण्यात यावी व शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

बाब क्र.	तपशिल	मोजमापा नुसार परिमाण	10% दबाईकरिता कमी करणे आवश्यक असलेले परिमाण	दर	वसुलपात्र रक्कम
13	Filling in plinth floors with contractor#39;s material approved by engineer.	90.59	9.06	251.69	2280

08) नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.नामप/संक्र 39/नवि 26, दिनांक 16/03/2009 तसेच विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनि 2314, दिनांक 31/03/2015 मधील सुचनांनुसार कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी कामाचा विमा उतरवुन विमापत्राची प्रत महानगरपालिकेस सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा कंत्राटदाराचे प्रथम देयकामधून कंत्राटी कामाच्या 1% प्रमाणे रक्कम कपात करुन विमा संचालनालयाकडे भरणा करण्यात यावी अशा स्पष्ट सूचना आहे. तथापी करारनामा अट क्र.25 साईटवर काम करणाऱ्या कामगारांचा विमा उतरविण्यात येईल, तसे न केल्यास प्रत्येक देयकातून विम्यापोटी कंत्राटी रकमेच्या 1% रक्कम लिहून घेणार यांचेद्वारा कपात करण्यात येईल अशी अट नमुद करण्यात आलेली असून सदर अट नियमबाह्य नमूद करण्यात आलेली आहे. वरील शासन सूचनांनुसार कंत्राटानुसार कामाची किंमत रु.1356695/- प्रमाणे रु.13567/- कपात करणे आवश्यक, तथापी दोन्ही देयकामधून एकूण रु.10029/- कपात केल्यामुळे रु.3538/- कमी कपात करण्यात आलेली आहे, त्यामुळे शासकीय विमा निधीचे नुकसान झालेले आहे, तरी कंत्राटदाराकडून रु.3538/- वसुल करण्यात येऊन शासन खाती भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह विमा संचालनालय मुंबई यांना अहवाल सादर करण्यात यावा.

09) काही बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात बचत तर काही बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ दिसून येते, त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही.

बाब क्र.	तपशिल	अंदाजपत्रकीय किंमत	प्रत्यक्ष कामानुसार किंमत	बचत (+) / वाढ (-)
1	Excavation for foundation in Hard murum	3827.00	5619.60	-1792.60
2	P L in situ CC 1:4:8	30511.00	56010.30	-25499.30
3	P L in situ CC M-14/1:2:4	41616.00	41616.39	-0.39
4	Prov. casting in situ CC M-15 RCC Column	80924.00	80551.54	372.46
5	Prov. casting in situ CC M-15 RCC Beam	124524.00	111593.42	12930.58
6	Prov. casting in situ CC M-15 RCC slab landinghellip;	107127.00	93768.94	13358.06
7	Providing fixing fan hoo box	294676.00	269499.03	25176.97
8	Providing brick masonary in Cement Mortor 1:6..	384984.00	52263.39	332720.61
9	Providing sand faced plaster	95143.00	101470.22	-6327.22
10	Providing inter cement plaster 6 mm. thk	9127.00	7789.00	1338.00
11	Providing neeru finish to plaster surface	2974.00	0.00	2974.00
12	C.I. Vertical guard for cremation platform.. (Market rate)	71000.00	119990.00	-48990.00
13	Filling in plinth floors with contractor#39;s material approved by engineer	23815.00	22800.60	1014.40
14	Providing fixing ceramic tiles of aproved quality	46446.00	0	46446.00
15	Electric Fitting	20000.00	0	-20000.00
16	Sintex water tank including water stand plumbing	20000.00	0	-20000.00

17	जादा बाब - Fire Bricks..	0	39999	39999
	एकूण	1356695	1002972	353720.57

10) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 2004/प्र.क्र.109/राम-2, दिनांक 22/03/2005 अन्वये कामांवरील साहित्यांचे चाचणी अहवाल शासकीय प्रयोगशाळेकडून करणे आवश्यक असतांना खाजगी इंजिनिअरींग कॉलेजकडून चाचणी अहवाल प्राप्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे शासन निर्देशांचे पालन करण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे सदर चाचणी अहवालामध्ये महानगरपालिकेचे पत्राचा संदर्भ पत्र क्र.नमुद नाही, दिनांक 15/5/2016 असा नमूद करण्यात आलेला आहे, तथापी सदरचे पत्र संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही. त्यामुळे करण्यात आलेल्या साहित्यांच्या चाचण्या ह्या अधिकृतरित्या करण्यात आलेल्या नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

11) काम पूर्ण झाल्यानंतर तयार करण्यात आलेले तुलनात्मक विवरणपत्र तपासणी करण्यात आली असता त्यामध्ये कमी/जादा बाबींचे कारणे नमूद करण्यात आलेली नाही, तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक हे रु.1356695/- इतक्या रकमेचे तयार करण्यात आलेले आहे, तथापी प्रत्यक्षात जादा बाबीसह काम हे रु.1002972/- इतक्या रकमेचे करण्यात आलेले आहे, त्यामुळे अंदाजपत्रकापेक्षा रु.353723/- इतक्या रकमेचे काम कमी झालेले आहे. म्हणजेच अंदाजपत्रक तयार करतांना स्थळ निरिक्षण करुन मोजमापांनुसार आवश्यक बाबींचा समावेश करणे व त्यानुसार तंतोतंत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असतांना जादा रकमेचे अंदाजपत्रक तयार केलेले असल्यामुळे शासन निधी विनावापर पडून राहिलेला आहे, व त्यामुळे शासनाला इतर योजनांवर सदरच्या जादा रकमेचा वापर करुन लोकोपयोगी कामे करता आलेली नाही. त्याचप्रमाणे सदरचा शिल्लक निधी शासनाकडे तात्काळ भरणा करणे आवश्यक होते, तथापी असा भरणा करण्यात आला किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात अभिलेखांअभावी पडताळणी करता आली नाही.

12) प्रशासकीय मान्यता आदेशामधील अट क्र.10 नुसार सदरचे काम हे 1 वर्षामध्ये पूर्ण करणे आवश्यक आहे, म्हणजे प्रशासकीय मान्यता आदेश दिनांक 13/08/2015 पासून 1 वर्ष म्हणजे 12/08/2016 पर्यंत सदरचे काम पूर्ण होणे आवश्यक होते, तथापी सदरचे काम हे दिनांक 10/09/2017 रोजी म्हणजे मुळ मुदतीनंतर 1 वर्षांचे विलंबाने पूर्ण करण्यात आलेले आहे, त्यामुळे शासन योजना राबवितांना विहित कालावधीचे पालन करण्यात आलेले नाही.

13) सदर कामाची मोजमापे नोंदविण्यात आलेली मोजमाप पुस्तिका क्र.167 लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे मोजमापे व देयके याबाबत पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.56 दिनांक 18/09/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
03	मुद्रांक शुल्क	400
05	दरपृथ:करण फरक	454254
06	गौण खनिज स्वामित्वधन	23737
07	दबाई	2280
08	विमा	3538
	एकूण वसुलपात्र रक्कम	484209

FDSDNBM7201 (Ref No : 57, Hmm No : 56)

49 प्र.क्र.36 मधील स.नं.449 खुल्या जागेमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व जॉगिंग ट्रॅक तयार करणे

योजना : स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी) (मा.श्री.सुरेश दामू भोळे) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 896.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी) (मा.श्री.सुरेश दामू भोळे)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियेाजन समिती, जळगांव यांचे आदेश क्र.915, दिनांक 15/03/2016 (अ.क्र.1) रु.9.99 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.420, दि.09/02/2016 रु.999666/-
दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.999666/-

निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.75 दि.30/11/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.सुशिलकुमार गणपत डोंगरे, जळगांव (3.01% कमी दराने)
परफार्मन्स सिक्युरिटी	मनपा पावती क्र.16375, दि.29/11/2016 रु.9996/-
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 29/05/2017)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण
चाचणी अहवाल	1) दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (साबां) क्षेत्रिय प्रयोगशाळा जळगांव पत्र क्र.327 दिनांक 28/02/2017 2) शासकीय तंत्रनिकेतन, जळगांव पत्र क्र.45 दि.23/2/2017

	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	38, दि.22/9/2017
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	ए-200, पृ.क्र.14 ते 19
कामाची किंमत	890591
वजा मंजूर निविदा दर (3.01%)	-26807
कामाची एकूण किंमत	863784
वजाती -	
गौण खनिज स्वामित्वधन	3011
सुरक्षा रक्कम	86378
आयकर	19867

जीएसटी/व्हॅट	17276
कामगार उपकर	8638
विमा	8638
एकूण वजाती	143808
निव्वळ देय रक्कम	719976

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) सदर कामाचे अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करण जोडण्यात आलेले नाही, तसेच गौण खनिज खदाण दर्शक नकाशा जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे अंदाजपत्रकामधील दर्शविण्यात आलेले दरांबाबत तसेच गौण खनिज वहनावळ दरांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता येत नाही. त्यामुळे अंदाजपत्रकातील दर लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

02) करारनामा अट क्र.27 नुसार कामाचा दोष निवारण कालावधी (Defect Liability Period) हा 6 महिन्यांचा ठेवण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण 2011/प्र.क्र.467/रस्ते-1, दिनांक 21/11/2011 नुसार असा दोष निवारण कालावधी हा 2 वर्षांचा असणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कालावधीमध्ये कामामध्ये काही दोष निर्माण झाल्यास व त्यावर दुरुस्तीकरिता खर्च करण्याची आवश्यकता भासल्यास महानगरपालिकेवर दायित्व वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास येते.

03) कामाचे आदेश दिनांक 30/11/2016 रोजी देण्यात आलेले आहेत, तथापी काम पूर्ण झाल्याचे प्रतिवृत्तानुसार काम सुरु झाल्याचा दिनांक 20/01/2017 असा नमुद करण्यात आलेला आहे. निविदेसोबत कंत्राटदाराचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र क्र.9886, दिनांक 21/12/2013 जोडण्यात आलेले असून त्यानुसार नोंदणीचा कालावधी हा 12/12/2016 रोजी संपलेला आहे. त्यानंतर कामाची सुरुवात करण्यात आलेली दिसून येते. तथापी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्राची मुदत नुतनीकरण करुन प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले दिसून येत नाही. म्हणजेच कंत्राटदार नोंदणीचा कालावधी संपल्यानंतरही कंत्राटदाराकडून नियमबाह्यपणे काम करवून घेण्यात आलेले आहे.

04) सदरचे कामाचे अंदाजपत्रकानुसार बाब क्र.16 ते 24 मधील बाबी ह्या विद्युतीकरणाची संबंधित असून त्याची एकूण रक्कम रु.275758/- इतकी आहे व प्रत्यक्षात झालेल्या कामाची किंमत रु.279342/- इतकी आहे. त्यानुसार सदरचे काम हे विद्युत कंत्राटदाराकडून करणे आवश्यक होते, तथापी कंत्राटानुसार सदरचे काम हे बांधकाम कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आलेले असून त्यांची विद्युत कंत्राटदार म्हणून नोंदणीबाबतचे अभिलेखे संचिकेमध्ये जोडण्यात आलेले

दिसून येत नाही, त्यामुळे सदरची बाब ही नियमबाह्य ठरते. तसेच सदरचे कामावर महानगरपालिकेच्या विद्युत अभियंता यांनी देखरेख करणे, मोजमापे नोंदविणे व कामाचे दर्जाबाबत प्रमाणित करणे आवश्यक होते, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही.

05) मुख्य अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांचे पत्र क्र.CE (Eelc)/Desk-3-5/HDM/206/2016 दिनांक 28/07/2016 अन्वये Rayon Illuminations या कंपनीचे साहित्य वापरास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापी सदर कामामध्ये सदर कंपनीचे किंवा इतर ISI मार्क असलेले साहित्य वापरण्यात आलेले असल्याबाबतचा कोणताही अहवाल किंवा तांत्रिक चाचणी अहवाल जोडण्यात आलेला नाही, त्यामुळे कंत्राटदाराने वापरलेले साहित्य हे योग्य दर्जाचे वापरलेले असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये खात्री करता आली नाही, व परिणामी अशा प्रकारे योग्य दर्जाचे साहित्य वापरलेले नसल्यास महानगरपालिकेचे नुकसान होण्याची शक्यताही राहते.

06) संचिकेमध्ये कामाचे तुलनात्मक विवरणपत्र जोडण्यात आलेले असून त्यानुसार काही बाबींवर बचत तर काही बाबींवर जादा खर्च करण्यात आलेला आहे. तथापी अशा वाढ किंवा बचत बाबतची कोणतीही कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही.

07) कामाची अंदाजपत्रकीय व प्रशासकीय मान्यता रक्कम रु.999666/- इतकी होती. सदर कामाची निविदा 3.01 टक्के कमी दराने स्विकृत करण्यात आली त्यानुसार काम रु.969576/- इतक्या रकमेमध्ये पूर्ण करणे आवश्यक होते. प्रत्यक्षात मुळ काम हे रु.890591/- इतक्या रकमेचे करण्यात आलेले असून त्यामधून मंजूर निविदा दर 3.01% प्रमाणे रु.26807/- वजा जाता रु.863784/- इतक्या रकमेमध्ये काम पूर्ण करण्यात आलेले आहे. म्हणजे अंदाजपत्रकीय व प्रशासकीय मान्यता रकमेतून रु.135882/- इतकी बचत झालेली दिसून येते. तथापी तुलनात्मक विवरणपत्रामध्ये रु.105792/- इतकी बचत दर्शविण्यात आलेली आहे. तसेच सदर बचतीची रक्कम रु.135882/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे रक्कम भरणा करण्यात आली किंवा कसे याबाबत आवश्यक अभिलेखांसह अनुपालन दर्शविण्यात यावे.

08) सदरचे कामामध्ये पेव्हर ब्लॉक बसविण्यात आलेले आहे, तथापी त्यांची चाचणी अहवाल प्राप्त करण्यात आलेले नाहीत, त्यामुळे वापरण्यात आलेले साहित्य हे योग्य दर्जाचे असल्याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली

नाही. परिणामी भविष्यात या कामाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

09) गौण खनिज स्वामित्वधन रक्कम परिगणना करतांना जिल्हा दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे गुणक देण्यात आलेले आहे, तसेच शासन अधिसूचना दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे, त्यानुसार परिगणना करण्यात येऊन गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम देयकामधून कपात करणे आवश्यक होते, तथापी संबंधित कंत्राटदार यांनी गौण खनिजचे पास/परवाने जोडलेले नाही किंवा देयकामधून रक्कम कमी कपात करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर गौण खनिज स्वामित्व धनाची खालीलप्रमाणे रक्कम रु.896/- वसुलपात्र ठरते. बाब क्र.24 नुसार विद्युत पोलकरिता सिमेंट काँक्रीट पाया 14 नग दर्शविण्यात आलेले असून त्याचे परिमाण दर्शविण्यात आलेले नाही, त्यामुळे 14 नगांचे 14 घमी परिमाण विचारात घेऊन खालीलप्रमाणे परिगणना करण्यात येत आहे. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रक्कम वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	दर	एकूण परिणाम	स्वामित्वधन		
				साहित्य	साहित्य वापराचा फॅक्टर	फॅक्टर नुसार परिमाण
2	Providing laying in situ C.C. 1:4:8	3586.6	20.02	रेती	0.45	9.01
3	Providing casting M20 for beam	7303.62	18.88	रेती	0.45	8.50
4	Providing laying M20 RCC element	5219.38	5.52	रेती	0.45	2.48
7	Providing casting in situ C.C. M15	4563.12	3.00	रेती	0.45	1.35
24	Providing Cement Concrete Foundation.	1320.00	14.00	रेती	0.45	6.30
	एकूण गौण खनिज वापराचे परिमाण					27.64

	गौण खनिज स्वामित्व धन दर					141.34
	गौण खनिज स्वामित्व धन रक्कम					3906
	कपात केलेली रक्कम					3010
	उर्वरित वसुलपात्र रक्कम					896

10) सदर कामाची मोजमापे ही मोजमाप पुस्तिका क्र.ए-200 मध्ये नोंदविण्यात आलेली आहेत, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही. त्यामुळे देयकामधील मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे करण्यात आलेला खर्च हा लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.71 दिनांक 02/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
09	गौण खनिज स्वामित्वधन	896

FDSDNBM7201 (Ref No : 58, Hmm No : 71)

50 वार्ड क्र.34 मध्ये अयोध्यानगर भागात नॅशनल हायवे क्र6 जळगांव स.नं.135 पासून ते मेहरुण स.नं.40 भाग पर्यंतचा डी.पी.रस्ता रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे

योजना : महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 254066.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान

प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.452, दि.05/01/2016 रु.3913918/- (अ.क्र.1) मनपा हिस्सा - रु.1956959/-, शासन हिस्सा रु.1956959/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.354, दि.20/10/2015, रु.3913918/-
दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.3913918/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.135 दि.16/03/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवाजी गणपत भंगाळे, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 15/09/2016)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 13/04/2017 (भौतिकदृष्ट्या)
चाचणी अहवाल	1) दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (साबां) नाशिक क्षेत्रिय प्रयोग शाळा जळगांव यांचे पत्र क्र.1446, दि.17/12/2016 2) श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी पत्र क्र.70/17-1, दि.3/2/2017
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय धावते देयक	तृतीय व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	05, दि.17/1/2017 (रु.946238/-) शासन हिस्सा 02, दि.8/5/2017 (रु.946237/-) मनपा	07, दि.23/03/2017 रु.799823/- (शासन हिस्सा) 04, दि.12/07/2017 रु.799823/- (मनपा हिस्सा)	पुढील आर्थिक वर्षामध्ये प्रदान

	हिस्ससा		
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	क्र.04 पृ.क्र.110 ते 119	क्र.04 पृ.क्र.120 ते 123	
स्थूल रक्कम	1892475	1599646	
वजा मंजूर निविदा दर (3.01%)	0	0	
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	0	
एकूण स्थूल रक्कम	1892475	1599646	
वजाती -			
गौण खनिज स्वामित्वधन	67818	0	
सुरक्षा रक्कम	189248	159965	
आयकर	43527	36792	
जीएसटी/व्हॅट	37850	31993	
कामगार उपकर	18925	15996	
विमा	18925	15996	
दंड 1%	18925	15996	

एकूण वजाती	395218	276738	
निव्वळ देय	1497257	1322908	

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.39.53 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.3500/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.3100/- चे फ्रँकिंग मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडूनवसुल करण्यात येऊन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

02) सदर कामाचे संचिकेमध्ये दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले असून सदर दरपृथ:करण पत्रकावर संबंधित कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांची स्वाक्षरी करण्यात आलेली आहे, तथापी सहायक अभियंता तसेच शहर अभियंता यांची स्वाक्षरी घेण्यात येऊन मान्यता घेण्यात आलेली दिसून येत नाही. म्हणजेच संचिकेमध्ये जोडण्यात आलेल्या दरपृथ:करण पत्रकावर सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता न घेता त्यामधील दर अंदाजपत्रक तयार करण्याकरिता वापरण्यात आलेले असल्याचे निदर्शनास येते.

03) करारनामा अट क्र.27 नुसार कामाचा दोष निवारण कालावधी (Defect Liability Period) हा 6 महिन्यांचा ठेवण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण 2011/प्र.क्र.467/रस्ते-1, दिनांक 21/11/2011 नुसार असा दोष निवारण कालावधी हा 2 वर्षांचा असणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कालावधीमध्ये कामामध्ये काही दोष निर्माण झाल्यास व त्यावर दुरुस्तीकरिता खर्च करण्याची आवश्यकता भासल्यास महानगरपालिकेवर दायित्व वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास येते.

04) करारनामा अट क्र.28 नुसार काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम पूर्ण झालेनंतर असे तीन टप्प्यांमधील फोटो तसेच काम पूर्ण झाल्यानंतर बोर्ड लावणे आवश्यक राहील. तथापी फक्त काम सुरु असतांनाचे फोटो लावण्यात आलेले आहेत, काम सुरु करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो तसेच माहिती फलक लावण्यात आलेला दिसून येत नाही. तसेच माहिती फलक लावलेला नसतांनाही तुलनात्मक विवरणपत्रानुसार रु.3201/- कंत्राटदारास प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरचे प्रदान हे वसुलपात्र ठरते. तरी सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

05) कामाची मुदत 6 महिने म्हणजे दिनांक 15/09/2016 पर्यंत होती, तथापी कंत्राटदाराने त्यांचे पत्र दि.26/09/2016 अन्वये कार्यारंभ आदेश हे पावसाळ्यामध्ये दिले होते व डांबरी कामे पावसाळ्यात करु नये आदेश आदेश होते, त्यामुळे पावसाळ्याचे चार महिने काम करता आले नाही, तरी दि.31/12/2016 पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी अशा आशयाचे विनंती पत्र सादर केले. तथापी त्यावर मनपाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली दिसून आली नाही. तसेचसदरचे काम विहित मुदतीनंतर पूर्ण करण्यात आलेले असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे विभागामार्फत मुदतवाढीबाबत कार्यवाही करण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

06) मंजूर कंत्राटानुसार कामाची किंमत रु.3913918/- अशी आहे. त्यानुसार कामाचा विमा 1% प्रमाणे रु.39139/- प्रथम देयकामधून कपात करणे आवश्यक असतांना प्रत्येक धावते देयकामधून देयक रकमेवर कपात करण्यात येत आहे. त्यामुळे शासकीय विमा काढण्याचा उद्देश सफल होत नाही.

07) गौण खनिज स्वामित्वधन रक्कम परिगणना करतांना जिल्हा दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे गुणक देण्यात आलेले असून त्यानुसार परिगणना करण्यात आलेली नाही, त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.17800/- वसुलपात्र ठरते. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रक्कम वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	परिमाण	गुणक	गौण खनिज परिमाण
4	Spreading oversized 40 mm metal	360.12	1.25	450.15
5	Spreading soft murum	119.7	1.30	155.61
	एकूण	**479.82**		**605.76**
	गौण खनिज दर	141.34		141.34
	गौण खनिज रक्कम	67817.76		85618.12
	वसुलपात्र रक्कम			**17800.36**

08) बाब क्र.1 नुसार रस्त्याचे खोदकाम करण्यात आलेले आहे. तसेच बाब क्र.3 नुसार कामासाठी मुरुम आणण्यात आलेला आहे. स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशन मधील Bd.A.1.2 नुसार खोदकामातून निघालेले साहित्यामधून उपयोगी व निरुपयोगी साहित्य वेगळे काढण्यात येऊन उपयोगी साहित्य कामाचे जागेपासून 50 मीटर अंतराचे आंत स्टॅक करण्यात यावा व कामामध्ये भरावासाठी वापरण्यात यावा अशी तरतुद आहे. तथापी बाब क्र.1 नुसार खोदकामातून 551.60 चौ.मी. साहित्य काढण्यात आलेले असून सदर साहित्याच्या वापराबाबत संचिकेमध्ये उल्लेख दिसून येत नाही. त्यामुळे सदरचे साहित्यापोटी 551.60x141.34= 77963/- गौण खनिज स्वामित्वधन संबंधित कंत्राटदाराकडून

वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन शासन खाती भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

09) वस्तु व सेवा कर कायद्यानुसार जीएसटी करप्रणाली दिनांक 01/07/2017 पासून अंमलात आली. शासकीय कार्यकंत्राटामध्ये जीएसटी प्रणाली लागू करणेबात वित्त विभाग शासन निर्णय क्र.जीएसटी-1017/प्र.क्र.155/कराधान-1, दिनांक 11/09/2017 मधील अ.क्र.4 नुसार चालू कामांचे बाबतीत कराच्या भारामध्ये वृद्धी वा घट झाल्यामुळे कंत्राटाच्या किंमतीत वृद्धी वा घट होऊ शकते, त्यामुळे करावयाचा बदल कंत्राटामध्ये उल्लेख केलेल्या अटी व शर्तींवर अवलंबून असेल, कंत्राटाबाबत अटी व शर्ती वेगवेगळ्या असतील त्यामुळे प्रत्येक विभागाने कंत्राटाची प्रत विधी व न्याय विभागाकडून तपासून बदललेल्या कररचनेमुळे कंत्राटाच्या किंमतीतून कराचा भार कमी झाल्यामुळे वजावट करता येईल किंवा कराचा भार वाढल्यामुळे किंमत वाढवून देता येईल याबाबत अभिप्राय घ्यावेत अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. वरीलप्रमाणे कंत्राटदाराची देयके अदा करण्यापूर्वी सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर कामाचे दुसरे धावते देयकातील मनपा हिश्श्याची रक्कम दिनांक 12/07/2017 रोजी अदा करण्यात आलेली असून वरील शासन निर्णयांमधील तरतुदीनुसार सदर देयकामधून जीएसटी-टीडीएस कपात करणे आवश्यक होते, तथापी सदर देयकामधून व्हॅट कपात करण्यात आलेला आहे. त्यामुळे शासन निर्णयाचे पालन करण्यात आलेले नाही. तरी शासन निर्णय दिनांक 11/09/2017 नुसार कार्यवाही करण्यात येऊन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

10) त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण हे काम सुरु असतांना किंवा काम पूर्ण झाल्यानंतर ताल्काळ करुन घेणे आवश्यक आहे, जेणेकरुन कामामध्ये काही दोष राहिल्यास संबंधित कंत्राटदार यांचेकडून ताल्काळ सुधारणा करणे शक्य होईल. सदरचे काम दिनांक 13/04/2017 रोजी पूर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेने त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करणेबाबत पत्र दिनांक 04/07/2017 रोजी व त्यानंतर दिनांक 09/01/2018 रोजी तांत्रिक तपासणी फीचा भरणा केलेला आहे व त्यानुसार प्रत्यक्ष चाचणीकरिता स्थळ पाहणी दिनांक 03/01/2018 रोजी म्हणजे जवळ जवळ 9 महिन्यांच्या विलंबाने करण्यात आलेली आहे. म्हणजेच अशा प्रकारे त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण हे करारनाम्यानुसार दोष दायित्व कालावधी संपल्यानंतर करण्यात आलेले असल्याने अशा प्रकारे कामामध्ये दोष निर्माण झालेला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची दुरुस्ती करण्याबाबतची जबाबदारी कंत्राटदारावर राहत नाही, यामुळे विहित कालावधीमध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेण्याची जबाबदारी पार पाडण्यात आलेली दिसून येत नाही.

11) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन जळगांव यांचेकडील त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण अहवालामधील Section D - Work Proper अंतर्गत अ.क्र.11 Whether all other test of materials which are being Used, are taken as per Frequency ? समोर Test reports of M-25 Cubes casted on 02/08/2017 Tested on 03/02/2016 तसेच Section G- OBSERVATIONS अंतर्गत अ.क्र.3 Execution progress of work (i) Testing of Materials समोर Test results at Laboratory of C.C.M-15 cubes are found satisfactory असे नमूद करण्यात आलेले आहे. सदरचे काम हे रस्ते डांबरीकरणाचे असून सदर कामामध्ये कोणतेही सिमेंट कॉंक्रीटचे काम करण्यात आलेले नाही

तथापी वरील अहवालामध्ये सिमेंट काँक्रीट क्यूबच्या चाचणी घेण्यात आलेले असल्याबाबत नमुद आहे. त्याचप्रमाणे Section A General मधील अ.क्र.9 Date of Inspection समोर 03/01/2018 व Section E Site Visit मधील अ.क्र.1 Date of Inspection समोर 11/01/2018 अशा वेगवेगळ्या तारखा नमुद आहेत. त्यामुळे सदरच्या अहवालाबाबत लेखापरीक्षणामध्ये साशंकता निर्माण होते.

12) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2005/प्र.क्र.-187/रा.म.-2, दिनांक 08/10/2007 मधील (अ) नुसार ज्या कामासाठी ठेकेदार डांबर रिफायनरीतून प्राप्त करणार आहे अशा डांबर प्राप्तीचे वेळापत्रक क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देणे ठेकेदारास बंधनकारक राहील, डांबराचे प्रापण सरकरी तेल कंपन्यांच्या रिफायरीमधून प्राप्त करण्यात यावे. तथापी याप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्याबाबतची कागदपत्रे संचिकेमध्ये लावण्यात आलेली नाहीत. त्यामुळे कामामध्ये योग्य दर्जाचे डांबराचा वापर करण्यात येत असल्याबाबत संबंधित अभियंता वेळीच कार्यवाही केलेली नसल्याचे स्पष्ट होते.

13) वरील शासन निर्णय दिनांक 08/10/2007 नुसार रिफायनरीमधून डांबराचा बाऊझर ठेकेदाराचे प्लॉन्टवर पोहोचल्यानंतर संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी रिफायनरीकडून प्राप्त चलन व डिलीव्हरी मेमोच्या मूळ प्रतीवरुन डांबराची प्रत लेखी स्वरुपात मोजमाप पुस्तिकांत नोंदविणे आवश्यक आहे, तसेच क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी प्लान्टवर आलेल्या डांबराच्या बाऊझरमधील डांबराचे चाचणी नमुने गोळा करुन डांबराची प्रत तपासून लेखी स्वरुपात नोंदवावी, तसेच (क) नुसार रिफिायनरीमधून निर्गमित झालेल्या बाऊझरमधील डांबराची प्रत वरीलप्रमाणे चाचणी अहवानानुसार जुळत असल्याची खात्री झाल्यावर संबंधित ठेकेदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीमध्ये डांबराचा बाऊझर प्लान्टवर रिकामा करण्याची लेखी परवानगी क्षेत्रिय अधिकारी देतील, अन्यथा हे डांबर कामासाठी न वापरण्याबाबत देखील ठेकेदारास लेखी निर्देश देतील. (ड) नुसार कामनिहाय प्लान्टवर एक नोंदवही ठेवण्यात येऊन त्यामध्ये बाऊझर क्रमांक, चलन क्रमांक, डिलीव्हरी मेमो क्रमांक, डांबराचे वजन, ग्रेड तपासणी व चाचणी अधिकाऱ्यांचे नांव इत्यादी तपशिल नमुद करण्यात येईल. तथापी अशा प्रकारे कार्यवाही करण्यात आल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे संचिकेमध्ये ठेवण्यात आलेले नाहीत.

14) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 2016/प्र.क्र.320/रस्ते-1, दिनांक 01/07/2016 मधील तरतुदीनुसार ज्या कामासाठी ठेकेदार डांबर रिफायनरीतून प्राप्त करणार आहे त्या रिफायनरीने दिलेले इनव्हाईस/मुळ गेळ पासची प्रत व रिफायनरीने ऑनलाईन उपलब्ध करुन दिलेले डिस्पॅच डिटेल्स पडताळणी करण्यासाठी ई-मेलद्वारे संबंधित रिफायनरीस पाठविण्यात यावेत, असे इनव्हाईस/मुळ गेट पास बनावट असल्याचे आढळून आल्यास संबंधित कंत्राटदारांवर कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना आहेत. तथापी याप्रमाणे मुळ इनव्हाईस/गेट पास कंत्राटदाराने सादर केलेले नसल्याचे तसेच त्यांची संबंधित अभियंता यांनी मागणी करुन तपासणी करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे संचिकेवरुन दिसून येते.त्यामुळे डांबर वापराबाबत वरीलप्रमाणे शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नसल्याचे तसेच योग्य दर्जाचे डांबर वापराबाबत पडताळणी करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते.

15) सदर कामामध्ये खडी व मुरुम वापरण्यात आलेले आहे, तथापी सदर साहित्यांचे चाचणी अहवाल प्राप्त करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदर साहित्य हे योग्य दर्जाचे वापरण्यात आलेले असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

16) बाब क्र.4 नुसार खडी पसरविणे व बाब क्र.5 नुसार मुरुम पसरविणेचे अनुक्रमे 360.12 चौ.मी. व 119.70 चौ.मी. काम करण्यात आलेले आहे. स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिणामामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रु.1575/- जादा प्रदान झालेले असून सदर रक्कम जबाबदारी निश्चित करण्यात येऊन वसुल करण्यात यावी व शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

बाब क्र.	तपशिल	मोजमापा नुसार परिमाण	10% दबाईकरिता कमी करणे आवश्यक असलेले परिमाण	दर	वसुलपात्र रक्कम
3	Spreading 40 mm metal	360.12	36.01	36.75	1323.37
4	Sperading Soft Murum	119.70	11.97	21.00	251.37
	एकूण वसुलपात्र रक्कम				**1574.74**

17) मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे प्रशासकीय मान्यता आदेशानुसार 4 कामाची शासन हिश्याची एकूण रक्कम रु.53.00 लक्ष मंजूर करण्यात आलेले आहेत, त्यानुसार सदर रक्कम रु.53.00 लक्ष एचडीएफसी बँक चेक क्र.47 दिनांक 23/06/2016 अन्वये प्राप्त झाली असून दिनांक 28/06/2016 रोजी खात्यामध्ये जमा करण्यात आलेले दिसून येतात. यामध्ये वरील कामाची रक्कम रु.1956959/- मंजूर असून त्यापैकी रु.946238/- व 799823/- अशी एकूण रु.1746061/- इतकी खर्च करण्यात आलेली आहे व रु.210898/- शिल्लक राहते. सदर शिल्लक रक्कम शासनाकडे जमा करण्यात आल्याचे तसेच उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले असल्याचे रोखवहीवरुन व संचिकेवरुन दिसून येत नाही.

18) रेट ॲनालेसीस नुसार डांबराचे बाबींमध्ये लीड चार्जेस 425 कि.मी. घेण्यात आलेले आहे, म्हणजेच सदरचे दर हे मुंबई रिफायनरीचे घेण्यात आलेले आहेत. तसेच या बाबीसाठी डांबराचे प्रत्यक्ष वापराचे वेळेचे दर विचारात घेण्यात आलेले नाहीत. डीएसआर सर्वसाधारण टिपणी अ.क्र.4.7 तरतुदीनुसार दर कमी दर असल्यास त्यानुसार वसुली करणे आवश्यक आहे. तथापी डांबर खरेदीची देयके जोडलेली नाहीत, त्यामुळे सदरचे दर देय ठरत नाहीत त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्याचप्रमाणे खालील बाबींच्या तपशिलानुसार 40 mm crushed metal चा वापर करण्यात आलेला आहे, तथापी दरपृथ:करण पत्रकामध्ये 40 mm पेक्षा जास्त व 40 mm पेक्षा कमी अशा दोन्ही प्रकारच्या खडीचा लिड दर्शविण्यात आलेले दिसून येतात, त्यामुळे जादा प्रदान झालेले आहे. असे जादा

प्रदान खालीलप्रमाणे वसुलपात्र ठरतो, तरी सदर रक्कम रु.153127/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व त्याप्रमाणे चलनाच्या प्रतीसह मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	एकूण दिलेला दर	40 मीमी पेक्षा जास्त खडी वहनावळ दर	डांबराचे लिड चार्जेस	एकूण वसुलपात्र दर	दुसऱ्या धावते देयकापर्यंतचे मोजमाप परिमाण	वसुलपात्र रक्कम
7	Providing laying 75 mm. thick BBM road surface spreading 40 mm. stone metal (crushed) layer	231.71	15.68	3.83	19.51	2398.81	46800.78
8	Providing laying 50 mm thk compacted BBM over existing BT surface. Spreading 40 mm. size metal (crushed metral)	193.40	10.45	4.3	14.75	540.00	7965.00
9	Providing laying 75 mm thick BBM road surface, spreading 40 mm. stone metal (crushed)	260.03	15.68	4.78	20.46	3399.46	69552.95
10	Providing hot mix hot laid 25 mm. thick premix bituminous carpet over existing BBM surface	251.54	0.00	4.53	4.53	6359.41	28808.13
	एकूण वसुलपात्र रक्कम						**153126.86**

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.72 दिनांक 02/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	400
04	माहितीफलक	**3201**

07	गौणखनिज	**17800**
08	खोदकाम मटेरियल	**77963**
16	दबाई	**1575**
18	वहनावळ	**153127**
	एकूण	**254066**

FDSDNBM7201 (Ref No : 59, Hmm No : 72)

51 मेहरुण स.नं.29अ अजिंठा सोसायटी मध्ये रस्ते डांबरीकरण करणे

योजना : दलीत वस्ती सुधार योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 87313.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	दलीत वस्ती सुधार योजना
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.628, दि.20/02/2016 (अ.क्र.5) रक्कम रु.2463000/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.375, दि.26/11/2015, रु.2463000/-
दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.2463000/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.76 दि.09/12/2016

कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवाजी गणपत भंगाळे, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 08/06/2017)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.26)
कामाची स्थिती	काम पूर्ण (भौतिकदृष्ट्या)
चाचणी अहवाल	1) दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (साबां) नाशिक क्षेत्रिय प्रयोग शाळा जळगांव यांचे पत्र क्र.1757, दि.02/01/2016 2) श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी पत्र क्र.70/17-2, दि.3/2/2017
देयकांचा तपशिल	

प्रमाणक क्रमांक व दिनांक	12, दि.21/01/2017	17, दि.27/02/2017	पुढील आर्थिक वर्षामध्ये प्रदान
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	क्र.80 पृ.क्र.92 ते 95	क्र.80 पृ.क्र.95 ते 98	
स्थूल रक्कम	1157465	1030328	
मंजूर निविदा दर	0	0	
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	0	
एकूण स्थूल रक्कम	1157465	1030328	
वजाती -			
गौण खनिज स्वामित्वधन	22205	0	
सुरक्षा रक्कम	115747	103033	
आयकर	26622	23698	

जीएसटी/व्हॅट	23149	20607	
कामगार उपकर	11575	10303	
विमा	11575	10303	
दंड 1%	0	0	
एकूण वजाती	210873	167944	
निव्वळ देय	946592	862384	

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.नामप/संक्र 39/नवि 26, दिनांक 16/03/2009 तसेच विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनि 2314, दिनांक 31/03/2015 मधील सुचनांनुसार कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी कामाचा विमा उतरवुन विमापत्राची प्रत महानगरपालिकेस सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा कंत्राटदाराचे प्रथम देयकामधून कंत्राटी कामाच्या 1% प्रमाणे रक्कम कपात करुन विमा संचालनालयाकडे भरणा करण्यात यावी अशा स्पष्ट सूचना आहे. मंजूर कंत्राटानुसार कामाची किंमत रु.2463000/- अशी आहे. त्यानुसार कामाचा विमा 1% प्रमाणे रु.24630/- प्रथम देयकामधून कपात करणे आवश्यक असतांना प्रत्येक धावते देयकामधून देयक रकमेवर कपात करण्यात येत आहे. त्यामुळे शासकीय विमा काढण्याचा उद्देश सफल होत नाही, त्याचप्रमाणे शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास येते.

02) करारनामा अट क्र.26 नुसार कामाचा दोष निवारण कालावधी (Defect Liability Period) हा 6 महिन्यांचा ठेवण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण 2011/प्र.क्र.467/रस्ते-1, दिनांक 21/11/2011 नुसार असा दोष निवारण कालावधी हा 2 वर्षांचा असणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कालावधीमध्ये कामामध्ये काही दोष निर्माण झाल्यास व त्यावर दुरुस्तीकरिता खर्च करण्याची आवश्यकता भासल्यास महानगरपालिकेवर दायित्व वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास येते.

03) करारनामा अट क्र.27 नुसार काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम पूर्ण झालेनंतर असे तीन टप्प्यांमधील फोटो तसेच काम पूर्ण झाल्यानंतर बोर्ड लावणे आवश्यक राहील. तथापी फक्त काम सुरु असतांनाचे फोटो लावण्यात आलेले आहेत, काम सुरु करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो तसेच माहिती फलक लावण्यात आलेला दिसून येत नाही. तसेच माहिती फलक लावलेला नसतांनाही तुलनात्मक विवरणपत्रानुसार रु.3201/- कंत्राटदारास प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरचे प्रदान हे वसुलपात्र ठरते. तरी सदर रक्कम संबंधित

कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

04) गौण खनिज स्वामित्वधन रक्कम परिगणना करतांना जिल्हा दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे गुणक देण्यात आलेले असून त्यानुसार परिगणना करण्यात आलेली नाही, त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.5828/- वसुलपात्र ठरते. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रक्कम वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	परिमाण	गुणक	गौण खनिज परिमाण
2	Supplying 40 mm metal	117.80	1.25	147.25
5	Supplying Soft Murum	39.30	1.30	51.09
	एकूण	**157.1**		**198.34**
	गौण खनिज दर	141.34		141.34
	गौण खनिज रक्कम	22205		28033
	वसुलपात्र रक्कम			**5828**

05) बाब क्र.1 नुसार रस्त्याचे खोदकाम करण्यात आलेले आहे. तसेच कामासाठी बाब क्र.2 नुसार खडी व बाब क्र.3 नुसार मुरुम आणण्यात आलेला आहे. स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशन मधील Bd.A.1.2 नुसार खोदकामातून निघालेले साहित्यामधून उपयोगी व निरुपयोगी साहित्य वेगळे काढण्यात येऊन उपयोगी साहित्य कामाचे जागेपासून 50 मीटर अंतराचे आंत स्टॅक करण्यात यावा व कामामध्ये भरावासाठी वापरण्यात यावा अशी तरतुद आहे. तथापी बाब क्र.1 नुसार खोदकामातून 196.81चौ.मी. साहित्य काढण्यात आलेले असून सदर साहित्याच्या वापराबाबत संचिकेमध्ये उल्लेख दिसून येत नाही. त्यामुळे असे साहित्य न वापरता खडी व मुरुमावर स्वतंत्रपणे खर्च करण्यात आलेला असल्यामुळे मनपा निधी व शासन निधीचे त्या-त्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. तरी सदर खोदकामातून काढण्यात आलेल्या साहित्यापोटी 196.81 x 141.34 = 27817/- गौण खनिज स्वामित्वधन रक्कम वसुलपात्र ठरते, सदर रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन शासन खाती चलनाने भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडून सादर करण्यात यावा.

06) त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण हे काम सुरु असतांना किंवा काम पूर्ण झाल्यानंतर तात्काळ करुन घेणे आवश्यक आहे, जेणेकरुन कामामध्ये काही दोष राहिल्यास संबंधित कंत्राटदार यांचेकडून तात्काळ सुधारणा करणे शक्य होईल. तथापी काम दिनांक 13/05/2017 रोजी पूर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेने त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करणेबाबत पत्र दिनांक 04/07/2017 रोजी व त्यानंतर दिनांक 09/01/2018 रोजी तांत्रिक तपासणी फीचा भरणा व प्रत्यक्ष

चाचणीकरिता स्थळ पाहणी दिनांक 08/01/2018 रोजी म्हणजे काम पूर्ण झाल्यानंतर जवळ जवळ 8 महिन्यांच्या विलंबाने करण्यात आलेली आहे.म्हणजेच अशा प्रकारे त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण हे करारनाम्यानुसार दोष दायित्व कालावधी संपल्यानंतर करण्यात आलेले असल्याने अशा प्रकारे कामामध्ये दोष निर्माण झालेला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची दुरुस्ती करण्याबाबतची जबाबदारी कंत्राटदारावर राहत नाही, यामुळे विहित कालावधीमध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेण्याची जबाबदारी पार पाडण्यात आलेली दिसून येत नाही.

07) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2005/प्र.क्र.-187/रा.म.-2, दिनांक 08/10/2007 मधील (अ) नुसार ज्या कामासाठी ठेकेदार डांबर रिफायनरीतून प्राप्त करणार आहे अशा डांबर प्राप्तीचे वेळापत्रक क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देणे ठेकेदारास बंधनकारक राहील, डांबराचे प्रापण सरकरी तेल कंपन्यांच्या रिफायरीमधून प्राप्त करण्यात यावे. तथापी याप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्याबाबतची कागदपत्रे संचिकेमध्ये लावण्यात आलेली नाहीत. त्यामुळे कामामध्ये योग्य दर्जाचे डांबराचा वापर करण्यात येत असल्याबाबत संबंधित अभियंता वेळीच कार्यवाही केलेली नसल्याचे स्पष्ट होते.

08) वरील शासन निर्णय दिनांक 08/10/2007 नुसार रिफायनरीमधून डांबराचा बाऊझर ठेकेदाराचे प्लॉन्टवर पोहोचल्यानंतर संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी रिफायनरीकडून प्राप्त चलन व डिलीव्हरी मेमोच्या मूळ प्रतीवरुन डांबराची प्रत लेखी स्वरुपात मोजमाप पुस्तिकांत नोंदविणे आवश्यक आहे, तसेच क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी प्लान्टवर आलेल्या डांबराच्या बाऊझरमधील डांबराचे चाचणी नमुने गोळा करुन डांबराची प्रत तपासून लेखी स्वरुपात नोंदवावी, तसेच (क) नुसार रिफिायनरीमधून निर्गमित झालेल्या बाऊझरमधील डांबराची प्रत वरीलप्रमाणे चाचणी अहवानानुसार जुळत असल्याची खात्री झाल्यावर संबंधित ठेकेदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीमध्ये डांबराचा बाऊझर प्लान्टवर रिकामा करण्याची लेखी परवानगी क्षेत्रिय अधिकारी देतील, अन्यथा हे डांबर कामासाठी न वापरण्याबाबत देखील ठेकेदारास लेखी निर्देश देतील. (ड) नुसार कामनिहाय प्लान्टवर एक नोंदवही ठेवण्यात येऊन त्यामध्ये बाऊझर क्रमांक, चलन क्रमांक, डिलीव्हरी मेमो क्रमांक, डांबराचे वजन, ग्रेड तपासणी व चाचणी अधिकाऱ्यांचे नांव इत्यादी तपशिल नमुद करण्यात येईल. तथापी अशा प्रकारे कार्यवाही करण्यात आल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे संचिकेमध्ये ठेवण्यात आलेले नाहीत.

09) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 2016/प्र.क्र.320/रस्ते-1, दिनांक 01/07/2016 मधील तरतुदीनुसार ज्या कामासाठी ठेकेदार डांबर रिफायनरीतून प्राप्त करणार आहे त्या रिफायनरीने दिलेले इनव्हाईस/मुळ गेळ पासची प्रत व रिफायनरीने ऑनलाईन उपलब्ध करुन दिलेले डिस्पॅच डिटेल्स पडताळणी करण्यासाठी ई-मेलद्वारे संबंधित रिफायनरीस पाठविण्यात यावेत, असे इनव्हाईस/मुळ गेट पास बनावट असल्याचे आढळून आल्यास संबंधित कंत्राटदारांवर कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना आहेत. तथापी याप्रमाणे मुळ इनव्हाईस/गेट पास कंत्राटदाराने सादर केलेले नसल्याचे तसेच त्यांची संबंधित अभियंता यांनी मागणी करुन तपासणी करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे संचिकेवरुन दिसून येते. त्यामुळे डांबर वापराबाबत वरीलप्रमाणे शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नसल्याचे तसेच योग्य दर्जाचे डांबर वापराबाबत पडताळणी करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते.

10) बाब क्र.4 नुसार खडी पसरविणे व बाब क्र.5 नुसार मुरुम पसरविणेचे अनुक्रमे 117.80 चौ.मी. व 39.30 चौ.मी. काम करण्यात आलेले आहे. स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिणामामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रु.515/- जादा प्रदान झालेले असून सदर रक्कम जबाबदारी निश्चित करण्यात येऊन वसुल करण्यात यावी व शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

बाब क्र.	तपशिल	मोजमापा नुसार परिमाण	10% दबाईकरिता कमी करणे आवश्यक असलेले परिमाण	दर	वसुलपात्र रक्कम
3	Spreading 40 mm metal	117.80	11.78	36.75	432.92
4	Sperading Soft Murum	39.30	3.93	21.00	82.53
	एकूण वसुलपात्र रक्कम				**515.45**

11) सदर कामाचे संचिकेमध्ये दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले असून सदर दरपृथ:करण पत्रकावर संबंधित कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांची स्वाक्षरी करण्यात आलेली आहे, तथापी सहायक अभियंता तसेच शहर अभियंता यांची स्वाक्षरी घेण्यात येऊन मान्यता घेण्यात आलेली दिसून येत नाही. म्हणजेच संचिकेमध्ये जोडण्यात आलेल्या दरपृथ:करण पत्रकावर सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता न घेता त्यामधील दर अंदाजपत्रक तयार करण्याकरिता वापरण्यात आलेले असल्याचे निदर्शनास येते.

12) रेट ॲनालेसीस नुसार डांबराचे बाबींमध्ये लीड चार्जेस 425 कि.मी. घेण्यात आलेले आहे, म्हणजेच सदरचे दर हे मुंबई रिफायनरीचे घेण्यात आलेले आहेत. तसेच या बाबीसाठी डांबराचे प्रत्यक्ष वापराचे वेळेचे दर विचारात घेण्यात आलेले नाहीत. डीएसआर सर्वसाधारण टिपणी अ.क्र.4.7 तरतुदीनुसार दर कमी दर असल्यास त्यानुसार वसुली करणे आवश्यक आहे. तथापी डांबर खरेदीची देयके जोडलेली नाहीत, त्यामुळे सदरचे दर देय ठरत नाहीत त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

13) त्याचप्रमाणे खालील बाबींच्या तपशिलानुसार 40 mm crushed metal चा वापर करण्यात आलेला आहे, तथापी दरपृथ:करण पत्रकामध्ये 40 mm पेक्षा जास्त व 40 mm पेक्षा कमी अशा दोन्ही प्रकारच्या खडीचा लिड दर्शविण्यात आलेले दिसून येतात, त्यामुळे जादा प्रदान झालेले आहे. असे जादा प्रदान खालीलप्रमाणे वसुलपात्र ठरतो, तरी सदर रक्कम रु.49952/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व त्याप्रमाणे चलनाच्या प्रतीसह मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

बाब	बाब	एकूण दिलेला	40 मीमी पेक्षा जास्त	डांबराचे लिड	एकूण वसुलपात्र	दुसऱ्या धावते देयकापर्यंतचे	वसुलपात्र

क्रमांक		दर	खडी वहनावळ दर	चार्जेस	दर	मोजमाप परिमाण	रक्कम
7	Providing laying 75 mm. thick BBM road surface spreading 40 mm. stone metal (crushed) layer	231.71	15.68	3.83	19.51	785.50	15325.11
8	Providing laying 75 mm thick BBM road surface spreading 40 mm. stone metal (crushed)	260.03	15.68	4.78	20.46	785.50	16071.33
9	Providing hot mix hot laid 25 mm. thick premix bituminous carpet over existing BBM surface	251.54	0.00	4.53	4.53	4096.08	18555.24
	एकूण वसुलपात्र रक्कम						**49951.68**

14) डांबर चाचणीचे अहवाल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग बांभोरी जळगांव यांचेकडील प्राप्त करण्यात आले असून, चाचणीपोटी रक्कम रु.5460/- पावती क्र.2563 अन्वये भरणा केलेली आहे. सदर पावतीबाबतचा उल्लेख महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजना अंतर्गत वार्ड क्र.34 मध्ये अयोध्यानगर भागात नॅशनल हायवे क्र.6 जळगांव स.नं.135 पासून ते मेहरुण स.नं.40 भाग पर्यंतचा डी.पी.रस्ता रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे या कामातील डांबर चाचणी अहवालामध्येही दिसून येतो. तसेच सदर दोनही कामांचे चाचणीकरिता मनपा कार्यालयाचे पत्राचे संदर्भ नमुद करण्यात आलेले नाहीत, तसेच पत्राच्या स्थळ प्रती लावण्यात आलेल्या दिसून येत नाही, त्यामुळे चाचणी अहवालाबाबत साशंकता निर्माण होते.

15) मा.प्रधान सचिव, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी मुंबई यांचे मा.जिल्हाधिकारी यांना दिलेले पत्र क्र.नपप्रसं/2015/प्र.क्र.71/का-08, दिनांक 7/12/2015 नुसार नगरपरिषदांकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेतांना त्यांना नगरपरिषदेने यापूर्वी मागील दहा वर्षात या योजनेतून घेतलेली कामे नकाशात दर्शवून ती त्यांनी सादर केली पाहिले जेणेकरुन त्यांच्या प्रस्तावांची तपासणी होत असतांना यापूर्वी अशा प्रकारची कामे घेण्यात आलेली आहेत किंवा कसे हे स्पष्ट होईल अशा सूचना दिलेल्या आहेत. तथापी प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करतांना अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही, त्याऐवजी प्रस्ताव सादर करावयाच्या पत्रामध्ये फक्त मागील 10 वर्षात कोणत्याही योजने अंतर्गत कामे झालेली नाही असे नमूद करण्यात आलेले आहे.

16) सदर कामाची मोजमापे नोंदविण्यात आलेली मोजमाप पुस्तिका क्र.80 लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे मोजमापे व देयके याबाबत पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.73 दिनांक 02/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
03	माहितीफलक	3201
04	गौण खनिज स्वामित्वधन	5828
05	खोदकाम साहित्य वापर	27817
10	दबाई	515
13	खडी वहणावळ	49952
	एकूण	**87313**

FDSDNBM7201 (Ref No : 60, Hmm No : 73)

52 प्र.क्र.32 मेहरुण स.नं.17/2ब/1 डॉ.झाकीर हुसेन को-ऑप. सोसायटीमधील रस्ते डांबरीकरण करणे

योजना : नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	अल्पसंख्याक निधी
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.348, दि.23/05/2016 रु.1018403/- (अ.क्र.4)
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.451, दि.22/02/2016, रु. 1018403/-
दरसूची वर्ष	2015-2016

कामाची अंदाजित किंमत	रु.1018403/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.101 दि.29/12/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवाजी गणपत भंगाळे जळगांव (3.11% कमी दराने)
परफॉर्मन्स सिक्युरिटी	मनपा पावती क्र.16333 दि.19/10/2016 रु.10184/-
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 28/06/2017)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	16/05/2017 (भौतिक दृष्ट्या पूर्ण)
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी पत्र क्र.--, दि.15/7/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय व व अंतिम
प्रमाणक क्रमांक व दिनांक	06, दि.01/03/2017	पुढील आर्थिक वर्षात प्रदान
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	क्र.009 पृ.क्र.177-179, 183 ते 185	
स्थूल रक्कम	761392	
मंजूर निविदा दरानुसार कपात	-23679	
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	
एकूण स्थूल रक्कम	737713	
वजाती -		
गौण खनिज स्वामित्वधन	40515	

सुरक्षा रक्कम	73771	
आयकर	16967	
जीएसटी/व्हॅट	14754	
कामगार उपकर	7377	
विमा	7377	
दंड 1%	00	
एकूण वजाती	160761	
निव्वळ देय	576952	

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) सदर कामाचे संचिकेमध्ये दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही त्यामुळे दरसूचीतील दर व अंदाजपत्रकातील दर याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही, तरी अंदाजपत्रकातील दर लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

02) सदर कामाचे दुसरे व अंतिम देयक लेखापरीक्षण कालावधीमध्ये प्रदान करण्यात आलेले नाही, लेखापरीक्षण कालावधीमध्ये म्हणजे दिनांक 16/05/2017 रोजी काम पूर्ण झालेले असल्याने तुलनात्मक विवरणपत्राची तपासणी करण्यात आली असता मोठ्या प्रमाणांत वाढ/घट झालेली असल्याचे दिसून येते तथापी अशा वाढ किंवा बचत बाबत कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत. नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. तसेच त्यानुसार सदर कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.1018403/- इतकी होती, प्रत्यक्षात झालेल्या एकूण काम रु.1016077/- मधून कमी दराच्या निविदेनुसार रु.31600/- वजा जाता रु.984477/- इतक्या रकमेत झाले असून अधिक त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी रु.12017/- असे एकूण रु.996494/- इतके प्रदान करण्यात आलेले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करिता कोणतीही तरतुद करण्यात आलेली दिसून येत नाही, त्यामुळे सदरचा खर्च हा मनपा निधीमधून करणे आवश्यक होते. सदर कामाकरिता प्रशासकीय मान्यतेनुसार प्राप्त निधी रु.1018403/- इतका असून प्रत्यक्षात निव्वळ काम कमी किंमतीत म्हणजे रु.984477/- इतक्या किंमतीमध्ये झालेले आहे, म्हणजेच रु.33926/- हा खर्च हा शिल्लक राहतो. वरीलप्रमाणे शिल्लक अनुदान रु.33926/- शासनाकडे चलनाने जमा करणे आवश्यक होते, त्यानुसार

कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे दिसून येते. तसेच अंदाजपत्रक तयार करणेपूर्वी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण करुन तंतोतंत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही.

03) वरील कामाचे दरपृथ:करण पत्रक व दरसूची लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, तथापी दरसूचीमध्ये डांबराचे दर हे मुंबई येथील शासकीय रिफायनरीचे घेण्यात येतात, असे दर हे अंदाजपत्रक तयार करतांना किंवा प्रत्यक्ष डांबर खरेदी करतांना कमी किंवा जादा झाल्यास त्याप्रमाणे कमी किंवा जादा करणे आवश्यक आहे. तसेच शासकीय रिफायनरीव्यतिरिक्त इतर ठिकाणांहून डांबर खरेदी करण्यात येऊ नये असे शासनाचे आदेश आहेत व त्याकरिता कंत्राटदाराने खरेदी केलेल्या डांबराचे इन्व्हॉईसच्या मुळ प्रती देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेले दर हे दरसूचीमधील दर व प्रत्यक्ष अंदाजपत्रक तयार करतेवेळी व डांबर खरेदीच्या वेळी यामध्ये खरेदी दरांबाबत तुलना करण्यात आली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी होऊ शकली नाही. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेले दर तसेच त्यांकरिता देण्यात आलेले वहनावळीचे दर हे लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

04) अंदाजपत्रकानुसार बाब क्र.7 मध्ये डांबर 80/100 ग्रेडचे वापरणे आवश्यक आहे, तथापी चाचणी अहवालानुसार फक्त 60/70 ग्रेडचे डांबराची चाचणी करण्यात आलेली आहे, त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये नमूद डांबराच्या प्रतीचा वापर करण्यात आलेला नसल्याचे दिसून येते. सदर बाबीकडे संबंधित बांधकाम अभियंता यांनी दुर्लक्ष केलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. कमी प्रतीच्या डांबराचा वापर करण्यात आल्यास रस्त्याच्या टिकाऊपणा राहणार नाही व परिणामी भविष्यात सदर रस्ता लवकरच खराब होण्याची शक्यता राहील. तसेच कमी प्रतीचा डांबराचा वापर केलेला असल्याने त्याप्रमाणे सबंधित कंत्राटदार यांचेकडून दरसूचीमधील दरानुसार परिगणना करण्यात येऊन वसुली करण्यात यावी व योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.75 दिनांक 02/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 62, Hmm No : 75)

53 प्र.क्र.22 अंतर्गत भोईटे गल्ली, भावसार मढी, चौधरी वाडा येथील रस्ते काँक्रीटीकरण कर

योजना : नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 12162.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	नागरी दलीत वस्ती सुधार योजना

प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.628, दि.20/12/2016 रु.1000000/ (अ.क्र.1)
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.377, दि.27/11/2015, रु.1000000/-
दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.1000000/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.40 दि.4/8/2016
कंत्राटदाराचे नांव	यश बिल्डर्स ॲण्ड कंस्ट्रक्शन्स कं. जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 3/2/2017)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	05/11/2016
चाचणी अहवाल	दक्षता व गुणनियंत्रण मंडळ क्षेत्रिय प्रयोगशाळा जळगांव पत्र क्र.971 दि.15/9/2015
देयकांचा तपशिल	

	प्रथम व अंतिम देयक देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	11, दि.13/01/2017
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	138 पृ.क्र.31 ते 32
स्थूल रक्कम	978759
मंजूर निविदा दरानुसार कपात	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	11500
एकूण स्थूल रक्कम	990259
वजाती -	
गौण खनिज स्वामित्वधन	0
सुरक्षा रक्कम	97876

आयकर	22511
जीएसटी/व्हॅट	19575
कामगार उपकर	9788
विमा	9788
एकूण वजाती	159538
निव्वळ देय	830721

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.10.0 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.500/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.100/- चे फ्रँकिंग मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी.

02) शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे, तथापी गौण खनिज स्वामित्वधन रक्कम परिगणना करण्यात आलेली नाही. बाब क्र.2 C.C.M-20 या बाबीचे परिमाणानुसार 184.92 x 0.45 = 83.22 x 141.34 = 11762 प्रमाणे वसुली करणे आवश्यक आहे. तरी सदरची रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व त्याप्रमाणे चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

03) तुलनात्मक विवरणपत्राची तपासणी करण्यात आली असता मोठ्या प्रमाणांत वाढ/घट झालेली असल्याचे दिसून येते तथापी अशा वाढ किंवा बचत बाबत कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत. नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, सदर कामामध्ये मुळ बाबी ऐवजी दुसऱ्या बाबीचे काम करण्यात आलेले दिसून येते, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. सदर कामाकरिता प्रशासकीय मान्यतेनुसार प्राप्त निधी रु.1000000/- इतका असून प्रत्यक्षात निव्वळ काम कमी किंमतीत म्हणजे रु.978759/- इतक्या किंमतीमध्ये झालेले आहे, म्हणजेच रु.21241/- इतका निधी शिल्लक राहतो. वरीलप्रमाणे शिल्लक अनुदान रु.21241/- शासनाकडे चलनाने जमा करणे आवश्यक होते, त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे दिसून येते. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होते असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही. नियम 265 नुसार जेव्हा महत्वाची संरचनात्मक फेररचना करण्याची आवश्यकता असते व त्याकरिता जरी वाढीव खर्चाची आवश्यकता नसली तरी, तेंव्हा मूळ

मंजूरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याचे आदेश घेण्यात यावेत. नियम 271 नुसार बांधकामाच्या कार्यक्रमाची आखणी अशा रीतीने करण्यात यावी की, पावळ्यापूर्वी ती बांधकामे सुरक्षित अवस्थेत आणली जातील आणि पावसाळ्यात त्या बांधकामाच्या कुठल्याची भागास नुकसान पोहचणार नाही.

04) सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करिता कोणतीही तरतुद करण्यात आलेली दिसून येत नाही, त्यामुळे सदरचा खर्च हा मनपा निधीमधून करणे आवश्यक होते. तथापी सदरचा खर्च रक्कम रु.11500/- योजनेच्या शिल्लक रकमेमधून पर्यायाने व्याजाच्या रकमेमधून करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीव्यतिरिक्त जादा झालेला खर्च हा परस्पर योजनेमधील कामावर वापरण्यात आलेला असल्याने शासन आदेशाचे उल्लंघन झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

05) सदरचे काम दिनांक 5/11/2016 रोजी पूर्ण झालेले आहे, तथापी त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता मा.प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन जळगांव यांना पत्र क्र.753 दिनांक 9/12/2016 रोजी देण्यात येऊन त्यानुसार त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाचा अहवाल मा.प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन जळगांव यांचे पत्र क्र.43 दिनांक 5/1/2017 अन्वये प्राप्त झालेला आहे व त्यामध्ये स्थळ पाहणीचा दिनांक 3/1/2017 असा नमुद करण्यात आलेला आहे. म्हणजे काम पूर्ण झाल्यानंतर 2 महिन्यांच्या कालावधीनंतर त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आलेले असल्याचे दिसून येते.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.76 दिनांक 02/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	400
02	गौण खनिज स्वामित्वधन	11762
	एकूण	**12162**

FDSDNBM7201 (Ref No : 63, Hmm No : 76)

54 प्र.क्र.10 मध्ये गुरुदत्त कॉलनी श्री.स्वामी समर्थ गल्ली ते डॉ.रितेश पाटील यांच्या गल्लीत रस्ता काँक्रीटीकरण करणे

योजना : आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.सुरेश दामु भोळे) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 14369.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.सुरेश दामु भोळे)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव यांचे आदेश क्र.1698, दिनांक 31/05/2016 (अ.क्र.5) रु.9.99 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.01, दि.20/04/2016, रु.999017/-
दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.999017/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.59 दि.6/10/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.सुशिलकुमार गणपत डोंगरे, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 05/4/2017)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 01/04/2017
चाचणी अहवाल	जोडलेले नाही.
देयकांचा तपशिल	

	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	11, दि.30/6/2017
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	एफ-86, पृ.क्र.176
स्थूल रक्कम	999000
मंजूर निविदा दरानुसार कपात	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0
एकूण स्थूल रक्कम	999000
वजाती -	

गौण खनिज स्वामित्वधन	0
सुरक्षा रक्कम	99918
आयकर	22981
जीएसटी/व्हॅट	19984
कामगार उपकर	9992
विमा	9992
एकूण वजाती	162867
निव्वळ देय	836133

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) सदर कामाचे देयकामध्ये गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना करण्यात येऊन शासन खाती भरणा करण्यात आलेली दिसून येत नाही. शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे. त्यानुसार देयकामधून सुधारित दराने गौण खनिज स्वामित्वधन रक्कम कपात करणे आवश्यक असतांना गौण खनिज स्वामित्वधन रक्कम कपात करण्यात आलेली नाही, त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.14369/- वसुलपात्र ठरत असून संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	दर	परिमाण	Royalty (15/5/2015 पासून रु.141.34)			
				साहित्य	फॅक्टर	फॅक्टर नुसार परिमाण	रक्कम
1	Providing laying CC 1:4:8 for foundation	3586.60	112.014	रेती	0.45	50.41	7124.95
2	Providing laying CC M-20 for foundation	5245.63	113.891	रेती	0.45	51.25	7243.70
	एकूण रक्कम					**101.66**	**14368.65**
	वसुल केलेली रक्कम						**00**
	वसुलपात्र रक्कम						**14369**

02) सदर कामाची मोजमापे ही मोजमाप पुस्तिका क्र.एफ-86 मध्ये नोंदविण्यात आलेली आहेत, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही. त्यामुळे देयकामधील मोजमापांबाबत लेखापरीक्षणात

पडताळणी करता आली नाही. त्यामुळे करण्यात आलेला खर्च हा लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.77 दिनांक 02/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	गौण खनिज स्वामित्वधन	14369

FDSDNBM7201 (Ref No : 64, Hmm No : 77)

55 प्र.क्र.32 मेहरुण स.नं.2+3/2+4ए+डी+4सी2 व स.नं.11/2/2बी मधील रस्ते डांबरीकरण करणे

योजना : अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्र विकास कार्यक्रम **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 35181.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्र विकास कार्यक्रम
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.348, दि.23/05/2016 (अ.क्र.3) रक्कम रु.717895/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.450, दि.22/2/2016, रु.717895/-
दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.717895/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.100 दि.29/12/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवाजी गणपत भंगाळे, जळगांव (3.11% कमी दराने)
परफॉर्मन्स सिक्युरिटी	मनपा पावती क्र.16336 दि.18/10/2016 रु.7178/-
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 28/06/2017)

दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	16/05/2017 (भौतिकदृष्ट्या पूर्ण)
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी पत्र क्र.70/24-2, दि.14/2/2017
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	07, दि.1/3/2017	पुढील आर्थिक वर्षामध्ये प्रदान
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	क्र.ए09 पृ.क्र.180 ते 183	
स्थूल रक्कम	648518	
मंजूर निविदा दरानुसार कपात	-20169	
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	
एकूण स्थूल रक्कम	628349	
वजाती -		
गौण खनिज स्वामित्वधन	20254	
सुरक्षा रक्कम	62835	
आयकर	14452	
जीएसटी/व्हॅट	12567	
कामगार उपकर	6283	
विमा	6283	
दंड 1%	0	
एकूण वजाती	122674	
निव्वळ देय	505675	

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज

स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे. त्यानुसार गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना करणे आवश्यक आहे, तसेच गौण खनिज स्वामित्वधन रक्कम परिगणना करतांना जिल्हा दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे गुणक देण्यात आलेले असून त्यानुसार परिगणना करण्यात आलेली नाही, त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.5265/- वसुलपात्र ठरते. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रक्कम वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	कपात केले नुसार परिमाण	गुणक	वसुलपात्र गौण खनिज परिमाण
2	Supplying 40 mm metal	114.80	1.25	143.50
5	Supplying Soft Murum	28.50	1.30	37.05
	एकूण	**143.3**		**180.55**
	गौण खनिज दर	141.34		141.34
	गौण खनिज रक्कम	20254		25519
	वसुलपात्र रक्कम			**5265**

02) बाब क्र.4 नुसार खडी पसरविणे व बाब क्र.5 नुसार मुरुम पसरविणेचे अनुक्रमे 114.80 चौ.मी. व 28.50 चौ.मी. काम करण्यात आलेले आहे. स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिणामामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही.

03) दर पृथ:करणपत्रकानुसार डांबराचे बाबींमध्ये लीड चार्जेस 425 कि.मी. घेण्यात आलेले आहे, म्हणजेच सदरचे दर हे मुंबई रिफायनरीचे घेण्यात आलेले आहेत. तसेच या बाबीसाठी डांबराचे प्रत्यक्ष वापराचे वेळेचे दर विचारात घेण्यात आलेले नाहीत. डीएसआर सर्वसाधारण टिपणी अ.क्र.4.7 तरतुदीनुसार दर कमी दर असल्यास त्यानुसार वसुली करणे आवश्यक आहे. तथापी डांबर खरेदीची देयके जोडलेली नाहीत, त्यामुळे सदरचे दर देय ठरत नाहीत. त्याचप्रमाणे खालील बाबींच्या तपशिलानुसार 40 mm crushed metal चा वापर करण्यात आलेला आहे, तथापी दरपृथ:करण पत्रकामध्ये 40 mm पेक्षा जास्त व 40 mm पेक्षा कमी अशा दोन्ही प्रकारच्या खडीचा लिड दर्शविण्यात आलेले दिसून येतात, त्यामुळे जादा प्रदान झालेले आहे. असे जादा प्रदान खालीलप्रमाणे वसुलपात्र ठरतो, तरी सदर रक्कम रु.26715/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व त्याप्रमाणे चलनाच्या प्रतीसह मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	एकूण दिलेला दर	40 मीमी पेक्षा जास्त खडी वहनावळ दर	डांबराचे लिड चार्जेस	एकूण वसुलपात्र दर	पहिल्या धावते देयकापर्यंतचे मोजमाप परिमाण	वसुलपात्र रक्कम

7	Providing laying 75 mm. thick BBM road surface, spreading 40 mm. stone metal (crushed) layer.	231.71	15.68	3.83	19.51	1111.26	21680.70
8	Providing hot mix hot laid 25 mm. thick premix bituminous carpet over existing BBM surface.	251.54	0.00	4.53	4.53	1111.26	5034.00
	एकूण वसुलपात्र रक्कम						**26714.70**

04) करारनामा अट क्र.28 नुसार काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम पूर्ण झालेनंतर असे तीन टप्प्यांमधील फोटो तसेच काम पूर्ण झाल्यानंतर बोर्ड लावणे आवश्यक राहील. तथापी फक्त काम सुरु असतांनाचे फोटो लावण्यात आलेले आहेत, काम सुरु करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो तसेच माहिती फलक लावण्यात आलेला दिसून येत नाही. तसेच माहिती फलक लावलेला नसतांनाही तुलनात्मक विवरणपत्रानुसार रु.3201/- कंत्राटदारास प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरचे प्रदान हे वसुलपात्र ठरते. तरी सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

05) कामाची अंदाजपत्रकीय व प्रशासकीय मान्यता रक्कम रु.717895/- इतकी होती. सदर कामाची निविदा 3.11 टक्के कमी दराने स्विकृत करण्यात आली त्यानुसार काम रु.695568/- इतक्या रकमेमध्ये पूर्ण करणे आवश्यक होते. तथापी जादा परिमाण नोंदविण्यात येऊन प्रत्यक्ष काम रु.717887/- इतक्या किंमतीमध्ये करण्यात आलेले आहे. त्यामुळे रु.22319/- इतक्या रकमेचे काम जादा करण्यात आलेले दिसून येते. कमी दराने निविदा स्विकृत केल्यानंतर वाढीव काम करुन त्यावर खर्च करणेत आलेला असल्याने कंत्राटदाराचे हित जोपासले जात असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. जादा करण्यात आलेला खर्च रु.22319/- हा मनपा निधीमधून करणे आवश्यक होते, तथापी सदरचा खर्च योजनेच्या रकमेमधून करण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होते असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही. तसेच नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही. तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीपैकी कमी दराची निविदा स्विकृत केल्यामुळे अशी रक्कम शिल्लक राहत असून त्यामधून वाढीव खर्चाची रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे, सदर बाब नियमबाह्य ठरते. त्याचप्रमाणे तुलनात्मक विवरणपत्रामध्ये रु.8.66 इतकी रक्कम निव्वळ शिल्लक राहत असल्याचे दर्शविण्यात आलेले आहे, सदरची बाबही नियमबाह्य ठरते.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.78 दिनांक 02/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र

		रकमा
02	गौण खनिज स्वामित्वधन	5265
03	डांबर वहनावळ	26715
04	माहितीफलक़	3201
	एकूण	**35181**

FDSDNBM7201 (Ref No : 65, Hmm No : 78)

56 चौदाव्या वित्त आयोगामधून शौचालय दुरुस्तीच्या कामावरील खर्चाबाबत

योजना : चौदावा वित्त आयोग **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 130866.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. चौदाव्या वित्त आयोगांतर्गत लेखापरिक्षण कालावधीमध्ये जळगांव शहरातील विविध भागांमध्ये सार्वजनिक शौचालय दुरुस्त्यांची कामे करण्यात आलेली आहे. अर्धसमास पत्र क्र.86 दिनांक 7/11/2023 व अर्धसमास पत्र क्र.90 दिनांक 24/11/2023 अन्वये शौचालय दुरुस्तीच्या कामांबाबत विवरणपत्रामध्ये माहिती मागविण्यात आली होती, तथापी माहिती उपलब्ध झाली नाही. याबाबत काही कामांच्या संचिका व काही कामांची वित्त विभागाकडील देयके तपासणी करण्यात आली, त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	कामाचे नांव	कंत्राटदाराचे नांव	प्रमाणक क्रमांक व दिनांक	केलेल्या कामाची किंमत व प्रत्यक्ष अदा रक्कम	जादा दराने समाविष्ट रक्कम (अदा करणे बाकी)	एकूण देय रक्कम	वसुलपात्र कामगार उपकर 1%	वसुल-पात्र वस्तु व सेवा कर टीडीएस 2%	वसुलपात्र गौण खनिज स्वामित्वधन	एकूण वसुलपात्र रक्कम
1	वा.क्र.16 बाजारपट्टा महिला सार्वजनिक शौचालय दुरुस्ती	श्री.संदेश टेकाडे जळगांव	135, दि.16/10/2017	89266	4463	93729	937	1875	0	2812
2	वा.क्र.16 बाजारपट्टा पुरुष	श्री.संदेश टेकाडे	136, दि.16/10/201	89266	4463	93729	937	1875	0	2812

	सार्वजनिक शौचालय दुरुस्ती	जळगांव	7							
3	वा.क्र.32 मधील सार्व.शौचालय दुरुस्ती करणे	श्री.संदेश टेकाडे जळगांव	185, दि.4/12/2017	416386	20819	437205	0	8744	0	8744
4	वा.क्र.32 मेहरुण अंतर्गत जोशीवाडा लक्ष्मीनगर येथील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती	श्री.संदेश टेकाडे जळगांव	186, दि.4/12/2017	295722	14786	310508	0	6210	660	6870
5	वा.क्र.32 मेहरुण अंतर्गत कुंभारवाडा सार्वजनिक शौचालय दुरुस्ती	श्री.संदेश टेकाडे जळगांव	187, दि.4/12/2017	198422	9922	208344	0	4167	1026	5193
6	वा.क्र.31,33,34 मधील सार्व. शौचालय दुरुस्ती करणे	श्री.संदेश टेकाडे जळगांव	188, दि.4/12/2017	526167	26308	552475	0	11050	0	11050
7	प्र.क्र.37 समता नगर भागातील बौद्धवाडा परिसरातील शौचालय दुरुस्ती व रंगकाम	श्री.संदेश टेकाडे जळगांव	204, दि.12/12/2007	227538	11382	238920	2389	4778	0	7167
8	प्र.क्र.37 मध्ये समता नगर भागातील वंजारी टेकडी येथील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती व रंगकाम	श्री.संदेश टेकाडे जळगांव	206, दि.12/12/2017	100189	5009	105198	1052	2104	392	3548
9	प्र.क्र.37 अंतर्गत समता नगर भागातील	श्री.संदेश टेकाडे	207, दि.12/12/201	223400	11170	234570	2346	4691	0	7037

	हनुमान मंदीराजवळील सार्व. शौचालय दुरुस्ती व रंगाकाम	जळगांव	7							
10	प्र.क्र.5 अंतर्गत खेडी नाला तलाठी कार्यालय व वैकुंठधाम जवळील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती व रंगकाम	श्री.संदेश टेकाडे जळगांव	208, दि.12/12/2017	283890	14194	298084	2981	5962	0	8943
11	प्र.क्र.23 अंतर्गत कासमवाडी (पांचाळवस्ती) जपवळील सार्व. शौचालय दुरुस्ती व रंगकाम करणे	श्री.कय्युम नवाज शेख जळगांव	209, दि.12/12/2017	192461	9623	202084	2021	4042	0	6063
12	वा.क्र.30 तांबापुरा भागातील गवळी वाड्यातील सार्व. शौचालय दुरुस्ती व रंगकाम	मे.प्रणव कंस्ट्रक्शन्स, जळगांव	253, दि.1/1/2018	203078	10154	213232	2132	4265	0	6397
13	वा.क्र.30 फुकटपुरा भागातील सार्व. शोचालय दुरुस्ती व रंगकाम	मे.प्रणव कंस्ट्रक्शन्स, जळगांव	254, दि.1/1/2018	268850	13443	282293	2823	5646	0	8469
14	वा.क्र.20,24,25, 26 नवल कॉलनीमधील सार्व. शौचालय दुरुस्ती	श्री.अभिजीत गणपत डोंगरे	284, दि.23/1/2018	519883	25994	545877	5459	10918	0	16377
15	प्र.क्र.21	श्री.संदेश	345,	896868	44843	941711	9417	18834	1133	29384

	मन्यारवाडा येथील सार्व. शौचालय दुरुस्तीसह रंगकाम करणे व पाण्याची टाकी बांधणे	टेकाडे जळगांव	दि.23/3/2018							
	एकूण			**4531386**	**226573**	**475795 9**	**32494**	**95161**	**3211**	**130866**

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

01) अर्धसमास पत्र क्र.86 दिनांक 7/11/2023 व अर्धसमास पत्र क्र.90 दिनांक 24/11/2023 अन्वये मागणी करण्यात आलेली शौचालय बांधकाम व दुरुस्तीबाबत माहिती उपलब्ध झाले नाही, त्यामुळे वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेल्या शौचालयांचे मुळ बांधकामे केंव्हा करण्यात आलीत, त्यावर यापूर्वी दुरुस्तीची कामे करण्यात आली किंवा कसे, आतापर्यंत दुरुस्तीपोटी किती खर्च करण्यात आला याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

02) तपासणी करण्यात आलेल्या कामांचे दरपृथ:करण जोडण्यात आलेले नसल्यामुळे अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेले दरांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. त्यामुळे अंदाजपत्रकातील दर लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

03) तपासणी करण्यात आलेल्या कामांच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत, त्यामुळे देयकांमधील मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही. परिणामी कामांवर करण्यात आलेला खर्च हा लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

04) वस्तु व सेवा कर कायद्यानुसार जीएसटी करप्रणाली दिनांक 01/07/2017 पासून अंमलात आली. शासकीय कार्यकंत्राटामध्ये जीएसटी प्रणाली लागू करणेबात वित्त विभाग शासन निर्णय क्र.जीएसटी-1017/प्र.क्र.155/कराधान-1, दिनांक 11/09/2017 मधील अ.क्र.4 नुसार चालू कामांचे बाबतीत कराच्या भारामध्ये वृद्धी वा घट झाल्यामुळे कंत्राटाच्या किंमतीत वृद्धी वा घट होऊ शकते, त्यामुळे करावयाचा बदल कंत्राटामध्ये उल्लेख केलेल्या अटी व शर्तींवर अवलंबून असेल, कंत्राटाबाबत अटी व शर्ती वेगवेगळ्या असतील त्यामुळे प्रत्येक विभागाने कंत्राटाची प्रत विधी व न्याय विभागाकडून तपासून बदललेल्या कररचनेमुळे कंत्राटाच्या किंमतीतून कराचा भार कमी झाल्यामुळे वजावट करता येईल किंवा कराचा भार वाढल्यामुळे किंमत वाढवून देता येईल याबाबत अभिप्राय घ्यावेत अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. वरीलप्रमाणे कंत्राटदारांची देयके अदा करण्यापूर्वी सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच देयकांमधून जीएसटी-टीडीएस कपात करण्यात आलेले नाहीत त्यामुळे शासन कर महसुलाचे नुकसान झालेले आहे, तसेच जीएसटी-टीडीएस कपात करण्यात न आल्यामुळे कंत्राटदारास रु.95161/- जादा प्रदान करण्यात आलेले असून सदर रक्कम वसुलपात्र ठरते. तरी वरीलप्रमाणे तपासणी करण्यात आलेल्या देयकांमधून तसेच अशाच प्रकारे इतर देयकामधून जीएसटी-टीडीएस परिगणना करण्यात येऊन संबंधित कंत्राटदारांकडून वसुल करण्यात याव्यात व शासन खाती चलनाने भरणा करण्यात येऊन त्याबाबतचे जीएसटीआर-7 व जीएसटीआर-7ए दाखल करण्यात यावे.

05) तपासणी करण्यात आलेल्या कामांचे देयकांमधून गौण खनिज कपात करण्यात आलेल्या दिसून येत नाही, तसेच संबंधित कंत्राटदाराने गौण खनिज वाहतुक पास व परवाना पत्र सादर केलेले नाही, त्यामुळे शासन

महसुलाची हानी झालेली आहे. शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे. वरील विवरणानुसार काही कामांचे गौण खनिज कपात करण्यात आलेल्या आहेत, तथापी काही कामांच्या संचिका तपासणी करण्यात आलेल्या नसल्यामुळे त्याबाबत परिगणना करुन रक्कम दर्शविण्यात आलेली नाहीत, तथापी त्यांचे देयकामधून गौण खनिज स्वामित्वधनाच्या रकमा कपात करण्यात आलेल्या नसल्यामुळे रकमा एकूण रु.3211/- वसुलपात्र ठरतात. संबंधिzwj;त कंत्राटदार यांनी गौण खनिज वाहतुक पास, परवाना पत्रे जोडलेली नसल्याने वरीलप्रमाणे तपासणी करण्यात आलेल्या देयकांमधून तसेच अशाच प्रकारे इतर देयकामधून गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना करण्यात येऊन संबंधित कंत्राटदारांकडून वसुल करण्यात याव्यात व शासन खाती चलनाने भरणा करण्यात येऊन मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

06) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ दिनांक 17/06/2010 मधील अ.क्र.3(1) अन्वये बांधकाम मुल्यावर 1% कामगार उपकर वसुल करणे, अ.क्र.3(3) नुसार नोंदवही ठेवणे व मासिक विवरण पुढील महिन्याच्या 10 तारखेपूर्वी अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांचेकडे पाठवणे आवश्यक आहे जेणेकरुन त्यांना जमा झालेल्या रकमेचा ताळमेळ घेणे शक्य होईल, तथापी वरीलप्रमाणे तपासणी करण्यात आलेल्या देयकांची कामगार उपकराची एकूण रक्कम रु.32494/- वसुलपात्र ठरते, तसेच अशाच प्रकारे इतर देयकामधून कामगार उपकराची परिगणना करण्यात येऊन संबंधित कंत्राटदारांकडून वसुल करण्यात येऊन शासन खाती चलनाने भरणा करण्यात यावे वरील शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

07) वरीलप्रमाणे सर्व कामांच्या निविदा वाटाघाटीअंती 5% जादा दराने स्विकृत करण्यात आलेल्या आहेत. देयके अदा करतांना अशा जादा दराच्या रकमा संबंधित कंत्राटदार यांना लेखापरीक्षण वर्षामध्ये अदा करण्यात आलेल्या दिसून आल्या नाही. जादा दराने निविदा स्विकृत करण्यात आलेल्या असल्यामुळे अशा जादा दराच्या रकमा योजनेच्या निधीमधून खर्ची न टाकता मनपा निधीमधून खर्च करणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.98 दिनांक 30/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
04	वस्तू सेवा कर	95161
05	गौण खनिज स्वामित्वधन	3211
06	कामगार कल्याण उपकर	32494
	एकूण	**130866**

FDSDNBM7201 (Ref No : 66, Hmm No : 98)

57 मेहरुण सर्वे नं.83/2 नाल्यापासून ते हॉटेल वासुमित्रा समोरील रोडपर्यंतचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे

योजना : आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.सुरेश दामु भोळे) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 67833.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	खासदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.ए.टी.पाटील खासदार)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.1423, दिनांक 20/07/2015 रु.560000/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता क्र.22, दिनांक 10/6/2015 रु.560000/-
दरसूची वर्ष	2014-2015
कामाची अंदाजित किंमत	रु.560000/-
निधी वितरण तपशिल	मा.जिल्हा नियोजन समिती यांचेकडून पत्र क्र.1290 दिनांक 12/4/2016 रु.553549/-
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	आदेश क्र.107 दिनांक 4/2/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवाजी गणपत भंगाळे, जळगांव (15% जादा दराने)
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 04/08/2016
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.26)
कामाची स्थिती	काम पूर्ण
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्ट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग टेक्नॉलॉजी, बांभोरी जळगांव पत्र क्र.67/20-1, दिनांक 12/2/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	03 दि.18/4/2016
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	18, पृ.क्र.160-165
कामाची एकूण किंमत	553549
मंजूर निविदा दर (+15 %)	83032
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0
देय रक्कम	636581
वजाती -	
1% विमा	6366
1% कामगार उपकर	6366
10% सुरक्षा रक्कम	63658
2% जीएसटी/व्हॅट	12732
2.33% आयकर	14641
गौण खनिज स्वामित्वधन	24098
एकूण वजाती	127861
निव्वळ देय रक्कम	508720

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.6.44 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.500/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.100/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/-

चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते.

02) सदर कामाचे अंदाजपत्रक 2014-15 चे दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. कामाचे अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाहीत. त्यामुळे दरांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता येत नाही. त्यामुळे दरसूचीनुसार देय दर गृहीत धरण्यात येऊन अंदाजपत्रकाच्या गोषवा-यामध्ये देण्यात आलेले दर हे जादा देण्यात आलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत असून अशी जादा दिलेली रक्कम एकूण रु.67433/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुलपात्र ठरते.

दरसूची मधील अ. क्र.	बाब क्र.	बाब तपशिल	अंदाजपत्रक व देयकानुसार			दरसूचीनुसार			दरसूची दरानुसार रक्कम	वसुलपात्र रक्कम
			परिमाण	दर	रक्कम	दर	5% म.न.पा हद्दी करिता वाढ	एकूण देय दर		
	1	Excavation of roadway in earth, soil.	33.97	63.00	2140.11	63.00	0.00	63.00	2140.11	0.00
1145	2	Supplying trap/granit/quartzite gneiss stone metal.	67.85	606.38	41142.88	130.00	6.50	136.50	9261.53	31881.36
1149	3	Supplying soft murum at the road side	33.80	427.58	14452.20	37.00	1.85	38.85	1313.13	13139.07
1154	4	Spreading 40 mm metal including sectioning complete.	67.85	25.20	1709.82	24.00	1.20	25.20	1709.82	0.00
1153	5	Spreading gravel/sand/soft murum/ hard murum.	33.80	14.70	496.86	14.00	0.70	14.70	496.86	0.00
	6	compacting the oversize metal layer	679.50	8.40	5707.80	8.40	0.00	8.40	5707.80	0.00
	7	Royalty charges	0.00	70.67	0.00	70.67	3.53	74.20	0.00	0.00

1365	8	Providing and laying 50 mm thick compated bitumen bound macadam with 80/100 grade bitumen	679.50	159.80	108584.10	159.80	0.00	159.80	108584.10	0.00
1363	9	Providing and laying 50 mm thick compacted b ktumen bound macadam with 80/100 kgrade bitumen over existing BT surface	468.00	185.36	86748.48	155.00	7.75	162.75	76167.00	10581.48
1314	10	Providing 25 mm thick open graded premix bituminous carpet	1147.50	199.98	229477.05	181.00	9.05	190.05	218082.38	11394.68
1292	11	Providing bituminous liquid seal coat (Type A) to black top surface	1147.50	54.98	63089.55	52.00	2.60	54.60	62653.50	436.05
		Total			**553548.86**				**486116.22**	**67432.64**

03) कामामध्ये Stone Metal, Soft Murum यांचा वापर करण्यात आलेला आहे, तथापी त्यांची कोणतीही चाचणी अहवाल प्राप्त करण्यात आलेले असल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही. त्यामुळे कामावर वापरण्यात आलेले साहित्य हे योग्य प्रकारचे होते किंवा नाही याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होत नाही. तसेच याबाबत बांधकामावरील संबंधित अभियंता यांनीही योग्य ती दक्षता घेतलेली नाही असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.115 दिनांक 29/12/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	400

02	दरसूची फरक	67433
	एकूण	**67833**

FDSDNBM7201 (Ref No : 67, Hmm No : 115)

58 युनिट क्र.1 वार्ड क्र.3 अंतर्गत सुरेशदादा जैन नगर मधील बिल्डींग नं58 व 3 पासून ते बिल्डींग नं.53 ते 54 पर्यंत दोन्ही बाजूने आरसी.सी.गटार बांधणे

योजना : स्थानिक विकास कार्यक्रम आमदार निधी (मा.श्री.सुरेश जैन) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 80075.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	स्थानिक विकास कार्यक्रम आमदार निधी (मा.श्री.सुरेश जैन)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.1091, दि.5/9/2012 रु.8.90 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता 65 दि.22/5/2012 रु.951954/-
दरसूची वर्ष	2010-2011
कामाची अंदाजित किंमत	रु.889677/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	आदेश क्र.49, दिनांक 6/10/2012
कंत्राटदाराचे नांव	मे.संस्कृती इन्फ्राटेक प्रा.लि जळगांव @ निविदा दरामध्ये
कामाचा कालावधी	4 महिने i.e. upto 05/02/2013
दोष निवारण कालावधी	6 महिने
कामाची स्थिती	काम पूर्ण
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी जळगांव पत्र क्र.70/23, दिनांक 4/2/2017

देयकांचा तपशिल	
	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	08, दि.01/03/2017
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	53, पृ.क्र. 90 ते 92
कामाची एकूण किंमत	889321
मंजूर निविदा दर	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0
देय रक्कम	889321
वजाती -	
1% विमा	8893
1% कामगार उपकर	8893
10% सुरक्षा रक्कम	88932
2% जीएसटी/व्हॅट	17786
2.33% आयकर	20454
गौण खनिज स्वामित्वधन	12783
दंड	8893
एकूण वजाती	166634
निव्वळ देय रक्कम	722687

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये सन 2010-2011 चे दरसुचीनुसार दर वापरण्यात आलेले आहेत, तथापी अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करणपत्रक जोडण्यात आलेले नाही, त्यामुळे अंदाजपत्रकाची तपासणी करता आली नाही. त्याचप्रमाणे कामाची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र.53 मध्ये नोंदविण्यात आलेली आहेत, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही. त्यामुळे देयकामधील मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे करण्यात आलेला खर्च हा लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

02) करारनामासोबतचे परिशिष्ट-अ मधील अट क्र.5 नुसार 'सदर कामी कार्यादेशात नमूद केलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्यास मुदत संपल्याच्या तारखेपासून रु.200/- (रु.दोनशे मात्र) प्रति दिवस प्रमाणे दंडाची रक्कम वसुल करण्यास माझी संमती आहे. मात्र दंडाची रक्कम जास्तीत जास्त अंदाजित रकमेच्या 10% राहील त्यापेक्षा जास्त

राहणार नाही.' यानुसार कामाचे आदेश दि.6/10/2012 रोजी पासून कामाची मुदत 4 महिने म्हणजे 5/2/2013 अशी होती, तथापी काम पूर्णत्वाचे दाखल्यानुसार काम पूर्ण दि.25/1/2017 रोजी पूर्ण करण्यात आले. म्हणजे एकूण 1755 दिवसांचा विलंब झालेला दिसून येतो. करारनाम्यातील अटीनुसार 1449 x 200 = रु.289800/- अंदाजित रकमेच्या 10 टक्के मर्यादेत म्हणजे रु.889677/- च्या 10 टक्के रु.88968/- इतकी दंडाची आकारणी करणे आवश्यक असतांना फक्त रु.8893/- इतकाच दंड वसुल करण्यात आलेला आहे, सदर दंडाबाबत टिपणी दिनांक ndash; (नमूद नाही) संबंधित शाखा अभियंता यांनी शहर अभियंता यांचेकडे सादर केली असता शहर अभियंता यांनी 1% प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करुन देयक सादर करा असे आदेशित केले व त्यानुसार देयकामधून 1% प्रमाणे दंड वसुल करण्यात आला. त्यामुळे करारनाम्यानुसार 88968 - 8893 = 80075/- इतका कमी दंड वसुल करण्यात आलेला आहे. तरी कमी वसुल केलेली दंडाची रक्कम रु.80075/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात यावा व संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावा.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.115 दिनांक 29/12/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
02	दंड	80075

FDSDNBM7201 (Ref No : 68, Hmm No : 116)

59 प्र.क्र.30 मधील भिलवाडा आणि गवळीवाडा येथे ठिकठिकाणी आरसीसी गटार बांधणे

योजना : आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.सुरेश दामू भोळे) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 30974.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.सुरेश दामू भोळे)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.2005, दि.07/07/2016 (अ.क्र.01) रु.10.00 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.39, दिनांक 10/06/2016 रु.10.00 लक्ष
दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.1000000/-

निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.61, दिनांक 13/10/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.गजानन एंटरप्राईजेस जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 12/04/2017
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी जळगांव पत्र क्र.69/B-16-2, दि.30/12/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	04, दि.13/04/2016
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	193, पृष्ठ क्र.42 ते 45
कामाची एकूण किंमत	998941
मंजूर निविदा दर	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0
देय रक्कम	998941
वजाती -	
1% विमा	9989
1% कामगार उपकर	9989
10% सुरक्षा रक्कम	99894

2% जीएसटी/व्हॅट	19979
2.33% आयकर	22976
गौण खनिज स्वामित्वधन	10664
दंड	0
एकूण वजाती	173491
निव्वळ देय रक्कम	825450

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये सन 2014-2015 ची दरसूची वापरण्यात आलेली आहे. अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही. दरसुचीमधील दरांची तुलना केली असता दरसूचीमधील दर व अंदाजपत्रकांसोबतच्या गोषवा-यामध्ये दर्शविण्यात आलेले दर यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते, त्यामुळे सदरचे दर हे लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.30974/- वसुलपात्र ठरतात. याबाबत जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुलीची कार्यवाही करण्यात यावी व संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात येऊन त्याप्रमाणे चलनाच्या प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियेाजन समिती, जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

Item No.	Item	Rate as per estimate	Qty. Excuted		Rate As per DSR					Diff. in rate	Recovery Amount
			Qty.	Amount	Sr No	Page No	Rate	5% Mun corpn	Total		
2	P L CC 1:4:8	3586.63	40.32	144612.92	995	224	3240	162	3402.00	184.63	7444.282
3	P L M-15 RCC	5219.38	122.19	637756.04	825	188	4795	239.75	5034.75	184.63	22559.94
4	P L M-15 C.C.	4871.83	5.25	25577.11	1015	227	4464	223.2	4687.2	184.63	969.3075
	Total										**30973.53**
	Round off										**30974.00**

02) करारनामा अट क्र.27 नुसार कामाचा दोष निवारण कालावधी (Defect Liability Period) हा 6 महिन्यांचा ठेवण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण 2011/प्र.क्र.467/रस्ते-1, दिनांक 21/11/2011 नुसार असा दोष निवारण कालावधी हा 2 वर्षांचा असणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कालावधीमध्ये

कामामध्ये काही दोष निर्माण झाल्यास व त्यावर दुरुस्तीकरिता खर्च करण्याची आवश्यकता भासल्यास महानगरपालिकेवर दायित्व वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास येते.

03) सदर कामाची मापे मोजमाप पुस्तिका क्र.193 मध्ये नोंदविण्यात आलेली आहे, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही, त्यामुळे देयकातील मापे व झालेला खर्च रु.998941/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.117 दिनांक 29/12/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	दरसूची तफावत	30974

FDSDNBM7201 (Ref No : 69, Hmm No : 117)

60 वार्ड क्र.34 मेहरुण स.नं.40 भाग ते जळगांव स.नं.135 पर्यंतच्या मुख्य डी.पी. रोड साईडला आरसीसी गटार बांधणे व रोड क्रॉसिंगला स्लॅब कल्व्हर्ट बांधणे

योजना : महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान
निधी : महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी
लेखाशीर्ष : 0
कलम : 9ब
वसुलपात्र : 0.00/-
अंतिम अमान्य : 11822.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचे आदेश क्र.247, दिनांक 22/08/2014 रु.2785323/- (अ.क्र.2) शासन अनुदान रु.1392662/-, मनपा हिस्सा रु.1392662/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.39, दि.17/07/2014, रु.2785323/-

दरसूची वर्ष	2012-2013
कामाची अंदाजित किंमत	रु.2785323/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.03 दि.10/04/2015
कंत्राटदाराचे नांव	श्री.विलास प्रभाकर पाटील, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 09/10/2015)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी पत्र क्र.68/34, दि.24/5/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय धावते देयक	तृतीय धावते देयक	चतुर्थ धावते देयक	पाचवे व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	01, दि. 5/8/2015	02, दि. 1/9/2015	03, दि. 21/11/2015	05, दि. 14/1/2016	01, दि. 10/6/2016	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	017, पृ.क्र.191 - 193	017, पृ.क्र.197- 199	009, पृ.क्र.152 - 160	009, पृ.क्र.161 - 166	009, पृ.क्र.167-171	
कामाची एकूण किंमत	586964	729840	822622	510554	130632	2780612
मंजूर निविदा दर	0	0	0	0	0	0
त्रयस्थ तांत्रिक	0	0	0	0	31891	31891

लेखापरीक्षण फी						
देय रक्कम	586964	729840	822622	510554	162523	2812503
वजाती -						
1% विमा	5870	7298	8226	5106	1306	27806
1% कामगार उपकर	5870	7298	8226	5106	1306	27806
10% सुरक्षा रक्कम	58696	72984	82262	51055	13063	278060
2% जीएसटी/व्हॅट	11739	14597	16452	10211	2613	55612
2.33% आयकर	13500	16786	18920	11743	3005	63954
गौण खनिज स्वामित्वधन	3300	4200	9200	6000	622	23322
एलबीटी 0.25%	1467	1825	0	0	0	3292
दंड	0	0	0	0	0	0
एकूण वजाती	100442	124988	143286	89221	21915	479852
निव्वळ देय रक्कम	486522	604852	679336	421333	140608	2332651

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) सदर कामासाठी सन 2012-2013 ची दरसूची वापरण्यात आलेली आहे, तथापी दरपृथ:करण पत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेल्या दरांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. परिणामी अंदाजपत्रकामध्ये व पर्यायाने देयकामध्ये दर्शविण्यात आलेले दर लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

02) शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे. प्रथम व द्वितीय धावते देयकाची मापे ही मोजमाप पुस्तिका क्र.ए017 मध्ये नोंदविली आहे. सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तथापी प्रथम देयकावरील मापे

नोंदविल्याचा दिनांक हा 15/06/2015 असा नमूद आहे. त्यामुळे सुधारित दराने गौण खनिजाची परिगणना करणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे एकूण 5 देयकांमधून एकूण रु.23322/- इतकी गौण खनिज स्वामित्वधनाची रक्कम कपात करण्यात आलेली आहे, याबाबत मोजमाप पुस्तिकेमध्ये सविस्तर बाबनिहाय साहित्य वापर व त्याप्रमाणे गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना दर्शविण्यात आलेली नाही. तथापी मोजमापांनुसार सर्व देयकांमधील गौण खनिज परिगणना खालीलप्रमाणे असून कपात केलेली रक्कम वजा जाता रु.8162/- इतकी रक्कम वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी व त्याप्रमाणे चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	एकूण परिणाम	स्वामित्वधन (15/5/2015 पासून रु.141.34)		
			साहित्य	साहित्य वापराचा फॅक्टर	फॅक्टर नुसार परिमाण
2	Providing laying in Situ CC 1:4:8	98.684	रेती	0.45	44.408
3	Providing lagging in sutu 1:2:4 / M-15 CC RCC Elements	367.438	रेती	0.45	165.347
4	Providing lagging in sutu 1:2:4 / M-15 CC RCC solid slab	28.88	रेती	0.45	12.996
	एकूण	495.002			222.751
	एकूण गौण खनिज स्वामित्व धन रक्कम				31483.63
	कपात केलेली गौण खनिज स्वामित्वधन रक्कम				23322
	वसुलपात्र गौण खनिज स्वामित्वधन रक्कम				8162

03) प्रथम व द्वितीय धावते देयकामधून स्थानिक संस्था करपोटी 0.25% प्रमाणे रक्कम कपात करण्यात आलेली आहे. स्थानिक संस्था कराची तरतुद दर पृथ:करणामध्ये करण्यात आलेली असल्याची शक्यता नाकारता येत नाही, तथापी दरपृथ:करण पत्रक संचिकेमध्ये लावण्यात आलेले नसल्याने याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. दरपृथ:करण पत्रकामध्ये याबाबत तरतुद करण्यात आली असल्यास सदर रक्कम पुढील सर्व देयकांमधून संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे. तृतीय, चतुर्थ, पाचवे व अंतिम देयकांद्वारे एकूण रक्कम रु.1463808/- इतकी रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे, सदर रकमेवर 0.25% प्रमाणे रु.3660/- इतकी रक्कम स्थानिक संस्था

करापोटी संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन संबंधित योजनेच्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

04) तुलनात्मक विवरणपत्रानुसार कामावर रु.4709/- इतकी बचत झालेली असल्याचे दर्शविण्यात आलेले आहे. तथापी कामावर एकूण खर्च रु.2780612/- अधिक त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी रक्कम रु.31891/- असा एकूण रु.28125093/- वजा अंदाजपत्रकीय रक्कम रु.2785323/- जाता रु.27180/- जादा खर्च करण्यात आलेला आहे. तसेच तुलनात्मक विवरणपत्रानुसार मोठ्या प्रमाणांत वाढ/घट झालेली असल्याचे दिसून येते तथापी अशा वाढ किंवा बचत बाबत कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत. बाबनिहाय तफावतीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही. अंदाजपत्रकानुसार 1800 चौ.मी. चे काम प्रस्तावित असतांना काही बाबींवर कमी व काही बाबींवर जादा काम करण्यात आलेले असल्याचे दिसून येते त्यामुळे अंदाजपत्रक तयार करणेपूर्वी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण करुन तंतोतंत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

बाब क्रमांक	बाब तपशिल	दर	अंदाजपत्रकानुसार		प्रत्यक्ष काम केल्यानुसार		तफावत	
			परिमाण	किंमत	परिमाण	किंमत	परिमाण	किंमत
1	Excavation for foundation	93.45	1104.35	103201.50	936.77	87541.15	167.58	15660.35
2	Providing laying in Situ CC 1:4:8	2647.67	88.20	233524.49	98.684	261282.66	-10.484	-27758.17
3	Providing laying in sutu 1:2:4 / M-15 CC RCC Elements	4631.96	411.373	1905463.28	367.438	1701958.11	43.935	203505.16
4	Providing laying in sutu 1:2:4 / M-15 CC RCC solid slab	5386.68	16.21	87318.08	28.88	155567.31	-12.67	-68249.23

5	Providing fixing in position mild steel	59771.28	7.626	455815.78	9.7077	574264.52	-1.9817	-118448.74
	एकूण			**2785323.13**		**2780613.75**		**4709.37**

05) सदर कामाचे 5 देयकांद्वारे कामावर स्थूल रक्कम रु.2780612/- इतका खर्च करण्यात आलेला आहे, त्यानुसार नगरपालिकेचा 50% हिश्यापोटी रु.1390306/- इतकी रक्कम नगरोत्थान योजनेच्या खात्यामध्ये प्रथम जमा करण्यात येऊन त्यानुसार देयकांची अदायगी करण्यात आलेली आहे. त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता अंदाजपत्रकामध्ये कोणतीही तरतुद करण्यात आलेली नाही, त्यामुळे सदर बाबीकरिता करण्यात येणारा खर्च हा महानगरपालिकेच्या निधीमधून करणे आवश्यक होते. तथापी त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणापोटी करण्यात आलेल्या खर्चाची रक्कम रु.31891/- मनपा निधीमधून सदर योजनेच्या खात्यामध्ये जमा करण्यात आलेली नाही, त्यामुळे सदर रक्कम ही योजनेच्या शिल्लक रकमेमधून पर्यायाने व्याजाच्या रकमेमधून करण्यात आलेली असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीव्यतिरिक्त जादा झालेला खर्च हा परस्पर योजनेमधील कामावर वापरण्यात आलेला असल्याने शासन आदेशाचे उल्लंघन झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

06) त्याचप्रमाणे मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे प्रशासकीय मान्यता आदेश दिनांक 22/08/2014 नुसार शासन हिश्याची रक्कम रु.1392662/- मधून प्रत्यक्ष कामावरील खर्च रु.2780612/- च्या 50% प्रमाणे रु.1390306/- वजा जाता रु.2356/- शिल्लक राहते. सदर शासन हिश्याची रक्कम चलनाने योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात येऊन त्याबाबत चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

07) काम पूर्ण दिनांक 08/10/2015 रोजी झालेले आहे, तथापी त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता मा.प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जळगांव यांना मनपा पत्र क्र.745 दिनांक 2/2/2016 रोजी पत्र देण्यात आलेले असून दिनांक 20/4/2016 रोजी तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता पाहणी करण्यात आलेली आहे व मा.प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जळगांव यांचे पत्र क्र.1153 दिनांक 26/5/2016 अन्वये अहवाल प्राप्त झालेला आहे. म्हणजेच काम पूर्ण झाल्यानंतर जवळ जवळ 6 महिन्यांनंतर त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे. म्हणजेच अशा प्रकारे त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण हे करारनाम्यानुसार दोष दायित्व कालावधी संपल्यानंतर करण्यात आलेले असल्याने अशा प्रकारे कामामध्ये दोष निर्माण झालेला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची दुरुस्ती करण्याबाबतची जबाबदारी कंत्राटदारावर राहत नाही, यामुळे विहित कालावधीमध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेण्याची जबाबदारी पार

पाडण्यात आलेली दिसून येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.118 दिनांक 29/12/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
02	गौणखनिज	8162
03	स्थानिक संस्था कर	3660
	एकूण	**11822**

FDSDNBM7201 (Ref No : 70, Hmm No : 118)

61 प्रभाग क्र.35 मधील स.नं.249/1ब/2/2/1 व स.नं.249/2/2/2 मधील डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करणे

योजना : महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान
लेखाशीर्ष : 0
वसुलपात्र : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी
कलम : 9ब
अंतिम अमान्य : 87764.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.452, दि.05/01/2016 रु.1837729/- (अ.क्र.2) मनपा हिस्सा - रु.918865/-, शासन हिस्सा रु. 918865/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.355, दि.20/10/2015, रु.1837729/-
दरसूची वर्ष	2015-2016

कामाची अंदाजित किंमत	रु.1837729/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.119 दि.05/03/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवाजी गणपत भंगाळे, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 04/09/2016)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी पत्र क्र.68/18-5, दि.17/5/2016 व पत्र क्र.68/18-7 दि.17/5/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	02, दि.15/7/2016 रु.495387/- (शासन हिस्सा) 03, दि.9/9/2016 रु.493387/- (मनपा हिस्सा)	02, दि.22/9/2016 रु.407097/- (शासन हिस्सा) 05, दि.12/07/2017 रु.385964/- (मनपा हिस्सा)	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	क्र.168 पृ.क्र.74 ते 77	क्र.168 पृ.क्र.80 ते 84	
कामाची एकूण किंमत	990774	771927	1762701
मंजूर निविदा दर	0	0	0

त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	21134	21134
देय रक्कम	990774	793061	1783835
वजाती -			
1% विमा	9908	7719	17627
1% कामगार उपकर	9908	7719	17627
10% सुरक्षा रक्कम	99077	77193	176270
2% जीएसटी/व्हॅट	19815	15439	35254
2.33% आयकर	22788	17754	40542
गौण खनिज स्वामित्वधन	128683	0	128683
दंड	0	0	0
एकूण वजाती	290179	125824	416003
निव्वळ देय रक्कम	700595	667237	1367832

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) सदर कामाचे संचिकेमध्ये दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले असून सदर दरपृथ:करण पत्रकावर संबंधित स्वाक्षरी करण्यात आलेली आहे, तथापी पदनाम नमूद करण्यात आलेले नाही, तसेच सहायक अभियंता आणि शहर अभियंता यांची स्वाक्षरी घेण्यात येऊन मान्यता घेण्यात आलेली नाही. म्हणजेच संचिकेमध्ये जोडण्यात आलेल्या दरपृथ:करण पत्रकावर सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता न घेता त्यामधील दर अंदाजपत्रक तयार करण्याकरिता वापरण्यात आलेले असल्याचे निदर्शनास येते.

02) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची किंमत रु.18.38 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.1400/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.1000/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते.

03) महाराष्ट्र शासन विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनि-2314/देयक कपात रक्कम/ संकीर्ण/अभि-3, दिनांक 31/3/2015 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम कार्यारंभ आदेश दिल्यानंतर विमा संचालनालयाकडे भरणा करणे व तसे विमापत्र सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा प्रथम देयकामधून कंत्राट रकमेवर 1% प्रमाणे विमा रक्कम कपात करण्यात येऊन विमा संचालनालयाकडे भरणा करुन विमा पत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. मंजूर कंत्राटानुसार सदर कामाची किंमत रु.1837729/- अशी आहे. त्यानुसार कामाचा विमा 1% प्रमाणे रु.18377/- प्रथम देयकामधून कपात करणे आवश्यक असतांना दोन धावते देयकामधून देयक रकमेवर रु.17627/- कपात करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे रु.750/- शासकीय विमा रकमेचे नुकसान झालेले आहे, तसेच दोन धावते देयकांमधून विमा रक्कम कपात करण्यात आलेली असल्यामुळे विमा काढण्याचा उद्देश सफल होत नाही. सदरची रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन चलनाने भरणा करण्यात येऊन चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल विमा संचालनालयाकडे सादर करण्यात यावा.

04) गौण खनिज स्वामित्वधन रक्कम परिगणना करतांना जिल्हा दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे गुणक देण्यात आलेले असून त्यानुसार परिगणना करण्यात आलेली नाही, त्यामुळे वसुल करण्यात आलेली रक्कम रु.128683/- वजा जाता खालीलप्रमाणे उर्वरित रक्कम रु.35195/- वसुलपात्र ठरते. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रक्कम वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	परिमाण (वसुल केलेली)	गुणक	गौण खनिज परिमाण (वसुलपात्र)
6	Spreading oversize metal..	482.45	1.25	603.06
7	Spreading Hard Murum, soft murum	428.00	1.30	556.40
	एकूण	**910.45**		**1159.46**
	गौण खनिज दर	141.34		141.34
	गौण खनिज रक्कम	128683		163878
	वसुलपात्र रक्कम			**35195**

05) बाब क्र.5 नुसार खडी पसरविणे व बाब क्र.6 नुसार मुरुम पसरविणेचे अनुक्रमे 482.45 चौ.मी. व 428.00 चौ.मी. काम करण्यात आलेले आहे. स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिणामामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रु.2672/- जादा प्रदान झालेले असून सदर रक्कम जबाबदारी निश्चित करण्यात येऊन वसुल करण्यात

यावी व शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

बाब क्र.	तपशिल	मोजमापा नुसार परिमाण	10% दबाईकरिता कमी करणे आवश्यक असलेले परिमाण	दर	वसुलपात्र रक्कम
5	Spreading 40 mm metalhellip;.	482.45	48.25	36.75	1773.19
6	Sperading Soft Murum	428.00	42.80	21.00	898.80
	एकूण वसुलपात्र रक्कम				**2671.99**

06) दर पृथ:करणानुसार डांबराचे बाबींमध्ये लीड चार्जेस 425 कि.मी. घेण्यात आलेले आहे, म्हणजेच सदरचे दर हे मुंबई रिफायनरीचे घेण्यात आलेले आहेत. तसेच या बाबीसाठी डांबराचे प्रत्यक्ष वापराचे वेळेचे दर विचारात घेण्यात आलेले नाहीत. दरसुचीमधील सर्वसाधारण टिपणी अ.क्र.4.7 तरतुदीनुसार दर कमी असल्यास त्यानुसार वसुली करणे आवश्यक आहे. तथापी डांबर खरेदीची देयके जोडलेली नाहीत, त्यामुळे सदरचे दर देय ठरत नाहीत तसेच डांबराचे दरांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्याचप्रमाणे खालील बाबींच्या तपशिलानुसार 40 mm crushed metal चा वापर करण्यात आलेला आहे, तथापी दरपृथ:करण पत्रकामध्ये 40 mm पेक्षा जास्त व 40 mm पेक्षा कमी अशा दोन्ही प्रकारच्या खडीचा लिड दर्शविण्यात आलेले दिसून येतात, त्यामुळे जादा प्रदान झालेले आहे. असे जादा प्रदान खालीलप्रमाणे वसुलपात्र ठरतो, तरी सदर रक्कम रु.48747/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व त्याप्रमाणे चलनाच्या प्रतीसह मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	एकूण दिलेला दर	40 मीमी पेक्षा जास्त खडी वहनावळ दर	डांबराचे लिड चार्जेस	एकूण वसुलपात्र दर	दुसऱ्या धावते देयकापर्यंतचे मोजमाप परिमाण	वसुलपात्र रक्कम
10	Providing laying 50 mm thk compacted BBM over existing WBM surface. Spreading 40 mm. size metal (crushed metral) at.	164.03	10.45	3.35	13.80	2413.20	33302.16
13	Providing 25 mm. thk open graded premix bituminous carpet over	251,54	0.00	4.53	4.53	2413.20	10931.80

	existing BBM surface.						
14	Providing bituminous liquid seal coat to black top.	64.40	0.00	1.87	1.87	2413.20	4512.68
	एकूण वसुलपात्र रक्कम						**48746.64**

07) मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे प्रशासकीय मान्यता आदेशानुसार 4 कामाची शासन हिश्याची एकूण रक्कम रु.53.00 लक्ष मंजूर करण्यात आलेले आहेत, त्यानुसार सदर रक्कम रु.53.00 लक्ष एचडीएफसी बँक चेक क्र.47 दिनांक 23/06/2016 अन्वये प्राप्त झाली असून दिनांक 28/06/2016 रोजी खात्यामध्ये जमा करण्यात आलेले दिसून येतात. यामध्ये वरील कामाची रक्कम रु.918865/- मंजूर असून त्यापैकी रु.495387/- व 407097/- अशी एकूण रु.902484/- इतकी खर्च करण्यात आलेली आहे. तसेच नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एनयुआर-2010/प्र.क्र.317/10/नवि-33, दिनांक 08/11/2010 मधील अ.क्र.(4) नुसार वित्तीय आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला असून त्यानुसार मंजूर किंमतीच्या 50% शासन हिस्सा व 50% नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा निश्चित करण्यात आलेला आहे, त्यानुसार प्रत्यक्ष कामावर झालेल्या खर्चाच्या 50-50% प्रमाणे खर्च करणे अपेक्षित आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाबाबत तरतुद करण्यात आलेली नव्हती, तसेच प्रत्यक्ष कामाचे भागावर एकूण रु.1762701/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. त्यानुसार 50% शासन हिश्याची रक्कम रु.881351/- इतकी खर्च करणे अपेक्षित असून 50% मनपा हिस्सा रु.881350/- अधिक त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी रक्कम रु.21134/- अशी एकूण रु.902485/- मनपा निधीमधून खर्च करणे आवश्यक आहे. त्यानुसार मंजूर रक्कम रु.918865/- मधून रु.881351/- शासन हिस्सा वजा जाता रु.37514/- इतकी रक्कम शिल्लक राहते, सदर रक्कम शासनाकडे जमा करण्यात येऊन चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले असल्याचे संचिकेवरुन दिसून आले नाही.

08) सदर कामाची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र.ए168 मध्ये नोंदविण्यात आलेली आहे, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही, त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.152 दिनांक 25/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा

02	मुद्रांक शुल्क	400
03	विमा	750
04	गौण खनिज	35195
05	दबाई	2672
06	खडी वापर	48747
	एकूण	**87764**

FDSDNBM7201 (Ref No : 71, Hmm No : 152)

62 वार्ड क्र. 35 मधील स.नं.249/1ब/2/2/1 व इदगाह मैदानावर जाणेसाठी असलेल्या लेंडी नाल्यावर पुल बांधणे

योजना : अल्पसंख्याक निधी **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 75529.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	अल्पसंख्याक निधी
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.664, दि.05/09/2015 रु.1783552/- (अ.क्र.1)
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.126, दि.22/01/2015 रु.1783552/-
दरसूची वर्ष	2012-2013
कामाची अंदाजित किंमत	रु.1783552/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.56 दि.19/11/2015

कंत्राटदाराचे नांव	क्रिएटीव्ह इंजिनिअर्स, चोपडा (5.91% कमी दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 18/05/2016)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी पत्र क्र.--, दि.20/05/2016 व पत्र क्र.--, दि.20/05/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	01, दि.26/7/2016
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	क्र.189 पृ.क्र.06 ते 09
कामाची एकूण किंमत	1906520
मंजूर निविदा दर	-112675
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	20511
देय रक्कम	1814356
वजाती -	
1% विमा	17938
1% कामगार उपकर	17938
10% सुरक्षा रक्कम	179385
2% जीएसटी/व्हॅट	35877
2.33% आयकर	41258

गौण खनिज स्वामित्वधन	0
दंड	0
एकूण वजाती	292396
निव्वळ देय रक्कम	1521960

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची किंमत रु.17.84 लक्ष अशी असून मंजूर निविदेनुसार कामाची किंमत रु.16.79 लक्ष इतकी येते, त्यानुसार रु.1200/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.900/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.300/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.300/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते.

02) सदर कामाचे संचिकेमध्ये दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले असून सदर दरपृथ:करण पत्रकावर संबंधित स्वाक्षरी करण्यात आलेली आहे, तथापी पदनाम नमूद करण्यात आलेले नाही, तसेच सहायक अभियंता आणि शहर अभियंता यांची स्वाक्षरी घेण्यात येऊन मान्यता घेण्यात आलेली नाही. म्हणजेच संचिकेमध्ये जोडण्यात आलेल्या दरपृथ:करण पत्रकावर सक्षम प्राधिका-यांची मान्यता न घेता त्यामधील दर अंदाजपत्रक तयार करण्याकरिता वापरण्यात आलेले असल्याचे निदर्शनास येते.

03) गौण खनिज स्वामित्वधन रक्कम परिगणना करतांना जिल्हा दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे गुणक देण्यात आलेले आहे तसेच शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे, त्यानुसार परिगणना करण्यात येऊन गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम देयकामधून कपात करणे आवश्यक होते, तथापी संबंधित कंत्राटदार यांनी गौण खनिजचे पास/परवाने जोडलेले नाही किंवा देयकामधून रक्कम कपात करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम रु.31501/- वसुलपात्र ठरते. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रक्कम वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब	बाब	दर	एकूण	स्वामित्वधन

क्रमांक			परिणाम	साहित्य	साहित्य वापराचा फॅक्टर	फॅक्टर नुसार परिमाण
3	Providing laying in situ M15 CC for cut off walls	5462.12	37.75	रेती	0.45	16.99
4	Providing laying M15 CC	4348.94	199.86	रेती	0.45	89.94
5	Providing laying in situ M25 CCh for RCC caps	4788.84	6.45	रेती	0.45	2.90
6	Providing laying in situ M25 CC hellip; for RCC work	6295.1	34.84	रेती	0.45	15.68
7	Providing laying in situ M20 CC	4780.36	4.52	रेती	0.45	2.03
8	Providing RCC parapet with M15 CC	1681.16	26.80	रेती	0.45	12.06
10	Providing laying in M10 CC	3331.34	56.91	रेती	0.45	25.61
11	Providing rubble filling behind the a utment, returns or wings	294.00	49.80	खडी	1.3	64.74
	एकूण गौण खनिज वापराचे परिमाण					229.95
	गौण खनिज स्वामित्व धन दर					141.34
	गौण खनिज स्वामित्व धन रक्कम					32501

04) सदर कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.1783552/- इतकी होती, निविदेमध्ये 5.91% कमी दर प्राप्त झाले व त्यानुसार मंजूर किंमत रु.1678144/- इतकी होती व त्यानुसार त्याच किंमतीमध्ये काम पूर्ण होणे आवश्यक होते. प्रत्यक्षात निव्वळ कामाची किंमत रु.1906520/- इतक्या रकमेत झाले व त्यामधून मंजूर निविदा दरानुसार रु.112675/- वजा जाता रु.1793845/- अधिक त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी रु.20511/- असे एकूण रु.1814356/- इतके प्रदान करण्यात आलेले आहे. म्हणजेच रु.1678144/- ऐवजी रु.1814356/- म्हणजे रु.136212/- इतके जादा प्रदान झालेले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करिता कोणतीही तरतुद करण्यात आलेली दिसून येत नाही. तसेच सदर कामाकरिता प्राप्त निधी रु.1783552/- इतका असतांना त्यापेक्षा जादा खर्च करण्यात आलेला आहे, म्हणजेच वरीलप्रमाणे रु.136212/- हा खर्च हा शिल्लक अनुदानमधून तसेच व्याजाच्या रकमेमधून करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-

3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीव्यतिरिक्त जादा झालेला खर्च हा परस्पर योजनेमधील कामावर वापरण्यात आलेला असल्याने शासन आदेशाचे उल्लंघन झालेले मत आहे. त्याचप्रमाणे कमी दराची निविदा स्विकारल्यानंतर काही बाबींमध्ये बचत तर काही बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करुन अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जादा काम करणेत आलेले असल्याने कंत्राटदाराचे हित जोपासले गेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

05) टिपणीवरील शहर अभियंता यांनी दिनांक 14/07/2016 रोजीचे अभिप्राय नोंदवितांना पुलाची लांबीमध्ये वाढ करणे गरजेचे होते, त्यामुळे बाब क्र.4, 6 व 7 मध्ये वाढ झालेली आहे, तथापी अंदाजपत्रकापेक्षा जास्त खर्च होऊ नये म्हणून काही बाबींचे काम करण्यात आले नाही, एकूण खर्च अंदाजपत्रकापेक्षा 10% पेक्षा जास्त करण्यात आलेला नाही असे नमूद केलेले आहे. बाब क्र.4,5,6,7,8,10 नुसार सिमेंट काँक्रीटचे बाबींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे तथापी बाब क्र.9 नुसार स्टीलचे पुरवठ्यामध्ये मोठ्या प्रमाणत बचत झालेली दिसून येते, स्टील वापराबाबतचे विवरणपत्र जोडलेले नसल्यामुळे याबाबत पडताळणी करता आली नाही. म्हणजेच अंदाजपत्रकाचे तुलनेत प्रत्यक्ष काम करतांना बाब क्र.9 नुसार स्टीलचा पुरवठा कमी करण्यात आलेला असल्याने बांधकामामध्ये योग्य प्रमाणात स्टीलचा वापर झालेला दिसून येत नाही व परिणामी सदर काम हे योग्य दर्जाचे व टिकावू झालेले असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. तसेच शहर अभियंता यांचे अभिप्रायानुसार पुलाची लांबीमध्ये वाढ झालेली आहे, यावरुन अंदाजपत्रक तयार करतांना प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन वास्तववादी व अचूक अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

06) बाब क्र.12 नुसार पाणी उपसा करिता बाब क्र.1 व 2 नुसार खोदकामाचे परिणामानुसार परिणाम विचारात घेऊन रु.42728/- इतके प्रदान करण्यात आलेले आहे. स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशन मधील BR.4.3 नुसार पाणी उपसाकरिता कंत्राटदाराने पंप/मशिनरी इत्यादी व्यवस्था स्वत: करावयाची आहे. तथापी याबाबत कोणतेही अभिलेखे जसे पाणी उपसाबाबतचे फोटो, पाणी उपसाकरिता वापरण्यात आलेली पाण्याचे पंप व त्यांचे वापराबाबतचे लॉगबुक ठेवण्यात आलेले नाही त्यामुळे सदर बाबीवर करण्यात आलेल्या खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही.

07) महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग शासन निर्णय क्र.नाक्षेयो-2015/प्र.क्र.137/का.9 दिनांक 17/78/2015 नुसार सदर कामासाठी रु.1778600/- इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयामधील अ.क्र.4 नुसार अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीत प्रस्तावात नमूद केलेली कामे पूर्ण करणे आवश्यक आहे व याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्र विहित नमुन्यात अल्पसंख्याक विकास विभागाकडे सादर करणे आवश्यक होते. त्यानुसार सदर योजनेकरिता प्राप्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास

सादर करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास येते.

08) सदर कामाची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र.ए189 मध्ये नोंदविण्यात आलेली आहे, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही, त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.153 दिनांक 25/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	300
03	गौण खनिज	32501
04	खोदकाम साहित्य	42728
	एकूण	**75529**

FDSDNBM7201 (Ref No : 72, Hmm No : 153)

63 प्र.क्र.1 मधील सिटी कॉलनी भागात आरसीसी गटार बांधणे

योजना : अल्पसंख्याक निधी **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	अल्पसंख्याक निधी
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.348, दि.23/05/2016 रु.1590190/- (अ.क्र.5)
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.445, दि.22/02/2016 रु. 1590190/-

दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु. 1590190/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.53 दि.22/09/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.कुंदन बाबुराल दर्टेकर, जळगांव (8.999 टक्के कमी दराने)
परफॉर्मन्स सिक्युरिटी	घेतलेली नाही
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 21/03/2017)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	दि. 22/02/2017 (भौतिक दृष्ट्या पूर्ण)
चाचणी अहवाल	शासकीय तंत्रनिकेतन जळगांव यांचे पत्र क्र.703 दि.29/11/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	दुसरे व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	04, दि.13/01/2017	लेखापरीक्षण कालावधीमध्ये
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	क्र.191 पृ.क्र.28 ते 32	देणे बाकी
कामाची एकूण किंमत	1224594	
मंजूर निविदा दर	-110201	
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	
देय रक्कम	1114393	
वजाती -		
1% विमा	0	

1% कामगार उपकर	11144	
10% सुरक्षा रक्कम	111439	
2% जीएसटी/व्हॅट	22288	
2.33% आयकर	25631	
गौण खनिज स्वामित्वधन	12827	
दंड	0	
एकूण वजाती	183329	
निव्वळ देय रक्कम	931064	

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) सदर कामाचे संचिकेमध्ये दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही त्यामुळे दरसूचीतील दर व अंदाजपत्रकातील दर याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही, तरी अंदाजपत्रकातील दर लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

02) सदर कामाची निविदा ही 8.99% कमी दराने स्विकृत करण्यात आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.बीडीजी-2016/ प्र.क्र.2/इमा.2, दिनांक 12/02/2016 मध्ये निर्देश दिल्यानुसार 10% पर्यंत कमी दरांच्या निविदा स्विकृत करण्यात आल्यास विहिzwj;त कालमर्यादेत व गुणवत्तापूर्वक होण्याच्या अनुषंगाने निविदा किंमतीच्या 1% प्रमाणे परफॉर्मन्स सिक्युरिटी कंत्राटदाराने सादर करणे आवश्यक आहे. तथापी याप्रमाणे परफॉर्मन्स सिक्युरिटी कंत्राटदाराने सादर केलेली नाही, तसेच याबाबत विभागाने पत्र क्र.361 दि.22/8/2016 अन्वये रु.15901/- परफॉर्मन्स सिक्युरिटी भरणेबाबत कळविले तथापी कंत्राटदाराने रक्कम भरणा केलेला नसतांना विभागानेही याबाबत पाठपुरावा केलेला संचिकेवरुन दिसून येत नाही.

03) सदर कामाचे दुसरे व अंतिम देयक लेखापरीक्षण कालावधीमध्ये प्रदान करण्यात आलेले नाही, दिनांक 22/02/2017 रोजी काम पूर्ण झालेले असल्याने तुलनात्मक विवरणपत्राची तपासणी करण्यात आली असता मोठ्या प्रमाणांत वाढ/घट झालेली असल्याचे दिसून येते तथापी अशा वाढ किंवा बचत बाबत कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत. नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात

आलेले नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही अशा सूचना आहेत. सदर कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.1590190/- इतकी होती, प्रत्यक्षात झालेल्या एकूण काम रु.1301449/- मधून मंजूर कमी दराच्या निविदेनुसार रु.117118/- वजा जाता रु.1184331/- इतक्या रकमेत झाले असून अधिक त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी रु.18764/- असे एकूण रु.1203095/- इतके प्रदान करण्यात आलेले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करिता कोणतीही तरतुद करण्यात आलेली दिसून येत नाही, त्यामुळे सदरचा खर्च हा मनपा निधीमधून करणे आवश्यक होते. सदर कामाकरिता प्रशासकीय मान्यतेनुसार प्राप्त निधी रु.1590190/- इतका असून प्रत्यक्षात निव्वळ काम कमी किंमतीत म्हणजे रु.1184331/- इतक्या किंमतीमध्ये झालेले आहे, म्हणजेच रु.405849/- इतका निधी शिल्लक राहतो. तथापी तुलनात्मक विवरणपत्रामध्ये प्रत्यक्ष काम केल्यानुसार दर्शविण्यात आलेल्या किंमतीमध्ये तफावत दिसून येते, तसेच कामामध्ये बचतीची रक्कमही कमी दर्शविण्यात आलेली आहे. वरीलप्रमाणे शिल्लक अनुदान रु.405849/- शासनाकडे चलनाने जमा करणे आवश्यक होते, त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे दिसून येते. तसेच अंदाजपत्रक तयार करणेपूर्वी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण करुन तंतोतंत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

04) देयकामध्ये गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम रु.12826/- प्रदान दर्शविण्यात येऊन कपातीच्या तपशिलामध्ये कपात करण्यात आलेली आहे. संबंधितांना रक्कम प्रदान करतांना त्यांनी गौण खनिज परवाने जोडणे आवश्यक होते, तथापी अशा प्रकारचे परवाने जोडण्यात आलेले नाही, तसेच मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे गौण खनिज मोकळे केल्याचे (Royalty Clearance Certificate) प्रमाणपत्रही कंत्राटदाराने जोडलेले नाही. त्यामुळे गौण खनिज वैधरित्या वाहतुक करुन कामाचे ठिकाणी आणण्यात आलेले असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

05) सदरचे काम दिनांक 22/02/2017 रोजी पूर्ण झालेले आहे, तथापी त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता मा.प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन जळगांव यांना पत्र क्र.1348 दिनांक 1/03/2018 रोजी देण्यात येऊन त्यानुसार त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाचा अहवाल मा.प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन जळगांव यांचे पत्र क्र.916 दिनांक 21/4/2018 अन्वये प्राप्त झालेला आहे व त्यामध्ये स्थळ पाहणीचा दिनांक 17/04/2018 असा नमुद करण्यात आलेला आहे. म्हणजे काम पूर्ण झाल्यानंतर 14 महिन्यांच्या कालावधीनंतर त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आलेले असल्याचे दिसून येते. म्हणजेच अशा प्रकारे त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण हे करारनाम्यानुसार दोष दायित्व कालावधी संपल्यानंतर करण्यात आलेले असल्याने अशा प्रकारे कामामध्ये दोष निर्माण झालेला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची दुरुस्ती करण्याबाबतची जबाबदारी कंत्राटदारावर राहत नाही, यामुळे विहित कालावधीमध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेण्याची जबाबदारी पार पाडण्यात आलेली दिसून येत नाही.

06) सदर कामाची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र.ए191 मध्ये नोंदविण्यात आलेली आहे, तथापी सदर मोजमाप

पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही, त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.154 दिनांक 25/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 73, Hmm No : 154)

64 वार्ड क्र.35 मध्ये मेहरुण वैकुंठधाम जवळ पुल बांधणे व मेहरुण गांव ते वैकुंठधाम रोडवर आरसीसी गटार बांधणे

योजना : अल्पसंख्याक निधी **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 7336.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजना
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचे आदेश क्र.377, दिनांक 06/11/2015 रु.2387745/- (अ.क्र.1)
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.29, दि.15/06/2015 Part A Bridge - 2032195 Part B Gutter - 355550 Total - 2387745
दरसूची वर्ष	2013-2014
कामाची अंदाजित किंमत	रु. 2387745/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.101 दि.22/01/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.श्रीकांत तळेले जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 21/07/2016)

दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण दि.10/07/2016
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी पत्र क्र.--, दि.15/7/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	07 दिनांक 23/09/2016
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	ए176, पृ.क्र.62 ते 67
कामाची एकूण किंमत	2477265
मंजूर निविदा दर	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	27459
देय रक्कम	2504724
वजाती -	
1% विमा	0
1% कामगार उपकर	24773
10% सुरक्षा रक्कम	247727
2% जीएसटी/व्हॅट	123863
2.33% आयकर	56977
गौण खनिज स्वामित्वधन	23297
दंड	0
एकूण वजाती	476637
निव्वळ देय रक्कम	2028087

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34

(सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची किंमत रु.23.87 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.1900/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.1500/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते.

02) गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना अंदाजपत्रकामध्ये तसेच देयकामध्ये करण्यात आलेली नाही. दरसूचीमधील दर्शविण्यात आलेले साहित्य वापराचे फॅक्टरनुसार व देयकानुसार रॉयल्टीची परिगणना खालीलप्रमाणे करणे आवश्यक होते, तथापी देयकानुसार कपात गौण खनिज स्वामित्वधनाची रक्कम कमी कपात करण्यात आलेली असून उर्वरित रक्कम रु.6936/- वसुल करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे गौण खनिज परवाने किंवा वाहतुक पास संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही.

बाब क्रमांक	बाब	देयकानुसार एकूण परिणाम	स्वामित्वधन		
			साहित्य	साहित्य वापराचा फॅक्टर	फॅक्टर नुसार परिमाण
	भाग-1				
3	Providing laying in situ M15 CC for cut off wall.	63.51	रेती	0.45	28.58
4	Providing laying M15 CC	85.03	रेती	0.45	38.26
5	Providing laying in situ M25 CC for RCC caps	8.32	रेती	0.45	3.74
6	Providing laying in situ M25 CC for RCC work	36.54	रेती	0.45	16.44
7	Providing laying in situ M20 CC	4.32	रेती	0.45	1.94
8	Providing RCC parapet with M15 CC	15.8	रेती	0.45	7.11
10	Providing laying in M10 CC	168.56	रेती	0.45	75.85
	भाग-2				
2	Providing laying in situ CC of 1:4:8	16.24	रेती	0.45	7.31
3	Providing laying in situ 1:2:4/M15 CC, RCC elements	69.15	रेती	0.45	31.12
4	Providing Providing laying in situ 1:2:4/M15 CC, RCC solid slabs	7.87	रेती	0.45	3.54

	एकूण गौण खनिज वापराचे परिमाण				213.90
	गौण खनिज स्वामित्व धन दर				141.34
	गौण खनिज स्वामित्व धन रक्कम				30233
	कपात केलेली रक्कम				23297
	वसुलपात्र रक्कम				**6936**

03) तुलनात्मक विवरणपत्रानुसार कामावर रु.89521/- इतका जादा खर्च झालेला असल्याचे दर्शविण्यात आलेले आहे. तथापी कामावर एकूण खर्च रु.2477265/- अधिक त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी रक्कम रु.27459/- असा एकूण रु.2504724/- वजा अंदाजपत्रकीय रक्कम रु.2387744/- जाता रु.116980/- जादा खर्च करण्यात आलेला आहे. तसेच तुलनात्मक विवरणपत्रानुसार मोठ्या प्रमाणांत वाढ/घट झालेली असल्याचे दिसून येते तथापी अशा वाढ किंवा बचत बाबत कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत. नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही अशा सूचना आहेत. तसेच अंदाजपत्रक तयार करणेपूर्वी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण करुन तंतोतंत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

04) सदर कामाचे देयक अदा करतांना निव्वळ कामाची किंमत अधिक त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी अशी एकत्रित रक्कम रु.2504724/- खर्च दर्शविण्यात आलेली असून मनपा हिस्सा रु.89520/- योजनेच्या खात्यामध्ये दिनांक 23/09/2016 रोजी जमा करण्यात आलेली आहे. कामाची मंजूर किंमत रु.2387744/- असून खर्च रु.2504724/- करण्यात आलेला असल्याने मनपा निधीमधून हिस्सा रक्कम रु.116980/- जमा करणे आवश्यक असतांना रु.89520/- जमा करण्यात आलेला आहे. त्यामुळे रु.27460/- मनपा हिस्सा कमी भरणा करण्यात आलेला असल्यामुळे सदरची रक्कम योजनेच्या खात्यामध्ये शिल्लक रकमेमधून पर्यायाने व्याजाच्या रकमेमधून करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीव्यतिरिक्त जादा झालेला खर्च हा परस्पर योजनेमधील कामावर वापरण्यात आलेला असल्याने शासन आदेशाचे उल्लंघन झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.155 दिनांक 25/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	400
03	गौण खनिज स्वामित्वधन	6936
	एकूण	**7336**

FDSDNBM7201 (Ref No : 74, Hmm No : 155)

65 प्र.क्र.18 पिंप्राळा गट नं.57/1/2 पंचशिल हौसिंग सोसायटी मधील रस्ते सिमेंट कॉंक्रीटीचे करणे व आरसीसी गटार बांधणे

योजना : नागरी दलीत वस्तीर सुधार योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 155152.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	नागरी दलीत वस्तीर सुधार योजना
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.628, दि.20/02/2016 रु.1796311/- (अ.क्र.3)
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.383, दि.02/12/2015, रु.1796311/-
दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.1796311/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.31 दि.15/06/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवाजी गणपत भंगाळे, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)

कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 14/12/2016)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण दि. 31/08/2016
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी पत्र क्र.68/62, दि.25/07/2016 व पत्र क्र.68/62-1, दि.25/07/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय व अंतिम	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	02, दि.26/08/2016	10, दि.15/12/2016	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	क्र.163 पृ.क्र.116 ते 120	क्र.163 पृ.क्र.124 ते 129	
कामाची एकूण किंमत	1590147	185173	1775320
मंजूर निविदा दर	0	0	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	20657	20657
देय रक्कम	1590147	205830	1795977
वजाती -			
1% विमा	15901	1852	17753
1% कामगार उपकर	15901	1852	17753
10% सुरक्षा रक्कम	159015	18517	177532
2% जीएसटी/व्हॅट	31803	3703	35506
2.33% आयकर	36574	4259	40833
गौण खनिज स्वामित्वधन	0	0	0

दंड	00	0	0
एकूण वजाती	259194	30183	289377
निव्वळ देय रक्कम	1330953	175647	1506600

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची किंमत रु.17.96 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.1300/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.900/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरतात. सदर रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी.

02) सदर कामाकरिता सन 2015-2016 ची दरसूची वापरण्यात आलेली आहे तथापी कामाचे दरपृथ:करण पत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेल्या दरांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. परिणामी अंदाजपत्रकामध्ये व पर्यायाने देयकामध्ये दर्शविण्यात आलेले दर लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

03) गौण खनिज स्वामित्वधन रक्कम परिगणना करतांना जिल्हा दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे गुणक देण्यात आलेले आहे तसेच शासन अधिसूचना क्र.गौणख.10/1012/प्र.क्र.63/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे, त्यानुसार परिगणना करण्यात येऊन गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम देयकामधून कपात करणे आवश्यक होते, तथापी संबंधित कंत्राटदार यांनी गौण खनिजचे पास/परवाने जोडलेले नाही किंवा देयकामधून रक्कम कपात करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम रु.153820/- वसुलपात्र ठरते. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रक्कम वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब		एकूण परिणाम	स्वामित्वधन		
		दर		साहित्य	साहित्य वापराचा गुणक	गुणकानुसार परिमाण

	भाग-1					
2	Supplying breaking boulders (Hand broken) 40 mm metal.	641.19	210.90	खडी	1.25	263.63
3	Supplying soft murum.	447.94	74.79	मुरुम	1.30	97.23
7	Providing lay8ng in situ CC of 1:4:8.	3586.60	110.03	रेती	0.45	49.51
8	Providing laying in situ cement concrete M20.	645.46	1467.50	रेती	0.45	660.38
	भाग-2					
2	Providing laying in sutu c.c. 1:4:8.	3586.63	9.77	रेती	0.45	4.40
3	Providing laying M15 RCC.	5219.38	28.26	रेती	0.45	12.72
4	Providing laying situ M15 CC.	4871.83	0.98	रेती	0.45	0.44
	एकूण गौण खनिज वापराचे परिमाण					1088.30
	गौण खनिज स्वामित्व धन दर					141.34
	गौण खनिज स्वामित्व धन रक्कम					153819.62

04)) स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिणामामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे रु.932/- जादा प्रदान झालेले असून सदर रक्कम जबाबदारी निश्चित करण्यात येऊन वसुल करण्यात यावी व शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

बाब क्र.	तपशिल	मोजमापा नुसार परिमाण	10% दबाईकरिता कमी करणे आवश्यक असलेले परिमाण	देय दर	वसुलपात्र रक्कम
4	Spreading 40 mm metalhellip;	210.90	21.09	36.75	775.05
5	Spreading soft murumhellip;	74.79	7.48	21.00	157.10

	एकूण				932.15

05) सदर कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.1796311/- इतकी होती, प्रत्यक्षात झालेल्या निव्वळ काम रु.1775320/- इतक्या रकमेत झाले असून अधिक त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी रु.20657/- असे एकूण रु.1795977/- इतके प्रदान करण्यात आलेले आहे. म्हणजेच रु.1775320/- ऐवजी रु.1795977/- म्हणजे रु.20657/- इतके जादा प्रदान झालेले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करिता कोणतीही तरतुद करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे सदर कामाकरिता प्राप्त निधी रु.1796311/- इतका असून प्रत्यक्षात निव्वळ काम कमी किंमतीत झालेले आहे, म्हणजेच वरीलप्रमाणे रु.20657/- हा खर्च हा शिल्लक अनुदानमधून करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. सदर विवेचनानुसार त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फीसह एकूण रु.20991/- अनुदान शिल्लक राहते, सदर शिल्लक अनुदान शासनाकडे चलनाने जमा करणे आवश्यक होते, त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे दिसून येते.

06) काम पूर्ण दिनांक 31/08/2016 रोजी झालेले आहे, तथापी त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता मा.प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जळगांव यांना मनपा पत्र क्र.441 दिनांक 07/09/2016 रोजी पत्र देण्यात आलेले असून दिनांक 30/09/2016 रोजी तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता पाहणी करण्यात आलेली आहे व मा.प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जळगांव यांचे पत्र क्र.2399 दिनांक 19/10/2016 अन्वये अहवाल प्राप्त झालेला आहे. म्हणजेच काम पूर्ण झाल्यानंतर जवळ जवळ 1 महिन्यांनंतर त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे.

07) सदर कामाची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र.ए163 मध्ये नोंदविण्यात आलेली आहे, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही, त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.167 दिनांक 20/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	400
03	गौण खनिज स्वामित्वधन	153820
04	दबाई	932

	एकूण	**155152**

FDSDNBM7201 (Ref No : 75, Hmm No : 167)

66 वा.क्र.23 मधील गजानन पार्क स.नं.118/1 प्लॉ.नं.5 ते 10 पर्यंत रोड सिमेंट काँक्रीटींग करणे

योजना : आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.गुरुमुख जगवानी) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 130319.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.गुरुमुख जगवानी)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियेाजन समिती, जळगांव यांचे आदेश क्र.2288, दिनांक 03/11/2015 (अ.क्र.01) रु.10.00 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.219, दि.12/08/2015, रु.999800/-
दरसूची वर्ष	2014-2015
कामाची अंदाजित किंमत	रु.999800/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.02 दि.05/04/2016
कंत्राटदाराचे नांव	बीएचआर कंस्ट्रक्शन्स, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 04/10/2016)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण दि.04/06/2016
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी बांभोरी जळगांव यांचे पत्र क्र.68/50-2, दिनांक 18/6/2016

देयकांचा तपशिल	
	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	18, दि.14/7/2016
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	इ-17, पृ.क्र.117 ते 120
कामाची एकूण किंमत	998503
मंजूर निविदा दर	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0
देय रक्कम	998503
वजाती -	
1% विमा	9985
1% कामगार उपकर	9985
10% सुरक्षा रक्कम	99850
2% जीएसटी/व्हॅट	19970
2.33% आयकर	22965
गौण खनिज स्वामित्वधन	0
एकूण वजाती	162755
निव्वळ देय रक्कम	835748

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे

मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची किंमत रु.09.98 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.500/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.100/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने शासन खाती जमा करण्यात यावी.

02) सदर कामाकरिता सन 2014-2015 ची दरसूची वापरण्यात आलेली आहे तथापी कामाचे दरपृथ:करण पत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेल्या दरांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. परिणामी अंदाजपत्रकामध्ये व पर्यायाने देयकामध्ये दर्शविण्यात आलेले दर लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

03) सदर कामाचे देयकामध्ये गौण खनिज स्वामित्व धनाची परिगणना करण्यात येऊन शासन खाती भरणा करण्यात आलेली दिसून येत नाही. शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे. त्यानुसार देयकामधून सुधारित दराने गौण खनिज स्वामित्वधन रक्कम कपात करणे आवश्यक असतांना गौण खनिज स्वामित्वधन रक्कम कपात करण्यात आलेली नाही, त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.104252/- वसुलपात्र ठरत असून संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	दर	परिमाण	गौण खनिज स्वामित्वधन (15/5/2015 पासून रु.141.34)			
				साहित्य	फॅक्टर	फॅक्टर नुसार परिमाण	रक्कम
2	Supply 40 mm metal (hand broken)	63.00	290.70	खडी	0.90	261.63	36978.80
3	Supply of Soft Murum	427.58	290.70	मुरुम	1.30	377.91	53413.80
7	PCC 1:4:8	2738.89	108.96	रेती	0.45	49.03	6929.90
8	PCC 1:2:4	4056.39	108.96	रेती	0.45	49.03	6929.90
	एकूण रक्कम					**737.60**	**104252.40**

	वसुल केलेली रक्कम						**00**
	वसुलपात्र रक्कम						**104252/-**

04) त्याचप्रमाणे सदरचे देयकामध्ये बाब क्र.9 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाची रक्कम रु.25667/- अदा करण्यात आलेली आहे. तथापी त्याबाबतची परिगणना देयकामध्ये दर्शविण्यात आलेली नसल्यामुळे याबाबत पडताळणी करता आली नाही. सदर बाबत गौण खनिज वाहतुक पास व मुरुम परवाना पत्र खालीलप्रमाणे जोडण्यात आलेले आहे.

अ. क्र.	वाहतुक पास क्रमांक	दिनांक	साहित्य	परिमाण (ब्रास)
1	150311990	13/03/2016	रेती	5
2	150315580	15/03/2016	रेती	5
3	150315562	15/03/2016	रेती	5
4	150316885	16/03/2016	रेती	5
5	150316947	16/03/2016	रेती	5
6	150317706	17/03/2016	रेती	5
7	150319886	19/03/2016	रेती	5
8	150319905	19/03/2016	रेती	5
9	150319934	19/03/2016	रेती	5
	एकूण रेती			**45**
10	पत्र क्र.05	27/04/2016	मुरुम	100
	एकूण मुरुम			**100**

वरील अ.क्र.1 ते 9 अन्वये रेती एकूण 45 ब्रास आणण्यात आलेली आहे. तथापी सदर परवानामध्ये प्रत्येकी 2 ब्रासची खाडाखोड करुन 5 ब्रास अशी दुरुस्ती करण्यात आलेली असल्याने रेतीच्या वाहतुक परवानांबाबत लेखापरीक्षणामध्ये साशंकता आहे. तसेच सदर परवानामधील अ.क्र.10 वाहन चालकाचे नांव, अ.क्र.11 रेती जेथे विकली जाणार आहे त्या ठिकाणाचे नांव व खरेदीदाराचे नांव व पत्ता याबाबतचा उल्लेख नमुद करण्यात आलेले नाही, त्याचप्रमाणे

वाहनचालकाची स्वाक्षरी करण्यात आलेल्या नाहीत. परवानांमधील अ.क्र.7 अन्वये रेतीघाट लिलावाचा कालावधी 31/09/2015 पर्यंत असा नमूद करण्यात आलेला आहे, म्हणजेच रेतीघाट लिलावाचा कालावधी सप्टेंबर 2015 मध्ये संपल्यानंतर मार्च 2016 मध्ये वाहतुक करण्यात आलेली असल्याने सदरचे परवाने हे मुदतबाह्य झालेले असल्याने अवैधरित्या रेती वाहतुक करण्यात आलेली असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. वरील विवरणपत्रामधील अ.क्र.10 समोर परवानानुसार मुरुम वाहतुक करण्यात आलेला आहे, सदर परवानाची प्रत ही छायांकित प्रत जोडण्यात येऊन त्यामध्ये काळया शाईच्या पेनाने खाडाखोड करुन कामाचे ठिकाणाचे ऐवजी कंत्राटदाराचे नांव नमुद करण्यात आलेले दिसून येते, त्यामुळे सदरचा मुरुमही अवैधरित्या आणण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. तथापी देयकामध्ये कंत्राटदाराला रु.25667/- रक्कम अदा करण्यात आलेली असून सदरची रक्कमही संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

05) सदर कामाची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र. इ17 मध्ये नोंदविण्यात आलेली आहे, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही, त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.168 दिनांक 20/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	400
03	गौण खनिज स्वामित्वधन	104252
04	गौण खनिज स्वामित्वधन	25667
	एकूण	**130319**

FDSDNBM7201 (Ref No : 76, Hmm No : 168)

67 प्र.क्र.37 अंतर्गत मेहरुण स.नं.468/1अ व 469/2ब मधील रस्ते डांबरीकरण करणे

योजना : नागरी दलीत वस्ती सुधार योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 2787.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

योजना	नागरी दलीत वस्ती सुधार योजना
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.838, दिनांक 9/10/2016 (अ.क्र.5) रु.1210717/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.257, दि.08/09/2016, रु.1210717/-
दरसूची वर्ष	2016-2017
कामाची अंदाजित किंमत	रु.1210717/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.136 दि.22/02/2017
कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवाजी गणपत भंगाळे, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 21/08/2017)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.26)
कामाची स्थिती	भौतिकदृष्टया काम पूर्ण दि.27/06/2017
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्ट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग बांभोरी जळगांवपत्र क्र.70/7002, दि.31/03/2017
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	03, दि.03/05/2017	पुढील आर्थिक वर्षात

मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	ए-008, पृ.क्र.107 ते 108	
कामाची एकूण किंमत	931983	
मंजूर निविदा दर	0	
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	
देय रक्कम	931983	
वजाती -		
1% विमा	9320	
1% कामगार उपकर	9320	
10% सुरक्षा रक्कम	93198	
2% जीएसटी/व्हॅट	18640	
2.33% आयकर	21436	
गौण खनिज स्वामित्वधन	0	
दंड	0	
एकूण वजाती	151914	
निव्वळ देय रक्कम	780069	

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) सदर कामाकरिता सन 2014-2015 ची दरसूची वापरण्यात आलेली आहे तथापी कामाचे दरपृथ:करण पत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेल्या दरांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. परिणामी अंदाजपत्रकामध्ये व पर्यायाने देयकामध्ये दर्शविण्यात आलेले दर लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

02) सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना मोजमाप पत्रकामध्ये मापे दर्शवितांना बाब क्र.8 नवजीवन शॉप ते विद्युत नगरी प्लॉट नं.1 पर्यंतचा रस्त्याचे माप नंतर नमूद करण्यात येऊन संपूर्ण अंदाजपत्रकामध्ये खाडाखोड करुन

अंदाजपत्रक वाढीव करण्यात आलेले दिसून येते. तसेच सदरचा रस्ता हा मुख्य रस्ता असून रुंदी जादा आहे, तथापी अंदाजपत्रकामध्ये फक्त 5.50 मीटर दर्शविण्यात आलेली आहे, तसेच दर्शक नकाशामध्ये मापे दिसून येत नसल्याने लांबीबाबतची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे सदर बाबीचे एकूण माप 445.50 चौ.मी. बाबत लेखापरीक्षणात साशंकता निर्माण होते.

03) सदर कामाची मोजमापे ही मोजमाप पुस्तिका क्र.ए-008 मध्ये नोंदविण्यात आलेली आहेत, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही. त्यामुळे देयकामधील मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही. त्यामुळे करण्यात आलेला खर्च हा लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

04) लेखापरिक्षण कालावधीमध्ये अंतिम देयक अदा करणे बाकी आहे. तथापी काम दिनांक 27/06/2017 रोजी पूर्ण झालेले असल्याने तुलनात्मक विवरणपत्राची तपासणी करण्यात आली असता कामाची अंदाजपत्रकीय व प्रशासकीय मान्यता रक्कम रु.1210717/- इतकी होती. प्रत्यक्षात काम रु.1170144/- इतक्या रकमेमध्ये पूर्ण झालेले आहे, त्यानुसार कामावर रु.40573/- इतकी बचत झालेली आहे. अंदाजपत्रकामध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता तरतुद करण्यात आलेली नाही, त्यामुळे सदरचा खर्च योजनेच्या निधीमधून करणे नियमबाह्य ठरेल, तथापी अंतिम देयकाची प्रतीवरुन सदर बाबीवर रु.14286/- इतका खर्च कामाच्या योजनेच्या निधीमधून करण्यात आलेला असल्याचे दिसून येते. त्यामुळे वरीलप्रमाणे बचत झालेल्या रकमेमधून सदरचा खर्च करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. वरीलप्रमाणे बचतीची रक्कम रु.40573/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे रक्कम भरणा करण्यात आली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात अभिलेखांअभावी पडताळणी करता आली नाही.

05) सदर कामाचे अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करण जोडण्यात आलेले नाही. तथापी अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेले दरामध्ये डांबराचे बाबींमध्ये लीड चार्जेस मुंबई रिफायनरीचे घेण्यात आलेले असल्याचे लेखपरीक्षणाचे मत आहे. याबाबzwj;त वरील शासन निर्णय दिनांक 08/10/2007 नुसार कंत्राटदाराने डांबर खरेदीची देयके जोडलेली नाहीत, त्यामुळे सदरचे वहनावळीचे दर देय ठरत नाहीत. तसेच या बाबीसाठी डांबराचे प्रत्यक्ष वापराचे वेळेचे दर विचारात घेण्यात आलेले नाहीत. या कामासाठी वापरण्यात आलेली सन 2016-17 ची जिल्हा दरसूचीमधील तरतुदीनुसार कमी दर असल्यास त्यानुसार वसुली करणे आवश्यक आहे. त्यामुळे देण्यात आलेले लिड चार्जेस तसेच अंदाजपत्रक तयार करतेवेळी शासकीय रिफायनरीचे दर कमी झालेले असल्यास दरसुचीतील दर व अंदाजपत्रकाचे वेळेचे दर यातील फरक वसुलपात्र ठरतात. तरी याबाबत योग्य ती परिगणना करण्यात येऊन संबंधितांकडून रकमा वसुल करण्यात येऊन संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करण्यात याव्यात.

06) महाराष्ट्र शासन विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनि-2314/देयक कपात रक्कम/ संकीर्ण/अभि-3, दिनांक 31/3/2015 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम कार्यारंभ आदेश दिल्यानंतर विमा संचालनालयाकडे भरणा करणे व तसे विमापत्र सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा प्रथम देयकामधून कंत्राट

रकमेवर 1% प्रमाणे विमा रक्कम कपात करण्यात येऊन विमा संचालनालयाकडे भरणा करुन विमा पत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. तथापी सदरचे कामामध्ये निविदा स्विकृतीच्या वेळी किंवा प्रदानापूर्वी कंत्राटी कामाचा विमा उतरविला असल्याबाबतची खात्री न करता किंवा तसे विमापत्र प्राप्त न करता प्रथम देयकामधून देयक रकमेच्या 1% प्रमाणे रु.9320/- विमा रक्कम कपात करण्यात आलेली आहे, त्यामुळे कामाचा विमा उतरविण्याचा उद्देश सफल होत नाही. तसेच निविदा रकमेवर विमा कपात न करता देयक रकमेवर विमा कपात केल्यामुळे कमी कपात करण्यात आलेली आहे. कामाची किंमत रु.1210717/- वर 1% प्रमाणे रु.12107/- इतकी विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते, त्यामुळे रु.2787/- इतकी कमी कपात करण्यात आलेली आहे. कामाचे उर्वरित देयकांमध्ये अशाच प्रकारे कपात करण्यात आलेली विम्याची रक्कम परिगणीत करण्यात येऊन निविदा रकमेवर 1% पेक्षा कमी कपात करण्यात आली असल्यास अशी कमी कपात करण्यात आलेली रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात यावी.

07) अंदाजपत्रकामध्ये बाब क्र.1 Providing laying 50 mm thick compacted bitumen bound macadamhellip; नुसार 80/100 ग्रेडचे डांबर वापरणेबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. तथापी साहित्य चाचणी अहवालानुसार 60/70 ग्रेड डांबराचे चाचणी अहवाल प्राप्त करण्यात आलेले आहे, यावरुन अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार योग्य प्रतीच्या डांबराचा वापरण्यात करण्यात आलेला नसल्याने कामाची प्रत राखण्यात आलेली नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.169 दिनांक 20/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
12	विमा	2787

FDSDNBM7201 (Ref No : 77, Hmm No : 169)

68 प्र.क्र.34 अंतर्गत मेहरुण स.नं.29अ अजिंठा सोसायटीमध्ये आरसीसी गटार बांधणे

योजना : नागरी दलीत वस्ती सुधार योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 400.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

योजना	नागरी दलीत वस्ती सुधार योजना

प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.628, दि.20/12/2016 रु.2073000/- (अ.क्र.6)
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.376, दि.26/11/2015, रु. 2073000/-
दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.2073000/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.38 दि.3/8/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवाजी गणपत भंगाळे जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 2/2/2017)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.26)
कामाची स्थिती	काम पूर्ण दि. 14/12/2016
चाचणी अहवाल	1) श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी बांभोरी जळगांव पत्र क्र.68/62-01, दिनांक 25/07/2016 2) दक्षता व गुणनियंत्रण मंडळ क्षेत्रिय प्रयोगशाळा जळगांव पत्र क्र.1178 दि.9/9/2015 संदर्भ - मनपा पत्र क्र.38 दि.11/8/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय धावते देयक	तृतीय व अंतिम	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	04, दि.23/9/16	09, दि.15/12/16	18, दि.3/3/17	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	79, पृ.क्र.158 ते 160	79, पृ.क्र.165 ते 168	79, पृ.क्र.174 ते 176	

कामाची एकूण किंमत	907364	786470	370782	2064616
मंजूर निविदा दर	0	0	0	
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	0	23840	23840
देय रक्कम	907364	786470	394622	2088456
वजाती -				
1% विमा	9074	7865	3708	20647
1% कामगार उपकर	9074	7865	3708	20647
10% सुरक्षा रक्कम	90738	78647	37078	206463
2% जीएसटी/व्हॅट	18147	15729	7416	41292
2.33% आयकर	20869	18089	8528	47486
गौण खनिज स्वामित्वधन	9600	7936	3640	21176
दंड	0	0	0	0
एकूण वजाती	157502	136131	64078	357711
निव्वळ देय रक्कम	749862	650339	330544	1730745

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची किंमत रु.20.73 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.1600/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.1200/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी.

02) तुलनात्मक विवरणपत्राची तपासणी करण्यात आली असता मोठ्या प्रमाणांत वाढ/घट झालेली असल्याचे दिसून येते तथापी अशा वाढ किंवा बचत बाबत कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत. नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही अशा सूचना आहेत. सदर कामाकरिता प्रशासकीय मान्यतेनुसार प्राप्त निधी रु.2073000/- इतका असून प्रत्यक्षात निव्वळ काम कमी किंमतीत म्हणजे रु.2064616/- इतक्या किंमतीमध्ये झालेले आहे, म्हणजेच रु.8384/- इतका निधी शिल्लक राहतो. वरीलप्रमाणे शिल्लक अनुदान रु.8384/- शासनाकडे चलनाने जमा करणे आवश्यक होते, त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे दिसून येते. तसेच अंदाजपत्रक तयार करणेपूर्वी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण करुन तंतोतंत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

03) सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करिता कोणतीही तरतुद करण्यात आलेली दिसून येत नाही, त्यामुळे सदरचा खर्च हा मनपा निधीमधून करणे आवश्यक होते. तथापी सदरचा खर्च रक्कम रु.23840/- योजनेच्या शिल्लक रकमेमधून पर्यायाने व्याजाच्या रकमेमधून करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधी व्यतिरिक्त जादा झालेला खर्च हा परस्पर योजनेमधील कामावर वापरण्यात आलेला असल्याने शासन आदेशाचे उल्लंघन झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

04) सदर कामाची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र.ए79 मध्ये नोंदविण्यात आलेली आहे, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही, त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.175 दिनांक 22/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
02	मुद्रांक शुल्क	400

FDSDNBM7201 (Ref No : 78, Hmm No : 175)

69 पिंप्राळा हुडको येथील ख्वाँजानगर गट नं214 परिसर व खोली नं.689 ते 696 व 697 ते 708 मध्ये रस्ता काँक्रीटीकरण करणे

योजना : नागरी दलीत वस्ती सुधार योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 18875.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	नागरी दलीत वस्ती सुधार योजना
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.225, दि.15/07/2015 रु.998283/- (अ.क्र.2)
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.27, दि.15/06/2015, रु.998283/-
दरसूची वर्ष	2014-2015
कामाची अंदाजित किंमत	रु.998283/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.41 दि.13/10/2015
कंत्राटदाराचे नांव	यश बिल्डर्स अॅण्ड कंस्ट्रक्शन्स कं. जळगांव (6.30% कमी दराने)
परफॉर्मन्स सिक्युरिटी	मनपा पावती क्र.45519 दि.09/10/2015 रु.9982/-
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 12/04/2016)

दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण दि. 30/02/2016
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी बांभोरी जळगांव यांचे पत्र क्र.67/27-1, दिनांक 13/5/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	01, दि.16/7/16
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	138 पृ.क्र.22 ते 23
कामाची एकूण किंमत	991493
वजा कमी निविदा दर	-62464
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	11500
देय रक्कम	940529
वजाती -	
1% विमा	9220
1% कामगार उपकर	9220
10% सुरक्षा रक्कम	92903
2% जीएसटी/व्हॅट	18580
2.33% आयकर	21367
गौण खनिज स्वामित्वधन	0
दंड	0

एकूण वजाती	151290
निव्वळ देय रक्कम	789239

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजुर निविदा दरानुसार किंमत रु.9.35 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.500/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.100/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

02) सदर कामाकरिता सन 2014-2015 ची दरसूची वापरण्यात आलेली असून कामाचे संचिकेमध्ये मुळ अंदाजपत्रकाचे दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेल्या दरांबाबत पडताळणी होत नसल्याने सदरचे दर लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

03) सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये व तसेच देयकामध्ये गौण खनिज स्वामित्व धनाची परिगणना करण्यात येऊन शासन खाती भरणा करण्यात आलेली नाही किंवा संबंधित कंत्राटदाराने गौण खनिज वाहतुक पास व परवाना पत्र सादर केलेले नाही. शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले असून त्याप्रमाणे स्वामित्वधनाची परिगणना करुन वसुली करणे आवश्यक होते. त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.18335/- वसुलपात्र ठरत असून संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	दर	परिमाण	गौण खनिज स्वामित्वधन (15/5/2015 पासून रु.141.34)			
				साहित्य	फॅक्टर	फॅक्टर नुसार परिमाण	रक्कम
2	Providing laying in situ CC 1:4:8	2738.89	144.138	रेती	0.45	64.862	9167.60

3	Providing laying in situ 1:2:4	4056.39	144.138	रेती	0.45	64.862	9167.60
	एकूण						**18335.20**
	कपात केलेली गौण खनिज रक्कम						**0.00**
	वसुलपात्र गौण खनिज रक्कम						**18335.20**

04) कपातीच्या रकमा परिगणीत करतांना कामाची निव्वळ किंमत रु.929029/- वर 1% कामगार विमा व कामगार उपकराच्या रकमा रु.9290/- प्रमाणे कपाती करणे आवश्यक असतां रु.9220/- प्रमाणे कपात करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे रु.70/- कामगार विमा व रु.70/- कामगार उपकराच्या रकमा कमी कपात करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या एकूण रु.140/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यता येऊन शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात याव्यात.

05) तुलनात्मक विवरणपत्राची तपासणी करण्यात आली असता वाढ/घट झालेली असल्याचे दिसून येते तथापी अशा वाढ किंवा बचत बाबत कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत. कामाची प्रशासकीय मान्यता किंमत रु.998283/- असून प्रत्यक्ष झालेल्या कामाची किंमत रु.991493/- वजा मंजूर कमी दरानुसार रु.62464/- वजा जाता रु.929029/- नुसार रु.69254/- इतकी रक्कम शिल्लक राहते. तथापी रु.6362/- इतकी बचत दर्शविण्यात आलेली आहे. सदर शिल्लक रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. तसेच सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करिता कोणतीही तरतुद करण्यात आलेली दिसून येत नाही, त्यामुळे सदरचा खर्च हा मनपा निधीमधून करणे आवश्यक होते. तथापी सदरचा खर्च रक्कम रु.11500/- योजनेच्या शिल्लक रकमेमधून पर्यायाने व्याजाच्या रकमेमधून करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीपैकी रक्कम शिल्लक राहत असून त्यामधून त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाची रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. सदर बाब नियमबाह्य ठरते. तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होते असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही.

06) सदर कामाची मोजमापे मोजमाप पुस्तिका क्र.ए138 मध्ये नोंदविण्यात आलेली आहे, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही, त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापांबाबत

लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.176 दिनांक 22/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
02	मुद्रांक शुल्क	400
03	गौण खनिज स्वामित्वधन	18335
04	विमा व उपकर	140
	एकूण	**18875**

FDSDNBM7201 (Ref No : 79, Hmm No : 176)

70 वा.क्र.12 अंतर्गत निमखेडी शिवार गट नं99/3डी-2/3डी-3/84,99/3डी-1, 96, 83, 88 मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीट गटार बांधणे

योजना : आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.सुरेशदादा जैन) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 49341.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.सुरेशदादा जैन)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव यांचे आदेश क्र.1148, दिनांक 07/08/2014 (अ.क्र.10) रु.12.00 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.64, दि.24/07/2014, रु.1200072/-

दरसूची वर्ष	2012-2013
कामाची अंदाजित किंमत	रु.1200072/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.36 दि.2/9/2014
कंत्राटदाराचे नांव	शाईन कंस्ट्रक्शन्स पुणे (0.50% कमी)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 01/03/2015)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.29)
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 25/12/2015
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी बांभोरी जळगांव यांचे पत्र क्र.65/26, दिनांक 22/5/2015
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय व व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	04, दि.11/6/15	06, दि.17/10/2016	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	166 पृ.क्र.57 ते 76	166, पृ.क्र.77 ते 87	
कामाची एकूण किंमत	936868	272621	1209489
वजा कमी निविदा दर	-4684	-1363	-6047
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	0	0
देय रक्कम	932184	271258	1203442
वजाती -			

1% विमा	9322	2713	12035
1% कामगार उपकर	9322	2713	12035
10% सुरक्षा रक्कम	93218	27126	120344
2% जीएसटी/व्हॅट	18644	5425	24069
2.33% आयकर	21440	6239	27679
गौण खनिज स्वामित्वधन	5235	1600	6835
स्थानिक संस्था उपकर (एलबीटी)	2330	678	3008
दंड	0	12034	12034
एकूण वजाती	159511	58528	218039
निव्वळ देय रक्कम	772673	212730	985403

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) सदर कामाकरिता सन 2012-2013 ची दरसूची वापरण्यात आलेली असून कामाचे संचिकेमध्ये मुळ अंदाजपत्रकाचे दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेल्या दरांबाबत पडताळणी होत नसल्याने सदरचे दर लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

02) सदर कामाचे अंदाजपत्रकामध्ये व तसेच देयकामध्ये गौण खनिज स्वामित्व धनाची परिगणना करण्यात येऊन शासन खाती भरणा करण्यात आलेली नाही किंवा संबंधित कंत्राटदाराने गौण खनिज वाहतुक पास व परवाना पत्र सादर केलेले नाही. शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले असून त्याप्रमाणे स्वामित्वधनाची परिगणना करुन वसुली करणे आवश्यक होते. त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.1575/- वसुलपात्र ठरत असून संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	दर	परिमाण	गौण खनिज स्वामित्वधन (15/5/2015 पासून रु.141.34)

				साहित्य	फॅक्टर	फॅक्टर नुसार परिमाण	रक्कम
2	Providing laying in PCC (1:4:8) for foundation	2647.67	12.72	रेती	0.45	5.72	808.50
3	Providing casting in situ CC 1:2:4 for RCC element	4631.96	34.08	रेती	0.45	15.34	2168.00
4	Providing casting in situ M15 for RCC slab	5386.68	3.11	रेती	0.45	1.40	198.00
	एकूण						**3174.50**
	कपात केलेली गौण खनिज रक्कम						**1600.00**
	वसुलपात्र गौण खनिज रक्कम						**1574.50**

03) करारनामा अट क्र.29 नुसार कामाचा दोष निवारण कालावधी (Defect Liability Period) हा 6 महिन्यांचा ठेवण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण 2011/प्र.क्र.467/रस्ते-1, दिनांक 21/11/2011 नुसार असा दोष निवारण कालावधी हा 2 वर्षांचा असणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कालावधीमध्ये कामामध्ये काही दोष निर्माण झाल्यास व त्यावर दुरुस्तीकरिता खर्च करण्याची आवश्यकता भासल्यास महानगरपालिकेवर दायित्व वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास येते.

04) तुलनात्मक विवरणपत्राची तपासणी करण्यात आली असता वाढ/घट झालेली असल्याचे दिसून येते तथापी अशा वाढ किंवा बचत बाबत सविस्तर कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत. कामाची प्रशासकीय मान्यता किंमत रु.1200000/- असून प्रत्यक्ष झालेल्या कामाची किंमत रु.1209489/- वजा मंजूर कमी दरानुसार रु.6047/- वजा जाता रु.1203442/- नुसार रु.3442/- इतका जादा खर्च करण्यात आलेला आहे. तथापी रु.9340/- इतकी बचत दर्शविण्यात आलेली आहे. तसेच कामाची अंदाजित किंमत रु.1200000/- वर 0.50 टक्के कमी दराप्रमाणे रु.6000/- वजा जाता रु.1194000/- इतक्या किंमतीमध्ये काम पूर्ण होणे आवश्यक होते. तसेच रु.1194000/- ऐवजी रु.1203442/- इतका खर्च करण्यात आलेला असल्याने रु.9442/- इतका जादा खर्च करण्यात आलेला आहे. कमी दराने निविदा स्विकृत केल्यानंतर वाढीव काम करुन त्यावर खर्च करणेत आलेला असल्याने कंत्राटदाराचे हित जोपासले जात असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे, तसेच जादा करण्यात आलेला खर्च रु.9442/- हा मनपा निधीमधून करणे आवश्यक होते.

तथापी सदरचा खर्च रक्कम रु.9442/- योजनेच्या शिल्लक रकमेमधून पर्यायाने व्याजाच्या रकमेमधून करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही. तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीपैकी कमी दराची निविदा स्विकृत केल्यामुळे अशी रक्कम शिल्लक राहत असून त्यामधून वाढीव खर्चाची रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे, सदर बाब नियमबाह्य ठरते. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होते असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही.

05) करारनामा अट क्र.5 नुसार मुदतीत काम पूर्ण न केल्यास मुदत संपल्याच्या तारखेपासून रु.200/- (रु.दोनशे मात्र) प्रति दिवस प्रमाणे दंडाची रक्कम जास्तीत जास्त अंदाजित रकमेच्या 10% राहील अशी तरतुद आहे. सदर कामाची मुदत दिनांक 01/03/2015 रोजी संपल्यानंतर कंत्राटदाराने काम दिनांक 25/12/2015 रोजी पूर्ण केलेले आहे, म्हणजे 299 दिवस विलंबाने काम पूर्ण केलेले आहे. करारनाम्यातील अटीनुसार 299 x 200 = 59800/- इतकी दंड वसुल करणे आवश्यक असतांना रु.12034/- इतकी दंड रक्कम वसुली करण्यात आलेला आहे. त्यामुळे उर्वरित रक्कम रु.47766/- दंड वसुलपात्र ठरतो. सदर रक्कम रु.47766/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन योजनेच्या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी व त्याप्रमाणे सविस्तर अहवाल मा.जिल्हा नियोजन समिती जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.177 दिनांक 22/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
02	गौण खनिज	1575
05	दंड	47766
	एकूण	**49341**

FDSDNBM7201 (Ref No : 80, Hmm No : 177)

71 एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना(IHSDP) अंतर्गत जळगांव शहर मनपा हद्दीतील पिंप्राळा गट नं.214/2 येथे 472 घरकुले बांधकाम कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्तीबाबत

योजना : एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना (IHSDP) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 193074.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे प्रगतीपथावर आहे. उपरोक्त विषयाचे अनुषंगाने एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेंतर्गत जळगांव शहर मनपा हद्दीतील पिंप्राळा गट नं.214/2 येथे 472 घरकुले बांधकाम कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्तीबाबतची संचिका तपासणी करण्यात आली. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

घरकुल बांधकामाची मुळ किंमत	108839000
कंत्राटदार (सल्लागार)	शुन्य कन्सल्टंट, अकोला (आर्कीटेक्ट मनिष एस. भुतडा)
मंजूर दर	4.20% of the actual work.
करारनामा	रु.3500/- मुद्रांकावर दिनांक 23/11/2011
Agreement Clause (5) Mode of payments -	That the corporation will make the payment to the consultant of the accepted offer amount of total 4.20% of the actual work to the consultant in the following mode manner;
1) Getting technical sanction, approval of Municipal drawings submission of 3 sets each	10% of total fees
2) After release of 1st installment from government preparation of tender document 7 allotment tender to contractor	10% of total fees
3) Day to day supervision	60% of total fees
4) After release of 2nd installment	10% of total fees
5) completion of the project	10% of total fees
कार्यादेश	मनपा पत्र क्र.163, दिनांक 26/9/2011

प्रदानाचा तपशिल	प्रमाणक क्रमांक 02, दिनांक 23/06/2017 रु.1234782/- प्रकल्प किंमतीच्या 4.20 टक्के प्रमाणे फी रक्कम - 108839000 x 4.20% = 4571238 एकूण फीच्या 60% प्रमाणे 4571238x 60% = 2742743/- करारनामा अट क्र.5(3) नुसार झालेल्या कामाचा खर्च/ अंदाजित रक्कम 88481894/108839000 x 100 = 81.29% 60% नुसार सुपरव्हीजन फी - 2742743 x 81.29% = 2229575 वजा यापूर्वी अदा (-) 994793 निव्वळ अदा करावयाची रक्कम - 1234783 वजा 10.30% आयकर - 127183 निव्वळ देय रक्कम - 1107599

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) निविदा कागदपत्रांनुसार कंत्राटदार शुन्य कंस्टल्टंट अकोला यांचे प्रोपायटर/पार्टनर श्री.मनिष सुखदेवजी भुतडा यांचे सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला यांचेकडील वास्तुशास्त्रज्ञ नोंदणी प्रमाणपत्र क्र.714 दिनांक 31/01/2007 जोडण्यात आलेली असून सदर प्रमाणपत्रानुसार कंत्राटदाराची वर्गवारी ही आय-5 व काम करण्याची पात्रता ही रु.15.00 लक्ष व नोंदणी प्रमाणपत्राची मुदत दिनांक 09/01/2007 ते 08/01/2012 अशी दर्शविण्यात आलेली आहे. सदर कामाची किंमत ही रु.1088.39 कोटी असून निविदाकाराचा देकार हा निविदा रकमेच्या 4.20% प्रमाणे रु.45.71 लक्ष इतका येतो, म्हणजे त्यांच्या काम करण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त रकमेची निविदा स्विकारण्यात आलेली आहे. सदर बाब ही नियमबाह्य ठरते व याबाबत निविदा समितीने/निविदा मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

02) वरीलप्रमाणे सादर केलेल्या प्रमाणपत्राची मुदत दिनांक 08/01/2012 पर्यंत होती, तथापी त्यानंतरही काम सुरु होते, मात्र संबंधित कंत्राटदार यांचेकडील मुदतवाढीचे प्रमाणपत्र मागविण्यात आलेले नाही, त्यामुळे नोंदणी कालावधीनंतरही कंत्राटदाराकडून काम करवून घेण्यात येत असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

03) सदर निविदेमध्ये दर भरण्याकरिता .....% on actual expenditure inquired on the project असे नमूद करण्यात आलेले आहे तसेच करारनामा अट क्र.5 प्रदानाची पद्धत मध्ये Corporation will make the payment to the consultant on the accepted offer amount of total 4.20% of the actual work to the consultant असे नमूद करण्यात आलेले आहे. सदरच्या अटीमुळे बांधकाम कंत्राटदार यांनी जादा दराची निविदा भरली असल्यामुळे कामाच्या भागावरील किंमतीवर जादा दर आकारणी करुन येणाऱ्या रकमेवर कंस्टल्टंट यांना रकमा अदा करण्यात आलेली आहे, त्यामुळे अट क्र.5(3) नुसार 60% दैनंदिन देखरेखीकरिता देय रक्कमेचे जादा प्रदान झालेले आहे, त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. सदर जादा प्रदान रक्कम रु.193074/- संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी.

प्रमाणक क्र.02 अन्वये कामाच्या भागावरील प्रत्यक्ष खर्च	80809045
करारनामा अ.क्र.5(3) नुसार झालेल्या कामाचा खर्च/ अंदाजित रक्कम	प्रकल्प किंमतीच्या 4.20 टक्के प्रमाणे फी रक्कम - 108839000 x 4.20% = 4571238 एकूण फीच्या 60% प्रमाणे 4571238x 60% = 2742743/- नुसार बांधकामाचे 14वे धावते देयकानुसार रकमेप्रमाणे - 80809045/108839000 x 100 = 74.25% 60% नुसार सुपरव्हीजन फी - 2742763 x 74.25% = 2036502 वजा यापूर्वी अदा (-) 994793 निव्वळ अदा करावयाची रक्कम - 1041709
प्रमाणक क्र.02 अन्वये करारनमा अट क्र.5(3) नुसार देयक रकमेवर अदा केलेली रक्कम	1234783
जादा प्रदान रक्कम	193074

04) करारनामा अट क्र.4 नुसार कामाचे कंत्राटदाराकडून विहित कालावधीमध्ये काम करुन घेण्याचे प्रयत्न कंस्टल्टंट यांनी करावे, अन्यथा महानगरपालिकेस मुदतवाढबाबत प्रस्ताव सादर करावेत असे नमुद आहे. मुळ बांधकामाचे कंत्राटानुसार बांधकाम कंत्राटाची मुदत 30/11/2013 पर्यंत होती त्यानंतर दोनवेळा मुदतवाढ देण्यात येऊन अंतिम मुदत दिनांक 31/12/2016 पर्यंत होती. तथापी त्यानंतरही काम सुरु असल्याचे दिसून येते, मात्र त्यानंतरच्या

मुदतवाढीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे पर्यायाने कंस्टल्टंट यांचे कामाचीही मुदत संपलेली आहे असे लेखापरीक्षणाचे मत आहे. त्याचप्रमाणे सदर अटीमध्ये ज्याप्रमाणे बांधकाम कंत्राटदार यांनी विहित मुदतीमध्ये काम पूर्ण न केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येते त्याचप्रमाणे सल्लागार यांनाही दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक होते असे लेखापरीक्षणाचे मत असून त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही.

05) स्थायी समिती सभा क्र.106 दिनांक 16/09/2011 आयत्या वेळेचा विषय क्र.03 ठराव क्र.811 नुसार सल्लागार यांचे कामाचे स्वरुप नमुद करण्यात आलेले असून त्यानुसार (1) मंजूर प्रस्तावानुसार घरकुलाच्या बांधकामाचे सविस्तर नकाशे व डिझाईन तयार करणे व मनपास पुरविणे, (2) घरकुल बांधकामकरिता निविदा पेपर तयार करणे व निविदा स्विकारणे कामी मनपास सल्ला देणे, (3) घरकुलाचे बांधकामाचे वेळोवेळी सुपरव्हीजन करणे व कायम स्वरुपी बांधकामावर स्वखर्चाने इंजिनिअर यांची नियुक्ती करणे, (4) बांधकामाचे थर्ड पार्टी ऑडीट करुन घेणे कामी मनपास सहकार्य करणे, (5) योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी कामी म्हाडा व हुडको मुंबई तसेच महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाकडे अनुदान मागणी प्रस्ताव पाठविणे, अनुदान प्राप्त करुन घेणे कामी आवश्यक पाठपुरावा करुन घेणे, (6) योजनेच्या बांधकामाचा वेळोवेळी त्रैमासिक अहवाल शासनाकडे पाठविणे कामी तसेच शासनाकडील आलेल्या पत्राचा निपटारा करणे कामी मनपास वेळोवेळी सल्ला देणे, (7) बांधकामाचे मक्तेदार व मनपा प्रशासनात वाद उपस्थित झाल्यास त्याचे निराकरण करणे कामी मनपास सल्ला देणे, (8) शासनाच्या धोरणानुसार व मंजूर प्रकल्प अहवालानुसार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे कामी मनपास सल्ला देणे अशी आहेत. तथापी त्याबाबत करारनामा करतांना कोणत्याही अटी/शर्ती नमुद करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे संबंधित सल्लागार यांचेकडून ठरावानुसार कामे करुन घेण्यात आलेली नाहीत, तसेच त्याबाबतचे कोणतेही अभिलेखे संचिकेमध्ये लावण्यात आलेली नाही. तथापी त्यांना वेळोवेळी रकमा प्रदान करण्यात आलेल्या दिसून येतात.

06) करारनामा अट क्र.2(ए1) नुसार टेंडर डॉक्युमेंटस् तयार करणे, (2ए2) नुसार यशस्वी निविदाकारास टेंडर आदेश देण्यामध्ये मदत करणे, (2ए3) नुसार आवश्यक प्लॅन व ड्रॉईंग तयार करणे, 2(ए4) नुसार योग्य त्या प्राधिकरणाकडून (विशेषत: म्हाडा) तांत्रिक मान्यता मिळविणे, 2(बी) नुसार लाभार्थ्यांकडून लाभार्थी हिस्सा गोळा करुन महानगरपालिका कडे जमा करणेस मदत करणे, 2(सी) नुसार सल्लागार यांनी कामाचे दैनंदिन देखरेखीसाठी एक पदवीधर स्थापत्य अभियंता यांची कायम नेमणूक करणे व बांधकाम कंत्राटदारास बांधकामामध्ये वेळोवेळी सल्ला देणे व तांत्रिक मान्यतेनुसार कामकाज करुन कामाची योग्य ती गती राखणे, बांधकामाची मोजमापांबाबत पडताळणी करणे व त्यानुसार देयकांची तपासणी करुन महानगरपालिकेकडे प्रदानासाठी सादर करणे इत्यादी कामे करणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे सल्लागार यांचेमार्फत कामे करण्यात येत असल्याबाबत अभिलेखांवरुन पडताळणी झाली नाही.

07) करारनामा अट क्र.(5) अन्वये सल्लागार यांना कामाच्या विविध टप्प्यांवर निश्चित केलेल्या टक्केवारीनुसार प्रदान करणे आवश्यक होते. तथापी रकमा प्रदान करतांना त्याप्रमाणे सल्लागार यांचेमार्फत कामे पूर्ण झालेली असल्याबाबतची कोणतीही कागदपत्रे संचिकेमध्ये लावण्यात आलेली नाहीत. त्यामुळे संबंधित सल्लागार यांनी

योजनेच्या कामकाजामध्ये प्रत्यक्ष सहभाग घेऊन काम केलेले असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयके अदा करतांना वरील बाबींबाबत विभागामार्फत पडताळणी करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास येते.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.187 दिनांक 07/03/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
03	जादा प्रदान	193074
	एकूण	**193074**

FDSDNBM7201 (Ref No : 81, Hmm No : 187)

72 जळगांव शहरात 15 ठिकाणी विविध भागात अंगणवाडी बांधणे

योजना : नागरी अंगणवाडी बांधकाम योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 146110.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	जळगांव शहरात 15 ठिकाणी विविध भागात अंगणवाडी बांधणे
योजना / लेखाशिर्ष	नागरी अंगणवाडी बांधकाम योजना
प्रशासकीय मान्यता	महासभा क्र.91 दिनांक 31/05/2013 विषय क्र.04 ठराव क्र.1565 अन्वये 40 अंगणवाडी केंद्राचे बांधकामाकरिता शासन निर्णयानुसार 530 चौ.फुट ऐवजी 487.42 चौ.फुट करणेकरिता प्रती अंगणवाडी रु.449400/- प्रमाणे रु.17976000/- खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान.

निधी उपलब्धता	महिला व बालविकास प्रकल्प पुणे-1 यांचे आदेश क्र.6782 दि.4/09/2012 अन्वये रु.17971150/- निधी मंजूर त्यापैकी बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी), जळगांव यांचे पत्र क्र.2002, दिनांक 30/03/2013 अन्वये प्रथम टप्प्यात धनादेश क्र.921915 दिनांक 30/03/2013 स्टेट बँक ऑफ इंडिया रक्कम रु.6823075/- इतका निधी जळगांव महानगरपालिकेस अदा करण्यात आला व उर्वरित निधी अंगणवाडी केंद्रांचे बांधकाम प्रगतीनुसार देण्यात येईल असे कळविण्यात आले. सदर निधी रोखपुस्तकानुसार दिनांक 03/04/2013 रोजी योजनेच्या बँक खात्यात जमा करण्यात आला.
DSR/SSR	2012-13
निविदा रक्कम	रु.6750000/-
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा पत्र क्र.150 दिनांक 31/01/2014
कंत्राटदाराचे नांव	श्री.तुषार रमेश महाजन, जळगांव (अंदाजपत्रकीय दरानुसार)
कामाचा कालावधी	8 महिने (i.e. upto 30/09/2014)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.30)
करारनामा तपशिल	रु.5800/- मुद्रांकावर दिनांक 28/01/2014
मुदतवाढ	--
टेस्ट रिपोर्ट	1) श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी जळगांव पत्र क्र.64/33 दिनांक 4/12/2014
कामाची स्थिती	काम प्रगतीत
देयकांचा तपशिल	

तपशिल	प्रथम धावते देयक	दुसरे धावते देयक	तिसरे धावते देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक / दिनांक	01, दि.31/05/2014	02, दि.10/12/2014	01, दि.07/05/2016	
मोजमाप पुस्तिका क्रमांक / पृष्ठ क्र.	ए-132, पृष्ठ क्र.52 ते 55	ए-132, पृष्ठ क्र.66 ते 72	ए-132, पृष्ठ क्रhellip; ते 114	
कामाची किंमत	1172710	1539469	1860137	4572316
-/+ मंजूर निविदा दर देय रक्कम	0	0	0	0
त्रयस्थ लेखापरीक्षण फी	0	0	0	0
एकूण देय रक्कम	1172710	1539469	1860137	4572316
वजाती -				
रॉयल्टी	0	15000	10000	25000
विमा	11727	15395	18601	45723
कामगार उपकर	11727	15395	18601	45723
सुरक्षा रक्कम	117271	153947	186014	457232
जीएसटी/व्हॅट	23454	30789	37203	91446
आयकर	26972	35408	42783	105163
एलबीटी	2932	3849	4650	11431
दंडाची रक्कम	0	0	18601	18601
एकूण वजाती	194083	269783	336453	800319
निव्वळ देय रक्कम	978627	1269686	1523684	3771997

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) सहायक संचालक, नगररचना, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांनी जळगांव शहारातील महानगरपालिका क्षेत्रातील कार्यरत अंगणवाडी केंद्रांची माहिती दर्शविणारा तक्ता संचिकेमध्ये जोडण्यात आलेला असून त्यामध्ये हरीविठ्ठल नगर भागातील अंगणवाडी क्र.54 ते 61 एकूण 8 अंगणवाडी केंद्रांसमोर वार्ड क्र.4/49 मध्ये 7 व वार्ड क्र.4/50 मध्ये 1 असे 8 अंगणवाडी केंद्र दर्शविण्यात आलेले आहे, तथापी सदर विवरणपत्रामध्ये जागा उपलब्ध करुन देण्याचे ठिकाण या रकान्यामध्ये जागा शासकीय मालकीची असून मनपाच्या नावावर हस्तांतरण करण्याची कार्यवाही सुरु आहे असे नमूद करण्यात आलेले आहे. तरी सदरच्या जागा हस्तांतरीत झाल्या किंवा कसे याबाबत संचिकेमध्ये पुढील कागदपत्रे दिसून येत नाहीत. त्याचप्रमाणे समतानगर भागातील अंगणवाडी केंद्र क्र.62, 63 वार्ड क्र.4/66 समोर स.नं.463/3/4 आर्य चाणक्य संस्थेस जागा दिली आहे असे नमूद असून त्याच भागातील अंगणवाडी केंद्र क्र.64, 65, 66 समोर विर सावरकर संस्थेस दिलेली जागा असे नमूद आहे, त्यामुळे सदर जागा संबंधित संस्थांकडून पुन:श्च मिळविण्यात आल्या किंवा कसे याबाबत संचिकेमध्ये कागदपत्रे दिसून आली नाहीत. त्यामुळे विविध संस्थांना देण्यात आलेल्या जागा पुन:श्च ताब्यात न घेता अंगणवाडी बांधकाम करण्यात आलेले असल्याचे दिसून येते.

02) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती 2010/प्र.क्र.34/39 दिनांक 06/08/2010 अन्वये रु.50 लक्ष व त्यावरील निविदांकरिता दिनांक 01/12/2010 पासून ई-निविदा कार्यप्रणाली सुरु करणेबाबत निर्देश दिलेले आहे. तथापी सदर कामाची ई-निविदा न करता बंद लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे शासन निर्देशांचे पालन करण्यात आलेले नाही.

03) निविदेमध्ये श्री.तुषार रमेश महाजन जळगांव यांनी सादर केलेले कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.वि. जळगांव यांचेकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र क्र.2660 दिनांक 28/03/2013 नुसार प्रमाणपत्राची मुदत दिनांक 19/03/2013 ते 18/03/2016 अशी होती, तथापी त्यानंतरही काम करण्यात आलेले आहे, तथापी संबंधित कंत्राटदार यांचेकडून पुढील मुदतीचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे कंत्राटदार नोंदणी नसतांनाही त्यांचेकडून काम करुन घेण्यात येत असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

04) महानगरपालिका क्षेत्रामध्ये 40 अंगणवाडी इमारतींचे बांधकाम करण्याकरिता बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) जळगांव यांना जागा निश्चित करुन देण्यात येऊन बांधकामाबाबत संमतीपत्र देण्यात आले. त्यानुसार मा.आयुक्त, महिला व बालविकास विभाग, पुणे यांचेमार्फत निधी मंजुर करण्यात आला. पहिल्या टप्प्यात 15 अंगणवाडी इमारतींचे बांधकामाकरिता रु.6823075/- इतका निधी प्राप्त झाला. याबाबतची निविदा प्रक्रीया राबविण्यात येऊन श्री.तुषार रमेश महाजन जळगांव यांना बांधकामाचे कंत्राट अंदाजपत्रकीय दरानुसार देण्यात आले व कामाचा कालावधी 8 महिने निश्चित करण्यात आला, त्यानुसार दिनांक 30/09/2014 अखेर काम पूर्ण होणे आवश्यक होते, तथापी सदर कालावधीमध्ये काम पूर्ण झालेले दिसून आले नाही. संबंधित कंत्राटदार यांनी काम करण्याचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी मुदतवाढीबाबत प्रस्ताव सादर करणे व त्यानुसार महानगरपालिकेमार्फत

मुदतवाढीबाबत उचित कार्यवाही करणे आवश्यक होते, तथापी त्याप्रमाणे मुदतवाढीबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

05) विहित मुदतीमध्ये काम पूर्ण करण्यात आलेले नसल्यामुळे तिसरे धावते देयकामधून रु.18601/- इतकी दंडाची रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. करारनामा अट क्र.5 नुसार मुदतीत काम पूर्ण न केल्यास मुदत संपल्याच्या तारखेपासून रु.200/- प्रती दिवस प्रमाणे दंडाची रक्कम वसुल करण्यात येईल अशी अट असतांना त्याप्रमाणे परिगणना न करता देयक रकमेच्या 1% प्रमाणे दंडाची रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. मनपा पत्र क्र.307, दिनांक 11/08/2014 अन्वये 15 अंगणवाडी केंद्रांचे बांधकामाची मुदत 30/09/2014 रोजी संपणार आहे, परंतु 7 अंगणवाडी केंद्रांचे बांधकाम प्रगतीपथवर असून उर्वरित 8 अंगणवाडी केंद्रांचे कामास सुरुवात केलेली नाही, त्यामुळे 15 अंगणवाडी केंद्रांचे बांधकाम हे मुदतीतच पूर्ण करावे अन्यथा निविदा अटी व शर्तीनुसार आपणावर कार्यवाही करण्यात येईल अशा आशयाची नोटीस संबंधित कंत्राटदार यांना देण्यात आली, तथापी यावर संबंधित कंत्राटदार यांनी कुठलाही लेखी खुलासा सादर केलेला दिसून येत नाही किंवा मुदतवाढीबाबतचा प्रस्तावही सादर केलेला नाही. तिसरे धावते देयकाकरिता मोजमापे कोणत्या दिनांकास नोंदविण्यात आली याबाबतचा तपशिल संचिकेमधून उपलब्ध होऊ शकला नाही तसेच मोजमाप पुस्तिकाही उपलब्ध झाली नाही. देयक दिनांक 30/03/2016 रोजी तयार करण्यात आलेले आहे, त्यानुसार दिनांक 30/09/2014 रोजी मुदत संपल्यानंतर दिनांक 01/10/2014 ते 30/03/2016 पर्यंत 547 दिवसांचा विलंब झालेला असून त्याप्रमाणे 547 x 200 = 109400/- दंड आकारणी करणे आवश्यक होते, त्यामुळे 109400 - 18601 = 90799/- इतकी कमी आकारणी करण्यात आलेली असल्याने सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुलपात्र ठरते.

06) अंदाजपत्रकामध्ये खालीलप्रमाणे बाबी दर्शविण्यात आलेल्या आहेत, तथापी तीनही देयकांनुसार खालीलप्रमाणे बाबींची कामे करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे अंदाजपत्रकानुसार कामे करण्यात आलेली नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

बाब क्रमांक	तपशिल	परिमाण	दर	रक्कम
31	Providing fixing screw down 15 mm. dia. Bib/stop tap.	45	203.04	9136.80
32	Providing fixing screw down 15 mm. dia. Bib/stop tap.	30	206.21	6186.03
33	Providing, hoisting and fixing in position sintex or equivalent High Density Water storage tank.	7500	8.46	63450.00
34	Providing fixing 75 mm. dia asbestos cement soil/vent/ waste pipe with necessary fixtures.	180	173.43	31217.40

35	Providing fixing white glazed earthenware sink.	15	1520.68	22810.02
36	Shooting of still photographs outdoor and indoor of construction.	15	56	840.00
37	Add Royalty charges for sand murum metal	478.05	70.67	33783.79
38	Electrification charges for anganwadi 1% of total cost			66740.41

07) गौण खनिज स्वामित्वधन रकमांच्या परिगणनेबाबत शासनामार्फत वेळोवेळी दर निश्चित करण्यात आलेले आहेत. शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले असून त्यानुसार गौण खनिज परिगणना करुन त्यांची वसुली करणे व शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली रकमा भरणा करण्यात येऊन सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना सादर करणे आवश्यक होते, तथापी गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना कमी करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे असून त्याप्रमाणे रक्कम रु.36710/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	तपशिल	प्रथम धावते देयक	दुसरे धावते देयक	एकूण परिमाण	साहित्य	फॅक्टर	गौण खनिज परिमाण	तिसरे धावते देयक	साहित्य	फॅक्टर	गौण खनिज परिमाण
3	Providing laying in situ cement concrete of 1:4:8	12.09	2.03	14.12	रेती	0.45	6.354	9.43	रेती	0.45	4.2435
4	Providing laying in situ C.C. of M-20 grade of trap/granite/ quartzite/gneiss metal for RCC work in foundation	22.65	0	22.65	रेती	0.45	10.1925	12.94	रेती	0.45	5.823
5	Providing casting in situ c.C. of M-15 grade of granite/quartzitegneiss metal for RCC Column	17.32	4.4	21.72	रेती	0.45	9.774	12.04	रेती	0.45	5.418

6	Providing casting in situ c.C. of M-20 grade of granite/quartzite/gneiss metal for RCC beams lintels	30.71	13.58	44.29	रेती	0.45	19.9305	25.3	रेती	0.45	11.385
7	Providing brick masonary in cement mortar 1:6 using second class burnt bricks in foundations plinth	7.47	13.7	21.17	रेती	0.32	6.7744	21.38	रेती	0.32	6.8416
8	Providing Brick masonary in c.m.1:6 using second class burnt bricks in superstructure	78.57	38.25	116.82	रेती	0.32	37.3824	68.58	रेती	0.32	21.9456
9	Filling plinth and floors with approved excavated materials in 15 to 20 cm. (spec.Bd.A10 page 262)	0	118.44	118.44	मुरुम	1.3	153.972	67.68	मुरुम	1.3	87.984
13	Providing casting in situ c.C. of M-15 grade of trap granite/quartzite/ gneiss metal for RCC slabs and landings.	0	39.62	39.62	रेती	0.45	17.829	22.64	रेती	0.45	10.188
15	Provding half brick thick wall	0	178.53	178.53	रेती	0.035	6.24855	110.888	रेती	0.035	3.88108
16	Providing and laying C.C. flooring 40 mm. thick with 1:2:3 cement concrete laid to proper level and slope.	0	244.02	244.02	रेती	0.45	109.809	139.44	रेती	0.45	62.748
19	Providing internal cement plaster 6 mm. thick in single	0	155.12	155.12	रेती	0.0076	1.178912	155.12	रेती	0.0076	1.178912

	coat in c.m.1:3 without neeru finish.										
21	Providing internal cement plaster 12 mm. thick in single coat in c.m. 1:4 without neeru finish.	0	789.81	789.81	रेती	0.016	12.63696	451.32	रेती	0.016	7.22112
23	Providing internal cement plaster 12 mm thick in single coat in cement mortar 1:3 without neeru finish	0	49.04	49.04	रेती	0.016	0.78464	61.3	रेती	0.016	0.9808
24	Providing sand faced plaster externally in c.m. 1:4 using kharsalia/ kasaba or similar type of sand in all positions including base coat of 15 mm. thick in c.m.1:4.	0	602.84	602.84	रेती	0.016	9.64544	344.48	रेती	0.016	5.51168
	एकूण परिमाण						402.5123				235.350292
	गौण खनिज स्वामित्वधन दर						70.67				141.34
	गौण खनिज स्वामित्वधन रक्कम						28445.544				33264.4103
	देयकांमधून वसुल केलेली रक्कम						15000				10000
	उर्वरित वसुलपात्र रक्कम						13446				23264
	एकूण वसुलपात्र रक्कम										36710

08) मनपा पत्र क्र.275, दिनांक 01/07/2017 अन्वये बालविकास अधिकारी (नागरी), जळगांव यांना दिनांक 31/03/2017 अखेरचा बांधकामाची स्थिती, तरतुद व खर्चाबाबतची माहितीबाबतचे विवरणपत्र जोडण्यात आलेले

आहे. त्यानुसार अंगणवाडी बांधकामांचे उद्दीष्ट 40, बांधकाम पूर्ण 11, प्रगतीपथवरील बांधकामे 2, अद्याप सुरु न झालेले बांधकामे 27, बांधकामावरील खर्च रु.4572316/- असे दर्शविण्यात आलेले आहे. कारणे या रकान्यामध्ये पहिल्या टप्प्यात 15 अंगणवाडी केंद्र बांधकामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करण्यात आली, त्यापैकी 11 अंगणवाडी बांधकाम पूर्ण झाले असून 2 केंद्र प्रगतीपथावर आहे, उर्वरित 25 केंद्र बांधकामसाठी आवश्यक निधी प्राप्त न झाल्याने मक्तेदाराने अद्याप कार्यादेश स्विकारलेले नाही, निधी प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल असे नमूद करण्यात आलेले आहे. सदर पत्रावर व अहवालावर स्वाक्षरी करण्यात आलेली नाही, तसेच सदर अहवाल बालविकास अधिकारी (नागरी) जळगांव यांना देण्यात आल्याबाबत त्यांच्या पोहोच घेण्यात आलेल्या दिसून येत नाही. याबाबत 25 अंगणवाडी केंद्रांचे बांधकामाकरिता रु.11235000/- ची निविदा प्रक्रीया सन 2014-15 मध्ये राबविण्यात आली त्यामध्ये दराचा लिफाफा दिनांक 11/01/2014 रोजी उघडण्यात आलेला आहे, सर्वात कमी दराची श्री.सुनिल बी. पाटील अॅण्ड कंपनी यांनी अंदाजपत्रकीय दरानुसार निविदा प्राप्त झालेली दिसून येते, तथापी स्थायी समिती सभा क्र.44 दिनांक 03/07/2015 विषय क्र.02 ठराव क्र.285 अन्वये 25 अंगणवाडी केंद्र बांधणेबाबत आलेल्या प्रस्तावानुसार आलेल्या निविदा व त्यामधील आलेल्या दरांची माहिती घेणे व त्यावर सविस्तर अभ्यास करणे आवश्यक वाटत असल्याने सन्मा.सदस्यांनी सूचित केलेप्रमाणे सदरचा प्रस्ताव तूर्त तहकुब ठेवणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानंतर स्थायी समिती सभा क्र.58 दिनांक 15/01/2016 आयत्या वेळेचा विषय क्र.01 ठराव क्र.385 अन्वये दरास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, त्यानंतर मनपा पत्र क्र.781 दिनांक 18/2/2016 अन्वये रु.10400/- चे मुद्रांकावर करारनामा करणे व रु.112350/- इतकी रक्कम जमा करणेबाबत कंत्राटदारास पत्र देण्यात आलेले आहे, म्हणजेच निविदा उघडण्यात आल्यानंतर मंजुरीची कार्यवाही जवळ जवळ 25 महिन्यांच्या कालावधीनंतर करण्यात आलेली आहे. तथापी करारनामा, इसारा रक्कम भरल्याबाबतची पावती, कामाचे आदेश इत्यादी कागदपत्रे संचिकेमध्ये लावण्यात आलेली नाही, त्यानंतर मनपा पत्र क्र.275 दिनांक 01/07/2017 सोबतच्या अहवालामध्ये आवश्यक निधी प्राप्त न झाल्याने मक्तेदाराने कार्यादेश स्विकारलेले नाही असे नमूद करणे हे संयुक्तीक वाटत नाही.

09) वरीलप्रमाणे बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून अंगणवाडी बांधकामाकरिता रु.6823075/- इतका निधी प्राप्त झालेला होता, त्यामधून दिनांक 31/03/2018 अखेर रु.4572316/- इतका निधी खर्च झालेला असून रु.2250759/- इतका निधी व खात्यामध्ये वेळोवेळी बँकेमार्फत जमा झालेले व्याज एकूण रु.926314/- अधिक कंत्राटदाराकडून वसुल दंड रक्कम रु.18601/- अशी एकूण रु.3195674/- इतकी रक्कम शिल्लक आहे. वरीलप्रमाणे प्रस्तावित कामे विहित मुदतीमध्ये पूर्ण करण्यात आलेले नसल्यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात निधी अडकून पडलेला आहे. तसेच काम पूर्ण न झाल्यामुळे अंगणवाडी केंद्रे कार्यान्वीत होण्यास व पर्यायाने नागरी भागातील बालकांना त्यांचा लाभ मिळण्यास विलंब झालेला दिसून येतो.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.188 दिनांक 07/03/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
05	दंड	109400
07	गौण खनिज	36710
	एकूण	**146110**

FDSDNBM7201 (Ref No : 82, Hmm No : 188)

73 प्र.क्र.37 मध्ये ठिकठिकाणी कॉंक्रिट रस्ते तयार करणे

योजना : नागरी दलीत वस्ती सुधार योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 2294.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	नागरी दलीत वस्ती सुधार योजना
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.796, दिनांक 19/08/2016 (अ.क्र.4) रु.1362461/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.568, दि.15/03/2016 रु.1361461/-
दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.1362461/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.138 दि.22/02/2017
कंत्राटदाराचे नांव	श्री.विलास पी. पाटील, जळगांव (0.60% कमी दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 21/08/2017)

दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.26)
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 10/07/2017
चाचणी अहवाल	दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (साबां) नाशिक क्षेत्रिय प्रयोगशाळा जळगांव यांचे पत्र क्र.1596 दि.28/2/2017
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	09, दि.28/06/2017	पुढील आर्थिक वर्षात
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	ए-043, पृ.क्र.181 ते 183	
कामाची एकूण किंमत	1078517	
वजा कमी निविदा दर	-6471	
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	
देय रक्कम	1072046	
वजाती -		
1% विमा	10720	
1% कामगार उपकर	10720	
10% सुरक्षा रक्कम	107205	
2% जीएसटी/व्हॅट	21441	
2.33% आयकर	24657	
गौण खनिज स्वामित्वधन	22055	
दंड	0	

एकूण वजाती	196798	
निव्वळ देय रक्कम	875248	

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) सदर कामाचे अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करण जोडण्यात आलेले नसल्यामुळे अंदाजपत्रकामधील दर्शविण्यात आलेले दरांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता येत नाही. त्यामुळे अंदाजपत्रकातील दर लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

02) अंदाजपत्रकामधील मोजमाप पत्रकामध्ये बाब क्र.2 supply of hard murum ची मापे दर्शवितांना 50x8x0.25 = 100 cum असे दर्शविण्यात आहे. रस्त्याची एकूणा लांबी ही 197 मी. लांबी व रुंदी 4.50 मी ते 9 मी. अशी दर्शविण्यात आलेली असतांना मुरुम करिता 50 मी. लांबी व 8 मी. रुंदी दर्शविण्यात आलेली आहे. तसेच बाब क्र.4 व 5 नुसार कॉंक्रीटीकरणाचे बाबींच्या परिमाण व दरसुचीनुसार रेती वापराचा फॅक्टर यांचा विचार न करता बाब क्र.6 मध्ये रेतीचे परिमाण 100 घमी असे दर्शविण्यात आलेले आहे. त्यानुसार बाब क्र.6 नुसार गौण खनिज परिगणना रेती व मुरुम करिता 100+100 = 200 cum अशी दर्शविण्यात आलेली आहे. यावरुन अंदाजपत्रक तयार करतांना वास्तविक परिमाण न दर्शविता परिमाणे ही मोघमरित्या दर्शविण्यात येत असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

03) सदर कामाची मोजमापे ही मोजमाप पुस्तिका क्र.ए-043 मध्ये नोंदविण्यात आलेली आहेत, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही. त्यामुळे देयकामधील मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही. त्यामुळे करण्यात आलेला खर्च हा लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

04) लेखापरिक्षण कालावधीमध्ये अंतिम देयक अदा करणे बाकी आहे. तथापी काम दिनांक 10/07/2017 रोजी पूर्ण झालेले असल्याने तुलनात्मक विवरणपत्राची तपासणी करण्यात आली असता कामाची अंदाजपत्रकीय व प्रशासकीय मान्यता रक्कम रु.1362461/- इतकी होती व मंजूर निविदा दरानुसार काम 0.60% कमी दराने स्विकृत करण्यात आले. प्रत्यक्षात काम रु.1239905/- इतक्या रकमेमध्ये पूर्ण झाले व त्यामधून निविदा दर मंजूर करता रु.1231905/- इतकी रक्कम देय होती. त्यानुसार अंदाजपत्रकीय रकमेमधून खर्च वजा जाता कामावर रु.130556/- इतकी बचत झालेली आहे तथापी तुलनात्मक विवरणपत्रामध्ये 122380/- इतकी दर्शविण्यात आलेली आहे. अंदाजपत्रकामध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता तरतुद करण्यात आलेली नाही, त्यामुळे सदरचा खर्च योजनेच्या निधीमधून करणे नियमबाह्य ठरेल, तथापी अंतिम देयकाची प्रतीवरुन सदर बाबीवर रु.19618/- इतका खर्च कामाच्या योजनेच्या निधीमधून करण्यात आलेला असल्याचे दिसून येते. त्यामुळे वरीलप्रमाणे बचत झालेल्या रकमेमधून सदरचा खर्च करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. वरीलप्रमाणे बचतीची रक्कम रु.130556/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे रक्कम भरणा करण्यात आली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात अभिलेखांअभावी खात्री करता आली नाही.

05) महाराष्ट्र शासन विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनि-2314/देयक कपात रक्कम/ संकीर्ण/अभि-3, दिनांक 31/3/2015 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम कार्यारंभ आदेश दिल्यानंतर विमा संचालनालयाकडे भरणा करणे व तसे विमापत्र सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा प्रथम देयकामधून कंत्राट रकमेवर 1% प्रमाणे विमा रक्कम कपात करण्यात येऊन विमा संचालनालयाकडे भरणा करुन विमा पत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. तथापी सदरचे कामामध्ये निविदा स्विकृतीच्या वेळी किंवा प्रदानापूर्वी कंत्राटी कामाचा विमा उतरविला असल्याबाबतची खात्री न करता किंवा तसे विमापत्र प्राप्त न करता प्रथम देयकामधून देयक रकमेच्या 1% प्रमाणे रु.10720/- विमा रक्कम कपात करण्यात आलेली आहे, त्यामुळे कामाचा विमा उतरविण्याचा उद्देश सफल होत नाही. तसेच निविदा रकमेवर विमा कपात न करता देयक रकमेवर विमा कपात केल्यामुळे कमी कपात करण्यात आलेली आहे. मंजूर निविदेनुसार कामाची किंमत रु.1354286/- वर 1% प्रमाणे रु.13543/- इतकी विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते, त्यामुळे रु.2823/- इतकी कमी कपात करण्यात आलेली आहे. कामाचे उर्वरित देयकांमध्ये अशाच प्रकारे कपात करण्यात आलेली विम्याची रक्कम परिगणीत करण्यात येऊन निविदा रकमेवर 1% पेक्षा कमी कपात करण्यात आली असल्यास अशी कमी कपात करण्यात आलेली रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात यावी.

06) सदर कामाचे देयकामध्ये गौण खनिज स्वामित्व धनाची परिगणना करण्यात कंत्राटदारास अदा करण्यात येऊन परत कपाती करण्यात आलेली आहे. तथापी संबंधित कंत्राटदाराने गौण खनिज वाहतुक पास व परवाना पत्र सादर केलेले नाही. शासन अधिसूचना दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.**2294**/- वसुलपात्र ठरत असून संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	दर	परिमाण	गौण खनिज स्वामित्वधन (15/5/2015 पासून रु.141.34)			
				साहित्य	फॅक्टर	फॅक्टर नुसार परिमाण	रक्कम
2	Supply of Hard Murum	447.94	54.00	मुरुम	1.30	70.20	9922.10
3	Providing laying in situ C.C. 1:4:8	3586.60	116.77	रेती	0.45	52.55	7427.40
4	Providing casting in situ C.C. M-20	5245.63	142.31	रेती	0.45	64.04	9051.40

	एकूण						**26400.9**
	कपात केलेली गौण खनिज रक्कम						**24107**
	वसुलपात्र गौण खनिज रक्कम						**2294**

07) स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिमाणामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.189 दिनांक 07/03/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
09	गौण खनिज स्वामित्वधन	2294

FDSDNBM7201 (Ref No : 83, Hmm No : 189)

74 प्र.क्र.22 अंतर्गत राम मंदीर ते चौधरी वाडा येथील रस्ता काँक्रीटीकरण करणे

योजना : नागरी दलीत वस्ती सुधार योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 135811.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	नागरी दलीत वस्ती सुधार योजना
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.628 दिनांक 20/02/2016 (अ.क्र.02) रु.1400000/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.378, दि.27/11/2015 रु.1395197/- पूर्णांकित रु.1400000/-
दरसूची वर्ष	2015-2016

कामाची अंदाजित किंमत	रु.1400000/-
निधी वितरण तपशिल	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र.पालिका/नादवसुयो/कावि/अनुदान/359/2015, दिनांक 02/11/2015 अन्वये रु.1.00 कोटी निधी सन 2015-2016 या वित्तीय वर्षासाठी मंजुर
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.189 दि.16/03/2017
कंत्राटदाराचे नांव	यश बिल्डर्स अॅण्ड कंस्ट्रक्शन्स कंपनी, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 15/09/2017)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.26)
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 16/04/2017
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्ट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग बांभोरी जळगांव पत्र क्र.70/64-16, दि.31/03/2017
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	160, दि.19/05/2017	167, दि.05/12/2017	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	ए-194, पृ.क्र.9 ते 10	ए-194, पृ.क्र.20 ते 31	
कामाची एकूण किंमत	1140375	250498	1390873
वजा कमी निविदा दर	0	0	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	16463	16463
देय रक्कम	1072046	266961	1339007
वजाती -			

1% विमा	11404	2505	13909
1% कामगार उपकर	11404	2505	13909
10% सुरक्षा रक्कम	114037	25050	139087
2% जीएसटी/व्हॅट	22808	5010	27818
2.33% आयकर	26229	5762	31991
गौण खनिज स्वामित्वधन	0	0	0
दंड	0		0
एकूण वजाती	185882	40832	226714
निव्वळ देय रक्कम	954493	226129	1180622

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) सदर कामाचे अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करण जोडण्यात आलेले नसल्यामुळे अंदाजपत्रकामधील दर्शविण्यात आलेले दरांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता येत नाही. त्यामुळे अंदाजपत्रकातील दर लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

02) मनपा पत्र क्र.136, दिनांक 16/5/2016 अन्वये मंजूर निविदाकारास करारनामा करणे व अनामत रक्कम भरणा करणेबाबत पत्र देण्यात आलेले आहे, त्यानुसार कंत्राटदाराने 20/05/2016 रोजी करारनामा करुन दिलेला आहे, तथापी संबंधित मंजूर निविदाकारास कामाचे आदेश देण्यात आलेले नाही. तथापी त्यानंतर मनपामार्फत पुन:श्च स्मरणपत्र क्र.1 स्वरुपात पत्र क्र.1175 दिनांक 15/03/2017 अन्वये करारनामा करणे व इसारा रक्कम भरणा करणेबाबत मंजूर निविदाकारास पत्र देण्यात आलेले आहे व त्यानुसार पुन:श्च मंजूर निविदाकाराने दिनांक 16/03/2017 रोजी करारनामा करुन दिला व कामाचे आदेश दिनांक 16/03/2017 रोजी देण्यात आलेले आहे. म्हणजेच दिनांक 20/5/2016 अन्वये मंजूर निविदाकाराने करारनामा करुन दिल्यानंतरही तात्काळ कामाचे आदेश देण्यात आले नाही, व दिनांक 15/03/2017 रोजी पुन:श्च करारनामा करणेबाबत पत्र देण्यात आलेले आहे, त्यामुळे विभागामार्फत या प्रक्रीयेमध्ये जवळजवळ 10 महिन्यांचा विलंब झालेला आहे. परिणामी काम पूर्ण करण्यासही विलंब झालेला असल्याने नागरिकांना सुविधेचा लाभ विलंबाने मिळालेला आहे. त्याचप्रमाणे तांत्रिक लिफाफा हा दिनांक 16/04/2016 रोजी उघडण्यात आल्यानंतर तात्काळ कामाचे आदेश देण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

03) सदर कामाचे देयकामध्ये गौण खनिज स्वामित्व धनाची परिगणना करुन कपात करण्यात आलेली दिसून येत

नाही. तसेच संबंधित कंत्राटदाराने गौण खनिज वाहतुक पास व परवाना पत्र सादर केलेले नाही, त्यामुळे शासन महसुलीची हानी झालेली आहे. शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे परिगणना करणे आवश्यक होते. तथापी कमी परिगणना करण्यात आलेली आहे. संबंधित कंत्राटदार यांनी गौण खनिज वाहतुक पास, परवाना पत्रे जोडलेली नसल्याने संपूर्ण रक्कम रु.135811/- वसुलपात्र ठरत असून संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व मा.जिल्हाधिकारी जळगांव यांना चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

बाब क्रमांक	बाब	दर	एकूण परिणाम	गौण खनिज स्वामित्वधन		
				साहित्य	साहित्य वापराचा गुणक	फॅक्टर नुसार परिमाण
2	Providing laying CC M-20 Trimix Treatment	645.46	2135.30	रेती	0.45	960.885
	एकूण गौण खनिज वापराचे परिमाण					960.885
	गौण खनिज स्वामित्व धन दर					141.34
	गौण खनिज स्वामित्व धन रक्कम					135811

04) खाजगी इंजिनिअरींग कॉलेजकडून प्राप्त करण्यात आलेल्या चाचणी अहवालानुसार कंत्राटदाराने पावती क्र.2624 अन्वये रु.460/- प्रदान केलेले आहे, तथापी देयकामध्ये बाब क्र.3 नुसार चाचणी अहवालापोटी रु.550/- अदा करण्यात आलेले आहे, त्यामुळे रु.90/- जादा प्रदान झालेले असल्याने संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरतात. सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन शासनाने योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

05) तुलनात्मक विवरणपत्राची तपासणी करण्यात आली असता कामाची अंदाजपत्रकीय व प्रशासकीय मान्यता रक्कम रु.1395197/- इतकी होती व निविदा अंदाजपत्रकीय दराने स्विकृत करण्यात आले. प्रत्यक्षात काम रु.1390874/- इतक्या रकमेमध्ये पूर्ण झाले. त्यानुसार अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा खर्च हा रु.4323/- इतकी बचत दर्शविण्यात आलेली आहे. अंदाजपत्रकामध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता कोणतीही तरतुद करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे सदरचा खर्च योजनेच्या रकमेतून अनुज्ञेय ठरत नाही. त्यामुळे कामावरील प्रत्यक्ष खर्च रु.1390874/- इतका खर्च करण्याऐवजी कामावरील प्रत्यक्ष खर्च रु.1390874/- तसेच त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणावरील खर्च रु.16463/- असे एकूण रु.1407337/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/

प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही. तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीव्यतिरिक्त जादा झालेला खर्च हा परस्पर योजनेमधील कामावर वापरण्यात आलेला असल्याने शासन आदेशाचे उल्लंघन झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

06) सदर कामाची मोजमापे ही मोजमाप पुस्तिका क्र.ए-194 मध्ये नोंदविण्यात आलेली आहेत, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही. त्यामुळे देयकामधील मोजमापांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही. त्यामुळे करण्यात आलेला खर्च हा लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.190 दिनांक 12/03/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
04	गौण खनिज स्वामित्वधन	135811

FDSDNBM7201 (Ref No : 84, Hmm No : 190)

75 प्र.क्र.37 अंतर्गत मेहरुण स.नं.463/1 व 463/2 मधील रस्ते डांबरीकरण

योजना : नागरी दलीत वस्ती सुधार योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 64185.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	नागरी दलीत वस्ती सुधार योजना

प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी, जळगांव आदेश क्र.838, दिनांक 09/10/2016 (अ.क्र.15) रु.1848456/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.264, दिनांक 08/09/2016 रु.1848456/-
दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.1848456/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.134, दिनांक 22/02/2017
कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवाजी गणपत भंगाळे, कंत्राटदार, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 21/08/2017
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.26)
कामाची स्थिती	22/06/2017 (भौतिकदृष्ट्या पूर्ण)
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्ट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग बांभोरी जळगांव पत्र क्र.70/70-01, दि.31/03/2017
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	157/03-05-2017	लेखापरीक्षण कालावधीमध्ये रक्कम अदा केलेली नाही.
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	008, पृ.102 ते 104	008, पृ.133 ते 137
कामाची एकूण किंमत	1529124	
वजा कमी निविदा दर	0	
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	

देय रक्कम	1529124	
वजाती -		
1% विमा	15291	
1% कामगार उपकर	15291	
10% सुरक्षा रक्कम	152912	
2% जीएसटी/व्हॅट	30582	
2.33% आयकर	35170	
गौण खनिज स्वामित्वधन	134965	
दंड	0	
एकूण वजाती	384211	
निव्वळ देय रक्कम	1144913	

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) महाराष्ट्र शासन विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनि-2314/देयक कपात रक्कम/ संकीर्ण/अभि-3, दिनांक 31/3/2015 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम कार्यारंभ आदेश दिल्यानंतर विमा संचालनालयाकडे भरणा करणे व तसे विमापत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापी निविदा स्विकृतीच्या वेळी किंवा प्रदानापूर्वी कंत्राटी कामाचा विमा उतरविला असल्याबाबतची खात्री न करता किंवा तसे विमापत्र प्राप्त न करता दोन देयकामधून देयक रकमेच्या 1% प्रमाणे विमा रक्कम कपात करण्यात आलेली आहे. कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.1848456/- इतकी असून त्यानुसार 1% प्रमाणे 18485/- इतकी विमा रक्कम कपात करणे आवश्यक असतांना दोनही देयकांमधून एकूण रु.16869/- इतकी रक्कम कपात करण्यात आलेली असल्यामुळे रु.1616/- इतकी रक्कम वसुलपात्र ठरते. तरी सदर रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन शासकीय विमा निधीकडे चलनाद्वारे भरणा करण्यात यावी व तसा सविस्तर अहवाल विमा संचालनालयाकडे सादर करण्यात यावा.

02) करारनामा अट क्र.19 नुसार कामाकरिता लागणारी खडी, रेती, मुरुम, डबर इ. गौण खनिज मटेरियलची रॉयल्टी, लागू असलेला जकात कर व इतर कर मी स्वत: भरेल व तसे सर्टीफिकेट जळगांव महानगरपालिकेस सादर करेल, अन्यथा नियमानुसार रॉयल्टी धावत्या देयकातून कपात करण्याचा अधिकार जळगांव महानगरपालिकेस राहील.

कंत्राटदाराने गौण खनिजांचे परवाने संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही, प्रथम धावते देयकामधून गौण खनिज रक्कम कपात करण्यात आलेली आहे. दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे प्रमाण दर्शविण्यात आलेले आहे व त्यानुसार गौण खनिजाची परिगणना करणे आवश्यक होते. तथापी त्याप्रमाणे परिगणना करण्यात आलेली नसल्यामुळे गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना कमी करण्यात आलेली आहे. तरी खालीलप्रमाणे स्वामित्वधनाची रक्कम रु.37922/- संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन शासन खाती चलनाने जमा करण्यात येऊन त्यासंबंधीचा अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सविस्तर तपशिल व चलनाच्या प्रतीसह सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	देयकानुसार परिमाण	फॅक्टर	स्वामित्वधनाचे परिमाण
5	Spreading oversize 40 mm/50 mm metal	363.45	1.25	454.313
6	Spreading Hard Murum Soft Murum	591.45	1.30	768.885
	एकूण परिमाण			1223.198
	स्वामित्व धन दर			141.34
	स्वामित्व धन रक्कम			172887
	वसुल केलेली रक्कम			134965
	वसुलपात्र रक्कम			37922

03) सदर कामाचे अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करणपत्रक जोडण्यात आलेले नाही, तथापी अन्य कामाचे संचिकेमधील सन 2015-2016 चे दरपृथ:करण पत्रकानुसार डांबराचे बाबींमध्ये लीड चार्जेस 425 कि.मी. घेण्यात आलेले आहे, म्हणजेच सदरचे दर हे मुंबई रिफायनरीचे घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्रदान करण्यात आलेले बाब क्र.9, 10 व 11 मध्ये लिड चार्जेस व Heating Unloading Charges असे घेण्यात आलेले आहे. याबाबzwj;त वरील शासन निर्णय दिनांक 08/10/2007 नुसार कंत्राटदाराने डांबर खरेदीची देयके जोडलेली नाहीत, त्यामुळे सदरचे दर देय ठरत नाहीत. तसेच या बाबीसाठी डांबराचे प्रत्यक्ष वापराचे वेळेचे दर विचारात घेण्यात आलेले नाहीत. या कामासाठी वापरण्यात आलेली सन 2015-16 ची जिल्हा दरसूचीमधील सर्वसाधारण टिपणी अ.क्र.4.7 नुसार डांबराचे दर दिनांक 16/08/2015 रोजीचे घेण्यात आलेले असून अंदाजपत्रक तयार करतेवेळी डांबराचे दर कमी/जास्त झालेले असल्यास त्याप्रमाणे परिगणना करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हा दरसूचीमधील तरतुदीनुसार कमी दर असल्यास त्याप्रमाणे वसुली करणे आवश्यक आहे. त्यामुळे देण्यात आलेले लिड चार्जेस तसेच अंदाजपत्रक तयार करतेवेळी शासकीय रिफायनरीचे दर कमी झालेले असल्यास दरसुचीतील दर व अंदाजपत्रकाचे वेळेचे दर यातील फरक वसुलपात्र ठरतात. तरी याबाबत योग्य ती परिगणना करण्यात येऊन संबंधितांकडून रकमा वसुल करण्यात

येऊन संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करण्यात याव्यात. उदाहरणादाखल लिड चार्जेस कमी करुन दर्शविण्यात आलेली असून त्यानुसार वरील सूचनांप्रमाणे खालीलप्रमाणे रक्कम रु.26647/- वसुल करण्यात यावी व योजनेच्या योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

बाब क्रमांक	बाब	दिलेला दर	वजा लिड चार्जेस	देय दर	परिमाण	वसुलीची रक्कम
9	Providing laying 50 mm thk compacted bitumen bound macadam	193.40	4.30	189.10	2303.43	9904.75
10	Providing 25 mm thk open graded premix bituminous carpet	251.54	4.53	247.01	2303.43	10434.54
11	Providing bituminous liquid seal coat	64.40	1.87	62.53	2303.43	4307.41
	एकूण वसुली					24646.7

04) स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन मधील Rd.13.7 नुसार भरावाचे कामामध्ये 10% दबाईकरिता परिणामामध्ये कपात करणे आवश्यक आहे, त्यानुसार अशा प्रमाणे कपात करण्यात आलेली दिसून येत नाही.

05) सदरचे काम दिनांक 22/06/2017 रोजी पूर्ण झालेले आहे, तथापी कामाचे अंतिम देयक लेखापरीक्षण कालावधीमध्ये अदा करणे बाकी असल्याचे दिसून येते. तसेच तुलनात्मक विवरणपत्रानुसार तपासणी करण्यात आली असता कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.1848456/- इतकी असून कामावरील एकूण खर्च रु.1686966/- इतका वजा जात रु.161490/- इतकी बचत दिसून येते, तथापी रु.161583/- इतकी बचत दर्शविण्यात आलेली आहे. अंदाजपत्रकामध्ये त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता कोणतीही तरतुद करण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणावरील खर्च हा योजनेच्या रकमेमधून देय ठरत नाही. त्यामुळे योजनेच्या रकमेतून फक्त कामावरील खर्च रु.1686966/- इतका करणे व त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता करण्यात आलेला खर्च रु.21812/- हा नगरपालिका निधीमधून करणे आवश्यक ठरते, तथापी सदरचा खर्च कामाच्या/योजनेच्या बचत रकमेमधून करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीव्यतिरिक्त करण्यात आलेला खर्च हा परस्पर योजनेमधील कामावर वापरण्यात आलेला असल्याने शासन आदेशाचे उल्लंघन झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

06) सदर कामाची मोजमापे नोंदविण्यात आलेली मोजमाप पुस्तिका क्र.008 लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे मोजमापे व देयके याबाबत पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.191 दिनांक 12/03/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	विमा	1616
02	गौण खनिज स्वामित्वधन	37922
03	दरसूची तफावत	24647
	एकूण	**64185**

FDSDNBM7201 (Ref No : 85, Hmm No : 191)

76 वा.क्र.34 मध्ये सुप्रिम कॉलनी भागातील मेहरुण सनं.163 भाग व 165 भाग मध्ये आरसीसी गटार बांधणे व रोड क्रॉसिंगला स्लॅब कल्व्हर्टबांधणे

योजना : अल्पसंख्याक निधी **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 40476.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	अल्पसंख्याक निधी
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी, जळगांव आदेश क्र.348, दिनांक 23/05/2016 (अ.क्र.01) रु.2000000/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.21, दिनांक 03/05/2016 रु.2000000/-
दरसूची वर्ष	2015-2016

कामाची अंदाजित किंमत	रु.2000000/-
निधी वितरण तपशिल	महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय क्र.क्षेविका-2016/ प्र.क्र.43/का.9 दिनांक 31/3/2016 रु.2000000/- दिनांक 25/10/2016 रोजी रु.1905000/- दिनांक 8/11/2016 रोजी रु.7500000/-
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.64, दिनांक 13/10/2016
कंत्राटदाराचे नांव	योगराज कंस्ट्रक्शन्स, जळगांव (4.95% कमी दराने म्हणजे रु.1901000/- किंमतीचे)
परफॉर्मन्स सिक्युरिटी	मनपा पावती क्र.8180 दिनांक 02/09/2016 अन्वये रु.20000/-
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 12/04/2017
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र जोडलेले नाही.
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्ट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग बांभोरी जळगांव पत्र क्र.69/31-01, दि.21/02/2017
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय धावते देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	01/07-04-2017	06/27-03-2018	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	ए003, पृ.79 ते 82	ए003, पृ.96 ते 97	
कामाची एकूण किंमत	804750	999187	1803937
वजा कमी निविदा दर	-39835	-49460	-89295
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	0	0

देय रक्कम	764915	949727	1714642
वजाती -			
1% विमा	7649	9497	17146
1% कामगार उपकर	7649	0	7649
10% सुरक्षा रक्कम	76492	94973	171465
2% जीएसटी/व्हॅट	15298	0	15298
2.33% आयकर	17593	21844	39437
गौण खनिज स्वामित्वधन	8205	0	8205
दंड	0	9497	9497
एकूण वजाती	132886	135811	268697
निव्वळ देय रक्कम	632029	813916	1445945

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) महाराष्ट्र शासन विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनि-2314/देयक कपात रक्कम/ संकीर्ण/अभि-3, दिनांक 31/3/2015 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम कार्यारंभ आदेश दिल्यानंतर विमा संचालनालयाकडे भरणा करणे व तसे विमापत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापी निविदा स्विकृतीच्या वेळी किंवा प्रदानापूर्वी कंत्राटी कामाचा विमा उतरविला असल्याबाबतची खात्री न करता किंवा तसे विमापत्र प्राप्त न करता दोन देयकामधून देयक रकमेच्या 1% प्रमाणे विमा रक्कम कपात करण्यात आलेली आहे. कामाची मंजूर दरानुसार रक्कम रु.1901000/- इतकी असून त्यानुसार 1% प्रमाणे 19010/- इतकी विमा रक्कम कपात करणे आवश्यक असतांना रु.17146/- इतकी रक्कम कपात करण्यात आलेली असल्यामुळे रु.1864/- इतकी रक्कम वसुलपात्र ठरते. तरी सदर रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन शासकीय विमा निधीकडे चलनाद्वारे भरणा करण्यात यावी व तसा सविस्तर अहवाल विमा संचालनालयाकडे सादर करण्यात यावा.

02) करारनामा अट क्र.20 नुसार कामाकरिता लागणारी खडी, रेती, मुरुम, डबर इ. गौण खनिज मटेरियलची रॉयल्टी, लागू असलेला जकात कर व इतर कर मी स्वत: भरेल व तसे सर्टीफिकेट जळगांव महानगरपालिकेस सादर करेल, अन्यथा नियमानुसार रॉयल्टी धावत्या देयकातून कपात करण्याचा अधिकार जळगांव महानगरपालिकेस राहील.

कंत्राटदाराने गौण खनिजांचे परवाने संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही, प्रथम धावते देयकामधून गौण खनिज रक्कम कपात करण्यात आलेली आहे. दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे प्रमाण दर्शविण्यात आलेले आहे व त्यानुसार गौण खनिजाची परिगणना करणे आवश्यक होते. तथापी दुसऱ्या व अंतिम देयकामधून त्याप्रमाणे परिगणना करण्यात आलेली नसल्यामुळे गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना कमी करण्यात आलेली आहे. तरी खालीलप्रमाणे स्वामित्वधनाची रक्कम रु.10120/- संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन शासन खाती चलनाने जमा करण्यात येऊन त्यासंबंधीचा अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सविस्तर तपशिल व चलनाच्या प्रतीसह सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	दोन्ही देयकानुसार एकूण परिमाण	फॅक्टर	स्वामित्वधनाचे परिमाण
2	Providing Laying C.C. 1:4:8	65.038	0.45	29.267
3	Providing Laying M15 for RCC Wall	200.178	0.45	90.080
4	Providing Laying M15 for Slab	22.897	0.45	10.304
	एकूण परिमाण			129.651
	स्वामित्व धन दर			141.34
	स्वामित्व धन रक्कम			18325
	वसुल केलेली रक्कम			8204
	वसुलपात्र रक्कम			10120

03) स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशन मधील Bd.A.1.2 नुसार खोदकामातून निघालेले साहित्यामधून उपयोगी व निरुपयोगी साहित्य वेगळे काढण्यात येऊन उपयोगी साहित्य कामाचे जागेपासून 50 मीटर अंतराचे आंत स्टॅक करण्यात यावा व कामामध्ये भरावासाठी वापरण्यात यावा अशी तरतुद आहे. तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली असल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे संचिकेमध्ये लावण्यात आलेले नसल्याने याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

04) सदर कामाचे प्रथम व दुसरे धावते देयके संचिकेमध्ये जोडण्यात आलेली आहेत, प्रमाणकांची व रोखपुस्तकामधील नोंदींची तपासणी करण्यात आली असता देयकांवर व संचिकेमधील टिपणींमध्ये प्रथम धावते देयक व दुसरे धावते देयक असे नमुद करण्यात आलेले आहे. तथापी अंतिम देयक अदा करण्यात आले किंवा कसे याबाबतचे अभिलेखे संचिकेमध्ये जोडण्यात आलेल नाही, तसेच रोखपुस्तकात पुढील कालावधीमध्येही अंतिम देयक अदा करण्यात आले

नसल्याबाबत निदर्शनास येते. सदर काम पूर्ण केल्यानंतर काम पूर्णत्वाचा दाखला सादर करणे आवश्यक आहे, तथापी अशा प्रकारचा दाखला संचिकेमध्ये जोडण्यात आलेला नाही, त्यामुळे काम पूर्ण झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

05) सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.2000000/- इतकी असून मंजूर निविदा किंमत रि.1901000/- अशी होती. कामावर दोन देयकांद्वारे एकूण खर्च रु.1803937/- इतकी करण्यात आलेला आहे. म्हणजेच मंजूर रक्कम रु.2000000/- मधून खर्च वजा जाता रक्कम रु.196063/- इतकी रक्कम शिल्लक राहते. सदर शिल्लक रक्कम शासनाकडे तात्काळ चलनाद्वारे भरणा करणे आवश्यक आहे. तथापी अशा प्रकारे रक्कम भरणा करण्यात आली किंवा कसे, तसेच मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.348 दिनांक 23/05/2016 मधील अट क्र.4 नुसार विनियोग प्रमाणपत्र सादर करण्यात आले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात अभिलेखांअभावी पडताळणी करता आली नाही.

06) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ दिनांक 17/06/2010 मधील अ.क्र.3(1) अन्वये बांधकाम मुल्यावर 1% कामगार उपकर वसुल करणे, अ.क्र.3(3) नुसार नोंदवही ठेवणे व मासिक विवरण पुढील महिन्याच्या 10 तारखेपूर्वी अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांचेकडे पाठवणे आवश्यक आहे जेणेकरुन त्यांना जमा झालेल्या रकमेचा ताळमेळ घेणे शक्य होईल, तथापी सदर कामाचे दुसरे धावते देयकामधून कामगार उपकराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. तरी दुसरे धावते देयकानुसार कामाचे मुल्य रक्कम रु.949727/- च्या 1% प्रमाणे रु.9497/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात यावी व वरील शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

07) वस्तु व सेवा कर कायद्यानुसार जीएसटी करप्रणाली दिनांक 01/07/2017 पासून अंमलात आली. शासकीय कार्यकंत्राटामध्ये जीएसटी प्रणाली लागू करणेबात वित्त विभाग शासन निर्णय क्र.जीएसटी-1017/प्र.क्र.155/कराधान-1, दिनांक 11/09/2017 मधील अ.क्र.4 नुसार चालू कामांचे बाबतीत कराच्या भारामध्ये वृद्धी वा घट झाल्यामुळे कंत्राटाच्या किंमतीत वृद्धी वा घट होऊ शकते, त्यामुळे करावयाचा बदल कंत्राटामध्ये उल्लेख केलेल्या अटी व शर्तींवर अवलंबून असेल, कंत्राटाबाबत अटी व शर्ती वेगवेगळया असतील त्यामुळे प्रत्येक विभागाने कंत्राटाची प्रत विधी व न्याय विभागाकडून तपासून बदललेल्या कररचनेमुळे कंत्राटाच्या किंमतीतून कराचा भार कमी झाल्यामुळे वजावट करता येईल किंवा कराचा भार वाढल्यामुळे किंमत वाढवून देता येईल याबाबत अभिप्राय घ्यावेत अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापी याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही तसेच वरीलप्रमाणे कंत्राटदाराचे दुसरे धावते देयकामधून जुनी करप्रणालीनुसार मुल्यावर्धीत कर किंवा वरील शासन निर्णयानुसार तपासणी करुन जीएसटी-टीडीएस कपात करण्यात आलेला नाही. त्यामुळे दुसरे धावते देयक रक्कम रु.949727/- च्या 2% प्रमाणे जीएसटी-टीडीएस रक्कम रु.18995/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन चलनाने भरणा करण्यात यावी व त्याप्रमाणे जीएसटीआर-7 विभागाकडे सादर करण्यात यावे.

08) सदर कामाची मोजमापे नोंदविण्यात आलेली मोजमाप पुस्तिका क्र.ए003 लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे मोजमापे व देयके याबाबत पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.192 दिनांक 12/03/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	विमा	1864
02	गौण खनिज स्वामित्वधन	10120
06	कामगार उपकर	9497
07	वस्तू व सेवा कर	18995
	एकूण	**40476**

FDSDNBM7201 (Ref No : 86, Hmm No : 192)

77 प्र.क्र.17 तडवी गल्ली स.नं.150 येथे रस्ते व गटार बांधणे

योजना : अल्पसंख्याक निधी **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 98336.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	अल्पसंख्याक निधी
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी, जळगांव आदेश क्र.348, दिनांक 23/05/2016 (अ.क्र.01) रु.981314/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.447, दिनांक 22/02/2016 रु.981314/-

	(भाग-1 रस्ते - 676223 + भाग-2 गटार - 305091)
दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.981314/-
निधी वितरण तपशिल	महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय क्र.क्षेविका-2016/ प्र.क्र.43/का.9 दिनांक 31/3/2016 रु.2000000/- दिनांक 25/10/2016 रोजी रु.1905000/- दिनांक 8/11/2016 रोजी रु.7500000/-
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.72, दिनांक 29/11/2016
कंत्राटदाराचे नांव	निलेश रामदास चौधरी, जळगांव (1.12% कमी दराने म्हणजे 970323)
परफॉर्मन्स सिक्युरिटी	घेतलेली नाही.
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 28/05/2017
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 26/04/2017
चाचणी अहवाल	दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (सा.बां.) क्षेत्रिय प्रयोगशाळा जळगांव पत्र क्र.1545, दि.10/01/2017 व पत्र क्र.1448, दि.06/12/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	03/13-09-2017
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	ए093, पृ.165 ते 172
कामाची एकूण किंमत	977825
वजा 1.12% कमी निविदा दर	-10952

त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	11800
देय रक्कम	978673
वजाती -	
1% विमा	9669
1% कामगार उपकर	9669
10% सुरक्षा रक्कम	96687
2% जीएसटी/व्हॅट	19337
2.33% आयकर	22238
गौण खनिज स्वामित्वधन	33532
दंड	0
एकूण वजाती	191132
निव्वळ देय रक्कम	787541

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) अंदाजपत्रक तयार करण्याकरिता जिल्हा दरसूची 2015-2016 वापरण्यात आलेली आहे. तथापी अंदाजपत्रकासोबत दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही, त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेले दरांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

02) सदर कामाची निविदा ही 1.12% कमी दराने स्विकृत करण्यात आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.बीडीजी-2016/ प्र.क्र.2/इमा.2, दिनांक 12/02/2016 मध्ये निर्देश दिल्यानुसार 10% पर्यंत कमी दरांच्या निविदा स्विकृत करण्यात आल्यास विहिzwj;त कालमर्यादेत व गुणवत्तापूर्वक होण्याच्या अनुषंगाने निविदा किंमतीच्या 1% प्रमाणे परफॉर्मन्स सिक्युरिटी कंत्राटदाराने सादर करणे आवश्यक आहे. तथापी याप्रमाणे परफॉर्मन्स सिक्युरिटी कंत्राटदाराने सादर केलेली नाही, तसेच विभागाने पत्र क्र.492 दि.17/09/2016 अन्वये रु.9813/- परफॉर्मन्स सिक्युरिटी भरणा करणेबाबत कळविले होते, तथापी कंत्राटदाराने रक्कम भरणा केली नसली तरी विभागानेही याबाबत पाठपुरावा केलेला संचिकेवरुन दिसून येत नाही.

03) महाराष्ट्र शासन विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनि-2314/देयक कपात रक्कम/ संकीर्ण/अभि-3, दिनांक 31/3/2015 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम कार्यारंभ आदेश दिल्यानंतर विमा संचालनालयाकडे भरणा करणे व तसे विमापत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापी निविदा स्विकृतीच्या वेळी किंवा प्रदानापूर्वी कंत्राटी कामाचा विमा उतरविला असल्याबाबतची खात्री न करता किंवा तसे विमापत्र प्राप्त न करता देयकामधून देयक रकमेच्या 1% प्रमाणे विमा रक्कम कपात करण्यात आलेली आहे. कामाची मंजूर दरानुसार रक्कम रु.970323/- इतकी असून त्यानुसार 1% प्रमाणे रु.9703/- इतकी विमा रक्कम कपात करणे आवश्यक असतांना रु.9669/- इतकी रक्कम कपात करण्यात आलेली असल्यामुळे रु.34/- इतकी रक्कम वसुलपात्र ठरते. तरी सदर रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन शासकीय विमा निधीकडे चलनाद्वारे भरणा करण्यात यावी व तसा सविस्तर अहवाल विमा संचालनालयाकडे सादर करण्यात यावा.

04) करारनामा अट क्र.20 नुसार कामाकरिता लागणारी खडी, रेती, मुरुम, डबर इ. गौण खनिज मटेरियलची रॉयल्टी, लागू असलेला जकात कर व इतर कर मी स्वत: भरेल व तसे सर्टीफिकेट जळगांव महानगरपालिकेस सादर करेल, अन्यथा नियमानुसार रॉयल्टी धावत्या देयकातून कपात करण्याचा अधिकार जळगांव महानगरपालिकेस राहील. कंत्राटदाराने गौण खनिजांचे परवाने संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही, प्रथम धावते देयकामधून गौण खनिज रक्कम कपात करण्यात आलेली आहे. दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे प्रमाण दर्शविण्यात आलेले आहे व त्यानुसार गौण खनिजाची परिगणना करणे आवश्यक होते. तथापी देयकामधून त्याप्रमाणे परिगणना करण्यात आलेली नसल्यामुळे गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना कमी करण्यात आलेली आहे. तसेच गौण खनिजाचे परवाने जोडलेले नसल्याने कंत्राटदारास देयकामध्ये स्वामित्वधनाची रक्कम देय ठरत नाही, त्यामुळे बाब क्र.12 अन्वये अदा करण्यात आलेली रक्कम रु.33531/- वसुलपात्र ठरते. तसेच खालीलप्रमाणे स्वामित्वधनाची रक्कम रु.52970/- संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन शासन खाती चलनाने जमा करण्यात येऊन त्यासंबंधीचा अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सविस्तर तपशिल व चलनाच्या प्रतीसह सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	देयकानुसार एकूण परिमाण	गौण खनिज वापराचा फॅक्टर	स्वामित्वधनाचे परिमाण
2	Supplying Hard Murum	81.78	1.3	106.314
3	Supplying 40 mm metal	81.78	1.25	102.225
4	Supplying Soft Murum	73.68	1.3	95.784
9	Providing laying CC 1:4:8 for roadway	40.82	0.45	18.369
10	Providing Laying CC 1:2:4 for Roadway	43.25	0.45	19.4625
12	Royalty for HM, SM, metal	237.24	1.0	237.24

14	PCC 1:4:8	15.85	0.45	7.1325
15	M15 for Piers abutment	55.08	0.45	24.786
16	M20 for App. slab	1.56	0.45	0.702
	एकूण परिमाण			612.015
	स्वामित्व धन दर			141.34
	स्वामित्व धन रक्कम			86502
	देयकामधून वसुल केलेली रक्कम			33532
	वसुलपात्र रक्कम			52970

04) संचिकेमध्ये कामाचे तुलनात्मक विवरणपत्र जोडण्यात आलेले असून त्यानुसार काही बाबींवर बचत दर्शविण्यात आलेले आहे. तथापी अशा बचत बाबतची कोणतीही कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. तसेच सदर कामाची अंदाजीत रक्कम रु.981314/- अशी असून प्रत्यक्ष कामानुसार कामाची किंमत रु.977825/- मधून मंजूर दरानुसार रु.10952/- वजा जाता रु.966873/- किंमतीमध्ये काम पूर्ण झालेले आहे, म्हणजेच अंदाजपत्रकीय रकमेमधून रु.14441/- इतकी बचत झालेली आहे, तथापी तुलनात्मक विवरणपत्रामध्ये रु.3451/- इतकी बचत दर्शविण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणाकरिता अंदाजपत्रकामध्ये कोणतीही तरतुद केलेली नव्हती, त्यामुळे सदर बाबीवरील खर्च हा सदर योजनेच्या निधीमधून अनुज्ञेय ठरत नाही, तथापी याकरिता रु.11800/- इतका खर्च योजनेच्या निधीमधून करण्यात आलेला असल्याने नियमबाह्य खर्च करण्यात आलेला आहे. तरी वरीलप्रमाणे बचतीची रक्कम रु.14441/- अधिक तांत्रिक लेखापरीक्षणाची रक्कम रु.11800/- अशी एकूण रक्कम रु.26241/- सदर योजनेच्या उचित लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी व त्याप्रमाणे चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा. तसेच मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.348 दिनांक 23/05/2016 मधील अट क्र.4 नुसार विनियोग प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाही, तरी विनियोग प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

05) सदर कामाची मोजमापे नोंदविण्यात आलेली मोजमाप पुस्तिका क्र.ए093 लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे मोजमापे व देयके याबाबत पडताळणी करता आली नाही.त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.193 दिनांक 12/03/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
02	विमा	34
04	गौण खनिज स्वामित्वधन	86502
05	त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	11800
	एकूण	**98336**

FDSDNBM7201 (Ref No : 87, Hmm No : 193)

78 प्रभाग क्र.10 मध्ये विजय कॉलनी, विष्णुनगर व परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे

योजना : आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.सुरेश दामू भोळे) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 21254.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (मा.श्री.सुरेश दामू भोळे)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.419, दिनांक 04/02/2016 रु.1000000/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.384, दिनांक 03/12/2015 रु.1000000/-

दरसूची वर्ष	2015-2016
कामाची अंदाजित किंमत	रु.1000000/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.20, दिनांक 19/05/2016
कंत्राटदाराचे नांव	शिवशक्ती कंस्ट्रक्शन्स, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 18/11/2016
दोष निवारण कालावधी	6 महिने
कामाची स्थिती	काम पूर्ण दि.08/06/2016
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्ट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग बांभोरी जळगांव, पत्र क्र.68/41, दि.28/5/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	29/01-08-2016
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	167, पृ.27 ते 29
कामाची एकूण किंमत	999699
वजा कमी निविदा दर	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0
देय रक्कम	999699
वजाती -	
1% विमा	9997

1% कामगार उपकर	9997
10% सुरक्षा रक्कम	99970
2% जीएसटी/व्हॅट	19994
2.33% आयकर	22993
गौण खनिज स्वामित्वधन	0
दंड	0
एकूण वजाती	162951
निव्वळ देय रक्कम	836748

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची किंमत रु.10.0 लक्ष अशी असून त्यानुसार रु.500/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.100/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने शासन खाती जमा करण्यात यावी.

02) दर पृथ:करणापत्रकानुसार डांबराचे बाबींमध्ये लीड चार्जेस 425 कि.मी. घेण्यात आलेले आहे, म्हणजेच सदरचे दर हे मुंबई रिफायनरीचे घेण्यात आलेले आहेत. तथापी डांबर खरेदीची देयके जोडण्यात आलेली नाहीत. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2005/प्र.क्र.-187/रा.म.-2, दिनांक 08/10/2007 नुसार कंत्राटदाराने डांबर खरेदीची देयके जोडलेली नाहीत. तसेच जिल्हा दरसूचीमधील तरतुदीनुसार अंदाजपत्रक तयार करतांना डांबराचे दर विचारात घेऊन वाढ अथवा घट झाली असल्यास त्यानुसार दरपृथ:करण करणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे जादा दराने दर देण्यात आल्याने अशी रक्कम रु.20854/- वसुलपात्र ठरते. लिड चार्जेची वसुली खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत असून डांबराचे दराबाबत दरपृथ:करण तयार करण्यात येऊन व त्याप्रमाणे रकमेची परिगणना करण्यात येऊन संबंधितांकडून वसुल करण्यात यावी व योजनेच्या योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

बाब क्रमांक	बाब	दिलेला दर	वजा लिड चार्जेस	देय दर	परिमाण	वसुलीची रक्कम
1	Providing laying 50 mm thk compacted bitumen bound macadam	193.40	4.30	189.10	1948.99	8381
2	Providing 25 mm thk open graded premix bituminous carpet	251.54	4.53	247.01	1948.99	8828
3	Providing bituminous liquid seal coat	64.40	1.87	62.53	1948.99	3645
	एकूण वसुली					20854

03) सदर कामाची मोजमापे नोंदविण्यात आलेली मोजमाप पुस्तिका क्र.167 लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे मोजमापे व देयके याबाबत पडताळणी करता आली नाही.त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.194 दिनांक 12/03/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	400
02	डांबर वहनावळ	20854
	एकूण	**21254**

FDSDNBM7201 (Ref No : 88, Hmm No : 194)

79 यु.क्र.2 अरुण बुक डेपो ते गोपाळ महाजन चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण

योजना : नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये

उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजना
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचे आदेश क्र.23, दिनांक 18/01/2014 (अ.क्र.4) रु.888664/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.125, दि.07/05/2013, रु.888664/-
दरसूची वर्ष	2012-2013
कामाची अंदाजित किंमत	रु. 888664/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.29 दि.30/08/2014
कंत्राटदाराचे नांव	श्री.एस.जी.भंगाळे जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 28/02/2015)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.29)
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 02/05/2016
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी पत्र क्र.66/30, दि.26/11/2015
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	दुसरे व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	15, दि.06/01/2016	04, दि.22/09/2016 (शासन हिस्सा) रु.114813/- 02, दि.12/07/2017 (मनपा हिस्सा) रु107830/-	

मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	क्र.ए179, पृ.क्र.23 ते 25	क्र.ए179, पृ.क्र.30 ते 32	
कामाची एकूण किंमत	785351	191948	977299
वजा कमी निविदा दर	78535	19195	97730
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	11500	11500
देय रक्कम	863886	222643	1086529
वजाती -			
1% विमा	8639	2111	10750
1% कामगार उपकर	8639	2111	10750
10% सुरक्षा रक्कम	86389	21114	107503
2% जीएसटी/व्हॅट	17278	4223	21501
2.33% आयकर	19869	4856	24725
गौण खनिज स्वामित्वधन	0	0	0
स्थानिक संस्था कर (LBT)	2160	0	2160
दंड	8639	2111	10750
एकूण वजाती	151613	36526	188139
निव्वळ देय रक्कम	712273	186117	898390

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) अंदाजपत्रक तयार करणेकरिता सन 2012-2013 ची दरसूची वापरण्यात आलेली आहे, त्यानुसार संचिकेमध्ये दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नसल्यामुळे दरांबाबत पडताळणी करता आली नाही. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये नमुद केलेले दर हे लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

02) कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.888664/- अशी असून कामावरील खर्च रु.977299/- अधिक जादा किंमतीवरील खर्च रु.97730/- अधिक त्रयस्थ तांत्रिक परिक्षण फी रु.11500/- अशी एकूण रु.1086529/- इतका झालेला आहे, त्यानुसार अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा म्हणजेच मंजूर निधीपेक्षा रु.197865/- इतका जादा खर्च झालेला आहे. सदर जादा खर्चाची रक्कम ही मनपा निधीमधून प्रथम योजनेच्या खात्यामध्ये जमा करुन व त्यानंतर योजनेमधून संपूर्ण खर्च करणे आवश्यक असतांना असा मनपा हिस्सा योजनेच्या खात्यामध्ये फक्त रु.107830/- इतका जमा करण्यात आलेला आहे, त्यामुळे असा उर्वरित जादा खर्च रक्कम रु.90035/- हा योजनेच्या खात्यामध्ये शिल्लक असलेल्या निधीमधून पर्यायाने व्याजाच्या रकमेमधून करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीव्यतिरिक्त जादा झालेला खर्च हा परस्पर योजनेमधील कामावर वापरण्यात आलेला असल्याने शासन आदेशाचे उल्लंघन झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

03) सदर कामाचे मोजमापे ही मोजमाप पुस्तिका क्र.A179 मध्ये घेण्यात आलेले असल्याचे देयकांवरील नोंदीनुसार दिसून येते. तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे मोजमापांबाबत तसेच खर्चाबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.199 दिनांक 26/03/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 89, Hmm No : 199)

80 प्रभाग क्र.31 मेहरुण गांव बुरुज ते महादेव मंदीर ते विठ्ठल मंदीरपर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे

योजना	:	नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजना	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 98094.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजना
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचे आदेश क्र.166, दिनांक 18/05/2015 (अ.क्र.1) रु.968639/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.111 दिनांक 07/01/2015 रु.968639/-
दरसूची वर्ष	2012-2013
कामाची अंदाजित किंमत	रु.968639/-/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.89, दिनांक 08/12/2015
कंत्राटदाराचे नांव	श्री.तुषार रमेश महाजन, जळगांव (2% जादा दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 07/06/2016)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 30/04/2016
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी जळगांव पत्र क्र.67/40, दि.16/03/2016
देयकांचा तपशिल	

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.09.69 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.500/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.100/- चे फ्रँकिंग मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते.

02) अंदाजपत्रकानुसार डांबर 80/100 ग्रेडचे वापरणे आवश्यक आहे, तथापी चाचणी अहवालानुसार 60/70 ग्रेडचे

डांबराची चाचणी करण्यात आलेली आहे, त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये नमूद डांबराच्या प्रतीचा वापर करण्यात आलेला नसल्याने रस्त्याच्या टिकाऊपणा राहणार नाही व परिणामी भविष्यात सदर रस्ता लवकरच खराब होण्याची शक्यता राहील. तसेच कमी प्रतीचा डांबराचा वापर केलेला असल्याने त्याप्रमाणे सबंधित कंत्राटदार यांचेकडून दरसूचीमधील दरानुसार परिगणना करण्यात येऊन वसुली करण्यात यावी.

03) अंदाजपत्रक तयार करणेकरिता सन 2012-2013 ची दरसूची वापरण्यात आलेली आहे, त्यानुसार संचिकेमध्ये दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे दरांबाबत पडताळणी करता आली नाही. तथापी विशेष निधी अंतर्गत प्रभाग क्र.8,9 मधील डांबरीकरण कामाचे अंदाजपत्रकाकरिता सन 2012-2013 ची दरसूचीनुसार दरपृथ:करणपत्रक तयार करण्यात आले आहे, सदर दरपृथ:करण पत्रकानुसार या कामाचे देयकामधील दरांची तुलना करण्यात आली असता मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते व त्यामुळे या कामामध्ये जादा दर घेण्यात आलेले असल्याने खालीलप्रमाणे रु.97694/- जादा प्रदान झालेले आहे. सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधित कंत्राटदारांकडून वसुल करण्यात येऊन योजनेच्या योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी.

बाब क्र.	बाब तपशिल	प्रभाग 8,9 हाऊसिंग सोसायटी रस्ते डांबरीकरण दरपृथ:करणानुसार दर	या कामाचे देयकामधील दिलेले दर	तफावत		
				दर	देयकानुसार परिमाण	वसुलपात्र रक्कम
2	P L 50 mm. thk compacted BBM with 80/100 grade bitumen over existing WBM Surface	189.63	208.97	-19.34	476.23	-9210.3
3	Providing 25 mm. thk open graded premix bituminous carpet	198.31	217.8	-19.49	3078.78	-60005
4	Providing bituminous liquid seal coat (Type - A) to black top surface	55.18	64.43	-9.25	3078.78	-28479
	Total					-97694

04) कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.968639/- अशी असून कामावरील जादा दरासह खर्च रु.987810/- अधिक त्रयस्थ तांत्रिक परिक्षण फी रु.11450/- अशी एकूण रु.999260/- इतका झालेला आहे, त्यानुसार अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा म्हणजेच मंजूर निधीपेक्षा रु.30621/- इतका जादा खर्च झालेला आहे. सदर जादा खर्चाची रक्कम ही मनपा

निधीमधून प्रथम योजनेच्या खात्यामध्ये जमा करुन व त्यानंतर योजनेमधून संपूर्ण खर्च करणे आवश्यक असतांना असा मनपा हिस्सा योजनेच्या खात्यामध्ये रु.15401/- अधिक रु.3967/- असे एकूण रु.19368/- इतका जमा करण्यात आलेला आहे, त्यामुळे उर्वरित जादा खर्च रक्कम रु.11253/- हा योजनेच्या खात्यामध्ये शिल्लक असलेल्या निधीमधून पर्यायाने व्याजाच्या रकमेमधून करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीव्यतिरिक्त जादा झालेला खर्च हा परस्पर योजनेमधील कामावर वापरण्यात आलेला असल्याने शासन आदेशाचे उल्लंघन झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

05) सदर कामाचे मोजमापे ही मोजमाप पुस्तिका क्र.A003 मध्ये घेण्यात आलेले असल्याचे देयकांवरील नोंदीनुसार दिसून येते. तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे मोजमापांबाबत तसेच खर्चाबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.200 दिनांक 26/03/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	400
03	दर तफावत	97694
	एकूण	**98094**

FDSDNBM7201 (Ref No : 90, Hmm No : 200)

81 प्र.क्र.31 व 35 अंतर्गत मेहरुण गांव डी.पी. पासून ते स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे

योजना : नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : योजना शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 85325.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजना
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचे आदेश क्र.166, दिनांक 18/05/2015 रु.916087/- (अ.क्र.2)
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.114, दि.07/01/2015, रु.916087/-
दरसूची वर्ष	2012-2013
कामाची अंदाजित किंमत	रु. 916087/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.90 दि.08/12/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.तुषार रमेश महाजन, जळगांव (5% जादा दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 07/06/2016)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 30/04/2016
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी पत्र क्र.67/40-1, दि.16/03/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	16, दि.22/03/2016	05, दि.22/09/2016	

मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	क्र.ए003, पृ.क्र.61 ते 64	क्र.ए003, पृ.क्र.61 ते 64	
कामाची एकूण किंमत	803964	111756	915720
अधिक 2% जादा निविदा दर	40198	5588	45786
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	0	11450	11450
देय रक्कम	844162	128794	972956
वजाती -			
1% विमा	8442	1173	9615
1% कामगार उपकर	8442	1173	9615
10% सुरक्षा रक्कम	84416	11734	96150
2% जीएसटी/व्हॅट	16883	2347	19230
2.33% आयकर	19416	2699	22115
गौण खनिज स्वामित्वधन	29681	0	29681
दंड	0	0	0
एकूण वजाती	167280	19126	186406
निव्वळ देय रक्कम	676882	109668	786550

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र

मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.09.69 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.500/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.100/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी.

02) अंदाजपत्रकानुसार बाब क्र.7 मध्ये डांबर 80/100 ग्रेडचे वापरणे आवश्यक आहे, तथापी चाचणी अहवालानुसार फक्त 60/70 ग्रेडचे डांबराची चाचणी करण्यात आलेली आहे, त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये नमूद डांबराच्या प्रतीचा वापर करण्यात आलेला नसल्याचे दिसून येते. सदर बाबीकडे संबंधित बांधकाम अभियंता यांनी दुर्लक्ष केलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. कमी प्रतीच्या डांबराचा वापर करण्यात आल्यास रस्त्याच्या टिकाऊपणा राहणार नाही व परिणामी भविष्यात सदर रस्ता लवकरच खराब होण्याची शक्यता राहील. तसेच कमी प्रतीचा डांबराचा वापर केलेला असल्याने त्याप्रमाणे सबंधित कंत्राटदार यांचेकडून दरसूचीमधील दरानुसार परिगणना करण्यात येऊन वसुली करण्यात यावी व योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

03) अंदाजपत्रक तयार करणेकरिता सन 2012-2013 ची दरसूची वापरण्यात आलेली आहे, त्यानुसार संचिकेमध्ये दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे दरांबाबत पडताळणी करता आली नाही. तथापी विशेष निधी अंतर्गत प्रभाग क्र.8,9 मधील डांबरीकरण कामाचे अंदाजपत्रकाकरिता सन 2012-2013 ची दरसूचीनुसार दरपृथ:करणपत्रक तयार करण्यात आले आहे, सदर दरपृथ:करण पत्रकानुसार या कामाचे देयकामधील दरांची तुलना करण्यात आली असता मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. एकाच वर्षाच्या दरसूचीनुसार दरपृथ:करणानुसार वेगवेगळ्या कामांमध्ये दरांमध्ये तफावत दिसून येत असल्याने सदर बाब ही गंभीर स्वरुपाची असून याबाबत संबंधित अभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. सदर तफावतीमुळे या कामामध्ये जादा दर घेण्यात आलेले असल्याने खालीलप्रमाणे रु.84925/- जादा प्रदान झालेले आहे. सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन योजनेच्या योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी.

बाब क्र.	बाब तपशिल	प्रभाग 8,9 हाऊसिंग सोसायटी रस्ते डांबरीकरण दरपृथ:करणानुसार	या कामाचे देयकामधील दिलेले दर	तफावत		
				दर	देयकानुसार परिमाण	वसुलपात्र रक्कम

		दर				
1	P L 50 mm. thk compacted BBM with 80/100 grade bitumen over existing WBM Surface	166.28	187.24	-20.96	520.87	-10917.44
2	P L 50 mm. thk compacted BBM with 80/100 grade bitumen over existing WBM Surface	189.63	208.97	-19.34	1249.08	-24157.20
3	Providing 25 mm. thk open graded premix bituminous carpet	198.31	217.8	-19.49	1734.54	-33806.18
4	Providing bituminous liquid seal coat (Type A) to black top surface	55.18	64.43	-9.25	1734.54	-16044.50
	Total					-84925.32

04) कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.916087/- अशी असून कामावरील जादा दरासह खर्च रु.961506/- अधिक त्रयस्थ तांत्रिक परिक्षण फी रु.11450/- अशी एकूण रु.972956/- इतका झालेला आहे, त्यानुसार अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा म्हणजेच मंजूर निधीपेक्षा रु.56869/- इतका जादा खर्च झालेला आहे. सदर जादा खर्चाची रक्कम ही मनपा निधीमधून प्रथम योजनेच्या खात्यामध्ये जमा करुन व त्यानंतर योजनेमधून संपूर्ण खर्च करणे आवश्यक असतांना असा मनपा हिस्सा योजनेच्या खात्यामध्ये रु.40198/- अधिक रु.5588/- असे एकूण रु.45786/- इतका जमा करण्यात आलेला आहे, त्यामुळे उर्वरित जादा खर्च रक्कम रु.11083/- हा योजनेच्या खात्यामध्ये शिल्लक असलेल्या निधीमधून पर्यायाने व्याजाच्या रकमेमधून करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तथापी सदर योजनेच्या खात्यामध्ये मंजूर निधीव्यतिरिक्त जादा झालेला खर्च हा परस्पर योजनेमधील कामावर वापरण्यात आलेला असल्याने शासन आदेशाचे उल्लंघन झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

05) टिपणी दिनांक 26/10/2015 अन्वये सन 2015-2016 चे दरांसोबत तुलनात्मक विवरणपत्र तयार करण्यात आलेले आहे. सदर विवरणपत्रामध्ये बाब क्र.7, 8 व 9 चे बाबींमध्ये 40 मीमी क्रश्ड खडीचा वापर करण्यात आलेला आहे. सन

2015-16 चे दरपृथ:करण पत्रकासोबत तुलना केली असता 40 मी.मी. पेक्षा जादा खडीचे वहनावळीचा दर समाविष्ट आहे, त्यामुळे असा दर देय ठरत नाही. त्यामुळे सदर दर कमी करुन तुलना करणे आवश्यक होते. सदर दर कमी करुन तुलना केली असता खालीलप्रमाणे कामाची किंमत निश्चित होते व त्यानुसार 0.29% इतके दर जादा होतात, तथापी 5% जादा दर मंजूर करण्यात आलेले असल्याने 4.71% दर जादा देण्यात आलेले आहेत.

बाब क्र.	बाब	परिमाण	40 मीमी खडी वहनावळ जादा दिलेला दर	किंमत
7	Pro. 50 mm thk BBM on WBM	521.00	10.45	5444.45
8	Pro. 50 mm. thk BBM on BT surface	1214.00	10.45	12686.30
9	Prov. 25 mm. thk carpet	1735.00	15.68	27204.80
	एकूण जादा किंमत			45335.55
	तुलना करणेकरिता विचारात घेतलेली एकूण रक्कम			964114.30
	कमी करुन विचारात घेणे आवश्यक असलेली किंमत			918778.75
	मुळ अंदाजपत्रकीय किंमत			916087.26
	तफावत			2691.49
	वाढीची टक्केवारी			0.29

वरीलप्रमाणे 4.71% जादा दर दिलेले असल्यामुळे कामावरील खर्चाची मुळ किंमत रु.915720/- वर 4.71% प्रमाणे रु.43130/- जादा प्रदान झालेले आहे. सदर जादा प्रदानाची रकमेबाबत जबाबदारी निश्चित करण्यात येऊन संबंधितांकडून रक्कम वसुल करण्यात येऊन शासनाने योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

06) सदर कामाचे मोजमापे ही मोजमाप पुस्तिका क्र.A003 मध्ये घेण्यात आलेले असल्याचे देयकांवरील नोंदीनुसार दिसून येते. तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे मोजमापांबाबत तसेच खर्चाबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.201 दिनांक 26/03/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता.

तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	400
03	दर तफावत	84925
	एकूण	**85325**

FDSDNBM7201 (Ref No : 91, Hmm No : 201)

82 प्रभाग क्र.36 मधील त्र्यंबक नगर मधील चंद्रलोक अपार्टमेंट ते संभाजीनगर चौकापर्यंत डांबरी रोड रिसरफेसिंग करणे

योजना : नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजना **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 99531.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजना
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचे आदेश क्र.377, दिनांक 06/11/2015 रु.913469/- (अ.क्र.2)
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.109, दि.19/12/2014, रु.913469/-
दरसूची वर्ष	2012-2013
कामाची अंदाजित किंमत	रु.913469/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही

कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.117 दि.01/03/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवशक्ती कंस्ट्रक्शन्स जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने (i.e.upto 30/08/2016)
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 31/05/2016
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी पत्र क्र.68/41-1, दि.28/05/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	03, दि.29/08/2016
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	क्र.ए069, पृ.क्र.155 ते 156
कामाची एकूण किंमत	911476
अधिक 2% जादा निविदा दर	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी	11500
देय रक्कम	922976
वजाती -	
1% विमा	9115
1% कामगार उपकर	9115
10% सुरक्षा रक्कम	91148
2% जीएसटी/व्हॅट	18230

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.15.15 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.1100/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.600/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.600/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.500/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

02) निविदा कागदपत्रांनुसार सदर कामाचे कंत्राटदार श्री.तुषार रमेश महाजन यांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र क्र.2660 दिनांक 28/03/2013 अन्वये मुदत दिनांक 19/03/2013 ते 18/03/2016 पर्यंत होती, तथापी त्यानंतरही काम सुरु असल्याचे दिसून येते, तथापी कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्राची मुदत वाढवून पुढील कालावधीचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले दिसून येत नाही.

03) अंदाजपत्रक तयार करणेकरिता सन 2012-2013 ची दरसूची वापरण्यात आलेली आहे, त्यानुसार संचिकेमध्ये दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे दरांबाबत पडताळणी करता आली नाही. तथापी विशेष निधी अंतर्गत प्रभाग क्र.8,9 मधील डांबरीकरण कामाचे अंदाजपत्रकाकरिता सन 2012-2013 ची दरसूचीनुसार

दरपृथ:करणपत्रक तयार करण्यात आले आहे, सदर दरपृथ:करण पत्रकानुसार या कामाचे देयकामधील दरांची तुलना करण्यात आली असता मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. एकाच वर्षाच्या दरसूचीनुसार दरपृथ:करणानुसार वेगवेगळ्या कामांमध्ये दरांमध्ये तफावत दिसून येत असल्याने सदर बाब ही गंभीर स्वरुपाची असून याबाबत संबंधित अभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. सदर तफावतीमुळे या कामामध्ये जादा दर घेण्यात आलेले असल्याने खालीलप्रमाणे रु.109509/- जादा प्रदान झालेले आहे. सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

बाब क्रमांक	बाब तपशिल	प्रभाग 8,9 हाऊसिंग सोसयटी रस्ते डांबरीकरण दरपृथ:करणानुसार दर	या कामाचे देयकामधील दिलेले दर	तफावत		
				दर	देयकानुसार परिमाण	वसुलपात्र रक्कम
1	P L 50 mm. thk compacted BBM with 80/100 grade bitumen over existing WBM Surface	166.28	187.24	-20.96	1100.82	-23073.08
2	P L 50 mm. thk compacted BBM with 80/100 grade bitumen over existing BT Surface	189.63	208.97	-19.34	2226	-43050.84
3	Providing 25 mm. thk open graded premix bituminous carpet	198.31	217.8	-19.49	2226	-43384.74
	एकूण				0	-109508.66

04) सदर कामाचे प्रथम धावते देयक सादर केल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार वरीलप्रमाणे रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर द्वितीय व अंतिम देयक लेखापरीक्षण कालावधीमध्ये अदा करण्यात आलेले नाही. सदरचे देयके नंतरच्या कालावधीत केंव्हा अदा करण्यात आले याबाबत लेखापरीक्षणात अभिलेखांअभावी पडताळणी करता आली नाही.

05) सदर कामाचे बाब क्र.4 नुसार सिलकोटचे काम करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास येते. सदर सिलकोटचे काम झालेले आहे किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणास योग्य ते अभिलेखे मागणी करुनही सादर करण्यात आले नाही. सिल

कोटचे काम झालेले नसल्यास रस्त्याचा टिकाऊपणा दिर्घकाळ राहणार नाही असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

06) करारनामा अट क्र.22 नुसार कार्यादेशात नमुद बाबीपेक्षा कामाचे ठिकाणी जादा बाबीप्रमाणे काम करावयाचे असल्यास त्वरीत अभियंता यांचे निदर्शनास आणून देण्यात येई. अशी अट नमुद असतांना जादा बाबींची कामे करण्यात आलेली आहे. त्याबाबत टिपणी दिनांक -- (नमुद नाही), मध्ये अंदाजपत्रक सन 2012-2013 मध्ये तयार करण्यात आलेले आहे व सदर कामाचे कार्यादेश 2016 मध्ये निर्गमित करण्यात आले असून अंदाजपत्रक तयार करतेवेळी स्थितीत आणि आताची परिस्थितीत बदल झालेला असून सदरचा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे, सदर रस्त्यामध्ये जवळपास 50% पेक्षा जास्त मोठे मोठे खड्डे पडलेले आहे, त्यामुळे 40 मीमी खडी व मुरुम टाकून भरल्यानंतर बीबीएम करणे आवश्यक आहे, सदर रस्त्यावरुन अत्यंत जड वाहतुक असल्याने सदरचे काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे मापे खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे. सदर जादा बाबींकरिता घेण्यात आलेले दर हे कोणत्या दरसूचीनुसार घेण्यात आलेले आहेत व त्याचे दरपृथ:करण टिपणीमध्ये नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे दरांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

07) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 466(3) खालील परिशिष्ट-3 खंड 36 मधील तरतुदीनुसार निविदा उघडल्यानंतर एक आठवड्याच्या आंत त्याची विल्हेवाट लावण्यात येईल, कोणत्याही परिस्थितीत एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीमध्ये त्याची विल्हेवाट लावण्यात येऊ नये अशी तरतुद आहे, तथापी सदर कामाचा दरांचा लिफाफा दिनांक 05/03/2014 रोजी उघडल्यानंतर वाटाघाटी केल्यानंतर मा.आयुक्त यांची दरास मान्यता दिनांक 21/05/2014 रोजी घेण्यात आली, त्यानंतर करारनामा करुन देणेबाबत संबंधित निविदाकारास 26/05/2014, 19/11/2014, 4/6/2015 रोजी पत्र देण्यात आलेली आहे. सदर पत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात कालावधी गेलेला दिसून येतो. त्यानंतर कंत्राटदाराने दिनांक 26/10/2015 रोजी करारनामा करुन दिलेला आहे. निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर म्हणजे दिनांक 05/03/2014 पासून करारनामा करणे म्हणजे दिनांक 26/10/2015 पर्यंत जवळ जवळ 19 महिन्यांचा कालावधी लोटलेला दिसून येतो. सदरचे कंत्राटदार श्री.तुषार रमेश महाजन यांचे इतर कामे तपासणी करण्यात आली असता त्या कामांमध्येही अशा प्रकारचा विलंब झालेला दिसून येतो. तथापी महानगरपालिकेकडून संबंधित कंत्राटदाराविरुद्ध कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही.

08) संचिकेमध्ये काम पूर्णत्वाचा दाखला जोडण्यात आलेला नाही, त्यामुळे लेखापरीक्षण कालावधीनंतरही काम पूर्ण करण्यात आलेले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

09) सदर कामाची मोजमापे ही मोजमाप पुस्तिका क्र.ए184 मध्ये नोंदविण्यात आलेली आहे, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे मोजमापांनुसार देयकांची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.217 दिनांक 05/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	500
03	दर तफावत	109509
	एकूण	**110009**

FDSDNBM7201 (Ref No : 99, Hmm No : 217)

90 यु.क्र.1 मधील महावीर जिन ते कंक यांच्या घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे

योजना : विशेष निधी **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 109179.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	विशेष निधी
प्रशासकीय मान्यता	मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्र क्र.1433, दिनांक 04/02/2014 (अ.क्र.1) रु.1499993/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.243, दिनांक 16/12/2013, रु. 1499993/-
दरसूची वर्ष	2012-2013
कामाची अंदाजित किंमत	रु.1499993/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.43, दिनांक 17/10/2015
कंत्राटदाराचे नांव	श्री.तुषार रमेश महाजन (0.90% जादा दराने)
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 16/04/2016

दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम अपूर्ण
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी जळगांव पत्र क्र.68/18-1, दि.28/4/2016
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	01, दि.22/09/2016
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	184, पृष्ठ क्र.19 ते 22
कामाची एकूण किंमत	1147018
अधिक 0.90% निविदा दर	10323
जादा बाबी	103568
देय रक्कम	1260909
वजाती -	
1% विमा	12609
1% कामगार उपकर	12609
10% सुरक्षा रक्कम	126091
2% जीएसटी/व्हॅट	25218
2.33% आयकर	29000
गौण खनिज स्वामित्वधन	15547
दंड	0

एकूण वजाती	221074
निव्वळ देय रक्कम	1039835

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.15.15 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.1100/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.600/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.600/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.500/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

02) निविदा कागदपत्रांनुसार सदर कामाचे कंत्राटदार श्री.तुषार रमेश महाजन यांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र क्र.2660 दिनांक 28/03/2013 अन्वये मुदत दिनांक 19/03/2013 ते 18/03/2016 पर्यंत होती, तथापी त्यानंतरही काम सुरु असल्याचे दिसून येते, तथापी कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्राची मुदत वाढवून पुढील कालावधीचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले दिसून येत नाही.

03) अंदाजपत्रक तयार करणेकरिता सन 2012-2013 ची दरसूची वापरण्यात आलेली आहे, त्यानुसार संचिकेमध्ये दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे दरांबाबत पडताळणी करता आली नाही. तथापी विशेष निधी अंतर्गत प्रभाग क्र.8,9 मधील डांबरीकरण कामाचे अंदाजपत्रकाकरिता सन 2012-2013 ची दरसूचीनुसार दरपृथ:करणपत्रक तयार करण्यात आले आहे, सदर दरपृथ:करण पत्रकानुसार या कामाचे देयकामधील दरांची तुलना करण्यात आली असता मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. एकाच वर्षाच्या दरसूचीनुसार दरपृथ:करणानुसार वेगवेगळ्या कामांमध्ये दरांमध्ये तफावत दिसून येत असल्याने सदर बाब ही गंभीर स्वरुपाची असून याबाबत संबंधित अभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. सदर तफावतीमुळे या कामामध्ये जादा दर घेण्यात आलेले असल्याने खालीलप्रमाणे रु.108679/- जादा प्रदान झालेले आहे. सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

बाब क्रमांक	बाब तपशिल	प्रभाग 8,9 हाऊसिंग सोसयटी रस्ते डांबरीकरण	या कामाचे देयकामधील	तफावत		
				दर	देयकानुसार	वसुलपात्र

		दरपृथ:करणानुसार दर	दिलेले दर		परिमाण	रक्कम
1	P L 50 mm. thk compacted BBM with 80/100 grade bitumen over existing WBM Surface	166.28	187.24	-20.96	1100.14	-23058.93
2	P L 50 mm. thk compacted BBM with 80/100 grade bitumen over existing BT Surface	189.63	208.97	-19.34	2205	-42644.70
3	Providing 25 mm. thk open graded premix bituminous carpet.	198.31	217.8	-19.49	2205	-42975.45
	एकूण					-108679.08

04) सदर कामाचे प्रथम धावते देयक सादर केल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार वरीलप्रमाणे रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर द्वितीय व अंतिम देयक लेखापरीक्षण कालावधीमध्ये अदा करण्यात आलेले नाही. सदरचे देयके नंतरच्या कालावधीत केंव्हा अदा करण्यात आले याबाबत लेखापरीक्षणात खुलासा सादर करण्यात यावा.

05) सदर कामाचे बाब क्र.4 नुसार सिलकोटचे काम करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास येते. सदर सिलकोटचे काम झालेले आहे किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणास योग्य ते अभिलेखे मागणी करुन सादर करण्यात आले नाहीत. सिल कोटचे काम झालेले नसल्यास रस्त्याचा टिकाऊपणा दिर्घकाळ राहणार नाही असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

06) करारनामा अट क्र.22 नुसार कार्यादेशात नमुद बाबीपेक्षा कामाचे ठिकाणी जादा बाबीप्रमाणे काम करावयाचे असल्यास त्वरीत अभियंता यांचे निदर्शनास आणून देण्यात येई. अशी अट नमुद असतांना जादा बाबींची कामे करण्यात आलेली आहे. त्याबाबत टिपणी दिनांक -- (नमुद नाही), मध्ये अंदाजपत्रक सन 2012-2013 मध्ये तयार करण्यात आलेले आहे व सदर कामाचे कार्यादेश 2016 मध्ये निर्गमित करण्यात आले असून अंदाजपत्रक तयार करतेवेळी स्थितीत आणि आताची परिस्थितीत बदल झालेला असून सदरचा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे, सदर रस्त्यामध्ये जवळपास 50% पेक्षा जास्त मोठे मोठे खड्डे पडलेले आहे, त्यामुळे 40 मीमी खडी व मुरुम टाकून भरल्यानंतर बीबीएम करणे आवश्यक आहे, सदर रस्त्यावरुन अत्यंत जड वाहतुक असल्याने सदरचे काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे मापे खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे. सदर जादा बाबींकरिता घेण्यात आलेले दर हे कोणत्या दरसूचीनुसार घेण्यात आलेले आहेत व त्याचे दरपृथ:करण टिपणीमध्ये नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे दरांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

07) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 466(3) खालील परिशिष्ट-3 खंड 36 मधील तरतुदीनुसार

निविदा उघडल्यानंतर एक आठवड्याच्या आंत त्याची विल्हेवाट लावण्यात येईल, कोणत्याही परिस्थितीत एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीमध्ये त्याची विल्हेवाट लावण्यात येऊ नये अशी तरतुद आहे, तथापी सदर कामाचा दरांचा लिफाफा दिनांक 05/03/2014 रोजी उघडल्यानंतर वाटाघाटी केल्यानंतर मा.आयुक्त यांची दरास मान्यता दिनांक 21/05/2014 रोजी घेण्यात आली, त्यानंतर करारनामा करुन देणेबाबत संबंधित निविदाकारास 26/05/2014, 19/11/2014, 4/6/2015 रोजी पत्र देण्यात आलेली आहे. सदर पत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात कालावधी गेलेला दिसून येतो. त्यानंतर कंत्राटदाराने दिनांक 17/10/2015 रोजी करारनामा करुन दिलेला आहे. निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर म्हणजे दिनांक 05/03/2014 पासून करारनामा करणे म्हणजे दिनांक 17/10/2015 पर्यंत जवळ जवळ 19 महिन्यांचा कालावधी लोटलेला दिसून येतो. सदरचे कंत्राटदार श्री.तुषार रमेश महाजन यांचे इतर कामे तपासणी करण्यात आली असता त्या कामांमध्येही अशा प्रकारचा विलंब झालेला दिसून येतो. तथापी महानगरपालिकेकडून संबंधित कंत्राटदाराविरुद्ध कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही.

08) संचिकेमध्ये काम पूर्णत्वाचा दाखला जोडण्यात आलेला नाही, त्यामुळे लेखापरीक्षण कालावधीनंतरही काम पूर्ण करण्यात आलेले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.218 दिनांक 05/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा
01	मुद्रांक शुल्क	500
03	दर तफावत	108679
	एकूण	

FDSDNBM7201 (Ref No : 100, Hmm No : 218)

91 शिवाजी नगर एस.के.ऑईल मिल ते कानळदा रस्त्यापर्यंतचा रिंगरोड डांबरीकरण करणे

योजना : महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 705137.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेत आलेले असून सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचे आदेश क्र.247, दिनांक 22/08/2014 (अ.क्र.1) रु.7291358/- मनपा हिस्सा - रु.3645679/-, शासन अनुदान रु.3607338/- (फरक रु.38341/-)
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.40, दिनांक 17/07/2014 रु.7291358/-
दरसूची वर्ष	2012-2013
कामाची अंदाजित किंमत	रु.7291358/-
निधी वितरण तपशिल	उपलब्ध नाही.
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.40, दिनांक 12/10/2015
कंत्राटदाराचे नांव	श्री.सुशिलकुमार गणपत डोंगरे, जळगांव (0.11% जादा दराने)
कामाचा कालावधी	9 महिने i.e. upto 11/07/2016
दोष निवारण कालावधी	6 महिने (करारनामा अट क्र.27)
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 20/01/2016
चाचणी अहवाल	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी जळगांव पत्र क्र.66/34-1, दि.03/11/2015
देयकांचा तपशिल	

	प्रथम धावते देयक	द्वितीय धावते देयक	तृतीय धावते देयक	चौथे व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	प्र.क्र.4 दि.21/12/2015	प्र.क्र.6, दि.21/1/2016	प्र.क्र.7, दि.23/2/2016	प्र.क्र.6, दि.21/2/2017	
मोजमाप पुस्तिका क्रमांक	174, P-24-25	174, P-30-32	174, P-50-52	174, P-54-55	

व पृष्ठ क्रमांक					
कामाची एकूण किंमत	2532668	3898607	694032	96645	7221952
अधिक 0.11% निविदा दर	2786	4289	763	106	7944
त्रयस्थ तांत्रिक लेखा परिक्षण फी	0	0	0	83851	83851
देय रक्कम	2535454	3902896	694795	180602	7313747
वजाती -					
1% विमा	25354	39029	6948	968	72299
1% कामगार उपकर	25354	39029	6948	968	72299
10% सुरक्षा रक्कम	253545	390290	69480	9675	722990
2% जीएसटी/व्हॅट	50709	78058	13896	1935	144598
2.33% आयकर	58315	89767	15980	2225	166287
गौण खनिज स्वामित्वधन	0	0	0	0	0
दंड	0	0	0	0	0
एकूण वजाती	413277	636173	113252	15771	1178473
निव्वळ देय रक्कम	2122177	3266723	581543	164831	6135274

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.73.00 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.6800/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.6400/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.400/-

चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.400/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

02) निविदा कागदपत्रांनुसार सदर कामाचे कंत्राटदार श्री.सुशिलकुमार गणपत डोंगरे यांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्राची मुदत दिनांक 13/12/2013 ते 12/12/2016 पर्यंत होती, तथापी त्यानंतरही काम सुरु असल्याचे दिसून येते, तथापी कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्राची मुदत वाढवून पुढील कालावधीचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले दिसून येत नाही.

03) अंदाजपत्रक तयार करणेकरिता सन 2012-2013 ची दरसूची वापरण्यात आलेली आहे, त्यानुसार संचिकेमध्ये दरपृथ:करण पत्रक जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे दरांबाबत पडताळणी करता आली नाही. तथापी विशेष निधी अंतर्गत प्रभाग क्र.8,9 मधील डांबरीकरण कामाचे अंदाजपत्रकाकरिता सन 2012-2013 ची दरसूचीनुसार दरपृथ:करणपत्रक तयार करण्यात आले आहे, सदर दरपृथ:करण पत्रकानुसार या कामाचे देयकामधील दरांची तुलना करण्यात आली असता मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. एकाच वर्षाच्या दरसूचीनुसार दरपृथ:करणानुसार वेगवेगळ्या कामांमध्ये दरांमध्ये तफावत दिसून येत असल्याने सदर बाब ही गंभीर स्वरुपाची असून याबाबत संबंधित अभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. सदर तफावतीमुळे या कामामध्ये जादा दर घेण्यात आलेले असल्याने खालीलप्रमाणे रु.704042/- जादा प्रदान झालेले आहे. सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुलपात्र ठरते. सदर रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

बाब क्रमांक	बाब तपशिल	प्रभाग 8,9 हाऊसिंग सोसयटी रस्ते डांबरीकरण दरपृथ:करणानुसार दर	या कामासाठी देण्यात आलेले दर	तफावत		
				दर	देयकानुसार परिमाण	वसुलपात्र रक्कम
1	P L 50 mm. thk compacted BBM with 80/100 grade bitumen over existing WBM Surface	189.63	208.97	-19.34	16178.41	-312890.45
2	Providing 25 mm. thk open graded premix bituminous carpet	198.31	217.80	-19.49	13610.00	-265258.90
3	Providing bituminous liquid seal coat (Type A) to black	55.18	64.43	-9.25	13610.00	-125892.50

	top surface					
	एकूण					-704041.85

04) महाराष्ट्र शासन विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनि-2314/देयक कपात रक्कम/ संकीर्ण/अभि-3, दिनांक 31/3/2015 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम कार्यारंभ आदेश दिल्यानंतर विमा संचालनालयाकडे भरणा करणे व तसे विमापत्र सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा प्रथम देयकामधून कंत्राट रकमेवर 1% प्रमाणे विमा रक्कम कपात करण्यात येऊन विमा संचालनालयाकडे भरणा करुन विमा पत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. तथापी सदर कामामध्ये विमापत्रे प्राप्त करण्यात आलेली नाही तसेच प्रथम धावते देयकामधून कंत्राट रक्कम रु.7299378/- वर 1% प्रमाणे रु.72994/- एकरकमी विमा रक्कम कपात करणे आवश्यक असतांना प्रत्येक देयक रकमेच्या 1% प्रमाणे एकूण रक्कम रु.72299/- कपात करण्यात आलेली आहे, त्यामुळे रु.695/- कमी कपात करण्यात आलेली असून सदर रक्कम वसुलपात्र ठरते. तरी सदर रक्कम रु.695/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व त्याप्रमाणे विमा संचालनालयाकडे चलनाच्या प्रतीसह सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

05) तुलनात्मक विवरणपत्रामध्ये एकूण बचत रु.69481/- अशी दर्शविण्यात आलेली आहे. कामाची मंजूर किंमत रु.7291358/- अशी असून जादा निविदा दरासह प्रत्यक्ष खर्च रु.7229896/- अधिक त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी रु.83851/- असा एकूण रु.7313747/- असा करण्यात आलेला असून मंजूर किंमत रु.7291358/- पेक्षा रु.22389/- जादा खर्च झालेला दिसून येतो. त्याचप्रमाणे सदर तुलनात्मक विवरणपत्रामध्ये वाढ/बचत झालेल्या बाबींची कारणे नमुद करण्यात आलेली नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे, तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही. तथापी मुळ कामांचे परिमाणामध्ये कपात करुन जादा बाबी घेण्यात आलेल्या असल्याचे दिसून येत असल्याने वरील नियमांचे पालन करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास येते.

06) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 466(3) खालील परिशिष्ट-3 खंड 36 मधील तरतुदीनुसार निविदा उघडल्यानंतर एक आठवड्याच्या आंत त्याची विल्हेवाट लावण्यात येईल, कोणत्याही परिस्थितीत एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीमध्ये त्याची विल्हेवाट लावण्यात येऊ नये अशी तरतुद आहे, तथापी सदर कामाचा दरांचा लिफाफा दिनांक 04/12/2014 रोजी उघडल्यानंतर कंत्राटदाराने दिनांक 12/10/2015 रोजी करारनामा करुन

दिलेला आहे व कामाचे आदेश दिनांक 12/10/2015 रोजी देण्यात आलेले आहे. निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर म्हणजे दिनांक 04/12/2014 पासून करारनामा करणे व कामाचे आदेश देणे म्हणजे दिनांक 12/10/2015 पर्यंत जवळ जवळ 11 महिन्यांचा कालावधी लोटलेला दिसून येतो.

07) प्रशासकीय मान्यता आदेश दि.22/08/2014 मधील अट क्र.3 नुसार अनुज्ञेय अनुदानाचा पहिला 50 टक्के भाग प्रकल्प मंजुरीनंतर वितरित करण्यात येईल, उर्वरित 50 टक्के अनुदान प्रथम टप्प्याच्या अनुदानाच्या 70 टक्के रक्कम खर्च झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर वितरित करण्यात येईल. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे अशा सूचना आहेत, तथापी कामाच्या संचिकेमध्ये उपयोगिता प्रमाणपत्र लावण्यात आलेले दिसून येत नाही.

08) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एनयुआर-2010/प्र.क्र.317/10/नवि-33, दिनांक 08/10/2010 मधील अ.क्र.4(i) नुसार सदर योजनेकरिता शासन हिस्सा 50% व नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा 50% अशा प्रकारे वित्तीय आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर कामाचे प्रशासकीय मान्यता आदेश दिनांक 22/08/2014 नुसार मंजुर रक्कम रु.7291358/- पैकी मनपा हिस्सा - रु.3645679/-, शासन अनुदान रु.3607338/- अशी मंजुर करण्यात आलेली आहे. कंत्राटदाराची देयके अदा करतांना वेळोवळी मनपा हिस्सा योजनेच्या खात्यामध्ये जमा करण्यात आला असून त्याची एकूण बेरीज रु.3706409/- अशी आहे. देयकानुसार निव्वळ कामाची रक्कम रु.7221952/- पैकी 50% मनपा हिस्सा रु.3610976/- अधिक जादा दरानुसार देण्यात आलेली रक्कम रु.7944/- अधिक त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण फी रु.83851/- अशी एकूण 3702771/- इतकी मनपा निधीमधून खर्च करणे आवश्यक आहे. मनपा हिश्याची जमा केलेली रक्कम रु.3706409/- पैकी प्रत्यक्षात मनपा हिश्यामधून खर्च करणे आवश्यक असलेली रक्कम रु.3702771/- वजा जाता रु.3638/- मनपा हिश्याची रक्कम योजनेच्या खात्यामध्ये शिल्लक राहते. सदर रक्कम मनपा निधीमध्ये परत जमा करणे आवश्यक आहे. रोख पुस्तकावरुन सदर कामासाठी शासनाकडून किती निधी प्राप्त झाला याबाबतचा तपशिल नमुद करण्यात आलेला नसल्यामुळे त्याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

09) सदर कामाची मोजमापे ही मोजमाप पुस्तिका क्र.ए174 मध्ये नोंदविण्यात आलेली आहे, तथापी सदर मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे मोजमापांनुसार देयकांची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.219 दिनांक 05/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रकमा

01	मुद्रांक शुल्क	400
04	दर तफावत	704042
04	विमा	695
	एकूण	**705137**

FDSDNBM7201 (Ref No : 101, Hmm No : 219)

92 डांबर व खडी खरेदीबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 443273.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 9928684.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. लेखापरीक्षण वर्षामध्ये खालीलप्रमाणे डांबर व खडी खरेदीपोटी व त्यांचे वाहतुकीपोटी खर्च करण्यात आलेला आहे.

अ. क्र.	प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	पुरवठादार
	डांबर खरेदी			
1	327	05/05/2016	481972	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई
2	1058	11/08/2016	482629	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई
3	2061	16/11/2016	483950	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई
4	2357	23/12/2016	475611	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई
5	2764	25/01/2017	300000	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई
6	2850	30/01/2017	368246	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई
		एकूण 2016-17	**2592408**	
1	311	26/04/2017	702553	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई

2	1163	10/08/2017	685560	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई
3	1867	27/10/2017	489960	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई
4	2258	04/12/2017	486550	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई
5	2710	29/12/2017	631153	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई
6	3139	06/02/2018	654570	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई
7	3361	26/02/2018	1001940	मे.हिंदुस्थान कॉलॅस प्रा.लि. मुंबई
		एकूण 2017-18	**4652286**	
	खडी खरेदी			
1	167	18/04/2016	63287	एन.एस.अग्रवाल
2	168	18/04/2016	62976	एन.एस.अग्रवाल
3	974	10/07/2016	62896	एन.एस.अग्रवाल
4	1531	21/09/2016	64386	एन.एस.अग्रवाल
5	1756	18/10/2016	354063	एन.एस.अग्रवाल
		एकूण 2016-17	**607608**	
1	973	11/07/2017	329475	मोहीत स्टोन क्रशिंग
2	1674	04/10/2017	334337	मोहीत स्टोन क्रशिंग
3	3049	02/02/2018	425235	मोहीत स्टोन क्रशिंग
4	3380	06/03/2018	171671	मोहीत स्टोन क्रशिंग
5	184	18/04/2017	210864	एन.एस.अग्रवाल
6	185	18/04/2017	33346	मोहीत स्टोन क्रशिंग

		एकूण 2017-18	**1504928**	
	डांबर वाहतुक			
1	2064	16/11/2016	43439	आर.आर.महाजन
2	2065	16/11/2016	51254	आर.आर.महाजन
3	2358	23/12/2016	47255	आर.आर.महाजन
		एकूण 2016-17	**141948**	
1	312	26/04/2017	40472	आर.आर.महाजन
2	313	26/04/2017	42775	आर.आर.महाजन
3	314	26/04/2017	58701	आर.आर.महाजन
4	1164	10/08/2017	63350	आर.आर.महाजन
5	2712	29/12/2017	60267	आर.आर.महाजन
6	3140	06/02/2018	46619	आर.आर.महाजन
7	3362	26/02/2018	58631	आर.आर.महाजन
8	3363	26/02/2018	58691	आर.आर.महाजन
		एकूण 2017-18	**429506**	
		एकूण सर्व खर्च	**9928684**	

वरील खर्चाच्या अनुषंगाने अभिलेखे उपलब्ध करुन देणेबाबत सविस्तर अर्धसमास पत्र क्र.24, दिनांक 08/08/2023 अन्वये कळविण्यात आले होते व त्यानंतर अर्धसमास पत्र क्र.28, दि.22/08/2023, क्र.67, दि.01/11/2023, क्र.92, दि.24/11/2023, क्र.109, दि.11/12/2023, क्र.134, दि.03/01/2024, क्र.145, दि.24/01/2024 अन्वये वेळोवेळी लेखी व तोंडी सूचविण्यात आलेले आहेत. तथापी परिपूर्ण अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नसून फक्त डांबर (इमल्शन) खरेदी व वाहतुकीच्या संचिका उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. डांबरची (इमल्शन) खरेदी ही हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि. नवी मुंबई या कंपनीकडून करण्यात येते, सदर कंपनी ही हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन

लिमिटेड व कोलॅस एस.ए. फ्रान्स या कंपन्यांची संयुक्त भागीदारी असल्याचे टॅक्स इन्व्हाईसनुसार दिसून येते. त्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) डांबर (इमल्शन) खरेदी करणेकरिता स्थायी समिती सभा ठराव क्र.248 दिनांक 21/01/2010 अन्वये रु.1039620/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण-5 संविदा मधील खंड (2)(2) नुसार निविदा न मागविता खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या पर्यायी रु.1039620/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानंतर अशा प्रकारचे ठराव करुन डांबर (इमल्शन) खरेदी करण्यात आलेले आहेत. दिनांक 30/11/2015 रोजी मा.आयुक्त यांनी सदर बाब नियमितपणे येते, स्थायी समितीच्या निदर्शनास आणून देऊन सदर बाबतीत कायमस्वरुपी पॉलीसी निश्चित करुन घ्यावी व त्यानुसार उपायुक्त यांनी शहर अभियंता यांचे सल्याने अंतिम निर्णय घ्यावा असे निर्देश दिले. तथापी स्थायी समितीसमोर सदर विषय ठेवून त्याप्रमाणे कायमस्वरुपी आदेश घेतले किंवा कसे याबाबत अभिलेखे संचिकेमध्ये आढळून आले नाही, तथापी लेखापरीक्षण कालावधीमध्ये डांबर खरेदीकरिता देण्यात आलेले प्रशासकीय आदेशांमध्ये मा.आयुक्त सो. यांनी दिनांक 30/11/2015 रोजी दिलेल्या अधिकारानुसार सन सन 2016-2017 व 2017-2017 मध्ये मान्यता प्रदान करण्यात आलेल्या आहेत व त्यानंतर 2017-2018 मध्ये माहे डिसेंबर 2017 पासून मा.आयुक्त यांचे मान्यतेने प्रशासकीय आदेश पारित करण्यात आलेले आहे. म्हणजेच तत्कालीन मा.आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही.

02) हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि. नवी मुंबई यांचेकडून वेळोवेळी शासकीय दराने डांबर (इमल्शन) खरेदी करण्याबाबत टिपणी व प्रशासकीय आदेश मंजूर करण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रशासकीय आदेशांमध्ये कंपनीचे दिनांक नमुद करुन शासकीय परिपत्रक/दरपत्रकानुसार प्रती टन दर नमुद करण्यात आलेले आहेत. तथापी अशा प्रकारचे परिपत्रक किंवा दरपत्रक संचिकेमध्ये लावण्यात आलेले आढळून आले नाही. त्यामुळे नमुद करण्यात आलेल्या दरांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

03) डांबर पुरवठा करणेबाबत संबंधित कंपनीला पुरवठा आदेश देण्यात आलेले दिसून येत नाही. त्यामुळे किती परिमाण पुरवठा करणे आवश्यक होते व प्रत्यक्षात किती पुरवठा झाला याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

04) प्राप्त होणारे डांबर (इमल्शन) कंपनीकडून उचल करुन जळगांव महानगरपालिका स्थळापर्यंत पोहोच करण्याकरिता निश्चित करण्यात येत असलेल्या वाहतुकदारास डांबर (इमल्शन) पुरवठा देणेकरिता प्राधिकार पत्र देण्यात आलेले आहेत. तथापी सदर प्राधिकार पत्रामध्येही किती परिमाणाचे डांबर (इमल्शन) हस्तांतरीत करावेत याबाबतही उल्लेख करण्यात आलेले नाही.

05) डांबर खरेदी करणेकरिता सादर करण्यात येणाऱ्या टिपणींवर टिपणी सादर करण्याचा दिनांक नमुद करण्यात आलेले नाहीत, संबंधित शाखा अभियंता यांचा मागणी अहवाल घेण्यात आलेले नाहीत, तसेच टिपणी सादर करतांना टिपणीमध्ये मागिल डांबर किती शिल्लक आहे, त्याव्यतिरिक्त आता किती डांबराची आवश्यकता आहे याबाबतचे

उल्लेख टिपणींमध्ये करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे किती डांबराची आवश्यकता होती व प्रत्यक्षात किती डांबर पुरवठा झाले याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

06) डांबर (इमल्शन) मागविणेच्या टिपणीमध्ये प्रत्येकी वेळी कंपनीकडे शिल्लक रकमेचा तपशिल नमुद करण्यात आलेले आहेत. यावरुन असे दिसून येते की, संबंधित कंपनीकडे पुरवठा आदेश देण्यात आलेले नसल्यामुळे तसेच संबंधित पुरवठादारासही तसेच आदेश दिलेले नसल्यामुळे कंपनीकडून प्रत्येक वेळी अदा करण्यात आलेल्या रकमांपेक्षा प्रत्यक्षात कमी पुरवठा झालेला आहे. तथापी शिल्लक रक्कम संबंधित कंपनीने तात्काळ परत केलेली दिसून येत नाही. सदर शिल्लक रक्कम पुढील आदेशामध्ये समायोजित करतांना पुन:श्च कंपनीकडे रक्कम शिल्लक राहतांना दिसून येते.

07) टिपणी दिनांक 19/01/2017, 21/03/2017 व 27/06/2017 मध्ये मागिल शिल्लक रकमा व भरणा करावयाच्या रकमा यांचा हिशोब नमुद करतांना तपशिल चुकीचा नमुद करण्यात आलेला दिसून येतो, त्यामुळे दिनांक 27/06/2017 अखेरच्या टिपणीमध्ये रु.10000/- ची तफावत दिसून येते व सदर रक्कम कंपनीकडे जादा शिल्लक राहत असून टिपणीमध्ये कमी नमुद करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक 12/10/2017 चे टिपणीमध्ये मागिल खरेदी रु.575960/- ऐवजी रु.575560/- नमुद करण्यात आलेली असल्यामुळे रु.400/- ची तफावत दिसून येते.

08) टिपणी व प्रशासकीय आदेश मंजुर करतांना खरेदी करावयाचे परिमाण व प्रत्यक्ष पुरवठा झालेले परिमाण यामध्ये तफावत दिसून येते व मंजुरीपेक्षा कमी डांबर (इमल्शन) पुरवठा झालेला दिसून येतो, त्यामुळे प्रशासकीय आदेशाप्रमाणे प्रस्तावित खरेदीनुसार कंपनीकडे रकमा भरणा करण्यात आलेल्या आहेत व प्रत्यक्ष कमी पुरवठा झालेला असल्यामुळे कंपनीकडे मोठ्या प्रमाणात रकमा शिल्लक दिसून येतात. टिपणी दिनांक 12/10/2017 अन्वये 20 मे.टन खरेदी प्रस्तावित मात्र प्रत्यक्षात प्राप्त 15 मे.टन, दिनांक 30/11/2017 अन्वये 20 मे.टन प्रस्तावित मात्र प्रत्यक्षात प्राप्त 17.6 मे.टन, टिपणी दिनांक 29/01/2018 अन्वये 20 मे.टन प्रस्तावित मात्र प्रत्यक्षात प्राप्त 15.2 मे.टन, टिपणी दिनांक 20/20/2018 अन्वये 30 मे.टन प्रस्तावित मात्र प्रत्यक्षात प्राप्त 22 मे.टन डांबर (इमल्शन) प्राप्त झालेले आहेत, म्हणजेच प्रस्तावित परिमाणापेक्षा प्रत्यक्ष परिमाण कमी प्राप्त झालेले असल्यामुळेही कंपनीकडे मोठ्या प्रमाणात रकमा प्रलंबित दिसून येतात.

09) प्रत्येक वेळेस डांबर (इमल्शन) खरेदी करतांना कंपनीकडे मागिल खरेदीमधून शिल्लक राहिलेली रक्कम प्रस्तावित डांबराची किंमतीमधून वजा करुन उर्वरित रक्कम कंपनीकडे जमा करण्यात आलेल्या आहेत, तथापी त्यानंतरही डांबर (इमल्शन) कमी प्राप्त झालेले असल्याने कंपनीकडे रकमा मोठ्या प्रमाणात शिल्लक राहिलेल्या दिसून येतात, माहे फेब्रुवारी 2018 मध्ये 30 मे.टन डांबर (इमल्शन) खरेदीची किंमत रु.1001940/- प्रस्तावित होती, प्रत्यक्षात ताळमेळ घेतला असता कंपनीकडे मागिल शिल्लक रक्कम रु.175585/- शिल्लक दिसून येते, त्यामुळे रु.826355/- इतकी रक्कम जमा करणे आवश्यक होती. मागिल जमा व खर्च रकमांचा योग्य ताळमेळ घेण्यात आलेला नसल्यामुळे सदर टिपणीमध्ये मागिल शिल्लक रक्कम रु.167876/- इतकी दर्शविण्यात आलेली आहे. तसेच शिल्लक रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम भरणा करणे आवश्यक असतांना फेब्रुवारी 2018 मध्ये खरेदी करावयाच्या डांबराची संपूर्ण रक्कम म्हणजे

रु.1001940/- रक्कम कंपनीकडे जमा करण्यात आलेली आहे. त्यानंतर 30 मे.टन डांबर (इमल्शन)ची मागणी असतांना फक्त 22 मे.टन डांबर प्राप्त झाल्यामुळे मार्च 2018 अखेर रु.443273/- कंपनीकडे शिल्लक दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचा मोठ्या प्रमाणात निधी कंपनीकडे अडकून पडलेला आहे. याबाबत सुरुवातीपासून योग्य तो ताळमेळ घेण्यात येऊन कंपनीकडे प्रस्ताव सादर करणे व शिल्लक रकमा समायोजित करणे अथवा वसुल करणे आवश्यक आहे.

10) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 2004/प्र.क्र.109/राम-2, दिनांक 22/03/2005 अन्वये कामांवरील साहित्यांचे चाचणी अहवाल शासकीय प्रयोगशाळेकडून करणे आवश्यक तथापी अशा प्रकारचे चाचणी अहवाल प्राप्त न करता हिंदुस्थान कोलॅस कंपनी नवी मुंबई यांचेकडील गुणनियंत्रण अधिकारी यांचेकडील तपासणी अहवाल जोडण्यात आलेले आहेत. त्यामुळे योग्य दर्जाचे डांबर (इमल्शन) खरेदी करण्यात आलेले असल्याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी होत नाही, तसेच शासन नियमांचे पालन करण्यात आलेले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

11) खरेदी करण्यात आलेले डांबर हे महानगरपालिकेने स्वत: खरेदी केलेले आहे, तथापी सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2005/प्र.क्र.-187/रा.म.-2, दिनांक 08/10/2007 मधील (अ) नुसार डांबर प्राप्त झाल्यानंतर रिफायरीकडून/कंपनीकडून प्राप्त चलन व डिलीव्हरी मेमोच्या मूळ प्रतीवरुन डांबराची प्रत लेखी स्वरुपात नोंद घेणे, (क) नुसार रिफायनरीमधून निर्गमित झालेल्या डांबराची प्रत चाचणी अहवालानुसार जुळत असल्याची खात्री झाल्यानंतर डांबर वापराची परवानगी देणे, अथवा कंपनीकडून योग्य तो अहवाल मागविणे, यामध्ये वाहतुकदार दोषी असल्यास कार्यवाही करणे, (ड) नुसार डांबर ज्या ठिकाणी साठविण्यात येणार आहे त्या ठिकाणी एक नोंदवही ठेऊन त्यामध्ये चलन क्रमांक, डिलीव्हरी मेमो क्रमांक, वजन/परिमाण, तपासणी अहवाल इत्यादी तपशिल नोंदविणे आवश्यक आहे, तथापी याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे लेखापरिक्षणामध्ये निदर्शनास येते.

12) डांबराचे (इमल्शन) वापराबाबत साठा नोंदवही ठेवण्यात आलेली नाही, त्यामुळे प्रत्यक्षात किती साठा होता, किती वापरण्यात आला व किती शिल्लक राहिला याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

13) डांबराचा (इमल्शन) वापर करुन ज्या रस्त्यांवरील ठिकाणचे पॉट होल दुरुस्ती करण्यात आलेले आहेत, त्याबाबतचे मोजमाप पुस्तिका मागणी करुनही लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही, त्यामुळे डांबराचे वापराबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

14) डांबर (इमल्शन) वापर करुन रस्त्यांवरील पॉट होल दुरुस्ती करण्याकरिता वापरण्यात आलेल्या मशिनरी/गाड्या यांचे लॉग-बुक, मजुरांचे हजेरी अहवाल, मजुरांचे मजुरी प्रदानाचे वेतनपट लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाही, त्यामुळे रस्ते दुरुस्तीच्या कामांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

15) रस्त्यांवरील पॉट होल दुरुस्ती करण्याकरिता खडी खरेदी करण्यात आलेले आहेत. त्याबाबतचे प्रमाणकांची

माहिती अर्धसमास पत्र क्र.24, दिनांक 08/08/2023 अन्वये देण्यात येऊन संचिका, साठा पुस्तिका मागणी करण्यात आली, तथापी आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाही, त्यामुळे खडी खरेदी व वापराबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

16) डांबर वाहतुक केल्यानंतर भरलेल्या गाडीचे वजन, रिकाम्या गाडीचे वजन करतांना मनपाचे प्रतिनिधी उपस्थित असलेबाबत त्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच डांबराचे (इमल्शन) भरलेले डबे सुस्थितीत प्राप्त झालेले असल्याबाबत वस्तु स्विकारणाऱ्या कर्मचाऱ्याच्या/अधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे गाड्याचे वजन अहवालाबाबत लेखापरीक्षणात साशंकता निर्माण होते.

17) डांबर (इमल्शन) खरेदी करण्याकरिता हिंदुस्थान कोलॅस कंपनी प्रा.लि. नवी मुंबई या कंपनीकडे खरेदी करावयाचे परिणामानुसार आगाऊ रकमा भरणा करण्यात आलेल्या आहेत, व प्रत्यक्ष पुरवठा झाल्यानंतर संबंधित कंपनीकडून टॅक्स-इन्व्हाईस प्राप्त झालेले आहे. तथापी संबंधित कंपनीला रकमा प्रदान करण्यात आल्यापोटी शासन नियमानुसार आयकर-टीडीएस, व्हॅट अथवा जीएसटी-टीडीएस रकमा कपात करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे शासन नियमानुसार संवितरण अधिकारी यांनी वरीलप्रमाणे टीडीएसच्या रकमा कपात करुन संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करणे व त्याबाबतचे मासिक/त्रैमासिक विवरण दाखल करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे शासकीय महसुलाचे नुकसान झालेले आहे, याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येऊन रकमा वसुली करुन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात याव्यात व त्याबाबतचे विवरण संबंधित विभागाकडे सादर करण्यात यावे.

18) डांबर (इमल्शन) वापरल्यानंतर रिकामे झालेले ड्रम यांची नोंद एक स्वतंत्र साठा पुस्तकामध्ये घेऊन त्यांचा लिलावाद्वारे विल्हेवाट लावणे आवश्यक आहे, तरी अशा प्रकारे रिकामे ड्रमची विल्हेवाटीबाबतची संचिका, साठा पुस्तिका लेखापरीक्षणात मागणी करुनही उपलब्ध झाले नाही, त्यामुळे रिकामे झालेले ड्रमच्या वापराबाबत वा विल्हेवाटीबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. रिकामे झालेले ड्रमची साठवणूक करणे, त्यांच्या साठा नोंदवहीमध्ये नोंदी घेणे व ठराविक कालांतराने लिलावाद्वारे विक्री करणे आवश्यक होते, तथापी याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे तसेच त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे नुकसान झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

19) महानगरपालिकेने रस्ते दुरुस्तीकरिता नियुक्त केलेल्या कामगारांना प्रचलित किमान वेतन कायदयाप्रमाणे परिमंडळानुसार किमान वेतन अदा करणे आवश्यक आहे. उदयोग उर्जा व कामगार विभाग अधिसूचना क्रं.किवेअ 2014/510/प्रं.क्रं.150/कामगार-7 दिनांक 24/02/2015 नुसार "ड" वर्ग महानगरपालिकेचे क्षेत्र हे परिमंडळ-1 मध्ये असुन, त्यानुसार कुशल कामगार दर रुपये 14000/-अर्धकुशल कामगार रुपये 13000/- व अकुशल कामगार दर रुपये 11500/- प्रति महिना देय ठरतो. त्याचप्रमाणे रोजंदारीवा अथवा अर्धवेळ काम करणाऱ्या कामगारांना अधिसूचनेच्या (डी) नुसार तो कामगार ज्या वर्गाचा असेल त्या वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजुरीच्या दरांना 26 ने

भागून येणारा भागाकार नजिकच्या पैशांपर्यंत पूर्णांकित करुन काढण्यात यावा तसेच (इ) नुसार तो कामगार ज्या वर्गवारीचा असेल त्या वर्गवारीच्या रोजंदारी किमान वेतनास 8 तासाने भागून व त्यात 15 टक्के वाढ करुन येणारी रक्कम नजिकच्या पैशांपर्यंत पूर्णांकित करुन दर काढण्यात यावा अशा सूचना आहे. तसेच नगरविकास विभाग परिपत्रक क्रं. संकिर्ण-2016/प्रं.क्रं.24/नवि-20 दिनांक 20/01/2016 अन्वये वरील अधिसूचनेची काटेकोर अंमलबजावणी करावी असे आदेश आहेत. तथापी त्यानुसार कार्यवाही करण्यात येऊन कामगारांना योग्य त्या दरानुसार वेतन अदा करण्यात आले किंवा कसे याबाबत अभिलेखांअभावी पडताळणी करता आली नाही.

20) शहरातील रस्ते दुरुस्त्यांकरिता डांबर व खडी मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आलेले आहेत, अर्धसमास पत्रान्वये साठा पुस्तक, मोजमाप पुस्तिका, मजुरांचे हजेरीपट, मजुरांचे पे-रोल, खडी खरेदीबाबतची संचिका व साठा पुस्तके लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाहीत, त्यामुळे शहरातील कोणत्या भागातील व किती रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली याबाबत लेखापरीक्षणात योग्य ती पडताळणी करता आली नाही, त्यामुळे सदर बाबींवर झालेला एकूण खर्च रु.9922684/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.173 दिनांक 20/02/2024 अन्वये खुलासा व आवश्यक अभिलेखे मागविण्यात आले होते. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा तसेच आवश्यक अभिलेखे प्राप्त झालेले नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्रमांक	मुद्दा	वसुलपात्र रक्कम
09	जादा जमा रक्कम	443273

FDSDNBM7201 (Ref No : 129, Hmm No : 173)

93 प्र.क्र.26 मध्ये सिंधी कॉलनी रोडवरील अंधशाळेपासून साईबाबा मंदीर पर्यंत सिमेंट काँक्रीटचा रस्ता तयार करणे

योजना : स्थानिक विकास कार्यक्रम (खासदार निधी) (मा.श्री.ए.टी.पाटील) **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर कालावधीमध्ये उपरोक्त काम करणेचे प्रस्तावित होते, सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	स्थानिक विकास कार्यक्रम (खासदार निधी) (मा.श्री.ए.टी.पाटील)
प्रशासकीय मान्यता	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव आदेश क्र.374, दिनांक 24/2/2015 रु.10.00 लक्ष
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, मनपा जळगांव ता.मा.मं.120 दि.22/1/2015 रु.1008806/-
दरसूची वर्ष	2012-2013
कामाची अंदाजित किंमत	रु.1008806/-
निधी वितरण तपशिल	मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव यांचे आदेश क्र.1027, दिनांक 26/05/2015 अन्वये रु.750000/-
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.19 दिनांक 07/05/2015
कंत्राटदाराचे नांव	बीएचआर कंस्ट्रक्शन्स, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 06/11/2015
दोष निवारण कालावधी	करारनामा जोडलेला नाही.
कामाची स्थिती	काम रद्द करण्यात आले.
चाचणी अहवाल	--
देयकांचा तपशिल	

	निधी परतावा देयक
प्रमाणक क्रमांक व दिनांक	04, दि.12/08/2016
मुळ अनुदान	750000
+ व्याज	32822
एकूण देयक रक्कम	782833

वरील कामाची संचिका तपासणीच्या अनुषंगाने खालील त्रृट्या निदर्शनास येतात.

01) सदर कामाचे अंदाजपत्रक मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगांव यांचेकडे पत्र क्र.2294, दिनांक 04/02/2015 अन्वये सादर करण्यात आले व सदर पत्रासोबत जोडण्यात आलेल्या प्रमाणपत्रामध्ये अ.क्र.1 अन्वये प्रस्तावित कामाची जागा मनपाच्या कब्जेवहीवाटीतील आहे असे प्रमाणीत करण्यात आलेले आहे. तथापी टिपणी दिनांक -- (नमूद नाही) अन्वये सदर कामाचे रस्त्यामध्ये नागरीकांचे

अतिक्रमण असल्याने व हा भाग कंजरवाडा असल्याने तेथे दारुच्या भट्या आहेत, पुरेसा पोलीस बंदोबस्त न मिळाल्यामुळे सदर अतिक्रमणाची मोहीम हाती घेता न आल्यामुळे सदर काम रद्द करुन दुसरे काम खासदार निधीतून करण्याकामी विनंती करता येईल असा प्रस्ताव सादर करण्यात आला, म्हणजेच मनपा पत्र क्र.2294 दिनांक 04/02/2015 अन्वये जागा मनपाचे कब्जेवहीवाटीतील आहे असे प्रमाणीत केलेले असतांना त्यानंतर प्रत्यक्ष काम करतांना अतिक्रमण असल्यामुळे काम करणे शक्य नाही असे नमूद करणेत आलेले आहे. म्हणजेच मनपाद्वारे प्रस्ताव सादर करतांना तसेच अंदाजपत्रक तयार करतांना याबाबत स्थळ निरिक्षण करण्यात आलेले नाही किंवा जागा पूर्णत: उपलब्ध असल्याबाबत म्हणजेच ताब्यात असल्याबाबत खात्री करण्यात आलेली नाही असे उपलब्ध अभिलेखांवरुन दिसून येते.

02) मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती जळगांव यांचे पत्र क्र.921 दिनांक 15/03/2016 अन्वये कामाच्या सद्य:स्थितीबाबत आकलन होत नाही, तरी माहिती सादर करण्यात यावी तसेच प्राप्त निधीमधून अपेक्षित खर्च वजा केल्यानंतर उर्वरित निधी परत करण्यात यावा असे सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार मनपा पत्र क्र.286 दिनांक 20/5/2016 अन्वये विहित नमुन्यामध्ये माहिती सादर करण्यात आली. मा.आयुक्त मनपा यांचे दिनांक 18/07/2016 अन्वये टिपणीस मान्यता प्रदान केल्यानुसार देयक अर्थ विभागास सादर करण्यात आले व अर्थविभागामार्फत वरील प्रमाणकान्वये व्याजासह मुळ रक्कम मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती जळगांव यांचेकडे परत करण्यात आली. यावरुन असे दिसून येते की, शासनाचा निधी दिनांक 26/05/2015 रोजी प्राप्त झालेला होता व त्यानंतर वरीलप्रमाणे जागा उपलब्धतेच्या अडचणींमुळे काम करता आले नाही व शासनास दिनांक 12/08/2016 रोजी म्हणजे 15 महिन्यानंतर निधी परतावा करण्यात आला. त्यामुळे शासनाचा निधी विनावापर 15 महिन्यांच्या कालावधीकरिता अडकून पडला व शासनाच्या इतर योजना किंवा कामे मनपाला पर्यायाने शासनाला करता आली नाही व परिणामी नागरिकांना उचित लाभ प्राप्त होऊ शकला नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.51, दिनांक 11/09/2023 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 139, Hmm No : 51)

94 विकास कामांमधील सर्वसाधारण अनियमितता

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान बांधकाम/विद्युत/पाणीपुरवठा विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले. सदर विभागांमार्फत उपरोक्त कालावधीमध्ये विविध योजनांतर्गत कामे करण्यात आलेली आहेत. सदर कामांमध्ये आढळून आलेल्या सर्वसाधारण अनियमिततांबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहेत.

01) नगरपरिषद प्रशासन संचालनालय वरळी मुंबई यांचे पत्र क्र.नपप्रसं/2015/प्र.क्र.71/का-8 दिनांक 07/12/2015

अन्वये नव्याने कामे हाती घेतांना मागिल किमान दहा वर्षांमध्ये संबंधित योजनेमधून घेतलेली कामे नकाशामध्ये दर्शविणे आवश्यक आहे. तथापी अशा प्रकारे कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे लेखापरीक्षणामध्ये संबंधित काम यापूर्वी केंव्हा करण्यात आलेले आहे याबाबत पडताळणी करता आली नाही.

02) कामांच्या संचिकांमध्ये दरसूचीनुसार सविस्तर दरपृथ:करण तयार करणे आवश्यक आहे, तथापी बांधकाम विभागाकडील संबंधित कामांच्या संचिकांमध्ये दरपृथ:करण विवरणपत्र जोडण्यात येत नाही, त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आलेले दरांबाबत पडताळणी करता आली नाही.

03) बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करतांना जिल्हा दरसूचीनुसार दरपृथ:करण तयार करतांना साहित्य वाहतुककरिता वहनावळ खर्च देण्यात येतो, तथापी त्याकरिता खदाणीचे अंतर दर्शविणारे दर्शक नकाशा जोडण्यात येत नाही, त्यामुळे साहित्याच्या वहनावळ रकमेबाबत पडताळणी करणे शक्य झाले नाही.

04) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 466(4) खालील परिशिष्ट-3 मधील खंड 19 नुसार रु.50 लक्ष पर्यंत किंमतीच्या निविदा ह्या राज्यस्तरीय कोणतेही एक वर्तमान पत्र व दैनंदिन 20000 प्रतींची विक्री असणारे एक वृत्तपत्र अशा प्रकारे दोन वर्तमानपत्रांमध्ये तसेच रु.50 लक्ष वरील कामाच्या निविदा ह्या राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही एक वर्तमानपत्र, राज्यस्तरीय कोणतेही एक वर्तमान पत्र दैनिक व दैनंदिन 20000 प्रतींची विक्री असणारे एक वृत्तपत्र अशा प्रकारे तीन वर्तमान पत्रांमध्ये निविदेस प्रसिद्धी देणे आवश्यक असतांना फक्त एकाच वर्तमान पत्रामध्ये प्रसिद्धी देण्यात येतात. त्यामुळे निविदेस अल्प प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येते व परिणामी अनेक वेळा फेर निविदा काढण्याची वेळ येते व परिणामी निविदा प्रक्रीयेमध्येच कालापव्यय होतांना दिसून येतो. त्यामुळे संबंधित कामांना प्रत्यक्ष सुरुवात होण्यासही विलंब होतो व नागरी सुविधा मिळण्यापासून नागरिकांना अनेक दिवसांचा विलंब होतो. त्याचप्रमाणे शासनाचा निधीची बराच काळापर्यंत विनावापर पडून राहतो.

05) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 466(4) खालील परिशिष्ट-3 मधील खंड 6 नुसार निविदा समिती स्थापन करणे व खंड 27 नुसार निविदा समितीने निविदाकारांच्या उपस्थितीत निविदा उघडणे, खंड 30 नुसार निविदा उघडल्यानंतर निविदाकारांसमोर निविदा उघडल्याबाबत त्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे आवश्यक आहे, तथापी निविदाकारांच्या उपस्थितीत निविदा उघडण्यात येऊन त्याबाबत त्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे निविदा प्रक्रीया ही पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत नाही असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

06) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 10(1)(दोन)(फ) तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 466(4) खालील परिशिष्ट-3 मधील खंड 17 नुसार कोणत्याही पालिका सदस्यांचा/नगरसेवकांचा निविदेमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंधी नाही अशा आशयाचे घोषणापत्र निविदाकारांनी अनुसूची-अ मध्ये निविदा दस्तऐवजांसोबत जोडणे आवश्यक आहे, तथापी अशा आशयाचे घोषणापत्र निविदाकारांकडून घेण्यात येत नाही.

07) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 466(3) खालील परिशिष्ट-3 खंड 36 मधील तरतुदीनुसार निविदा उघडल्यानंतर एक आठवड्याच्या आंत त्याची विल्हेवाट लावण्यात येईल, कोणत्याही परिस्थितीत एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीमध्ये त्याची विल्हेवाट लावण्यात येऊ नये अशी तरतुद आहे, तथापी अनेक कामांच्या दरांचा लिफाफा उघडल्यानंतर आवश्यक असल्यास वाटाघाटी करणे, दरास मंजुरी प्रदान करणे, निविदाकारासमवेत करारनामा करणे या प्रक्रीयेमध्ये एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागत असल्याचे निदर्शनास येते. यशस्वी निविदाकाराने करारनामा करुन देण्यास विलंब लावल्यास त्याबाबत विभागाकडून कोणत्याही प्रकारचा पाठपुरावा करण्यात येत असल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे शासकीय अनुदानाच्या रकमा विनावापर पडून राहतात तसेच विकास कामांपासून सर्वसामान्य जनतेस लाभ मिळण्यास विलंब होतो.

08) बांधकाम विभागाकडील विविध कामांचे करारनामानुसार कामाचा दोष निवारण कालावधी (Defect Liability Period) हा 6 महिन्यांचा ठेवण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण 2011/प्र.क्र.467/रस्ते-1, दिनांक 21/11/2011 नुसार असा दोष निवारण कालावधी हा 2 वर्षांचा असणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कालावधीमध्ये कामामध्ये काही दोष निर्माण झाल्यास व त्यावर दुरुस्तीकरिता खर्च करण्याची आवश्यकता भासल्यास महानगरपालिकेवर दायित्व वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास येते.

09) वित्त विभाग शासन निर्णय क्र.विमास-1098/प्र.क्र.28/शासन हमी दिनांक 19/8/1998, नगरविकास विभाग शासन पत्र क्र.जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24, दिनांक 3/11/2003 तसेच शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र.2314 दिनांक 31/3/2015 नुसार कंत्राटदाराने कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविल्याबाबतचा पुरावा काम सुरु करणेपूर्वी सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा प्रथम देयकामधून निविदा रकमेच्या 1% प्रमाणे रक्कम कपात करुन शासकीय विमा निधीकडे चलनाने भरणा करणे व त्याबाबतचा चलनाच्या प्रतीसह सविस्तर अहवाल शासकीय विमा निधीकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापी अशा प्रकारे कार्यवाही न करता प्रत्येक देयकामधून देयक रकमेवर विमा कपात करण्यात येतो, त्यामुळे निविदा रकमेपेक्षा कमी किंमतीमध्ये काम पूर्ण झाल्यास विमा रक्कम कमी कपात करण्यात येते व परिणामी शासकीय विमा निधीचे नुकसान होते, तसेच कामगारांचा विमा उतरविण्याचा उद्देश सफल होत नाही. कपात करण्यात आलेली विमा रक्कम शासकीय विमा निधीकडे भरणा करण्यात येऊन त्याबाबतचा चलनाच्या प्रती संचिकेमध्ये लावण्यात येत नाही, त्यामुळे संबंधित कामाचा विमा कपात करण्यात येऊनही योग्य लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात येत असल्याबाबत पडताळणी होत नाही तसेच रक्कम भरणा केल्यानंतर शासकीय विमा निधी कार्यालयास रक्कम भरणाबाबतचा तपशिल उपलब्ध झाल्यास त्यांचे कार्यालयास ताळमेळ घेणेही सुलभ होते.

10) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 2004/प्र.क्र.109/राम-2, दिनांक 22/03/2005 अन्वये बांधकामांवरील साहित्यांचे चाचणी अहवाल शासकीय प्रयोगशाळेकडून करणे आवश्यक असतांना खाजगी इंजिनिअरींग कॉलेजकडून चाचणी अहवाल प्राप्त करण्यात येत असल्याचे निदर्शनास येते, त्यामुळे शासन निर्देशांचे

पालन करण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे चाचणी अहवालामध्ये महानगरपालिकेचे पत्राचा संदर्भ पत्र क्रमांक व दिनांक नमूद करण्यात येत नसल्याचेही दिसून येते किंवा एकसारखेच क्रमांक व दिनांक नमूद करण्यात येत असल्याचे दिसून येते, तसेच साहित्य चाचणी करुन मिळणेबाबतचे महानगरपालिकेचे पत्र संचिकेमध्ये लावण्यात येत नाही. त्यामुळे करण्यात आलेल्या साहित्यांच्या चाचण्या ह्या अधिकृतरित्या करण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

11) करारनाम्यांनुसार काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम संपल्यानंतर कामाचे फोटो काढणे तसेच माहिती फलक लावणे आवश्यक आहे. तथापी संचिकांमध्ये फक्त काम सुरु असतांनाचे फोटो लावण्यात येतात तथापी काम सुरु करण्यापूर्वी जागेचे फोटो, काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो संचिकांमध्ये लावण्यात येत नाही. त्याचप्रमाणे संचिकांमध्ये लावण्यात आलेल्या फोटोंमध्ये माहिती फलक लावण्यात आलेल्या असल्याबाबतचे फोटो दिसून येत नाही त्यामुळे कंत्राटदाराने माहिती फलक लावलेले असल्याबाबत पडताळणी होत नाही, तथापी अनेक कामांचे देयकांमध्ये माहितीफलक लावण्याकरिता रकमाही अदा करण्यात आलेल्या असल्याचे निदर्शनास येते.

12) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 205 नुसार प्रगतीपथावरील कामांची नोंदवही नमुना क्र.18 मध्ये ठेवणे आवश्यक आहे, तथापी अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

13) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 9 अंतर्गत नियम 131 व 132 नुसार मंजूरीशिवाय मुळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही, संकल्पचित्र किंवा आराखड्यामध्ये बदल होणार असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशा सूचना आहे. नियम 139 नुसार तुलनात्मक विवरणपत्र तयार करण्यात येते, तथापी त्यामध्ये बाबनिहाय वाढ व बचतबाबत कारणे नमुद करण्यात येत नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील नियम 261 नुसार विशिष्ट प्रकल्पासाठी मंजूर केलेल्या अंदाजातील अपेक्षित वा प्रत्यक्ष बचत ही विशेष प्राधिकार असल्याशिवाय वापरण्यात येऊ नये, शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही प्रकल्पाचा बराचसा भाग सोडून दिल्यामुळे खर्चात बचत होत असेल तर ती बचत इतर भागातील कामासाठी उपलब्ध आहे असे मानता येणार नाही. तथापी याप्रमाणे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात येत नसल्याने नियमाचे पालन न करता परस्पर कामांच्या बाबींमध्ये बदल करण्यात येत असल्याचे तसेच वाढीव बाबींची कामे करण्यात येत असल्याचे निदर्शनास येते.

14) वस्तु व सेवा कर कायद्यानुसार जीएसटी करप्रणाली दिनांक 01/07/2017 पासून अंमलात आली. शासकीय कार्यकंत्राटामध्ये जीएसटी प्रणाली लागू करणेबात वित्त विभाग शासन निर्णय क्र.जीएसटी-1017/प्र.क्र.155/कराधान-1, दिनांक 11/09/2017 मधील अ.क्र.4 नुसार चालू कामांचे बाबतीत कराच्या भारामध्ये वृद्धी वा घट झाल्यामुळे कंत्राटाच्या किंमतीत वृद्धी वा घट होऊ शकते, त्यामुळे करावयाचा बदल कंत्राटामध्ये उल्लेख केलेल्या अटी व शर्तींवर अवलंबून असेल, कंत्राटाबाबत अटी व शर्ती वेगवेगळ्या असतील त्यामुळे प्रत्येक विभागाने कंत्राटाची प्रत विधी व न्याय विभागाकडून तपासून बदललेल्या कररचनेमुळे कंत्राटाच्या किंमतीतून कराचा भार कमी झाल्यामुळे वजावट

करता येईल किंवा कराचा भार वाढल्यामुळे किंमत वाढवून देता येईल याबाबत अभिप्राय घ्यावेत अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. लेखापरिक्षण कालावधीमध्ये तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांमध्ये व्हॅट प्रणालीनुसार अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत, तथापी प्रत्यक्ष काम केल्यानंतर व देयके अदा करतांना जीएसटी प्रणाली लागू झाल्यामुळे सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही न करता कंत्राटदाराचे देयकामधून व्हॅटची वसुली करण्यात आलेली नाही किंवा नवीन कर प्रणालीनुसार जीएसटी-टीडीएसचीही वसुली करण्यात आलेली नाही. त्यामुळे कंत्राटदारांना जादा प्रदान झालेले असून शासनाचा कर चुकविण्यात आलेला असल्याने शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे.

15) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2005/प्र.क्र.-187/रा.म.-2, दिनांक 08/10/2007 मधील (अ) नुसार ज्या कामासाठी ठेकेदार डांबर रिफायनरीतून प्राप्त करणार आहे अशा डांबर प्राप्तीचे वेळापत्रक क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देणे ठेकेदारास बंधनकारक राहील, डांबराचे प्रापण सरकरी तेल कंपन्यांच्या रिफायरीमधून प्राप्त करण्यात यावे. तथापी याप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्याबाबतची कागदपत्रे संचिकेमध्ये लावण्यात आलेली नाहीत. त्यामुळे कामामध्ये योग्य दर्जाचे डांबराचा वापर करण्यात येत असल्याबाबत संबंधित अभियंता यांनी वेळीच कार्यवाही केलेली नसल्याचे स्पष्ट होते.

16) वरील शासन निर्णय दिनांक 08/10/2007 नुसार रिफायनरीमधून डांबराचा बाऊझर ठेकेदाराचे प्लॉन्टवर पोहोचल्यानंतर संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी रिफायनरीकडून प्राप्त चलन व डिलीव्हरी मेमोच्या मूळ प्रतीवरुन डांबराची प्रत लेखी स्वरुपात मोजमाप पुस्तिकांत नोंदविणे आवश्यक आहे, तसेच क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी प्लान्टवर आलेल्या डांबराच्या बाऊझरमधील डांबराचे चाचणी नमुने गोळा करुन डांबराची प्रत तपासून लेखी स्वरुपात नोंदवावी, तसेच (क) नुसार रिफिायनरीमधून निर्गमित झालेल्या बाऊझरमधील डांबराची प्रत वरीलप्रमाणे चाचणी अहवानानुसार जुळत असल्याची खात्री झाल्यावर संबंधित ठेकेदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीमध्ये डांबराचा बाऊझर प्लान्टवर रिकामा करण्याची लेखी परवानगी क्षेत्रिय अधिकारी देतील, अन्यथा हे डांबर कामासाठी न वापरण्याबाबत देखील ठेकेदारास लेखी निर्देश देतील. (ड) नुसार कामनिहाय प्लान्टवर एक नोंदवही ठेवण्यात येऊन त्यामध्ये बाऊझर क्रमांक, चलन क्रमांक, डिलीव्हरी मेमो क्रमांक, डांबराचे वजन, ग्रेड तपासणी व चाचणी अधिकाऱ्यांचे नांव इत्यादी तपशिल नमुद करण्यात येईल. तथापी अशा प्रकारे कार्यवाही करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते.

17) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 2016/प्र.क्र.320/रस्ते-1, दिनांक 01/07/2016 मधील तरतुदीनुसार ज्या कामासाठी ठेकेदार डांबर रिफायनरीतून प्राप्त करणार आहे त्या रिफायनरीने दिलेले इनव्हाईस/मुळ गेळ पासची प्रत व रिफायनरीने ऑनलाईन उपलब्ध करुन दिलेले डिस्पॅच डिटेल्स पडताळणी करण्यासाठी ई-मेलद्वारे संबंधित रिफायनरीस पाठविण्यात यावेत, असे इनव्हाईस/मुळ गेट पास बनावट असल्याचे आढळून आल्यास संबंधित कंत्राटदारांवर कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना आहेत. तथापी याप्रमाणे मुळ इनव्हाईस/गेट पास कंत्राटदाराने सादर केलेले नसल्याचे तसेच त्यांची संबंधित अभियंता यांनी मागणी करुन तपासणी करण्याची कार्यवाही करण्यात

येत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. त्यामुळे डांबर वापराबाबत वरीलप्रमाणे शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नसल्याचे तसेच योग्य दर्जाचे डांबर वापराबाबत पडताळणी करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते.

18) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-2014/प्र.क्र.06/रस्ते-1, दिनांक 26/05/2014 मधील अ.क्र.3.2 अन्वये डांबरीकरणाचा प्रस्ताव तयार करण्यापूर्वी जलनिस्सारणाच्या कामांचा सविस्तर ड्रेनेज प्लॅन तयार करुन त्याचा संबंधित अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे अनिवार्य राहील व अशा अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्याने मान्यता प्रदान करावी. तसेच डांबरीकरणाची कामे करण्यापूर्वी जलनिस्सारण सुधारण्याची कामे मंजूर ड्रेनेज प्लॅननुसार पूर्ण करण्यात यावी असे निर्देश आहेत. तथापी कोणत्याही रस्ते डांबरीकरणाच्या प्रस्तावामध्ये जलनिस्सारणाबाबतच्या कामांचा समावेश केलेला दिसून येत नाही किंवा अशी डांबरीकरणाची कामे प्रस्तावित करतांना पूर्वी जलनिस्सारणाची कामे झालेली असल्याबाबतचा अहवाल संचिकेमध्ये जोडण्यात आलेले नाहीत. त्यामुळे डांबरीकरण करण्यात आलेल्या भागांमध्ये पावसाळयात पाणी साठल्यामुळे डांबरीकरणाची कामे भविष्यात लवकरच खराब होऊन महानगरपालिकेवर दुरुस्तीचे दायित्व वाढून महानगरपालिकेचे नुकसान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

19) नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, तथापी कामांमध्ये अशा प्रकारे जादा खर्च नोंदवितांना जादा खर्च हा मनपा निधीमधून न करता योजनेच्या शिल्लक रकमेमधून व पर्यायाने व्याजाच्या रकमेमधून करण्यात येत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे शासन नियमांचे पालन करण्यात होत नाही व पर्यायाने शिल्लक निधी व व्याजाच्या रकमा शासन खाती जमा न करता कामांवर परस्पर नियमबाह्यपणे खर्च करण्यात आलेला आहे.

20) देयक अदा केल्यानंतर देयकाच्या स्थळ प्रतीवर तसेच मोजमाप पुस्तिकेमध्ये देयकाचा तपशिल जसे प्रमाणक क्रमांक, दिनांक इत्यादी नमुद करण्यात येत नाही. त्यामुळे असे प्रदान दुबार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

बांधकाम विभागाकडील सर्वसाधारण अनियमितता या आशयाचे अर्धसमास पत्र क्र.61, दिनांक 19/10/2023 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नाही, तसेच इतर विभागांचे कामांसंबंधीत संचिका तपासणी करतांना अशा प्रकारच्या अनियमितता आढळून आलेल्या आहे, त्याअनुषंगाने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

95 जळगांव शहरातील प्रमुख रस्ते दुरुस्त करणे कामातील अनियमितता

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 308000.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान महानगरपालिका निधीमधून बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या विकास कामांबाबत अर्धसमास पत्र क्र.89, दिनांक 24/11/2023, क्र.109, दिनांक 11/12/2023, क्र.134, दिनांक 03/01/2024, क्र.145, दिनांक 24/01/2024 अन्वये अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित करण्यात आले होते. सदर कामाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. तथापी वित्त विभागाकडील मुळ प्रमाणके व त्यासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे यांची तपासणी करण्यात आली. त्याबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	जळगांव शहरातील प्रमुख रस्ते दुरुस्त करणे	
योजना / लेखाशिर्ष	मनपा निधी / रस्ते अनुदान	
प्रशासकीय मान्यता	उपलब्ध नाही	
तांत्रिक मान्यता	उपलब्ध नाही	
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	उपलब्ध नाही	
कंत्राटदाराचे नांव	श्री.तुषार रमेश महाजन आसोदा	
कामाचा कालावधी	उपलब्ध नाही	
दोष निवारण कालावधी	उपलब्ध नाही	
करारनामा तपशिल	उपलब्ध नाही.	
मुदतवाढ	उपलब्ध नाही.	
प्रदानाचा तपशिल	प्रथम धावते देयक (पार्ट पेमेंट)	द्वितीय धावते देयक (पार्ट पेमेंट)
प्रमाणक क्रमांक / दिनांक	3080, दि.27/02/2017	283, दि.29/04/2016
मोजमाप पुस्तिका क्रमांक / पृष्ठ क्र.	ए076, P-151-153	ए076, P-151-153
कामाची किंमत	1000000	1200000

-/+ मंजूर निविदा दर 6%	0	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण	0	0
एकूण देय रक्कम	1000000	1200000
वजाती -		
रॉयल्टी	0	0
विमा	0	0
कामगार उपकर	0	0
सुरक्षा रक्कम	0	0
जीएसटी/व्हॅट	0	0
आयकर	23000	27600
अति.सुरक्षा रक्कम	0	0
दंड 1%	0	0
एकूण वजाती	23000	27600
निव्वळ देय रक्कम	977000	1172400
काम पूर्णत्वाचा दाखला	कामाचे अंतिम देयक उपलब्ध नाही.	
टेस्ट रिपोर्ट	उपलब्ध नाही	

वरील कामाचे मुळ प्रमाणकाच्या तपासणीच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) वरीलप्रमाणे दोन देयकांसोबत कामाची कोणतीही कागदपत्रे लावण्यात आलेली नाहीत, त्यामुळे कामाचे स्वरुप, निविदा प्रक्रीया, कामाचे आदेशानुसार कामाची मुदत, करारनामा अटी व शर्ती, काम पूर्ण/अपूर्ण इत्यादींबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही. तसेच वरीलप्रमाणे प्रमाणके ही निवडक महिन्यांतील आढळून आलेली आहे, उर्वरित प्रमाणके व कामाची संचिका लेखापरीक्षणास मागणी करुनही उपलब्ध झाली नाहीत त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

02) प्रमाणक क्र.3080 व 3114 अन्वये अनुक्रमे 1000000 व 1200000 असे एकूण रु.2400000/- अदा करण्यात आलेले आहे. प्रमाणकावर नोंद केलेनुसार देयकाची एकूण रक्कम रु.2653150/- पैकी रु.2400000/- चे प्रदान करण्यात आले असून उर्वरित रु.453150/- चे प्रदान करणे बाकी दिसून येते. सदर उर्वरित रक्कम व अंतिम देयक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत.

03) वरीलप्रमाणे दोन देयकांमधून फक्त आयकर रक्कम कपात करण्यात आलेल्या असून नियमानुसार इतर शासकीय रकमांच्या वसुली केलेल्या नाही त्यामुळे खालीलप्रमाणे रकमा वसुलपात्र ठरतात.

प्रदानाचा तपशिल	प्रथम धावते देयक	दुसरे धावते देयक
कामाची किंमत	1000000	1200000
वजाती -		
रॉयल्टी	0	0
विमा	10000	12000
कामगार उपकर	10000	12000
सुरक्षा रक्कम	100000	120000
जीएसटी/व्हॅट	20000	24000
आयकर	0	0
अति.सुरक्षा रक्कम	0	0
दंड 1%	0	0
एकूण वसुलपात्र रकमा	140000	168000

04) तपासणी करण्यात आलेल्या कामांचे देयकांमधून गौण खनिज कपात करण्यात आलेल्या दिसून येत नाही, तसेच संबंधित कंत्राटदाराने गौण खनिज वाहतुक पास व परवाना पत्र सादर केलेले नाही, त्यामुळे शासन महसुलाची हानी झालेली आहे. शासन अधिसूचना क्र.गौखनि.10/1012/प्र.क्र.603/ख, दिनांक 11/05/2015 अन्वये गौण खनिज स्वामित्वधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडील जिल्हा दरसुचीमध्ये गौण खनिज वापराचे फॅक्टर नमुद करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर कामामध्ये वापरण्यात आलेल्या गौण खनिज स्वामित्वधनाची परिगणना करण्यात येऊन संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात यावी व चलनाने

शासन खाती भरणा करण्यात यावी. त्याचप्रमाणे चलनाच्या प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

05) महानगरपालिकेने रस्ता दुरुस्तीकरिता हिंदुस्थान कोलॅस कंपनीकडून डांबर व स्थानिकरित्या खडी खरेदी केलेल्या आहेत. तथापी वरीलप्रमाणे रस्ता दुरुस्तीची कामे स्वतंत्ररित्या कंत्राटदारामार्फत करण्यात आलेली आहे. सदर कामाची मुळ संचिका व आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणास वेळोवेळी अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही उपलब्ध झालेल्या नाहीत, त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

06) सदरची रस्ता दुरुस्ती ही डांबर व खडीचा वापर करुन केलेला असल्यास वरीलप्रमाणे हिंदुस्थान कोलॅस कंपनीकडून डांबर व स्थानिकरित्या खडी खरेदी करणेवर दुबार खर्च करण्यात आलेला दिसून येतो. यामुळे महानगरपालिका निधीचा गैरवापर करण्यात आलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.263, दिनांक 15/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 167, Hmm No : 263)

96 प्र.क्र.20 चित्रा चौक ते बेंडाळे चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 3500.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान महानगरपालिका निधीमधून बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या विकास कामांबाबत अर्धसमास पत्र क्र.89, दिनांक 24/11/2023, क्र.109, दिनांक 11/12/2023, क्र.134, दिनांक 03/01/2024, क्र.145, दिनांक 24/01/2024 अन्वये अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित करण्यात आले होते. सदर कामाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तथापी वित्त विभागाकडील मुळ प्रमाणके व त्यासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे यांची तपासणी करण्यात आली. त्याबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	प्र.क्र.20 चित्रा चौक ते बेंडाळे चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे	
योजना / लेखाशिर्ष	मनपा निधी / रस्ते अनुदान	
प्रशासकीय मान्यता	महासभा ठराव क्र.91 दिनांक 13/05/2014 (प्रत उपलब्ध नाही)	
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.01, दिनांक 08/05/2014 (उपलब्ध नाही) रु.4601714/-	
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.52, दिनांक 11/09/2014	
कंत्राटदाराचे नांव	श्री.तुषार रमेश महाजन आसोदा (6% जादा दराने)	
कामाचा कालावधी	10 महिने i.e. upto 10/07/2015	
दोष निवारण कालावधी	6 महिने	
करारनामा तपशिल	रु.3600/- मुद्रांकावर दिनांक 11/09/2014	
मुदतवाढ	उपलब्ध नाही.	
प्रदानाचा तपशिल	प्रथम धावते देयक	द्वितीय धावते देयक
प्रमाणक क्रमांक / दिनांक	39, दि.02/04/2016	283, दि.29/04/2016
मोजमाप पुस्तिका क्रमांक / पृष्ठ क्र.	ए076, P-138-139	ए076, P-151-153
कामाची किंमत	2880935	1427402
-/+ मंजूर निविदा दर 6%	0	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण	0	0
एकूण देय रक्कम	2880935	1427402
वजाती -		

रॉयल्टी	0	0
विमा	28809	14274
कामगार उपकर	28809	14274
सुरक्षा रक्कम	288093	142740
जीएसटी/व्हॅट	57619	28548
आयकर	66262	32830
अति.सुरक्षा रक्कम	0	0
दंड 1%	0	0
एकूण वजाती	469592	232666
निव्वळ देय रक्कम	2382534	1180462
काम पूर्णत्वाचा दाखला	कामाचे अंतिम देयक उपलब्ध नाही.	
टेस्ट रिपोर्ट	उपलब्ध नाही	

वरील कामाचे मुळ प्रमाणकाच्या तपासणीच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) मंजुर दरानुसार कामाची किंमत रु.48,77,817/- इतकी येते. त्यानुसार रु.4000/- चे मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक होते, करारनामा खरेदी तपशिलामध्ये मुद्रांक शुल्क रक्कम रु.3600/- नमुद असून मुद्रांक विक्री नोंदवही अ.क्र.814 दिनांक 10/9/2014 असा तपशिल नमुद आहे. तथापी देयकासोबत फक्त रु.500/- चा एक मुद्रांक पेपर लावलेला असल्याने, सदर कामाच्या करारनाम्याकरिता किती किंमतीचे मुद्रांक वापरण्यात आले याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होत नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे रु.3500/- चे मुद्रांक वापरानुसार कमी वापरण्यात आलेल्या मुद्रांकाची रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी.

02) सदर कामाचे मुळ निविदा संचिका, मुळ अंदाजपत्रक लेखापरीक्षणास मागणी करुनही प्राप्त झाले नाही, त्यामुळे त्याबाबत तपासणी करता आली नाही.

03) टिपणी दिनांक -- (नमुद नाही) नुसार दि.30/3/2016 रोजी सदर कामाचा मुळ ठराव व प्रशा.मा. मनपा फंडातून

देण्यात आली व निविदा मंजूर केली तथापी स्थायी समिती ठराव क्र.387 दि.15/1/2016 अन्वये सदर काम रस्ता अनुदानातून घेण्याचे ठरले. तेंव्हा Third Party audit चे अधीन राहून बिल मंजुर करणेपूर्वी प्रशासकीय मान्यतेस्तव सादर असे उपायुक्त यांनी शेरा नमुद केला आहे, त्यावर मा.आयुक्त यांनी असे नियमानुसार करता येईल कां, नियमानुसार मु.ले.प. यांनी स्पष्ट अभिप्राय द्यावेत अशा सूचना दिल्यात. त्यावर मा.मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय न घेता उपायुक्त यांनी दिनांक 31/03/2016 रोजी शासनाकडून प्राप्त झालेले रस्ता अनुदान आजपावेतो सामान्य निधीमध्येच जमा करण्यात येत असतो तसेच रस्ता अनुदानाच्या रकमेपेक्षाही जास्तीचा खर्च अशा कामांवर होत असतो. आजपर्यंत रस्ता अनुदानातून खर्च केलल्या रकमेला कोणत्याही सभेची किंवा स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही तसेच याबाबत कोणतेही लेखा आक्षेप लेखापरीक्षणामध्ये घेण्यात आलेले नाहीत. दि.31/3/2016 पूर्वी सदरची रक्कम खर्च केली तर शासनास उपयोगिता प्रमाणपत्र पाठविता येईल, कारण याशिवाय पुढील अनुदान मनपास प्राप्त होणार नाही. तरी रस्ता अनुदानातून खर्च करण्यास हरकत नाही असे नमुद केले आहे. त्यावर मा.आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय रकमेला सदर प्रस्ताव मान्य असा शेरा नमुद करुन मान्यता प्रदान केली. त्यानुसार 6% जादा निविदा दर कमी करण्यात येऊन अंदाजपत्रकीय दरानुसार देयक अदा करण्यात आले. त्याचप्रमाणे दुसरे धावते देयकसुद्धा अंदाजपत्रकीय दरानुसार अदा करण्यात आलेले आहे. त्यामुळे वाढीव दरानुसार कंत्राटदारास देयक अदा केले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

04) उपायुक्त त्यांचा शेरा दिनांक 31/03/2016 अन्वये आजपर्यंत रस्ता अनुदानातून खर्च केलेल्या रकमेला कोणत्याही सभेची किंवा स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही तसेच याबाबत कोणतेही लेखा आक्षेप लेखापरीक्षणामध्ये घेण्यात आलेले नाहीत, असे नमुद करणे हे प्रशासकीय दृष्ट्या योग्य नसल्याचे व नियमांनुसार नसल्याचेलेखापरीक्षणाचे मत आहे.

05) सदरचे काम हे प्रथम मनपा निधीमधून सन 2014 मध्ये मंजुर करण्यात आलेले आहे, म्हणजेच सन 2014-15 च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये सदर कामाबाबत तरतुद करण्यात आलेली होती. तथापी सदरचे काम हे प्रत्यक्षात सन 2015-2016 मध्ये सुरु करण्यात येऊन त्यानंतर कामाची देयके प्रत्यक्षात सन 2016-2017 मध्ये अदा करण्यात आलेली दिसून येतात. म्हणजेच सन 2014-15 मध्ये अंदाजपत्रकामध्ये तरतुद करण्यात येऊनही प्रत्यक्षात काम करण्यात आलेले नसल्याने त्या वर्षामध्ये नागरिकांना प्रत्यक्ष सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली नसल्याचे व विलंबाने काम करण्यात आलेले असल्याने सुविधा उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

06) स्थायी समिती सभा क्र.23 दिनांक 05/09/2014 आयत्या वेळेचा विषय क्र.2 ठराव क्र.141 अन्वये निविदा 6% जादा दरानुसार श्री.तु.र.महाजन यांची मंजुर करण्यात आली. त्यानंतर स्थायी समिती सभा क्र.58 दिनांक 15/01/2016 आयत्या वेळेचा विषय क्र.03 ठराव क्र.387 अन्वये सदरचे काम मनपा फंडातील असल्याने मक्तेदार काम करणेस प्रतिसाद देत नसल्याने सदरचे रस्ते हे शहाराच्या मध्यवर्ती भागातील असून बाजारपेठ, व्यापारी संकुले व इतर व्यावसायिक प्रतिष्ठाने असल्याने सदरच्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर रहदारी असते, सदरचे रस्त्यांचे डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी सदरचे काम रस्ता अनुदान अंतर्गत शिल्लक रकमेतून देयक

अदायगी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे अशा आशयाने मान्यता प्रदान करण्यात आली. यावरुन कंत्राटदाराचे हित जोपासले असल्याचे निदर्शनास येते.

07) सदरचे काम हे प्रथम मनपा निधीमधून प्रस्तावित करण्यात आले होते त्यानुसार त्यास प्रशासकीय मान्यता ही महासभेची प्रदान करण्यात आली होती. तथापी त्यानंतर सदरचे काम हे रस्ता अनुदानातून प्रस्तावित करण्यात आल्यामुळे त्यास नियमानुसार मा.जिल्हाधिकारी जळगांव यांची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक होते, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने नियमबाह्यता झालेली दिसून येते.

08) देयकावर काम सुरु झाल्याचा दिनांक 09/02/2016 व मोजमापे नोंदविल्याचा दिनांक 01/03/2016 असे नमूद करण्यात आलेले आहेत. म्हणजेच कामाचे आदेश दिनांक 11/09/2014 रोजी देण्यात आल्यानंतर प्रत्यक्ष कामास दिनांक 09/02/2016 रोजी म्हणजे जवळ जवळ 16 महिन्यांच्या कालावधीनंतर सुरुवात करण्यात आलेली असल्याचे निदर्शनास येते. कंत्राटदारामार्फत काम विहित वेळेत सुरु करुन पूर्ण करण्याबाबत मनपामार्फत काय कार्यवाही करण्यात आली याबाबत लेखापरीक्षणास अभिलेखे मागणी करुनही उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. तसेच दरम्यानच्या काळात प्रस्तावित रस्त्याची अवस्था जास्तच खराब झालेली असल्याने खालीलप्रमाणे जादा काम करावा लागल्यामुळे जादा खर्च झालेला दिसून येतो. सदर जादा परिमाणाबाबत सुधारित तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही त्यामुळे सदरचा जादा खर्च रु.929/- लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येत आहे.

बाब क्र.	बाब तपशिल	प्रस्तावित परिमाण	देयकानुसार परिमाण	जादा झालेले परिमाण	दर	जादा खर्च झालेली रक्कम
1	Excavation fot pot holes.	28.50	43.25	14.75	63.00	929.25

09) सदर कामाचे अंतिम देयक लेखापरीक्षण कालावधीमध्ये दिनांक 31/03/2018 अखेर अदा करण्यात आले असल्यास सदर देयक, मोजमाप पुस्तिका अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही, त्यामुळे याबाबत योग्य ती पडताळणी करता आली नाही.

10) सदर कामाची मुळ संचिका व आवश्यक अभिलेखे अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.264, दिनांक 15/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रक्कम
01	मुद्रांक शुल्क	3500

FDSDNBM7201 (Ref No : 168, Hmm No : 264)

97 प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत मुख्य डांबरी (कॉलनी) रस्त्यावरील खड्डे बुजविणे

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 20276.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान महानगरपालिका निधीमधून बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या विकास कामांबाबत अर्धसमास पत्र क्र.89, दिनांक 24/11/2023, क्र.109, दिनांक 11/12/2023, क्र.134, दिनांक 03/01/2024, क्र.145, दिनांक 24/01/2024 अन्वये अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित करण्यात आले होते. सदर कामाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तथापी वित्त विभागाकडील मुळ प्रमाणके व त्यासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे यांची तपासणी करण्यात आली. त्याबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत मुख्य कॉलनी रस्त्यावरील खड्डे बुजविणे
योजना / लेखाशिर्ष	मनपा निधी
प्रशासकीय मान्यता	महासभा ठराव क्र.511 दिनांक 20/08/2016 (प्रत उपलब्ध नाही)
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.142, दिनांक 19/08/2016 (उपलब्ध नाही) रु.2946333/-
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.70, दिनांक 18/10/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.सुशिलकुमार गणपत डोंगरे, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)
कामाचा कालावधी	180 दिवस i.e. upto 15/05/2017
दोष निवारण कालावधी	उपलब्ध नाही

करारनामा तपशिल	रु.500/- मुद्रांकावर दिनांक 18/10/2016
मुदतवाढ	उपलब्ध नाही.
प्रदानाचा तपशिल	प्रथम धावते देयक
प्रमाणक क्रमांक / दिनांक	3002, दि.27/02/2017
मोजमाप पुस्तिका क्रमांक / पृष्ठ क्र.	ए082, P-168-172
कामाची किंमत	1876731
-/+ मंजूर निविदा दर	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण	0
एकूण देय रक्कम	1876731
वजाती -	
रॉयल्टी	28890
विमा	18767
कामगार उपकर	18767
सुरक्षा रक्कम	187673
जीएसटी/व्हॅट	37535
आयकर	43165
अति.सुरक्षा रक्कम	0
दंड 1%	0
एकूण वजाती	334797
निव्वळ देय रक्कम	1541934

काम पूर्णत्वाचा दाखला	कामाचे अंतिम देयक उपलब्ध नाही.
टेस्ट रिपोर्ट	उपलब्ध नाही

वरील कामाचे मुळ प्रमाणकाच्या तपासणीच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) सदर कामाचे मुळ निविदा संचिका, मुळ अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धासमास पत्रान्वये कळविण्यात येऊनही सदरचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

02) सदर कामाचे अंतिम देयक लेखापरीक्षण कालावधीमध्ये दिनांक 31/03/2018 अखेर अदा करण्यात आले असल्यास सदर देयक, मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास मागणी करण्यात येऊनही उपलब्ध झाले नाही, त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

03) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.29.46 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.2500/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.500/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.2000/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.2000/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते.

04) गौण खनिज स्वामित्वधन रक्कम परिगणना करतांना जिल्हा दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे गुणक देण्यात आलेले असून त्यानुसार परिगणना करण्यात आलेली नाही, त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.7580/- वसुलपात्र ठरते. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रक्कम वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	परिमाण	गुणक	गौण खनिज परिमाण
3	Supplying 40 mm metal	154.00	1.25	192.50
4	Spreading soft murumhellip;.	50.40	1.30	65.53
	एकूण	**204.4**		**258.03**
	गौण खनिज दर			141.34

	गौण खनिज रक्कम			36470.00
	देयकामध्ये वसुल केलेली रक्कम			**28890.00**
	वसुलपात्र रक्कम			**7580.00**

05) महाराष्ट्र शासन विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनि-2314/देयक कपात रक्कम/ संकीर्ण/अभि-3, दिनांक 31/3/2015 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम कार्यारंभ आदेश दिल्यानंतर विमा संचालनालयाकडे भरणा करणे व तसे विमापत्र सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा प्रथम देयकामधून कंत्राट रकमेवर 1% प्रमाणे विमा रक्कम कपात करण्यात येऊन विमा संचालनालयाकडे भरणा करुन विमा पत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. तथापी सदरचे कामामध्ये निविदा स्विकृतीच्या वेळी किंवा प्रदानापूर्वी कंत्राटी कामाचा विमा उतरविला असल्याबाबतची खात्री न करता किंवा तसे विमापत्र प्राप्त न करता प्रथम देयकामधून देयक रकमेच्या 1% प्रमाणे रु.18767/- विमा रक्कम कपात करण्यात आलेली आहे, त्यामुळे कामाचा विमा उतरविण्याचा उद्देश सफल होत नाही. तसेच निविदा रकमेवर विमा कपात न करता देयक रकमेवर विमा कपात केल्यामुळे कमी कपात करण्यात आलेली आहे. कामाची किंमत रु.2946333/- वर 1% प्रमाणे रु.29463/- इतकी विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते, त्यामुळे रु.10696/- इतकी कमी कपात करण्यात आलेली आहे. कामाचे उर्वरित देयकांमध्ये अशाच प्रकारे कपात करण्यात आलेली विम्याची रक्कम परिगणीत करण्यात येऊन निविदा रकमेवर 1% पेक्षा कमी कपात करण्यात आली असल्यास अशी कमी कपात करण्यात आलेली रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात यावी.

06) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 2004/प्र.क्र.109/राम-2, दिनांक 22/03/2005 अन्वये कामांवरील साहित्यांचे चाचणी अहवाल शासकीय प्रयोगशाळेकडून करणे आवश्यक आहे. कामाचे मुळ प्रमाणाकासोबत चाचणी अहवाल जोडण्यात आलेले नसल्याने चाचणी अहवालाबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही. तसेच चाचणी अहवाल प्राप्त केले नसल्यास कामासाठी वापरण्यात आलेले साहित्य हे योग्य दर्जाचे वापरण्यात आले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

07) महानगरपालिकेने रस्ता दुरुस्तीकरिता हिंदुस्थान कोलॅस कंपनीकडून डांबर व स्थानिकरित्या खडी खरेदी केलेल्या आहेत. तथापी वरीलप्रमाणे रस्ता दुरुस्तीची कामे स्वतंत्ररित्या कंत्राटदारामार्फत करण्यात आलेली आहे. तसेच सदरची रस्ता दुरुस्ती ही डांबर व खडीचा वापर करुन केलेला असल्याने वरीलप्रमाणे हिंदुस्थान कोलॅस कंपनीकडून डांबर व स्थानिकरित्या खडी खरेदी करणेवर दुबार खर्च करण्यात आलेला दिसून येतो.यामुळे महानगरपालिका निधीचा गैरवापर करण्यात आलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

08) सदर कामाची मुळ संचिका व आवश्यक अभिलेखे अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे

सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.265, दिनांक 15/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रक्कम
03	मुद्रांक शुल्क	2000
04	गौण खनिज	7580
05	विमा	10696
	एकूण	20276

FDSDNBM7201 (Ref No : 169, Hmm No : 265)

98 प्रभाग समिती क्र.2 अंतर्गत मुख्य डांबरी रस्त्यावरील खड्डे बुजविणे

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 26665.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान महानगरपालिका निधीमधून बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या विकास कामांबाबत अर्धसमास पत्र क्र.89, दिनांक 24/11/2023, क्र.109, दिनांक 11/12/2023, क्र.134, दिनांक 03/01/2024, क्र.145, दिनांक 24/01/2024 अन्वये अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित करण्यात आले होते. सदर कामाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तथापी वित्त विभागाकडील मुळ प्रमाणके व त्यासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे यांची तपासणी करण्यात आली. त्याबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	प्रभाग समिती क्र.2 अंतर्गत मुख्य डांबरी रस्त्यावरील खड्डे बुजविणे

योजना / लेखाशिर्ष	मनपा निधी	
प्रशासकीय मान्यता	महासभा ठराव क्र.511 दिनांक 20/08/2016 (प्रत उपलब्ध नाही)	
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.141, दिनांक 19/08/2016 (उपलब्ध नाही) रु.2822610/-	
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.69, दिनांक 18/10/2016	
कंत्राटदाराचे नांव	श्री.सुशिलकुमार गणपत डोंगरे, जळगांव (अंदाजपत्रकीय दराने)	
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 17/04/2017	
दोष निवारण कालावधी	उपलब्ध नाही	
करारनामा तपशिल	रु.2500/- मुद्रांकावर दिनांक 18/10/2016	
मुदतवाढ	उपलब्ध नाही.	
काम पूर्ण दिनांक	26/05/2017	
प्रदानाचा तपशिल	प्रथम धावते देयक	द्वितीय व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक / दिनांक	3003, दि.27/02/2017	1057, दि.01/08/2017
मोजमाप पुस्तिका क्रमांक / पृष्ठ क्र.	ए134, P-80-81	ए134, पृ.108-110
कामाची किंमत	1317233	1505056
-/+ मंजूर निविदा दर	0	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण	0	0
एकूण देय रक्कम	1317233	1505056
वजाती -		
रॉयल्टी	0	0

विमा	13172	15051
कामगार उपकर	13172	15051
सुरक्षा रक्कम	131723	150506
जीएसटी/व्हॅट	26345	30101
आयकर	30296	34616
दंड 1%	0	28223
एकूण वजाती	214708	273548
निव्वळ देय रक्कम	1102525	1231508
काम पूर्णत्वाचा दाखला	कामाचे अंतिम देयक उपलब्ध नाही.	
टेस्ट रिपोर्ट	उपलब्ध नाही	

वरील कामाचे मुळ प्रमाणकाच्या तपासणीच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) सदर कामाचे मुळ निविदा संचिका, मुळ अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धासमास पत्रान्वये कळविण्यात येऊनही सदरचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

02) सदर कामाचे अंतिम देयक लेखापरीक्षण कालावधीमध्ये दिनांक 31/03/2018 अखेर अदा करण्यात आले असल्यास सदर देयक, मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास मागणी करण्यात येऊनही उपलब्ध झाले नाही, त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

03) गौण खनिज स्वामित्वधन रक्कम परिगणना करतांना जिल्हा दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे गुणक देण्यात आलेले असून त्यानुसार परिगणना करण्यात आलेली नाही, त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.26665/- वसुलपात्र ठरते. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रक्कम वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	परिमाण	गुणक	गौण खनिज परिमाण

3	Supplying 40 mm metal	112.80	1.25	141.00
4	Spreading soft murumhellip;.	36.66	1.30	47.66
	एकूण	**204.4**		**188.66**
	गौण खनिज दर			141.34
	गौण खनिज रक्कम			26665.00
	देयकामध्ये वसुल केलेली रक्कम			**0.00**
	वसुलपात्र रक्कम			**26665.00**

04) महाराष्ट्र शासन विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनि-2314/देयक कपात रक्कम/ संकीर्ण/अभि-3, दिनांक 31/3/2015 अन्वये कामगारांचा विमा उतरविण्यासाठी निविदा रकमेच्या 1 टक्के रक्कम कार्यारंभ आदेश दिल्यानंतर विमा संचालनालयाकडे भरणा करणे व तसे विमापत्र सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा प्रथम देयकामधून कंत्राट रकमेवर 1% प्रमाणे विमा रक्कम कपात करण्यात येऊन विमा संचालनालयाकडे भरणा करुन विमा पत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. तथापी सदरचे कामामध्ये निविदा स्विकृतीच्या वेळी किंवा प्रदानापूर्वी कंत्राटी कामाचा विमा उतरविला असल्याबाबतची खात्री न करता किंवा तसे विमापत्र प्राप्त न करता प्रथम देयकामधून देयक रकमेच्या 1% प्रमाणे रु.18767/- विमा रक्कम कपात करण्यात आलेली आहे, त्यामुळे कामाचा विमा उतरविण्याचा उद्देश सफल होत नाही. तसेच निविदा रकमेवर विमा कपात न करता देयक रकमेवर विमा कपात केल्यामुळे कमी कपात करण्यात आलेली आहे. कामाची किंमत रु.2946333/- वर 1% प्रमाणे रु.29463/- इतकी विमा रक्कम कपात करणे आवश्यक होते, त्यामुळे रु.10696/- इतकी कमी कपात करण्यात आलेली आहे. कामाचे उर्वरित देयकांमध्ये अशाच प्रकारे कपात करण्यात आलेली विम्याची रक्कम परिगणीत करण्यात येऊन निविदा रकमेवर 1% पेक्षा कमी कपात करण्यात आली असल्यास अशी कमी कपात करण्यात आलेली रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात यावी.

05) कामाचे दुसरे व अंतिम देयकासोबत जोडलेल्या फरकाचे विवरणपत्राची व देयकांची तपासणी करण्यात आली असता बाब क्र.10 नुसार सिलकोटची तरतुद करण्यात आलेली आहे, तथापी प्रत्यक्ष कामामध्ये सिलकोटचे काम करण्यात आलेले नाही, त्यामुळे करण्यात आलेल्या कामाचा टिकाऊपणा राहणार नाही असे लेखापरीक्षणाचे मत आहे. तसेच तफावतीच्या विवरणपत्रामध्ये तफावतीचे कारणे नमुद करण्यात आलेली नाही.

06) महानगरपालिकेने रस्ता दुरुस्तीकरिता हिंदुस्थान कोलॅस कंपनीकडून डांबर व स्थानिकरित्या खडी खरेदी केलेल्या आहेत. तथापी वरीलप्रमाणे रस्ता दुरुस्तीची कामे स्वतंत्ररित्या कंत्राटदारामार्फत करण्यात आलेली आहे. तसेच सदरची रस्ता दुरुस्ती ही डांबर व खडीचा वापर करुन केलेला असल्याने वरीलप्रमाणे हिंदुस्थान कोलॅस कंपनीकडून डांबर व स्थानिकरित्या खडी खरेदी करणेवर दुबार खर्च करण्यात आलेला दिसून येतो.यामुळे महानगरपालिका

निधीचा गैरवापर करण्यात आलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

07) सदर कामाची मुळ संचिका व आवश्यक अभिलेखे अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.266, दिनांक 15/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रक्कम
03	गौण खनिज	26665
	एकूण	26665

FDSDNBM7201 (Ref No : 170, Hmm No : 266)

99 जळगांव शहरातील प्रमुख रस्ते दुरुस्त करणे कामातील अनियमिताबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 350000.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान महानगरपालिका निधीमधून बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या विकास कामांबाबत अर्धसमास पत्र क्र.89, दिनांक 24/11/2023, क्र.109, दिनांक 11/12/2023, क्र.134, दिनांक 03/01/2024, क्र.145, दिनांक 24/01/2024 अन्वये अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित करण्यात आले होते. सदर कामाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तथापी वित्त विभागाकडील मुळ प्रमाणके व त्यासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे यांची तपासणी करण्यात आली. त्याबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	जळगांव शहरातील प्रमुख रस्ते दुरुस्त करणे
योजना / लेखाशिर्ष	मनपा निधी

प्रशासकीय मान्यता	उपलब्ध नाही
तांत्रिक मान्यता	उपलब्ध नाही
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	उपलब्ध नाही
कंत्राटदाराचे नांव	श्री.तुषार रमेश महाजन आसोदा
कामाचा कालावधी	उपलब्ध नाही
दोष निवारण कालावधी	उपलब्ध नाही
करारनामा तपशिल	उपलब्ध नाही.
मुदतवाढ	उपलब्ध नाही.
प्रदानाचा तपशिल	पार्ट पेमेंट
प्रमाणक क्रमांक / दिनांक	1058, दि.01/08/2017
मोजमाप पुस्तिका क्रमांक / पृष्ठ क्र.	उपलब्ध नाही
कामाची किंमत	2500000
-/+ मंजूर निविदा दर 6%	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण	0
एकूण देय रक्कम	2500000
वजाती -	
रॉयल्टी	0
विमा	0
कामगार उपकर	0
सुरक्षा रक्कम	0

जीएसटी/व्हॅट	0
आयकर	57500
अति.सुरक्षा रक्कम	0
दंड 1%	0
एकूण वजाती	57500
निव्वळ देय रक्कम	2442500
काम पूर्णत्वाचा दाखला	कामाचे अंतिम देयक उपलब्ध नाही.
टेस्ट रिपोर्ट	उपलब्ध नाही

वरील कामाचे मुळ प्रमाणकाच्या तपासणीच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) वरीलप्रमाणे मुळ देयकांसोबत कामाची कोणतीही कागदपत्रे लावण्यात आलेली नाहीत, त्यामुळे कामाचे स्वरुप, निविदा प्रक्रीया, कामाचे आदेशानुसार कामाची मुदत, करारनामा अटी व शर्ती, काम पूर्ण/अपूर्ण इत्यादींबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही. तसेच वरीलप्रमाणे प्रमाणके ही निवडक महिन्यांतील आढळून आलेली आहे, उर्वरित प्रमाणके व कामाची संचिका लेखापरीक्षणास मागणी करुनही उपलब्ध झाली नाहीत, त्यामुळे याबाबत आवश्यक ती पडताळणी करता आली नाही.

02) सदर प्रमाणकामध्ये नमुद केलेनुसार मक्तेदार यांनी जळगांव शहरातील प्रमुख रस्ते दुरुस्त करणेचे केलेले कामाचे देयक रु.4900617/- पैकी पार्ट पेमेंट रु.14 लक्ष वजा जाता उर्वरित रक्कम रु.3500617/- पैकी तुर्तास अदा करावयाचे पार्ट पेमेंट देयक असे नमुद करण्यात आलेले आहे. म्हणजेच कामाचे एकूण देयकाची रक्कम रु.4900617/- अशी असून सदर कामाचे अदा करण्यात आलेल्या सर्व देयकांची मुळ प्रमाणके लेखापरीक्षणास मागणी करुनही उपलब्ध झाली नाही.

03) वरीलप्रमाणे देयकांमधून फक्त आयकर रक्कम रु.57500/- कपात करण्यात आलेल्या असून नियमानुसार इतर शासकीय रकमांच्या वसुली केलेल्या नाही त्यामुळे खालीलप्रमाणे रकमा वसुलपात्र ठरतात.

प्रदानाचा तपशिल	प्रदान रक्कम
कामाची किंमत	2500000

वजाती -	
रॉयल्टी	0
विमा	25000
कामगार उपकर	25000
सुरक्षा रक्कम	250000
जीएसटी/व्हॅट	50000
आयकर	0
एकूण वसुलपात्र रकमा	350000

04) महानगरपालिकेने रस्ता दुरुस्तीकरिता हिंदुस्थान कोलॅस कंपनीकडून डांबर व स्थानिकरित्या खडी खरेदी केलेल्या आहेत. तथापी वरीलप्रमाणे रस्ता दुरुस्तीची कामे स्वतंत्ररित्या कंत्राटदारामार्फत करण्यात आलेली आहे. सदर कामाची संचिका लेखापरीक्षणास वेळोवेळी अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही उपलब्ध झालेल्या नाहीत, त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही.

05) सदरची रस्ता दुरुस्ती ही डांबर व खडीचा वापर करुन केलेला असल्यास वरीलप्रमाणे हिंदुस्थान कोलॅस कंपनीकडून डांबर व स्थानिकरित्या खडी खरेदी करणेवर दुबार खर्च करण्यात आलेला दिसून येतो.यामुळे महानगरपालिका निधीचा गैरवापर करण्यात आलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

06) सदर कामाची मुळ संचिका व आवश्यक अभिलेखे अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.267, दिनांक 15/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रक्कम

03	शासकीय कपाती (विमा, कामगार उपकर, सुरक्षा रक्कम, जीएसटी/व्हॅट इ.)	350000

FDSDNBM7201 (Ref No : 171, Hmm No : 267)

100 वार्ड क्र.31 मध्ये मेहरुण भागात श्री.चोपडे यांचे घरापासून नाल्यापर्यंत व सनं.263 व 229 मध्ये मुख्य रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 14047.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान महानगरपालिका निधीमधून बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या विकास कामांबाबत अर्धसमास पत्र क्र.89, दिनांक 24/11/2023, क्र.109, दिनांक 11/12/2023, क्र.134, दिनांक 03/01/2024, क्र.145, दिनांक 24/01/2024 अन्वये अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित करण्यात आले होते. सदर कामाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तथापी वित्त विभागाकडील मुळ प्रमाणके व त्यासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे यांची तपासणी करण्यात आली. त्याबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	वार्ड क्र.31 मध्ये मेहरुण भागात श्री.चोपडे यांचे घरापासून नाल्यापर्यंत व स.नं.263 व 229 मध्ये मुख्य रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे
योजना / लेखाशिर्ष	मनपा निधी
प्रशासकीय मान्यता	मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक 22/12/2015 र.1701896/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.387, दिनांक 16/12/2015 (उपलब्ध नाही) रु.1701896/-
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.11, दिनांक 16/04/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवाजी गणपत भंगाळे जळगांव (5% जादा दराने)

कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 15/10/2016
दोष निवारण कालावधी	उपलब्ध नाही
करारनामा तपशिल	रु.100/- मुद्रांकावर दिनांक 12/04/2016
मुदतवाढ	उपलब्ध नाही.
काम पूर्ण दिनांक	31/05/2016
प्रदानाचा तपशिल	प्रथम व अंतिम देयक
प्रमाणक क्रमांक / दिनांक	2485, दि.29/12/2016
मोजमाप पुस्तिका क्रमांक / पृष्ठ क्र.	ए080, P-83-87
कामाची किंमत	1697694
-/+ मंजूर निविदा दर	84884
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण	0
एकूण देय रक्कम	1782578
वजाती -	
रॉयल्टी	53518
विमा	17826
कामगार उपकर	17826
सुरक्षा रक्कम	178258
जीएसटी/व्हॅट	35652
आयकर	41000
दंड 1%	0

एकूण वजाती	344080
निव्वळ देय रक्कम	1438498
काम पूर्णत्वाचा दाखला	जोडला आहे
टेस्ट रिपोर्ट	श्रमसाधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिग ॲण्ड टेक्नॉलॉजी, बांभोरी जळगांव पत्र क्र.18-4 दि.09/05/2016 व पत्र क्र.18 दि.28/04/2016

वरील कामाचे मुळ प्रमाणकाच्या तपासणीच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) सदर कामाचे मुळ निविदा संचिका, मुळ अंदाजपत्रक मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणात अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही उपलब्ध झाली नाही त्यामुळे लेखापरीक्षणात योग्य ती पडताळणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

02) गौण खनिज स्वामित्वधन रक्कम परिगणना करतांना जिल्हा दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे गुणक देण्यात आलेले असून त्यानुसार परिगणना करण्यात आलेली नाही, त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.14047/- वसुलपात्र ठरते. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रक्कम वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	परिमाण	गुणक	गौण खनिज परिमाण
2	Supplying 40 mm metal	284.40	1.25	355.50
3	Supplying Soft Murum	94.25	1.30	122.53
	एकूण	**204.4**		**478.03**
	गौण खनिज दर			141.34
	गौण खनिज रक्कम			67565.00
	देयकामध्ये वसुल केलेली रक्कम			53518.00
	वसुलपात्र रक्कम			**14047.00**

03) महानगरपालिकेने रस्ता दुरुस्तीकरिता हिंदुस्थान कोलॅस कंपनीकडून डांबर व स्थानिकरित्या खडी खरेदी केलेल्या

आहेत. तथापी वरीलप्रमाणे रस्ता दुरुस्तीची कामे स्वतंत्ररित्या कंत्राटदारामार्फत करण्यात आलेली आहे. तसेच सदरची रस्ता दुरुस्ती ही डांबर व खडीचा वापर करुन केलेला असल्याने वरीलप्रमाणे हिंदुस्थान कोलॅस कंपनीकडून डांबर व स्थानिकरित्या खडी खरेदी करणेवर दुबार खर्च करण्यात आलेला दिसून येतो.यामुळे महानगरपालिका निधीचा गैरवापर करण्यात आलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

04) सदर कामाची मुळ संचिका व आवश्यक अभिलेखे अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.268, दिनांक 15/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रक्कम
02	गौण खनिज	14047

FDSDNBM7201 (Ref No : 172, Hmm No : 268)

101 प्र.क्र.23 काशिबाई कोल्हे विद्यालय ते कालंका माता मंदीरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 70749.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान महानगरपालिका निधीमधून बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या विकास कामांबाबत अर्धसमास पत्र क्र.89, दिनांक 24/11/2023, क्र.109, दिनांक 11/12/2023, क्र.134, दिनांक 03/01/2024, क्र.145, दिनांक 24/01/2024 अन्वये अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित करण्यात आले होते. सदर कामाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तथापी वित्त विभागाकडील मुळ प्रमाणके व त्यासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे यांची तपासणी करण्यात आली. त्याबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	प्र.क्र.23 काशिबाई कोल्हे विद्यालय ते कालंका माता

	मंदीरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे
योजना / लेखाशिर्ष	मनपा निधी
प्रशासकीय मान्यता	महासभा क्र.37 दिनांक 14/06/2016 आयत्या वेळेचा विषय क्र.06 ठराव क्र.477 अ.क्र.01 रु.67,16,700/-
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.122, दिनांक 01/08/2016 (उपलब्ध नाही) रु.6716700/-
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.93, दिनांक 29/12/2016
कंत्राटदाराचे नांव	श्री.शिवाजी गणपत भंगाळे, जळगांव (0.99% कमी दराने)
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 28/06/2017
दोष निवारण कालावधी	उपलब्ध नाही
करारनामा तपशिल	रु.500/- मुद्रांकावर दिनांक 22/12/2016
मुदतवाढ	उपलब्ध नाही.
काम पूर्ण दिनांक	उपलब्ध नाही
प्रदानाचा तपशिल	प्रथम धावते देयक (मनपा निधी)
प्रमाणक क्रमांक / दिनांक	366, दि.08/05/2017
मोजमाप पुस्तिका क्रमांक / पृष्ठ क्र.	ए194, P-01-06
कामाची किंमत	6111457
-/+ मंजूर निविदा दर	-60504
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण	0
एकूण देय रक्कम	6050953

वजाती -	
रॉयल्टी	194426
विमा	60510
कामगार उपकर	60510
सुरक्षा रक्कम	605095
जीएसटी/व्हॅट	121019
आयकर	139172
अतिरिक्त सुरक्षा रक्कम	907643
एकूण वजाती	2088375
निव्वळ देय रक्कम	3962578
काम पूर्णत्वाचा दाखला	कामाचे अंतिम देयक उपलब्ध नाही.
टेस्ट रिपोर्ट	उपलब्ध नाही

वरील कामाचे मुळ प्रमाणकाच्या तपासणीच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) सदर कामाचे मुळ निविदा संचिका, मुळ अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही उपलब्ध झाली नाही, त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणात योग्य ती पडताळणी करता आली नाही.त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

02) टिपणी दिनांक 18/04/2017 अन्वये रस्ता अनुदान अंतर्गत रु.75 लक्ष निधी प्राप्त झाला होता, तथापी मा.जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सदर रक्कम रस्ता अनुदानाची नसून अल्पसंख्याक निधी अंतर्गत असल्याचे पत्र प्राप्त झाले. त्यामुळे मक्तेदाराने केलेले कामाचे देयक महानगरपालिका फंडातून अदायगी करण्यास हरकत नसावी असा प्रस्ताव सादर केला. त्यास फक्त मुख्य लेखा अधिकारी यांची मंजुरी घेण्यात आली असून मा.आयुक्त यांची मान्यता तसेच स्थायी समितीचा ठराव घेण्यात आलेला दिसून येत नाही.

03) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015)

अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. करारनामाकरिता मुद्रांक खरेदीच्या तपशिलामध्ये मुद्रांक शुल्क रक्कम रु.500/- मुद्रांक विक्री नोंदवही अ.क्र.1175, दिनांक 29/12/2016 अशी नोंद दिसून येते, म्हणजेच खरेदी करतांनाही रु.500/- चे मुद्रांक खरेदी करण्यात आलेली असून रु.500/- चे मुद्रांकावर करारनामा करण्यात आलेला आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.66.50 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.6200/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.500/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.5700/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.5700/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते.

04) गौण खनिज स्वामित्वधन रक्कम परिगणना करतांना जिल्हा दरसूचीमध्ये विवरणपत्र-ड नुसार साहित्य वापराचे गुणक देण्यात आलेले असून त्यानुसार परिगणना करण्यात आलेली नाही, त्यामुळे खालीलप्रमाणे रक्कम रु.50649/- वसुलपात्र ठरते. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रक्कम वसुल करण्यात येऊन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व चलनाचे प्रतीसह सविस्तर अहवाल मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात यावा.

बाब क्र.	तपशिल	परिमाण	दरसुचीनुसार वापराचा फॅक्टर	फॅक्टरनुसार येणारे परिमाण
3	Supply of 40 mm metal	1086.54	1.25	1358.175
4	Supply of Soft Murum	289.05	1.30	375.765
	एकूण परिमाण			1733.94
	गौण खनिज स्वामित्वधन दर			141.34
	गौण खनिज स्वामित्वधन रक्कम			245075
	वसुल केलेली रक्कम			194426
	वसुलपात्र रक्कम			50649

05) देयकामध्ये चाचणी अहवालापोटी खालीलप्रमाणे रकमा प्रदान करण्यात आलेल्या आहेत, देयकासोबत चाचणी अहवालाच्या प्रती जोडण्यात आलेल्या नाही. चाचणी अहवाल प्राप्त करण्यात आले नसल्यास सदर रक्कम वसुलपात्र ठरते. तसेच मुळ संचिकेमध्ये चाचणी अहवाल लावण्यात आले असल्यास चाचणी अहवालामध्ये कंत्राटदाराने अदा केलेली रक्कम नमुद केलेली असल्यास सदर रक्कम फक्त देय ठरते व उर्वरित रक्कम वसुलपात्र ठरते.

बाब क्र.	तपशिल	रक्कम

13	Testing Soft Murum	9000
14	Testing Stone	1600
15	Testing Bitumen	1300
16	Penetration Bitumen	2500
	एकूण वसुलपात्र रक्कम	14400

06) सदर कामाचे पुढील तसेच अंतिम देयके लेखापरीक्षणास मागणी करुनही उपलब्ध झाले नाही त्यामुळे अंतिम देयकाबाबत तसेच काम पूर्णत्वाबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

07) सदर कामाची मुळ संचिका व आवश्यक अभिलेखे अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.269, दिनांक 15/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रक्कम
03	मुद्रांक शुल्क	5700
04	गौण खनिज	50649
05	चाचणी अहवाल फी	14400
	एकूण	70749

FDSDNBM7201 (Ref No : 173, Hmm No : 269)

102 प्र.क्र.20 पेट्रोल पंप ते नेरी नाका चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 67370.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान महानगरपालिका निधीमधून बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या विकास कामांबाबत अर्धसमास पत्र क्र.89, दिनांक 24/11/2023, क्र.109, दिनांक 11/12/2023, क्र.134, दिनांक 03/01/2024, क्र.145, दिनांक 24/01/2024 अन्वये अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित करण्यात आले होते. सदर कामाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तथापी वित्त विभागाकडील मुळ प्रमाणके व त्यासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे यांची तपासणी करण्यात आली. त्याबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	प्र.क्र.20 पेट्रोल पंप ते नेरी नाका चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे	
योजना / लेखाशिर्ष	मनपा निधी	
प्रशासकीय मान्यता	महासभा ठराव क्र.91 दिनांक 13/05/2014 (प्रत उपलब्धस नाही)	
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता, ज.म.न.पा. जळगांव क्र.02, दिनांक 08/05/2014 (उपलब्ध नाही) रु.5396782/-	
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.133, दिनांक 16/03/2016	
कंत्राटदाराचे नांव	श्री.तुषार रमेश महाजन आसोदा (6% जादा दराने)	
कामाचा कालावधी	6 महिने i.e. upto 15/09/2016	
दोष निवारण कालावधी	उपलब्ध नाही	
करारनामा तपशिल	रु.4500/- मुद्रांकावर दिनांक 16/03/2016	
मुदतवाढ	उपलब्ध नाही.	
काम पूर्ण दिनांक	उपलब्ध नाही	
प्रदानाचा तपशिल	प्रथम धावते देयक	द्वितीय धावते देयक

प्रमाणक क्रमांक / दिनांक	40, दि.02/04/2016	282, दि.29/04/2016
मोजमाप पुस्तिका क्रमांक / पृष्ठ क्र.	ए076, P-145-147	ए076, P-155-156
कामाची किंमत	2972036	1574289
-/+ मंजूर निविदा दर	0	0
त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण	0	0
एकूण देय रक्कम	2972036	1574289
वजाती -		
रॉयल्टी	0	0
विमा	29720	15743
कामगार उपकर	29720	15743
सुरक्षा रक्कम	297204	157429
जीएसटी/व्हॅट	59441	31486
आयकर	68357	36209
अतिरिक्त सुरक्षा रक्कम	0	0
एकूण वजाती	484442	256610
निव्वळ देय रक्कम	2487594	1317679
काम पूर्णत्वाचा दाखला	कामाचे अंतिम देयक उपलब्ध नाही.	
चाचणी अहवाल	उपलब्ध नाही	

वरील कामाचे मुळ प्रमाणकाच्या तपासणीच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) सदर कामाचे मुळ निविदा संचिका, मुळ अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही उपलब्ध झाली नाही, त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणात योग्य ती पडताळणी करता आली नाही.

त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

02) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. करारनामाकरिता मुद्रांक खरेदीच्या तपशिलामध्ये मुद्रांक शुल्क रक्कम रु.4500/- मुद्रांक विक्री नोंदवही अ.क्र.23824/1, दिनांक 16/03/2016 अशी नोंद दिसून येते, म्हणजेच खरेदी करतांनाही रु.4500/- चे मुद्रांक खरेदी करण्यात आलेली असून रु.4500/- चे मुद्रांकावर करारनामा करण्यात आलेला आहे. सदर कामाची मंजूर दरानुसार किंमत रु.57.21 लक्ष अशी आहे, त्यानुसार रु.5300/- किंमतीचे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.800/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे शासनाचा रु.800/- चे मुद्रांक वापरापोटीचा कमी भरणा झालेला आहे, सदर रु.800/- संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते.

03) टिपणी दिनांक -- (नमुद नाही) नुसार दि.30/3/2016 रोजी सदर कामाचा मुळ ठराव व प्रशा.मा. मनपा फंडातून देण्यात आली व निविदा मंजूर केली तथापी स्थायी समिती ठराव क्र.387 दि.15/1/2016 अन्वये सदर काम रस्ता अनुदानातून घेण्याचे ठरले. तेंव्हा Third Party audit चे अधीन राहून बिल मंजुर करणेपूर्वी प्रशासकीय मान्यतेस्तव सादर असे उपायुक्त यांनी शेरा नमुद केला आहे, त्यावर मा.आयुक्त यांनी असे नियमानुसार करता येईल कां, नियमानुसार मु.ले.प. यांनी स्पष्ट अभिप्राय द्यावेत अशा सूचना दिल्यात. त्यावर मा.मुख्य लेखापरीक्षण यांचे अभिप्राय न घेता उपायुक्त यांनी दिनांक 31/3/2016 रोजी शासनाकडून प्राप्त झालेले रस्ता अनुदान आजपावेतो सामान्य निधीमध्येच जमा करण्यात येत असतो तसेच रस्ता अनुदानाच्या रकमेपेक्षाही जास्तीचा खर्च अशा कामावंर होत असतो. आजपर्यंत रस्ता अनुदानातून खर्च केलल्या रकमेला कोणत्याही सभेची किंवा स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही तसेच याबाबत कोणतेही लेखा आक्षेप लेखापरीक्षणामध्ये घेण्यात आलेले नाहीत. दि.31/3/2016 पूर्वी सदरची रक्कम खर्च केली तर शासनास उपयोगिता प्रमाणपत्र पाठविता येईल, कारण याशिवाय पुढील अनुदान मनपास प्राप्त होणार नाही. तरी रस्ता अनुदानातून खर्च करण्यास हरकत नाही असे नमुद केले आहे. त्यावर मा.आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय रकमेला सदर प्रस्ताव मान्य असा शेरा नमुद करुन मान्यता प्रदान केली. त्यानुसार 6% जादा निविदा दर कमी करण्यात येऊन अंदाजपत्रकीय दरानुसार देयक अदा करण्यात आले. त्याचप्रमाणे दुसरे धावते देयकसुद्धा अंदाजपत्रकीय दरानुसार अदा करण्यात आलेले आहे. उपायुक्त त्यांचा शेरा दिनांक 31/03/2016 अन्वये आजपर्यंत रस्ता अनुदानातून खर्च केलेल्या रकमेला कोणत्याही सभेची किंवा स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही तसेच याबाबत कोणतेही लेखा आक्षेप लेखापरीक्षणामध्ये घेण्यात आलेले नाहीत, तसेच 31 मार्च 2016 पूर्वी सदरची रक्कम खर्च केली तर शासनास उपयोगिता प्रमाणपत्र पाठविता येईल याशिवाय पुढील अनुदान मनपास प्राप्त होणार नाही, असे नमुद करणे हे प्रशासकीय दृष्ट्या योग्य व नियमांनुसार नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

04) सदरचे काम हे रस्ता अनुदानामधून प्रस्तावित करतांना त्यास प्रशासकीय मान्यता ही मा.जिल्हाधिकारी जळगांव यांची प्राप्त करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे राज्य शासनाच्या

निधीमधून कामांवर खर्च करतांना नियमांचे पालन करण्यात आले नसल्याचे निदर्शनास येते.

05) स्थायी समिती ठराव क्र.387 दिनांक 15/01/2016 अन्वये ठराव पारित करतांना चित्रा चौक ते बेंडाळे चौकापर्यंतच्या रस्ता डांबरीकरणाचे रक्कम रु.4477817/- व सदरचे काम जळगांव पेट्रोल पंप ते नेरीनाका पर्यंतचा रस्ता डांबरीकरणे करणेकामी अंदाजित रक्कम रु.5775557/- असे एकूण रु.10252374/- मात्र रकमेचे कामे रस्ते अनुदान अंतर्गत शिल्लक रकमेतून देयक अदायगी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे असा ठराव पारित करण्यात आला. तथापी सदर कामाची मुळ संचिका उपलब्ध झाली नसल्याने याबाबत पडताळणी करता येत नाही, लेखाविभागाकडील मुळ प्रमाणकांसोबत जोडण्यात आलेल्या कागदपत्रांमधील कंत्राटदाराचे मंजुर दरानुसार शेड्युल-बी नुसार कामाची मुळ किंमत अनुक्रमे रु.4601714 + 5396782 = 9998496/- इतकी रक्कम येते, तथापी ठराव करतांना रु.10252374/- खर्चाचा मंजुर करण्यात आल्यामुळे रु.253878/- इतक्या जादा रकमेचा करण्यात आलेला दिसून येतो, तसेच ठरावामध्ये कामांच्या रकमा नमूद करतांना चुकीच्या रकमा नमुद करण्यात आलेल्या असल्याचे निदर्शनास येते.

06) स्थायी समिती सभा क्र.23 दिनांक 05/09/2014 आयत्या वेळेचा विषय क्र.2 ठराव क्र.138 अन्वये निविदा 6% जादा दरानुसार श्री.तु.र.महाजन यांची मंजुर करण्यात आली. त्यानंतर स्थायी समिती सभा क्र.58 दिनांक 15/01/2016 आयत्या वेळेचा विषय क्र.03 ठराव क्र.387 अन्वये सदरचे काम मनपा फंडातील असल्याने मक्तेदार काम करणेस प्रतिसाद देत नसल्याने तसेच सदरचे रस्ते हे शहाराच्या मध्यवर्ती भागातील असून बाजारपेठ, व्यापारी संकुले व इतर व्यावसायिक प्रतिष्ठाने असल्याने सदरच्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर रहदारी असते, सदरचे रस्त्यांचे डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी सदरचे काम रस्ता अनुदान अंतर्गत शिल्लक रकमेतून देयक अदायगी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे अशा आशयाने मान्यता प्रदान करण्यात आली. यावरुन कंत्राटदाराचे हित जोपासले असल्याचे निदर्शनास येते.

07) निविदा प्रक्रीया राबविण्यात आल्यानंतर व वाटाघाटीनंतर दर मंजुरीबाबत स्थायी समितीचा ठराव दिनांक 05/09/2014 रोजी मंजुर करण्यात आला. तथापी त्यानंतर कंत्राटदार यांनी 16/02/2016 अन्वये करारनामा करुन दिला व त्यांना दिनांक 16/03/2016 रोजी कामाचे आदेश देण्यात आले. म्हणजेच दर मंजुरीनंतर जवळ जवळ 18 महिन्यानंतर कंत्राटदाराने करारनामा करुन दिलेला आहे. दरम्यानच्या काळात प्रस्तावित रस्त्याची अवस्था जास्तच खराब झालेली असल्याने खालीलप्रमाणे जादा काम करावे लागलेले दिसून येते. त्यामुळे खालीलप्रमाणे जादा खर्च झालेला दिसून येतो. सदर जादा परिमाणाबाबत सुधारित तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नसल्याने जादा खर्च रु.66570/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

बाब क्र.	बाब तपशिल	प्रस्तावित परिमाण	देयकानुसार परिमाण	जादा झालेले परिमाण	दर	जादा खर्च झालेली रक्कम

1	Excavation fot pot holes.	9.28	32.20	22.92	63.00	1443.96
2	Providing laying 50 m. thk compacted BBM	335.85	644.17	308.32	211.23	65126.43
	एकूण			**331.24**		**66570.39**

08) सदर कामाचे पुढील तसेच अंतिम देयके लेखापरीक्षणास मागणी करुनही उपलब्ध झाले नाही त्यामुळे अंतिम देयकाबाबत तसेच काम पूर्णत्वाबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

09) सदर कामाची मुळ संचिका व आवश्यक अभिलेखे अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. लेखापरीक्षणात अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अत्यंत गंभीर असून जबाबदार अधिकारी/कर्मचारी हे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार दंडाधिकाऱ्यांकडे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.25000/- पर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होतील अशा आशयाच्या सूचना लेखी व अनेकवेळा तोंडी देण्यात येऊनही सदर बाबीकडे विभागामार्फत दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.270, दिनांक 15/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रक्कम
02	मुद्रांक शुल्क	800
07	जादा कामाची वसुली	66570
	एकूण	67370

FDSDNBM7201 (Ref No : 174, Hmm No : 270)

103 महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाअंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या सुधारणात्मक कामे करणे

योजना : महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान प्रकल्प विभागाकडील उपरोक्त

कामाची संचिका तपासणी करण्यात आली. योजनेचा तपशिल व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

योजना	महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान
प्रशासकीय मान्यता	कार्यासन अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय शासन निर्णय क्र.सुनिअ/2012/प्र.क्र.154/पापु-22, दिनांक 15/03/2012 (प्रत उपलब्ध नाही) रक्कम रु.45268000/-
तांत्रिक मान्यता	कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व उर्जा प्राधिकरण, नाशिक यांचे पत्र क्र.514 दिनांक 18/05/2012 रक्कम रु.45268000/-
दरसूची वर्ष	MSNA CSR 2010-2011
कामाची अंदाजित किंमत	Work - 43111501 5% TSP - 2155575 Total 45267076 Say 45268000
निधी वितरण तपशिल	म.जी.प्रा. नागरी व ग्रामीण योजना विभाग जळगांव यांचे पत्र क्र.1050 दि.27/03/2015 अन्वये (खात्यात जमा दिनांक 29/03/2014) रु.5800000/- पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सुनिअ 2014/प्र.क्र.36/पापु-22, दिनांक 21/11/2014 रु.22720000 लक्ष (खात्यामध्ये प्रत्यक्ष जमा दिनांक 17/12/2014)
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.1994 दिनांक 21/11/2012
कंत्राटदाराचे नांव	मे.ए.डी.सी.सी. इन्फोकॅड प्रा.लि. नागपूर (6% जादा दराने)
कामाचा कालावधी	18 महिने (i.e.upto 20/05/2014)
कामाची स्थिती	काम पूर्ण दिनांक 30/10/2017 (वेळोवेळी मुदतवाढ मंजूर करण्यात आलेल्या आहेत)
देयकांचा तपशिल	

तपशिल	धावते देयक	द्वितीय धावते देयक	तृतीय धावते देयक	चौथे धावते देयक	पाचवे धावते देयक	सहावे व अंतिम देयक	एकूण
प्रमाणक क्रमांक व दिनांक	02, दि.15/07/2014	04, दि.03/01/2015	01, दि.24/04/2015	03, दि.12/10/2015	02, दि.27/10/2016	01, दि.15/01/2017	
मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक	ए158, पृ.क्र.16 ते 22	ए158, पृ.क्र.23 ते 60	ए158, पृ.क्र.69 ते 77	ए158, पृ.क्र.85 ते 93	ए158, पृ.क्र.94 ते 106	ए158, पृ.क्र.107 ते 115	
कामाची एकूण किंमत	7583158	8765357	5023440	4038573	2340490	1088676	28839694
अधिक 6% निविदा दर	454989	525921	301406	242315	140429	65321	1730381
जादा बाबी	5415074	3084961	465585	0	354960	0	9320580
देय रक्कम	13453221	12376239	5790431	4280888	2835879	1153997	39890655
वजाती -							
1% विमा	134533	0	0	224476	28359	11540	398908
1% कामगार उपकर	0	123763	57905	42808	28359	11540	264375
10% सुरक्षा रक्कम	269065	247525	115809	85618	56718	23080	797815
2% जीएसटी/व्हॅट	269065	247525	115809	85618	56718	23080	797815

2.3% आयकर	309424	284654	133180	98461	65225	26542	917486
गौण खनिज स्वामित्वधन	0	0	0	0	0	0	0
दंड	0	0	0	0	0	0	0
एकूण वजाती	982087	903467	422703	536981	235379	95782	3176399
निव्वळ देय रक्कम	12471134	11472772	5367728	3743907	2600500	1058215	36714256

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

01) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ दिनांक 17/06/2010 मधील अ.क्र.3(1) अन्वये कामाचे मुल्यावर 1% कामगार उपकर वसुल करणे, अ.क्र.3(3) नुसार नोंदवही ठेवणे व मासिक विवरण पुढील महिन्याच्या 10 तारखेपूर्वी अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांचेकडे पाठवणे आवश्यक आहे जेणेकरुन त्यांना जमा झालेल्या रकमेचा ताळमेळ घेणे शक्य होईल, तथापी वरीलप्रमाणे तपासणी करण्यात आलेल्या देयकांपैकी प्रथम धावते देयकामधून कामगार उपकराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर रक्कम रु.134532/- वसुलपात्र ठरते. तरी सदर रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन चलनाने शासन खाती भरणा करण्यात यावी व वरील शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

02) एडीसीसी नागपूर यांचे चौथे धावते देयकाची स्थूल रक्कम रु.4280888/- अशी होती, त्यानुसार कार्यकारी अभियंता, मजीप्रा. नाशिक यांना करारनामा अटीनुसार 3% प्रकल्प व्यवस्थापन शुल्क रु.128427/- इतके अदा करणे आवश्यक होते. तथापी प्रमाणक क्र.2 दिनांक 11/08/2015 अन्वये 4थे धावते देयकाची रक्कम रु.6774008/- अशी दर्शविण्यात येऊन त्यावर 3% प्रमाणे रु.203220/- अदा करण्यात आलेली आहे, त्यामुळे रु.74793/- जादा प्रदान झालेले आहे. याबाबत प्रकल्प विभागाकडील टिपणी दिनांक 30/07/2015 अन्वये रु.6774008/- अशी दर्शविण्यात येऊन त्यावर 3% प्रमाणे रु.203220/- प्रस्तावित करण्यात आलेली असून त्यास मा.उपायुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. सदर जादा रक्कम वसुल करणे किंवा समायोजन करणे आवश्यक आहे.

03) एडीसीसी नागपूर यांचे पाचवे धावते देयकाची स्थूल रक्कम रु.2835879/- अशी होती, त्यानुसार कार्यकारी अभियंता, मजीप्रा. नाशिक यांना करारनामा अटीनुसार 3% प्रकल्प व्यवस्थापन शुल्क रु.85076/- इतके अदा करणे आवश्यक होते. तथापी प्रमाणक क्र.1 दिनांक 08/08/2016 अन्वये पाचवे धावते देयकाची रक्कम रु.3705542/- अशी

दर्शविण्यात येऊन त्यावर 3% प्रमाणे रु.111167/- अदा करण्यात आलेली आहे, त्यामुळे रु.26091/- जादा प्रदान झालेले आहे. याबाबत प्रकल्प विभागाकडील टिपणी दिनांक 31/05/2016 अन्वये रु.3705542/- अशी दर्शविण्यात येऊन त्यावर 3% प्रमाणे रु.111167/- प्रस्तावित करण्यात आलेली असून त्यास शहर अभियंता यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. सदर रक्कम प्राप्त झाल्याबाबत कार्यकारी अभियंता मजीप्रा जळगांव यांचे पत्र क्र.3159 दिनांक 26/08/2016 अन्वये धनादेश मिळाल्याची पोच पत्रामध्ये देयकाची रक्कम रु.2835879/- अशी नमूद केलेली दिसून येते. त्यापूर्वी म.जी.प्रा. यांचे पत्र क्र.1316 दिनांक 31/3/2016 अन्वये पाचवे देयकाची रक्कम रु.3705542/- किंमतीचे देयकाची तपासणी कामी सेवा शुल्क रु.111175/- रक्कम धनाकर्ष ह्या विभागास पाठविण्यात यावा असे कळविण्यात आले, तथापी वरीलप्रमाणे टिपणी सादर करतांना व धनादेश पाठवितांना योग्य त्या दुरुस्त्या करुन रक्कम अदा करण्यात आलेली दिसून येत नाही. सदर जादा रक्कम वसुल करणे किंवा समायोजन करणे आवश्यक आहे.

04) एडीसीसी नागपूर यांचे सहावे व अंतिम देयकाच्या रकमेवर 3% प्रमाणे प्रकल्प व्यवस्थापन शुल्काची रक्कम तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेसमवेत करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार प्रकल्पाचे सल्लागार शुल्क अदा करावयाचे टप्पे नमुद करण्यात आलेले आहे त्यानुसार करारनाम्याची मुदत संपण्याच्या वेळी उर्वरित सर्व रक्कम अदा करावयाची बाकी दिसून येते, तरी सदर रकमा अदा करतांना वरीलप्रमाणे जादा प्रदान झालेल्या रकमा समायोजित करण्यात याव्यात.

05) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.नापापु 2008/प्र.क्र.1/पापु-22, दिनांक 22/10/2008 नुसार वित्तीय आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला असून त्यानुसार 70% शासन अनुदान, 20% कर्ज व 10% निधी हा नागरी संस्थानी उभारावयाचा आहे. त्यानुसार 20% कर्ज उभारणे महानगरपालिकेस आर्थिक परिस्थिती पाहता शक्य होणार नसल्याने व 13व्या वित्त आयोगाचे मार्गदर्शक तत्वांनुसार सदरचे काम अनुज्ञेय ठरत असल्याने रु.112 लक्ष 13व्या वित्त आयोग निधीमधून योजनेच्या खात्यात वर्ग करण्याकरिता महासभा क्र.09 दिनांक 13/05/2014 आयत्या वेळेचा विषय क्र.1 ठराव क्र.89 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानुसार योजनेच्या खात्यामध्ये वेळोवेळी मनपा हिस्सा रु.2500000/- व 13व्या वित्त आयोगामधून रु.11180500/- रक्कम जमा करण्यात आली व शासन अनुदान रु.28520000/- इतकी रक्कम जमा झाली. योजनेच्या देयकांची तपासणी करण्यात आली असता योजनेवर स्थूल रक्कम व वाढीव बाबींची रक्कम अशी एकूण रक्कम रु.38160274/- व 6% जादा दरानुसार रु.1730381/- अशी एकूण रु.39890655/- इतका खर्च करण्यात आला. जादा दराची निविदा स्विकृत केल्यामुळे अशा जादा दराचा खर्च हा मनपा निधीमधून खर्च करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कामाच्या स्थुल रकमेच्या 70% शासन हिस्सा म्हणजे रु.38160274/- च्या 70% प्रमाणे रु.26712192/- इतकी रक्कम वित्तीय आकृतीबंधानुसार शासन अनुदानामधून खर्च करणे आवश्यक आहे. शासन अनुदान रु.28520000/- मधून वरीलप्रमाणे खर्च रु.26712192/- वजा जाता रु.1807808/- शासन अनुदानाची रक्कम शिल्लक राहते. त्यामधून वरीलप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे देणे अदा केल्यानंतर उर्वरित रक्कम शासन खाती चलनाने तात्काळ जमा करण्यात यावी. तसेच सदर योजनेच्या खात्यामध्ये बँकेमार्फत दिनांक 30/11/2023 पावेतो एकूण रु.1249713/- इतके व्याज जमा करण्यात आलेले आहे. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-

3416/ प्र.क्र.40/नवि-04, दिनांक 27/05/2016 मधील अ.क्र.4 मधील तरतुदीनुसार योजनेसाठी मंजूर केलेल्या निधीवर प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पूर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येईल, मात्र कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर झालेला निधी व त्यावरील व्याज अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही, अशी तरतुद आहे, तरी सदरची व नंतरच्या कालावधीमध्ये जमा होणारी व्याजाची रक्कम शासन खाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने जमा करण्यात यावी.

06) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग परिपत्रक क्र.सुनिअ 2018/प्र.क्र.33/पापु-22 दिनांक 06/03/2018 अन्वये महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत भांडवली व सुधारणा कामांच्या पूर्ण/अपूर्ण स्थितीबाबत व योजनेच्या फलनिष्पत्तीबाबत विहित नमुन्यांमध्ये माहिती सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते. तथापी त्यानुसार माहिती सादर केली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणास अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.247 दिनांक 29/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 187, Hmm No : 247)

104 महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची चुकीची वेतननिश्चिती केली असलेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत एकूण अधिकारी व कर्मचारी पैकी 165 अधिकारी व कर्मचारी यांच्या मुळ सेवापुस्तकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी काही अधिकारी व कर्मचारी यांच्या मुळसेवा पुस्तकात वेतनवाढ नोंदी बाबत काही आक्षेप आहेत. त्यांची नावे खालील प्रमाणे

अ क्र	अधिकारी / कर्मचा-यांचे नाव, पदनाम. विभागाचे नाव	दिनांक	मुळ सेवापुस्तकातील नोंदी नुसार अदा केलेले वेतन	अदा करणे आवश्यक असलेले वेतन
1	श्री यशवंत भिला चौधरी, लिपिक, सामान्य प्रशासन विभाग	01/07/2008	7610 + 1900	7610 + 1900

		01/07/2009	7890 + 1900	7900 + 1900
		01/07/2010	8190 + 1900	8200 + 1900
		01/07/2011	8500+ 1900	8510+ 1900
		01/07/2012	8820+ 1900	8830+ 1900
		01/07/2013	9150+ 1900	9160+ 1900
		01/07/2014	9490+ 1900	9500+ 1900
		01/07/2015	9840+ 1900	9850+ 1900
		01/07/2016	10200+ 1900	10210+ 1900
		01/07/2017	10570+ 1900	10580+ 1900
2	श्रीमती लक्षमीबाई अंबादास मोरे, मजुर, पाणीपुरवठा विभाग	01/07/2014	5580 + 1300	5580 + 1300
		01/07/2015	5780 + 1300	5790 + 1300
		01/07/2016	6000 + 1300	6010 + 1300
		01/07/2017	6220 + 1300	6230 + 1300
3	श्री प्रदिप वाल्मीक निबांळकर, मजुर, पाणीपुरवठा विभाग	01/07/2014	5580 + 1300	5580 + 1300
		01/07/2015	5780 + 1300	5790 + 1300

		01/07/2016	6000 + 1300	6010 + 1300
		01/07/2017	6220 + 1300	6230 + 1300
4	श्री दिपक बन्सी भालेराव, गटारकामगार, आरोग्य विभाग	01/07/2010	6750 + 1600	6750 + 1600
		01/07/2011	7260+ 1600	7000 + 1600
		01/07/2012	7440+ 1600	7260+ 1600
		01/07/2013	7710+ 1600	7440+ 1600
		01/07/2014	7990+ 1600	7720+ 1600
		01/07/2015	8280+ 1600	8000+ 1600
		01/07/2016	8580+ 1600	8290+ 1600
		01/07/2017	8890+ 1600	8590+ 1600
5	श्री दिलीप रतन जावळे, सफाईकामगार, आरोग्य विभाग	01/07/2010	6750 + 1600	6750 + 1600
		01/07/2011	7260+ 1600	7000 + 1600
		01/07/2012	7440+ 1600	7260+ 1600
		01/07/2013	7710+ 1600	7440+ 1600
		01/07/2014	7990+ 1600	7720+ 1600

		01/07/2015	8280+ 1600	8000+ 1600
		01/07/2016	8580+ 1600	8290+ 1600
		01/07/2017	8890+ 1600	8590+ 1600
6	श्री शालीक सुकलाल अहिरे, हेल्पर / मजुर, पाणीपुरवठा विभाग	01/01/2006	5520+ 1300	5510+ 1300
	6 वे वेतन निश्चिती करतांना 1/1/2006 रोजी	01/07/2006	5830+ 1300	5720+ 1300
	2960 * 1.86 = 5505.6 i.e. 5510/-	01/07/2007	6050+ 1300	5930+ 1300
		01/07/2008	6270+ 1300	6150+ 1300
		01/07/2009	6500+ 1300	6380+ 1300
		01/07/2010	6740+ 1300	6610+ 1300
		01/07/2011	6990+ 1300	6850+ 1300
		01/07/2012	7240+ 1300	7100+ 1300
		01/07/2013	7440+ 1300	7360+ 1300
		01/07/2014	7710+ 1300	7440+ 1300
		01/07/2015	7980+ 1300	7710+ 1300
		01/07/2016	8260+ 1300	7980+ 1300

		01/07/2017	8550+ 1300	8260+ 1300
7	श्रीमती ज्योती विलास कापरे, व्हॉलमन / चौकीदार, पाणीपुरवठा विभाग	01/07/2013	7080+ 1300	7080+ 1300
		01/07/2014	7340+ 1300	7340+ 1300
		01/07/2015	7600+ 1300	7440+ 1300
		01/07/2016	7870+ 1300	7710+ 1300
		01/07/2017	8150+ 1300	7980+ 1300
	7 वे वेतन आयोग वेतन निश्चिती			
	01/01/2016 रोजीचे वेतन 7440+ 1300 * 2.57 =22462	01/01/2016	23500	22800
	i.e. Rs.22800/-	01/07/2016	24200	23500
		01/07/2017	24900	24200
8	श्रीमती लक्ष्मी गबा हातागडे, सफाईकामगार, पाणीपुरवठा विभाग	01/07/2016	5380+ 1300	5380+ 1300
		01/07/2017	5590+ 1300	5580+ 1300
9	श्रीमती प्रतिभा युवराज अहिरे, सफाईकामगार, पाणीपुरवठा विभाग	01/07/2010	5960 + 1300	5960+ 1300
		01/07/2011	6190+ 1300	6180+ 1300

		01/07/2012	6420+ 1300	6410+ 1300
		01/07/2013	6660+ 1300	6650+ 1300
		01/07/2014	6900+ 1300	6890+ 1300
		01/07/2015	7150+ 1300	7140+ 1300
		01/07/2016	7410+ 1300	7400+ 1300
		01/07/2017	7680+ 1300	7440+ 1300
10	सौ नथाबाई संतोष सावळे, सफाईकामगार, पाणीपुरवठा विभाग	01/07/2016	7710+ 1300	7710+ 1300
		01/07/2017	7990 + 1300	7980 + 1300
11	श्रीमती सिताबाई यशवंत आंबोरे, सफाईकामगार, पाणीपुरवठा विभाग	01/07/2016	8850+ 1300	8850+ 1300
		01/07/2017	9140 + 1300	9160 + 1300
12	श्री शंकर धुडकू शिरसाठ, सफाईकामगार, पाणीपुरवठा विभाग	01/07/2016	5380+ 1300	5380+ 1300
		01/07/2017	5590 + 1300	5580 + 1300
13	श्रीमती बेबीबाई मधुकर लोंढे, सफाईकामगार, पाणीपुरवठा विभाग	01/07/2016	7710+ 1300	7710+ 1300
		01/07/2017	7990 + 1300	7980+ 1300

14	श्री शेख फहिम अहमद शेख मुखतार, कुली/मजुर, जकात विभाग	01/07/2015	5500+ 1300	5580+ 1300
		01/07/2016	5710+ 1300	5790+ 1300
		01/07/2017	5920 + 1300	6010 + 1300
15	श्री प्रसाद प्रभाकर पुराणीक, बिल्डींग इनस्पेक्टर, आरोग्य विभाग	01/07/2015	14540 + 4200	14540 + 4200
		01/07/2016	15140+ 4200	15110+ 4200
		01/07/2017	15720+ 4200	15690+ 4200
16	श्री समिर शशिकांत बोरोले, सर्व्हेअर, आरोग्य विभाग	27/02/2008	7510+ 2400	7510+ 2400
		01/07/2009	7810+ 2400	7810+ 2400
		01/07/2010	7810+ 2400	8120+ 2400
		01/07/2011	नोंद नाही	8440+ 2400
		01/07/2012	नोंद नाही	8770+ 2400
		01/07/2013	8770+ 2400	9110+ 2400
		01/07/2014	9110+ 2400	9460+ 2400
		01/07/2015	9460+ 2400	9820+ 2400
		01/07/2016	9820+ 2400	10190+ 2400

		01/07/2017	10190+ 2400	10570+ 2400
	7 वे वेतन आयोग वेतन निश्चिती			
	01/01/2016 रोजीचे वेतन 9820+ 2400 * 2.57 =31405	01/01/2016	30500	32300
	i.e. Rs.32300/-	01/07/2016	31400	33300
		01/07/2017	32300	34300
17	श्री विजय पांडूरंग मराठे, सर्व्हेअर, आरोग्य विभाग	27/02/2008	7510+ 2400	7510+ 2400
		01/07/2009	7810+ 2400	7810+ 2400
		01/07/2010	8120+ 2400	8120+ 2400
		01/07/2011	8120+ 2400	8440+ 2400
		01/07/2012	8440+ 2400	8770+ 2400
		01/07/2013	8770+ 2400	9110+ 2400
		01/07/2014	9110+ 2400	9460+ 2400
		01/07/2015	9460+ 2400	9820+ 2400
		01/07/2016	9820+ 2400	10190+ 2400
		01/07/2017	10190+ 2400	10570+ 2400
	7 वे वेतन आयोग वेतन निश्चिती			

	01/01/2016 रोजीचे वेतन 9820+ 2400 * 2.57 =31405	01/01/2016	30500	32300
	i.e. Rs.32300/-	01/07/2016	31400	33300
		01/07/2017	32300	34300
18	श्री उल्हास रामदास इंगळे, आरोग्य निरीक्षक, आरोग्य विभाग	01/07/2011	10970+ 2400	10970+ 2400
		01/07/2012	11370+ 2400	11380+ 2400
		01/07/2013	11790+ 2400	11800+ 2400
		01/07/2014	12220+ 2400	12230+ 2400
		01/07/2015	12660+ 2400	12670+ 2400
		01/07/2016	13120+ 2400	13130+ 2400
		01/07/2017	13590+ 2400	13600+ 2400
19	श्री उदय मधुकर पाटील, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग	01/07/2012	19660+5400	19660+5400
		01/07/2013	21200+5400	20420+5400
		01/07/2014	22000+5400	21200+5400
		01/07/2015	22860+5400	22000+5400
		01/07/2016	23680+5400	22830+5400

		01/07/2017	24560+5400	23680+5400
20	श्री संजय शामराव पाटील, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग	01/07/2011	16650+5400	16650+5400
		01/07/2012	17280+5400	17320+5400
		01/07/2013	17930+5400	18010+5400
		01/07/2014	18600+5400	18720+5400
		01/07/2015	19290+5400	19450+5400
		01/07/2016	20000+5400	20200+5400
		01/07/2017	20740+5400	20970+5400

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) वरील नमुद एकूण 20 कर्मचारी यांना 6 वे वेतन आयोगाप्रमाणे कर्मचारी यांना वार्षिक वेतनवाढ आकारतांना मुळवेतन + ग्रेड पे यास 3 टक्के यांनी गुणुन येणारी वेतनवाढ देतांना मुळवेतनाची आकारणी ही कमी अथवा जास्त आकारण्यात आलेली आहे त्यामुळे संबधीत कर्मचारी यास कमी वेतन अथवा जास्त वेतन अदा करण्यात आलेले आहे तरी कर्मचारीस वेतन कमी अदा केल्याने कर्मचारी यांचे आर्थिक नुकसान तसेच कर्मचारीस जास्त वेतन अदा केल्याने महानगरपालिका यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येऊन जादा वेतन अदा होत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून वसुलीची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व वसुल झालेल्या रकमा महानगरपालिकेच्या योग्य निधी खात्यामध्ये जमा करण्यात याव्यात.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 47 दिनांक 01/09/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

105 शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे वेतनातुन वसुल केलेल्या अनुज्ञप्ती व सेवाशुल्क कमी वसुल केले बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 या दोन आर्थिक वर्षाचे आस्थापना विभागाचे लेखापरीक्षण केले असून शासकिय निवासस्थानी वास्तव्यास असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची माहिती मागविण्यात आली होती . त्यानुसार सन 2016-17 व 2017-18 मधील निवडक महिन्यातील संबधीत अधिकारी / कर्मचारी यांच्या पगारदेयक यांचे अवलोकन केले असता खालील अधिकारी / कर्मचारी शासकिय निवास्थानात वास्तव्यास असल्याने त्यांचे वेतनातून कपात करण्यात आलेली अनुज्ञप्ती, सेवाशुल्काची रक्कम व शासन निर्णयानुसार कपात करावयाची रक्कम खालील प्रमाणे आहे.

अ क्र	कर्मचा-याचे नाव	पदनाम	ग्रेड वेतन	कपात केलेली		शा.नि. नुसार आवश्यक कपात		वसुल पात्र मासिक रक्कम
				मासिक अनुज्ञप्ती शुल्क	मासिक सेवा शुल्क	दि. 19/4/11 शासन निर्णयानुसार मासिक अनुज्ञप्ती शुल्क	दि. 27/1/16 शासन निर्णयानुसार मासिक सेवा शुल्क	
1	श्री.संजय जयराम कापडणीस	आयुक्त	7600	820	0	1400	465	1045
2	श्री. किशोर बोर्डे	आयुक्त	7600	820	0	1400	465	1045
3	श्री जिवन नामदेवराव सोनवणे	आयुक्त	7600	820	0	1400	465	1045
4	श्री. प्रदीप गणपतराव जगताप	उपायुक्त	5400	580	0	580	245	245
5	श्री राजेद बापु फातले	उपायुक्त	5400	580	0	580	245	245
6	श्री चंद्रकांत शिवाजीराव	उपायुक्त	5400	580	0	580	245	245

	खोसे							

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक घभाव-2010/प्र.क्र.4/सेवा-5 दिनांक 19.04.2011 नुसार आणि मुंबई नागरी सेवा नियम, 1959 खंड 1 मधील नियम 849(बी) च्या तरतुदीनुसार कर्तव्यस्थान दिलेल्या शासकिय निवासस्थानासाठी शासकीय कर्मचा-यास त्यांच्या वित्तलब्धीच्या 10 टक्के किंवा निवासस्थानाचे प्रमाणात भाडे हयापैकी जे कमी असेल तेवढे अनुज्ञप्ती शुल्क दयावे लागते असे नमूद आहे. महानगरपालिकेने वरील तक्त्यामध्ये नमूद अधिकारी यांचेकडून अनुज्ञप्ती शुल्क शासन निर्णयानुसार कपात केलेले नसल्याचे आढळून आलेले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.15 दिनांक 24/04/2023 अन्वये अधिकाऱ्यांना निवासस्थान वाटपाबाबतचा तपशिल मागविण्यात आला होता, तथापी अशा प्रकारचा तपशिल लेखापरीक्षणात उपलब्ध झाला नाही. त्यामुळे एकूण वसुलीची रक्कम परिगणीत करता येत नाही. तथापी वरीलप्रमाणे दर्शविण्यात आलेली रक्कम ही एक महिन्यांकरिता असून संबंधित अधिकारी प्रत्यक्षात जेवढे महिने निवासस्थानांमध्ये वास्तव्यात होते तेवढ्या महिन्यांची परिगणना करण्यात येऊन वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

02) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक- आरएलएफ 2009/प्र.क्र.77/ मिव्य-2 दिनांक 27.01.2016 नुसार दिनांक 01.04.2015 पासून सेवाशुल्काचे दर सुधारित करण्यात आलेले असून सदरील सुधारित दराने शासकिय निवासस्थानामध्ये वास्तव्यास असलेल्या आणि वरील तक्त्यामध्ये नमूद अधिका-यांचे वेतनातून सेवाशुल्काची कपात करण्यात आलेली नसल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे शासन नियमांचे पालन करण्यात आलेले नाही परिणामी महानगरपालिकेचेही नुकसान झालेले आहे.

03) सन 2016-2017 व 2017-2018 या कालावधीत महानगरपालीका जळगाव यांचे शासकिय निवासस्थानी वास्तव्यास असलेल्या अधिका-यांकडून व कर्मचारी यांच्याकडून अनुज्ञप्ती शुल्क आणि सेवा शुल्काची रक्कम शासननिर्णयानुसार वसुल करण्यात येवून अनुपालन सादर करावे.

04) वाघुर जलशुध्दिकरण केंद्र, व इतर जलशुध्दिकरण केंद्र, मनपा दवाखाने, व त्याव्यतिरिक्त इतर ठिकाणी शासकिय निवासस्थानी शासकिय अधिकारी व कर्मचारी वास्तव्यास असल्यास आस्थापना अधिक्षक/विभाग प्रमुख यांनी अशा कर्मचा-यांचे वेतनातून उपरोक्त नमुद शासन निर्णयानुसार अनुज्ञप्ती शुल्क, सेवाशुल्काची वसुली करुन वसुली रक्कमेच्या स्वयंस्पष्ट अहवालासह अनुपालन दर्शवावे.

05) शासकिय अधिकारी यांना ग्रेड पे नुसार अनुज्ञेय चटाई क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र वास्तव्यास दिलेले असल्यास एकुण निवासस्थानाच्या क्षेत्रफळाच्या रु.0.50/- प्रती चौरस फुट प्रमाणे आकारणी करावी तसेच सेवकाचे निवासस्थान, वाहनाचे गॅरेज, खुली जागा याची आकारणी शासन निर्णयानुसार करण्यात येवून अनुपालन दर्शवावे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 63 दिनांक 27/10/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता,

तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 25, Hmm No : 63)

106 कार्यरत कर्मचारी यांचे वेतन देयके व निलंबित कर्मचारी यांचे निर्वाहभत्ता देयका बाबत

योजना :		**लेखाशीर्ष** : 0		**वसुलपात्र** :	1700.00/-
निधी :	महानगरपालिका स्व- निधी	**कलम** : 9ब		**अंतिम अमान्य** :	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत कर्मचारी यांचे वेतन देयक व निलंबित कर्मचारी यांचे निर्वाहभत्ता यांचे माहे सन 2016-2017 व 2017 - 2018 या कालावधीचे देयकांचे अवलोकन केला असता लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत खालील मुदयांच्या आधारे आक्षेप नोंदविण्यात येत आहे

01) कर्मचारी व अधिकारी यांचे वेतन देयकांची तपासणी केली असता वेतन देयका सोबत वजाती रक्कमांचे (भविष्य निर्वाह निधी वर्गणी रक्कम, व्यवसाय कर, आयकर कपात, जीआयएस कपात व इतर) विवरणपत्र सोबत जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर कर्मचारी व अधिकारी यांची वेतनातुन योग्य त्या कपातीच्या रक्कमा कपात केल्या आहेत किंवा कसे याबाबत तपासणी करता आली नाही.

02) महाराष्ट व्यवसाय कर, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम 1975 मधील अनुसूची एक व सुधारणा दिनांक 18/04/2015 मधील प्रकरण 3 नुसार वेतनदार व मजुरी मिळविणारे ज्यांचे मासिक वेतन किंवा मजुरी रु.7500/- रुपयांहून अधिक मात्र रु.10000/- रुपयांहून अधिक नसेल अशा प्रदानांकरीता रु.175/-दरमहा व रु.10,000/- पेक्षा जादा मासिक वेतनाकरीता रु.200/- प्रती महिना व माहे फेबुवारी वेतनातुन रु.300/- असे एकूण रु.300/- असे एकूण रु. 2500/- वार्षिक दराप्रमाणे व्यवसाय कराची कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार माहे फेबुवारी 2017 या महिन्याचे नियमित वेतन देयक व निलबित कर्मचारी यांचे निर्वाहभत्ता या देयकांची तपासणी केली असता एकूण 17 निलबित कर्मचारी यांचे निर्वाहभत्ता यातुन व्यवसाय कर हा 300 या प्रमाणे कपात करणे आवश्यक असतांना तसे न करता तो 200 या प्रमाणे कपात करण्यात आलेली आहे. तरी एकूण 17 निलंबीत कर्मचारी यांच्याकडून 100/- या प्रमाणे एकूण रक्कम रु.1,700/- संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन शासनखाती चलनाने भरणा करण्यात यावी. तसेच माहे फेबुवारी 2018 ची नियमित वेतन देयक व निलबित कर्मचारी यांचे निर्वाहभत्ता देयके माहे एप्रिल 2018 मध्ये अदा करण्यांत आली असुन सदर देयकांमधून व्यवसाय कराची कमी वसुली असल्यास वरील प्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

03) कर्मचारी व अधिकारी यांचे वेतन देयकांची तपासणी केली असता वेतन देयकात काही महिन्यांच्या देयकात 6 वे वेतन आयोगाच्या फरकांची रककम अदा केल्याचे निर्दशनास आले आहे परंतु सदरच्या देयकात कुठलाही फरकांचे

तपशील सोबत जोडलेले नसल्याने फरकांची रक्कम बरोबर दिली आहे किंवा कसे या बाबत लेखापरिक्षणात पडताणी करता आली नाही.

04) कर्मचारी व अधिकारी यांचे वेतन देयकांची तपासणी केली असता वेतन देयकात भविष्य निर्वाह निधीची परतावा रक्कमेचा कितवा हफता कोणत्या महिन्यात कपात केला या बाबत पडताळणी करता येत नाही. तसेच देयका सोबत भविष्य निर्वाह निधीची परतावा रक्कमेचा तपशील सोबत जोडलेले नसल्याने भविष्य निर्वाह निधीची परतावा रक्कम बरोबर वसुल होते किंवा कसे या बाबत या बाबत लेखापरिक्षणात पडताणी करता आली नाही.

05) निलबित कर्मचारी यांचे निर्वाहभत्ता या देयकांची तपासणी केली असता महाराष्ट नागरी सेवा नियम 69 (4) व 69 (6) अन्वये दरमहा निलंबीत कर्मचारी हे निलंबीत कालावधीत कोणताही खाजगी अथवा दुयम व्यवसाय केलेला नाही तसेच उपरोक्त कालावधीत ते मुख्यालयातच वास्तव्यास होते असे निलंबीत कर्मचारी यांच्या सहीचे प्रमाणपत्र निवार्हभत्ता देयकांसोबत आढळून आलेले नाही. तसेच प्रमाणपत्राशिवाय निवार्हभत्ता अदा केल्याचे निर्दशनास आले आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 36 दिनांक 22/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 29, Hmm No : 36)

107 महानगरपालिका जळगाव येथील विविध कार्यालयातील दुरध्वनी देयके विलंबआकारणी रक्कमेसह अदा केल्याबाबतची अनियमितते बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे दुरध्वनी विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. जळगाव शहर महानगरपालिकेतील अंतर्गत असलेली सर्व कार्यालयास एकूण 54 दुरध्वनी बीएसएनएल कंपनी मार्फत पुरविण्यात आले असुन त्यांची मासिक ग्रुपबिल देयके महानगरपालिकेद्वारे अदा करण्यात येत असते. सन 2016-2017 व सन 2017-2018 या दोन वर्षातील दुरध्वनी विभागातील कार्यालयीन दुरध्वनी या देयकांचे अवलोकन व तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेले आहेत.

बीएसएनएल कंपनीचे सन 2016-2017 या कालावधीतील कार्यालयाची ग्रुप बिलाची दुरध्वनी देयकांचा तपशील खालीलप्रमाणे

महिना व वर्ष	प्रमाणक क्रमांक व दिनांक	बीएसएनएल कंपनीस अदा	बीएसएनएल कंपनीस विलंब

		केलेली रक्कम	आकारणी अदा केलेली रक्कम
एप्रिल 2016	616 दिनांक 01-06-2016	71421/-	----------
मे 2016	853 दिनांक 12-07-2016	76668/-	1275.84
जुन 2016	1032 दिनांक 01-08-2016	76913/-	1318.72
जुलै 2016	1274 दिनांक 07-09-2016	76305/-	1429.24
ऑगस्ट 2016	1598 दिनांक 01-10-2016	81823/-	1426.90
सप्टेबर 2016	1916 दिनांक 08-11-2016	73852/-	1324.06
ऑक्टोबर 2016	2235 दिनांक 01-12-2016	72742/-	1614.08
नोव्हेबर 2016	2763 दिनांक 25-01-2017	75717/-	1191.95
डिसेंबर 2016	2846 दिनांक 30-01-2017	75284/-	1244.10
जानेवारी 2017	3085 दिनांक 27-02-2017	63690/-	1200.00
फेबुवारी 2017	3334 दिनांक 31-03-2017	71069/-	----------
मार्च 2017	344 दिनांक 08-05-2017	72134/-	1521.13
एकूण			**13546.02**

बीएसएनएल कंपनीचे सन 2017-2018 या कालावधीतील कार्यालयाची ग्रुप बिलाची दुरध्वनी देयकांचा तपशील खालीलप्रमाणे

महिना व वर्ष	प्रमाणक क्रमांक व दिनांक	बीएसएनएल कंपनीस अदा केलेली रक्कम	बीएसएनएल कंपनीस विलंब आकारणी अदा केलेली रक्कम
एप्रिल 2017	440 दिनांक 02-06-2017	71674/-	1323.41
मे 2017	1014 दिनांक 27-07-2017	68432/-	1165.26
जुन 2017	1061 दिनांक 02-08-2017	56526/-	-------

जुलै 2017	1294 दिनांक 01-09-2017	74857/-	1091.04
ऑगस्ट 2017	1795 दिनांक 10-10-2017	63943/-	2388.46
सप्टेबर 2017	2257 दिनांक 29-11-2017	61469/-	2181.31
ऑक्टोबर 2017	2453 दिनांक 16-12-2017	57709/-	------
नोव्हेबर 2017	2842 दिनांक 15-01-2018	56871/-	2469.56
डिसेंबर 2017	2979 दिनांक 22-01-2018	53784/-	1049.20
जानेवारी 2018	3357 दिनांक 26-02-2018	53421/-	1092.80
फेबुवारी 2018	3599 दिनांक 28-03-2018	50546/-	1082.98
मार्च 2018	338 दिनांक 25-04-2018	55032/-	2111.98
एकूण			**14873.02**

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) बीएसएनएल कंपनीने महानगरपालिकेतील दुरध्वनी विभागास सन 2016-2017 व 2017-2018 या कालावधीची ग्रुप बिल दुरध्वनी देयके दरमहा उपलब्ध करुन दिले. तसेच दरमहा दुरध्वनी देयकाची अंतिम तारीख ही त्याच महिन्याच्या 27 तारीख असल्याने दुरध्वनी विभाग यांनी उपरोक्त देयकांचा भरणा मुदतीच्या आत करणे आवश्यक होते. परंतु वरील बीएसएनएल कंपनीचे दुरध्वनी देयकांची तपासणी व अवलोकन केले असता दरमहा देयकांचा भरणा मुदतीच्या आत करण्यात आलेला नसुन मुदतीनंतर भरणा करण्यात आलेला आहे.

02) ग्रुप बिल दुरध्वनी देयकांची रक्कम मुदतीत अदा न केल्यामुळे बीएसएनएल कंपनी यांनी प्रत्येक महिन्यात विलंब आकार / दंडाची रक्कम पुढील महिन्याच्या देयकात आकारणी केली आहे. सन 2016-2017 मध्ये एकूण रक्कम रु.13,546.02 व सन 2017-2018 मध्ये एकूण रक्कम रु.15955.82 असे दोन्ही वर्षातील एकूण रक्कम रु.28419.04 इतकी अतिरिक्त विलंब आकार / दंडाची रक्कम संबधीत कंपनीस महानगरपालिकेने अदा कलेली आहे. सबब महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे..

03) तसेच मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम क्रमांक 57 व 58 मधील वित्तीय औचित्याच्या सुत्रांनुसार सर्वसामान्य व्यक्ती स्वत:चा पैसा खर्च करतांना जी जागरुकता दाखविते तशीच जागरुकता सार्वजनिक सेवकाने शासकिय रक्कम खर्च करतांना दाखविली पाहिजे. तथापी याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्याचे दिसुन येते.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 163 दिनांक 05/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 39, Hmm No : 163)

108 साने गुरुजी ग्रंथालय व वाचनालय यामध्ये आढळून आलेल्या अनियमितता बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 75697.00/-
निधी : महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे साने गुरुजी ग्रंथालय व वाचनालय, जळगाव यांचे लेखापरीक्षण केले असून सन 2017 -2018 अखेर रक्कम रु.75,697/- थकबाकी प्रलंबित आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

वित्तीय वर्ष	मागील थकबाकी	चालू मागणी	एकूण मागणी	चालू वसुल	मागील वसुल	एकूण वसुल	एकूण थकबाकी	एकूण वसुलीचे प्रमाण	एकूण थकबाकीचे प्रमाण
2016-2017	37922	73680	111602	38865	20545	59410	52192	53.23%	46.77%
2017-2018	52192	68400	120592	32855	12040	44895	75697	37.22%	62.78%

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत खालील मुदयांच्या आधारे लेखापरीक्षणाचे अभिप्राय आहेत.

01) सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय यांची सन 2016-2017 या वर्षाअखेर सभासद वर्गणीची थकबाकी रक्कम रुपये 52192/- इतकी असून थकबाकीचे प्रमाण 46.77% व सन 2017-2018 या वर्षाअखेर थकबाकी रक्कम रुपये 75697/- इतकी असून थकबाकीचे प्रमाण 62.78% इतके आहे. प्रलंबित रक्कम वसुलीसाठी कोणतीही विशेष कार्यवाही अंमलात आणली गेलेली नसल्याने ग्रंथालयातील थकीत वसुली रक्कम वाढत आहे.

02) प्रशासकीय आदेश क्रमांक 111 दिनांक 12/09/2003 नुसार सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय करीता निविदा काढणे ऐवजी वर्तमान पत्रे व मासिके यांची बिले दर महिन्याला अदा करणेसाठी रक्कम रु.5000/- स्थायी अग्रीम ग्रंथपाल यांना देणे बाबत नमुद केलेले आहे परंतु सन 2016-2017 व 2017-2018 या वर्षाचे स्थायी अग्रीमाचे रजिस्टर याचे अवलोकन केले असता त्यात वर्तमान पत्रे व मासिके यांची बिले अदा करण्यात आलेले नाही यावरुन ज्या कारणासाठी स्थायी अग्रीम देण्यात आले त्याच कारणासाठी खर्च करणे आवश्यक असतांना इतर बाबींवर खर्च

करण्यात आलेला असल्याचे दिसुन आले आहे

03) सभासद यांनी राजीनामा दिल्यानंतर त्यांना अनामत रक्कम स्थायी अग्रीम रक्कमेतुन परत देण्यात आलेली आहे . सन 2016-2017 या वर्षात रक्कम रुपये 1950/- व सन 2017-18 या वर्षात रक्कम रुपये 2800/- परत देण्यात आलेली आहे तरी उपरोक्त रक्कम ही स्थायी अग्रीम मधुन कोणत्या नियमाखाली खर्च करण्यात आली त्याबाबतचा खुलासा सादर करण्यात आला नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 69 दिनांक 2/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. त्यानुसार ग्रंथालय विभागाकडून खुलासा प्राप्त झालेला आहे. तरी वरील आक्षेपाबाबत परीपूर्ण कार्यवाही करुन अनुपालन सादर करणे आवश्यक असल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 28, Hmm No : 69)

109 विवाह नोंदणी फी व शास्तीची रक्कम शासनाकडे जमा करणे व विवाह नोंदणी फॉर्म फी आकारणे बाबत.

योजना :		**लेखाशीर्ष** :	0	**वसुलपात्र** :	24375.00/-
निधी :	महानगरपालिका स्व- निधी	**कलम** :	9ब	**अंतिम अमान्य** :	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे विवाह नोंदणी यांचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाची अधिसुचना क्र.एस30/1007/848/प्र.क्र.284/ कृ.क्र.2, दि.27/02/2008 नुसार राज्य शासनाने विवाह नोंदणीचे कामकाज स्थानिक स्वराज्य संस्थाकडे हस्तांतारीत केलेले आहे. त्या अनुषंगाने सदरचे कामकाज महानगरपालिकेने करावयाचे आहे. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक पुणे यांच्या दिनांक 24/04/2008 च्या पत्रानुसार विवाह नोंदणी कामकाजाचे हस्तांतर जळगांव शहर महानगरपालिकेकडे झाले असुन विवाह नोंदणीचे कामकाज जळगांव महानगपालिकेकडुन प्रभाग क्र.1,2,3,4 मध्ये स्वतंत्ररित्या सुरु करण्यात आले होते . तदनंतर माहे मार्च 2017 पासुन प्रभाग क्र.1,2,3,4 या चारही प्रभागातील विवाह नोंदणी ही एकाच ठिकाणी म्हणजेच नानीबाई हॉस्पीटल, जळगाव येथे सुरु करण्यात आलेली आहे.

आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र. संव्यासे/विवाह नोंदणी/ कक्ष 18 /3863-78/16 दिनांक 21/04/2016 नुसार विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्याच्या दिनांकापासुन 90 दिवसाच्या आत विवाह नोंदणी केल्यास शुल्क रुपये 50/-, विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्यानंतरच्या 90 दिवसानंतर परंतु एक वर्ष पुर्ण होण्यापुर्वी विवाह नोंदणी केल्यास शुल्क रुपये 100/-, विवाह शास्त्रोक्त पध्दतीने झाल्यानंतरच्या एक वर्षाहून वा त्याहून अधिक कालावधीने विवाह नोंदणी केल्यास शुल्क रुपये 200/-, विवाह नोंदवही तपासण्यासाठीच्या अर्जासाठी

सोबत दयावयाचे शुल्क रुपये 15/-, विवाह नोंदवहीतील उतारांची प्रमाणित प्रत मिळविण्यासाठी अर्जासोबत दयावयाचे शुल्क रुपये 20/- आकारता येईल. तसेच ज्ञापन फी रुपये 15/- आकारता येईल असे नमुद करण्यात आले आहे.

परंतु विवाह नोंदणी विभाग, महानगरपालिका, जळगाव हे कार्यालयीन आदेश क्रमांक 549/2003 दिनांक 30-05-2003 अन्वये महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना क्र.विनोंका 2002/1448/प्र.क्र.423/कु. क्रं.3, दि.29/03/2003 नुसार विवाहाच्या तारखेपासुन 90 दिवसाच्या आतमध्ये नोंदणी केल्यास शुल्क रुपये 50/-, विवाहाच्या तारखेपासुन 90 दिवसानंतर परंतु 1 वर्षाच्या आत नोंदणी केल्यास शुल्क रुपये 100 अधिक शास्ती रुपये 50/-असे एकूण 150/- व विवाहाच्या तारखेपासुन एक वर्षानंतर वा अधिक कालावधीसाठी नोंदणी केल्यास शुल्क रुपये 200 अधिक रुपये 100/- शास्ती असे एकूण रुपये 300/- विवाह नोंदणी शुल्काची रक्कम आकारण्यात आलेली आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील विवाह नोंदणी प्रभाग 1,2,3,4 कार्यालयाकडील विवाह नोंदणी नोंदवही / चलन पुस्तिका / रोख नोंदवहीचे इत्यादींची तपासणी व लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) सन 2016-17 व 2017-18 मध्ये जळगांव शहर महानगरपालिकेकडील प्रभाग क्र.1,2,3,4 असे चार ठिकाणी एकुण 1625 विवाह नोंदणी झाल्याचे विवाह नोंदवहीवरुन दिसुन येते आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे जा.क्र. संव्यासे/विवाह नोंदणी/ कक्ष 18 /3863-78/16 दिनांक 21/04/2016 नुसार ज्ञापन फी रक्कम रुपये 15/- ही आकारणे आवश्यक असताना जळगाव महानगरपालिका कार्यालयीन आदेश क्रमां 549/2013 दिनांक 30/05/2013 मधील विवाह नोंदणी कार्यपध्दती क्रमांक 2 अन्वये पक्षकारांपैकी एकाने विवाह नोंदणी ज्ञापन व सूचना पत्रक, नमुना प्रतिज्ञापत्र विना शुल्क प्राप्त करुन घ्यावे असे नमुद करण्यात आले आहे तरी ते कोणत्या आधारे अथवा नियमानुसार लागु करण्यात आले आहे त्या बाबतचा लेखापरिक्षणास खुलासा सादर करण्यात आला नाही.

02) जळगाव महानगरपालिका कार्यालयीन आदेश क्रमां 549/2013 दिनांक 30/05/2013 अन्वये ज्ञापन फी / विवाह नोंदणी फॉम फी आकारण्यात आलेली नसल्याने सन 2016-17 व 2017-18 या दोन वर्षात रक्कम रुपये 15/- प्रमाणे एकूण 1625 नोंदणी पोटी शासनाचे रक्कम रुपये 24,375/- चे नुकसान झालेले आहे. या बाबतचा खुलासा लेखापरिक्षणास सादर करण्यात आला नाही.

03) आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे जा.क्र. संव्यासे/विवाह नोंदणी/ कक्ष 18 /3863-78/16 दिनांक 21/04/2016 नुसार विवाह नोंदणी करतांना फक्त ज्ञापन फी व शुल्क आकरणी करण्यात आलेली आहे परंतु विवाह नोंदणी विभाग, महानगरपालिका, जळगाव हे कार्यालयीन आदेश क्रमांक 549/2003 दिनांक 30-05-2003 अन्वये महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना क्र.विनोंका 2002/1448/प्र.क्र.423/कु. क्रं.3, दि.29/03/2003 नुसार शास्ती रक्कम आकारणी करण्यात आलेली आहे ती कोणत्या नियमानुसार केली आहे त्या

बाबतचा खुलासा लेखापरिक्षणास सादर करण्यात आला नाही.

04) आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट राज्य, मुंबई यांचे जा.क्र. संव्यासे/विवाह नोंदणी/ कक्ष 18 /3863-78/16 दिनांक 21/04/2016, महाराष्ट्र शासन राजपत्र गुरुवार मे 20, 1999 सार्वजनिक आरोग्य विभाग दि.15 मे 1999 अधिसुचना महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम 1998, 160 च्या नियम 12 नुसार विवाह निंबधकाकडे जमा होणारी सर्व फी/शास्तीची रक्कम शासकीय कोषागार मध्ये जमा करणेबाबत नमुद केलेले आहे. तसेच नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांनी त्यांचे परिपत्रक क्र.का-7/प्र.क्र.1426/2001/6736, दि.05/12/2001 व नुसार विवाह नोंदणीव्दारे जमा होणारी रक्कम ही मुख्य शिर्षक - 0030, मुद्रांक व नोंदणी फी,उपशिर्ष - 03 नोंदणी, उपगौण लेखा - 800, इतर जमा 00300161 06 - विवाह अधिनियम अन्वये वसुल केलेली फीस या शासन खाती चलनाने जमा लेखा शिर्षखाली जमा करणे आवश्यक आहे.

परंतु जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती कार्यालय क्रमांक 1,2,3,4 असे चार ठिकाणी विवाह नोंदणी कार्यालय कार्यरत असुन त्यांचेकडुन रोकड वही/चलन पुस्तिका/विवाह नोंद वहीची पडताळणी केली असता सन 2016-17 विवाह नोंदणी फि रक्कम रुपये 1,05,080/- व शास्तीची रक्कम रुपये 39,750/- असे एकूण रक्कम रुपये 1,44,830/- व नानीबाई हॉस्पीटल, जळगाव येथील विवाह नोदणी कार्यालयात सन 2017-18 मध्ये विवाह नोंदणी फि रक्कम रुपये 1,04,400/- व शास्तीची रक्कम रुपये 46,000/- असे एकूण रक्कम रुपये 1,50,400/- असे दोन्ही वर्षाची एकूण रक्कम रुपये 2,95,230/- वरीलप्रमाणे निर्देशानुसार शासन खाती जमा न करता जळगांव शहर महानगपालिकेकडील मनपा खाती जमा करण्यात आलेली आहे. त्यामुळे शासन निर्देशांचे पालन करण्यात आलेले नसल्याने शासनाकडे जमा होणाऱ्या महसुलाचे नुकसान झालेले आहे. सदरच्या रकमा वरील लेखा शिर्षाखाली शासन खाती चलनाने जमा करण्यात याव्यात व त्या बाबतचे अनुपालन लेखापरिक्षणास सादर करण्यात आला नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 106 दिनांक 05/12/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 32, Hmm No : 106)

110 छत्रपती शाहू महाराज दवाखाना व ईतर दवाखाने यांना प्राप्त तसलमात रक्कमेतून रोख व्यवहार करणे, औषधे खरेदी, इतर उपयोगी साहित्य खरेदीतील अनियामितता व इतर अनियमितता बाबत...

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0		**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब		**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे आरोग्य विभाग (दवाखाने), जळगाव यांचे लेखापरीक्षण करण्यात आले. आरोग्य विभाग (दवाखाने), जळगाव येथील छत्रपती शाहू महाराज दवाखाना व

ईतर दवाखाने यांनी औषध खरेदी, प्रयोगशाळा साहित्य व इतर आवश्यक साहित्य खरेदी करीता अग्रिम रक्कमा उचलून त्या रोख स्वरुपात खर्च केलेल्या आहेत दवाखाना निहाय अग्रिम रकमांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	दवाखान्याचे नाव	सन 2016-17 (अग्रिम रक्कमेमधुन करण्यात आलेला खर्च)	सन 2017-18 17 (अग्रिम रक्कमेमधुन करण्यात आलेला खर्च)
1	छत्रपती शाहू महाराज, दवाखाना	2,99,369/-	1,20,951/-
2	नानीबाई दवाखाना	11,137/-	15,000/-
3	दादासाहेब भिकमचंद जैन दवाखाना	29,657/-	67,091/-
4	चैत्यनदास दवाखाना	34,877/-	26,798/-
5	म. मू. मुलतानी दवाखाना	5,000/-	14,108/-
6	माता बालसंगोपन केंद्र	3,982/-	2,341/-
	एकूण	3,84,022/-	2,46,289/-

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) उपरोक्त तपशिलावरून दिसून येते की, आरोग्य विभाग (दवाखाने), जळगाव येथील छत्रपती शाहू महाराज दवाखाना व ईतर दवाखाने यांनी सन 2016-2017 या वर्षात रक्कम रुपये 3,84,022/- व सन 2017-2018 या वर्षात 2,46,289/- असे एकूण रक्कम रुपये 6,30,311/- इतका दोन वर्षात दवाखान्या करीता लागणारी औषध खरेदी, प्रयोगशाळा साहित्य व इतर आवश्यक साहित्यावर अग्रिम उचलून खर्च केली आहे. सदर रक्कमा वैद्यकीय अधिकारी यांनी वेळोवेळी अग्रिम देयकाद्वारे प्राप्त करून घेतल्या आहेत. अशा प्रकारे प्राप्त झालेल्या रक्कमा दवाखान्याच्या नावे एक बँक खाते उघडून त्या मधून धनादेशाद्वारे आर्थिक व्यवहार करणे अपेक्षित होते. महाराष्ट्र नगर परिषद लेखा सहिता 2011 मधील नियम क्रमांक 45 नुसार मनपाने संपूर्ण आर्धिक व्यवहार धनादेशाद्वारे करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने औषध खरेदी, प्रयोगशाळा साहित्य खरेदी इत्यादी संपूर्णपणे रोख स्वरुपात केलेली आहे. त्यामुळे उपरोक्त नियम तरतुदीचे पालन झालेले नाही.

02) आरोग्य विभाग (दवाखाने) यांनी वित्तीय वर्ष 2016-17 व 2017-18 मध्ये सर्वसाधारण औषध खरेदी, प्रयोगशाळा साहित्य खरेदी इत्यादी एकत्रित खरेदीसाठी वर्षाच्या सुरवातीलाच जाहीर निविदा मागविणे आवश्यक होते जेणेकरून स्पर्धात्मक दरांचा लाभ मिळाला असता. विभागाने वर्षभरासाठी लागणारे अंदाजित औषधी व इतर विविध साहित्य यांच्या एकत्रित खरेदी करण्याच्या दृष्टीकोनातून दोन्ही आर्थिक वर्षाच्या सुरवातीलाच नियोजन करून शक्य तितक्या लवकर यशस्वी निविदा प्रक्रिया राबविणे बाबत प्रयत्न करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

03) आरोग्य विभाग (दवाखाने), जळगाव येथील छत्रपती शाहूमहाराज दवाखाना व ईतर दवाखाने यांनी वित्तीय वर्ष 2016-17 व 2017-2018 मध्ये औषधी खरेदी व इतर साहित्य खरेदी स्थानिक स्तरावर आवश्यकते प्रमाणे वेळोवेळी केलेली दिसुन येत आहे. अशी खरेदी करीत असताना शासकीय दराचे पालन झाले किवा कसे हे स्पष्ट होत नाही. तसेच विभागाने संचालक आरोग्य सेवा यांचे कडील त्या त्या वर्षातील दरकरार विचारात घेवून अशी

खरेदी केली किंवा कसे हे स्पष्ट होत नाही. याबाबत विभागाने खुलासा सादर करण्यात आला नाही.

04) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रवे विभाग शासन निर्णय क्रमांक डीपीआर/2003/सी.आर.373/प्रशासन दिनांक 08/09/2009. नुसार हाफकिन जीव औषधी निर्माण महामंडळ मर्यादित मुंबई व अजिंठा फार्मासिटीकल जळगाव या शासन अंगीकृत उपक्रमाने उत्पादित केलेली औषधी निविदा पध्दतीने खरेदी न करता थेट विकत घ्यावी अशी तरतूद आहे. परंतु विभागाने उपरोक्त संस्थांमार्फत आवश्यक खरेदी न करता स्थानिक बाजारातून किरकोळ स्वरुपात केली आहे. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयाचे पालन झाले नाही.

05) तसलमतमधुन औषधी खरेदी व इतर साहित्य खरेदी केल्यानंतर स्टॉक रजिस्टर मध्ये सदर औषधी यांची नोंद करतांना त्यात बॅच नंबर, औषधाची किंमत व औषधाची मुदत संपण्याची तारीख नमुद करण्यात आलेले नाही. तसेच तसलमत मधुन इतर आवश्यक त्या वस्तु खरेदी केल्यानंतर त्या वस्तुची नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये घेण्यात येत नसल्याचे दिसून आले आहे.

06) आरोग्य विभाग (दवाखाने), जळगाव येथील छत्रपती शाहू महाराज दवाखाना व ईतर दवाखाने यांचे ओ.पी.डी, लॅब, इजेक्शन, मॅट, तज्ञ इत्यादी पावती पुस्तकांची तपासणी केली असता वित्तीय वर्षा अखेर शिल्लक पावती पुस्तकातील शिल्लक पावती रदद करण्यात आलेली नाही. तसेच शेवटच्या पावतीवर आवश्यक ती माहिती भरण्यात आलेली नाही.

07) छत्रपती शाहू महाराज दवाखाना व ईतर दवाखाने हे आपआपल्या स्टॉक मधुन औषधी , गोळ्या व इतर साहित्य यांचा वापर करीत असता परंतु औषधी , गोळ्या व इतर साहित्य कसे व किती प्रमाणात अथवा कधी वापरले याबाबतच्या नोदी ठेवण्यात आलेल्या नाही

08) छत्रपती शाहूमहाराज दवाखाना व ईतर दवाखाने यांचे जडवस्तु संग्रह नोंदवहिचे अवलोकन केले असता त्यात फर्निचर, इतर वस्तु यांचे फक्त नाव नमुद करण्यात आले आहे परंतु त्यांची किमंत नमुद करण्यात आलेली नाही . तसेच काही वस्तु मोडकळीस असल्याबाबतची नोंद आढळून आलेली आहे. तरी उपरोक्त वस्तुंची किमंत नमुद करुन व मोडकळीस वस्तुबाबत योग्य ती कार्यवाही करुन त्या बाबतचा अहवाल सादर करावा

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 96 दिनांक 28/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 30, Hmm No : 96)

111 छत्रपती शाहू महाराज दवाखाना व ईतर दवाखाने या रुग्णालयांमध्ये पार पडलेल्या शस्त्रक्रियेसाठी स्त्रीरोगतज्ञ व भुलरोगतज्ञ यांना वैद्यकीय सेवेपोटी(सिझेरियन कामी) दिले जाणारे मानधनातुन आयकर कपात न करणेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	37500.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात येत आहे. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या आर्थिक आरोग्य विभाग (दवाखाने), जळगाव यांचे

लेखापरीक्षण केले. आरोग्य विभाग (दवाखाने), जळगाव येथील छत्रपती शाहूमहाराज दवाखाना व ईतर दवाखाने या रुग्णलयांमध्ये पार पडलेल्या शस्त्रक्रियेसाठी स्त्रीरोगतज्ञ व भुलरोगतज्ञ यांना वैद्यकीय सेवेपोटी (सिझेरियन कामी) दिले जाणारे मानधन सन 2016-2017 व 2017-2018 मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आले असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे

01) प्रमाणक क्रमांक 2966/2016-17 दिनांक 20/02/2017

अ.क्र.	डॉक्टरांचे नाव	कालावधी	केसेस	दर प्रत्येकी	एकूण देय रक्कम
1	डॉ तिलोत्तमा गाजरे (स्त्रीरोग तज्ञ)	7/4/2016 ते 28/11/2016	128	600	76800/-
2	डॉ सुजाता महाजन (स्त्रीरोग तज्ञ)	7/4/2016 ते 28/11/2016	57	600	34200/-
3	डॉ पुनम दुसाने (स्त्रीरोग तज्ञ)	7/4/2016 ते 28/11/2016	28	600	16800/-
4	डॉ वंदना चौधरी (भुलरोगतज्ञ)	7/4/2016 ते 28/11/2016	78	600	46800/-
5	डॉ रोहीणी चौधरी (भुलरोगतज्ञ)	7/4/2016 ते 28/11/2016	81	600	48600/-
6	डॉ सपना दातार (भुलरोगतज्ञ)	7/4/2016 ते 28/11/2016	43	600	25800/-
7	डॉ विनोद किनगे (भुलरोगतज्ञ)	7/4/2016 ते 28/11/2016	6	600	3600/-
8	डॉ धिरज चौधरी (भुलरोगतज्ञ)	7/4/2016 ते 28/11/2016	5	600	3000/-
		एकूण			255600/-

02) प्रमाणक क्रमांक 879/2017-18 दिनांक 11/07/2017

अ.क्र.	डॉक्टरांचे नाव	कालावधी	केसेस	दर प्रत्येकी	एकूण देय रक्कम
1	डॉ तिलोत्तमा गाजरे (स्त्रीरोग	1/12/2016 ते 31/03/2017	44	600	26400/-

	तज्ञ)				
2	डॉ सुजाता महाजन (स्त्रीरोग तज्ञ)	1/12/2016 ते 31/03/2017	27	600	16200/-
3	डॉ पुनम दुसाने (स्त्रीरोग तज्ञ)	1/12/2016 ते 31/03/2017	11	600	6600/-
4	डॉ वंदना चौधरी (भुलरोगतज्ञ)	1/12/2016 ते 31/03/2017	30	600	18000/-
5	डॉ रोहीणी चौधरी (भुलरोगतज्ञ)	1/12/2016 ते 31/03/2017	28	600	16800/-
6	डॉ सपना दातार (भुलरोगतज्ञ)	1/12/2016 ते 31/03/2017	18	600	10800/-
7	डॉ विनोद किनगे (भुलरोगतज्ञ)	1/12/2016 ते 31/03/2017	2	600	1200/-
8	डॉ धिरज चौधरी (भुलरोगतज्ञ)	1/12/2016 ते 31/03/2017	4	600	2400/-
		एकूण			98400/-

03) **प्रमाणक क्रमांक 2846/2017-18 दिनांक 15/01/2018**

अ.क्र.	डॉक्टरांचे नाव	कालावधी	केसेस	दर प्रत्येकी	एकूण देय रक्कम
1	डॉ तिलोत्तमा गाजरे (स्त्रीरोग तज्ञ)	6/4/2017 ते 28/09/2017	91	600	54600/-
2	डॉ सुजाता महाजन (स्त्रीरोग तज्ञ)	6/4/2017 ते 28/09/2017	15	600	9000/-
3	डॉ पुनम दुसाने (स्त्रीरोग तज्ञ)	6/4/2017 ते 28/09/2017	07	600	4200/-
4	डॉ वंदना चौधरी (भुलरोगतज्ञ)	6/4/2017 ते 28/09/2017	22	600	13200/-
5	डॉ रोहीणी चौधरी	6/4/2017 ते 28/09/2017	43	600	25800/-

	(भुलरोगतज्ञ)				
6	डॉ सपना दातार (भुलरोगतज्ञ)	6/4/2017 ते 28/09/2017	45	600	27000/-
7	डॉ विनोद किनगे (भुलरोगतज्ञ)	6/4/2017 ते 28/09/2017	3	600	1800/-
		एकूण			135600/-

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) वरील प्रमाणे स्त्रीरोगतज्ञ व भुलरोगतज्ञ यांना देण्यात आलेले दरांबाबत महापालिका महासभा ठराव क्रमांक 44 दिनांक 11/6/2008 व स्थायी समिती ठराव क्रमांक 15 दिनांक 05/07/2004 इत्यादी ठराव लेखापरिक्षण दरम्यान उपलब्ध झाले नाही त्यामुळे देण्यात आलेल्या दरांबाबत पडताळणी करता आली नाही.

02) आरोग्य विभाग (दवाखाने), जळगाव येथील छत्रपती शाहूमहाराज दवाखाना व ईतर दवाखाने या रुग्णलयांमध्ये पार पडलेल्या शस्त्रक्रियेसाठी स्त्रीरोगतज्ञ व भुलरोगतज्ञ यांना वैघकीय सेवेपोटी (सिझेरियन कामी) मानधन सन 2016-2017 व 2017-2018 मध्ये अदा करण्यात आले आहे परंतु सदर मानधनातुन महाराष्ट शासन, वित्त विभाग, शासन निणर्य क्रमांक आयकर 1007/प्र.क्र. 105/कोषा-प्र-5 दिनांक 22 फेबुवारी 2008 आयकर कलम 194जे नुसार Fees for professional or technical services/ Royalty when the sums credited/ paid exceeds Rs.30000/- at the rate 10% as TDS. या नुसार टीडीएस कपात करण्यात आलेली नाही. स्त्रीरोगतज्ञ व भुलरोगतज्ञ यांच्याकडून खालीलप्रमाणे टीडीएस एकूण रक्कम रु.37,500/- वसुल करुन सदरची रक्कम सरकारजमा करुन त्याबाबतचे आयकर विवरणपत्र दाखल करण्यात यावे व फॉर्म 16 ए तयार करण्यात यावा. यानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत अनुपालन लेखापरिक्षणास सादर करावे.

अ.क्र.	डॉक्टरांचे नाव	एकूण देय रक्कम 2016-17	एकूण देय रक्कम 2016-17	एकुण अदा करण्यात आलेली रक्कम	दि. 22/2/08 शासननिर्णया नुसार कलम 194 जे नुसार 10 % वसुल करावयाची रक्कम
1	डॉ तिलोत्तमा गाजरे (स्त्रीरोग तज्ञ)	76800/-	26400/-	103200/-	10320/-
2	डॉ सुजाता महाजन (स्त्रीरोग तज्ञ)	34200/-	16200/-	50400/-	5040/-

3	डॉ पुनम दुसाने (स्त्रीरोग तज्ञ)	16800/-	6600/-	23400/-	Nil
4	डॉ वंदना चौधरी (भुलरोगतज्ञ)	46800/-	18000/-	64800/-	6480/-
5	डॉ रोहीणी चौधरी (भुलरोगतज्ञ)	48600/-	16800/-	65400/-	6540/-
6	डॉ सपना दातार (भुलरोगतज्ञ)	25800/-	10800/-	36600/-	3660/-
7	डॉ विनोद किनगे (भुलरोगतज्ञ)	3600/-	1200/-	4800/-	Nil
8	डॉ धिरज चौधरी (भुलरोगतज्ञ)	3000/-	2400/-	5400/-	Nil
	एकूण	**255600/-**	**98400/-**	**489600/-**	**32040/-**

अ.क्र.	डॉक्टरांचे नाव	एकूण देय रक्कम 2017-18	दि. 22/2/08 शासननिर्णया नुसार कलम 194 जे नुसार 10 % वसुल करावयाची रक्कम
1	डॉ तिलोत्तमा गाजरे (स्त्रीरोग तज्ञ)	54600/-	5460/-
2	डॉ सुजाता महाजन (स्त्रीरोग तज्ञ)	9000/-	Nil
3	डॉ पुनम दुसाने (स्त्रीरोग तज्ञ)	4200/-	Nil
4	डॉ वंदना चौधरी (भुलरोगतज्ञ)	13200/-	Nil
5	डॉ रोहीणी चौधरी (भुलरोगतज्ञ)	25800/-	Nil
6	डॉ सपना दातार (भुलरोगतज्ञ)	27000/-	Nil
7	डॉ विनोद किनगे (भुलरोगतज्ञ)	1800/-	Nil
8	डॉ धिरज चौधरी (भुलरोगतज्ञ)	0	Nil
	एकूण	**135600/-**	**5460/-**

अ.क्र.	वित्तीय वर्ष	वसुल करावयाची रक्कम
1	2016-2017	32,040/-
2	2017-2018	5,460/-
	एकूण	**37,500/-**

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 97 दिनांक 28/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 31, Hmm No : 97)

112 जैविक घनकचरा प्रकल्प उभारणीबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 66352.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान चौदाव्या वित्त आयोगामधून आरोग्य विभागांतर्गत जैविक घनकचरा प्रकल्प उभारणीचे कंत्राट देण्यात आलेले असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	जैविक घनकचरा प्रकल्प उभारणी
कंत्राटदाराचे नांव	मे.मन्साई बायोमेडीकल वेस्ट इंटरप्राईजेस प्रा.लि. जळगांव
कामाचे आदेश क्रमांक व दिनांक	मनपा आदेश क्र.आरोग्य/532/13/7/05, दिनांक 13/07/2005
करारनामा तपशिल	मुळ करारनामा - रु.100/- मुद्रांकावर दिनांक 02/08/2005, अतिरिक्त करारनामा - रु.100/- मुद्रांकावर दिनांक 16/09/2005 अतिरिक्त करारनामा - रु.100/- मुद्रांकावर दिनांक 28/03/2006
कराराचा कालावधी	20 वर्षे (म्हणजे 12/07/2025 पर्यंत)
महानगरपालिकेस अनुदान जमा करणेचा तपशिल	1 ते 6 वर्ष - 13% 7 ते 12 वर्षे - 17%

	12 ते मुदत संपेपर्यंत - 20%

सदर कामासाठी उभारण्यात येणारा प्रकल्प हा 20 वर्षांसाठी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर महासभा ठराव क्र.9 दिनांक 02/07/2005 नुसार मान्यता देण्यात आलेली आहे व प्रकल्प उभारणीसाठी जळगांव महानगरपालिकेच्या मालकीची जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर कंत्राटामध्ये कंत्राटदाराने 200 कि.मी. परिसरातील दवाखाने, जनरल प्रॅक्टीशनर, गुरांचे दवाखाने, लॅबॉरटरीज्, शाळा/कॉलेज यांच्या प्रयोगशाळा यांचेकडील जैविक कचरा गोळा करणे व त्याकरिता त्यांना दर ठरवून देण्यात आलेत. सदर दरांमध्ये दर तीन वर्षांनी 5% वाढ मंजूर करण्यात आली. याप्रमाणे ठराविक कालांतराने वाढ करण्यात येऊन कंत्राटदाराकडे जमा होणाऱ्या रकमेवर त्याने 13%, 17% व 20% प्रमाणे अनुदान (रॉयल्टी) महानगरपालिकेस दरमहा 15 तारखेपर्यंत जमा करणे आवश्यक आहे.

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) सदर कामाची निविदा प्रक्रीया राबवितांना निविदेचे कोणतेही प्रारुप तयार करण्यात आलेले दिसून येत नाही,ज्यामध्ये कामाचे स्वरुप, आधारभूत दर निश्चित करणे याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. कामाचे स्वरुप निश्चित करणे व आधारभूत दर निश्चित करणे याकरिता इतर महानगरपालिकांकडे अशा प्रकारचे प्रकल्प उभारले असल्यास त्यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेणे व त्याद्वारे कामाचे स्वरुप व आधारभूत दर निश्चित करणे आवश्यक होते जेणेकरुन महानगरपालिकेचे निश्चित उत्पन्नाची प्राथमिक माहिती तयार होऊ शकेल व त्या आधारे निविदेमधील प्राप्त दरांमध्ये तुलना करुन जास्तीत जास्त दरांद्वारे महानगरपालिकेचे उत्पन्नामध्ये वाढ होऊ शकेल. तथापी याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही व निविदाकारांनी नमुद केलेल्या दरांवर निविदा अंतिम करण्यात आलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये निश्चित असे उत्पन्न प्राप्त होत आहे किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होऊ शकली नाही.

02) सदर कामाचा करारनामा हा प्रदीर्घ कालावधीचा असल्याने करारनाम्याचे प्रारुप हे महानगरपालिकेच्या प्रमुख विधी सल्लागार यांचेकडून तपासणी करणे आवश्यक होते, जेणे करुन करारनाम्यामध्ये काही त्रृटी राहू नये व परिणामी भविष्यात कायदेशिर बाबी उद्भवणार नाहीत व महानगरपालिकेस नुकसान होणार नाही. तथापी याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे दिसून येते.

03) या अनुषंगाने संचिकेमध्ये कंत्राटदाराचे पत्र दिनांक 31/07/2007 तसेच अन्य पत्रव्यवहार तसेच महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या टिपणींची तपासणी करण्यात आली असता कंत्राटदाराने करारनाम्याचा आधार घेऊन महानगरपालिकेच्या विरोधात वेळोवेळी भाष्य केलेले असल्याचे निदर्शनास येते उदा.वाहतुक खर्च, दंडात्मक कार्यवाही इ. याबाबत खाली स्वतंत्रपणे मुद्दे नमुद करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे सदर प्रकल्प राबवितांना संबंधित कंत्राटदार व महानगरपालिका आरोग्य विभाग यांनी संयुक्तरित्या व योग्य तो समन्वय ठेवून कामकाज करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे उपलब्ध संचिकेवरुन दिसून येते व

परिणामी वैद्यकीय व्यावसायिक यांचेकडून योग्य ते सहकार्य मिळणे व रकमा विहित मुदतीत जमा होणेबाबत अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येते.

04) महानगरपालिका हद्दीव्यतिरिक्त इतर शहरांमधून/गावांमधून जैविक कचरा गोळा करण्यापोटी वाहतुक खर्च कोणी करावा याबाबत करारनाम्यामध्ये उल्लेख करण्यात आलेला नाही त्यामुळे अशा प्रकारे जैविक कचरा गोळा केल्यानंतर जमा होणाऱ्या रकमेमधून वाहतुक खर्च वजा जाता उर्वरित रकमेमधून रॉयल्टीच्या रकमा भरणेबाबत कंत्राटदारामार्फत पत्रव्यवहार करण्यात आलेला दिसून येतो. त्यामुळे कंत्राटदारामार्फत योग्य त्या रकमा भरणा करण्यात येत असल्याबाबत आरोग्य विभागामार्फत तपासणी होत नसल्याचे दिसून येते. परिणामी महानगरपालिकेकडे जमा होणाऱ्या रॉयल्टीच्या रकमा कमी प्रमाणात जमा होऊन महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे, याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

05) आरोग्य विभागाचे पत्र क्र.666 दिनांक 08/10/2009 नुसार संबंधित कंत्राटदार यांना नोटीस देण्यात आली असून त्यामध्ये आरोग्याधिकारी व उपायुक्त यांचे दिनांक 13/08/2009 व दिनांक 08/09/2009 रोजी प्रकल्प स्थळी भेटी दरम्यान प्रकल्पाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये दोनही दिवसांना वेगवेगळ्या नावाचे बालकामगार काम करीत असल्याचे आढळून आल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. याबाबत करारनाम्यामध्ये कोणतीही अट नमूद करण्यात आलेली दिसून येत नाही.

06) करारनाम्यातील अट क्र.01 नुसार अनुदान (रॉयल्टी) ची रक्कम दर महिन्याच्या 15 तारखेपर्यंत एकूण जमा झालेल्या रकमेतून निश्चित केलेल्या प्रमाणानुसार महानगरपालिकेच्या खजिन्यात रोखीने किंवा चेकद्वारे जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे, तथापी विलंबाने रकमा भरणा केल्यास दंडात्मक कार्यवाहीबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे कंत्राटदाराने त्यांचे पत्र दि.08/02/2010 अन्वये जशमनपा व कंपनी यांच्या झालेल्या करारनाम्यात थकीत रॉयल्टी रकमेवर व्याज आकारणीबाबत काहीही नमूद नसल्यामुळे व्याज आकारु नये, व्याजात सुट द्यावी व सहकार्य करणेस विनंती असे नमूद केलेले आहे. तसेच त्यानंतर महानगरपालिकेकडून कंत्राटदारास विलंबामुळे रॉयल्टी रकमेवर व्याज भरणा करण्याबाबत कळविण्यात आले असता कंत्राटदाराकडून कोणतीही व्याजाची रक्कम भरणा करण्यात आलेली असल्याचे संचिकेवरुन दिसून आले नाही. तसेच विभागामार्फत कोणताही पाठपुरावा करण्यात आलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे.

07) करारनामा अट क्र.04 नुसार दरवर्षी एप्रिल महिन्याच्या अखेर वार्षिक हिशोब ऑडीट करुन महानगरपालिकेत सादर करणे बंधनकारक राहील, तथापी संबंधित कंत्राटदार यांनी अशा प्रकारे कोणतेही ऑडीट अहवाल सादर केलेले दिसून येत नाही, किंवा त्याबाबत महानगरपालिकेकडून त्याबाबत कोणताही पाठपुरावा करण्यात आलेला दिसून येत नाही. त्याचप्रमाणे टिपणीवर मा.आयुक्त यांनी दिनांक 09/02/2010 रोजी महानगरपालिकेच्या लेखापरीक्षकांमार्फत त्यांचे Books of account तपासून अभिकर्त्याने योग्य दराने वसुली केली आहे काय व महानगरपालिकेला देय रक्कम बिनचूक भरली आहे काय याची शहानिशा करावी असे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार आरोग्य विभागाचे पत्र

क्र.1083 दिनांक 11/02/2010 अन्वये कंत्राटदारास महानगरपालिकेच्या लेखा परीक्षकांमार्फत आपले प्रकल्पासंबंधी बुक ऑफ अकाऊंट, लेखे (संपूर्ण दस्ताऐवजी) उपलब्ध करुन द्यावेत असे कळविण्यात आले, त्यावर कंत्राटदाराने दिनांक 15/02/2010 अन्वये खुलासा सादर करतांना लेखापरीक्षकांच्या (सी.ए.) व आमच्या तांत्रिक अडचणींमुळे लेखापरीक्षण अहवाल आम्ही मुदतीत सादर करु शकलेलो नाहीत, तरी परत आम्हांस लेखापरीक्षण अहवाल सादर करणेसाठी 90 दिवसांचा अवधी द्यावा ही विनंती असा खुलासा सादर केलेला आहे, तथापी त्यामध्ये महानगरपालिकेच्या लेखापरीक्षकांकडे त्यांचे बुक ऑफ अकाऊंट, लेखे सादर करण्याबाबत खुलासा केलेला नाही. तसेच त्यांचे लेख्यांची तपासणी महानगरपालिकेच्या अंतर्गत लेखापरीक्षण शाखेमार्फत करण्यात आल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही, त्यामुळे कंत्राटदारानी त्यांचे लेखे तपासणी करण्याकरिता सादर करण्याकरिता टाळाटाळ केलेली असल्याचे तसेच याबाबत आरोग्य विभागामार्फत त्याबाबत पाठपुरावा करण्यात आलेला नसल्याचे दिसून येते. परिणामी कंत्राटदाराचे हित गेलेले जोपासले असल्याचे तसेच मा.आयुक्त यांनी दिलेले आदेशांचे पालन करण्यात आलेले नसल्याचेही लेखापरीक्षणाचे मत आहे.

08) महानगरपालिकेमध्ये अंतर्गत लेखापरीक्षण विभागामध्ये पूर्व लेखापरीक्षण करण्यात येत असते. त्यानुसार कंत्राटदार यांनी जमा करावयाच्या रकमा व त्यांचे अभिलेखे यांचे अंतर्गत लेखापरीक्षण विभागामार्फत त्या-त्या वेळी पूर्व लेखापरीक्षण करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे तपासणी करण्याकरिता आरोग्य विभागामार्फत सदरचे अभिलेखे महानगरपालिकेच्या अंतर्गत लेखापरीक्षण विभागाकडे सादर करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे जमा होणाऱ्या रकमा योग्य असल्याबाबत पूर्व लेखापरीक्षण होत नसल्याने सदर बाबत गंभीर अनियमितता झालेली असून व परिणामी महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे.

09) करारनामा अट क्र.06 नुसार महानगरपालिकेकडून उपलब्ध करुन दिलेल्या जागेवर प्रकल्प उभारणी ही कंत्राटदाराने स्वखर्चाने करणे बंधनकारक होते. तसेच अट क्र.23 नुसार सदर खुल्या जागेत महानगरपालिकेच्या लेखी परवानगीनुसार बांधकाम किंवा इतर फेरबदल करणार नाही असे नमुद करण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर प्रकल्प उभारणीसाठी महानगरपालिका नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी घेण्यात आली किंवा कसे याबाबतचे अभिलेखे संचिकेमध्ये लावण्यात आलेले दिसून येत नाही, त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होत नाही. तसेच बांधकाम परवानगी घेतली नसल्यास विकास शुल्क व इतर शुल्कापोटी जमा होणाऱ्या रकमा प्राप्त न झाल्यामुळे महानगरपालिकेचे तेवढ्या रकमेचे नुकसान झालेले आहे. तसेच कंत्राटदारामार्फत प्रकल्प उभारणी करतांना करण्यात आलेले बांधकाम हे बांधकाम नियमावलीनुसारच करण्यात आलेले असल्याबाबत महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून कोणतीही तपासणी करण्यात आलेली नाही किंवा आरोग्य विभागामार्फत त्याप्रमाणे कोणतीही कार्यवाही करण्याबाबत नगररचना विभागास कळविलेले असल्याबाबत संचिकेवरुन दिसून आले नाही.

10) करारनामा अट क्र.11 नुसार वैद्यकीय व्यावसायिकांनी बायोमेडीकल वेस्ट प्रकल्पाचे सभासदत्व स्विकारण्यास विरोध केल्यास त्याचेवर कायदेशिर कारवाई करुन बील वसुल करण्याचे सहकार्य महानगरपालिका करेल. त्यानुसार सदर प्रकल्पाचे कंत्राटदाराकडे वैद्यकीय व्यावसायिकांनी नोंदणी करणे आवश्यक आहे, तथापी अशा प्रकारच्या नोंदणी

होत नसल्याने मनपा आरोग्य विभागाचे पत्र क्र.321 दिनांक 23/05/2008 नुसार 7 दिवसांचे आंत कंत्राटदारांकडे सभासदत्व स्विकारुन दवाखान्यात निर्माण होणारा जैविक कचरा नियमित वरील प्रकल्पास देण्याचे करावे व तसे केल्याबद्दल महानगरपालिकेस लेखी कळवावे, मुदतीनंतर जे व्यावसायिक नियमांचे उल्लंघन करीत असल्याचे निदर्शनास आल्यास आपणाविरुद्ध रु.500/- दंड व फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल अशा आशयाची नोटीसची प्रत संचिकेमध्ये लावण्यात आलेली आहे. तसेच त्यानंतर आरोग्य विभाग पत्र क्र.1675 दिनांक 02/01/2009 नुसार वैद्यकीय व्यवसायातून निर्माण होणारा जैविक घनकचरा पिवळया, लाल व काळया रंगांच्या विघटीत होणाऱ्या प्लास्टीक पिशव्यांमध्ये प्रवर्ग निहाय गोळा करावा. त्यानुसार वैद्यकीय व्यावसायिक यांचेकडून उल्लंघन करीत असल्याचे निदर्शनास आल्यास व तसे सिद्ध झाल्यास त्यांचेकडे असलेला साठा जप्त करुन रु.500/- दंड व फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल अशा आशयाची नोटीसची प्रत संचिकेमध्ये लावण्यात आलेली आहे. तथापी सदर दोन्ही नोटीस कोण-कोणत्या वैद्यकीय व्यावसायिकांना देण्यात आली याबाबतच्या पोहच संचिकेमध्ये लावण्यात आलेल्या दिसून येत नाही किंवा याबाबत वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्धी देण्यात आली असल्यास त्याबाबतचे कात्रणही संचिकेमध्ये लावण्यात आले नाही. त्यामुळे सदरच्या नोटीस संबंधित वैद्यकीय व्यावसायिक यांना खरोखरच देण्यात आल्या किंवा नाही याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होत नाही.

11) करारनामा अट क्र.15 नुसार महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या जागेचे भाडे हे वार्षिक रु.10000/- (रुपये दहा हजार मात्र) इतके निश्चित करण्यात आलेले आहे. तथापी त्यामध्ये कुठलीही दरवाढ नमुद करण्यात आलेली नाही. त्यामुळे भविष्यात वाढ होणारे बाजारभाव किंवा रेडी रेकनर यांमध्ये होणारी वाढ यानुसार जागेचे भाड्यामध्ये वाढ प्रस्तावित केलेली नसल्यामुळे महानगरपालिकेस सद्य:स्थितीत अत्यंत अल्प रक्कम प्राप्त होत असल्याने महानगरपालिकेचे वार्षिक उत्पन्नामध्ये नुकसान होत आहे. तसेच जागा भाडे हे आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वी जमा करणे आवश्यक असतांना सदर अटीनुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर जमा करणेबाबत अट नमुद करण्यात आलेली आहे, सदर बाब ही लेखापरीक्षणाचे दृष्टीने नुकसानकारक आहे.

12) करारनामा अट क्र.21 नुसार महानगरपालिका हद्दीतून व 200 कि.मी. परिसरातील सर्व प्रकारच्या दवाखान्यांमधून जैविक कचरा गोळा करणेबाबत निश्चित करण्यात आले, त्यानुसार जळगांव जिल्ह्यातील सर्व नगरपालिका, ग्रामपंचायत हद्दीमधील सर्व दवाखान्यांना याबाबत संबंधित नगरपालिका वा ग्रामपंचायत यांचेमार्फत महानगरपालिकेच्या वतीने कळविणे आवश्यक होते. तसेच याबाबत संबंधित नगरपालिका, ग्रामपंचायत यांचेकडून ठराविक कालांतराने म्हणजे सहामाही किंवा वार्षिक पडताळणी करुन अहवाल मागविणे आवश्यक होते. तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे जळगांव शहाराच्या बाहेरुन अन्य नगरपालिका वा ग्रामपंचायत हद्दीमधून कंत्राटदाराने किती दवाखान्यांमधून जैविक कचरा गोळा केला व त्यापोटी किती रकमा गोळा केल्या याबाबत महानगरपालिकेकडे कोणतेही अभिलेखे ठेवण्यात आलेले दिसून येत नाही. त्यामुळे कंत्राटदारामार्फत वरीलप्रमाणे नगरपालिका व ग्रामपंचायत हद्दीमधील दवाखान्यांमधून जैविक कचरा गोळा करण्यात येऊन त्यापोटी शुल्क गोळा करण्यात येते तथापी त्याबाबतची रॉयल्टी महानगरपालिकेकडे भरणा करण्यात येत

नसल्याचे व त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

13) करारनामा अट क्र.26 नुसार महानगरपालिकेचे अधिकारी सदर जागेची तपासणी करण्यास मागतील त्यावेळेस जागा तपासणीस उपलब्ध करणे आवश्यक आहे, तथापी प्रकल्प कार्यान्वीत झाल्यापासून ठराविक कालांतराने अशा प्रकारची तपासणी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांमार्फत करणे आवश्यक असतांना ती करण्यात आलेली असल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे/अहवाल संचिकेमध्ये लावण्यात आलेले दिसून येत नाही, त्यामुळे याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. त्याचप्रमाणे सदर अटीनुसार फक्त जागेची तपासणी करणेबाबत अट नमुद करण्यात आलेली आहे, तथापी अभिलेखे तपासणी करणे, जमा होणाऱ्या रकमांच्या अनुषंगाने कंत्राटदाराकडील अभिलेखे तपासणी करणे, कंत्राटदारामार्फत महानगरपालिकेकडे जमा होणाऱ्या रॉयल्टीच्या रकमांची तपासणी करणे तसेच इतर आवश्यक अनुषंगिक बाबी तपासणी करणे याबाबतच्या अटी नमुद करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे कंत्राटामध्ये आर्थिक मापदंडाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वतीने कोणतीही तपासणी होत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

14) करारनामा अट क्र.27 नुसार या प्रकल्पाबाबत महापालिकेने संबंधित वैद्यकीय व्यवसाय करणारे व्यावसायिक दवाखाने तसेच प्रयोगशाळा, क्लिनिक्स, गुरांचे दवाखाने यांना वेळोवेळी जैविक घनकचरा हाताळणे व व्यवस्थापन करणे यासाठी लागणारी माहितीपत्रक, दरपत्रक जाहिर करणे इत्यादीबाबतची जबाबदारी महापालिकेची राहील, जेणेकरुन कंपनीला याबाबतीत वसुली करतांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. त्यानुसार महानगरपालिकेने दिनांक 01/08/2012 पासूनचे लागू असणाऱ्या दरांबाबत वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धी दिलेली आहे, तथापी त्यानंतर प्रत्येक तीन वर्षांनंतर म्हणजे सन 2015, 2018, 2021 व 2024 चे दर प्रसिद्धीबाबतचे वृत्तपत्रांचे कात्रण संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे लेखापरीक्षण कालावधी सन 2016-17 व 2017-18 या कालावधीमध्ये लागू असलेले दर व त्यानुसार जमा होणाऱ्या रकमा याबाबत लेखापरीक्षणात प्रथमदर्शनी पडताळणी करता येत नाही.

15) करारनामा अट क्र.33 नुसार सदर प्रकल्पाच्या बांधकामाव्यतिरिक्त खुल्या जागेमध्ये वृक्ष लागवड करु जेणेकरुन पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही असे असतांना कंत्राटदाराने प्रकल्प स्थळी वृक्ष लागवड केली किंवा कसे याबाबतचे अभिलेखे, तपासणी अहवाल किंवा फोटो संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाहीत, त्यामुळे यानुसार कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होत नाही. तसेच अशा प्रकारची वृक्ष लागवड ही संबंधित कंत्राटदाराने करणे आवश्यक असतांना मनपा आरोग्य विभागाचे पत्र क्र.1912 दिनांक 07/03/2009 अन्वये शासनास पत्र सादर करतांना लॅण्ड फिलींगची जागा विकसित करणे व वृक्षलागवड करणेसाठी अंदाजे रु.100000/- एवढा खर्च अपेक्षित आहे, उक्त निधी प्राप्त झाल्यास मनपास वृक्ष लागवड व भुमीभरण जागेचा नियमाप्रमाणे विकास करता येईल असे सादर करण्यात आले. म्हणजेच कामाचा करारनामा दिनांक 02/08/2005 रोजी करण्यात आल्यानंतर कंत्राटदारामार्फत कोणतीही वृक्षलागवड करण्यात आलेली नसल्याचे सिद्ध होते व त्यासाठी कंत्राटदारास विचारणा करणे आवश्यक असतांना वृक्ष लागवडीसाठी शासनाकडे पुन:श्च स्वतंत्ररित्या निधी मागणी करणेची बाब ही कंत्राटदाराचे हित जोपासले गेले असल्याचे निदर्शनास येते.

16) सदर कामामध्ये कंत्राटदारामार्फत वैद्यकीय व्यावसायिक यांचेकडून ठरवून दिलेल्या दरानुसार फी जमा करावयाची आहे. त्याकरिता महानगरपालिकेने मोहोर उमटविलेले पावती पुस्तके कंत्राटदारास देणे व त्यानुसार कंत्राटदाराने हिशोब ठेवणे व त्याप्रमाणे रॉयल्टीची रक्कम जमा करणेची कार्यवाही करणे आवश्यक होते. तथापी कंत्राटदाराने वैद्यकीय व्यावसायिक यांना रकमा जमा केल्यापोटी पावती दिली किंवा कसे याबाबतचे अभिलेखे संचिकेमध्ये लावण्यात आलेले नसल्याने याबाबत पडताळणी करता आली नाही. परिणामी कंत्राटदारामार्फत जमा करण्यात येणाऱ्या रकमा परिपूर्ण न दर्शविता कमी प्रमाणात दर्शविण्यात येऊन महानगरपालिकेकडे त्याप्रमाणे कमी प्रमाणात रॉयल्टीच्या रकमा जमा करण्यात येत असल्याची व त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत असल्याचे तसेच याबाबत संबंधित आरोग्य अधिकारी यांनी याबाबत योग्य ती पडताळणी केलेली नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

17) कंत्राटदाराने वैद्यकीय व्यावसायिक यांचेकडून रकमा मागणी व जमा याबाबतचे विवरणपत्र सादर केलेली आहेत, तथापी त्याबाबत उभ्या बेरजा नमूद केलेल्या नसल्यामुळे एकूण मागणी किती होती त्यापैकी जमा किती झाली व थकबाकी किती राहीली याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होत नाही. विवरणपत्रामध्ये फक्त जमा रकमांची बेरीज करण्यात येऊन त्यावर रॉयल्टीची परिगणना करुन रकमा जमा केलेल्या आहेत. त्यामुळे सदर विवरणपत्रानुसार मागिल एकूण थकबाकी किती व चालू मागणी किती याबाबतही पडताळणी होत नाही. यावरुन महानगरपालिकेच्या वतीने संबंधित विभागामार्फत किंवा आरोग्य अधिकारी यांचेमार्फत कोणतीही पडताळणी करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास येते. सदर बाब ही वित्तीय शिस्तीस अनुसरुन नाही व त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत आलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

18) मंजूर निविदानुसार खाटांच्या संख्येनुसार दर निश्चित करण्यात आले असून त्यानुसार 10 खाटांकरिता, 11 ते 50 खाटांकरिता व 51 चे पुढे खाटांकरिता दर निश्चित करण्यात आलेले आहेत, तसेच सदर दरांमध्ये दर तीन वर्षांनी दरवाढ मंजूर करण्यात आलेली आहे. त्याबाबत महानगरपालिकेने सन 2015 पासून दरांची यादी प्रसिद्ध केलेली दिसून येत नाही. तथापी परिगणना करण्यात आली असता देय दरानुसार परिगणना करणे आवश्यक असतांना कंत्राटदाराने सादर केलेले विवरणपत्रामध्ये तफावत दिसून येते. उदाहरणादाखल माहे एप्रिल 2016 चे विवरणपत्रामधील काही रकमा खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत असून याप्रमाणे इतरही सर्व रकमांची परिगणना तपासणी करणे आवश्यक आहे, जेणेकरुन महानगरपालिकेचे नुकसान होऊ नये तसेच वैद्यकीय व्यावसायिक यांचेकडून जादा रकमा भरणा करण्यात आल्यामुळे त्याविरोधात कोणत्याही तक्रारी उद्भवू नयेत. तसेच याबाबत कंत्राटदाराने विवरणपत्र सादर केल्यानंतर आरोग्य विभागात तपासणी होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे तपासणी करण्यात आलेली नसल्याने विभागामार्फत त्यांची जबाबदारी पार पाडण्यात आलेली दिसून येत नाही.

अ. क्र.	दवाखान्याचे नांव	खाटांची संख्या	देय दर (प्रती खाट प्रती माह)	देय दरानुसार आकारणीची	प्रत्यक्ष आकारणी	तफावत

				रक्कम	केलेली रक्कम	
1	मुळीक नेत्रचिकित्सालय ला.ना.हायस्कूल समोर	7	3.48	730.80	710.50	-20.30
2	जावळे हॉस्पीटल ला.ना.हायस्कूल समोर	5	3.48	522.00	1511.25	989.25
3	डॉ.प्रमोद महाजन रुग्णसेवा हॉस्पीटल गांधीनगर	8	3.48	835.20	434.00	-401.20
14	मन्साई हॉस्पीटल विसनजी नगर	20	3.48 व 3.19	2001.00	1612.00	-389.00
17	इंडो अमेरिकन, विसनजी नगर	40	3.48 व 3.19	3915.00	4030.00	115.00
55	डॉ.अर्जुन भंगाळे हॉस्पीटल, ओंकार नगर	60	3.48 व 3.19 व 2.94	5754.00	5307.00	-447.00
93	गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट	100	3.48 व 3.19 व 2.94	9282.00	9455.00	173.00

19) कंत्राटदाराने सादर केलेल्या देयकानुसार दवाखानेनिहाय चालू मागणी, मागिल थकबाकी, एकूण मागणी व जमा रकमा इत्यादी रकाने दर्शविण्यात आलेले आहेत. माहे एप्रिल 2016 व माहे मे 2016 चे विवरणपत्रांची उदाहरणादाखल तपासणी करण्यात आली असता एप्रिल 2016 अखेर शिल्लक थकाबाकी ही मे 2016 मध्ये मागिल थकबाकीमध्ये दर्शवितांना तफावत दिसून येते. याबाबत कंत्राटदाराने विवरणपत्र सादर केल्यानंतर आरोग्य विभागात तपासणी होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे तपासणी करण्यात आलेली नसल्याने विभागामार्फत त्यांची जबाबदारी पार पाडण्यात आलेली दिसून येत नाही. तफावतीबाबतची काही उदाहरणे खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत असून याप्रमाणे इतर महिन्यांच्या विवरणपत्रातील सर्व रकमांबाबत तपासणी करणे आवश्यक आहे, जेणेकरुन कमी भरणामुळे महानगरपालिकेचे नुकसान होऊ नये त्याचप्रमाणे वैद्यकीय व्यावसायिक यांचेकडून जादा रकमा भरणा करण्यात आल्यामुळे त्याविरोधात कोणत्याही तक्रारी उद्भवू नयेत. तसेच खालील तफावतीच्या वसुलपात्र रकमा व इतर महिन्यांमधील अशा प्रकारच्या तफावतीच्या रकमा परिगणीत करण्यात येऊन संबंधित कंत्राटदाराकडून तात्काळ वसुली करण्यात याव्यात व महानगरपालिका निधीच्या खात्यामध्ये जमा करण्यात याव्यात.

अ. क्र.	दवाखान्याचे नांव	एप्रिल 2016 अखेर थकबाकी	मे 2016 मध्ये दर्शविलेली मागिल थकबाकी	तफावत

1	मुळीक नेत्रचिकित्सालय ला.ना.हायस्कूल समोर	8722.37	0.87	-8721.50
29	विवेकानंद हॉस्पीटल अंतरीक्ष भवन	2117.50	2660.00	542.50
32	गीताई लहान मुलांचे हॉस्पीटल	7027.40	7569.90	542.50
33	मीना हॉस्पीटल गांधी नगर	6230.80	6773.30	542.50
34	आशिर्वाद ॲक्सीडंट हॉस्पीटल नवीन बसस्थानक	1274.44	1708.44	434.00
35	कोगटा हॉस्पीटल प्रभात कॉलनी	3738.89	4064.39	325.50
38	चव्हाण आर्थो हॉस्पीटल स्वातंत्र चौक	2099.44	-2.56	-2102.00
39	चव्हाण आर्थो हॉस्पीटल स्वातंत्र चौक	1592.50	0.00	-1592.50
40	ओम हॉस्पीटल विवेकानंद नगर	3844.75	1.00	-3843.75
41	डॉ.आर.एच.अग्रवाल हॉस्पीटल	955.98	325.48	-630.50
42	दिव्यज्योती आय हॉस्पीटल	1049.75	349.75	-700.00
43	मातृसेवा हॉस्पीटल	8872.50	3022.50	-5850.00
44	तेजस चाईल्ड हॉस्पीटल	913.74	810.80	-102.94
47	सुचेतन हॉस्पीटल	23054.00	25069.00	2015.00

20) कंत्राटदारामार्फत मासिक जमा रकमांचे विवरणपत्र सादर करतांना त्याबाबतचे कंत्राटदाराचे पत्रामध्ये जळगांव शहर, भुसावळ शहर व चोपडा शहरातून जमा झालेल्या संपूर्ण रकमेचा गोषवारा सादर करीत आहे असे उल्लेख करण्यात आलेले आहेत, तथापी यादीमधील दवाखान्यांची तपासणी करण्यात आली असता सर्व दवाखाने हे जळगांव शहरातील दिसून येतात, यादीमध्ये फक्त शेवटचे तीन दवाखाने हे अडावद येथील नमूद करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भुसावळ व चोपडा शहरातील रकमा जमा करण्यात आल्याबाबतचा उल्लेख फक्त पत्रामध्ये करण्यात येऊन यादी जोडण्यात आलेली नसल्याने कंत्राटदारामार्फत संपूर्ण रकमा दर्शविण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. तसेच इतर नगरपालिका व ग्रामपंचायत हद्दीमधील दवाखान्यांकडूनही रकमा कंत्राटदारामार्फत जमा करण्यात येत असतांनाही यादी सादर करतांना त्यामध्ये नमूद करण्यात येत नसल्याने अशा दवाखान्यांच्या जमा रकमांमधून रॉयल्टीच्या रकमा महानगरपालिकेत भरणा करण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. याबाबत संबंधित

आरोग्य अधिकारी यांनी त्यांची जबाबदारी पार पाडलेली नसल्याचे निदर्शनास येते.

21) जनरल प्रॅक्टीशनर यांचे दर रु.276/- प्रमाणे आकारणी करण्यात आलेली आहे. याबाबतचा सन 2012 चा दर रु.276/- असा होता व त्यानंतर तीन वर्षांनी म्हणजे दिनांक 01/08/2015 पासून 5% वाढ प्रमाणे रु.290/- नुसार आकारणी करणे आवश्यक असतांना माहे ऑक्टोबर 2016 पासून रु.290/- प्रमाणे आकारणी करण्यात आलेली आहे. त्यामुळे ऑगष्ट 2015 ते सप्टेंबर 2015 अशा 02 महिन्यांची आकारणी कमी करण्यात आलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडे जमा होणारी रॉयल्टीची रक्कम कमी जमा झालेली आहे. याबाबत संबंधित कंत्राटदार यांना जबाबदार धरण्यात येऊन त्यांचेकडून रॉयल्टीच्या फरकाची रक्कम परिगणीत करण्यात येऊन वसुल करण्यात यावी व महानगरपालिकेच्या निधीमध्ये जमा करण्यात यावी.

22) माहे एप्रिल 2016 चे विवरणपत्र व माहे मार्च 2018 चे विवरणपत्र तपासणी केले असता त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दवाखान्यांच्या संख्येमध्ये व खाटांच्या संख्येमध्ये वाढ झालेली दिसून येत नाही. दोन वर्षांच्या कालावधीमध्ये जळगांव शहर व 200 कि.मी. हद्दीमध्ये अनेक दवाखाने/क्लीनिक/जनरल प्रॅक्टीशनर यांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून विवरणपत्रामध्ये वाढ करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे वाढ करण्यात आलेली नसल्याने महानगरपालिकेचे रॉयल्टी रकमेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

23) दवाखान्यांच्या संख्ये वाढ किंवा घट झालेली असल्याबाबत आरोग्य विभागाने कर संकलन विभाग, नर्सिंग होम नोंदणी विभाग, इतर नगरपालिका व ग्रामपंचायती यांचेकडून दरवर्षी अहवाल मागविणे व त्यानुसार परिगणना तपासणी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे आरोग्य विभागामार्फत कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे दिसून येते. याबाबत महानगरपालिकेमार्फत पत्र क्र.1223 दिनांक 12/03/2010 अन्वये जळगांव जिल्ह्यातील 13 नगरपरिषदांना (जामनेर, रावेर, सावदा, फैजपूर, अमळनेर, पाचोरा, चाळीसगांव, धरणगांव, भडगांव, यावल, चोपडा, पारोळा, एरंडोल) त्यांचे नगरपालिका हद्दीमधून जैविक कचरा मनपाच्या प्रकल्पात आणतात कां, आणत असल्यास कधीपासून कृपया चौकशी करुन माहिती सादर करण्याबाबत कळविण्यात आले, तथापी त्याबाबतचा कुठलाही अहवाल महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही त्याचप्रमाणे अशा अहवालाबाबत महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा करण्यात आलेला दिसून येत नाही. यावरुन संबंधित विभागामार्फत योग्य ती तपासणी करण्यात येत नसल्याचे व संबंधित कंत्राटदाराचे हित जोपासले जात असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

24) डॉ.मनिषा दावलभक्त, सेक्रेटरी, आयएमए भुसावळ यांचे पत्र दिनांक 23/01/2010 अन्वये मन्साई बायो. कंपनी ही भुसावळ शहरातील जैविक कचरा विल्हेवाट लावत आहे, त्यासाठी ट्रान्सपोर्ट चार्ज रु.75/- दरमहा वेगळे आकारत असून ट्रान्सपोर्ट चार्जची रिसीट देत नाही तसेच महानगरपालिका जळगांव प्रशासनाची दिशाभूल करत असून रॉयल्टी भरत नाही. तरी कृपया सदरील प्रकरणाची चौकशी करुन ट्रान्सपोर्ट चार्ज भरावे किंवा नाही तसे आम्हास कळवावे ही विनंती अशा आशयाचे पत्र महानगरपालिकेस दिले. त्यानुसार कंत्राटदाराकडून खुलासा न मागविता उलटपक्षी डॉ.दावलभक्त यांना मन्साई बायोमेडीकल व आयएमए यांनी केलेल्या करारनाम्याची प्रत पाठवावी असे कळविलेले

आहे. वास्तविक कंत्राटदार व महानगरपालिका यांचेदरम्यान 200 कि.मी. हद्दीमधील दवाखान्यांकडून जैविक कचरा गोळा करणेबाबत करारनामा झालेला असल्याने कंत्राटदार व आयएमए यांचे करारनाम्याची प्रत तक्रारदार यांचेकडून मागणी करणे ही बाब तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही न करता उलटपक्षी कंत्राटदाराचे हित जोपासले गेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. त्याचप्रमाणे सदर विषयाबाबत दिनांक 06/02/2010 रोजी मा.आयुक्त यांचे दालनात बैठकीमध्ये निर्णय झाल्यानुसार भुसावळ तसेच इतर शहरातील व्यावसायिक यांचेकडून ट्रान्सपोर्ट फी नियमबाह्य वसुल करीत आहे, सदर वसुल केलेली फी संबंधितांना दिनांक 20/02 पूर्वी परत करावी असा निर्णय झाला. याबाबत मनपा पत्र क्र.1204 दिनांक 09/03/2010 अन्वये संबंधित कंत्राटदार यांना नोटीस देण्यात आली त्यामध्ये दरमहा 15 तारखेपर्यंत न भरल्यास सदर रकमेवर त्यापुढील तारखेपासून 12% प्रमाणे व्याज आकारुन सदर रकमेसह वसुल केली जाईल, दिनांक 06/02/2010 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तानसार नियमबाह्य वाहतुक फी वसुल केलेल्या रकमा दिनांक 20/02/2010 पूर्वी परत करण्यात याव्यात. तथापी याबाबत कंत्राटदारामार्फत रकमा परत करण्यात आल्या किंवा कसे याबाबत अभिलेखे ठेवण्यात आलेले नसल्यामुळे लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. तसेच याबाबत संबंधित कंत्राटदार यांचेकडे पाठपुरावाही करण्यात आलेला दिसून येत नाही. तसेच सदर पत्रव्यवहारावरुन भुसावळ नगरपालिका हद्दीमधील दवाखान्यांकडून जैविक कचरा गोळा करण्यात येत होता मात्र कंत्राटदारामार्फत सादर करण्यात येणाऱ्या यादीमध्ये भुसावळ शहरामधील दवाखान्यांच्या नांवाचा समावेश दिसून आला नाही, त्यामुळे कंत्राटदारामार्फत महानगरपालिकेची दिशाभूल करण्यात येत असल्याचे निदर्शनास येते तसेच याबाबत संबंधित विभागामार्फतही योग्य ती पडताळणी करण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

25) रॉयल्टीच्या रकमा जमा करणेबाबतचे टप्पे वर तपशिलामध्ये दर्शविण्यात आले असून त्यानुसार शेवटच्या टप्प्याच्या कालावधीत मुदत ही 12 ऐवजी 13 ते मुदत संपेपर्यत असे नमुद करणे आवश्यक होते, यामुळे संदिग्धता निर्माण होत आहे. कार्यादेश निर्गमित केलेनंतर कालावधी हा गणना करुन 12 वर्ष पुर्ण झाल्यानंतर म्हणजेच दिनांक 01/08/2017 पासुन प्लांटच्या रॉयल्टीपोटी रक्कम 20% प्रमाणे देय असतांना ती 17% दराने आकारणी करण्यात आल्यामुळे कमी रॉयल्टीची रक्कम जमा करण्यात आलेली आहे, त्यामुळे खालीलप्रमाणे कमी जमा रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुलपात्र ठरते. त्याचप्रमाणे त्यापुढे ज्या महिन्यापर्यंत 17% प्रमाणे रक्कम जमा करण्यात आलेली आहे त्याची पुनर्गणना करण्यात येऊन 3% फरकाची रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात यावी व महानगरपालिका निधीमध्ये जमा करण्यात यावी.

अ.क्रं.	माहे	एकुण जमा रक्कम	17% प्रमाणे वसुल	20% प्रमाणे देय रक्कम	कमी जमा रक्कम रुपये
1	ऑगस्ट-2017	255223	43119	51045	7926
2	सप्टेंबर-2017	248950	42321	49790	7469

3	ऑक्टोबर-2017	263986	44877	52797	7920
4	नोव्हेंबर-2017	239863	40776	47973	7197
5	डिसेंबर-2017	141737	24094	28347	4253
6	जानेवारी-2018	399014	67832	79803	11971
7	फेबुरवारी-2018	297122	50855	59424	8569
8	मार्च-2018	368138	62581	73628	11047
	एकूण	**2214033**	**376455**	**442807**	**66352**

26) महानगरपालिका आरोग्य विभागाचे पत्र क्र.1912 दिनांक 07/03/2009 अन्वये कक्ष अधिकारी यांना अहवाल सादर करतांना त्यामध्ये शाळा कॉलेज, गुरांचे दवाखाने व औद्योगिक कारखाने यांनी शहरातील संख्या प्रत्येकी 0 अशी दर्शविण्यात आलेली असून त्यामध्ये कंत्राटदार यांचेकडे औद्योगिक कारखान्यांची नोंदी 04 अशी दर्शविण्यात आलेली आहे. जळगांव शहर व 200 किमी परिसरामध्ये अनेक शाळा व कॉलेजेस् असून त्यांचेकडे प्रयोगशाळा कार्यान्वीत असतात, जळगांव शहारामध्ये दोन गुरांचे दवाखाने असून अनेक खाजगी व्यावसायिकही आहेत, त्याचप्रमाणे 200 किमीच्या हद्दीमध्ये अनेक ठिकाणी जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच गुरांचे दवाखाने, शासनाचे उपजिल्हा रुग्णालये कार्यरत आहेत. तथापी याप्रमाणे शाळा/कॉलेज प्रयोगशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, गुरांचे दवाखाने, उपजिल्हा रुग्णालय व औद्योगिक कारखाने यांचेकडील जैविक कचरा संकलनापोटी जमा होणारी रक्कम सन 2016-2017 व 2017-2018 मधील कंत्राटदाराने सादर केलेले विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेली नाही. त्यामुळे याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. तसेच आरोग्यधिकारी यांनी योग्य ती तपासणी केलेली नसल्याचे त्यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडलेले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

27) टिपणी दिनांक 24/01/2006 अन्वये कंत्राटदाराने त्यांचे पत्र दिनांक 16/01/2006 नुसार संस्थेस बँकेमार्फत कर्ज मिळणेसंदर्भात सादर केलेली आहे. त्यावर विधी सल्लागार यांचे अभिप्रायानुसार त्रिपक्षीय करारनाम्यातील अटींमध्ये बदल सुचविण्यात आलेले आहेत. तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली किंवा कसे, तसेच कंत्राटदारास कंत्राटदारास कर्ज मिळणेसंदर्भात आवश्यक प्रमाणपत्र देण्यात आले किंवा कसे, देण्यात आले असल्यास त्याबाबतच्या अटी/शर्ती कंत्राटदारास कोणत्या नमुद करण्यात आल्या किंवा त्याऐवजी कंत्राटदाराचा अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली याबाबतचे अभिलेखे संचिकेमध्ये लावण्यात आलेले नसल्याने याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी होत नाही.

28) सदर कंत्राटामध्ये कंत्राटदाराने निविदा भरतेसमयी रु.25000/- ची इसारा रक्कम भरणा केलेली आहे, त्यानंतर

करारनामा करतेवेळी कोणतीही सुरक्षा रक्कम भरणा करण्यात आलेली दिसून येत नाही. सदर निविदा भरतेवेळी सादर केलेली इसारा रक्कम संबंधित कंत्राटदार यांना परत करण्यात आली किंवा सुरक्षा रकमेमध्ये वळती करण्यात आली याबाबत संचिकेमध्ये कुठेही उल्लेख दिसून येत नाही, तसेच करारनाम्यामध्येही सुरक्षा रकमेबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे लेखा विभागामार्फत द्विनोंद लेख्यांमधील अनामत रकमांच्या विवरणपत्रामध्ये सदर कंत्राटदाराची अनामत रक्कम जमा असलेबाबत नोंद दिसून येत नाही. त्यामुळे सदर कंत्राटामध्ये कंत्राटदाराकडून सुरक्षा रक्कम जमा करण्यात आलेली असल्याचे किंवा त्यापोटी मुदत ठेव पावती/बँक गॅरंटी घेण्यात आलेली नसल्याचे दिसून येते. सदर कराराचा कालावधी हा 20 वर्षांइतका दिर्घ असल्याने व निविदेमध्ये नमुद दवाखान्यांची/खाटांची संख्या व वेळोवेळी होणाऱ्या दरवाढीनुसार परिगणना केल्यानुसार अपेक्षित उत्पन्न हे जवळ-जवळ रु.1.74 कोटी इतके येते व त्यानुसार 10% प्रमाणे रु.17.40 लक्ष इतकी सुरक्षा रक्कम जमा करुन घेणे आवश्यक होते. सदर कंत्राटाचा कालावधी हा सन 2005 पासून 20 वर्ष म्हणजे सन 2025 पर्यंत असून सदर कालावधी संपण्यास आता अत्यंत अल्प कालावधी (दिनांक 12/07/2025 पर्यंत) शिल्लक राहिलेला आहे. संबंधित कंत्राटदार यांनी मागिल कालावधीमध्ये रॉयल्टीच्या रकमा कमी जमा केलेल्या असल्याने तसेच भविष्यात मागिल रकमांसह पुढील रॉयल्टीच्या रकमा जमा न केल्यास महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी वरीलप्रमाणे लेखापरीक्षणामध्ये उपस्थित मुद्यांनुसार योग्य ती पडताळणी करण्यात येऊन वसुलीच्या रकमा परिगणीत करण्यात याव्यात व त्याप्रमाणे संबंधित कंत्राटदार यांच्याकडून तात्काळ वसुल करण्यात याव्यात.

29) प्रकल्प सुरु झाल्यापासून दरमहा प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाबाबत आरोग्य विभागामध्ये एका स्वतंत्र नोंदवहीमध्ये नोंदी घेणे व त्यानुसार दरमहा तसेच वार्षिक उत्पन प्राप्त होत आहे किंवा कसे, प्रकल्प सुरु झाल्यापासून आतापर्यंत एकूण किती उत्पन्न प्राप्त झालेले आहे यावर आरोग्य विभागामार्फत लक्ष ठेवणे आवश्यक आहे. तथापी अशा प्रकारे नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्यामुळे एकूण उत्पन्नाबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होत नाही. तसेच कंत्राटाचा कालावधी संपल्यानंतर अंतिमत: प्रकल्प राबविल्यामुळे अपेक्षित उत्पन्न प्राप्त झाले किंवा कसे व त्यामुळे महानगरपालिकेला प्रत्यक्षात लाभ झाला किंवा नुकसान झाले याबाबतच्या फलनिष्पत्तीबाबतही पडताळणी होणे आवश्यक आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.272 दिनांक 24/05/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 189, Hmm No : 272)

113 महानगर पालिका जळगाव अंतर्गत बालवाडी मधील विदयार्थाना पुरविण्यात येणाऱ्या पोषण आहार करीता राबविण्यात आलेली ईनिविदा प्रक्रीयेत झालेली अनियमितता

योजना : **लेखाशीर्ष :** 0 **वसुलपात्र :** 600.00/-

निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या दोन आर्थिक वर्षाचे महीला व बालकल्याण विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. जळगाव शहर महानगरपालिकेच्या अंतर्गत महीला व बालकल्याण विभागाकडील मनपा बालवाडीतील विदयार्थ्योकरिता पोषण आहार पुरविणेबाबत राबविण्यात आलेली ईनिविदा प्रकीया संचिकेची तपासणी करण्यात आली, त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

वित्तीय वर्ष	2016-2017
कामाचे नाव	मनपा बालवाडीतील विदयार्थ्या करिता पोषण आहार पुरविणे बाबतची जाहीर निविदा
ईनिविदा प्रसिद्धी दिनांक	दै.दिव्य मराठी 03/07/2016
मुदतवाढ ईनिविदा प्रसिद्धी दिनांक	दै.दिव्य मराठी 15/07/2016
फॉर्म फी	रु.1,000/-
इसारा रक्कम	रु.19,000/-
ईनिविदा किमंत	19,29,845/-
एकूण प्राप्त निविदा	03
तांत्रीक निविदा उघडल्याचा दिनांक	दि. 11/08/2016
आर्थिक निविदा उघडल्याचा दिनांक	दि. 24/08/2016
सर्वात कमी दरची निविदा	श्री लोकशाही महीला ग़ह उदयोग सोसा.
करारनामा दिनांक	21/12/2016
कार्यादेश क्रमांक व दिनांक	संदर्भ क्र./ज.म.न.पा/म.व.बा.क./2144/2016-17, दिनांक 02/01/2017

प्रती दिन विदयार्थी दर	रु.3.90/-
कालावधी	12 महिने (2016-2017)
वित्तीय वर्ष	2017-2018
कामाचे नाव	मनपा बालवाडीतील विदयार्थ्या करिता पोषण आहार पुरविणे बाबतची जाहीर निविदा
ईनिविदा प्रसिद्धी दिनांक	दै.दिव्य मराठी 12/05/2017
ईनिविदा प्रसिद्धी दिनांक	दै.दिव्य मराठी 06/06/2017
ईनिविदा प्रसिद्धी दिनांक	दै.दिव्य मराठी 30/06/2017
ईनिविदा प्रसिद्धी दिनांक	दै.दिव्य मराठी 06/08/2017
फॉर्म फी	रु.1,000/-
इसारा रक्कम	रु.19,000/-
ईनिविदा किमंत	19,58,775/-
एकूण प्राप्त निविदा	03
तांत्रीक निविदा उघडल्याचा दिनांक	दि. 28/08/2017
आर्थिक निविदा उघडल्याचा दिनांक	दि. 14/09/2017
सर्वात कमी दरची निविदा	गुलाब महिला बचत गट
करारनामा दिनांक	27/10/2017
कार्यादेश क्रमांक व दिनांक	संदर्भ क्र./ज.म.न.पा/म.व.बा.क./2053/2017-18, दिनांक 31/10/2017
प्रती दिन विदयार्थी दर	रु.3.20/-
कालावधी	12 महिने (2017-2018)

जळगाव शहर महानगरपालिकेच्या अंतर्गत महीला व बालकल्याण विभागाकडील मनपा बालवाडीतील विदयार्थ्योकरिता पोषण आहार पुरविणेबाबत राबविण्यात आलेली ई-निविदा प्रकीया संचिकेचे लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) वरीलप्रमाणे करण्यात आलेली कामे ही ठराविक दोन कंत्राटदार यांनाच देण्यात आलेली आहे. सदर कामांच्या निविदा प्रक्रीयेमध्ये एकसारखेच तीन निविदाकार भाग घेत असल्याचे दिसून येते. त्यापैकी दोन निविदाकारांनी आलटून-पालटून निविदा दर कमी भरुन कामे मिळविलेली आहेत. त्यामुळे संगनमताने कामे मिळविल्याचे दिसून येते.

02) उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाकस 2014 /प्र.क्र. 82 /भाग III / उदयोग 4 मंत्रालय, मुंबई दिनांक 30/10/2015 व दिनांक 01/12/2016 शासननिर्णय प्रकरण 2 मधील 2.9.3 अन्वये जिल्हास्तरावर समिती स्थापन करणे, निविदाकारांच्या उपस्थितीत समितीने निविदा उघडणे, निविदा उघडल्यानंतर निविदाकारांसमोर निविदा उघडल्याबाबत त्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे आवश्यक आहे, तथापी निविदाकारांच्या उपस्थितीत निविदा उघडण्यात येऊन त्याबाबत त्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नसल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे निविदा प्रक्रीया ही पारदर्शक पद्धतीने राबविण्यात आलेली नाही असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

03) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. परंतु सन 2016-2017 मध्ये पोषण आहार करारनामे हे रु.200/- चे मुद्रांकावर करण्यात आलेले आहेत, परंतु 1601 विदयाथी करीता मंजूर करण्यात आलेला दर रुपये 3.90 दराने 245 दिवसांकरीता रक्कम रुपये 15,29,756/- इतकी निविदा रक्कम असल्यामुळे अशा कामांचे करारनामा हा एकूण रु.1100/- मुद्रांकावर करणे आवश्यक होते. यास्तव एकूण रु.900/- चे शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे. तसेच 2017-2018 मध्ये पोषण आहार करारनामे हे रु.200/- चे मुद्रांकावर करण्यात आलेले आहेत, परंतु 1625 विद्यार्थ्यांकरिता मंजूर करण्यात आलेला दर रुपये 3.20 दराने 245 दिवसांकरीता रक्कम रुपये 12,74,000/- इतकी निविदा रक्कम असल्यामुळे अशा कामांचे करारनामा हा एकूण रु.800/- मुद्रांकावर करणे आवश्यक होते. यास्तव एकूण रु.600/- चे शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रकमा वसुल करुन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

04) वरील दोन्ही आर्थिक वर्षाच्या पोषण आहाराच्या कामांचे आदेशामध्ये किंवा करारनाम्यांमध्ये पोषण आहार पुरविण्याचा कालावधी कुठेही नमूद करण्यात आलेला दिसून येत नाही.

05)जळगाव शहर महानगरपालिकेच्या अंतर्गत महीला व बालकल्याण विभागाकडील मनपा बालवाडीतील विदयार्थ्योकरिता पोषण आहार पुरविणेबाबत राबविण्यात आलेली ईनिविदा प्रकीया ही विलंबाने राबविण्यात आलेली आहे म्हणजे सन 2016-2017 करीता ईनिविदा प्रक्रीयेची जाहिरात दिनांक 03/07/2016 व मंजुरी ही दिनांक

02/01/2017 व सन 2017-2018 करीता ईनिविदा प्रक्रीयेची जाहिरात 12/05/2017 मंजुरी ही दिनांक 31/10/2017 रोजी मिळाली आहे . तरी सदरची ईनिविदेची प्रक्रीया ही तीन महिने आधी सुरु करणे आवश्यक असल्याचे लेखा परिक्षणाचे मत आहे

06) महाराष्ट शासन महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि 2010 / प. क. 113 / का-5 मंत्रालय, मुंबई दिनांक 26 सप्टेबर 2011 रोजीच्या शासननिर्णयानुसार प्रति दिन प्रति लाभार्थी आहाराचा दर हा रु. 4.92/- इतका करण्यात आला असुन सुध्दा संबधित कंत्राटदार यांनी सन 2016-2017 मध्ये प्रति दिन प्रति लाभार्थी आहाराचा दर हा रु. 3.90/- व सन सन 2017-2018 मध्ये प्रति दिन प्रति लाभार्थी आहाराचा दर हा रु.3.20/- इतका मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच पोषण आहाराची अन्न व औषध प्रशासन यांच्याकडून तपासणी करण्यात आलेले अहवाल संचिकेत जोडलेली नसल्याने संबधीत कंत्राटदाराने मनपा बालवाडीतील विदयार्थ्यांना पुरविलेला पोषण आहार हा दर्जात्मक आहे किंवा कसे या बाबत संदेह निर्माण होतो.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 126 दिनांक 03/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 36, Hmm No : 126)

114 महानगर पालिका जळगाव महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत बालवाडीतील विदयार्थाना 15 ऑगस्ट व 26 जानेवारी रोजी पुरविण्यात येणारा खाऊ अंध अंपगांना साहित्य पुरविल्याचे देयक व बालवाडीतील विदयार्थाना शिष्यवत्ती इत्यादी देयकांची व नस्तीची तपासणी केली असता त्यात आढळून आलेली वित्तीय अनियमितते बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	400.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षाचे महीला व बालकल्याण विभागा लेखापरीक्षण करण्यात आले आहे. जळगाव शहर महानगरपालिका महीला व बालकल्याण विभाग अंतर्गत अंध अंपगाना साहित्य पुरविल्याचे देयक व नस्ती, बालवाडीतील विदयार्थाना 15 ऑगस्ट व 26 जानेवारी रोजी पुरविण्यात येणारा खाऊ यांचे देयक व नस्ती, व बालवाडीतील विदयार्थाना शिष्यवत्ती इत्यादी देयकांचे लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

A) अंध अंपगाना साहित्य पुरविल्याचे देयक व नस्ती :-

सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही वर्षात अंध व अंपगाना साहित्य पुरविलेल्या देयके तपासली त्यांचा

तपाशील खालील प्रमाणे

अ.नं.	प्रमाणक क्रमांक व दिनांक	पुरवठादाराचे नाव	प्रमाणक रक्कम
1	628/2017 दिनांक 22/06/2017	छाबडा एजन्सीज, जळगांव	1,11,200/-

अंध अंपगांना साहित्य पुरविल्याचे देयकाचे लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 628/2017 दिनांक 22/06/2017 रु.1,11,200/- या देयकाची तपासणी केली असता 1) Tricycle (तीनचाकी सायकल) 07 नग 2) Walking Tripod 01 नग 3) Wheal Walkar 01 नग 4) Afko Caliper 05 नग 5) Blind Stick 01 नग इतके पुरविण्यात आले आहे. तथापी सदर देयका सोबत पुरवठादाराचे मुळ उपप्रमाणक हे वित्त शाखेकडील मुळ प्रमाणकांना जोडणे आवश्यक असतांना छायाकिंत प्रत जोडली आहे. मुळ प्रत निविदा संचिकेमध्ये जोडण्यात आलेले आहे.

2) नगर पालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 166 अन्वये अपंग साहित्य खरेदी मेसर्स छाबडा एजन्सीज या देयकावर पेड अॅण्ड कॅन्सलचा (Paid and cancled) शिक्का मारण्यात आलेला नाही. त्यामुळे सदरची देयके पुन्हा खर्च करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) उपरोक्त देयकांसोबत मंजुर कार्यालयीन टिपणी सोबत जोडण्यात आलेली आहे परंतु त्या कार्यालयीन टिपणीत फक्त अंपग साहित्य यांचा तपाशील नमुद आहे. परंतु अपंग व्यक्तींचे नाव व संख्या नमुद करण्यात आलेले नाही.

4) उपरोक्त देयकांसोबत अंपग व्यक्तीची यांचे वैदयकिय प्रमाणपत्र देयकासोबत जोडण्यात आलेले नाही.

5) अपंग साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याचे तसेच जडवस्तु संग्रहनोंदवही मध्ये नोंद घेतल्याबाबतचा शेरा मुळ देयकावर नोदविण्यात आलेला नाही.

6) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्र. 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. अपंग व्यक्तिीं करती साहित्य खरेदी करारनामा हा रु.100/- चे मुद्रांकावर करण्यात आलेले आहेत, परंतु खरेदी रक्कम रुपये 1,11,200/- इतकी निविदा रक्कम असल्यामुळे अशा कामांचे करारनामा हा एकूण रु.500/- मुद्रांकावर करणे आवश्यक होते. यास्तव एकूण रु.400/- चे शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे. तरी संबंधित कंत्राटदार यांचेकडून रकमा वसुल करुन शासनाचे योग्य त्या लेखाशिर्षा भरणा करण्यात यावी.

7) अपंग व्यक्तिींकरीता साहित्य खरेदीची नस्ती मध्ये व प्रमाण क्रमांक 628/2017 दिनांक 22/06/2017 रु.1,11,200/-

यात मेसर्स छाबडा एजन्सीज, जळगाव यांचे मुळ डिलीव्हरी चलन आढळून आलेले नाही .

8) मेसर्स छाबडा एजन्सीज, जळगाव यांना दिनांक 06/12/2016 रोजी अपंग साहित्य पुरविणे व करारनामा करण्याबाबत कळविण्यात आल. तदनंतर दिनांक 01/02/2017 रोजी करारनामा करण्यात आला. परंतु अपंग साहित्य वाटप दिनांक 03/01/2017 रोजी करण्यात आले. यावरुन असे निर्दशनास येते की करारनामा करण्यापुर्वीच अपंग साहित्य वाटप करण्यात आले आहे. याबाबत लेखापरिक्षणास खुलासा सादर करण्यात आला नाही.

9) मेसर्स छाबडा एजन्सीज, जळगाव यांच्याशी दिनांक 01/02/2017 रोजी करारनामा करण्यात आला. त्यातील अट क्रमांक 9 नुसार नमुद साहित्य खराब अथवा नादुरुस्त आलेस ते गॅरंटी कालावधीत बदलून तसेच दुरुस्त करुन देणे हे मान्य आहे असे नमुद केले आहे परंतु करारनाम्यात गॅरंटी कालावधी नमुद करण्यात आलेला नाही.

10) दिनांक 11/08/2016 रोजी जळगांव शहरातील अपंगाची तपासणी शिबीर श्री छत्रपती शाहू महाराज रुग्णलाय, शाहू नगर येथे घेण्यात आले होते. त्या शिबिराचा अहवाल व रिपोर्ट अपंग व्यक्तींची नावासह वैदयकिय अधिकारी यांनी दिनांक 16/08/2016 रोजी महानगरपालिकेस सादर केला. त्या अहवाल व रिपोर्ट मधील अपंग रुग्णाचे नावे व अपंग साहित्य स्वीकारणा-या अपंग व्यक्तींची नावे यांची तपासणी केला असता. वैदयकिय अधिकारी यांचा दिनांक 16/08/2016 रोजीचा अहवाल व रिपोर्ट मध्ये अपंग व्यक्तींचे नाव असुन सुध्दा खालील अपंग व्यक्तींना साहित्य वाटप करण्यात आलेले नाही. त्यामुळे अपंग साहित्य वाटप हे नियमाप्रमाणे झाले नसल्याचे लेखापरिक्षकांचे मत आहे.

अ.क्र.	साहित्य स्वीकारणा-या अपंग व्यक्तींची नावे
2	गणेश अजय चौधरी जानकी नगर, जळगाव
10	प्रियंका रामदास बिढे , शंकरराव नगर

11) अपंग बांधवांचे नोंदवहि रजिष्टर (27/08/2015 ते 31/05/2016) अनुक्रमांक 1 ते 110 मधील नावांची यादी व अपंग साहित्य स्वीकारणा-या अपंग व्यक्तींची नावे यांची तपासणी केला असता. अपंग बांधवांचे नोंदवहि रजिष्टर मध्ये नोंद नसतांना देखील खालील अपंग व्यक्तींना साहित्य वाटप करण्यात आले. त्यामुळे अपंग साहित्य वाटप हे नियमाप्रमाणे झाले नसल्याचे लेखापरिक्षकांचे मत आहे.

अ.क्र.	साहित्य स्वीकारणा-या अपंग व्यक्तींची नावे
2	करण सुनिल जाधव
5	प्रियंका रामदास भिळे
6	पुष्पा रघुनाथ चौधरी

12, 13	विजया नामदेव मोरे
14	शोभा सदाशिव डहाके

B) बालवाडीतील विदयार्थाना 15 ऑगस्ट व 26 जानेवारी रोजी पुरविण्यात येणारा खाऊ :-

जळगाव शहर महानगरपालिका महीला व बालकल्याण विभागामार्फत दरवर्षी बालवाडीतील विदयार्थाना 15 ऑगस्ट व 26 जानेवारी रोजी खाऊचे वाटप करण्यात येत असते. सन 2016-2017 व 2017-2018 या वित्तीय वर्षातील खाऊ वाटपाच्या नस्तींचे अवलोकन, तपासणी व लेखापरिक्षण केले असता. तसेच 15 ऑगस्ट 2016 व 26 जानेवारी 2017, 15 ऑगस्ट 2017 व 26 जानेवारी 2018 या रोजी बालवाडीतील विदयार्थाना खाऊचे वाटप करण्यात आले त्याची नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली आहे तसेच लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) 26 जानेवारी 2017 रोजी 1625 विदयार्थी, 15 ऑगस्ट 2017 रोजी 1700 विदयार्थी व 26 जानेवारी 2018 1700 विदयार्थी यांना खाऊचे वाटप करण्यात आले . परंतु विदयार्थी संख्या कशी निश्चित केली याबाबत कोणताही पुरावा नस्ती सोबत जोडण्यात आलेला नाही तसेच विदयार्थी यांचे हजेरीपट सुध्दा सोबत जोडण्यात आलेले नाही.

2) 15 ऑगस्ट 2017 रोजी बालवाडी विदयार्थी यांना खाऊ वाटप करणे कामी मेसर्स श्री दिनेश हिरालाल जोशी यांच्या कडून खाऊ खरेदी करण्यात आला. परंतु दिनांक 09/08/2016 रोजी मेसर्स श्री दिनेश हिरालाल जोशी यांना कार्यादेश देण्यात आला पण करारनामा दिनांक 23/10/2017 रोजी करण्यात आला. म्हणजेच करारनामा हा खाऊचा पुरवठा केल्यानंतर करण्यात आला आहे. याबाबत लेखापरिक्षणास खुलासा सादर करण्यात आला नाही.

3) 26 जानेवारी 2017, 15 ऑगस्ट 2017 व 26 जानेवारी 2018 या तिन्ही वेळेस वेगवेगळया पुरवठादाराकडून खाऊ खरेदी करण्यात आला व वाटप सुध्दा करण्यात आला. परंतु खाऊ वाटप करण्याबाबतचा कोणताही फोटो नस्ती सोबत जोडण्यात आलेला नाही.

4) नगर पालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 166 अन्वये खाऊ खरेदीच्या विविध देयकावर पेड अॅण्ड कॅन्सलचा (Paid and cancled) शिक्का मारण्यात आलेला नाही. त्यामुळे सदरची देयके पुन्हा खर्च करण्याची शक्यता नाकारता येत नाही

C) बालवाडीतील विदयार्थाना शिष्यवत्ती :-

जळगाव शहर महानगरपालिका महीला व बालकल्याण विभागामार्फत सन 2016-017 मधील प्रमाणक क्रमांक 1815 ते 1825 दिनांक 16/10/2017 व 2017-2018 या वित्तीय वर्षात बालवाडीतील विदयार्थाना शिष्यवत्ती देण्यात आली असुन त्याची नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली आहे . परंतु सन 2017-2018 वर्षाची शिष्यवत्ती रक्कम सन 2018-2019 मध्ये अदा करण्यात आलेली आहे .तसेच लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या

अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सन 2016-2017 मध्ये मराठी बालवाडी मधील मुला मुलींची संख्या 547 व इंग्रजी बालवाडी मधील मुला मुलींची संख्या 1078 असे एकूण 1625 मुला मुलींन पैकी 160 मुला मुलींना ठराव क्रमांक 23 दिनांक 13/06/2017 नुसार शिष्यवत्ती देण्यात आली आहे. परंतु ठराव क्रमांक 23 दिनांक 13/06/2017 मधील ठरावानुसार 70 टक्के हजेरी असणा-या विदयार्थीचे हजेरीपट व लसीकरण झालेले विदयार्थी याबाबतचा शिक्षकांच्या अभिप्राय नस्ती सोबत जोडण्यात आलेली नाही. त्यामुळे 70 टक्के हजेरी असणा-या विदयार्थी व लसीकरण झालेले विदयार्थी याच मुला मुलींना शिष्यवत्ती देण्यात आली आहे त्याबाबतची पडताळणी करण्यात आलेली नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 171 दिनांक 20/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 40, Hmm No : 171)

115 महानगरपालिका जळगाव येथील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन अदा करताना घेण्यात येणा-या रु.1/- किमतीच्या मुद्रांकाची रक्कम शासन खाती जमा न करणेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	50712.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखाविभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. जळगाव शहर महानगरपालिकेच्या सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही आर्थिक वर्षातील महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे निवडक वेतन देयकाचे **लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितताबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.**

महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम क्रमांक 160 व 277 (1) अन्वये वेतन अदा केल्यानंतर वेतन पटावर प्रत्येक कर्मचा-यांची वेतन प्राप्त झाल्या बददल मुद्रांकित स्वाक्षरी घेतली जाते. विशेषत: ज्या कार्यालयात कर्मचा-यांची संख्या जास्त आहे त्यांना अशा प्रकारे प्रत्येक कर्मचा-याची स्वाक्षरी घेण्यात वेळ व श्रम घालवावे लागतात. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण 1013/ प्र.क्र. 64 / कोषा प्रशा ndash; 5 दिनांक 26 ऑक्टोबर 2015 शासन परिपत्राकानुसार यापुढे प्रत्येक कर्मचा-याच्या बॅक खात्यात थेट इलेक्ट्रॉनिक माध्यमातुन वेतन अदा केले जाणार असल्याने अशा प्रकारे वेतनपटाची गरज राहणार नाही असा निर्णय घेण्यात आला आहे.

दिनांक 10.09.2004 च्या भारताच्या राजपत्रात प्रसिध्द केल्याप्रमाणे परिशिष्ट 8 मधील कलम 117 (3) नुसार रु.5000/- व त्यापेक्षा जास्त प्रदाना करीता रु.1/- मुल्याच्या मुद्रांक तिकीटावर अदात्याची सही घेतली जाते. वरील

दिनांक 26 ऑक्टोबर 2015 रोजीच्या शासन परिपत्राकानुसार वेतनपटाची आवश्यकता भासणार नसल्याने रु.1/- मुल्यांच्या मुद्रांका ऐवजी कर्मचा-यांकडून त्यांच्या वेतनातून रु.1/- वजा करुन ते शासन खाती जमा करण्यात यावे. रेव्हेन्यू स्टॅम्प च्या महसूली जमा खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खाली दर्शविल्या प्रमाणे मुंबई करीता व उर्वरीत महाराष्ट्रकरीता असणारे वेगवेगळे लेखाशिर्ष असतील.

0030 - मुद्रांक व नोंदणी फी.

02 - मुद्रांक न्यायिकेतर 102 ndash; मुदांकाची विक्री

02 - इतर न्यायिके तर मुद्रांकाची विक्री

(01)(01) मुद्रांक अधिक्षक (00300455)- मुंबईकरीत

(01)(02) नोंदणी महानिरीक्षक (00300464)- उर्वरीत महाराष्ट्रा करीता

परंतु महानगरपालिका, जळगाव येथे दिनांक 26 ऑक्टोबर 2015 या शासन परिपत्रानुसार कार्यवाही केलेली नाही. तसेच त्यांनी अधिकारी व कर्मचारी यांचे वेतनपट सुध्दा ठेवण्यात आलेले नाही. तसेच वेतनातुन रु.1/- मुद्रांकाची रक्कम वजा करुन ते शासन खाती जमा करण्यात आलेले नाही.

माहे एप्रिल 2016 चे वेतन देयकानुसार खालील अधिकारी व कर्मचारी हे कार्यरत होते

अ.न.	कर्मचारी यांची वर्गवारी	कर्मचारी यांची संख्या
1	वर्ग-1	02
2	वर्ग-2	36
3	वर्ग-3	580
४	वर्ग-4	1495
	एकूण	2113
	1 महिन्याची रेव्हेन्यू स्टॅम्पच्या महसूली रक्कम शासनाच्या खाती जमा करणे	2113/-
	24 महिन्याची एकूण रक्कम 2113 X 24	50,712/-

तरी माहे मार्च 2016 ते फेबुवारी 2018 असे एकूण 24 महिन्याच्या कालावधी पावेतो कार्यरत अधिकारी व कर्मचारी

यांच्याकडून प्रतिमहा रु.1/- यानुसार एकूण रक्कम रु. 50,712/- मुद्रांकाची रक्कम वसुल करण्यात येवुन उपरोक्त रक्कम वर नमुद करण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली शासन खाती जमा करण्यात यावी.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 207 दिनांक 02/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 49, Hmm No : 207)

116 महानगरपालिका जळगाव येथील अधिकारी व कर्मचारी यांना सेवाउपदान अदा करतांना झालेली अनियमितते बाबत.

योजना :		**लेखाशीर्ष** : 0		**वसुलपात्र** :	2462.00/-
निधी :	महानगरपालिका स्व- निधी	**कलम** : 9ब		**अंतिम अमान्य** :	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखा विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. सदर आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण वेळी काही निवडक 34 सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचे निवृत्तीवेतन परिगणना तक्त्याची तपासणी केली आहे. त्यापैकी खालील नमुद अधिकारी व कर्मचारी यांना सेवाउपदान कमी अथवा जादा प्रदान करण्यात आलेली असुन त्यांची नावे खालील प्रमाणे **असुन त्याबाबतचे लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.**

01) श्री अशोक लोटन ठाकुर सेवानिवृत्त मजुर :-

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)नियम 1982 मधील नियम 110 (3)अन्वये अर्हताकारी सेवेचा कालावधी ची गणना करताना वर्षाचा (3 महिने)इतका आणि त्याहून अधिक भाग पूर्ण अर्ध वर्षाचा कालावधी मानला जाईल व 3 महिन्यापेक्षा कमी कालावधी असल्यास सोडून दिला जातो. याप्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी म्हणून मोजण्यात येईल.

तथापि श्री अशोक लोटन ठाकुर, से.नि. मजुर हे दिनांक 31.03.2018 रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच ते दिनांक 13.05.1997 रोजी सेवेत रुजू झालेले आहेत. निवृत्तीवेतन पुस्तक नुसार 20 वर्ष, 10 महिने, 18 दिवस इतकी एकूण सेवा झालेली आहे. म्हणजेच उपदान साठी एकूण 42 सहामाही घेणे आवश्यक आहे. तथापि लेखाविभाग, जळगाव यांनी एकूण 43 सहामाही गृहीत धरून उपदान रक्कम निश्चित केलेली आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे जादा प्रदान झालेले आहे.

उपदानासाठी गृहीत धरलेला कालावधी व रक्कम	उपदानासाठी गृहीत धरावयाचा कालावधी व रक्कम	जादा प्रदान रक्कम
8550 + 1300 x 43 / 4 = 1,05,887/-	8550 + 1300 x 42 / 4 = 1,03,425/-	2,462/-

श्री अशोक लोटन ठाकुर सेवानिवृत्त मजुर यांच्याकडून रक्कम रु. 2,462/- वसुल करून सदरची रक्कम

शासनाच्या लेखाशिर्षात भरणा करण्यात यावी.

02) श्री. मौलाद खाँ चांद खाँ पठाण, सेवानिवृत्त लिपिक :-

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)नियम 1982 मधील नियम 110 (3)अन्वये अर्हताकारी सेवेचा कालावधी ची गणना करताना वर्षाचा (3 महिने)इतका आणि त्याहून अधिक भाग पूर्ण अर्ध वर्षाचा कालावधी मानला जाईल व 3 महिन्यापेक्षा कमी कालावधी असल्यास सोडून दिला जातो. याप्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी म्हणून मोजण्यात येईल.

तथापि मौलाद खॉ चांद खॉ पठाण, सेवा निवृत्त लिपिक हे दिनांक 31.07.2016 रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच ते दिनांक 01.09.1987 रोजी सेवेत रुजू झालेले आहेत. निवृत्तीवेतन पुस्तक नुसार 28 वर्ष, 08 महिने, 30 दिवस म्हणजेच नुसार 28 वर्ष, 09 महिने, इतकी एकूण सेवा झालेली आहे. म्हणजेच उपदान साठी एकूण 58 सहामाही घेणे आवश्यक आहे. तथापि लेखाविभाग, जळगाव यांनी एकूण 56 सहामाही गृहीत धरून उपदान रक्कम निश्चित केलेली आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे कमी रक्कम प्रदान झालेली आहे.

उपदानासाठी गृहीत धरलेला कालावधी व रक्कम	उपदानासाठी गृहीत धरावयाचा कालावधी व रक्कम	कमी प्रदान रक्कम
9840 + 1900 x 56 / 4 = 1,64,360/-	9840 + 1900 x 58 / 4 = 1,70,230/-	5,870/-

श्री. मौलाद खाँ चांद खाँ पठाण, सेवानिवृत्त लिपिक यांना सेवाउपदानाची रक्कम ही कमी प्रदान करण्यात आलेली आहे. तरी श्री पठाण यांना रक्कम रु.5870/- अदा करण्यात यावी.

03) श्री. रमेश गणसिंग पाटील, सेवानिवृत्त नाकेदार :-

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)नियम 1982 मधील नियम 110 (3)अन्वये अर्हताकारी सेवेचा कालावधी ची गणना करताना वर्षाचा (3 महिने)इतका आणि त्याहून अधिक भाग पूर्ण अर्ध वर्षाचा कालावधी मानला जाईल व 3 महिन्यापेक्षा कमी कालावधी असल्यास सोडून दिला जातो. याप्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी म्हणून मोजण्यात येईल.

श्री. रमेश गणसिंग पाटील, सेवानिवृत्त नाकेदार हे दिनांक 31.03.2018 रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच ते दिनांक 31.07.1987 रोजी सेवेत रुजू झालेले आहेत. निवृत्तीवेतन पुस्तक नुसार 30 वर्ष, 08 महिने इतकी एकूण सेवा झालेली आहे. म्हणजेच उपदान साठी एकूण 61 सहामाही घेणे आवश्यक आहे. तथापि लेखाविभाग, जळगाव यांनी एकूण 60 सहामाही गृहीत धरून उपदान रक्कम निश्चित केलेली आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे कमी रक्क्म प्रदान झालेली आहे.

उपदानासाठी गृहीत धरलेला कालावधी व रक्कम	उपदानासाठी गृहीत धरावयाचा कालावधी व रक्कम	कमी प्रदान रक्कम
11370 + 1900 x 60 / 4 = 1,99,050/-	11370 + 1900 x 61 / 4 = 2,02,367/-	3,317/-

श्री. रमेश गणसिंग पाटील, सेवानिवृत्त नाकेदार यांना सेवाउपदानाची रक्कम ही कमी प्रदान करण्यात आलेली आहे. तरी श्री. पाटील यांना रक्कम रु.3,317/- अदा करण्यात यावी.

04) श्री. दिलीप रघुनाथ कोल्हे, सेवानिवृत्त चौकीदार :-

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)नियम 1982 मधील नियम 110 (3)अन्वये अर्हताकारी सेवेचा कालावधी ची गणना करताना वर्षाचा (3 महिने)इतका आणि त्याहून अधिक भाग पूर्ण अर्ध वर्षाचा कालावधी मानला जाईल व 3 महिन्यापेक्षा कमी कालावधी असल्यास सोडून दिला जातो. याप्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी म्हणून मोजण्यात येईल.

श्री. दिलीप रघुनाथ कोल्हे, सेवानिवृत्त चौकीदार हे दिनांक 31.10.2017 रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच ते दिनांक 16.12.1985 रोजी सेवेत रुजू झालेले आहेत. निवृत्तीवेतन पुस्तक नुसार 31 वर्ष, 10 महिने व 15 दिवस इतकी एकूण सेवा झालेली आहे. म्हणजेच उपदान साठी एकूण 64 सहामाही घेणे आवश्यक आहे. तथापि लेखाविभाग, जळगाव यांनी एकूण 62 सहामाही गृहीत धरून उपदान रक्कम निश्चित केलेली आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे कमी रक्क्म प्रदान झालेली आहे.

उपदानासाठी गृहीत धरलेला कालावधी व रक्कम	उपदानासाठी गृहीत धरावयाचा कालावधी व रक्कम	कमी प्रदान रक्कम
10240 + 1600 x 62 / 4 = 1,83,520/-	10240 + 1600 x 64 / 4 = 1,89,440/-	5,920/-

श्री. दिलीप रघुनाथ कोल्हे, सेवानिवृत्त चौकीदार यांना सेवाउपदानाची रक्कम ही कमी प्रदान करण्यात आलेली आहे. तरी श्री. कोल्हे यांना रक्कम रु.3,317/- अदा करण्यात यावी.

उपरोक्त वर नमुद अभिप्रायांची पूर्तता करुन अनुपालन सादर करावे. तसेच याप्रमाणे इतर सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना प्रदान करण्यात आलेली उपदान रकमेची तपासणी करून जादा प्रदान असल्यास योग्य ती वसुलीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच कमी प्रदान असल्यास संबधीतास रक्कम प्रदान करण्याबाबतची योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 226 दिनांक 08/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 52, Hmm No : 226)

117 गुंतवणूक नोंदवही विहीत नमुन्यात न ठेवलेबाबत तसेच विविध योजनेचे तसेच इतर सर्व बॅंक खात्यातील शिल्लक रक्कम गुंतवणुक न करणे बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-

निधी : महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखा विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. तसेच लेखा विभागातील प्रत्येक योजनेनुसार व कामानुसार वेगवेगळी बॅंक खाते असुन अशा बँक खात्यांचा व त्यामधील शिल्लक रकमांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	योजनेचे नाव	बॅंकेचे नाव	खाते क्रमांक	गुंतवणूकीअभावी खात्यात शिल्लक असलेली रक्कम	
				2016-2017	2017-2018
1	एकात्मिक शहर विकास योजना (IDSMT)	अलाहाबाद बॅंक	20915870013	11375949	11829552
2	नागरी दलीत वस्ती सुधार योजना	अलाहाबाद बॅंक	20915869927	27174929	16717237
3	अमृत योजना (बगीचा ग्रीन स्पेसेस योजना)	अलाहाबाद बॅंक	50327990471	4677952	6928495
4	शहरी एकात्मीक गृहनिर्माण योजना (IHSDP)	अलाहाबाद बॅंक	50059942282	29515949	18329181
5	मुलभूत सोईसुविधा विकास कामे	ॲक्सिस बॅंक	917010049085257	0	253397511
6	अमृत पाणी पुरवठा योजना	अलाहाबाद बॅंक	50303931172	230589912	2809158
7	अमृत पाणी पुरवठा योजना	आयसीआयसीआय बॅंक	37501005535	200000000	1083962
8	अमृत पाणी पुरवठा योजना	इंडसइंड बॅंक	159423041111	0	552023440
9	आग सुरक्षा निधी	अलाहाबाद बॅंक	50025280747	15745832	14768492
10	सर्वसाधारण रस्ता अनुदान	अलाहाबाद बॅंक	50389909011	0	7720862
11	महा उर्जा विकास अभिकरण	अलाहाबाद बॅंक	50104848860	131453	136510
12	महा नगरोत्थान महाअभियान योजना	अलाहाबाद बॅंक	50139162429	880334	914293
13	आमदार श्री चंदुभाई पटेल स्थानिक विकास कार्यक्रम	अलाहाबाद बॅंक	50385425820	0	3964897

14	जलयुकत शिवार अभियान	अलाहाबाद बॅक	50434057214	0	2583935
15	आमदार श्री मनिष जैन स्थानिक विकास कार्यक्रम	अलाहाबाद बॅक	50147646024	1465584	807620
16	मेहरुण तलाव सुशोभीकरण करणे	अलाहाबाद बॅक	50283398221	876263	64583
17	अनुसुचीत जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना रमाई	अलाहाबाद बॅक	50044062805	9617212	9646595
18	आमदार श्री सुरेशदादा जैन स्थानिक विकास कार्यक्रम	अलाहाबाद बॅक	50033099623	2497628	2034981
19	नागरी दलीतेतर वस्ती सुधार	अलाहाबाद बॅक	50139162791	4349987	1644167
20	राष्ट्रपुरुष व्यक्ती यांची स्मारके आणि पुतळे बांधकाम	अलाहाबाद बॅक	50139162600	1417425	1083460
21	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम श्री विजय दर्डा	अलाहाबाद बॅक	50409845353	0	20209
22	आमदार निधी श्री सुरेश दामू भोळे	अलाहाबाद बॅक	50275085740	7530955	1306516
23	खासदार निधी श्री ईश्वरलाल जैन	अलाहाबाद बॅक	50087005982	1782325	336435
24	खासदार निधी श्री ए.टी. पाटील	अलाहाबाद बॅक	50107668668	275414	0
25	अल्पसंख्याक अनुदान	अलाहाबाद बॅक	50060694926	6045888	2653728
26	नागरी दलीत वस्ती पाणी पुरवठा योजना	अलाहाबाद बॅक	50077020505	167539	173985

27	राजीव आवास योजना	अलाहाबाद बॅक	5007702968	1241546	1289314
28	महा. सृजल निर्मल अभियान, पाणी पुरवठा योजना	अलाहाबाद बॅक	50147606193	2284016	1206565
29	तातडीची पाणी पुरवठा योजना	अलाहाबाद बॅक	50149263254	243389	252754
30	आमदार निधी श्री गुरुमुख जगवाणी	अलाहाबाद बॅक	50275085933	1834695	725895
31	स्वच्छ महा अभियान	अलाहाबाद बॅक	50296531305	5479270	12295449
32	मुलभुत सोई सुविधा	अलाहाबाद बॅक	50336619788	26173933	17785935
33	14वे वित्त आयोग	अॅक्सीस बॅक	915010034044296	327406020	256260498
34	12वे वित्त आयोग	अॅक्सीस बॅक	174010100152105	5279190	5493544
35	12 वे वित्त आयोग इतर विकास कामे	अॅक्सीस बॅक	174010100152112	5279190	5397787
36	13 वे वित्त आयोग	अलाहाबाद बँक	50047247668	62994473	31124843
37	10 वे वित्त आयोग	अलाहाबाद बँक	20915869905	902068	936774
38	11 वे वित्त आयोग	युनियन बॅक	341502010014868	766157	795828
39	नागरी अंगणवाडी बांधकाम योजना	अलाहाबाद बँक	341502010014868	3077279	3195674
40	खासदार श्री ए टी नाना पाटील 16 वी लोकसभा	अलाहाबाद बँक	50280320798	20580	27525
41	नाविन्य पूर्ण योजना	इंडियन बॅक	50421398409	0	2047484
42	आमदार सौ स्मिता वाघ निधी	आमदार सौ स्मिता	50345540486	748053	857988

		वाघ निधी			
43	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान	इंडियन बॅंक	50074852130	3030076	7885657
44	विशेष निधी	अलाहाबाद बॅंक	50152624706	4358526	4531089
45	विशेष रस्ता अनुदान	अलाहाबाद	50336620205	39770627	38226774
46	परिवहन उपक्रम	परिवहन उपक्रम	50020524473	314130	323692
47	वेतन राखीव निधी	अलाहाबाद बॅंक	20915869950	1893185	1966167
48	वेतन राखीव निधी	एस.बी. आय. बॅंक	11144957204	77023	79839
49	भविष्य निर्वाह निधी (Provident Fund Bank)	अलाहाबाद बॅंक	20915869961 (5009)	162004	8581472
50	भविष्य निर्वाह निधी (Provident Fund Bank)	ॲक्सीस बॅंक	174010100179287	38801	14490
51	मृत्यु निधी (Death Relief Fund Bank)	देना बॅंक	21310001410	87051	91111
52	मृत्यु निधी (Death Relief Fund Bank)	अलाहाबाद बॅंक	50019132311	623027	94745
53	परिभाषित अंशदान (Pension Fund Bank)	अलाहाबाद बॅंक	20915870091 (5023)	2943620	4903060

जळगाव शहर महानगरपालिकेच्या सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही आर्थिक वर्षातील गुंतवणूक नोंदवहीचे लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

01) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम क्रमांक 215 अन्वये नमुना क्रमांक 19 नुसार ठेवावयाच्या गुंतवणूक नोंदवहीमध्ये महानगरपालिकेने धारण केलेल्या सर्व गुंतवणूकांची नोंद करेल. गुंतवणूक नोंदवहीमध्ये, महानगरपालिका निधी, विविध राखून ठेवलेले निधी आणि विशिष्ट अनुदाने यातून करण्यात आलेल्या गुंतवणूकीच्या तपशीलाची नोंद करण्यात येईल. परंतु अश्या प्रकारची गुंतवणूक नोंदवही सुधारीत नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही.

02) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम क्रमांक 443 अन्वये गुंतवणूक नोंदवहीतील माहीती लेखा

प्रमुखाकडून प्रमाणित करण्यात येईल. परंतु अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

03) वर नमुद केलेल्या बँक खात्यामधून काही खात्यातील रकमा गुंतवणूक करण्यात आलेल्या आहेत, तर काही खात्यांमधील कोणत्याही रकमा गुंतवणूक करण्यात आलेल्या दिसून येत नाहीत. वरील सर्व बॅक खात्यातील आर्थिक वर्ष 2016-17 व 2017-18 यांच्या वर्षाच्या शेवटी शिल्लक रक्कमा हया बॅक खात्यात शिल्लक असुन त्यांची गुंतवणुक करण्यात आलेली नाही. काही उपरोक्त नमुद रक्कमांचे भविष्यातील कालावधीसाठी आवश्यकतेनुसार कमी ते दिर्घ कालावधीसाठी योग्य त्या प्रमाणात गुंतवणूक केल्यास जास्तीत जास्त व्याजाचा लाभ प्राप्त होऊ शकला असता. तथापी योग्य ती गुंतवणूक केलेली नसल्याने महानगरपालिकेचे व पर्यायाने शासनाचे व्याजाचे नुकसान झालेले असल्याचे लेखापरिक्षणाचे मत आहे.

04) गुंतवणुक नोंदवहीतील नोंदीची तपासणी केली असता आर्थिक वर्ष 2016-17 व 2017-18 या वर्षात तसेच यापुर्वी करण्यात आलेल्या ठेवी अथवा नमुद रक्कमांची गुंतवणुक ही कमी कालावधीसाठी करण्यात आलेली आहे जर रक्कमांची गुंतवणुक ही दिर्घ कालावधीसाठी करण्यात आली असती तर त्या रक्कमेतुन महानगरपालिकेला/शासनाला जास्तीत जास्त व्याज मिळाले असते पर्यायाने अशा प्राप्त होऊ शकणाऱ्या व्याजाचे नुकसान झालेले आहे असे लेखापरिक्षणाचे मत आहे.

05) कर्मचाऱ्यांना देय असलेल्या रक्कमा जसे भविष्य निर्वाह निधी, परिभाषींत अंशदायी निवृत्ती वेतन योजना, मृत्युनिधी यांच्या रक्कमा संबधीत कर्मचाऱ्यांना अदा करतांना शासन नियमानुसार व्याज परिगणीत करुन देणे आवश्यक असते. त्यामुळे अशा निधी मधील शिल्लक रक्कमा गुंतवणूक करतांना कमीत कमी देय व्याजदर किंवा त्यांच्यापेक्षा जादा दराच्या मुदतठेवी मध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधीत निधीचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापी या निधी मधील गुंतवणूका या अल्प कालावधीकरीता व कमी व्याजदराने केलेल्या असल्याचे दिसून येते. तसेच परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या खात्यामध्ये मोठया प्रमाणात रक्कम गुंतवणूकीशिवाय शिल्लक दिसून येते.

06) रोखवहितील पृष्ठक्रमांक 10 वर नमुद केले नुसार मा. आयुक्त यांचे दिनांक 02/02/2017 चे मान्यतेने अमृत पाणीपुरवठा योजना मधुन रुपये 34 कोटी 60 दिवसांकरीता मुदत ठेव धनादेश क्रमांक 12274 दिनांक 04/03/2017 (अलाहाबाद बॅक मध्ये) केली असे रोखवहित दिनांक 04/03/2017 रोजी खर्च नोंदविलेला आहे. तथापी अलाहाबाद बॅकेने मुदत ठेव न केल्याने दिनांक 29/03/2017 रोजी सदरचा धनादेश रदद करुन रक्कम रोखवहित जमा दर्शविण्यात आली आहे. वास्तवीक मा. आयुक्त यांनी दिनांक 02/02/2017 रोजी मुदतठेवीसाठी मान्यता दिलेली होती. म्हणजेच त्या दिनांकापासून रु.34 कोटीची मुदतठेव करणे आवश्यक होते. परंतु लेखा विभागाच्या विलंबाने सदरची मुदतठेवीची प्रकिया दिनांक 04/03/2017 रोजी सुरु करण्यात आली. तथापी त्यानंतरही लेखाविभागाने योग्य ती दक्षता न घेतल्याने अलाहाबाद बॅकेने रु.34 कोटीची मुदतठेव केली नाही. त्यामुळे इतर बॅकांच्या सरासरी दरा नुसार 6.50 टक्के गृहीत धरल्यास रु.36,83,333/- एवढया व्याजाच्या रक्कमेचे नुकसान झालेले आहे असे लेखापरिक्षणाचे मत

आहे.

07) तसेच सदर योजनेमध्येच वर दर्शविल्याप्रमाणे वेळोवेळी शासनाकडून मनपास अनुदान प्राप्त झाले आहे. दिनांक 31/03/2018 रोजी रु.55,59,16,560/- इतकी मोठया प्रमाणावर शिल्लक रक्कम बॅक खात्यात पडून आहे. सदर खात्यामध्ये दोन वर्षात जमा असलेल्या रक्कमेवर रु.3,21,50,160/- एवढे व्याज जमा झालेले आहे. यावर बचत खात्याच्या अनुषंगाने उपरोक्त रक्कमेवर व्याज मिळालेले असल्याचे दिसुन येते. लेखा विभागाने या कालावधीत कोणत्याही प्रकारची मुदतठेव न केल्याने अंदाजीत तेवढेच म्हणजे जवळपास रु.3 कोटी एवढया व्याजाच्या रक्कमेचे नुकसान झालेले आहे असे लेखापरिक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 233 दिनांक 10/04/2024 व अर्धसमास पत्र क्रमांक 262 दिनांक 15/05/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 54, Hmm No : 233)

118 कर्ज नोंदवही व कर्ज रक्कम बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगाव शहर महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण वेळी कर्ज नोंदवही ची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

01) जळगाव शहर महानगरपालिकेने हुडको (HUDCO) व जळगाव जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्याकडून कर्ज घेतलेली आहेत. याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1) हुडको कर्ज (HUDCO)	
एकुण घेतलेले कर्ज	141,34,83,000/-
कर्ज घेतल्याचा कालावधी	सन 1989 ते 2001
कर्जाचे प्रयोजन	घरकुल बांधणे, वाघुर पाणी पुरवठा योजना, रस्ते, मार्केट बांधणे.
सन 16-17 मध्ये भरणा केलेली रक्कम सन 17-18 मध्ये भरणा केलेली रक्कम	1)30,00,00,000/- 2)39,00,00,000/-

दिनांक 31 मार्च, 2018 अखेर एकूण भरणा केलेली रक्कम	324,21,10,842 /-
दिनांक 31 मार्च, 2018 अखेर एकूण शिल्लक कर्ज	नोंदवहीत केवळ भरणा रक्कम नमूद आहे. शिल्लक कर्ज रक्कम नमूद नाही.
शेरा	मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे दिनांक 08 .01.2015 चे निर्देश व मा.D A R T न्यायालय दिल्ली यांचे दिनांक 04.04.2016 चे निर्देश नुसार दरमहा रु 3 कोटी मनपा हुडको यांना प्रदान करत होती.त्यानंतर महाराष्ट्र शासन ,नगर विकास विभाग ,निर्णय क्रमांक जमपा-2019/प्र क्र.173 /नवि-25 दिनांक 06.09.2019 अन्वये रु 253,83,38,000/- एक रकमी परत फेड करण्यात आलेली आहे.
	मनपास सदर कर्जापोटी एकूण रु 629,04,48,842/- भरणा करावे लागलेले आहेत.
2) जे.डी.सी.सी.बँक कर्ज	
एकुण घेतलेले कर्ज	59,34,00,000
कर्ज घेतल्याचा कालावधी	सन 1997 ते 2001
कर्जाचे प्रयोजन	विविध विकास कामे, न.पा.शिक्षण मंडळ शिक्षकांचे वेतन, हुडको कर्ज फेड, वाघुर पा.पु.योजना कामी
सन 16-17 मध्ये भरणा केलेली रक्कम सन 17-18 मध्ये भरणा केलेली रक्कम	1)10,00,00,000/- 2)13,00,00,000/-
दिनांक 31 मार्च, 2018 अखेर शिल्लक कर्ज	18,51,24,281/-
शेरा	सदरची सर्व कर्ज रक्कम ऑगस्ट 2019 पर्यंत व्याजासह भरणा करण्यात आलेली आहे. मनपास सदर कर्जापोटी एकूण रु.199,52,32,836/- भरणा करावे लागलेले आहेत.

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

01) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम क्रमांक 62 अन्वये महानगरपालिकेने प्राप्त झालेल्या कर्जाची नोंद नमुना क्रमांक 23 मध्ये घेणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम क्रमांक 282 व 283 प्रमाणे महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या प्रत्येक कर्जाचा तपशील स्वतंत्र पृष्ठांवर नोंदविण्यात येईल. प्रत्येक कर्जाच्या नोंदीच्या पहिल्या पृष्ठांवर धनकोचे नाव, कर्जाचे प्रयोजन, खर्चास देण्यात आलेली सुरक्षा इत्यादीची नोंद करण्यात येईल.तसेच मुदद्ल, व्याज व परत फेडीच्या नोंदी घेण्यात येतील. तथापि जळगाव शहर महानगरपालिकेने जुन्याच नमुन्यात (क्रमांक 143)नोंदवही ठेवलेली आहे.

02) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम क्रमांक 288 नुसार प्राधिकृत धनकोकडून वर्षभरात उपार्जित झालेले व्याज, परतफेड करण्यात आलेले मुद्दल आणि व्याज आणि वर्ष अखेरीस देय असणारी कर्जाची शिल्लक दर्शविणारे लेखा विवरणपत्र मिळवील. धनकोकडून मिळविण्यात आलेल्या विवरणपत्रातील रकमांचा ताळमेळ महानगरपालिकेच्या कर्ज नोंदवहीशी आणि लेख्यामधील शिलकीशी घालण्यात येईल. यामध्ये कोणताही फरक आढळून आल्यास तो, तत्काळ मुख्य अधिकाऱ्याच्या/आयुक्तांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल आणि आवश्यक दोषनिवारक उपाय योजना करण्यात येतील. तथापि याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

03) जे.डी.सी.सी.बँक कडून कर्ज घेताना बँकेने लिंकिंग शेअर्स च्या स्वरुपात एकूण रु.2,81,78,100/- रक्कम कपात केलेली आहे. सदर शेअरर्सबाबतची कोणतेही अभिलेखे महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही, त्यामुळे सदर रकमांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता येत नाही. तसेच सदर रक्कम लेखापरीक्षण कालावधी पावेतो परत प्राप्त करण्यात आलेली नाही. सदर रकमेवर बँकेकडून व्याज परिगणना करुन सदर रक्कमही प्राप्त करणे आवश्यक आहे. तरी सदर रक्कम व्याजासह त्वरित प्राप्त करणे बाबत कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा यामुळे महानगरपालिकेचा निधी अडकून पडलेला असून मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 237 दिनांक 19/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 135, Hmm No : 237)

119 प्रलंबित अग्रीम रकमेबाबत.

योजना	:	**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	: महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. जळगाव महानगरपालिकेकडील सन 2017-2018 या आर्थिक वर्षाचे अग्रिम नोंदवहीची तपासणी केली असता लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) राष्ट्रीय लेखा नियम पुस्तीका नमुना जनरल 16 , जनरल 17 व लेखा संहिता 2011 नियम 240 नुसार नमुना क्रमांक 20 मध्ये प्रलंबीत अग्रीम नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना सदर नमुन्यात नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

02) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम 241 नुसार स्थायी अग्रीमाबाबत 1 एप्रिल रोजी पावती घेणे आवश्यक आहे.तथापि त्याप्रमाणे पावती घेण्यात आलेली नाही.

03) अग्रिम रकमांचे बाबत वित्तीय वर्ष अखेर समायोजन करणे आवश्यक आहे.तथापि दिनांक 31.03.2018 अखेर पुढीलप्रमाणे अग्रिम हे दीर्घ काळापासून (सन 1944 पासून) प्रलंबित आहे.त्यांचे त्वरित समायोजन होणे आवश्यक आहे.

अ क्र	अग्रिम तपशील	अग्रिम येणे बाकी रक्कम
1	कर्मचारी अग्रिम	2174940
2	ठेकेदार अग्रिम	174140702
	एकूण	176315642

द्वीनोंद लेख्यानुसार काही पुरवठादारांकडील अग्रिमाच्या मोठया रक्कमांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ क्र	कंत्राटदारांचे नाव	अग्रिम येणे बाकी रक्कम
1	अे.पी एजन्सीज	1,50,000/-
2	अॅटलान्टा कन्टक्शन प्रा लि.	8,26,72,889/-
3	सेन्चुरी सिमेंन्ट	1,88,250/-
4	गोलाणी ब्रदर्स , भुसावळ	60,21,445/-
5	जहांगीरदार अॅग्रो प्रोडक्ट	1,75,000/-
6	जैन ऐरीगेशन सिस्टीम	1,00,000/-
7	जळगाव कन्टक्शन	24,21,000/-
8	जळगाव एन्टरटेन्मेट चॅनल	2,00,000/-

9	जे.बी. शर्मा	4,00,000/-
10	खान्देश बिल्डर्स	7,55,33,624/-
11	पिक्सेल पॉईन्ट लि. मुंबई	15,00,000/-

तरी वरील अग्रिम हे दीर्घ काळापासून प्रलंबित आहे, तसेच कंत्राटदारांच्या/पुरवठादारांच्या रक्कमा मोठया प्रमाणात आहे. सदर अग्रिमाच्या रकमा ह्या महानगरपालिका निधीमधून देण्यात आलेल्या कि शासन निधीमधून देण्यात आलेल्या आहे याबाबतही लेखापरीक्षणामध्ये पडताळणी होत नाही. सदर अग्रिम रकमांमुळे शासनाचे तसेच महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. तसेच विकास कामांवरही परिणाम होत असल्याचे लेखापरिक्षणाचे मत आहे. अग्रिम नोंदवहीनुसार प्रलंबित असलेल्या अग्रिमाच्या रकमा ह्या ज्या विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या-त्या विभागांनी सदरच्या रकमा वसुलीबाबतची ठोस कार्यवाही करणे आवश्यक असतांना त्या-त्या विभागाने विहित मुदतीमध्ये वसुलीची किंवा पुढील देयकांमधून समायोजनाची कार्यवाही पार पाडलेली नसल्यामुळे प्रलंबित रकमांची थकबाकी मोठ्या प्रमाणात दिसून येते, तरी संबंधित विभागांनी सदर रकमा वसुलीची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व योग्य निधीच्या खात्यामध्ये किंवा शासन निधीच्या बाबतीत योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 252 दिनांक 03/05/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATRSBM6601 (Ref No : 160, Hmm No : 252)

120 वाहन निर्लेखन बाबत.

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण वेळी वाहन निर्लेखन नस्तीची तपासणी केली असता कालबाह्य झालेल्या वाहनांच्या निर्लेखनाबाबत ची नस्ती दिनांक ५.१२.२०१२ रोजी सुरु झालेली आहे.त्यानुसार जळगाव मनपा वाहन विभागा कडे एकुन१५८ वाहने असून त्यापैकी ७० वाहने कालबाह्य झालेली आहेत.सदर ७० वाहने निर्लेखित करणे आवश्यक आहे.असे टिपणीत नमूद केलेले आहे.

महासभा ठराव क्र १११८ दिनांक १६.८.२०११ नुसार एकूण १२ वाहनांची शासन मान्य मुल्यांकन अभिकर्ता यांनी निश्चित केलेली किंमत रु ५०५०००/- इतकी आहे. महासभा ठराव क्र ७२ दिनांक १८.२.२०१४ नुसार एकूण १२

वाहनांची शासन मान्य मुल्यांकन अभिकर्ता यांनी निश्चित केलेली किंमत रु १४७६०००/- इतकी आहे.तसेच एकूण ४६ वाहनांची शासन मान्य मुल्यांकन अभिकर्ता यांनी निश्चित केलेली किंमत रु २६१४०००/- इतकी आहे. म्हणजेच एकूण ७० वाहनांची किंमत रु.४५९५०००/- निश्चित केलेली आहे.

दिनांक २२.५.२०१४ चे टिपणीतील उपायुक्त व मा आयुक्त यांचे अभिप्रायानुसार १२ वाहने त्वरित निर्लेखित करावी व ५८ वाहन लिलावासाठी वृत्तपत्रात जाहिरात द्यावी असे नमूद आहे. त्यानुसार ३१ वाहनांसाठी दिनांक २३.११.२०१५ रोजी दैनिक दिव्य मराठी मध्ये ई औक्शन सिस्टिम द्वारे निविदा प्रसिद्ध केली होती .परंतु त्यास कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.तसेच ई टेंडर क्र ३२४ दिनांक १८.३.२०१६ अन्वये दैनिक दिव्य मराठी मध्ये निविदा प्रसिद्ध केली होती. त्यास सुध्दा कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.त्यानंतर तसेच ई निविदा क्र ३६७ दिनांक २२.६.२०१६ अन्वये निविदा प्रसिद्ध केली असून त्यामध्ये तीन निविदा धारक यांनी निविदा सादर केलेल्या आहेत.त्यामध्ये आधारभूत किमतीपेक्षा जादा दर १५ वाहनांचे असल्याने सदरची १५ वाहने दीपक ट्रेडर्स उल्हासनगर यांना रु ११२१४००/- जमा करून दिनांक १८.१.२०१७ ला ताब्यात देण्यात आलेली आहेत.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

01) सदरची नस्ती सन २०१२ पासून सुरु आहे.तथापि निर्लेखित वाहनाचा लिलाव फारच विलंबाने झाल्याचे दिसून येते. त्यामुळे वाहनाची आधारभूत किंमत कमी होऊन महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

02) सन २०११ व २०१४ मध्ये एकूण ७० वाहनांची आधारभूत किंमत रु ४५९५०००/- एवढी निश्चित करण्यात आलेली होती.तथापि प्रदीर्घ कालावधी नंतरही केवळ १५ वाहनांसाठी लिलाव प्रक्रिया होऊन रु ११२१४००/- रक्कम जमा झालेली आहे. उर्वरित 55 वाहनांचा लिलाव करण्यात आलेला नसल्याने त्या वाहनांच्या लिलावापोटीचे उत्पन महानगरपालिकेस प्राप्त होऊ शकले नाही. तसेच अशा वाहनांचे लिलावाकरिता विलंब लावल्यास विलंब कालावधीनुसार अशा वाहनांची घसारा रक्कम कमी होऊन वाहनांचे लिलावापोटी अपेक्षित उत्पन्नामध्येही घट होऊन महानगरपालिकेचे नुकसान होण्याची शक्यता असते

03) मनपाने कालबाह्य झालेली वाहने नियमानुसार विहित कार्यपद्धतीचा वापर करुन निर्लेखीत करुन लिलावाद्वारे विक्री न करता वापरात ठेवलेली होती, अशी कालबाह्य वाहने वापरल्याने मोठ्या प्रमाणात डिझेल व दुरुस्तीचा खर्च झाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

04) मनपाने आता कालबाह्य झालेली वाहने नियमानुसार त्वरित निर्लेखित करून लिलाव प्रक्रिया राबविणेची कार्यवाही करावी अन्यथा महानगरपालिकेचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 80 दिनांक 07/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता,

तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 102, Hmm No : 80)

121 जळगाव महानगरपालिकेने खरेदी केलेल्या डिझेल बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण वेळी जळगाव महानगरपालिकेने खरेदी केलेल्या डिझेल खर्चाची नस्तीची तपासणी केली असता मनपा ने सन २०१६-१७ मध्ये १२००० लिटर क्षमतेचे एकूण २४ टँकर आणि ८९८६ लिटर क्षमतेचा १ टँकर म्हणजेच एकूण २९६९८६ लिटर डिझेल खरेदी केले असून एकूण रु. १७२२५०३८/- खर्च केलेला आहे.तसेच सन २०१७-१८ मध्ये १२००० लिटर क्षमतेचे एकूण २५ टँकर म्हणजेच एकूण ३००००० लिटर डिझेल खरेदी केले असून एकूण रु.१८०९४१६१/- खर्च केलेला आहे.सदर खर्च मनपा निधी मधून केलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

01) नस्ती मध्ये टिप्पणी तयार केलेली असून त्यामध्ये शिल्लक डिझेल व खरेदी करावयाचे डीझेल याचा उल्लेख आहे. तसेच खर्च मंजुरीसाठी सादर असे नमूद आहे. सदर टिप्पणीस संबंधित अधिकारी यांची मंजुरी आहे. मनपाने लेखापरीक्षण कालावधीत IOCL पानेवाडी (मनमाड) येथून डिझेल खरेदी केलेले असून वार्षिक वरीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे. मनपाने प्रथम पासूनच IOCL पानेवाडी येथून डिझेल खरेदी केलेले असल्याचे अभिलेख्यांवरून समजले. वास्तविक जवळपास २ कोटी रुपयांची वार्षिक खरेदी असल्याने IOCL, HPCL, BPCL यांचेकडून दर घेऊन करारनामा करून डिझेल खरेदी करणे आवश्यक होते, तथापि मनपाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

IOCL कडे मनपाने काही रक्कम डीपोझीट ठेवलेले असून त्यामधून बिलाची रक्कम वजा केली जाते.तसेच पुन:श्च आलेल्या बिल एवढी रक्कम IOCL ला दिली जाते. याप्रमाणे कार्यवाही होऊन ३१.३.२०१८ रोजी रु २१८४१.२८ शिल्लक आहे.दिनांक २८.३.२०१८ चे बिल रु ७६०५२५/- एवढे असल्याने ते बिल प्रदान केल्यानंतर रु ७८२३६६.२८ एवढी शिल्लक राहील. सदरची रक्कम संबंधित कंपनीकडे जादा जमा असल्याने त्या रकमेवर मनपास कोणत्याही प्रकारे लाभ होत नाही. तरी कंपनीकडे अशा जादा रकमेचे तात्काळ समायोजन करणे किंवा वसुलीची कार्यवाही करणेत येऊन सदर रक्कम मनपा निधीमध्ये जमा करणे आवश्यक होते, तथापी याकडे विभागाकडे दुर्लक्ष केलेले असल्याने महानगरपालिकेचा निधी विनावापर अडकून पडलेला होता.

02) सन २०१६-१७ ते २०१७-१८ मध्ये डिझेल IOCL ने टँकर द्वारे मनपाच्या पंपापर्यंत पोहोच करून दिलेले आहे. तथापि डिझेल पुरवठा करताना दुर्दैवाने काही दुर्घटना घडली तर त्याची जबाबदारी कोणाची राहील. याबाबत

कोणतेही कागदपत्रे नस्ती मध्ये नाहीत.

03) डिझेल खरेदी करतांना कंपनीला पुरवठा आदेश देणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे पुरवठा आदेश संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही, त्यामुळे मागणीनुसार पुरवठा करण्यात आला किवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

04) १२००० लिटर क्षमतेचा डिझेल टँकर आल्यानंतर डिझेल पम्पामध्ये टाकणे पूर्वी संबंधित जबाबदार अधिकारी यांचे डिझेल योग्य प्रमाणात प्राप्त झालेबाबतचे प्रमाणपत्र संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाही, त्यामुळे पुरवठा झालेले डिझेल योग्य दर्जाचे व क्षमतेचे होते किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. त्यामुळे पुरवठा झालेले डिझेल योग्य दर्जाचे, क्षमतेचे व योग्य ते परिमाणामध्ये होते किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. त्यामुळे डिझेल आणणावळ प्रवासाच्या कालावधीमध्ये डिझेलचा गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही, याबाबत संबंधित विभाग प्रमुख यांनी वेळोवेळी पडताळणी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे त्यांनीही त्यांची जबाबदारी पार पाडलेली दिसून येत नाही.

05) डिझेलच्या शुद्धते बाबतचा चाचणी अहवाल नस्ती सोबत जोडलेले नाहीत. त्यामुळे योग्य दर्जाच्या डिझेलचा पुरवठा झालेला असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही, तसेच विभागाने याबाबत त्यांची जबाबदारी पार पाडलेली दिसून येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 82 दिनांक 07/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 104, Hmm No : 82)

122 वाघुर धरणाजवळील पंपिंग स्टेशन येथे लाईट व्यवस्थासाठी केलेल्या खर्च बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 400.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण वेळी पाणीपुरवठा विभाग वाघुर धरणा जवळील पंपिंग स्टेशन येथे लाईट व्यवस्थासाठी केलेल्या खर्च नस्तीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

प्रमाणक क्र व दिनांक	रक्कम	नाव
840/11.07.2017	४८२०३	न्यू आर के इलेक्ट्रिकल

01) तीन मक्तेदार यांचेकडून दर मागविलेले आहेत. तथापि दर मागविताना काय पध्दत वापरली याचा कुठेही उल्लेख नाही. महानगरपालिकेने मक्तेदाराना पत्र दिलेबाबत दिसून येत नाही.

02) मक्तेदार यांचेकडून बंद पाकिटात दर प्राप्त झालेले आहेत. परंतु पाकिटावर आवक शिक्का व दिनांक टाकलेला नाही. त्यामुळे मक्तेदारांकडून बंद पाकिटे केंव्हा प्राप्त झाली याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

03) अभियंता यांनी बंद पाकिटे उघडले आहेत. तथापि लिफाफे उघडण्यात आल्याबाबत दिनांक व वेळ नमूद केलेली नाही. त्यामुळे प्राप्त झालेली दरपत्रकांची पाकिटे केंव्हा उघडण्यात आली याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

04) परिपत्रक नुसार दिनांक ९.२.२०१६ रोजी मंगळवारी १२ वाजेपर्यंत भाव मोहरबंद पाकिटात पाठवावे असे नमूद आहे. तथापि परिपत्रक वर दिनांक ८.२.२०१७ टाकलेला आहे. तसेच ठेकेदार यांचे दरपत्रकावर ८.२.१७ व ८.२.१९ असे दिनांक आहेत. उपलब्ध कागदपत्रांवरुन वेगवेगळे दिनांक नमूद करण्यात आलेली दिसून येतात, म्हणजेच कागदपत्राची विभागामार्फत योग्य प्रकारे तपासणी केलेली दिसून येत नाही.

05) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण, दि. 24.04.2015 क्र. 47 महाराष्ट स्टॅम्प अॅक्ट (सुधारीत) 2015 मधील परीच्छेद क्र.34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत रु.500/- व त्यापुढील रक्कमेच्या 0.1 टक्के दराने मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. या कामासाठी रुपये 100 मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. त्यामुळे सदर कामांचे रुपये 400/- संबंधिताकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन सादर करावे.

06) सदर कामाचा फोटो नस्ती सोबत आढळून आला नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 138 दिनांक 10.01.2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 110, Hmm No : 138)

123 जळगाव शहर महानगरपालिका परिसरात एकूण24 सार्व.शौचालयाच्या ठिकाणी 150 मिमी व्यासाची बोअर वेल व 2 एच पी सबमर्सिबल वीजपंप पुरविणे व बसविणेसाठी केलेल्या खर्चबाबत

योजना	:	**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	: महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे पाणीपुरवठा विभाग चे लेखापरीक्षण वेळी जळगाव शहर महानगरपालिका परिसरात एकूण 23 सार्व.शौचालयाच्या ठिकाणी 150 मिमी व्यासाची बोअर वेल व 2 एच पी सबमर्सिबल वीजपंप पुरविणे व बसविणे साठी केलेल्या खर्च नस्तीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे

अभिप्राय देण्यात येत आहेत.

01) शासन निर्णय क्र स्वमअ-२०१७/प्र क्र/123/नवि-३४ दिनांक ३१.१०.२०१७ नुसार हगणदारी मुक्त शहराचा दर्जा टिकविण्यासाठी सार्व.शौचालयांची स्थिती चांगली व योग्य असणे आवश्यक असल्याने आरोग्य विभागाकडून पाहणी अंती एकूण १ ते २४ ठिकाणी पुरेशा पाण्याची व्यवस्था करणे चे आरोग्य अधिकारी यांनी कळविले होते.तसेच शा.नि. ३१.१०.२०१७ नुसार दि.३१.१२.२०१७ अखेर सर्व कामे आवश्यक असल्याने प्रस्तावित कामांची एकत्रित निविदा प्रसिद्ध केल्यास कामास उशिर होण्याची शक्यता असल्याने प्रत्येक कामनिहाय स्वतंत्र निविदा प्रसिद्ध करणे साठी सादर असे टिपणी दिनांक १७.११.२०१७ मध्ये नमूद केलेले आहे.सर्व कामांचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार केलेले असून तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार सर्व कामाच्या स्वतंत्र निविदा काढून अंदाजपत्रकीय दराने खालीलप्रमाणे ठेकेदारास कामे देण्यात आलेली आहेत.

अ)संदेश ज्ञानदेव टेकाडे जळगाव एकूण १० कामे

ब)योगराज कन्स्ट्रक्शन जळगाव एकूण २ कामे

क)प्रशांत इंटरप्रायजेस जळगाव एकूण ६ कामे

ड)हेमंत अरुण नाईक जळगाव एकूण २ कामे

ई)प्रणव कन्स्ट्रक्शन जळगाव एकूण ४ कामे

सर्व ठेकेदारांना दिनांक ४.१.२०१८ रोजी कार्यारंभ आदेश दिलेले आहे.

सदरची कामे एकाच पद्धतीची असल्याने एकच अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते.तसेच जवळपास २५ लक्ष रुपयांचे काम असल्याने राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात देऊन ई निविदा मागविणे आवश्यक होते.म्हणजेच स्पर्धात्मक दराचा लाभ मिळून अंदाजपत्रक पेक्षा कमी दराने निविदा प्राप्त होऊ शकल्या असत्या.

तथापि याप्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ लागले आणि स्टेशनरीचा मोठ्या प्रमाणात वापरही झाला.तसेच सर्व कामे अंदाजपत्रक दराने करावी लागली.

सदर कामांची अनेक अंदाजपत्रके तयार करुन त्यास वेगवेगळी तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली असल्याचे निदर्शनास येते. रु.3 लक्षपेक्षा जास्त कामांकरिता ई-निविदा प्रक्रीया राबविणे आवश्यक आहे, तथापी अशा प्रकारची ई-निविदा प्रक्रीया टाळण्याच्या दृष्टीने अशा प्रकारे विभागणी करण्यात आल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

02) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 3 मध्ये निविदा प्रक्रीया राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. त्यामधील अ.क्र.4 व 5 नुसार तीन महिन्यांच्या आंत पुन्हा करावयाच्या कामांकरिता स्वतंत्र

निविदा मागविण्यात येणार नाही तर अशा स्वरुपाची कामे एकाच निविदेमध्ये एकत्रित करण्यात यावीत. तसेच वारंवार किंवा नियमित तत्वावर हाती घेण्यात येणाऱ्या कामांकरिता पुन्हा पुन्हा निविदा न मागविता निश्चित कालावधीकरिता दर करार करणेत यावेत. तसेच असे दर करार करतांना कमी दराच्या बोलीदाराला कमीत कमी 50 टक्के काम देणे व उर्वरित कामे/कार्यादेश इतर बोलीदारांमध्ये कमी बोली लावणाऱ्यास जास्तीत जास्त काम देणेत यावीत अशी मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापी याबाबतची कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने नियमांचे पालन करण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

03) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 466(4) खालील परिशिष्ट-3 मधील खंड 19 नुसार रु.50 लक्ष पर्यंतच्या कामाच्या निविदा ह्या कोणतेही राज्यस्तरीय दैनिक व दैनंदिन 20000 प्रतींची विक्री असणारे एक वृत्तपत्र अशा प्रकारे दोन वर्तमान पत्रांमध्ये निविदेस प्रसिद्धी देणे आवश्यक आहे.तथापि सदर बी १ कामांच्या वृत्तपत्र प्रसिद्धीबाबतचे कात्रण संचिकांमध्ये जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे वृत्तपत्रामध्ये जाहिरात देण्यात आलेली असल्याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी होत नाही. तसेच त्यामुळे निविदेस अल्प प्रतिसाद मिळालेला दिसून येतो व परिणामी कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

04) सदर करण्यात आलेली कामे ही ठराविक कंत्राटदार यांनाच देण्यात आलेली आहे. सदर कामांच्या निविदा प्रक्रीयेमध्ये एकसारखेच तीन निविदाकार भाग घेत असल्याचे दिसून येते. त्यापैकी दोन निविदाकारांनी आलटून-पालटून निविदा दर कमी भरुन कामे मिळविलेली आहेत. त्यामुळे संगनमताने कामे मिळविल्याचे दिसून येते. तसेच याबाबत संबंधित शहर अभियंता तसेच पा पु अभियंता यांनी त्यांची कर्तव्ये योग्यरित्या पार पाडलेली नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

05) वेगवेगळ्या अंदाजपत्रक मध्ये खालील बाबी वेगवेगळ्या दर्शविलेल्या आहेत.

अ)बाब क्र १ बोअर वेल ११५ एम एम ,१५० एम एम आणि ६ इंच याप्रमाणे वेगवेगळ्या मापाचे दर्शविलेले आहेत.

ब) बाब क्र ४ सबमर्सिबल पंप २ एच पी रु २१९९८/- आणि रु २६३९४/- या रकमेचे दर्शविलेले आहेत.

क)बाब क्र ५ काही अंदाजपत्रक मध्ये जी आय पाईप रु २८६/- मीटर व काही अंदाजपत्रक मध्ये पोलीथीन पाईप रु ७७/- मीटर तर काही अंदाजपत्रक मध्ये पी वी सी पाईप रु २१९=४५ मीटर याप्रमाणे दर घेतलेले आहेत.

सर्व कामे सारखीच असताना वेगवेगळ्या प्रकारे बाबी घेऊन वेगवेगळे दर घेतलेले असल्याने अंदाजपत्रकीय रकमांमध्येही तफावत दिसून येते.

06) अ क्र ९ या कामावर रु २६०४०/- खर्च केलेला आहे.तसेच अ क्र १७ या कामावर रु २४१८०/- खर्च करण्यात आलेला आहे.सदर ठिकाणी पाणी न लागल्याने पंप बसविलेला नाही. म्हणजेच याबाबत भूजल सर्वेक्षण विभागाकडून कामाचे ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी न करताच अहवाल प्राप्त करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

07) मनपा ने भूजल सर्वेक्षण विभागाकडे कोणताही पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत नाही. तथापि एका कागदावर सर्व ठिकाणांची नावे लिहून स्थळ दर्शविले असून त्यावर वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विभाग यांची स्वाक्षरी असून सदर अहवालावर त्यांचे कार्यालयाचा जावक क्रमांक दिनांक नमूद नाही. त्यामुळे असा प्राप्त करण्यात आलेला अहवाल अधिकृतरित्या प्राप्त करण्यात आलेला नसल्याबाबत लेखापरीक्षणाचे मत आहे..

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 139 दिनांक 10/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 114, Hmm No : 138)

124 वाघुर पाणीपुरवठा योजने अंतर्गत टाकण्यात आलेल्या मुख्य जलवाहिनी1500 ते 600 मिमी पी एस सी व 1168 मिमी ते 457 मिमी एम एस पाईप लाईन व ऐअर व्हाल्व ची व्यवस्था व दुरुस्ती करणे

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 13784.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे पाणीपुरवठा विभाग चे लेखापरीक्षण वेळी वाघुर पाणीपुरवठा योजने अंतर्गत टाकण्यात आलेल्या मुख्य जलवाहिनी 1500 ते 600 मिमी पी एस सी व 1168 मिमी ते 457 मिमी एम एस पाईप लाईन व ऐअर व्हाल्व ची व्यवस्था व दुरुस्ती करणे साठी केलेल्या खर्च नस्तीची तपासणी केली असता त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	वाघुर पाणीपुरवठा योजने अंतर्गत टाकण्यात आलेल्या मुख्य जलवाहिनी 1500 ते 600 मिमी पी एस सी व 1168 मिमी ते 457 मिमी एम एस पाईप लाईन व ऐअर व्हाल्व ची व्यवस्था व दुरुस्ती करणे..
योजना	महानगरपालिका निधी
प्रशासकीय मान्यता	महासभा ठराव क्र.652 , दिनांक 29/04/2017
तांत्रिक मान्यता	शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.02, दि.21/04/2017 रु.4614178 /-
दरसूची वर्ष	2015-2016
निविदा प्रसिद्धी	१)दै.देशदूत दि.5/7/2017 प्रथम प्रसिद्धी ,प्रतिसाद नाही. २)दै दिव्य मराठी दि.2/8/2017 फेर प्रसिद्धी ,प्रतिसाद नाही.

	3)दै तरुण भारत दि.1/9/2017 फेर प्रसिद्धी (तिसरी वेळ)प्रतिसाद नाही .तथापि दि.18/9/17 पर्यंत मुदतवाढ दिल्याने दोन निविदा प्राप्त.
सर्वात कमी दराची निविदा	श्री.संजय दिनेश भोळे ,जळगांव (11.97 %जादा दराने)
वाटाघाटीअंती दर	9.97 %जादा दराने रुपये 5074211 /-
स्थायी समिती मान्यता	ठराव क्र 756 दि. 15/12/2017
करारनामा	रु.4200/- चे मुद्रांकावर करारनामा दि.4/1/2018 रोजी केला.
सुरक्षा रक्कम	देयकामधून
कामाचे आदेश	मनपा आदेश क्र.208 दि.18/12/2017
कामाची मुदत	करारनामा अट क्रमांक 5 मध्ये मुदत नमूद केलेली नाही.तथापि कार्यादेश मध्ये 18 महिने नमूद आहे.
दोष दायित्व कालावधी	करारनामा मध्ये नमूद नाही.
काम पूर्ण दिनांक	प्रगतीत
प्रमाणक क्रमांक	3377/2017-18 दिनांक 06/03/2018

प्रदानाचा तपशील

बील	रक्कम	आयकर	vat	विमा	उपकर	रोयाल्टी	सुअनामत	निव्वळदेय
प्रथम धावते देयक	1338388	30783	26768	13384	--	--	66919	1099050

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

01) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 466(4) खालील परिशिष्ट-3 मधील खंड 19 नुसार रु.50 लक्ष पर्यंतच्या कामाच्या निविदा ह्या कोणतेही राज्यस्तरीय दैनिक व दैनंदिन 20000 प्रतींची विक्री असणारे एक वृत्तपत्र अशा प्रकारे दोन वर्तमान पत्रांमध्ये निविदेस प्रसिद्धी देणे आवश्यक आहे.तथापि सदर कामांच्या वृत्तपत्र प्रसिद्धीबाबतचे कात्रण संचिकांमध्ये जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे वृत्तपत्रामध्ये जाहिरात देण्यात आलेली

असल्याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी होत नाही. तसेच त्यामुळे निविदेस अल्प प्रतिसाद मिळालेला दिसून येतो व परिणामी कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

02) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 2011 परिशिष्ट 3 [नियम 466 (4) पहा] खंड 17 मध्ये कोणत्याही नगरसेवकाचा कोणत्याही निविदेमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध असणार नाही. या प्रयोजनासाठी अनुसुची अ मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यात तसे एक घोषणापत्र मागविण्यात येईल आणि निविदाकाराकडून सादर केलेल्या निविदा दस्तऐवजांसह ते मिळविण्यात येईल. निविदेच्या अटीमध्ये, विनिर्दीष्ट करण्यात आले असेल की, नंतरच्या दिनांकास असा कोणताही हितसंबंध दिसून आला तर, कंत्राट रद्दबातल असल्याचे समजण्यात येईल असे नमुद आहे. तथापी, कंत्राटदाराकडुन असे घोषणापत्र घेण्यात आलेले नाही.

03) सदरच्या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु 4614178/- असून दरसूची 15-16 ची वापरलेली आहे.शाखा अभियंता ,वाघुर पाणीपुरवठा यांनी सन 16-17 च्या दरसूची नुसार रु 4987733/- रक्कम काढलेली असून चालू दर हे अंदाजपत्रक रकमे पेक्षा रु 373555 /- म्हणजेच 8.09 % जादा असल्याचे दिसून येते.म्हणजेच सन 16-17 च्या दरसूची नुसार अंदाजपत्रक रकमेपेक्षा 1.73 % जादा दर आहेत. त्यामुळे वाटाघाटी करुनही जादा दराची निविदा स्विकारण्यात आलेली असल्याने महानगरपालिकेचे तेवढ्या रकमेचे नुकसान झालेले आहे.

04) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण, दि. 24.04.2015 क्र. 47 महाराष्ट स्टॅम्प ॲक्ट (सुधारीत) 2015 मधील परीच्छेद क्र. 34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत रु. 500/- व त्यापुढील रक्कमेच्या 0.1 टक्के दराने मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. या कामासाठी रुपये 4600/- मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना रुपये 4200 मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. त्यामुळे सदर कामांचे रुपये 400/- संबंधिताकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन सादर करावे.

05) तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ दिनांक 17/06/2010 मधील अ.क.3(1) अन्वये बांधकाम मुल्यावर 1 % कामगार उपकर वसुल करणे , अ.क्र.3 (3) नुसार नोंदवहि ठेवणे व मासिक विवरण पुढील महिन्याच्या 10 तारखेपुर्वी अध्यक्ष महाराष्ट इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ , मुंबई यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे. जेणे करुन त्यांना जमा झालेल्या रक्कमेचा ताळमेळ घेणे शक्य होईल तथापी सदर कामाच्या देयकातुन कामगार उपकराची रक्कम रु.13384/- कपात करण्यात आलेली नाही. तरी संबधीत ठेकेदारकडून रक्कम वसुल करण्यात यावी व व शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात यावा.

06) मोजमाप पुस्तिकेवर देयकाचे प्रदान करताना प्रमाणक क्रमांक व दिनांक टाकलेले नाहीत.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 140 दिनांक 10/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता,

तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 115, Hmm No : 140)

125 रेमंड चौकातील 75 एच पी बुस्टर पुरविणे व बसविणे

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 10000.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे पाणीपुरवठा विभाग चे लेखापरीक्षण वेळी रेमंड चौकातील 75 एच पी बुस्टर पुरविणे व बसविणे साठी केलेल्या खर्च नस्तीची तपासणी केली असता त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	रेमंड चौकातील 75 एच पी बुस्टर पुरविणे व बसविणे
योजना	महानगरपालिका निधी
प्रशासकीय मान्यता	क्र.013 , दिनांक 13/07/2017
तांत्रिक मान्यता	१)शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.026 , दि.2/09/2016 रु.914150/- सुधारित २)शहर अभियंता मनपा जळगांव तां.मा.क्र.43 , दि.08/03/2017 रु.1411226 /-
दरसूची वर्ष	2015-2016
निविदा प्रसिद्धी	१)दै.देशदूत दि.21/9/2016 प्रथम प्रसिद्धी ,प्रतिसाद नाही. १)दै.देशदूत दि.19/3/2017
सर्वात कमी दराची निविदा	श्री भैरव इलेक्ट्रो मेक वर्क्स ,जळगांव (9.95 %जादा दराने)
वाटाघाटीअंती दर	१)3 %जादा दराने २)अंदाजपत्रक दराने दिनांक २८.६.२०१७ चे पत्रानुसार
करारनामा	रु.1000/- चे मुद्रांकावर करारनामा दि. 17/7 /2017 रोजी केला.

सुरक्षा रक्कम	देयकामधून
कामाचे आदेश	मनपा आदेश क्र.87 दि.17/7 /2017
कामाची मुदत	करारनामा मध्ये मुदत नमूद केलेली नाही.
प्रमाणक क्रमांक	3520 दिनांक 20.03.2018 रु 500000/-
मोजमाप पुस्तिका	क्र.एफ 16 पृष्ठ 156 ते 160

प्रदानाचा तपशील

बील	रक्कम	आयकर	व्हॅट	विमा	उपकर	रोयाल्टी	सु.अनामत	निव्वळदेय
प्रथम	500000	11500	-	-	-	-	-	488500

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

01) सदर कामाचे पहिले अंदाजपत्रक रु.914150 /- एवढ्या रकमेचे होते.त्यास तांत्रिक मान्यता देण्यात आलेली होती .तसेच त्यासाठी वर्तमान पत्रांमध्ये निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती.तथापि त्यास कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.त्यामुळे नवीन अंदाजपत्रक रु.1411226 /- तयार केलेले आहे.त्यामध्ये खालीलप्रमाणे दरात वाढ केलेली आहे.

अ क्र	बाब	पहिले अंदाजपत्रक नुसार किमत	सुधारित अंदाजपत्रक नुसारकिमत	तफावत
1	75 अश्व शक्ती विद्युत पंप	262000	372167	110160
2	75 अश्व शक्ती विद्युत मोटार	211774	300367	88593
3	L T क्युबिकल प्यानल बोर्ड स्टार्टर	175000	356000	181000

याचाच अर्थ अंदाजपत्रक तयार करताना सर्व बाबींचा विचार न करता अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते.तसेच जुन्या अंदाजपत्रक मध्ये वरील बाबींचे बाजारभाव नुसार रकमा घेण्यात आलेल्या होत्या. अंदाजपत्रकामध्ये दरसूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या बाबींकरिता बाजारभावानुसार अंदाजपत्रक तयार करतांना दरपत्रके मागवून व त्यामध्ये कमीत कमी दरांची तुलना करुन त्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये दर समाविष्ट करणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही, त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये नमूद करण्यात आलेले दरांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. तसेच केवळ 6 महिन्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात भाव वाढ

झाल्याचे दिसून येते, याबाबतही लेखापरीक्षणामध्ये साशंकता आहे.

02) संबंधित ठेकेदार यांनी 9.95% जादा दर निविदेत भरणा केलेले होते. ठेकेदार यांना वाटाघाटी करणे साठी बोलविले नंतर 3% जादा दराने काम करण्यास तयारी दर्शविली आहे.तसेच मनपाचे कर्मचारी /अधिकारी यांनी सदर दर मंजूर करणेबाबत टिपणीत नमूद केलेले आहे.तथापि मा.आयुक्त यांनी जादा दर का असे टिपणीत विचारले नंतर ठेकेदारास अंदाजपत्रक दराने काम करणेबाबत पत्र देण्यात आले.त्यानंतर अंदाजपत्रक दराने काम करणेस तयार असल्याचे लेखी पत्र ठेकेदाराने दिलेले आहे.मनपा चे संबंधित कर्मचारी /अधिकारी यांनी मनपा चे हित जोपासणे आवश्यक असताना ठेकेदाराचे हित जोपासत असल्याचे दिसून येते.

03)देयकामधून मुल्यावर्धीत कराची 2% प्रमाणे वसुली करण्यात आलेली नाही, सदर रक्कम संबंधितांकडून वसुलपात्र ठरते, तरी देयक रक्कम रु.5.00 लक्षवर 2% प्रमाणे रु.10000/- संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन शासनखाती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

04) मोजमाप पुस्तिकेवर देयकाचे प्रदान करताना प्रमाणक क्रमांक व दिनांक टाकलेले नाहीत.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 141 दिनांक 10/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 116, Hmm No : 141)

126 वाघुर रॉ वाटर पंपिंग स्टेशन येथील3000 केव्हीअे क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती करणे

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 18189.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 पाणीपुरवठा विभाग चे लेखापरीक्षण वेळी वाघुर रॉ वाटर पंपिंग स्टेशन येथील 3000 केव्हीअे क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती करणेसाठी केलेल्या खर्च नस्तीची तपासणी केली असता त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	वाघुर रॉ वाटर पंपिंग स्टेशन येथील 3000 केव्हीअे क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती करणे.
योजना	महानगरपालिका निधी
प्रशासकीय मान्यता	स्थायी समिती ठराव क्र.639, दिनांक 12/05/2017

निविदा प्रसिद्धी	निविदा न मागविता करावयाची कामे.
ठेकेदार	मे द्वारका इंडस्ट्रीज जळगाव
कार्यारंभ आदेश	नाही
करारनामा	नाही.
प्रमाणक क्रमांक	प्र.क्र.1874 , दिनांक 02/11/2017

प्रदानाचा तपशील

बील	रक्कम	आयकर	जीएसटी	विमा	उपकर	रॉयल्टी	सुअनामत	निव्वळ देय
प्रथम व अंतिम	442264	10172	-	-	-	-	-	432091

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

01) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 466(4) खालील परिशिष्ट-3 मधील खंड 19 नुसार रु.50 लक्ष पर्यंतच्या कामाच्या निविदा ह्या कोणतेही राज्यस्तरीय दैनिक व दैनंदिन 20000 प्रतींची विक्री असणारे एक वृत्तपत्र अशा प्रकारे दोन वर्तमान पत्रांमध्ये निविदेस प्रसिद्धी देणे आवश्यक आहे.तथापि सदरचे काम अत्यावश्यक असल्यामुळे महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5 (2) (2)नुसार निविदा न मागविता सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेऊन शहरातील अधिकृत उत्पादक लघु उद्योजक मे.द्वारका इंडस्ट्रीज जळगाव यांचेकडून करून घेतलेले आहे.टिपणीत नमूद नुसार राखीव ट्रान्सफॉर्मर ने पाणीपुरवठा करणेत आलेला आहे.तरी नियमानुसार निविदा मागऊन दुरुस्तीचे काम करून घेता आले असते.परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच कामाचे आदेशही देण्यात आलेले नाही.

02) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण, दि. 24.04.2015 क्र. 47 महाराष्ट स्टॅम्प ॲक्ट (सुधारीत) 2015 मधील परीच्छेद क्र. 34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत रु.500/- व त्यापुढील रक्कमेच्या 0.1 टक्के दराने मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. या कामासाठी मुद्रांकावर करारनामा केलेला नाही. त्यामुळे सदर कामांचे रुपये 500/- संबंधिताकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन सादर करावे.

03) सदर कामाचे अंदाजपत्रक रु.498100/- एवढ्या रकमेचे होते.तसेच जुन्या कॉपर वायर 450 किलोग्रॅमचे रु 274/- प्रमाणे रु.123000/- वजा करून उर्वरित रकमेवर 18% रु.67464/- GST घेऊन एकूण रु.442264/- चे अंदाजपत्रक ठेकेदार यांनी तयार केलेले आहे. जुन्या कॉपर वायरचे दराबाबत मनपाने इतर कोणाकडे चौकशी केलेली नाही.

त्यामुळे दर बरोबर आहे किंवा कसे याबाबत समजून येत नाही. तसेच केवळ एकच लघु उद्योजक यांना सांगितल्यामुळे त्यांनी दिलेल्या अंदाजपत्रकनुसार काम करण्यात आलेले आहे. त्यामुळे तुलनात्मक दरांचा लाभ महानगरपालिकेस झालेला नाही.

04) नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र कमांक जिईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि 24 दिनांक 3/11/2003 अन्वये महानगरपालिकांनी त्यांचे मार्फत देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणेबाबत सर्व महानगरपालिकांना सुचना दिलेल्या आहेत. तथापि याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच विमा रक्कम रु 4422/- देयकातून कपात करून विमा निधीकडे भरणा करण्यात आलेली नाही. सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन चलनाने योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासकीय विमा निधीकडे सादर करण्यात यावा.

05) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए/2009/प्र.क्र.108/कामगार 7 अ / दिनांक 17.6.2010 मधील मुद्दा क्रमांक 5 नुसार देयकातून 1 टक्का कामगार कल्याण उपकराची रक्कम कपात करणे अनिवार्य आहे. तथापि कामगार उपकर रक्कम रु 4422/- देयकातून कपात करून भरणा करण्यात आलेली नाही. सदर रक्कम संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात यावी व योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात येऊन त्याबाबतचा सविस्तर अहवाल अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात यावा.

06) वस्तु व सेवा कर कायद्यानुसार जीएसटी करप्रणाली दिनांक 01/07/2017 पासून अंमलात आली. शासकीय कार्यकंत्राटामध्ये जीएसटी प्रणाली लागू करणेबात वित्त विभाग शासन निर्णय क्र.जीएसटी-1017/प्र.क्र.155/कराधान-1, दिनांक 11/09/2017 मधील अ.क्र.4 नुसार चालू कामांचे बाबतीत कराच्या भारामध्ये वृद्धी वा घट झाल्यामुळे कंत्राटाच्या किंमतीत वृद्धी वा घट होऊ शकते, त्यामुळे करावयाचा बदल कंत्राटामध्ये उल्लेख केलेल्या अटी व शर्तींवर अवलंबून असेल, कंत्राटाबाबत अटी व शर्ती वेगवेगळया असतील त्यामुळे प्रत्येक विभागाने कंत्राटाची प्रत विधी व न्याय विभागाकडून तपासून बदललेल्या कररचनेमुळे कंत्राटाच्या किंमतीतून कराचा भार कमी झाल्यामुळे वजावट करता येईल किंवा कराचा भार वाढल्यामुळे किंमत वाढवून देता येईल याबाबत अभिप्राय घ्यावेत अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. वरीलप्रमाणे कंत्राटदाराची देयके अदा करण्यापूर्वी सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर कामाचे देयकातील रक्कम दिनांक 02/11/2017 रोजी अदा करण्यात आलेली असून वरील शासन निर्णयांमधील तरतुदीनुसार सदर देयकामधून जीएसटी-टीडीएस रक्कम रुपये 8845/- कपात करणे आवश्यक होते, तथापी सदर देयकामधून जीएसटी-टीडीएस रक्कम कपात करण्यात आलेली नाही. त्यामुळे शासन निर्णयाचे पालन करण्यात आलेले नाही. तरी याबाबत शासन निर्णय दिनांक 11/09/2017 नुसार कार्यवाही करण्यात येऊन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी व नियमानुसार रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसुल करण्यात यावी व त्याबाबतचे योग्य ते विवरण संबंधित विभागाकडे सादर करण्यात यावे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 146 दिनांक 24/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	तपशिल	वसुलपात्र रक्कम
1	मुद्रांक शुल्क	500
4	विमा	4422
5	उपकर	4422
6	जीएसटी-टीडीएस	8845
	एकूण वसुलपात्र रक्कम	**18189**

DATPRAM6701 (Ref No : 117, Hmm No : 146)

127 प्रभाग क्र 35 मधील स नं 249/1ब/2/2/1 व स नं 249/1ब/2/2/2 मध्ये पीव्हीसी पाईप लाईन टाकणे

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 3475.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 पाणीपुरवठा विभाग चे लेखापरीक्षण वेळी प्रभाग क्र 35 मधील स नं 249/1ब/2/2/1 व स नं 249/1ब/2/2/2 मध्ये पीव्हीसी पाईप लाईन टाकणे साठी केलेल्या खर्च नस्तीची तपासणी केली असता त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	प्रभाग क्र 35 मधील स नं 249/1ब/2/2/1 व स नं 249/1ब/2/2/2 मध्ये पीव्हीसी पाईप लाईन टाकणे
योजना	महानगरपालिका निधी
प्रशासकीय मान्यता	दिनांक 18/02/2016
तांत्रिक मान्यता	118 दिनांक 09/02/2016
अंदाजपत्रक रक्कम	215105

निविदा प्रसिद्धी	17/02/2016 दैनिक तरुण भारत
निविदा दर	5 % जादा दराने वाटाघाटी अंती 4 % जादा दराने
ठेकेदार	मे दिनेश रामचंद्र बेडीस्कर
कार्यारंभ आदेश	26 दिनांक 06/05/2016
करारनामा	100
मोजमाप पुस्तिका क्र.	B 41 /81-84
प्रमाणक क्रमांक	प्र.क्र. 915 , दिनांक 11/07/2017

प्रदानाचा तपशील

बील	रक्कम	आयकर	vat	विमा	उपकर	रॉयल्टी	सुअनामत	निव्वळदेय
प्रथम व अंतिम	223643	5145	11182	2236	2236	--	22364	180480

01) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण, दि. 24.04.2015 क्र. 47 47 महाराष्ट स्टॅम्प ॲक्ट (सुधारीत) 2015 मधील परीच्छेद क्र. 34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत रु. 500/- व त्यापुढील रक्कमेच्या 0.1 टक्के दराने मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. या कामासाठी रुपये 100 मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. त्यामुळे सदर कामांचे रुपये 400/- संबंधिताकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन सादर करावे.

02) सदर कामातील बाब क्रमांक ४ डबल फ्लॅग स्लुईस व्हॉल्व 150 मिमी 2 नग पुरविले असून बाब क्रमांक 5 डबल फ्लॅग स्लुईस व्हॉल्व 150 मिमी 2 नग जोडणे असे मोजमाप पुस्तिका पृष्ठ क्रमांक 82 वर नमूद आहे. तथापि मोजमाप पुस्तिका पृष्ठ क्रमांक 83 वर बाब क्रमांक 5 डबल फ्लॅग सलुईस व्हाल्व 150 मिमी 3 नग जोडणे असे नमूद केलेले आहे. म्हणजेच 1 नग जादा नमूद केलेले आहे. त्यामुळे 1 नगाची किंमत रुपये 2957/- आणि 4 % जादा दर म्हणजेच रु 118/- असे एकूण रु 3075/- ठेकेदारास जादा प्रदान झालेले आहेत. जादा प्रदान रक्कम वसूल करून महानगर पालिका निधीत भरणा करून अनुपालन दर्शवावे.

03) सदर कामाचा फोटो नस्ती सोबत आढळून आला नाही.

04) मोजमाप पुस्तिकेवर देयकाचे प्रदान करताना प्रमाणक क्रमांक व दिनांक टाकलेले नाहीत.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 147 दिनांक 24/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता,

तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 118, Hmm No : 147)

128 वाघूर धरण उदभव टप्पा5 ची पाणी बिल थकबाकी बाबत.

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 पाणीपुरवठा विभाग चे लेखापरीक्षण वेळी वाघूर धरण उदभव टप्पा 5 ची पाणी बिल खर्च नस्तीची तपासणी केली असता दिनांक 31/03/2018 रोजी रुपये 65074876/- थकबाकी असल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

01) जळगाव शहर महानगरपालिका यांनी सन 2016-2017 या वर्षात रुपये 13,29,54,570/- आणि सन 2017-2018 या वर्षात रुपये 12,39,89,516/- पाणीपट्टी रक्कम वसूल केलेली आहे. परंतु पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगाव यांचेकडे रक्कम भरणा केली नसल्याने फारच मोठ्या प्रमाणात पाणी बिल थकबाकी असल्याचे दिसून येते.

02) कार्यकारी अभियंता वाघूर धरण विभाग जळगांव यांचे पत्र जा. क्र. वाधवि /प्रशा /520/दिनांक 10/02/2015 चे पत्र नुसार पाणीपुरवठा करारनामा ची मुदत दिनांक 31/10/2014 रोजी संपुष्टात आली आहे .याची नोंद नस्ती मधील टिप्पणी पान नंबर 5 दिनांक 02/03/2016 मध्ये दर्शविली आहे.

तसेच अधिक्षक अभियंता ,जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ ,जळगाव यांचे अर्ध शासकीय पत्र क्रमांक 30 दिनांक 10/05/2016 नुसार पाणीपुरवठा करारनामा ची मुदत संपुष्टात आल्याने दिनांक 01/11/2014 पासून पाणीपट्टी रकमेवर 25% दंडात्मक आकारणी करण्यात येत आहे. तसेच प्रचलित शासन नियमाप्रमाणे थकीत पाणीपट्टीवर द.सा.द.शे. 12% दराने विलंब आकार लावण्यात येत आहे. (नोव्हेंबर 2015 अखेर थकबाकी रुपये 32573055/-)

कार्यकारी अभियंता वाघूर धरण विभाग पत्र जा. क्र. वाधवि /प्रशा /4757/दिनांक 27/12/2016 चे पत्र नुसार महानगरपालिकेने नोव्हेंबर 2013 मध्ये पाणीपट्टी रक्कम भरणा केली होती. त्यानंतर तीन वर्ष कालावधी होऊन सुद्धा डिसेंबर 2016 पर्यंत काहीही रक्कम भरणा केलेली नाही.

03) महानगरपालिकेने दिनांक 16/12/2017 रोजी जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगाव यांचेशी करारनामा केलेला आहे. कालावधी दिनांक 27/10/2017 ते 26/10/2023 असा आहे. महानगरपालिकेने करारनामा तीन वर्ष विलंबाने केल्याने दिनांक 01/11/2014 ते दिनांक 16/12/2017 या तीन वर्षाच्या कालावधीत पाणीपट्टी रक्कम वर 25% दंडात्मक आकारणी करून देयक प्राप्त झालेले आहेत. याबाबत महानगरपालिका संबंधित विभागाकडे करारनामा करणेबाबत योग्य ती दक्षता घेतलेली नसल्याने दंडात्मक आकारणी करण्यात आलेली असल्याने जबाबदारी निश्चित

होणे आवश्यक आहे.

04) पाणीबिला पोटी दिनांक 31/03/2018 रोजी रुपये 65074876/- थकबाकी आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे रकमाचा समावेश आहे.

अ) विलंब आकार रु 9530661/-

ब) 25 % दंडात्मक आकारणी रु 7988808/-

क) जैन इरिगेशन सिस्टीम लि रु 2034774/- (मुद्दल रु 1332616 + व्याज रु 702158)

दिनांक 20/09/2012 रोजीच्या टिपणीनुसार जैन ऐरिगेशन सिस्टीम लिमिटेड यांना दिलेल्या पाण्यासाठी घरगुती पाणी वापराच्या दराने पाणीपटटीचे देयक दिले जात होते. तथापी कार्यकारी अभियंता वाघुर धरण विभाग यांनी वाणिज्य वापराच्या फरकाचे देयक रु.1411650/- हे दिलेले आहे. त्यापैकी महानगरपालिकेन रु.79034/- भरणा केलेले असुन रु.1332616/- शिल्लक दिसुन येतात. सदरची रक्कम वाघुर धरण विभाग जळगाव यांचे पत्र क्रमांक 1467 दिनांक 23/04/2018 सोबत प्राप्त विवरणपत्रामध्ये ही दंडनीय व्याजासह शिल्लक दर्शविण्यात आलेली आहे, म्हणजेच सप्टेबर 2012 मध्ये टिपणी सादर केल्यापासुन एप्रिल 2018 पर्यन्त सदरची रक्कम भरणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे दंडनीय व्याजाचा बोजा दरमहा वाढत जात आहे.

महानगरपालिका प्रशासनाने याबाबत योग्य ती कार्यवाही करून विलंब आकार व दंड रक्कम क्षमापित होणेबाबत वरिष्ठ स्तरावर पाठपूरावा करून पाणीपट्टी रक्कम भरणा करणेबाबत कार्यवाही करावी.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 148 दिनांक 24/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 119, Hmm No : 148)

129 मनपा भुरे मामलेदार शिवाजीनगर उद्यान येथील बोअरवेलसाठी नवीन जि आय पाईप खरेदी करणे

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 पाणीपुरवठा विभाग चे लेखापरीक्षण वेळी मनपा भुरे मामलेदार शिवाजीनगर उद्यान येथील बोअरवेलसाठी नवीन जि आय पाईप खरेदी करणेसाठी रुपये 31860/- केलेल्या खर्च नस्तीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

मनपा भुरे मामलेदार शिवाजीनगर उद्यान येथील बोअरवेलसाठी नवीन जि आय पाईप खरेदी करणे साठी

परिपत्रक वर तीन दरपत्रके मागवून श्री के.एन.शेख याना क्र.36/2017 दिनांक 11/05/2017 अन्वये पुरवठा आदेश दिलेला आहे.जळगाव मनपा विवरण नमुना यावर पाणीपुरवठा अभियंता ,जळगाव शहर महानगरपालिका यांनी सी क्लास पाईप नमूद केलेले आहे. श्री के.एन.शेख यांनी लेटरहेड वर दिनांक 19/05/2017 रोजी पाईप चे बिल दिलेले आहे. तथापि त्यावर पाईप कोणत्या क्लास चे आहेत हे नमूद केलेले नाही. तसेच पाणीपुरवठा विभागाकडील साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध नसल्यामुळे, पाइपची नोंद घेतलेबाबत व कोणत्या क्लास चे पाईप प्राप्त झाले याबाबत तपासणी करता आली नाही. त्यामुळे सदर कामासाठी कोणते पाईप वापरले याची तपासणी करता आली नाही.

यावरून असे दिसून येते कि मनपा विवरण नमुना नुसार साहित्य प्राप्त झाले किंवा कसे याबाबत कोणीही कोणतीही खात्री केलेली नसताना सुद्धा देयक पारित करण्यात आलेले आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 149 दिनांक 24/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 120, Hmm No : 149)

130 आमदार निधीमधून केलेल्या विकास कामाबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 1200.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 पाणीपुरवठा विभाग चे लेखापरीक्षण वेळी आमदार निधीमधून खालीलप्रमाणे विकास काम केल्याचे दिसून आले.

अ) प्रभाग क्र 27 मध्ये रिंग रोड येथे 18 इंची व्हॉल्व टाकणे. व संत बाबा हरदासराम मंगल कार्यालय पर्यंत पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.

ब) प्रभाग क्र 13 मधील ग न 9/1,2 अ परिसरात नवीन पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.

क) पिंप्राळा ग न 158,159,160 मध्ये शामनगर व हनुमान नगर मुख्य जलवाहिनी वर वितरण वाहिनी टाकणे.

सदर कामाच्या खर्च नस्तीची तपासणी केली असता त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव	1	2	3
योजना	आमदार निधी	आमदार निधी	आमदार निधी
प्रशा मान्यता	जिल्हाधिकारी जळगाव 1698 दि. 31.5.16	जिल्हाधिकारी जळगाव 737 दि. 29.2.16	जिल्हाधिकारी जळगाव 737 दि. 29.2.16
तांत्रिक मान्यता	01 दि. 12.4.16	109 दि. 30.1.16	112 दि. 30.1.16
अंदाजपत्रक रक्कम	499318	441000	899862

निविदा दर	4.70 % जादा वाटाघाटीने अंदाजपत्रक दराने	अंदाजपत्रक दराने	2 % कमी दराने
ठेकेदार	संजय दिनेश भोळे	ललित अमृत पाटील	अभयकुमार महेंद्र जैन
कार्यारंभ आदेश	62 दि. 23.8.16	33 दि. 30.5.16	34 दि. 1.6.16
करारनामा	100 रुपये	100 रुपये	100 रुपये
मोजमाप पुस्तिका क्र.	B 57 /6-14	B 87 /33-37	B 17 /83-93
खर्च रक्कम	493300	347983	844084
प्रमाणक क्रमांक	प्र.क्र. 72 , दिनांक 28/11/2016	प्र.क्र. 52 , दिनांक 15/02/2018	प्र.क्र . 78 , दिनांक 21/01/2017

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

01) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण, दि. 24.04.2015 क्र. महाराष्ट्र स्टॅम्प ॲक्ट (सुधारीत) 2015 मधील परीच्छेद क्र. 34 मध्ये मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत रु. 500/- व त्यापुढील रक्कमेच्या 0.1 टक्के दराने मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. या कामासाठी रुपये 100 मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. त्यामुळे सदर कामांचे प्रत्येकी रुपये 400/- प्रमाणे एकूण रुपये 1200/- संबंधिताकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन सादर करावे.

02) सदर कामासाठी पीव्हीसी पाईप वापरलेले आहेत. त्यासाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण दरसुचीनुसार हैड्रॉलिक चाचणी घेणे आवश्यक आहे. हैड्रॉलिक चाचणी होईपावेतो ठेकेदारास 85% रक्कम प्रदान करणे आवश्यक होते. तथापि सदर कामांमध्ये हैड्रॉलिक चाचणी घेतलेली नाही. तरीसुद्धा सर्व रक्कम प्रदान केलेली आहे.

03) महाराष्ट्र जिवन प्राधिकरण दरसुचीनुसार थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करून त्याचा अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही. त्यामुळे योग्य वजनाचे ,दर्जाचे पीव्हीसी पाईप वापरले बाबत खात्री करता येत नाही.

04) मोजमाप पुस्तिकेवर देयकाचे प्रदान करताना प्रमाणक क्रमांक व दिनांक टाकलेले नाहीत.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 150 दिनांक 24/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 121, Hmm No : 150)

131 पाणीपुरवठा विभागातील वीज देयके सुट रकमेचा लाभ न घेता दंडनीय व्याजासह भरणा केल्याबाबत.

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे पाणीपुरवठा विभागातील वीज देयकांचे अवलोकन व तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

सन 2016-2017 या कालावधीतील वीज देयकांचा तपशील खालीलप्रमाणे

महिना व वर्ष	मुळ देयकाची रककम रुपये	सुट रक्कम रुपये
मार्च- 2016	4573562	45736
एप्रिल 2016	5044239	50442
मे 2016	5462880	54629
जुन 2016	5156840	51568
जुलै 2016	4939050	49390
ऑगस्ट 2016	5048967	50490
सप्टेबर 2016	5133953	51340
ऑक्टोबर 2016	5201662	52017
नोव्हेबर 2016	5315792	53158
डिसेंबर 2016	4416447	44164
जानेवारी 2017	4568525	45685
फेबुवारी 2017	4452144	44521
एकूण:-	59314061	593140

सन 2017-2018 या कालावधीतील विज देयकांचा तपशील खालीलप्रमाणे

महिना व वर्ष	मुळ देयकाची रककम रुपये	सुट रक्कम रुपये
मार्च 2017	4444386	44444

एप्रिल 2017	4785147	47851
मे 2017	5851743	58517
जुन 2017	4971749	49717
जुलै 2017	4799540	47995
ऑगस्ट 2017	5031210	50312
सप्टेबर 2017	4657295	42304
ऑक्टोबर 2017	4798854	47989
नोव्हेबर 2017	4944978	49450
डिसेंबर 2017	4964781	49648
जानेवारी 2017	5161291	51613
फेबुवारी 2018	2296270	36453
एकूण:-	56707244	576293

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) माहे मार्च -2016 मध्ये वीज देयकांची मागील थकबाकी रुपये 15353606 एवढी होती माहे मार्च-2016 ते फेबुवारी-2017 या कालावधीत वीज देयकांची एकुण रककम रुपये 59314061/- एवढी होती तसेच माहे मार्च- 2017 ते फेबु-2018 या कालावधीत वीज देयकांची एकुण रककम रुपये 56707244/- एवढी होती . म्हणजेच मार्च -2016 ते फेबु- 2018 या कालावधीतील थकबाकीसह एकुण रक्कम 131374911/- एवढी भरावयाची होती . प्रत्येक महिन्याच्या वीज देयकांत विहित मुदतीत रक्कम भरणा केल्यास त्यावर 1 टक्का सुटीची रक्कम अनुज्ञेय आहे. परंतु सबंधित कर्मचारी /अधिकारी यांनी वीज देयक भरणाची टिपणी सादर करतांना त्यांत सुट रक्कमेचा उल्लेख करणे आवश्यक असतांना, तसा उल्लेख कोणत्याही टिपणीत केलेला नाही .

02) वरील तक्त्यांत दर्शविलेप्रमाणे सुटीची एकुण रक्कम रुपये 1169433/- एवढी आहे. त्यामुळे वीज देयक प्राप्त झालेनंतर विहित मुदतीत देयकांचा भरणा करणे आवश्यक होते. तथापी महानगरपालिकेने काही वेळेस विहित मुदतीपेक्षा केवळ दोन ते चार दिवस विलंबाने वीज देयकांचा भरणा केल्यामुळे सुट रक्कमेचा लाभ महानगरपालिकेला मिळालेला नाही. मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम क्रमांक ५७ व ५८ मधील वित्तीय औचित्याच्या

सुत्रांतुसार सर्वसामान्य व्यक्ती स्वत:चा पैसा खर्च करतांना जी जागरुकता दाखविते तशीच जागरुकता सार्वजनिक सेवकाने शासकिय रक्कम खर्च करतांना दाखविली पाहिजे. तथापी याप्रमाणे दक्षता घेण्यात आलेली नसल्याने महानगरपालिकेला जादा रक्कम भरणा करावी लागलेली आहे, व परिणामी महानगरपालिकेला सुटीचा लाभ प्राप्त होऊन निधीमध्ये बचत होऊ शकलेली नाही.

03) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. टिएफसी ८०१५/प्रं.क्रं.१०६/नवि-४ दिनांक ३/८/२०१५ मधील (II) 14 व्या वित्त आयोगा अर्तगत अनुदानातुन हाती घ्यावयाची कामे मधुन (ड) (III) नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडील पाणीपटटी व वीजबीले (दंड सोडुन) भरणा करण्यांचा खर्च करता येईल जळगांव शहर महानगरपालिकेकडे 14 वा वित्त आयोग निधीमध्ये पुरेसा निधी उपलबध असतांना देखील वेळेवर व विहित कालावधीत वीज बीलांचा भरणा करण्यांत आलेला नाही.

04) माहे मार्च -2016 ते फेबु- 2018 या कालावधीत जळगांव शहर महानगरपालिकेने वीज देयकांपोटी रक्कम रुपये 138656997/- एवढी रककम व्याज व दंडनीय व्याजासह भरणा केलेली आहे. वास्तवीक रक्कम रुपये 130205478 /- (131374911 - 1169433) वीज देयकांपोटी भरणा करणे आवश्यक असतांना रककम रुपये 84,51,519/- जादा भरणा करण्यात आली आहे. सबब महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 162 दिनांक 02 /02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 122, Hmm No : 162)

132 आमदार निधी / अल्प संख्यांक बहुल/महानगरपालिका निधीमधून केलेल्या विकास कामाबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 8900.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 पाणीपुरवठा विभाग चे लेखापरीक्षण वेळी आमदार निधी व अल्प संख्यांक बहुल मधून खालीलप्रमाणे विकास काम केल्याचे दिसून आले.

अ क्र	कामाचे नाव	ठेकेदाराचे नाव	अंदाजपत्रक रक्कम	करारनामा मुद्रांक रक्कम	एम बी नंबर
	आमदार निधी				

1	वार्ड क्र 7 मध्ये हेरंब गणपती मंदिरापासून ते श्रीकृष्ण व्यायाम शाळा पर्यंत 6 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणे	ललित अमृत पाटील जळगाव	106000	100	
2	वार्ड क्र 7 मध्ये बळीराम पेठ जयंत ओंक यांचे घरा पासून ते शनिपेठ पोलीस स्टेशन पर्यंत 6 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणे	ललित अमृत पाटील जळगाव	174000	100	
3	प्रभाग क्र 37 मेहरूण स न 461 मध्ये त्रिपाठी यांचे घरा जवळ नवीन पीव्हीसी पाईप लाईन टाकणे	ललित अमृत पाटील जळगाव	400000	100	
4	प्रभाग क्र 15 पिम्प्राळा ग न 171 /1 व 173 भैरव नगर भागात नवीन पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.	ललित अमृत पाटील जळगाव	399460	100	
5	प्रभाग क्र 13 मधील ग न 303 पिम्प्राळा शिवार गणपती नगर येथे पीव्हीसी पाईप लाईन टाकणे	ललित अमृत पाटील जळगाव	100000	100	
6	प्रभाग क्र 35 रेणुका नगर सप्तशृंगी कॉलोनी ते वसंत गोंधळी यांच्या घरापर्यंत नवीन पीव्हीसी पाईप लाईन टाकणे	प्रणव construction जळगाव	150000	100	
7	प्रभाग क्र 5 मध्ये जुना असोदा रोड मकरा पार्क ते छोटू मिस्त्री यांच्या घरापर्यंत 110 मीमी पीव्हीसी पाईप लाईन टाकणे	ललित अमृत पाटील जळगाव	106000	---	
8	प्रभाग क्र 11 गुड्डू राजा नगर ते हर्ष गिरी अपार्टमेंट पर्यंत नवीन पीव्हीसी पाईप लाईन टाकणे	पंकज गजानन पाटील जळगाव	207000	100	
9	प्रभाग क्र 6 मधील कांचन नगर शाळा क्र 21 च्या आवारातील बोअर वेल मध्ये संपूर्ण साहित्या निशी नवीन विद्युत पंप पुरविणे व बसविणे.	मुकुंद शांताराम तायडे जळगाव	51000	100	ए 104
10	वार्ड क्र 34 सुप्रीम कॉलोनी तील खूबचंद नगर येथील हनुमान मंदिराजवळ बोअर वेल करणे , विद्युत पंप टाकणे,तसेच ओटा बांधून त्यावर 5 हजार लिटरची	ललित अमृत पाटील जळगाव	160000	100	ए 181

	टाकी बसविणे.				
11	वार्ड क्र 24 मध्ये गणेश वाडी सरदार वल्लभभाई पटेल उद्यानात पाणीपुरवठा करणे कामी बोअर वेल करणे व पाईप लाईन टाकणे.	मुकुंद शांताराम तायडे जळगाव	150000	100	ए 107
12	जळगाव शहरातील प्रभाग क्र 23 विठ्ठल पेठ तेली चौक परिसरात नवीन बोअर वेल करणे व पाईप लाईन टाकणे.	गजानन इंटर प्रायजेस जळगाव	154000	100	
13	जळगाव शहरातील प्रभाग क्र 22 मधील कुंभारवाडा सुरेश भोई यांचे घराजवळ बोअर वेल करणे व पाईप लाईन टाकणे.	गजानन इंटर प्रायजेस जळगाव	200000	100	
14	जळगाव शहरातील प्रभाग क्र 5 जळगाव स न 28/4 ब ,30/1 केसी नगर भागात पाईप लाईन टाकणे .	अनिल बारसू भोळे जळगाव	69000	500	एफ 44
15	मुक्ताई नगर कॉलनी ग न 32 व 33 श्री बनसोडे घर समोरील गार्डन मध्ये बोअर वेळ करून विद्युत पंप बसविणे	ललित अमृत पाटील जळगाव	79000	100	ए 181
16	प्र क्र 18 मध्ये पिण्याची पाईप लाईन टाकणे.सुनील राणे ते शिंपी गल्ली	ज्ञानेश्वर पी पाटील	299000	100	
17	प्र क्र 16 ब मध्ये पाईप लाईन टाकणे.हरी विठ्ठल नगर ते कोठारी नगर	ज्ञानेश्वर पी पाटील	300000	100	
	अल्पसंख्याक बहुल निधी				
18	प्र क्र 29 महावीर हौसिंग सोसायटी पाणीपुरवठा करणे करिता पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.	गजानन इंटर प्रायजेस जळगाव	121076	100	
	महानगरपालिका निधी				
19	काव्य रत्नावली चौकातील बुस्टर पंपाजवळ 250 मिमी व्यासाचा सी आय स्लुईस वाल्व्ह पुरविणे व	संजय डी भोळे	52929	100	ए 189

	बसविणे				
20	काव्य रत्नावली चौकातील बुस्टर पंपाजवळ 250 मिमी व्यासाचा सी आय नॉन रिटर्न वाल्व्ह पुरविणे व बसविणे	संजय डी भोळे	58457	100	ए 189
21	शिवाजीनगर भुरे मामलेदार उद्यानात नव्याने बोअरवेल करणे वीजपंप पुरविणे व बसविणे	मे के एन शेख	113502	100	एफ 44
22	पाणीपुरवठा विभागातील उमाळा जलशुद्धीकरण केंद्र येथील ऑफिस समोर पोलवर लाईट व्यवस्था करणे.	न्यू आर के इलेक्ट्रिक	49796	100	एफ 44
23	प्रभाग 23 श्रीकृष्ण नगर मध्ये सुभाष कोळी ते नाना पाटील व इतर गल्ल्यांमध्ये 90 मिमी पीव्हीसी पाईप लाईन टाकणे	दीपक पंडित आटाळे	57077	100	ए 171

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

01) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण, दि. 24.04.2015 क्र. 47 महाराष्ट्र स्टॅम्प ॲक्ट (सुधारीत), ॲक्ट 2015 मधील परीच्छेद क्र. 34 मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये 10 लक्षपर्यंत रु. 500/- व त्यापुढील रक्कमेच्या 0.1 टक्के दराने मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. अ. क्र.1 ते 6 व 8 ते 13 आणि 15 ते 23 या 21 कामासाठी रुपये 100 मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. त्यामुळे सदर कामांचे प्रत्येकी रुपये 400 /- प्रमाणे एकूण रुपये 8400/- व अ क्र 7 या कामासाठी मुद्रांकावर करारनामा केलेला नसल्याने त्याचे रु 500/- असे एकुण रु.8900/- संबंधिताकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन सादर करावे.

02) अ. क्र.9 ,10,11,14,15 व 19 ते 23 या कामांच्या मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणात उपलब्ध केलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांची तपासणी करता आली नाही. त्यामुळे देयकामध्ये दर्शविण्यात आलेली मोजमापे, दर व रकमा लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 183 दिनांक 27/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

133 उमाळे ता.जळगांव येथे शेतजमिनी खरेदीबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या वर्षाचे लेखापरीक्षण प्रगतीत असून मिळकत व्यवस्थापन विभागाकडील मिळकतीसंबंधीत संचिका तपासणी करण्यात आल्या असता सन 2002 मध्ये उमाळे ता.जळगांव येथे खालीलप्रमाणे शेतजमिनी खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

गट नंबर	एकूण क्षेत्र (हेक्टर मध्ये)	शेतमालकाचे नांव	दुय्यम निबंधक यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक व दिनांक	खरेदी रक्कम
107/1	3.38	श्री.अशोककुमार गंगाराम रंगलाणी रा.जळगांव	344/1-13 दिनांक 25/1/2002	750000
107/अ	3.38	मे.अशोक इं.इंजि. वर्क चे प्रोपायटर श्री.भगवान गंगाराम रंगलानी, श्री.दिलीप गंगाराम रंगलानी, श्रीमती दिप्ती दिपक रंगलानी, श्रीमती ज्योती दिपक रंगलानी	231/4-13 दिनांक 18/1/2002	750000
109/3	0.87	श्रीमती लक्ष्मीबाई दत्तात्रय जोशी, श्रीमती विजया वसंत जोशी व श्रीमती रजनी प्रभाकर जोशी रा.उमाळे	1383/3-10 दिनांक 17/2/2002	217500

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) वरील तीनही शेतजमिनींचे दिनांक 15/01/2024 रोजीचे अद्यावत ऑनलाईन 7/12 उतारे तपासणी करण्यात आले असता उताऱ्यामधील नमुना 12 मध्ये अद्यापही पिकांच्या नोंदी दिसून येतात. म्हणजेच वरील तीनही जमिनींचा अद्यापही कृषक वापर होत असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

2) त्यापैकी गट नं.107/1 चे दिनांक 02/12/2008 रोजीच्या 7/12 उताऱ्यावर जलशुद्धीकरण केंद्राची नोंद करण्यात आलेली आहे. म्हणजेच सदर क्षेत्रावर जलशुद्धीकरण केंद्र बांधण्यात आलेले आहे. महाराष्ट्र जमिन महसुल संहिता 1966 मधील कलम 42 नुसार कोणतीही कृषक जमिन ही अकृषक कारणासाठी वापरता येणार नाही असे नमुद आहे, तथापी वरीलप्रमाणे शेतजमिनीवर जलशुद्धीकरण केंद्र बांधण्यात आलेले आहे म्हणजेच अकृषक वापर करण्यात येत आहे.

त्यामुळे वरील नियमाचे पालन करण्यात आलेले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. त्याचप्रमाणे 2008 मधील उताऱ्यावर जलशुद्धीकरण केंद्राची नोंद असून सन 2024 मधील उताऱ्यावर सदरची नोंद दिसून येत नाही, याबाबत योग्य ती दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

3) वरीलप्रमाणे शेतजमिनी खरेदी करण्यात आल्यानंतर तलाठी उमाळे यांचेकडील गट नं.107/1 व 107/अ च्या 7/12 उताऱ्यांवर तत्कालीन मुख्याधिकारी नगरपालिका जळगांव नावाची नोंद आहे, सदर नोंदी आता महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर मा.आयुक्त महानगरपालिका जळगांव यांचे नांवे अद्यापही दुरुस्त करण्यात आलेल्या नसल्याचे निदर्शनास येते.

4) गट नं.109/3 जमिनीची खरेदी करण्यात आली तेंव्हा त्यामध्ये श्रीमती लक्ष्मीबाई दत्तात्रय जोशी, श्रीमती विजया वसंत जोशी व श्रीमती रजनी प्रभाकर जोशी अशा 4 मालकांच्या नोंदी होत्या, तथापी आता महसुल विभागाकडील दिनांक 15/01/2024 रोजीचा ऑनलाईन 7/12 उतारा तपासणी केला असता त्यामध्ये श्री.कमलाकर दत्तात्रय जोशी, रामचंद्र दत्तात्रय जोशी, सुधीर दत्तात्रय जोशी, सुरेश दत्तात्रय जोशी, विजया वसंत जोशी, रजनी प्रभाकर जोशी, लक्ष्मीबाई दत्तात्रय जोशी अशी 7 मालकांची नांवे दिसून येत आहेत. म्हणजेच खरेदी करण्यात आल्यानंतरही इतर नांवे समाविष्ट झालेली दिसून येतात. तसेच सदर 7/12 उताऱ्यानुसार कुळ, खंड व इतर अधिकारी रकान्यामध्ये सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरास बंदी - इनाम व वतन जमिन अशी नोंद आहे तसेच पुनर्वसन कायद्यांतर्गत जमिनीच्या हस्तांतरण, पोट-विभागणी विभाजन, रुपांतरण किंवा सुधारणा यावर निर्बंध अशी नोंद दिसून येते. त्याचप्रमाणे उमाळे विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. उमाळे यांचेकडील रु.5,00,000/- इतक्या रकमेचा बोजा दिसून येतो. उताऱ्यावर शेवटचा फेरफार क्र.4917 दिनांक 09/01/2023 अन्वये करण्यात आलेला आहे. म्हणजेच दिनांक 17/02/2002 रोजी सदरची शेतजमिन तत्कालीन नगरपालिकेने खरेदी केल्यानंतरही सदरच्या शेतजमिनीच्या उताऱ्यावर नगरपालिकेचे किंवा सध्याचे महानगरपालिकेचे नांव लावण्यात आलेले नाही व मुळ मालकांने इतर नांवे समाविष्ट केलेले असून सहकारी सोसायटीकडून कर्ज उपलब्ध करुन सदर कर्जाचा बोजाच्या नोंदीसुद्धा घेतलेल्या आहेत. तसेच सदरच्या शेतजमिनीवर पिक नोंदमध्ये सन 2022-23 वर्षामध्ये कापूस पिकाची नोंद दिसून येते, म्हणजेच महानगरपालिकेने खरेदी केलेल्या शेतजमिनीवर पूर्वीचा शेतमालक अद्यापही शेती करत असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. यावरुन सदर बाबीकडे महानगरपालिकेने दुर्लक्ष केलेले असून मूळ मालक सदर शेतजमिनीचा अनधिकृत वापर करुन उत्पन्न प्राप्त करीत असल्याचे दिसून येते व त्यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.174 दिनांक 20/02/2024 अन्वये खुलासा व आवश्यक अभिलेखे मागविण्यात आले होते. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा तसेच आवश्यक अभिलेखे प्राप्त झालेले नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

134 भांडार विभागाकडून अग्नीशमन विभागाकरीता फायर हायड्रॅन्ट सिस्टीम खरेदीतील अनियमीतता

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 34100.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण कालावधीत प्रमाणक क्र. 02 दिनांक 15/02/2017 अन्वये महानगर पालिका अंतर्गत इमारतींच्या फायर हायड्रॅन्ट सिस्टीम देखभाल दुरुस्ती पोटी प्रदान केले आहेत सदर देयकांची तपासणी करण्यात आली असून, मे.इंडीया ऑटोमेशन अण्ड सोल्युशन ,पुणे, यांना प्रदांन केलेला देयकांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

01) प्रशासकिय मंजुरी :-

अ) मा.संचालक,महाराष्ट्र अग्निशमन सेवा, (महाराष्ट्र राज्य) मुंबई, यांचे पत्र क्रं.जशनपा/जा.क्रं.अग्नीशमन सेवा/2846/2015 दिनांक 30/03/2015

ब) महासभा ठराव क्रं.327 दिनांक 24/11.2015

क) महानगर पालिकाचा आदेश क्रं.19 दिनांक 10/07/2016

02) तांत्रिक मंजुरी :- महाराष्ट्र अग्निशमन सेवा, अग्निशमन सल्लागार अकादमी मुंबई, यांचे पत्र क्रं.मअसे/37अे/2015/1431 दिनांक 10/09/2015.

03) ई निवीदा :- शासन दर करार निश्चीत आहे. 328/26/04/2016 12,22,400/- नांवे मे इzwj;डिया ऑटोमेशन ऑण्ड सोल्युशन, पुणे.

04) प्राकलन :- 18,50,000/-

05) कामाचे आदेश :- जळगांव महानगरपालिका आदेश क्रं.भांडार/40/16-17 दिनांक 11/07/2016 .

06) कामाची मुदत :- 45 दिवस

07) प्रदान :- प्र.क्रं. 02 दिनांक 15/02/2017 रुपये 12,22,400/-

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) करारनामा 100 रु च्या मुंद्राकिंत पेपरवर अटीशर्तीसह करारनामा केलेला आहे. तथापी महाराष्ट्र राजपत्र नोव्हेंबर 2015 नुसार 1300 रुपये च्या मुंद्राकिंत पेपरवर करणे आवश्यक होते. तथापी केवळ 100/- च्या मुद्रांकित पेपरवर करारनामा केला आहे. सबब रक्कम रुपये 1200 चे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले असलयाने रुपयेय 1200/-

वसुलपात्र ठरते. सबंधितांकडुनस सदर रक्कम वसुल करुन चलनाने योग्या त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यांत यावी.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 119 दिनांक 03/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, विभागाकडून प्राप्त झालेल्या खुलाशानुसार परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

DATSHBM6701 (Ref No : 144, Hmm No : 119)

135 भांडार विभागाकडुन अग्निशमन विभागाकरीता होज पाईप साहित्य खरेदीतील अनियमितता

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	400.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	437875.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण सुरु असुन भांडार विभागाचे लेखापरिक्षण केले असता लेखापरीक्षण कालावधीत आग सुरक्षा अंतर्गत अग्निशमन साहित्य खरेदी जिल्हा निधीतुन (आगसुरक्षा निधी) महानगरपालिकेने अग्निशमन विभागाच्या मागणीनुसार होज पाईप व ब्रॅंरंच पाईप खरेदीसाठी 04 वेळेस ई- निवीदा प्रक्रिया राबवुन खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1) **प्रशासकिय आदेश**:- 18/ दिनांक 11/07/2016 (सुधारीत)

2) **तांत्रिक मान्यता** :- अग्निशमन संचालनालयाचे परिपत्रक क्रं. मअसे/2015/61/1699/ दिनांक 10/11/2015 .

3) **अंदाजपत्रक** :- 437875/-

4) **मक्तेदार** :- इंडिया ऑटोमेशन ऑण्ड फायर सोलयुशन्स पुणे

5) **पुरवठा आदेश :-** जशनपा/भांडार/39/16-17 दिनांक 11/07/2016

6) **करारनामा** :- दिनांक 30/08/2016 चा 100/- मुद्रांकित पेपरवर आहे.

7) **प्रमाणक क्रमांक व दिनांक:-** 02 दिनांक 16/11/2016 (आगसुरक्षा निधी)

8**) प्रदान रककम रुपये** :- 437875/-

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

महानगरपालिकेने खालील प्रमाणे ई-निवीदा प्रकिया राबविली आहे.

अ.क्रं.	ई- निवीदा नोटीस क्रमांक	सन

1	64	2014-2015
2	241	2015-2016
3	245	2015-2016
4	299	2015-2016

01) महाराष्ट्र मुद्रांक सुधारणा अधिनियम 2015 मधील नियम क्रंमाक 34 नुसार तसेच महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 मधील परिशिष्ट -1 अनुच्छेद -63 (अ) व (ब) प महाराष्ट्र शासन राजपत्र,असाधारण भाग-चार सन 2015 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.20 मधील सुधारणा दिनांक 24 एप्रील 2015 नुसार कार्यकंत्राट करारनामा करतांना रुपये 10 लाखांच्या आतील रककमेंसाठी रुपये 500/- च्या मुद्रांकशुल्क पत्रावर करणे आवश्यक आहे. सबब सदरची वसुली सबंधित मक्तेदाराकडुन करण्यांत यावी. तसेच सदरहु अधिनियमातील कलम 33 अन्वये एखादया कमी मुंद्राक शुल्क भरलेल्या प्रकरणांत सदरचा दस्तऐवज अवरुध्द (Impounding) करुन,मुद्रांक जिल्हाधिकारी, यांचेकडुन प्रमाणीत करुन घेणे बंधनकारक आहे. सर्व प्रकारच्या कार्यकरारासाठी कंत्राटांत मांडलेली रक्कम किंवा मुल्य दहा लाखापर्यत रुपये 500/- चे मुद्रांक शुल्क आकारणी करावी व रुपये 10 लाखपेक्षा जास्त रककमेच्या कार्य करारासाठी 0.1टक्के याप्रमाणे मुद्रांक शुल्काची आकारणी करणे बाबत तरतुद आहे. तथापी विवरणपत्रात नमुद क्रं.1 ते 9 मधील कामांची निविदेच्या अनुषंगाने नियमोचीत करारनामा करणे आवश्यक असतांना, मुद्रांक शुल्काची आकारणी कमी केलेली असल्याने रु.400/- रक्कम वसुल करण्यांत यावी व योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 136 दिनांक 09/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, विभागाकडून प्राप्त झालेल्या खुलाशानुसार परिच्छेद अंतिम करण्यात येत आहे.

DATSHBM6701 (Ref No : 145, Hmm No : 136)

136 आरोग्य विभागाने वार्ड क्रं.36 व 3 मधील घनकचरा ठेका रद्द केले नंतर अनामत रक्कमा जप्त न करणेबाबत.

योजना : 14वा वित्त आयोग **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 67500.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण आले. महानगरपालिका हद्दीमधील विविध वार्डपैकी 22 वार्डमध्ये साफसफाई करण्याकरिता विविध बचत गट, स्वयंरोजगार संस्था यांना साफसफाईचे एकमुस्त दराने (ठोक वेतन) ठेके देण्यात आले होते. लेखापरीक्षण कालावधीमध्ये वार्ड क्र.36 मधील सहजीवन स्वंय रोजगार सह संस्था मर्यादित जळगांव यांचा व वार्ड क्र.3 मधील परिश्रम महिला बचत गट जळगांव यांना ठेका त्यांचे काम समाधानकारक नसल्याकारणाने रद्द करण्यात आलेला होता. सदर कंत्राटदारांना लेखापरीक्षण कालावधीमधील

देयकांची अदायगी करतांना त्यांचे देयकामधून 10 टक्के दराने अनामत रकमा कपात करण्यात आलेल्या होत्या. तथापी सदरच्या अनामत रकमा संबंधितांना परत करणेबाबत टिपणी सादर करण्यात येऊन व मंजुरी प्राप्तीनंतर पुढील आर्थिक वर्षांमध्ये परत करण्यात आलेल्या आहेत. अनामत कपाती रकमांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्रं.	पावती क्रंमाक व दिनांक	रक्कम रुपये	शेरा
	सहजीवन स्वंय रोजगार सह संस्था मर्यादित जळगांव		
1	16387/07-12-2016	38828	मुळ पावती छायांकित प्रत उपलब्ध नाही.
2	23276/18-02-2017	54360	मुळ पावती छायांकित प्रत उपलब्ध नाही.
3	30152/09-03-2017	81970	मुळ पावती छायांकित प्रत उपलब्ध नाही.
4	41397/07-07-2017	74210	मुळ पावती छायांकित प्रत उपलब्ध नाही.
5	48902/24-08-2017	33767	मुळ पावती छायांकित प्रत उपलब्ध नाही.
	एकुण:-	**283135**	
	परिश्रम महिला बचत गट जळगांव		
1	41316/07-06-2017	29150	मुळ पावतीची छायांकित प्रत उपलब्ध नाही
2	52155/7-10-2017	164530	मुळ पावतीची छायांकित प्रत उपलब्ध नाही
3	58010/21-12-2017	103333	मुळ पावतीची छायांकित प्रत उपलब्ध नाही
	एकुण:-	**297013**	

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) ई-निवीदे मधील सर्वसाधारण अटी व शर्ती मधील शर्त (इ) क्रं. 1 नुसार वादविवाद निर्माण झाल्यास याबाबत रस्ते साफसफाईचे, गटार साफसफाईचे काम, कचरा कुंडया व ढिग उचलणेचे काम असमाधानकारक आहे असे दिसुन आल्यानंतर वाद निर्माण झाल्यास कोणतेही नोटीस न देता सर्व अनामत रक्कम जप्त करुन मक्ता रद्द करणेचा अधिकार आयुक्तांना असेल अशी अट नमुद करण्यांत आली आहे. सदर कामांमध्ये मक्तेदार यांची कामे समाधानकारक नसल्याने मक्ता रद्द करण्यात आलेला आहे. काम असमाधानकारक असल्याने मक्ता रद्द करतांना करारनाम्यातील अटी व

शर्तीनुसार अनामत रक्कम जप्त करणे आवश्यक असतांना मक्तेदाराचा जमा झालेल्या अनामत रकमा परत करणेबाबत टिपणी सादर करण्यात आली असून त्याबाबतचे प्रदान हे पुढील आर्थिक वर्षामध्ये करण्यात आलेले असल्याची शक्यता आहे. सदर अनामत रकमा संबंधित कंत्राटदारांना पुढील आर्थिक वर्षामध्ये परत करण्यात आल्या असल्यास नियमबाह्यपणे परत करण्यात आलेल्या असल्याचे संबंधितांनाकडून सदरच्या अनामत रकमा वसुल करण्यात येऊन योग्य त्या खाती भरणा करण्यात याव्यात.

02) सहजीवन स्वंय रोजगार सह संस्था मर्यादित जळगांव यांचे कामास प्रशासकिय मान्यता मा.आयुक्त यांनी पत्र क्रं.जमना/आका/03/2016 दिनांक 01/12/2016 अन्वये दिलेली आहे तर कार्यारंभ आदेश हे दिनांक 12/08/2016 रोजी दिलेले आहे. म्हणजेच प्रशासकिय मान्यता देण्यापुर्वीच कामाचे आदेश देण्यांत आले आहेत. सदर बाब नियमबाहय ठरते.

03) परिश्रम महिला बचत गट जळगांव यांचे कामास प्रशासकिय मान्यता मा.आयुक्त यांनी पत्र क्रं.जमना/आका/03//2016 दिनांक 01/12/2016 अन्वये दिलेली आहे तर कार्यारंभ आदेश हे दिनांक 12/08/2016 रोजी दिलेले आहे. म्हणजेच प्रशासकिय मान्यता देण्यापुर्वीच कामाचे आदेश देण्यांत आले आहेत. सदर बाब नियम बाहय ठरते.

04) परिश्रम महिला बचत गट जळगांव, समवेत झालेल्या करारनाम्यामधील अट क्रं. ड (4) नुसार EPF No. KDNSK1560075000 हा क्रमांक माहे जुन -2017 ला नोंदणी करुन प्राप्त केला आहे. म्हणजेच कामाचे आदेश दिल्यानंतर जवळ जवळ 9 महिन्यांच्या कालावधीनंतर नोंदणी करण्यांत आलेली आहे. सदर बाब ही निवीदा मंजुर करतेवेळी तपासणी करणे आश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. त्यामुळे ऑगस्ट-2016 ते जुन 2017 या कालावधीत कामगारांच्या EPF च्या रक्कमा भरणा करण्यांत आलेल्या नसल्याची शकयता नाकारता येत नाही. याबाबत महानगरपालिका आरोग्य विभागामध्ये योग्य ती दक्षता घेण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास येते. व त्यामुळे कामगारांचे नुकसान झालेले असल्याचे लेखापरीक्षणांचे मत आहे.

05) परिश्रम महिला बचत गट जळगांव, यांचा ठेका स्थगिती आदेश क्रं.जमनपा/आरोग्य/1275/2017-18 दिनांक 10/07/2017 ची मुळ प्रत लेखापरीक्षणात सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे याबाबत योग्य ती पडताळणी करता आली नाही.

06) श्री.आनंद के. सोनवल, आरोग्य निरीक्षक यांनी दिनांक 03/05/2017 च्या टिपणीनुसार परिश्रम महिला बचत गट जळगांव, यांनी दिनांक 18/08/16 ते 20/08/2016, 22/05/2016 व 23/05/2016 या पाच दिवसात संपुर्ण वार्डात काम बंद होते, त्यापोटी दंडाची रक्कम 15000/- प्रतिदिन प्रमाणे आकारणी करणे करारनाम्यानुसार आवश्यक असतांना श्री.आनंद के. सोनवल, यांनी केवळ 1500/- प्रमाणे कमी दराने दंडाची आकारणी करुन मक्तेदाराचे हित जोपासले आहे. सबब 67500/- कमी दंड आकरणेत आला आहे. याबाबत श्री सोनवल,यांच्या टिपणी पान नं. 10149 दिनांक 18/08/2016, टिपणी पान नं.10146 दिनांक16/08/2016 टिपणी पान नं. व 10147 दिनांक 17/08/2016 व टिपणी

पान नं. 10150 दिनांक 19/08/2016 सादर केलेल्या अहवालानुसार दंड आकरणी करणेबाबत शिफारस करुन, नंतर रक्कम रुपये 7500/- नाममात्र दंडाची रककम त्यांच्याकडुन वसुल केली आहे. त्यामुळे रु.75000/- इतकी दंडाची रक्कम वसुल होणे आवश्यक असतांना रु.7500/- इतकी अल्प रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे रक्कम रुपये 67500/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे. सदर कमी वसुलीची रक्कम रु.67,500/- संबधीतांकडून वसुल करण्यात येवुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने जमा करण्यात यावी.

07) वरील दोन्ही ठेक्यांमध्ये ठेका रद्द करणेसंदर्भात चौकशी अधिकारी यांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. चौकशी दरम्यान कंत्राटदारांची सुनावणी होऊन चौकशी अहवाल सादर करण्यात आलेले असल्याचे संचिकांमध्ये नमूद करण्यात आलेले आहे. सदरचे चौकशी अहवाल अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाहीत. त्याचप्रमाणे ठेका रद्द/स्थगित करणेबाबत आदेशही लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे चौकशी अहवालामध्ये काय-काय नमूद करण्यात आले, मक्तेदाराने त्यांचे काय म्हणणे मांडले, त्यावर काय निर्णय देण्यात आले, ठेका रद्द करणेबाबतच्या आदेशामध्ये कोणत्या बाबी नमूद करण्यात आल्या याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 158, दिनांक 30/01/2024 व 178 दिनांक 29/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATSHBM6701 (Ref No : 146, Hmm No : 178)

137 विविध वार्डांमध्ये साफसफाई ठेक्यांमधील अनियमिततांबाबत

योजना	:	14वा वित्त आयोग	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 67900.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 8400.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण आले. महानगरपालिका हद्दीमधील विविध वार्डपैकी 22 वार्डमध्ये साफसफाई करण्याकरिता विविध बचत गट, स्वयंरोजगार संस्था यांना साफसफाईचे एकमुस्त दराने (ठोक वेतन) ठेके देण्यात आले होते. लेखापरीक्षण कालावधीमध्ये सदर वार्डांमध्ये साफसफाईचे कामे केल्यानुसार संबंधित संस्थांना विविध प्रमाणकांद्वारे देयके अदा करण्यात आलेल्या आहेत. यानुसार सन 2016-2017 मध्ये एकूण रक्कम रु.28427469/- इतकी व सन 2017-2018 मध्ये एकूण रक्कम रु.113835194/- इतक्या रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत. यासंदर्भात संचिकांची तपासणी करण्यात आली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

01) कामाचे आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र

मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. वरील ठेक्यांनुसार तीन वर्षे कालावधीकरिता देय होणारी एकूण रक्कम परिगणीत करुन त्यानुसार वरील नियमाप्रमाणे करारनामा करण्याकरिता मुद्रांक शुल्क वापरणे आवश्यक होते. तथापी ठेक्यांमध्ये रु.400/- चे मुद्रांक कमी वापरण्यात आलेले असल्याने शासन महसुलाची हानी झालेली आहे. तरी 22 संस्थांकडून 22 x 400 = 8800/- रक्कम वसुल करण्यात यावी व शासन खाती संबंधित लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

02) करारनाम्यामधील अटींनुसार कामावरील कामगारांची आरोग्य तपासणी केलेबाबतचे प्रमाणपत्रे घेण्यात आली नाही. त्यामुळे कामावरील कामगारांच्या आरोग्य तपासणी करण्यात आलेले नसल्याचे दिसून येते. परिणामी कामगारांची आरोग्य विषयक दक्षता घेण्यात आलेली नाही व याबाबत आरोग्य विभागानेही योग्य तो पाठपुरावा केलेला दिसून येत नाही.

03) ई-निवीदे मधील सर्वसाधारण अटी व शर्ती मधील शर्त (ड) क्रं. 2 नुसार मक्तेदार ज्या मजुरांची /कामगारांची नियुक्ती करेल ती नियुक्ती प्रचलित किमान वेतन कायदयाप्रमाणे करेल व त्या परिमंडळानुसार किमान वेतन अदा करण्यांची जबाबदारी मक्तेदाराची असतांना, उदयोग उर्जा व कामगार विभाग अधिसूचना क्रं.किवेअ 2014/510/प्रं.क्रं.150/कामगार-7 दिनांक 24/02/2015 नुसार "ड" वर्ग महानगरपालिकेचे क्षेत्र हे परिमंडळ -1 मध्ये असुन, त्यानुसार कुशल कामगार दर रुपये 14000/-अर्धकुशल कामगार रुपये 13000/- व अकुशल कामगार दर रुपये 11500/- प्रति महिना देय ठरतो. तसेच नगरविकास विभाग परिपत्रक क्रं. संकिर्ण-2016/प्रं.क्रं.24/नवि-20 दिनांक 20/01/2016 अन्वये वरील अधिसूचनेची काटेकोर अंमलबजावणी करावी असे आदेश आहेत. त्यानुसार कार्यवाही झाली किंवा कसे याबाबत साधार अभिलेखे सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा करण्यात येत होते किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. तसेच कंत्राटदारामार्फत कामगारांना अशा प्रकारे किमान वेतन दरानुसार वेतन अदा करण्यात येत असल्याबाबत विभागामार्फत कोणतीही पडताळणी करण्यात आलेली नसल्याची बाब निदर्शनास येते.

04) त्याचप्रमाणे ई-निवीदे मधील सर्वसाधारण अटी व शर्ती मधील शर्त (इ) क्रं.1 मक्तेदाराने लावलेल्या कामगारांना प्रचलित किमान वेतन कायदयानुसार धनादेशाद्वारे वेतन प्रदान करणे मक्तेदारांवर बंधनकारक राहिल व त्याबाबतचा पुरावा (बॅक खाते उतारा) या कायदयांची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे सादर करावा लागेल असे नमुद केले आहे. त्यानुसार अंमलबजावणीची माहिती कंत्राटदारांमार्फत सादर करण्यात आलेली असल्याचे दिसुन येत नाही. तसेच याबाबत विभागानेही योग्य ती दक्षता घेतलेली असल्याचे दिसून आले नाही.

05) तसेच संबंधित कंत्राटदारांनी त्यांचे कामगारांना वेतन अदा केल्यानंतर वेतनपटावर/हजेरीपत्रकावर वेतन मिळालेबाबत मुद्रांकित पोहच पावतीच्या प्रती मागणी करुनही लेखापरीक्षणात सादर करण्यात आल्या नाहीत.

06) कामगार भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 मधील तरतुदींनुसार कंत्राटदारांनी ईपीएफ ट्रस्टकडे स्वत:ची व

कामगारांची नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच नियमानुसार कामगारांचे वेतनामधून कामगारांचा हिस्सा व कंत्राटदाराचा हिस्सा संबंधितांचे खात्यामध्ये भरणा करणे व त्याबाबतच्या पुराव्यादाखल कागदपत्रे महानगरपालिकेकडे देयकासोबत सादर करणे आवश्यक असतांना कोणत्याही कंत्राटदाराने याप्रमाणे कार्यवाही केलेली असल्याचे आढळून आले नाही. सदर बाब ही कामगारांचे भविष्याचे दृष्टीने नुकसानकारक आहे. तथापी याबाबत संबंधित विभागामध्ये योग्य ती पडताळणी करण्यात आलेली असल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले नाही.

07) कंत्राटदारांची देयके अदा करण्यापूर्वी संबंधित वार्डमधील स्वच्छता निरिक्षक यांचा तपासणी अहवाल देयकासोबत जोडणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे अहवाल जोडण्यात आलेले असल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे सदर बाबत संबंधित स्वच्छता निरिक्षक यांनी तपासणी केली किंवा कसे, संबंधित कामाचे ठिकाणी स्वच्छता निरिक्षक खरोखर उपस्थित होते किंवा कसे, नागरिकांच्या तक्रारी असल्यास त्यानुसार कार्यवाही करण्यात येत होती किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

08) कचरा भरणा केल्यानंतर संबंधित वाहनांचे वजन, खेपा यांबाबत तपासणी करुन व त्याप्रमाणे संबंधित नोंदवहीमध्ये आरोग्य निरिक्षक, आरोग्य अधीक्षक, आरोग्य्zwj; अधिकारी यांनी प्रमाणीत करणे आवश्यक असतांना अनेक ठिकाणी असे प्रमाणित करण्यात आलेले असल्याचे आढळून आले नाही

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 178 दिनांक 29/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATSHBM6701 (Ref No : 149, Hmm No : 178)

138 आरोग्य विभागाकरिता 14 नग ट्रॅक्टर ट्रॉलीसह खरेदी करणे

योजना : चौदावा वित्त आयोग **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 10600.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान चौदाव्या वित्त आयोगामधून आरोग्य विभागाकरिता 14 नग ट्रॅक्टर ट्रॉलीसह खरेदी करण्यात आलेली असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

योजना	चौदावा वित्त आयोग
प्रशासकीय मान्यता	महासभा ठराव क्र.350 दिनांक 9/12/2015
साहित्याचा तपशिल	ट्रॅक्टर ट्रेलरसह 10 नग, फ्रंट एण्ड लोडर 4 नग (प्रभागनिहाय)

पुरवठादार	मे.सिद्धी ऑटोमोबाईल्स, जळगांव	
पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक	मनपा भांडार विभाग पुरवठा आदेश क्र.75, दिनांक 23/9/2016	
पुरवठा कालावधी व प्रत्यक्ष पुरवठा दिनांक	कालावधी 45 दिवस (i.e. upto 6/11/2016), प्रत्यक्ष पुरवठा दिनांक 24/10/2016	
तांत्रिक तपासणी अहवाल	उपअभियंता, सा.बां.(यां) उपपिभाग जळगांव यांचे प)त्र क्र.306 दिनांक 25/10/2016	
खर्चाचा तपशिल	प्रमाणक क्रमांक 11, दिनांक 27/10/2016	
	देयक रक्कम	12367421
	वजा सुरक्षा रक्कम	281250
	आयकर	284451
	मुल्यावर्धीत कर	247348
	विमा	123674
	एकूण वजाती	936723
	निव्वळ देय रक्कम	11430698

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) घनकचरा संकलन व वाहतुकीसाठी आरोग्य विभागास 14 नग ट्रॅक्टर्स यामध्ये 10 नग ट्रॅक्टर्स ट्रॉलीसह व 4 नग ट्रॅक्टर्स फ्रंड लोडरसह असे खरेदी करण्याकरिता वरीलप्रमाणे महासभा ठरावान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापी लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या संचिकांमध्ये सदर ठरावाच्या अनुषंगाने आरोग्य विभागामार्फत सादर करण्यात आलेला प्रस्ताव, विविध अधिकाऱ्यांचे अभिप्राय, डॉकेट शिट प्रत लावण्यात आलेले नाही, त्यामुळे आरोग्य विभागाकडे घनकचरा संकलन व वाहतुकीसाठी किती ट्रॅक्टर्स उपलब्ध आहेत, त्यापैकी किती वाहने नादुरुस्त असून निर्लेखनास पात्र आहेत, वार्डनिहाय किती वाहनांची आवश्यकता आहे व त्यानुसार किती वाहने नव्याने खरेदी करणे आवश्यक आहे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही.

02) मनपा वाहन विभाग पत्र क्र.140, दिनांक 17/2/2016 अन्वये मा.अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), सार्वजनिक

बांधकाम विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना वाहननिहाय कंपनी व अश्वशक्ती तसेच ई-निविदेसाठी आवश्यक असलेले अटी व शर्ती बाबत मार्गदर्शन करण्याकरिता सादर करण्यात आले, त्यामध्ये ट्रॅक्टर टॉलीसह 10 नग वाहन क्षमता प्रती वाहन 3 टन, कामाचे स्वरुप कचरा वाहतुक करणे, ट्रॅक्टर फ्रंट अॅण्ड लोडर 4 नग, वाहन क्षमता 0.5 क्यु.मिटर प्रती वाहन, कामाचे स्वरुप कचऱ्याचे ढिगारे उचलणे असे नमुद करण्यात आलेले आहे. तसेच पत्रासोबत मशिनरीचे किंमतीबाबतचे प्रोफॉर्मा इन्व्हॉईस, टेक्नीकल स्पेसिफिकेशन व डिजीएस अॅण्ड डी चे रेट कॉंट्रॅक्टच्या छायांकित प्रती संलग्न आहे असे नमुद करण्यात आलेले आहे. त्यानुसार मा.अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), सार्व.बां.वि. नवी मुंबई यांचे पत्र क्र.360 दिनांक 18/3/2016 अन्वये मार्गदर्शन करण्यात आले. त्यामध्ये ट्रॅक्टर ट्रॉलीसह (10 नग) हे वाहन महिंद्रा, एस्कॉर्ट व मैसी फर्ग्युसन बनावटीचे ट्रॅक्टर ट्रालीसह डीजीएस अॅण्ड डी रेट कॉंट्रॅक्टरवर उपलब्ध आहे. यामध्ये महिंद्रा बनावटीचे ट्रॅक्टर ट्रॉलीसह 40 एचपी पॉवर स्टेअरींगसह उपलब्ध आहे व ते शहर परिसरात वापरण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या सोईचे व उपयुक्त ठरतात. ट्रॅक्टर लोडर (4 नग) हे वाहन महिंद्रा, एस्कॉर्ट बनावटीचे ट्रॅक्टर ट्रालीसह डीजीएस अॅण्ड डी रेट कॉंट्रॅक्टरवर उपलब्ध आहे. यामध्ये महिंद्रा बनावटीचे ट्रॅक्टर लोडर पॉवर स्टेअरींगसह उपलब्ध असल्याने सदर ट्रॅक्टर लोडर शहर परिसरात वापरण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या सोईचे व उपयुक्त ठरतात. त्यामुळे तुलनात्मक विवरणपत्रामध्ये नमूद Mahindra-605 DI-I Arjun Novo-57 HP (with power steering) या बनावटीचे ट्रॅक्टर लोडर डीजीएस अॅण्ड डी रेट कॉंट्रॅक्टवर प्रचलित शासकीय साहित्य खरेदी धोरणामध्ये नमूद नियमांचे पालन करुन खरेदी करावयास हरकत नाही असे कळविलेले आहे. मनपा वाहन विभागाचे वर नमुद पत्र क्र.140 सोबत डीजीएस अॅण्ड डी चे दर कराराची प्रत जोडण्यात आलेली असल्याबाबत नमुद आहे, तथापी संचिकेमध्ये दर कराराची प्रत संलग्न करण्यात आलेली नाही. तसेच अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही सदर दरकराराची प्रत लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाही, त्यामुळे दराकरारामधील दरांबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

03) वरीलप्रमाणे मा.अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), सार्वजनिक बांधकाम विभाग नवी मुंबई यांचे पत्र क्र.360 दिनांक 18/3/2016 अन्वये सुचविण्यात आलेली वाहने ही डीजीएस अॅण्ड डी चे दरकरारामध्ये उपलब्ध असल्याबाबत नमुद केलेले आहे, तथापी दराकरारानुसार निश्चित करण्यात आलेल्या पुरवठादारांकडून व दरकरारामधील दरांमध्ये वाहने खरेदी करण्यात आलेली नाहीत, त्यामुळे जादा दराने खरेदी करण्यात आलेली असण्याची व त्यामुळे शासन निधीचे नुकसान झालेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

04) वाहने खरेदी करतांना थेट उत्पादक कंपनीकडे मागणी केल्यास कंपनीच्या किंमतीमध्ये वाहने उपलब्ध होऊ शकतात. याप्रमाणे थेट उत्पादक कंपनीकडून मनपामार्फत इतर वाहने खरेदी करण्यात आलेली असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. तथापी उपरोक्त वाहने खरेदी करतांना उत्पादक कंपनीकडे मागणीपत्र सादर करण्यात आलेले नसल्याने शासन निधीचे नुकसान झालेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

05) अॅटो मेकॅनिक, वाहन विभाग मनपा यांनी वाहने खरेदी करण्याच्या अनुषंगाने दिनांक 30/03/2016 अन्वये टिपणी सादर केली, सदर टिपणीमध्ये डिजीएस अॅण्ड डी यांचे दरकराराबाबत कुठेही उल्लेख करण्यात आलेला दिसून

येत नाही. त्याचप्रमाणे शाखा अभियंता वाहन विभाग यांचा दिनांक 04/04/2016 रोजीचा शेरा, शहर अभियंता यांचा दिनांक 05/04/2016 रोजीचा शेरा तसेच मुख्य लेखापरीक्षक यांचा दिनांक 05/04/2016 रोजीचा शेरा यांमध्येही दरकराराबाबत कुठेही उल्लेख करण्यात आलेला दिसून येत नाही, याउलट शहर अभियंता यांनी ई-निविदा काढणेत यावी असे नमुद केले आहे. तसेच सदर टिपणीवर उपायुक्त तसेच मा.आयुक्त यांची कोणतीही मान्यता घेण्यात आलेली दिसून येत नाही. त्यामुळे दरकराराच्या बाबी ह्या जाणीवपूर्वक दुर्लक्षित करण्यात आल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

06) ई-निविदा प्रक्रीया पूर्ण करण्यात आल्यानंतर मे.सिद्धी ऑटोमोबाईल जळगांव यांचे सर्वात कमी दर हे वाटाघाटीअंती मंजुर करण्यात आले व त्यास स्थायी समिती सभा ठराव क्र.523 दिनांक 16/09/2016 अन्वये मान्यता प्रदान करण्यात येऊन पुरवठा आदेश देण्यात आले. पुरवठा आदेशामध्ये पुरवठादारास करारनामा करुन देण्याबाबत कळविण्यात आले, तथापी त्यामध्ये मुद्रांक किंमतीचा उल्लेख न करता नियमानुसार मुद्रांक पेपरवर करारनामा करुन द्यावा असे नमुद करण्यात आले. संबंधित पुरवठादार यांनी रु.1300/- चे मुद्रांकावर करारनामा दि.26/09/2016 रोजी करुन सादर केला. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 महाराष्ट्र मुद्रांक शूल्क अधिनियम 2015 मधील परिच्छेद 34 व महसुल मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 (सुधारणा 2015) अन्वये रूपये 10 लक्ष पर्यंत रूपये 500 व त्या पुढील रक्कमेचा प्रत्येक लाखास 0.1% दराने म्हणजे रु.100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे वाहने पुरविणेकरिता पुरवठा आदेशानुसार किंमत रु.1,23,67,421/- इतकी होती व त्यानुसार रु.11900/- चे मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक होते, तथापी रु.1300/- चे मुद्रांकावर करारनामा करण्यात आल्यामुळे रु.10600/- मुद्रांक महसुलाचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे सदरची रक्कम संबंधित पुरवठादार यांचेकडून वसुल करण्यात येऊन मुद्रांक शुल्काचे लेखाशिर्षाखाली शासन खाती भरणा करण्यात यावी.

07) ई-निविदा प्रक्रीया पूर्ण करण्यात आल्यानंतर मे.सिद्धी ऑटोमोबाईल जळगांव यांना पुरवठा आदेश देण्यात आला. त्यानुसार त्यांनी वाहनांचा पुरवठा डिलीव्हरी चलन क्र.3373 व 3372 दिनांक 24/10/2016 अन्वये केला. डिलीव्हरी चलननुसार महिंद्रा कंपनीचे सरपंच 415 ट्रॅक्टर ट्रॉलीसह 10 नग व ट्रॅक्टर लोडरसह 4 नग पुरवठा करण्यात आलेले आहे. त्यांची नोंद माल रजिष्टर नं.2 पृष्ठ क्र.143 वर घेण्यात आली आहे, सदर नोंदवही अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

08) निविदा मागवितांना वाहनांचे स्पेसिफिकेशनमध्ये acceptable make - Messey Furguson, Mahindra, Escort, John Deere अशी कंपनींची नांवे नमुद करण्यात आलेली आहे, त्यानुसार पुरवठादार मे.सिद्धी ऑटोमोबाईल यांनी निविदेसोबत महिंद्रा कंपनीच्या वाहनांचा तांत्रिक तपशिल जोडलेला आहे, तथापी महानगरपालिकेच्या पुरवठा आदेशामध्ये कंपनीचे नांव नमुद करण्यात आलेले दिसून येत नाही. पुरवठा आदेश देतांना सर्व तांत्रिक बाबी नमुद करणे आवश्यक होते, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही.

09) निविदा मागवितांना ट्रॅक्टरचे स्पेसिफिकेशन नमूद करतांना 39 ते 42 एचपी व फ्रंट लोडर ट्रॅक्टरचे स्पेसिफिकेशन नमुद करतांना 55 ते 60 असे नमुद करण्यात आलेले आहे, त्यानुसार निविदाकारांनी दर नमूद केलेले आहे, तथापी नमूद

करण्यात आलेले दर हे किती एचपी क्षमतेचे पुरविण्यात येतील याबाबत स्पष्ट उल्लेख केलेला नाही, तसेच संबंधित पुरवठादाराकडून याबाबत लेखी पत्रव्यवहार करण्यात आलेला दिसून येत नाही. त्यानंतर प्रत्यक्ष पुरवठा हा ट्रॅक्टर 40 एचपी व फ्रंट लोडर ट्रॅक्टर 57 एचपी क्षमतेचे करण्यात आलेले आहेत. त्यामुळे नमुद करण्यात आलेले दर हे प्रत्यक्षात पुरवठा करण्यात आलेल्या साहित्याच्या एचपी क्षमतेचेच होते किंवा कसे तसेच जादा क्षमतेच्या वाहनांचे दर नमुद करुन कमी क्षमतेची वाहने पुरविण्यात आलेली असण्याची व त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले असण्याची शक्यताबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. तसेच याबाबत विभागाकडे तांत्रिक अधिकारी/कर्मचारी कार्यरत असतांना त्यांचेमार्फतzwj; योग्य ती दक्षता घेण्यात आलेली नसल्याचीही बाब निदर्शनास येते.

10) वरीलप्रमाणे डिलीव्हरी चलननुसार महिंद्रा कंपनीची ट्रॅक्टर व ट्रॉली खरेदी करण्यात आलेल्या आहेत. सदर वाहनांचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जळगांव यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्राची तपासणी करण्यात आली असता त्यामध्ये 40 एचपी चे 10 ट्रॅक्टर व 57 एचपीचे 4 ट्रॅक्टरच्या नोंदणी झालेल्या आहेत. त्याचप्रमाणे ट्रॉलीच्या नोंदणी स्वतंत्रपणे करण्यात आलेल्या असून सदर ट्रॉलीच्या नोंदणी प्रमाणपत्रांमध्ये अ.क्र.(2) नुसार उत्पादक कंपनीचे नांव हे चौधरी इंजिनिअरींग वर्क्स व अ.क्र.(12) नुसार उत्पादकाचे वर्गीकरण हे न्यू निलेश ट्रेलर असे नमुद करण्यात आलेले आहे. म्हणजेच खरेदी करण्यात आलेल्या ट्रॉलीज् ह्या महिंद्रा कंपनीऐवजी स्थानिक उत्पादकाकडून बनवून घेण्यात आलेल्या असल्याचे दिसून येते. त्यामुळे पुरवठा आदेश, डिलीव्हरी चलन व पुरवठादाराचे देयक यांनुसार ठराविक उत्पादक कंपनी नमूद करण्यात येऊन प्रत्यक्षात पुरवठा हा स्थानिक उत्पादकाकडील साहित्यांचा करण्यात आलेला असल्याने शासन निधीचे नुकसान व गैरवापर करण्यात आलेला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

11) निविदा कागदपत्रांमध्ये ट्रेलरचा तपशिल देतांना लांबी 10 फुट, रुंदी 6.25 फुट, उंची 3 फुट, वजन 1650 किग्रॅ., क्षमता 3 टन, टायर साईज 10x20 असे नमूद केले असून पुरवठादाराने निविदा कागदपत्रांमध्ये याप्रमाणे तपशिल नमूद केलेला आहे. तथापी पुरवठा करण्यात आलेले ट्रेलर नमुद तपशिलाप्रमाणेच करण्यात आलेला असल्याबाबत संचिकेमध्ये कुठेही तपशिल नमुद करण्यात आलेला नाही. त्यामुळे पुरवठा करण्यात आलेल्या ट्रॉली ह्या निविदेमध्ये नमुद तपशिलानुसार करण्यात आलेल्या असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही. तसेच विभागाने याबाबत तपासणी अहवाल जोडलेला नसल्याने योग्य ती दक्षता घेतलेली नसल्याचे दिसून येते.

12) वित्त विभाग शासन निर्णय क्र.विमासं-1098/प्र.क्र.28/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 व त्या अनुषंगाने नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे पत्र क्र.डीएमई 102000/प्र.क्र.6/2000/1, दिनांक 14/11/2000 अन्वये सूचित केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मालमत्तेचा विमा हा फक्त शासकीय विमा निधीकडेच काढणे क्रमप्राप्त आहे. तथापी सदर वाहनांचा विमा हा युनायटेड इंशुरन्स कंपनी लिमिटेड यांचेकडून काढण्यात आलेला असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे शासकीय विमा निधीचा महसुल वाढविणेचा शासनाचा उद्देश सफल होत नसल्याने शासकीय महसुलाची हानी होत आहे. तसेच शासन नियमांचे पालन होत नसल्याचेही लेखापरीक्षणाचे मत आहे.

वरील संपूर्ण खरेदीच्या प्रक्रीयेमध्ये आरोग्य विभागाकरिता साहित्याची आवश्यकता, भांडार विभागामार्फत निविदा प्रक्रीया व वाहन विभागामार्फत नोंदणी प्रक्रीया पूर्ण करण्यात आलेली आहे. त्यामुळे वरील मुद्यांचे अनुषंगाने तीनही विभागांनी संयुक्तरित्या आवश्यक अभिलेखांसह लेखापरीक्षणात अनुपालन सादर करण्यात यावे या आशयाने अर्धसमास पत्र क्र.276 दिनांक 28/05/2024 अन्वये कळविण्यात आले, तथापी अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात येत आहेत.

FDSDNBM7201 (Ref No : 186, Hmm No : 276)

139 14 वा वित्त आयोग निधी (घनकचरा व्यवस्थापन) अंतर्गत कचरा वाहतुक ढकलगाडया खरेदीवरील खर्चाबाबत

योजना	:	14वा वित्त आयोग	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 434000.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-18 चे लेखापरीक्षण प्रगतीत असुन,आरोगय विभागाचे लेखापरीक्षण करण्यांत येत आहे. या विभागांतर्गत 14 वा विततत आयोगाचे अनुदान प्राप्त आहे. त्यातुन50 टकके निधी घनकचरा व्यवस्थापनासाठी खर्च करणेची तरतुद आहे त्यानुसार महासभा ठराव क्रमांक 519 दिनांक 26/09/2016 अन्वये महापालिकेने ई-निवीदा क्रं.595 दिनांक 5/01/2017 नुसार मे.रोटोमेटीक कन्टेनर्स प्रायव्हेट लिमीटेड,अंबड,नाशिक ई- निवीदा प्रक्रिया राबवुन आय. एस. ओ. दर्जाचे डबल व सिंगल व्हील बॅरो हात ढकलगाडया 180 नग खरेदी वाटाघाटीनंतर खरेदी केलेल्या आहेत. याबाबत खालील प्रमाणे तपशिल आहे.

1.**प्रशासकिय मान्यता** :- 1.महासभा ठराव नं.519 दिनांक 26/09/2016

2.मा.आयुक्त यांचे प्रशासकिय आदेश क्रं.11 दिनांक 22/02/2017

2.**तांत्रिक मान्यता** :- उपलब्ध नाही.

3.**ई निवीदा क्रमांक** :- ई-निवीदा क्रं.595 दिनांक 5/01/2017

4.**मक्तेदार** :-मे.रोटोमेटीक कन्टेनर्स प्रायव्हेट लिमीटेड,अंबड,नाशिक,

5.**पुरवठा आदेश :-**जमनपा/आरोग्य/जा.क्रं.1080/2016-17 दिनांक 22/02/2017

6. **करारनामा** :-1500/- किमंतीचे स्टॅम्प पेपर वर आहे.

7. **खर्च** :- 22,53,000/-

8. **<u>प्रमाणक क्रमांक :-</u>** 66 दिनांक 31/03/2017

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

01) टिपणी दिनांक 03/12/2016 नुसार प्रतीगाडी बाजारभावानुसार प्रती नग रुपये 14000/-ते 15000/- व पेडेस्ट्रेन टॅाली प्रती नग रुपये 12000/- असे नमूद करण्यात आलेले आहे, तथापी याबाबत निविदा मागविणेपूर्वी बाजारामधून दरपत्रके मागवून त्याप्रमाणे हातची किंमत निश्चित करणे व त्याप्रमाणे निविदेमध्ये किंमत नमूद करणे आवश्यक होते. तथापी याप्रमाणे दरपत्रके मागविण्यात आलेले नाहीत, त्याचप्रमाणे निविदेमध्ये प्राप्त झालेले दर योग्य आहेत किंवा कसे याबाबत महानगरपालिकेकडून/विभागाकडून कोणतीही पडताळणी करण्यात आलेली नाही, त्यामुळे बाजारभावापेक्षा जादा दराने खरेदी करण्यात आलेली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

02) मुख्य स्वच्छता निरीक्षक, यांनी प्रभाग क्रं.1 ते 4 साठी मागणी केलेप्रमाणे Pedistration Trolly नग 80 व व्हील बॅरो 100 नग मागणी दिनांक 21/12/2016 रोजी सादर केलेली आहे. महासभा ठराव क्रं.519 दिनांक 26/09/2016 अन्वये घनकचरा व्यवस्थापनावर कराव्या लागणा-या कामांना चौदावा वित्त आयोगाच्या निकषानुसार 50 टक्के खर्च करण्यांस मान्यता प्रदान करण्यांत आलेली आहे. तथापी दिनांक 21/12/2016 रोजी मागणी सादर करण्यांत आल्यानंतर साहित्य खरेदी व अपेक्षीत खर्चास मान्यता घेण्यांत आलेली दिसुन येत नाही. तसेच वरील महासभा ठरावाच्या अनुषंगाने सादर टिपणी व डॉकेट शीट संचिकेमध्ये लावण्यांत आलेले नाही. त्यामुळे विभागामार्फत सादर करण्यात आलेले प्रस्ताव हे परिपूर्ण स्वरुपात सादर न करता मोघम स्वरुपात सादर करण्यात येऊन मान्यता घेण्यात असल्याची बाब निदर्शनास येत असून सदर बाब ही वित्तीय औचित्याच्या सूत्रांचे पालन करण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

03) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 24 एप्रील 2015 नुसार करारनामा करतांना त्यावर पाहिल्या 10 लाखास रुपये 500/- व नंतरच्या प्रति लाखास 100/- रुपये याप्रमाणे मुंद्रांक लावणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे सदर खरेदी रक्कम ही रु.22.53 लक्ष होती व त्यानुसार रु.1800/- चे मुद्रांक वापरणे आवश्यक असतांना रु.1500/- चे मुद्रांक वापरण्यात आलेले आहेत. त्यामुळे रु.300/- चे कमी मुद्रांक वापरण्यात आलेले असल्याने शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे. सदर रु.300/- संबंधित कंत्राटदार यांचेकडून वसुल करण्यात येऊन शासन खाती योग्य लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

03) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 24 एप्रील 2015 नुसार करारनामा करतांना त्यावर पाहिल्या 10 लाखास रुपये 500/- व नंतरच्या प्रति लाखास 100/- रुपये याप्रमाणे मुंद्रांक लावणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता कमी रककमेचे (1500) वर करारनामा केलेला आहे. 1800/- रुपयेचे मुद्रांक लावणे आवश्यक असतांना 300/- चे कमी मुद्रांक लावलेले आहेत. तरी 300/- शासकिय महसुलात जमा करावी.

04) साहित्यांच्या वॉरंटीबाबत करारनाम्यामध्ये कुठलीही अट नमुद करण्यांत आलेली नाही. किंवा पुरवठादाराने तसे

लेखी हमी पत्र दिलेले दिसुन येत नाही. त्यामुळे आवश्यकता भासल्यास दुरुस्तीवर खर्च महानगरपालिकेस करावा लागुन महानगरपालिकेचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

05) पुरवठा करणेत आलेले साहित्य हे I.S.O.प्रमाणीत असल्याबाबत व करारनामा अट क्रं.7 नुसार निविदेत दिलेल्या ड्रॉईग व स्पेसीफिकेशन नुसार असल्याबाबत कुठलीही तांत्रिक गुणवत्ता तपासणी करण्यांत आलेली दिसुन येत नाही. त्यामुळे पुरवठा करण्यात आलेले साहित्य निकषानुसार योग्य दर्जाचे होते किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

06) प्राप्त झालेले साहित्य साठा नोंदवहीमध्ये नोंदविल्याबाबत देयकावर व डिलीव्हरी चलनावर करण्यांत आलेली आहे. सदर साठा नोंदवही लेखापरीक्षणांत उपलबध झाली त्यांत छायांकित डिलीव्हरी चलन क्रमांक 5 दिनांक 19/03/2017 नुसार दुबार 40 नग 190 लिटरचे लोखंडीगाडया साठा नोंदवहीत नोंदविल्या आहेत. तथापी त्यांचे मुळ डिलीव्हरी चलन उपलबध नाहीत छायांकित प्रतीवर केवळ बारनिशी लिपीकाचे सही आहे साहित्य कोणी ताब्यात घेतले. याबाबत सबंधितांची स्वाक्षरी आढळुन आली नाही. तसेच उर्वरित 40 नग M.S.चाकाच्या गाडया प्राप्त झालयाबाबतचे डिलीव्हरी चलन संचिका व मुळ प्रमाणके नस्तीस आढळुन आले नाही. त्यामुळे 40 नग M.S.चाकाच्या गाडया प्राप्त झाल्या नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. सदर 40 नग M.S.चाकाच्या गाडयांची एकुण किमंत 40 X10850= 434000/- बाबत जबाबदारी निश्चित होऊन रक्कम वसुल करणेत यावी व योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाने भरणा करण्यात यावी.

07) दिनांक 31/03/2017 च्या टिपणीवर प्रदानाबाबत मा. आयुक्त, यांची स्वाक्षरी आढळुन आली नाही. त्यामुळे मा. आयुक्त, यांची मान्यता न घेताच रक्कम प्रदान करण्यांत आलेली असलयाचे दिसुन येते. त्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता न घेताच रकमा प्रदान करणेत आलेले असल्याने वित्तीय नियमांचे पालन करण्यात आलेले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.275 दिनांक 29/05/2024 अन्वये खुलासा सादर करण्यातबाबत कळविण्यात आले होते, तथापी कोणताही खुलासा सादर करण्यात आलेला नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSHBM6701 (Ref No : 188, Hmm No : 275)

140 नगरसचिव विभागाचे सन2016-17 व 2017-2018 लेखापरीक्षण कालावधीतील अनियमितताबाबत

योजना :		**लेखाशीर्ष** : 0		**वसुलपात्र** :	0.00/-
निधी :	महानगरपालिका स्व- निधी	**कलम** : 9ब		**अंतिम अमान्य** :	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. नगरविकास विभाग

सन 2016-17 व 2017-2018 च्या लेखापरीक्षणांत निवडक माहिन्यातील उदाहरणदाखल खालील प्रमाणे बील रजिष्टरवरुन झेरॉक्स, चहानाष्टा या बाबीवर खर्च नोंदविलेला आहे. त्याचा तपाशील खालील प्रमाणे

सन 2016-2017

अ.क्रं.	प्रमाणक क्रमांक व दिनांक	रक्कम रुपये	कोणास दिले काय प्रयोजन तपशिल
1	64/04/04/2016	7850	सभा खर्च, गोपाळ टि सेटंर हस्ते निरंजन सैंदाणे
2	863/14/07/2016	2760	सभा खर्च, गोपाळ टि सेटंर हस्ते निरंजन सैंदाणे नगरसचिव
3	864/14/07/2016	2760	सभा खर्च, गोपाळ टि सेटंर हस्ते निरंजन सैंदाणे नगरसचिव
4	865/14/07/2016	3390	सभा खर्च, गोपाळ टि सेटंर हस्ते निरंजन सैंदाणे नगरसचिव
5	866/14/07/2016	7900	सभा खर्च, गोपाळ टि सेटंर हस्ते निरंजन सैंदाणे नगरसचिव
6	867/14/07/2016	2400	सभा खर्च, गोपाळ टि सेटंर हस्ते निरंजन सैंदाणे नगरसचिव
7	868/14/07/2016	1730	सभा खर्च, गोपाळ टि सेटंर हस्ते निरंजन सैंदाणे नगरसचिव
8	1192/25/08/2016	3040	सभा खर्च, गोपाळ टि सेटंर हस्ते निरंजन सैंदाणे नगरसचिव
9	1468/20/09/2016	1380	फोटो, हस्ते निरंजन सैंदाणे नगरसचिव
10	1469/20/09/2016	9880	फोटो, हस्ते निरंजन सैंदाणे नगरसचिव
11	1738/17/10/2016	1780	सभा खर्च, गोपाळ टि सेटंर हस्ते निरंजन सैंदाणे
12	2834/30/01/2017	10970	सभा खर्च, गोपाळ टि सेटंर हस्ते निरंजन सैंदाणे
	एकुण:-	55840	

सन 2017-2018

अ.क्रं.	बील रजिष्टर मधील क्रमांक व दिनांक	रक्कम रुपये	कोणास दिले काय प्रयोजन तपशिल
1	613/15/12/2017	6795	सुगोळी फरसाण, जळगांव
2	623/04/01/2018	7245	सुगोळी फरसाण जळगांव
3	636/17/03/2018	7845	सुगोळी फरसाण जळगांव
	एकुण :-	21885	

आर्थिक वर्ष 2016-2017 व 2017-2018 या कालावधीत बील नोदंवहीवरुन झेरॉक्स चहापाणी व नाष्टा या बाबीवर असा एकुण रक्कम रुपये 241764 /- एवढा खर्च नोंदविलेला आहे. लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) सन 2016-17 व 2017-08 मध्ये अल्पोहारासाठी व चहापानासाठी एकुण रककम रुपये 241764/- एवढा खर्च झालेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1971मधील अनूसुची ड प्रकरण (2) नुसार खर्च असल्यास कुठलाही माल किंवा सामुग्री खरेदी करण्यासाठी 7 दिवस अगोदर स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अशा खरेदीसाठी निवीदा मागविणे आवश्यक असतांना विना निवीदा व दरपत्रके न मागविता चहा व अल्पोहार यावर खर्च केलेला आहे. निवीदा प्रक्रिया न राबविलेमुळे स्पर्धात्मक दराचा लाभ जळगांव महानगरपालिकेस झालेला नाही. परिणामी पुरवठादाराकडुन अल्पोहार व चहापान करीता खरेदी केलेली असल्याने जादा खर्च झाला असण्याची शकयता नाकारता येत नाही. तसेच अशा प्रकारे साहित्यांची वारंवार आवश्यकता भासल्यास निवीदा काढुन वार्षिक दर मंजुर करणे शकय असतांना देखील अशी कार्यवाही झालेली दिसुन आलेली नाही.

02) अल्पोहार व चहापानासाठी झालेल्या खरेदीची उपप्रमाणके यांची तपासणी केली असता सबंधित पुरवठादारांना सदरील खर्चासाठी कोणतेही कार्यादेश देण्यांत आलेले संचिकेत दिसुन आलेले नाहीत. परिणामी पुरवठयाचे परिमाण ,दर, कोणकोणेत्या बाबी पुरवठादाराने पुरविणे आवश्यक आहे याची कोणतीही तपासणी आणि पडताळणी न करता सबंधितान रककम अदा करण्यांत आलेल्या आहेत. सबंधित पुरवठादारांनी प्रत्यक्षात किती अल्पोहार व चहापान इत्यादीचा पुरवठा केला आहे याची कोणतीही माहिती /अभिलेखे नस्तीसोबत उपलब्ध झालेले नाहीत .

03) सन 2017-2018 या वित्तीय वर्षात महानगरपालिकेने साठा नोदंवहीचे पृष्ठ क्रमांक 43 वर एक झेरॉक्स ड्रम खरेदी केलेले आहे व पृष्ठ क्रमांक 45 वर 7 नग टोनर खरेदी केले आहत. महानगरपालिकेकडे झेरॉक्स मशीन उपलब्ध असतांना, व बहुतेक प्रिंटर, हे टु इन वन या बनावटीचे मशीन असतांना विभागाने बाहेरुन झेरॉक्सपोटी खर्च केल्याचे आढळुन येते. सबब ही बाब वित्तीय औचित्याचे सुत्राचा भंग करणारी आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 123 दिनांक 03/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATRSBM6601 (Ref No : 152, Hmm No : 123)

141 अग्नीशमन तपासणी शुल्क व अग्नीसेवा शुल्काची आकारणी न केलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. याबाबत जळगांव महानगपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या कालावधीतील अग्निशमन विभागाचे लेखापरीक्षण करणेकामी संबधीत कर्मचारी व अधिकारी यांना प्रत्यक्ष बोलावुन लेखापरिक्षण कालावधीतील आवश्यक ती माहिती अग्निशमन विभागाकडून घेवून लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक 05/02/2007 पासुन महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनयम 2006 हा लागु करण्यांत आला आहे. उपपरोक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार महानगरपलिका क्षेत्रातील शासकिय कार्यालय, हॉटेल लॉजेस, रेस्टारंट व्यावयसाईक इमारती 15 मीटर उंचीवरील निवास इमारती समिंश्र वापराच्या इमारती दवाखाने प्रसुतीगृहे औदयोगीक इमारती गोदामे इत्यादी मध्ये आग प्रतिंबंधक उपाययोजना करुन सदरच्या उपाययोजना दुरुस्त व कार्यक्षम असलयाबाबतचे प्रमाणपत्र वर्षातुन दोन वेळा जानेवारी व जुलै माहिन्यांत मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे कायदयातील तरतुदीनुसार इमारतीचे मालक /भोगवटादार यांनी अग्निशमन यंत्रणेकडुन फायर ऑडीट विहित केलेले अग्निशमन शुल्क भरुन घेणे आवश्यक आहे.परंतु सदर कार्यवाही करण्यात आली नाही. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनयम 2006 कलम 6,7,8 नुसार कार्यवाही करणे अपेक्षीत आहे. परंतु नियमानुसार सदर कार्यवाही करणेत आलेली नाही.

02) जळगाव महानगरपालीका हददीमध्ये अश्या उपाययोजना करणे बंधनकारक असणा-या इमारती व्यवसायीक व औदयोगीक इमारती हॉटेल व निवारागृह असेम्ब्ली हाऊस दवाखाने व नर्सिग होम आहेत व त्यापैकी किती इमारत मालकांनी / भोगवटादारकांनी आग प्रतीबंधक उपाय योजना केल्या आहेत याचा तपशील अग्नीशमन विभागाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे कोणत्या इमारती मालकांनी /भोगवटादारकांनी अश्या उपाययोजना केलेल्या नाहीत याची माहीती उपलब्ध करुन या अधिनियमाच्या कलम 6,7,8 नुसार कार्यवाही करण्यात आलेबाबतची अभिलेखे मागणी करुनही लेखापरीक्षणात उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे नियमानुसार कार्यवाही करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते.

03) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनयम 2006 दिनांक 05/02/2007 पासुन राज्याच्या नागरी भागात लागु झाला आहे. या अधिनियमाच्या तरतुदीची अंमलबजावणी करुन व अनुसूची दोन भाग-1 नुसार अग्निशमन सेवा शुल्काची आकारणी करुन मनपाचा महसुल वाढविणे व सदरील महसुल हा कलम 25 नुसार आग सुरक्षा निधी स्थापन करुन त्यामध्ये जमा करणे आवश्यक असतांना असा स्वंतत्र निधी मनपाने स्थापन केलेला नाही. त्यामुळे सेवा शुल्काची रक्कम मनपा निधीत जमा होत आहे.

04) सन 2017-2018 अखेर पर्यत महानगरपालीकेचे उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार शासन निर्णय क्र.अशस 1407/360प्र.क्र./211/नावि/20/दि.31/08/2009.तसेच व्यापारी व प्रतिष्ठान यांना सन २०११-१२ या आर्थिक वर्षात अग्निशमन तपासणी शुल्क आकारलेबाबतचा स्थायी समिती ठराव क्र.६०७ दिनांक ५/२/२०११ अन्वये ठराव पारीत करण्यात आला तसेच स्थायी समीती ठराव क्र.२५ दि.१३/१२/२०१३ विषय क्रमांक व सभा क्रमांक ५ नुसार जळगाव शहर महानगरपालिका हददीत तसेच औदयोगीक वसाहत मधील केमिकल्स फॅक्टरी आगप्रतिबंधक लायसन्स नवीन देणे व नुतनीकरण करणे जिनिंग प्रेसिंग करिता अग्निशमन सुरक्षा परिरक्षण प्रमाणपत्र यांना देण्यात येणारे आग प्रतिबंधंक प्रमाणपत्र नवीन /नुतनीकरणासाठी देण्यात येणा-या प्रमाणापत्राची शुल्क रु २०००/- वाढवीणेस मान्याता प्रदान करण्यात आलेली असतांनाही अग्निशमन सेवा फी वसुलात आणण्याची कार्यवाही केल्याचे आढळुन आले नाही त्यामुळे अग्निशमन सेवा फी अन्वये उभारावयाचा विशेष निधी उभारणीचा मुळ उददेश साध्य होत नाही तसेच

उपरोक्त फी वसुल न झाल्याने महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थीक नुकसान झालेले आहे.

05) महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने इमारत प्रकार निहाय (उदा.हॉटेल दुकान रहिवासी इ.) महाराष्ट नगरपालिका लेखासहिता 2011 चे नियम 114 नुसार नमुना क्रमांक 82 प्रमाणे वार्षिक फी मागणी व आकारणी नोंदवही परिरक्षित करणे आवश्यक होते .मात्र अशी नोंदवही न ठेवल्याने वार्षिक फी मागणी व आकारणी तसेच वर्ष अखेरीस राहीलेली थकबाकी रक्कम तसेच कलम 36 (2) मध्ये नमुद केल्या प्रमाणे शास्तीस पात्र होणा-या आस्थापना इत्यादी बाबी पडताळता आलेल्या नाहीत. तसेच त्यामुळे संबंधित विभागांनाही किती रकमांची वसुली करणे आवश्यक आहे व त्याकरिता योग्य त्या उपाययोजना करुन वसुलीची कार्यवाही करणे शक्य होत नाही, याबाबत संबंधित विभागाने त्यांची जबाबदारी योग्यरित्या व नियमानुसार पार पाडलेली दिसून येत नाही, त्यामुळे महानगरपालिकेचे पर्यायाने अग्निशामन निधीचे नुकसान होत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 220 दिनांक 05/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATRSBM6601 (Ref No : 153, Hmm No : 220)

142 आग विझविणे कामी पुरविलेल्या सेवेच्या खर्चाच्या रक्कमा सबंधितांकडुन वसुल न करण्याच्या अनियमिततेबाबत.

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. अग्नीशमन विभागाकडील प्रलंबित रक्कमा मागणी नोंदवहीची पडताळणी केली असतां महानगरपालिका शहाराच्या क्षेत्राबाहेर लागलेल्या आगीसारख्या आपादकालीन घटनेकरीता महानगरपालिकेने आग विझविणेची सेवा संबधित व्यक्ती /शासकिय कार्यालय/कंपनी इत्यादीनां सत्वर उपलबध करुन दिलेली होती. संबधितांनी नमुद केल्याप्रमाणे विहित दराने देय होणारी अग्नीशमन सेवा फी एकुण रक्कम रुपये 532947/- आज पावेतो महानगरपालिकेकडे भरणा केलेली नाही . त्यामुळे रककमा थकीत राहण्याची अनियमितता झालेली आहे. संबधितांकडुन अग्नीशमन सेवा बाबत नियमानुसार वसुली न केलेल्या रककमांचा तपशिल खालील तक्त्यात नमुद केलेला आहे.

अ.क्रं.	तपशील	एकुण रककम
1.	सन 1981-82 ते 2015-2016 पर्यत थकबाकी रक्कम	470789

2.	सन 2016-17 ते 17-18 मधील थकीत रक्कम	00
	1.विनोद अग्रवाल ,सैय्यद हमीद सैय्यद सादिल कानळदरोड	5680
	2.अभियंता सार्वजनीक बांधकाम विभाग,चिंचोळे हायवे	1700
	3.कडगांव ग्रामपंचायत	2400
	4.नशिराबाद ग्रामपंचायत	1900
	5.म्हसावद रेल्वे स्टेशन	3050
	6. अभियंता सार्वजनीक बांधकाम विभाग,आसोदा	1150
	7.धानोरा ग्रामपंचायत	1755
	8.बिरजु बन्सीलाल पारशी,भुसावळ	3900
	9.गणपत पुना खडके ममुराबाद	1140
	10.शशीकांत मधुकर महाजन,इदगांव	2114
	11.जैन व्हॅली	1308
	12.शेखर भगवान सोनवणे म्हसावद	4824
	13.कानळदा ग्रामपंचायत	2178
	14.न्हावी प्र अडावद ग्रामपंचायत	3460
	15.मोहाडी ग्रामपंचायत	1346
	16.भारतीय विमा प्राधीकरण कुसुंबा	1858
	17.जळगांव बुधगांव ग्रामपंचायत	6210
	18.पिंपळगांव हरेशवर ग्रामपंचायत	5855
	19.वाळोद ग्रामपंचायत	7710

	20.रविद्रं गोविंदा पाटील शेडगांव	2620
	एकुण	62158
3.	दिनांक 31/03/2018 अखेर एकुण थकीत रक्कम	532947

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) थकबाकीच्या रक्कमा पहाता सन 1981-82 ते 2015-2016 पासुनच्या रक्कमांचा समावेश असुन थकीत रक्कम रुपये 470789 व सन 2016-17 ते 17-18 मधील थकीत रक्कम रुपये 62158/-अशी एकुण रक्कम रुपये 532947/- असुन सबंधितांकडुन वसुल होणे आवश्यक आहे. यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत असून सदर रकमा वसुलीबाबत ठोस कार्यवाही करण्यात यावी. तसेच यापुढे पुरविलेल्या सेवेपोटी देय होणारी फी रक्कम तात्काळ वसुलात आणण्याबाबतची योग्य ती कार्यवाही होईल याची दक्षता घेण्यांत यावी

02) महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम 1949 च्या कलम 289 नुसार शहरात लागलेल्या व प्रत्येक आगीचे प्रतिवृत्त आग लागल्याच्या पुढील दिवसाचे आंत मा आयुक्तांस सादर केले पाहिजे त्याप्रमाणे माहिती सादर केले असल्याची कार्यवाही विभागाने केलेली नसल्याचे दिसुन येते.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 221 दिनांक 05/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATRSBM6601 (Ref No : 154, Hmm No : 221)

143 अग्नीशमन वाहनाने शहरात सुविधा पुरविणे व त्याबदल्यात शुल्क न आकारलेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 18600.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव शहर महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. अग्निशमन विभाग महानगरपालिका, जळगांव यांचे लेखापरिक्षण सुरु असुन **लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.**

01) अग्नीशमन वाहनाद्वारे शहरातंर्गत सुविधा पुरविणेत आलेल्या आहेत सदर सुविधा पुरवितांना अग्नीशमन वाहनाचा वापर हा लग्न कार्य संमारंभ घरगुती पिण्यासाठी तसेच खाजगी टॅक्र भरणेसाठी जळगांव शहर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रं.23 दिनांक 13/12/2013 अन्वये या सर्व कारणासाठी रक्कम रुपये 100/- ,400/- व 1600/- असे शुल्क घेणेबाबत ठराव पारीत करणेत आला होता.

02) अग्नीशमन विभागाकडील निवडक महिन्याचे लॉक बूक ची पडताळणी केली असता खालील सुविधा पुरविणेत आलेल्या असतांनाही शुल्क आकारणेत आलेले नाही.

गाडी नंबर	दिनांक	तपशिल	गाडीच्या खेपा	रक्कम
एम एच -19 एम 9050	1/1/16	पोलीस भरती पिण्याचे पाणी दिले	01	400
	8/4/17	गवळी समाज सामुहीक विवाह पाणी दिले	01	100
एम एच -19 एम 9048	2/5/16	क्रिकेट मॅच पाणी दिले	01	1600
	2/5/16	नरेश पाटील नगरसेवक घराजवळ बगीच्यास पाणी देणे	01	400
	2/5/16	सौ .भोळे यांचे कडे धार्मिक कामासाठी पिण्याचे पाणी देणे	01	400
	4/5/16	सौ .भोळे यांचे कडे धार्मिक कामासाठी पिण्याचे पाणी देणे	01	400
	10/5/16	शहर अभियंता थोरात साहेब यांचे बंगल्यावर पिण्याचे पाणी देणे	01	400
	10/5/16	नगरसेविका सनकर यांचे वाडीत भूंडारासाठी पिण्याचे पाणी देणे	01	400
	14/5/16	शहर अभियंता थोरात साहेब यांचे बंगल्यावर पिण्याचे पाणी देणे	01	400
	15/5/16	पिंजारी समाजाच्या सामुहि क विवाहासाठी पिण्याचे पाणी देणे	01	400
	20/5/16	शहर अभियंता थोरात साहेब यांचे बंगल्यावर पिण्याचे पाणी देणे	01	400
	7/3/17	शहर अभियंता थोरात साहेब यांचे	01	400

		बंगल्यावर पिण्याचे पाणी देणे		
	10/3/17	पोलीस परेड ग्राऊंड तीन मोटर पाणी मारणे	03	1200
	11/3/17	पोलीस परेड ग्राऊंड तीन मोटर पाणी मारणे	01	400
	11/3/17	राजेंद्रं चवहाण धार्मिक कामासाठी पिण्याचे पाणी	01	400
	12/3/17	चंद्रलोक अर्पामेंट झाडांना पाणी देणे	01	400
	27/3/17	प्रल्हाद भातरदे यांचे घरी पाणी देणे	01	400
	28/3/17	संजुशिवराम परदेशी यांचे घरी पाणी देणे	01	400
	29/3/17	शहर अभियंता थोरात साहेब यांचे बंगल्यावर पिण्याचे पाणी देणे	01	400
	29/3/17	सागर पार्क वरील झाडांना पाणी देणे	01	400
	3/4/17	चंद्रलोक अपार्टमेंट शेजारी बागेस पाणी देणे	01	400
	11/4/17	हातकर कॅालनी भंडा-यासाठी पाणी दिले	01	400
	11/4/17	रायसोनी फार्म् हाऊस झाडांना पाणी देणे	01	400
	13/4/17	जयश्री नितीन पाटील यांचे घरी पिणेचे पाणी देणे	01	400
	15/4/17	रायसोनी फार्म् हाऊस झाडांना	01	400

		पाणी देणे		
	17/4/17	शहर अभियंता थोरात साहेब यांचे बंगल्यावर पिण्याचे पाणी देणे	01	400
	21/4/17	नितीन बर्डे झाडांना पाणी देणे	01	400
	21/4/17	सुनील महाजन लग्न समारंभ्zwj; पाणीदेणे	01	100
	25/4/17	शहर अभियंता थोरात साहेब यांचे बंगल्यावर पिण्याचे पाणी देणे	01	400
	16/3/18	नगरसेवक नितीन बर्डे सप्ताह निमित्त पाणी देणे	01	400
एम एच 19 एम 9050	2/3/18	महापौर यांचे आदेशावरुन व्यसन मुक्ती कार्यक्रमास पाणी देणे	01	400
	7/3/18	ज्योतीताई इंगळे यांचे घरासमोर टॅकरमध्ये पाणी भरणे	01	1600
	14/3/18	नितीन बर्डे नगरसेवक वॉर्डात पाणीवाटप	01	400
	22/3/18	नितीन बर्डे नगरसेवक वॉर्डात पाणीवाटप	01	400
	23/3/18	नितीन बर्डे नगरसेवक वॉर्डात पाणीवाटप	01	400
	24/3/18	महापैार यांचे घरी पाणी देणे	01	400
	30/3/18	ग्राऊडवर पाणी मारणे	02	800
	30/3/18	शिव कॉलनी भंडार कार्यक्रमास	01	400

		पाणी देणे		
		एकुण :-		18600

वरील प्रमाणे रक्कमा संबधीतांकडून वसुल पात्र ठरतात. तसेच वरील तपशिला व्यतिरिक्त इतर महिन्यांमध्ये अशा प्रकारे खाजगी वापरासाठी टँकर भरण्यासाठी अग्निशमन वाहनाचा वापर करण्यात आला असल्यास वरील ठराव क्रमांक 123 दिनांक 13/12/2013 नुसार रक्कमा संबधितांकडून वसुल करण्यांत याव्यात. तसेच रक्कमा वसुल करण्यात येवुन महानगरपालिकेकडे योग्य त्या खाती भरणा करण्यात यावा.

03) वरील ठरावानुसार निश्चित करण्यांत आलेले दर हे 2013 मधील असुन तयाला बराच कालावधी लोटलेला आहे. पेट्रोल / डिजेलचे दर, वाहन दुरुस्तीचे दर कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च या मध्ये मोठया प्रमाणीत वाढ झालेली असल्याने वरील दरांमध्येही वाढ होणे आवश्यक आहे असे लेखापरिक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 249 दिनांक 03/05/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATRSBM6601 (Ref No : 157, Hmm No : 249)

144 स्टॅडबाय डयुटी शुल्क न आकारणे बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. अग्नीशमन विभागाचे लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) अग्नीशमन वाहनाद्वारे शहरातंर्गत सुविधा पुरविणेत आलेल्या आहेत सदर सुविधा पुरवितांना अग्नीशमन वाहनाचा वापर स्टॅडबाय डयुटी शुल्कzwj; प्रती तासासाठी 400/- असा जळगांव शहर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रं.406 दिनांक 04/03/2016 अन्वये असे शुल्क घेणेबाबत ठराव पारीत करणेत आला होता.

02) अग्नीशमन विभागाकडील निवडक महिन्याचे लॉक बूक ची पडताळणी केली असता खालील सुविधा पुरविणेत आलेल्या असतांनाही शुल्क आकारणेत आलेले नाही.

गाडी नंबर	दिनांक	तपशिल	तास	रक्कम
एम एच -19 एम 9050	20/03/2017	पोलीस ग्राऊड स्टॅडबाय डयुटी	01	400
	25/03/2017	पोलीस ग्राऊड स्टॅडबाय डयुटी	01	400
एम एच -19 एम 9047	13/03/2017	जे के पार्क स्टॅडबाय डयुटी	04	1600

	30/03/2018	विमान तळ स्टॅंडबाय डयुटी	01	400
			एकूण	2800

तसेच वरील तपशिलाव्यतीरीक्त इतर महीन्यांमध्ये अशा प्रकारे वाहनाचा वापर स्टॅण्डबाय करण्यांत आलेला असल्यास वरील ठराव क्रमांक 406 दिनांक 04/03/2016 अनव्ये शुल्क संबधीतांकडून वसुल करण्यांत यावे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 250 दिनांक 03/05/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATRSBM6601 (Ref No : 158, Hmm No : 250)

145 अभिन्यास मंजुरी प्रकरणातील अनियमितता- पिंप्राळा गट नं.206

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 50425.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान नगररचना विभागाकडील खालील अभिन्यास मंजुरी प्रकरणाची तपासणी करण्यात आली.

गट नंबर	पिंप्राळा शिवार गट नं.206	
अर्जदार	श्री.पांडुरंग रघुनाथ काळे	
अर्जदाराचा दाखल अर्ज	मनपा दाखल क्र.682 दि.10/09/2014	
बिनशेती परवानगी आदेश क्रमांक	मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र. जमिन/1/बिशे/ एसआर/209/2012 दिनांक 15/07/2013	
महानगरपालिका अंतिम मंजुरी आदेश क्रमांक	मनपा आदेश क्र.001, दिनांक 07/04/2016	
मंजुरी आदेशानुसार क्षेत्रफळ	तपशिल	क्षेत्र (चौमी)
	एकूण	17700.00
	18 मी. डीपी रोड क्षेत्रफळ	875.00
	ओपन स्पेस क्षेत्रफळ	1682.52

	रस्ते क्षेत्रफळ	2673.38
	उर्वरित ले-आऊट क्षेत्रफळ (प्लॉटचे क्षेत्रफळ)	12469.10

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) अर्जदाराचा अर्ज दिनांक 10/09/2014 रोजी महानगरपालिकेमध्ये दाखल करण्यात आला, त्यानंतर त्रृट्यांची पूर्तता, भूमी अभिलेख कार्यालयामार्फत मोजणी इत्यादी प्रक्रीयेनंतर अंतिम मंजुरीकरिता नगररचना विभागाची टिपणी दिनांक -- (नमूद नाही), त्यास मा.आयुक्त यांची दिनांक 12/08/2015 रोजी रेखांकन नकाशांना अंतिम मंजुरी देण्यात आलेली आहे. तथापी त्यानंतर प्रत्यक्ष आदेश हे दिनांक 07/04/2016 रेाजी म्हणजे जवळ-जवळ 8 महिन्यांच्या कालावधीनंतर देण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-1005/34/प्र.क्र.8/2005/18 (र.व का.) दिनांक 07/04/2005 मधील अ.क्र.(2) नुसार साधारणपणे कोणतीही फाईल विभागातील किंवा कार्यालयातील कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांच्या टेबलावर सात कामाच्या दिवसांचे वा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही, अ.क्र.(4) अन्वये दुसऱ्या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यकता नसलेल्या फाईलींच्या संबंधात विभागाने त्या प्रकरणावर पंचेचाळीस दिवसांचे आत निर्णय घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी अशा सूचना आहेत. त्याचप्रमाणे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली 2016 मधील कलम 7 व 8 प्रस्ताव सादर करण्यात आल्यानंतर 60 दिवसांच्या आंत एक तर तो मंजूर करण्यात यावा किंवा त्रृट्यांच्या पूर्ततेसाठी संबंधितांना कळविण्यात यावा, अशा प्रकारे प्रस्तावावर कार्यवाही करण्यात न आल्यास प्रस्ताव मंजुर करण्यात आला आहे असे समजण्यात येईल अशी अट नमुद करण्यात आलेली आहे. तथापी वरील प्रकरणामध्ये मा.आयुक्त यांची मान्यता झाल्यानंतर जवळ-जवळ 8 महिन्यांपेक्षा जास्त विलंब झालेला दिसून येतो, त्यामुळे शासन नियमांचे पालन करण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

02) सदर प्रकरणामध्ये तात्पुरती मंजुरी मिळण्याच्या प्रक्रीयेपासून अंतिम मंजुरी मिळणेपर्यंतच्या प्रक्रीयेपर्यंत विकास शुल्कापोटी वेळोवेळी खालीलप्रमाणे एकूण रु.697721/- इतक्या रकमेचा भरणा केलेला आहे.

अ. क्र.	मनपा पावती क्रमांक	दिनांक	रक्कम
1	37529	05/02/1996	142750
2	14139	31/07/1997	55185
3	4529	07/05/2012	497280
4	6186	25/10/2012	2506
		एकूण	697721

सदर रक्कम मनपाचे तात्पुरती मंजुरी आदेश क्र.224 दिनांक 25/10/2012 अन्वये मंजुरी देतांना उर्वरित ले-आऊट क्षेत्र 11628.68 x 60 = 697721/- याप्रमाणे फरकासह भरणा करण्यात आलेल्या आहेत. अंतिम मंजुरी देतांना रस्ते व ओपन स्पेसचे क्षेत्र वजा जाता 46 प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ 12469.10 चौमी. याप्रमाणे मंजुरी देण्यात आलेली आहे, त्यानुसार 12469.10 x 60 = 748146/- इतके विकास शुल्क आकारणी करुन मागिल भरणा रु.697721/- वजा जाता रु.50425/- इतका भरणा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणा करण्यात आलेली दिसून येत नाही. तरी सदर रक्कम संबंधित मालकाकडून वसुलपात्र ठरते. त्याचप्रमाणे अंतिम मंजुरी आदेश दिनांक 07/04/2015 मधील अट क्र.10 मध्ये सदर अभिन्यास मंजुरीकरिता जमिन विकास शुल्क रक्कम रु.497280/- पावती क्र.4529 दि.07/05/2015 अन्वये भरलेला आहे असे नमूद करण्यात आलेले आहे, म्हणजेच आदेशामध्ये परिपूर्ण खात्री न करता भरणा करण्यात आलेली संपूर्ण रक्कम रु.697721/- नमूद करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे रक्कम नमूद करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे आकारणी करण्यात आलेला दर रु.60/- कोणत्या आधारे घेण्यात आलेला आहे याबाबतचे आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणामध्ये उपलब्ध झाले नाही त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणामध्ये साशंकता आहे.

03) अभिन्यास अंतिम मंजुरी आदेश क्र.001 दिनांक 07/04/2015 मधील अट क्र.5 मध्ये प्रस्तावित भूमी अभिन्यासातील खुली जागा क्षेत्र 1682.52 चौमी. महापालिकेकडे ताबा पावतीद्वारे हस्तांतरीत केलेले आहे असे नमूद आहे, तथापी अशा प्रकारची ताबा पावती संचिकेमध्ये लावण्यात आलेली नाही. त्यामुळे अशी खुली जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही विहित मुदतीत करण्यात आलेली नसल्याने भविष्यात कायदेशिर बाबींचा सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाबीकडे विभागामार्फत उचित कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने दुर्लक्ष करण्यात आलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

04) अभिन्यास अंतिम मंजुरी आदेशातील अट क्र.7 नुसार महानगरपालिकेच्या शहर अभियंता यांचे मार्गदर्शनाखाली भूमी अभिन्यासातील दर्शविलेले रस्ते व गटारी विकसीत करुन व इलेक्ट्रीक पोल उभारुन (कंडक्टरसह) ते ताबा पावतीद्वारे महानगरपालिकेच्या ताब्यात हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत असे नमूद आहे, तथापी अशा प्रकारची ताबा पावती संचिकेमध्ये लावण्यात आलेली नाही. त्यामुळे अशा प्रकारे रस्त, गटारी, इलेक्ट्रीक पोल महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही विहित मुदतीत करण्यात आलेली नसल्याने भविष्यात कायदेशिर बाबींचा सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाबीकडे विभागामार्फत उचित कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने दुर्लक्ष करण्यात आलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

05) अभिन्यास मंजुरीनंतर सदर गट नंबरमधील रस्ते, नाल्या व मोकळया जागांची महसुल विभागाकडील नमुना 7/12 उताऱ्यावर महानगरपालिकेचे नांव लावणे आवश्यक असतांना अद्यावत ऑनलाईन नमुना 7/12 उतारा तपासणी केला असता त्यावर मुळ मालक श्री.पांडुरंग रघुनाथ काळे यांचे नांव असल्याचे निदर्शनास येते. म्हणजेच नमुना 7/12 उताऱ्यावर महानगरपालिकेचे नांव अद्यापही लावण्यात आलेले दिसून येत नाही. याबाबत संबंधित विभागाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही केलेली नसल्याचे निदर्शनास येते.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.230, दिनांक 10/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 163, Hmm No : 230)

146 अभिन्यास मंजुरी प्रकरणातील अनियमितता- खेडी बु. गट नं.38/2अ/1

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान नगररचना विभागाकडील खालील अभिन्यास मंजुरी प्रकरणाची तपासणी करण्यात आली.

गट नंबर	खेडी बु. गट नं.38/2अ/1	
अर्जदार	श्री.सुनिलकुमार बाफना व इतर	
अर्जदाराचा दाखल	क्र.2802, दिनांक 10/03/2015	
महानगरपालिका तात्पुरती मंजुरी आदेश क्रमांक	मनपा आदेश क्र.0104, दिनांक 08/11/2016	
मंजुरी आदेशानुसार क्षेत्रफळ	तपशिल	क्षेत्र (चौमी)
	एकूण क्षेत्रफळ	10100.00
	वजा 18 मी. डीपी रोड	261.25
	वजा ओपन स्पेस	984.20
	वजा रस्ते	2541.38
	ॲमेनिटी एरिया	983.93
	उर्वरित ले-आऊट क्षेत्र	5329.22

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) अर्जदाराचा अर्ज दिनांक 10/03/2015 रोजी महानगरपालिकेमध्ये दाखल करण्यात आला, त्यानंतर मनपा पत्र

क्र.3213 दिनांक 20/03/2015 अन्वये प्रकल्प संचालक (एनआयएआय), औरंगाबाद यांना सदर अभिन्यास हा राष्ट्रीय महामार्गला सन्मुख असल्याने अभिन्यास मंजुरीची परवानगी देतांना सोबत जोडलेल्या नकाशांवर इमारत रेषा, नियंत्रण रेषा व सेवा रस्त्यांची आखणी करुन द्यावी अशा आशयाचे पत्र देण्यात आले. त्यानंतर सदर विभागाकडून कुठलाही खुलासा प्राप्त झालेला दिसून येत नाही किंवा महानगरपालिकेकडूनही याबाबत पुन:श्च पत्रव्यवहार करण्यात आलेला दिसून येत नाही. त्यानंतर मनपा पत्र क्र.740 दिनांक 12/08/2016 अन्वये संबंधित अर्जदार यांना विकास शुल्क रक्कम रु.394362/- भरणा करणेबाबत कळविण्यात आले. सदर रकमा मनपा पावती क्र.21274 दिनांक 22/08/2016 अन्वये तीन धनादेशांद्वारे भरणा करण्यात आली. दरम्यान नगररचना विभागाने रेखांकनास तात्पुरती मंजुरी देण्याबाबत टिपणी दिनांक 01/05/2016 अन्वये सादर केली व त्यावर सहायक संचालक यांनी दिनांक 11/08/2016 रोजी मंजूरी देण्यास हरकत नाही तसेच दिनांक 06/10/2016 अन्वये जागेचे स्थळ निरिक्षण करण्यात आलेले आहे असे शेरे नमूद केलेले आहेत व त्यावर मा.आयुक्त यांनी 19/10/2016 रोजी तात्पुरती मान्यता प्रदान केली. म्हणजेच अर्जदाराने अर्ज सादर करणे, विकास शुल्क रकमा भरणा करणे, टिपणी सादर करणे, टिपणीवर विविध स्तरांवर शेरे नमूद करणे व त्यानंतर मा.आयुक्त यांची मंजुरी या दरम्यान मोठ्या प्रमाणात कालावधी उलटलेला दिसून येतो. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-1005/34/प्र.क्र.8/2005/18 (र.व का.) दिनांक 07/04/2005 मधील अ.क्र.(2) नुसार साधारणपणे कोणतीही फाईल विभागातील किंवा कार्यालयातील कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांच्या टेबलावर सात कामाच्या दिवसांचे वा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही , अ.क्र.(4) अन्वये दुसऱ्या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यकता नसलेल्या फाईलींच्या संबंधात विभागाने त्या प्रकरणावर पंचेचाळीस दिवसांचे आत निर्णय घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, दुसऱ्या विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची असलेल्या फाईलींच्या संदर्भात तीन महिन्यांच्या आंत निर्णय घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी अशा सूचना आहेत. त्याचप्रमाणे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली 2016 मधील कलम 7 व 8 प्रस्ताव सादर करण्यात आल्यानंतर 60 दिवसांच्या आंत एक तर तो मंजूर करण्यात यावा किंवा त्रृट्यांच्या पूर्ततेसाठी संबंधितांना कळविण्यात यावा, अशा प्रकारे प्रस्तावावर कार्यवाही करण्यात न आल्यास प्रस्ताव मंजुर करण्यात आला आहे असे समजण्यात येईल अशी अट नमुद करण्यात आलेली आहे. तथापी वरील प्रकरणामध्ये अर्जदाराचा अर्ज दाखल झाल्यानंतर मंजुरी प्रदान करण्यापर्यंत जवळ-जवळ 20 महिन्यांचा कालावधी लोटलेला असल्याने नियमानुसार विहित कालावधीमध्ये कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने संबंधित विभागामार्फत नियमांचे पालन करण्यात येत नाही.

02) मंजुर नकाशामध्ये प्लॉट नं.15 व 16 मध्ये नगररचना विभागाने हिरव्या शाईने Sewage Raw Water treatment plant करिता एकूण क्षेत्र 463.20 चौमी असे दुरुस्त करण्यात आलेले दिसून येते. तथापी याबाबत टिपणीमध्ये तसेच मंजुरी आदेशामध्ये कोणतीही अट टाकण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर बदलाबाबत लेखापरीक्षणामध्ये योग्य ती पडताळणी करता आली नाही. त्याचप्रमाणे आकारणी करण्यात आलेला दर रु.60/- कोणत्या आधारे घेण्यात आलेला आहे याबाबतचे आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणामध्ये उपलब्ध झाले नाही त्यामुळे

याबाबत लेखापरीक्षणामध्ये साशंकता आहे.

03) मंजुर नकाशानुसार दर्शविण्यात आलेले प्लॉटचे क्षेत्रफळ 5329.22 चौमी दर्शविण्यात आलेले आहे, त्यानुसार विकास शुल्क 5329.22 x 60 = 319753/- इतके आकारणी करणे आवश्यक असतांना रु.394362/- इतका भरणा करण्यात आलेला आहे, सदर रक्कम परिगणीत करण्याबाबत संचिकेमध्ये कुठेही उल्लेख दिसून येत नाही, त्यामुळे भरणा करण्यात आलेल्या जादा रकमेबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

04) मनपा पत्र क्र.3213 दिनांक 20/03/2015 अन्वये प्रकल्प संचालक (एनएचएआय) पीआय बी-23, एन-24, औरंगाबाद यांना सदर अभिन्यास राष्ट्रीय महामार्गाला सन्मुख असल्याने अभिन्यास मंजुरीची परवानगी देतांना सोबत जोडलेल्या नकाशांवर इमारत रेषा, नियंत्रण रेषा, व सेवा रस्त्याची आखणी करुन द्यावी ही विनंती असे नमुद करण्यात आलेले आहे, याबाबत त्यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला दिसून येत नाही. तथापी याच अभिन्यास शेजारील गट नं.38/2ब/ब अर्जदार श्री.ओमप्रकाश चांडक जळगांव यांचे तात्पुरती अभिन्यास मंजुरी आदेश क्र.108 दिनांक 27/02/2017 व अंतिम अभिन्यास मंजुरी आदेश क्र.203 दिनांक 06/09/2017 अन्वये राष्ट्रीय महामार्गाला लागून 12 मी. सेवा रस्ता (सर्व्हीस रोड) दर्शविण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे सदर गट नं.38/2अ/1 क्षेत्रामध्ये राष्ट्रीय महामार्गाला लागून 12 मी. सर्व्हीस रोड दर्शविण्यात येऊन त्याप्रमाणे तात्पुरती मंजुरी देणे आवश्यक होते, तथापी 12 मी. सर्व्हीस रोड दर्शविण्यात येऊन अंतिम मंजुरी घेतली असल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणात अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही उपलब्ध झाले नाही. त्यामुळे अशा प्रकारे 12 मी. सर्व्हीस रोड सोडण्यात आलेला आहे किंवा नाही याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही, तसेच लगतच्या दोन अभिन्यासांच्या मंजुरी प्रकरणांमध्येही तफावत दिसून येत असल्याने विभागामार्फत संबंधित अभियंता यांनी योग्य ती तपासणी न करता प्रकरणास मंजुरी दिलेली असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे..

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.231, दिनांक 10/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 164, Hmm No : 231)

147 प्लॉट नं.468, टीपी स्कीम नं.3, मेहरुण शिवार जळगांव येथील बांधकाम परवानगीबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	4000.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव शहर महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षांचे लेखापरीक्षण दरम्यान नगररचना विभागाकडील विषयांकित बांधकाम परवानगीची संचिका तपासणी करण्यात आली असून त्याबाबत

लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) प्लॉट नं.468, टीपी स्कीम नं.3, मेहरुण शिवार येथे तळमजलासह व 4 मजले बांधकाम सुधारित मंजुरीचे प्रकरण तपासणी करण्यात आले असता सदर बांधकाम परवानगीमध्ये बांधकाम व्यावसायिक मे.अरिहंत कंस्ट्रक्शन्स, जळगांव यांनी श्री.शरद भास्कर पाटील यांचेकडून खालीलप्रमाणे टीडीआर खरेदी केलेले आहेत.

अ. क्र.	डीआरसी नंबर व दिनांक	डीआरसीमधील क्षेत्रापैकी खरेदी केलेले क्षेत्र	दुय्यम निबंधक यांचेकडील नोंदणी दस्त क्रमांक व दिनांक
1	49, दि.18/10/2010	1000	4319, दि.30/10/2010
2	49, दि.18/10/2010	1000	4320, दि.30/10/2010
3	49, दि.18/10/2010	309	4321, दि.30/10/2010
4	30, दि.17/04/2010	579	4321, दि.30/10/2010
	एकूण खरेदी केलेले क्षेत्र	2888	

वरील प्लॉटवरील सुधारित बांधकाम परवागनी क्र.1006, दिनांक 03/11/2016 सोबतच्या नकाशामध्ये दर्शविल्यानुसार खालीलप्रमाणे क्षेत्रफळ दर्शविण्यात आलेले आहे.

अ. क्र.	तपशिल	क्षेत्रफळ (चौ.मी.)
1	प्लॉटचे क्षेत्रफळ	831.12
2	वापरलेला टीडीआर	207.78
3	उपलब्ध एफएसआय	1038.90
4	अस्तित्वातील एकूण बांधकाम	1038.89
5	खरेदी केलेला टीडीआर	286.50
6	प्रस्तावित बांधकाम	286.02
7	अस्तित्वातील व प्रस्तावित एकूण बांधकाम	1324.91

वरील परवानगीनुसार एकूण टीडीआर 207.78 + 286.50 = 494.28 चौमी सदर बांधकामासाठी वापरण्यात आलेले

आहे. श्री.शरद भास्कर पाटील यांचेकडून एकूण 2888 चौमी टीडीआर खरेदी केल्याबाबतच्या नोंदी टीडीआर नोंदवहीमध्ये घेण्यात आलेल्या आहेत. तथापी मे.अरिहंत कंस्ट्रक्शन्स जळगांव यांनी खरेदी केल्यानंतर प्रत्यक्षात वापरलेले टीडीआर व शिल्लक टीडीआर याबाबतच्या नोंदी नोंदवहीमध्ये दिसून येत नाही. खरेदी केलेल्या टीडीआर 2888 चौमी मधून या कामी वापरलेला टीडीआर 494.28 चौमी वजा जाता 2393.72 चौमी मे.अरिहंत कंस्ट्रक्शन्स जळगांव यांचेकडे शिल्लक राहतो, व याबाबतच्या नोंदी स्वतंत्रपणे नोंदवहीमध्ये नोंदविणे आवश्यक आहे, अन्यथा संबंधित बांधकाम व्यावसायिक वरील टीडीआर अन्यत्र दुबार वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही व यामुळे संबंधित बांधकाम व्यावसायिकामार्फत महानगरपालिकेची फसवणूक करण्याची शक्यता नाकारता येत नाही व अशा बाबींवर लक्ष ठेवण्याच्या दृष्टीने नगररचना विभागाकडे कोणतीही यंत्रणा असल्याचे निदर्शनास येत नाही.

02) वरील बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने महानगरपालिका पत्र क्र.2434 दिनांक 06/12/2016 अन्वये संबंधित बांधकाम व्यावसायिक यांना विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या तरतुदीनुसार उक्त बांधकाम नकाशांना परवानगी दिली गेलेली नसल्याबाबत साशंकता असल्यामुळे सदर बांधकाम स्थगित ठेवण्यात यावे अशा आशयाचे पत्र देण्यात आले होते. त्यानंतर स्थगिती आदेश रद्द करण्यात येत असल्याबाबतचे मसुदा पत्र संचिकेमध्ये लावण्यात आलेले असून त्यावर विभागाचा जावक क्रमांक, दिनांक व सहायक संचालक नगररचना यांची स्वाक्षरी दिसून येत नाही. त्यामुळे देण्यात आलेली स्थगिती रद्द करण्यात आली किंवा बांधकाम परवानगी रद्द करण्यात आली याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली.

03) सदर कामाचे संचिकेमधील टिपणी दिनांक 16/03/2013 अन्वये बंदीस्त बाल्कनी क्षेत्र 31.62 चौमी क्षेत्रावर प्रिमीयम रु.4000/- तसेच उपकर रक्कम 16460/- भरणा करुन घेऊन प्रस्तावानुसार बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र देण्यास मान्यता प्रदान करण्यात येऊन सदर प्रस्तावानुसार अंशत: भोगवटा प्रमाणपत्र क्र.80 दिनांक 25/03/2013 अन्वये देण्यात आलेले आहे. तथापी प्रिमीयम रु.4000/- चा भरणाबाबतची पावती संचिकेमध्ये लावण्यात आलेली नाही, त्यामुळे सदर रक्कम संबंधित बांधकाम व्यावसायिक यांचेकडून वसुलपात्र ठरते. तसेच भरणा रकमांच्या तपासणीबाबत योग्य ती दक्षता घेण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

04) वरील बांधकाम व्यावसायिक यांनी खालीलप्रमाणे वेळोवेळी रकमांचा भरणा केलेला दिसून येतो.

अ. क्र.	तपशिल	पावती क्रमांक	दिनांक	रक्कम
1	प्रिमीयम चार्जेस (31.01 चौ मी. क्षेत्रावर)	4696	22/04/2009	3751
2	उपकर (303.34 x 65)	4696	22/04/2009	19717
3	पूर्णत्व छाननी फी	165	3/5/2011	500

4	आग सुरक्षा निधी	9620	5/5/2011	10000
5	कामगार कल्याण उपकर (161.38 x 102)	चलन	22/03/2013	16460
6	पूर्णत्व छाननी फी	7296	6/3/2013	550
7	बांधकाम छाननी फी	20245	16/05/2016	150
8	कामगार कल्याण उपकर	चलन	27/10/2016	54344
9	विकास शुल्क फी	35	3/11/2016	117154
10	टीडीआर आयआयसी शुल्क (286.50 x 19000 = 5443500 च्या 5% = 272175)	20782	3/11/2016	272175

वरील भरणा पावत्यांनुसार सन 2016 मध्ये सादर केलेल्या सुधारित बांधकाम परवानगी अर्जानुसार विकास शुल्क रकमांचा भरणा केलेला दिसून येतो, तथापी त्यापूर्वी वेळोवेळी सादर केलेल्या मुळ व सुधारित बांधकाम परवानगी अर्जानुसार व तात्पुरत्या भोगवटा प्रमाणपत्रांनुसार विकास शुल्क रकमांचा भरणा केलेला दिसून येत नाही. तसेच कामगार उपकर, टीडीआर आयआयसी शुल्क, प्रिमीयम चार्जेसच्या रकमांचा भरणा करतांना काही ठिकाणी परिगणना करण्यात आलेली नाही, त्याचप्रमाणे टिपणीमध्ये किंवा छाननी नमुन्यामध्ये नमुद करतांना आतापर्यंत किती रकमांचा भरणा करण्यात आलेला आहे, किती रकमांचा भरणा करणे आवश्यक आहे याबाबतचा तपशिल देण्यात आलेले नाही. त्यामुळे भरणा करण्यात आलेल्या रकमा योग्य असल्याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.245, दिनांक 26/04/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 166, Hmm No : 245)

148 नगररचना विभागाकडील बांधकाम परवानगी अभिलेखांमधील अनियमितता

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 47358.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान नगररचना विभागाकडील

अभिलेखांची तपासणी करण्यात आली असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.63 अंतर्गत नमुना 38 मध्ये बांधकाम परवागनी नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे नोंदवही न ठेवता असुधारित नमुना क्र.45 मध्ये नोंदवही चार प्रभागांनुसार ठेवलेली आहे.

02) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.64 नुसार नोंदवहीचे प्रत्येक पृष्ठ हे महानगरपालिकेच्या सामान्य मुद्रेने मोहोरबंद करण्यात येईल, प्रत्येक पृष्ठांला अनुक्रमांक देण्यात येतील व एकूण पृष्ठे लेखाप्रमुखाकडून/विभाग प्रमुखाकडून पडताळणी करुन प्रमाणित करण्यात येईल असे नमूद आहे. सदर नोंदवह्यांमध्ये पृष्ठ क्र.1 ते 200 असून सदर नोंदवही वरील नियमानुसार प्रमाणित करण्यात आलेली नाही.

03) सदर नमुना क्र.45 मधील नोंदवहीची पडताळणी करण्यात आली असता, नोंदवहीमधील रकाना क्र.8 काम पूर्ण झाल्याचा दिनांक, रकाना क्र.9 ताबा घेतल्याचा दिनांक नमूद करण्यात आलेले नाहीत, रकाना क्र.10 कराधान विभागास सुचना दिल्याचा दिनांक या रकान्यामध्ये क्षेत्र नमुद करण्यात आलेले आहे, रकाना क्र.11 आकारणीचा दिनांक, रकाना क्र.12 आकारणीची रक्कम व रकाना क्र.13 शेरा या रकान्यांमध्ये नोंदणीकृत अभियंता व नगररचना विभागाचे अभियंता यांची नांवे नमूद करण्यात आलेली आहेत. म्हणजेच रकान्यातील योग्य ती माहिती भरण्यात आलेली दिसून येत नाही.

04) वरील नमुन्यामध्ये आवश्यक त्या नोंदी घेण्यात आलेल्या नसल्यामुळे संबंधित काम केंव्हा पूर्ण झाले, सदर कामाच्या सूचना कराधान विभागास देण्यात आली किंवा कसे, त्यानुसार त्यांनी कर आकारणी केली किंवा कसे व केली असल्यास कोणत्या दराने व किती रकमेची आकारणी केली याबाबतचा तपशिल उपलब्ध होऊ शकला नाही.

05) नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेल्या प्रत्येक नोंदी प्रमाणित करणे आवश्यक असतांना, पूर्ण वर्ष संपल्यानंतर एकाच ठिकाणी सहा.नगररचनाकार यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे, विभाग प्रमुख सहायक संचालक यांच्या कुठेही स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत.

06) महानगरपालिका बांधकाम उपविधीमधील अ.क्र.6.2.1.2 खालील तक्ता क्र.2 नुसार बांधकाम नकाशामध्ये आवश्यक त्या रंगांचा वापर करुन क्षेत्र दर्शविण्यात येत नाहीत. त्यामुळे अस्तित्वातील बांधकाम, प्रस्तावित बांधकाम व इतर आवश्यक माहिती याबाबत आवश्यक पडताळणी करता आली नाही.

07) जळगांव महानगरपालिका उपविधीमधील अनुसूची-आर मधील (a), (b) व (c) मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक इमारतीमध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग स्ट्रक्चरची व्यवस्था करणे, सदर व्यवस्थेनुसार पावसाच्या पाण्याचा साठा व्यवस्थित होऊन जमिनीतील पाणी रिचार्ज होण्याच्या दृष्टीने स्ट्रक्चर सुस्थितीत राहील याची संबंधित बांधकाम मालकाने दक्षता घेणे आवश्यक आहे. अशा प्रकारची व्यवस्था करण्यात आली नसल्यास अथवा त्यांचे सुस्थितीत राहण्याकरिता योग्य ती दक्षता घेतली नसल्यास दरवर्षी रु.1000/- पर्यंत दंड आकारणी करणे आवश्यक आहे.

बांधकाम परवानगी कागदपत्रांमध्ये फक्त तरतुद करण्यात येते, तथापी अशा प्रकारे व्यवस्था करण्यात आली असल्याबाबत तपासणीचे प्रमाणपत्र जोडण्यात आलेले नाहीत. तसेच अशा व्यवस्था तपासणीच्या अनुषंगाने अभिलेखे ठेवण्यात आलेले नाहीत.

08) उपविधीमधील कलम क्र.7.3 नुसार बांधकामांचे जोता पातळीपर्यंत काम झाल्यानंतर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी तपासणी करुन त्यानंतर पुढील बांधकामाची परवानगी अनुसूची-एच मध्ये देणे आवश्यक आहे. तथापी अशा प्रकारच्या तपासणीची अभिलेखे संचिकांमध्ये आढळून आली नाही. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियेाजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम-48 अन्वये बांधकाम परवानगी ही इमारतीचे बांधकाम जोत्याच्या पातळीपर्यंत किंवा बेसमेंटच्या वरच्या भागाचे बांधकाम पूर्ण होईपर्यंतचे बांधकाम झालेले नसल्यास ती प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 1 वर्षापर्यंत वैध राहील व त्यानंतर नव्याने परवानगी घेणे आवश्यक आहे. तथापी अशा प्रकारच्या तपासणी महानगरपालिका नगररचना विभागामार्फत करण्यात येत असल्याबाबत तसेच बांधकाम परवानगी वैधता कालावधीमध्ये करण्यात आले असल्याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

09) बांधकाम परवाना आदेशानुसार सेप्टीक टँक आणि शोष खड्डा जळगांव महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्याचे निर्देशानुसार बांधकाम करण्यात यावा व त्याबाबतची ना-हरकत प्रमाणपत्र भोगवटा प्रमाणपत्रापूर्वी सादर करण्यात यावे अशी अट नमूद करण्यात येते, तथापी अशा प्रकारे महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात येत असल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे अटी/शर्तीनुसार कामे करण्यात येत असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये खात्री करता आली नाही.

10) बांधकाम परवानगी आदेशांमधील अ.क्र.30 नुसार व शासन आदेश क्र.डीसीआर/1094/2829/नवि-11, दिनांक 18/11/2004 तसेच बिल्डींग उपविधी मधील परिशिष्ट-एक्स नुसार पाणी गरम करण्याची सोलर सिस्टीम लावणे बंधनकारक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली असल्याबाबत अभिलेखे संचिकेमध्ये लावण्यात आलेले नाहीत.

11) नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी, भोगवटा प्रमाणपत्र, तात्पुरती अभिन्यास मंजुरी, अंतिम अभिन्यास मंजुरी इत्यादी प्रकरणांची तपासणी करण्यात आली असता त्यामध्ये छाननी फी, विकास शुल्क फी, प्रिमीयम चार्जेस, आयआयसी चार्जेस, पाणीपुरवठा व दिवाबत्ती चार्जेस, बांधकाम कामगार कल्याण उपकर इत्यादी रकमांची आकारणी करुन रकमा वसुल करण्यात येतात. तथापी याबाबत रकमांच्या आकारणीबाबत उल्लेख करण्यात येत नाही. सदर रकमांचे दर मंजुरीबाबत शासन राजपत्र/शासन निर्णय लेखापरीक्षणात उपलब्ध करुन देण्याबाबत, तसेच सन 2016-2017 व 2017-2018 या कालावधीमध्ये प्रचलित बाजारमुल्य दरांबाबचे अभिलेखे किंवा रेडी रेकनर पुस्तक लेखापरीक्षणात उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले होते, तथापी लेखापरीक्षणास मागणीकृत अभिलेखे उपलब्ध झाले नाही, त्यामुळे आकारणी करण्यात आलेल्या विविध रकमांबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

12) याबाबत जोडण्यात आलेल्या नमुन्यांमध्ये विकास शुल्क दर हे रहिवास प्रयोजनासाठी रु.60/- प्रती चौमी किंवा प्रचलित बाजारमुल्य दराच्या 2% प्रती चौमी यापैकी जे जास्त असेल ते, वाणिज्य प्रयोजनासाठी रु.120/- प्रती चौमी किंवा प्रचलित बाजारमुल्य दराच्या 2% प्रती चौमी यापैकी जे जास्त असेल ते, औद्योगिक प्रयोजनासाठी रु.90/- प्रती चौमी किंवा प्रचलित बाजारमुल्य दराच्या 2% प्रती चौमी यापैकी जे जास्त असेल ते, दिवाबत्ती व पाणीपुरवठा शुल्क (भूखंड क्षेत्रावर) रु.15/- प्रती चौमी, कामगार कल्याण उपकर हे बांधकामाचे क्षेत्र x बांधकामाचा बाजारमुल्य दर = एकूण रकमेच्या 1% प्रमाणे चलनाने भरणा करणे असे दर छापिल स्वरुपात नमुद करण्यात आलेले आहेत. तथापी याबाबत बाजारमुल्य दराशी तुलना न करता विकास शुल्क रु.60/- प्रमाणे सर्व प्रकरणांमध्ये आकारणी करण्यात आलेला असल्याचे दिसून येते, तसेच कामगार कल्याण उपकराची परिगणनाबाबत नमुद दरांबाबतही लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. याबाबतचे शासन निर्देशानुसार आकारणी करणे आवश्यक आहे, जेणेकरुन महानगरपालिकेचेही नुकसान होणार नाही, किंवा नागरिकांवरही अतिरिक्त बोजा पडणार नाही. याबाबत योग्य त्या परिगणनेसह अनुपालन सादर करण्यात यावे, ज्यामध्ये महानगरपालिकेचे किंवा नागरिकांचे नुकसान झालेले नाही याबाबत खात्री होईल.

13) निकम, लाठी ॲण्ड पाटील असोसिएटस् जळगांव यांनी त्यांचा अर्ज दिनांक 29/03/2016 अन्वये प्लॉट नं.12, गट नं.14/1, खेडी शिवार येथे 1 बीएचके चे 5 ब्लॉक बांधकामाच्या परवानगीकरिता अर्ज सादर केला त्यामध्ये कामगार कल्याण उपकराची रक्कम परिगणीत करतांना 165.97 x 220 = 36513/- इतकी आकारणी करण्यात आलेली असून मनपाकडे दि.31/03/2016 रोजी रु.29088/- व दिनांक 13/04/2016 रोजी रु.7425/-याप्रमाणे भरणा करण्यात आलेला आहे. तथापी खालीलप्रमाणे काही प्रकरणांमध्ये रु.190/- प्रती चौमी प्रमाणे आकारणी करण्यात आलेली आहे. त्यामुळे रु.30/- प्रती चौमी प्रमाणे फरकाची रक्कम संबंधितांकडून वसुलपात्र ठरते. **याचप्रमाणे इतकी सर्व प्रकरणांमध्ये अशा प्रकारे कमी आकारणी केली असल्यास वसुलीची रक्कम निश्चित करण्यात येऊन संबंधितांकडून वसुल करण्यात यावी.** सदर खालीलप्रमाणे कमी आकारणीची रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात येऊन योग्य त्या खाती भरणा करण्यात यावी.

अ. क्र.	नांव	क्षेत्र	अर्ज सादर दिनांक	क्षेत्रफळ	कपात केलेली रक्कम	रु.30/- प्रती चौमी प्रमाणे वसुलपात्र रक्कम
1	श्री.मुरलीधर राजाराम महाजन जळगांव	प्लॉट नं.26, गट नं.106/1, निमखेडी शिवार येथे पार्कींग व 4 मजले बांधकाम	11/4/2016	637.91	121203	19137
2	सौ.सुधा	प्लॉट नं.13, गट नं.109,	8/3/2016	654.71	124395	19641

	पुरुषोत्तम काबरा, जळगांव	निमखेडी शिवार येथे पार्कींग व 4 मजले बांधकाम				
3	मे.अरिहंत कंस्ट्रक्शन्स पार्टनर श्री.मनिष छबीलदास शाह जळगांव	प्लॉट नं.468, टीपी स्कीम नं.3, मेहरुण शिवार येथे तळमजलासह व 4 मजले बांधकाम सुधारित मंजुरी	3/11/2016	286.02	54344	8580
		एकूण वसुलपात्र रक्कम				47358

14) प्लॉट नं.5,6,7,18, गट नं.151, मेहरुण शिवार येथे तळमजलासह व 3 मजले बांधकाम सुधारित मंजुरी प्रकरणामध्ये जळगांव महानगरपालिका उपविधीमधील अ.क्र.16.5.2(जे) मध्ये "In the residential building development of fitness center is permissible free of FSI subject to the condition that In every residential building, constructed or proposed to be constructed for the use of a Co-operative Housing Society or an Apartment Owners Association, a fitness centre room will be permitted. The area of the room shall be limited to 2 (two) percent of the total built up area of building or 20 sq.mt. whichever is more. It shall not be used for any other purpose, except for Fitness activities and itrsquo;s ownership shall vest to society or association" असे नमुद आहे. त्यानुसार एकूण बांधकामाचे क्षेत्रफळ 850.31 चौमी असून 2% प्रमाणे 17.01 चौमी किंवा 20 चौमी पैकी जास्त म्हणजे 20 चौमी इतके जिमखाना रुम बांधकाम करणे आवश्यक असतांना त्यापेक्षा जास्त म्हणजे 30.51 चौमी क्षेत्रफळाचे जिमखाना रुम बांधण्यात आलेले आहे. तसेच सदर नियमानुसार बांधकाम करण्यात आलेले फिटनेस सेंटरचा वापर अन्य कारणासाठी करता येणार नाही, तसेच जिमखाना रुमची मालकी ही संबंधित सोसायटी किंवा असोसिएशनकडे हस्तांतरीत करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात खात्री झाली नाही. तसेच सदर बांधकाम परवानगी देतांना सदर जिमखाना रुमचे जादा बांधकामाबाबत योग्य ती पडताळणी करण्यात आलेली दिसून येत नाही.

15) अंतर्गत लेखापरीक्षण शाखेमार्फत पूर्वलेखापरीक्षण करण्यात येत असल्याने वरीलप्रमाणे आकारणी करण्यात येणारे शुल्कांच्या रकमांबाबत अंतर्गत लेखापरीक्षण विभागामार्फत पडताळणी होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कोणतीही पडताळणी करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे आकारणी करण्यात येणाऱ्या रकमा ह्या फक्त नगररचना विभागामार्फतच अंतिम करण्यात येतात व परिणामी रकमांची कमी प्रमाणात आकारणी होत असल्यास महानगरपालिकेचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

16) बांधकाम परवानगी देणेपूर्वी सदर जागा खुली असतांना महानगरपालिकेचा खुला भूखंड कराची रक्कम भरणा करणे आवश्यक होते. त्यानुसार काही प्रकरणांची तपासणी करण्यात आली असता त्यामध्ये खुला भूखंड कर भरणा करण्यात आल्याबाबतच्या पावत्यांच्या छायांकित प्रती जोडण्यात आलेल्या नाहीत, अथवा त्याबाबत टिपणीमध्येही नमुद करण्यात आलेले दिसून येत नाही. त्यामुळे खुला भूखंड कर भरणा करण्यात आल्याबाबत बांधकाम परवानगी देतांना नगररचना विभागाकडून पडताळणी करण्यात आलेली नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

अ. क्र.	बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक	मालमत्ता धारकाचे नांव	जागेचा तपशिल	मंजुर क्षेत्रफळ (चौमी)
1	316, दिनांक 07/04/2016	श्री.सुरेंद्र गजानन चौधरी	प्लॉट नं.38/पार्ट-1, स.नं.247/3ए सीटीएस 7/32 जळगांव शिवार	316.61
2	652, दिनांक 14/09/2016	श्री.सिताराम एकनाथ चौधरी	प्लॉट नं.241, टीपीएस-III, एफपी नं.241 मेहरुण शिवार	1012.16
3	1137, दिनांक 30/11/2016	श्री.भगवानदास दयाभाई पटेल	प्लॉट नं.1 (पार्ट) सीटीढस नं.7028/ पार्ट/स.नं.232/2बी जळगांव शिवार	274.14
4	744, दिनांक 25/10/2016	सौ.सुधा पुरुषोत्तम काबरा	प्लॉट नं.13, गट नं.109, निमखेडी शिवार	610.48
5	278, दिनांक 31/05/2016	मे.निकम, लाठी व पाटील असोसिएटस् जळगांव	प्लॉट नं.5,6,7,8, 18 (पार्ट) स.नं.252 मेहरुण शिवार	850.31
6	745, दिनांक 27/10/2016	श्रीमती ललीताबाई अशोक नेमाने	प्लॉट नं.15, गट नं.99/1 व 2, निमखेडी शिवार	164.43
7	800, दिनांक 31/12/2016	श्री.मुरलीधर राजाराम महाजन	प्लॉट नं.27, गट नं.106/01 निमखेडी शिवार	637.91

वरील यादीमधील अ.क्र.1,2 बाबत कर संकलन विभागाची तात्पुरती पावती अनुक्रमे दिनांक 30/12/2015, दिनांक 09/09/2016 जोडण्यात आलेल्या आहेत. संबंधितांनी सादर केलेले धनादेश रोखीकृत झाल्यानंतर त्यांना रक्कम प्राप्त झाल्याबाबत मुळ पावती देण्यात येते. सदर मुळ (पक्की) पावतीच्या छायांकित प्रती नगररचना विभागाने प्राप्त करणे आवश्यक होते, तथापी अशाछायांकित प्रती प्राप्त करण्याबाबत नगररचना विभागाने कोणतीही दक्षता घेतलेली दिसून

येत नाही व धनादेश वटल्यानंतर देण्यात येणाऱ्या पावतीच्या आधारे पुढील कार्यवाही करणे आवश्यक असतांना अशा पावतीशिवाय बांधकाम परवानगी दिलेली असल्याचे निदर्शनास येते.

वरील यादीमधील अ.क्र.4 च्या संचिकेमध्ये सौ.सुधा पुरुषोत्तम काबरा यांनी सदर प्लॉटची खरेदी दिनांक 16/07/2010 रोजी केलेली असून खरेदीखत व पूर्वीचा 7/12 उताऱ्यानुसार सदर प्लॉटचे मुळ मालक श्री.अजित व सुजित शिवशंकर दुडे असल्याचे दिसून येते, तथापी खुला भूखंड कर भरणा करतांना पावती क्र.43337, दिनांक 16/8/2010 रक्कम रु.58864/- कालावधी सन 96 ते 2010 व पावती क्र.11561 दिनांक 20/10/2016 रक्कम रु.43716/- कालावधी 2010 ते 2016-2017 भरण्यात आली असून सदर पावती ही चंद्रशेखर डिगंबर काळे यांचे नांवाची दिसून येते.म्हणजेच जमिनीचे मुळ मालक किंवा खरेदी करणारे मालक यांचे नांवाची पावती जोडणे आवश्यक असतांना इतर व्यक्तींच्या नावाची पावती जोडून प्रकरणास मंजुरी देण्याची कार्यवाही नगररचना विभागाने केलेली असल्याने योग्य ती पडताळणी न करता नगररचना विभागामार्फत परवानगी देण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येते.

वरील यादीमधील अ.क्र.5 च्या संचिकेमध्ये बांधकाम व्यावसायिक यांनी प्लॉट नं.5 व 6 क्षेत्रफळ अनुक्रमे 319.75 व 294.50 चौमी हे दिनांक 14/08/2012 रोजी श्री.प्रकाश रघुनाथ पाटील यांचेकडून खरेदी केलेले आहे व प्लॉट नं.7 व 18 क्षेत्रफळ अनुक्रमे 314.05 व 321 चौमी हे दिनांक 14/08/2012 रोजी सौ.संगिता प्रकाश पाटील यांचेकडून खरेदी केलेले आहे. खरेदीखत सोबत जोडलेल्या 7/12 उताऱ्यानुसार त्यांवर श्री.प्रकाश रघुनाथ पाटील व सौ.संगिता प्रकाश पाटील यांची नांवे दिसून येतात. तथापी खुला भूखंड कर भरणा पावती क्र.35380 दिनांक 01/03/2014 कालावधी 2012-13 ते 2013-14 रक्कम रु.28548/- व पावती क्र.42035 दिनांक 18/01/2016 कालावधी सन 2014-15 व 2015-16 रक्कम रु.28760/- नुसार सौ.सुनंदा विठ्ठल तेली यांचे नांवाची दिसून येते. म्हणजेच जमिनीचे मुळ मालक किंवा खरेदी करणारे मालक यांचे नांवाची पावती जोडणे आवश्यक असतांना इतर व्यक्तींच्या नावाची पावती जोडून प्रकरणास मंजुरी देण्याची कार्यवाही नगररचना विभागाने केलेली असल्याने योग्य ती पडताळणी न करता नगररचना विभागामार्फत परवानगी देण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येते. **सदर बाबी ह्या अत्यंत गंभीर असून याबाबत प्रशासनाने गंभीर दखल घेणे आवश्यक आहे.**

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.244, दिनांक 26/04/2024 व 257, दिनांक 03/05/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 179, Hmm No : 244)

कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

---------- निरंक ----------

भाग दोन

सर्वसाधारण अनियमितता

कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

149 एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण असल्याच्या नोंदी मुळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात न आल्याबाबत.

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत 165 अधिकारी व कर्मचारी यांचे मुळसेवापुस्तकांची तपासणी करण्यात आली असून ब-याचशा कर्मचा-याचे सेवापुस्तकामध्ये कर्मचा-याने संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण केली आहे किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली असल्याचे प्रमाणपत्र सेवापुस्तकामध्ये नोंदविण्यात आलेले नाही. अशा कर्मचारी यांचे नावे खालील प्रमाणे असे.

अ क्र	अधिकारी / कर्मचा-यांचे नाव	पदनाम	विभागाचे नाव
1	श्री इंद्रसिंग गुलाबसिंग पाटील	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
2	श्री संजय बंन्सी पवार	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
3	श्री राजेन्द् आत्माराम तायडे	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
4	श्री यशवंत भिला चौधरी	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
5	श्री बालासाहेब बडवेन चव्हाण	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
6	जगतसिंग बाबुराव पाटील	लॅब असिस्टंट	पाणीपुरवठा विभाग
7	श्री वंसत सुपडू सपकाळे	लिपिक	जकात विभाग
8	श्री दिपक सुकलाल अहिरे	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	आरोग्य विभाग

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितताबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई यांचा शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-2000/प्रक्र-5/2001/39, दिनांक 20.07.2002 अन्वये शासकिय गट-अ,ब,क संवर्गातील कर्मचा-यांना एम.एस.सी.आय.टी. ही संगणक अर्हता परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. सदर निर्णयातील अटी व शर्तीनुसार वयाच्या 50 वर्षेपर्यंत सदरची परीक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक असून 50 वर्षापेक्षा जास्त वयाच्या शासकिय कर्मचा-यांना सदर परीक्षेपासून सूट देण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई यांचा शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती 04/224/39, दिनांक 05.05.2007 अन्वये दिनांक 31/12/2007 पर्यन्त अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली होती. तरी सदरील शासन निर्णय अंमलात येण्याच्या दिनांकास वयाची 50 वर्षे पुर्ण केलेले अधिकारी/कर्मचारी वगळता उर्वरीत सर्व कर्मचारी यांनी संगणक अर्हता धारण करणे आवश्यक असतांना बहुतेक कर्मचारी संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण नसल्याचे त्यांच्या मुळ

सेवापुस्तकावरुन दिसुन आले.

02) वरील शासन निर्णयातील नियम क्रमांक 3(1) नुसार संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या कर्मचा-यांना ते संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्याच्या दिनांकापर्यंत त्यांच्या वेतनवाढी रोखून धरण्यास पात्र ठरतिल असे स्पष्ट नमूद असतांना महानगरपालिकेतील किती कर्मचारी संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण केलेले नाही याबाबत माहिती नाही. तरी आस्थापना अधिक्षक यांनी महानगरपालिकेतील सर्व गट-अ,ब,क संवर्गातील कर्मचा-यांनी संगणक हाताळणी प्रमाणपत्र प्राप्त केले आहे किंवा नाही याची तपासणी करुन संगणक अर्हता धारण न केलेल्या कर्मचा-याचे वेतनवाढी रोखून धरण्यात याव्यात व नियमोचीत कार्यवाही आणि तपासणीच्या स्वयंस्पष्ट अहवालासह अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 33 दिनांक 22/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 18, Hmm No : 33)

150 महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे मुळसेवापुस्तकांची तपासणी केली असता त्यातील अनियमितता बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत 165 अधिकारी व कर्मचारी यांचे मुळसेवापुस्तकांची तपासणी करण्यात आली त्यांची नावे खालील प्रमाणे असे

अ क्र	अधिकारी / कर्मचा-यांचे नाव	पदनाम	विभागाचे नाव
1	श्री मनिलाल हिरालाल डांबोरे	ग्रंथपाल	सामान्य प्रशासन विभाग
2	श्री लक्ष्मण पुंडलिक सपकाळे	फेराप्रिंटर्स	सामान्य प्रशासन विभाग
3	कु प्रगती प्रकाश चोंडकाळे	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
4	श्री सुनिल रविन्द्राथ पवार	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
5	श्री अनिल सदाशिव पाटील	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
6	श्री दशरथ बळीराम बावीस्कर	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग

7	श्री इंद्रसिंग गुलाबसिंग पाटील	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
8	श्री संजय बंन्सी पवार	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
9	श्री चंद्रकांत लक्ष्मण बाद्रे	बांधकाम अधिक्षक	सामान्य प्रशासन विभाग
10	श्री चंद्रकांत लक्षमण पंधारे	सहायक ग्रंथालय	सामान्य प्रशासन विभाग
11	श्री संजय चांगदेव आरडे	शिपाई	सामान्य प्रशासन विभाग
12	श्री दिलिप रामदास पवार	शिपाई	सामान्य प्रशासन विभाग
13	श्री राजेन्द् आत्माराम तायडे	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
14	श्री यशवंत भिला चौधरी	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
15	श्री बालासाहेब बडवेन चव्हाण	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
16	श्रीमती अनुभा अनिल भट	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
17	श्री इकबाल सलाउददीन काझी	शिपाई	सामान्य प्रशासन विभाग
18	श्री अशोक रघुनाथ बारी	शिपाई	सामान्य प्रशासन विभाग
19	श्री सुधाकर काशिनाथ बावीसकर	शिपाई	सामान्य प्रशासन विभाग
20	श्री ललीत रविंद्र चंदनकर	शिपाई	सामान्य प्रशासन विभाग
21	श्री संजय सिताराम कुलकणी	शिपाई	सामान्य प्रशासन विभाग
22	श्रीमती स्मिता डिंगबर चौधरी	शिपाई	सामान्य प्रशासन विभाग
23	श्रीमती प्रतिभा नरेन्द् कोळी	शिपाई	सामान्य प्रशासन विभाग
24	कु अंजुम जमशेर तडवी	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
25	श्री भाउसाहेब दादाजी बागुल	लिपिक	सामान्य प्रशासन विभाग
26	श्री आशिष उखडू सुरडकर	सफाईकामगार	सामान्य प्रशासन विभाग

27	श्री सागर दामोदर सुरवाडे	सफाईकामगार	आरोग्य विभाग
28	श्रीमती गुंफाबाई विश्वानाथ गायकवाड	सफाईकामगार	आरोग्य विभाग
29	श्री राजेंद्र वसंत नाडे	सफाईकामगार	आरोग्य विभाग
30	श्री मनोज छन्नू भालेराव	सफाईकामगार	आरोग्य विभाग
31	सौ आशा पंडीत निधाणे	सफाईकामगार	आरोग्य विभाग
32	सौ रेखा मंगल गोडाले	गटारकामगार	आरोग्य विभाग
33	श्री अनिल काशिनाथ नाडे	गटारकामगार	आरोग्य विभाग
34	श्रीमती बिंदीया सुनिल दाभाडे	गटारकामगार	आरोग्य विभाग
35	श्री राजेश प्रभु बेडवाल	गटारकामगार	आरोग्य विभाग
36	श्री संतोष ईश्वर पवार	गटारकामगार	आरोग्य विभाग
37	सौ विमला राजु धवलपुरे	सफाईकामगार	आरोग्य विभाग
38	श्री दिपक बन्सी भालेराव	गटारकामगार	आरोग्य विभाग
39	श्री अमोल शामा कंडारे	सफाईकामगार	आरोग्य विभाग
40	श्री संतोष किशोर सोनवल	सफाईकामगार	आरोग्य विभाग
41	श्री डिंगबर यशवंत चौधरी	पिंजराकुली	आरोग्य विभाग
42	श्री दिलीप रतन जावळे	सफाईकामगार	आरोग्य विभाग
43	श्री हुकुमचंद मोतीलाल सारसर	सफाईकामगार	आरोग्य विभाग
44	श्री किशोर लक्ष्मण अटवाल	लिपिक	आरोग्य विभाग
45	श्री मंगलसिंग सुंदरलाल खरारे	सफाईकामगार	आरोग्य विभाग
46	श्री आनंदा लक्षमण तांबे	सफाईकामगार	आरोग्य विभाग

47	श्री दिपक अण्णा सोनवणे	सफाईकामगार	आरोग्य विभाग
48	श्री शरद बाबुराव माळी	शिपाई	आरोग्य विभाग
49	श्री सुधीर तुळशीराम महाजन	दिवाबत्ती नौकर	आरोग्य विभाग
50	श्री सतीष मोतीराम पाटील	पहारेकरी	आरोग्य विभाग
51	श्री मनोजकुमार रामचंद्र शर्मा	लिपिक	आरोग्य विभाग
52	श्री मोहम्मद रफीक मो. हनीफ	वाहनचालक	आरोग्य विभाग
53	श्री दिपक भुपेंद्र भावसार	स्वच्छक	आरोग्य विभाग
54	श्री धनराज पंढरीनाथ सपकाळे	कपोस्ट कामगार	आरोग्य विभाग
55	श्री कमलाकर तुकाराम बनसोडे		आरोग्य विभाग
56	श्री दतात्रय केशव मराठे	वाहनचालक	आरोग्य विभाग
57	श्री रविंद्र पुंडलिक सपकाळे	वाहनचालक	आरोग्य विभाग
58	श्री निळकंठ आत्माराम तायडे	वाहनचालक	आरोग्य विभाग
59	श्री संतोष पंडीत तायडे	वाहनचालक	आरोग्य विभाग
60	श्री वंसत ओकांर सुशिर	वाहनचालक	आरोग्य विभाग
61	श्री शरद गंभिर सोनवणे	वाहनचालक	आरोग्य विभाग
62	श्री सुरेश दला पाटील	वाहनचालक	आरोग्य विभाग
63	श्री नविनकुमार रविंद्रनाथ पवार	मॅकेनीक	पाणीपुरवठा विभाग
64	श्री जगतसिंग बाबुराव पाटील	लॅबअसिस्टट	पाणीपुरवठा विभाग
65	श्री ज्ञानेश्वर शेनफडू सुर्यवंशी	चौकीदार	पाणीपुरवठा विभाग
66	श्री अनिल राजाराम कोळी	व्हॉलमन / चौकीदार	पाणीपुरवठा विभाग

67	श्री अलताफखॉ मीरखॉ पठाण	व्हॉलमन / चौकीदार	पाणीपुरवठा विभाग
68	श्री शालीक सुकलाल अहिरे	हेल्पर / मजुर	पाणीपुरवठा विभाग
69	श्री रविंद्रआत्माराम पाटील	हेल्पर / मजुर	पाणीपुरवठा विभाग
70	श्री प्रधान रामा मुळीक	पंप ऑपरेटर	पाणीपुरवठा विभाग
71	श्री मोहन विलास भाकरे	हेल्पर / मजुर	पाणीपुरवठा विभाग
72	श्रीमती ज्योती विलास कापरे	व्हॉलमन / चौकीदार	पाणीपुरवठा विभाग
73	श्रीमती सरला लिलाधर तायडे	हेल्पर / मजुर	पाणीपुरवठा विभाग
74	श्री अशोक रामराव मोरे	फिटर	पाणीपुरवठा विभाग
75	श्री नरेंद्र भागवत गायकवाड	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
76	श्रीमती लक्ष्मी गबा हातागडे	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
77	श्री रविकुमार अशोक सनकत	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
78	श्रीमती बरखा जगदीश घेंगट	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
79	सौ मिना विनोद करोसीया	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
80	सौ वाराबाई रमेश सकट	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
81	श्रीमती प्रतिभा युवराज अहिरे	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
82	सौ नथाबाई संतोष सावळे	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
83	श्रीमती सिताबाई यशवंत आंबोरे	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
84	श्रीमती अनिता अनिल ठठोरे	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
85	श्री किरण सुरेश सोनवाल	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
86	श्री आनंद सुकलाल मरसाळे	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग

87	श्री राजु अशोक शिरसाठ	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
88	श्री आनंदा रतन खलसे	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
89	श्री शंकर धुडकू शिरसाठ	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
90	श्री भरत मांगिलाल बि-हाडे	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
91	श्री रमेश चंदु लोढे	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
92	सौ सुनिता संजय सनकत	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
93	श्री अरुण रामा अहिरे	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
94	श्रीमती बेबीबाई मधुकर लोंढे	सफाई कामगार	पाणीपुरवठा विभाग
95	श्री संजय काशीनाथ विसपुते	मजुर	पाणीपुरवठा विभाग
96	श्री हेमंत बळीराम सोनवणे	मजुर	पाणीपुरवठा विभाग
97	श्री उमाकांत सुर्यकांत सोनार	मजुर	पाणीपुरवठा विभाग
98	श्री परमेश्वर रघुनाथ सैदांणे	मजुर	पाणीपुरवठा विभाग
99	श्रीमती लक्ष्मीबाई अंबादास मोरे	मजुर	पाणीपुरवठा विभाग
100	श्री प्रदिप वाल्मीक निबांळकर	मजुर	पाणीपुरवठा विभाग
101	सौ कल्पना रविद्र मिस्तरी	मजुर	पाणीपुरवठा विभाग
102	श्रीमती पुष्पा सुरेश साळूंखे	मजुर	पाणीपुरवठा विभाग
103	श्री रामधन दौलत कुहीटे	मजुर / हेल्पर	पाणीपुरवठा विभाग
104	श्री रवि संभाजी निंबाळकर	मजुर / हेल्पर	पाणीपुरवठा विभाग
105	श्री अनिल बुधा सोनवणे	मजुर / हेल्पर	पाणीपुरवठा विभाग
106	श्री पंडीत रामा सोनवणे	मजुर / हेल्पर	पाणीपुरवठा विभाग

107	श्री संजय भास्कर इंगळे	मजुर / हेल्पर	पाणीपुरवठा विभाग
108	श्री सुनिल रतन पाटील	मजुर / हेल्पर	पाणीपुरवठा विभाग
109	श्री इंदल गिरधर कोळी	मजुर / हेल्पर	पाणीपुरवठा विभाग
110	श्री विजय भाउराव पाटील	मजुर / हेल्पर	पाणीपुरवठा विभाग
111	श्री शेखर गणेश सोनवणे	मजुर / हेल्पर	पाणीपुरवठा विभाग
112	श्री गणेश शामराव सपकाळे	मजुर / हेल्पर	पाणीपुरवठा विभाग
113	श्री त्रंबक शांताराम तावडे	लिपिक	पाणीपुरवठा विभाग
114	श्री कैलास गिरधर सपकाळे	कुली	पाणीपुरवठा विभाग
115	श्रीमती मंगला दिपक जगताप	कुली	पाणीपुरवठा विभाग
116	श्री किशोर आत्माराम सोनवणे	कुली	पाणीपुरवठा विभाग
117	श्री ज्ञानेश्वर उत्तम पाटील	कुली	पाणीपुरवठा विभाग
118	श्रीमती उषाबाई अरुण सपकाळे	कुली	पाणीपुरवठा विभाग
119	श्री संजय जयसिंग राजपुत	कुली	पाणीपुरवठा विभाग
120	श्री. शौकत अली सैययद मोहममद	कुली	पाणीपुरवठा विभाग
121	श्री प्रमोद नामदेव आटाळे	फिटर	पाणीपुरवठा विभाग
122	सौ विजया पांडूरंग हाटकर	लिपिक	पाणीपुरवठा विभाग
123	श्री अशोक बंडू म्हस्के	मोकादम	पाणीपुरवठा विभाग
124	श्री शिवाजी रामा मुळीक	नाकेदार / चौकीदार	पाणीपुरवठा विभाग
125	श्री रविंद्र सुरेश जाधव	लिपिक	पाणीपुरवठा विभाग
126	श्रीमती संगिता भागवत ठाकरे	लिपिक मिटर रिडर	पाणीपुरवठा विभाग

127	श्री किशोर भिवसन विसावे	लिपिक मिटर रिडर	पाणीपुरवठा विभाग
128	श्री दिपक पंढरीनाथ सपकाळे	लिपिक	पाणीपुरवठा विभाग
129	श्री चंद्रशेखर अरुण पिथळे	इन्सटुमेट मॅकेनिक	पाणीपुरवठा विभाग
130	श्री भिकन गोपीचंद वाणी	लिपिक	पाणीपुरवठा विभाग
131	श्री सत्यनारायण मदनलाल तिवारी	पंपअटेडंट	पाणीपुरवठा विभाग
132	श्री मोतीलाल भाउलाल चौधरी	पंपअटेडंट	पाणीपुरवठा विभाग
133	श्री नागेश्वर एकनाथ लोखंडे	आरोग्य निरीक्षक	पाणीपुरवठा विभाग
134	श्री त्रंबक उत्तमराव कुलकर्णी	नाकेदार	जकात विभाग
135	श्री वंसत सुपडू सपकाळे	लिपिक	जकात विभाग
136	श्री मनोज बद्रि गोयर	नाकेदार	जकात विभाग
137	श्री अब्बदुल वहाब मो. असलम	मोकादम	जकात विभाग
138	श्री रविंद्र कमलाकर मुळे	नाकेदार	जकात विभाग
139	श्री संजय हरी पाटील	नाकेदार	जकात विभाग
140	श्री मनोज गंगाकिशन पांडे	चौकीदार	जकात विभाग
141	श्री शेख फहिम अहमद शेख मुख्तार	कुली/मजुर	जकात विभाग
142	श्री सोनवणे पंडीत सुका	झाडे संरक्षक	जकात विभाग
143	सौ प्रमिला वासुदेव पवार	आया	आरोग्य विभाग
144	श्री सुनिल रामदास पाटील	वॉर्डबॉय	आरोग्य विभाग
145	श्री संतोष मोहन गवळी	वॉर्डबॉय	आरोग्य विभाग
146	श्री सुबोध देविदास तायडे	लिपिक	आरोग्य विभाग

147	श्री संजय मनोहर दाभाडे	लिपिक	आरोग्य विभाग
148	श्री नसरुल्ला अब्दुल्ला शाह	औष्धनिर्माता	आरोग्य विभाग
149	श्री दिपक सुकलाल अहिरे	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	आरोग्य विभाग
150	सौ उर्मिला उमाकांत भिरुड	मिडवाईफ	आरोग्य विभाग
151	सौ सोनाली यशवंत खरे	मिडवाईफ	आरोग्य विभाग
152	सौ शोभा राजकुमार कोगदे	परिचारिका	आरोग्य विभाग
153	सौ गायत्री भाउराव पाटील	परिचारिका	आरोग्य विभाग
154	सौ सरला मधुकर शिंदे	परिचारिका	आरोग्य विभाग
155	सौ मिना किरण हिवाळे	परिचारिका	आरोग्य विभाग
156	श्री प्रसाद प्रभाकर पुराणीक	बिल्डींग इनस्पेक्टर	सार्वजनिक बांधकाम विभाग
157	श्री चंद्रकांत सोमा सोनगिरे	बिल्डींग इनस्पेक्टर	सार्वजनिक बांधकाम विभाग
158	श्री समिर शशिकांत बोरोले	सर्व्हेअर	सार्वजनिक बांधकाम विभाग
159	श्री विजय पांडूरंग मराठे	सर्व्हेअर	आरोग्य विभाग
160	श्री गौरव वसंत सपकाळे	लिपिक	आरोग्य विभाग
161	श्री उल्हास रामदास इंगळे	आरोग्य निरीक्षक	आरोग्य विभाग
162	श्री प्रविण चिंतामण पाटील	लिपिक	आरोग्य विभाग
163	श्री संजय दिनकर पाटील	कनिष्ठ अभियंता	सार्वजनिक बांधकाम विभाग
164	श्री उदय मधुकर पाटील	कनिष्ठ अभियंता	सार्वजनिक बांधकाम विभाग
165	श्री संजय शामराव पाटील	कनिष्ठ अभियंता	सार्वजनिक बांधकाम विभाग

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, 1998 मधील नियम 5 नुसार भविष्य निर्वाह निधी वर्गणीदाराचे नामनिर्देशन घेण्यात येवून ते सेवापुस्तकामध्ये जोडणे आवश्यक असतांना कोणत्याही कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीचे नामनिर्देशन घेण्यात आलेले नाहीत.

02) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 नियम 116 (14) नुसार विहीत नमुन्यातील कुटूंब प्रमाणपत्र कर्मचा-यांच्या सेवापुस्तकामध्ये जोडण्यात आलेले नाही.

03) सेवानिवृत्ती उपदानासाठी आवश्यक असलेले नामनिर्देशन कर्मचा-यांच्या सेवापुस्तकामध्ये जोडण्यात आलेले नाही.

04) सेवेत दाखल होताना कर्मचा-याचे स्वग्राम व जिल्हा घोषित केल्याचे प्रमाणपत्र कर्मचा-यांच्या सेवापुस्तकामध्ये जोडण्यात आलेले नाही.

05) सेवापुस्तकातील पहिल्या पानावरील अनुक्रमांक 1 ते 11 या नोंदी अदयावत करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र दुस-या पानावर कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी यांनी नोंदविणे आवश्यक असतांना काही कर्मचा-यांच्या नोंदी अपुर्ण आहेत.

06) महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 नुसार शासकिय कर्मचा-याकडून लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन घेवून ते सेवापुस्तकामध्ये जोडणे आवश्यक असतांना असे प्रतिज्ञापन सेवापुस्तकामध्ये जोडलेले नाही.

07) महानगरपालिका कर्मचा-याचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण होण्याआधी सामान्य प्रशासन विभागाच्या शासननिर्णय क्रमांक परिवी -2715/प्र.क. 302/आठ दिनांक 29/02/2016 नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

08) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 मधील नियम क्रमांक 11(1) व (2) नुसार शासन सेवेत प्रवेश करणेपुर्वी कर्मचारी संबंधीत पदावर कार्य करण्यास सक्षम आहे किंवा नाही याबाबतचे प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकाच्या 6 महिन्याच्या आत प्राप्त करणे आवश्यक आहे. काही कर्मचारी यांचे वैदयकिय तपासणी अहवाल मुळसेवापुस्तकात जोडलेले नाहीत.

09) सेवापुस्तक तयार केल्यानंतर दुय्यम सेवापुस्तक कर्मचा-यास देण्यात येवून सेवापुस्तक मिळाल्याची नोंद सेवापुस्तकामध्ये घेण्यात आलेली नाही.

10) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक सेनिवे 1007/62/सेवा-4 दिनांक 04.01.2008 तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक स्थाप्रप-1414/(प्र.क्र.73/14)/13-अ दिनांक 11/09/2014 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झालेल्या कर्मचा-यांच्या स्थायित्व प्रमाणपत्राची नोंदी सेवापुस्तकामध्ये घेण्यात आलेल्या नाहीत.

11) सेवापुस्तकात 6व्या वेतन आयोगानुसारची वेतनवाढ नमूद करतांना ग्रेड पे नमूद करण्यात आलेला नाही.

12) वेतनवाढीसमोर अ.क्र.8 येथे कर्मचा-याची स्वाक्षरी घेण्यात येत नाही.

13) शासन निर्णय क्रमांक व्हीसीए-1082/1681/सी.आर.-40/16-अ, मंत्रालय,मुंबई दिनांक 27.04.1982 शासन सेवेत नियुक्तीच्यावेळी कर्मचा-याची चारित्र्य पडताळणी करण्यात येवून त्याबाबतचे प्रमाणपत्र सेवापुस्तकामध्ये जोडण्यात आलेले नाही.

14) मुळ सेवापुस्तकाच्या पहिल्या पानावर कर्मचारी यांचा भविष्य निर्वाह निधी क्रमांक अथवा नविन परिभाषित अंशदान निवत्तीवेतन योजनेचा क्रमांक (DCPS NO) नमुद करण्यात आलेला नाही.

15) सर्व कर्मचारी यांच्या मुळसेवापुस्तकात 5 वे 6 व्या वेतन आयोगानुसारची जो फरक संबधीत कर्मचारी यांना अदा करण्यात आला त्याचे विवरणत्र मुळसेवापुस्तकासोबत जोडण्यात आलेले नाही.

16) कर्मचारी यांच्या शैक्षणीक कागदपत्र व इतर कागदपत्रांची छायाकिंत प्रती मुळ सेवापुस्तकात ठेवण्यात आलेल्या नाही.

वरीलप्रमाणे नोंदीच्या अपूर्णतेमुळे कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण/कुटुंब सेवा निवृत्ती प्रकरण तयार करतांना अडचणी निर्माण होऊन संबंधितांना त्याबाबतचे लाभ मिळण्यास विलंब होऊ शकतो. तसेच विलंबामुळे संबंधितांनी व्याजाची मागणी केल्यास महानगरपालिकेचे नुकसान होऊ शकते. तरी महानगरपालिकेमध्ये कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे सेवापुस्तकामध्ये वरीलप्रमाणे नोंदी अद्यावत करण्यात याव्यात.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 34 दिनांक 22/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 19, Hmm No : 34)

151 कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे वयाची 50 / 55 वर्षे अथवा 30 वर्षे सेवा झाले नंतर कर्मचा-याची पात्रता तपासणी होत नसलेबाबत

योजना	:	**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	: महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत 165 अधिकारी व कर्मचारी यांचे मुळसेवापुस्तकांची तपासणी करण्यात आली असता महानगरपालिकेतून महानगरपालिका अधिकारी/ कर्मचारी यांचे वयाच्या 50/55 व्या वर्षाच्या पलीकडे किंवा त्यांची

अर्हताकारी सेवा 30 वर्षे पुर्ण झाल्यानंतर त्यांची सेवा शासन सेवेत पुढे चालू ठेवण्याची पात्रता आजमावण्यासाठी त्यांचे गोपनीय अहवाल, सचोटी व शारिरीक क्षमता या विहित केलेल्या निकषांच्या आधारे त्यांचे प्रकरणाचे पुनर्विलोकन करण्यासाठी महानगरपालिकेने कोणतीही कार्यवाही केलेली आहे किंवा नाही तसेच तशा नोंदी अधिकारी / कर्मचारी यांच्या मुळ सेवापुस्तकात आढळून आलेले नाही.

त्या अनुषंगाने लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) प्रधान सचिव(सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अर्ध शासकीय पत्र क्रमांक : विपुस-1098/प्र.क्र.20/98/15 दिनांक 07.02.1998 तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरसी-1082/952/15 दिनांक 01.09.1983, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-1085/1029/43/15 दिनांक 12.05.1986, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरसी-1085/1029/43/15 दिनांक 01.04.1989, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरसी-1085/1029/43/15 दिनांक 24.02.1993, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक विपुस 1096/प्र.क्र.128/96/15 दिनांक 29.11.1996, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक विपुस-1002/प्र.क्र.148/2002/15 दिनांक 22.09.2003 अन्वये महानगरपालिकेने अधिकारी/ कर्मचारी यांचे वयाच्या 50/55 व्या वर्षाच्या पलीकडे किंवा त्यांची अर्हताकारी सेवा 30 वर्षे पुर्ण झाल्यानंतर त्यांची सेवा शासन सेवेत पुढे चालू ठेवण्याची पात्रापात्रता आजमावण्यासाठी त्यांचे गोपनीय अहवाल, सचोटी व शारिरीक क्षमता या विहित केलेल्या निकषांच्या आधारे त्यांचे प्रकरणाचे पुनर्विलोकन करुन सुयोग्य व कार्यक्षम/ अधिकारी कर्मचा-यांना महानगरपालिका सेवेत पुढे चालू ठेवावे व अकार्यक्षम तसेच संशयास्पद सचोटी असणा-या अधिकारी/ कर्मचा-यांना शासन सेवेतून मुदतपूर्व सेवेतून सेवानिवृत्त करावे असे शासन धोरण असतांना सन 2016-2017 व 2017-2018 या वर्षात अशा प्रकारची काही कार्यवाही केलेली आहे किंवा कसे या बाबतचा खुलासा सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे नियमानुसार कार्यवाही करण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येते, परिणामी अपात्र ठरु शकणारे कर्मचारीही सेवेत कार्यरत राहिल्यामुळे महानगरपालिकेच्या कामकाजावर विपरित परिणाम होऊ शकतो.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 35 दिनांक 22/08/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 20, Hmm No : 35)

152 निलंबित कर्मचा-यांचे निर्वाह भत्ता अदा करतांना झालेली अनियमित्ते बाबत

योजना	:	**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	: महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखा विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. जळगाव शहर महानगरपालिकेच्या सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही आर्थिक वर्षातील निलंबित कर्मचाऱ्यांचे निर्वाह भत्यांच्या देयकांचे लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितताबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

01) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, 1981 मधील नियम 69 मध्ये कर्मचारी निलंबाधीन असताना शासकिय येणे रक्कमा निर्वाह भत्यामधून वसुल करण्यासंबंधी नियम नमूद आहेत. नियम 69(2) (अ) मध्ये सक्तीच्या वजाती संबंधी तरतुदी असून नियम69(2)(ब) मध्ये वैकल्पिक वजाती कर्मचाऱ्याच्या लेखी संमतीने करता येवू शकतात. परंतु नियम69(2)(क) इतर कपाती मध्ये निर्वाह भत्त्यामधून करता येणार नाहीत अशा वजाती असून त्यामध्ये (एक) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची वर्गणी, (दोन) न्यायालयीन जप्तीसंबंधातील देय रक्कमा, (तीन) शासकिय कर्मचारी जबाबदार असेल अशा शासकिय नुकसानीची वसुली संबंधीच्या रक्कमा नमूद आहेत. परंतु निर्वाह वेतन देयकाचे लेखापरिक्षण केला असता निर्वाहभत्ता देयकातुन भ.नि.नि वर्गणीची रक्कमा कपात करण्यात आलेली आहे परंतु कर्मचारी यांची संमती असल्याबाबतचे कोणतेही पत्र निर्वाहभत्ता या देयका सोबत नाही.

02) माहे फेब्रुवारी 2017 पेड मार्च 2017 या निर्वाहभत्ता देयकांतुन काही कर्मचारी यांना निर्वाहभत्ता अदा करतांना व्यवसायकर 300 या प्रमाणे कपात करण्याऐवजी 200 या प्रमाणे कपात करण्यात आलेला आहे.

03) सुनिल भगवान सारवान, सफाईकामगार हा दिनांक 26/02/2016 रोजी निलंबीत करण्यात आले असुन त्या कर्मचारीस निर्वाहभत्ता अदा करणेकामी जा.क्र./आस्था/51/2017 दिनांक 06/04/2017 रोजी मा. उपायुक्त यांच्या आदेशान्वये 14 महिन्यानंतर उशीराने निर्वाहभत्ता अदा करण्याचा आदेश करण्यात आला असुन मार्च 2016 ते डिंसेबर 2016 या 10 महिन्याचे निर्वाहभत्ता फेब्रुवारी 2017 मध्ये विलंबाने अदा करण्यात आला.

04) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, 1981 मधील नियम 69 नुसार कर्मचारी हा जर निलंबनाधिन असतांना निलंबनकाळात नोकरीवर नसल्याचे व मुख्यालयी वास्तव्यास असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतू निर्वाहभता देयका सोबत कोणतेही प्रमाणपत्र जोडण्यात आलेले नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 228 दिनांक 10/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 56, Hmm No : 228)

153 विवीध विभागातील रोख रक्कम हाताळणारे कर्मचारी यांचे क्षतिपुर्ती बंधपत्राबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0		**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड		**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिका लेखा शाखेचे सन 2016-17 व 2017-18 चे लेखापरीक्षण प्रगतीत असुन, महानगरपालिकेने लेखा परीक्षण कालावधीत विवीध विभागात रोख रक्कम हाताळणारे रोखपाल व भांडारपाल यांचे मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 51 नुसार पदनिहाय निश्चित केलेली रक्कमेचा व दोन प्रतिष्ठीत

व्यक्तींच्या स्वाक्षरीसह जामीन कदबा घेणे (क्षतिपुर्ती बंधपत्रे) आवश्यक आहे. महानगरपालिकेमध्ये विवीध विभागामध्ये मोठया प्रमाणांत रककमा स्विकारल्या जात असतांत अशा रक्कमा स्विकारणारे कर्मचारी अधिकारी यांचे वरील नियमानुसार जामीन कदबे (क्षतिपुर्ती बंधपत्रे) घेण्यांत आलेले नसल्याचे निर्दशनास येते तरी वरील नियमानुसार कर्मचाऱ्याकडून क्षतीपुर्ती बंधपत्रे घेण्यात यावीत.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 210 दिनांक 04/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATSHBM6701 (Ref No : 150, Hmm No : 210)

154 किरकोळ वसुली विभागमध्ये आढळून आलेली अनियमितता

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण आले. जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-18 चे लेखापरिक्षण केले असता किरकोळ वसुली विभागाचे लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) जळगाव मनपा कडून व्हिल टॅक्स/चाककर आकारणी जळगाव नगरपालिका असलेपासून प्रत्येक वर्षाकरिता रुपये 105/- प्रत्येक हातगाडीकडून करण्यात येत असून रुपये 105/- पैकी रुपये 25/- नंबर प्लेट चार्ज व रुपये 85/- ही वार्षिक कराची रक्कम आहे. महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासून म्हणजे सन 2003 पासून सदर दरांमध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पनातही वाढ झालेली नाही.

02) जळगाव महानगरपालिकेने तीन मजली मटन मार्केट बांधलेले असून सन 2012-13 मध्ये एक वर्षाकरिता लिलाव करण्यात आलेला होता तथापी तेथील एकुण 62 ओटयापैकी 32 ओटयांचा लिलाव झाले तदनंतर आजपावेतो लिलावात कोणीही भाग न घेतल्यामुळे प्रत्येक वर्षास 10% वाढीसह 32 ओटेधारकाकडून वसुली चालु आहे. आरोग्य विभागाकडून इतर ठिकाणी प्रती बोकड रुपये 20/- प्रमाणे आकारणी, तसेच मटन मार्केट व्यतिरिक्त इतर ठिकाणी असलेल्या मटनशॉप साठी आरोग्य विभागाकडून सशुल्क परवानगी देण्यात येत असल्याने महानगरपालिकेने खर्च करुन बांधलेले मटन मार्केट ओस पडले आहे. यापुर्वी आरोग्य विभागातून मटन मार्केट लिलाव, आणि इतर वसुली होत असतांना किरकोळ वसुली विभागातून लिलाव करण्याचे प्रयोजन काय? तसेच आरोग्य विभाग इतर ठिकाणच्या मटन शॉपला परवानगी देत असल्याने मटन मार्केट बांधणे व सोयी सुविधा पुरविण याकरिता झालेला खर्च निष्फळ झालेला आहे.

03) जळगांव मनपा हद्दीतील सर्व्हेअर व इंजिनिअर यांना परवाना नगररचना विभागाकडून देण्यात येत असतांना त्याची पावती किरकोळ वसुली विभागात करण्याचे प्रयोजन काय? नगररचना विभागात विविध परवानग्या

संदर्भातील शुल्क वसुली करण्यात येत असतांना परवाना शुल्क वसुली किरकोळ विभागात करण्यात येत आहे.

04) जाहिरात करांचे दर हे फार जुने असुन 1 रुपये स्वेअरफुट इतका आहे. त्यात आजपावेतो वाढ करण्यात आलेला नाही . सदर दरांमध्ये वाढ करण्यात आलेली नसल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्येही उचित वाढ झालेली नाही, परिणामी महानगरपालिकेचे नुकसान होत आलेले आहे.

05) घरकुलातील रहिवासी यांना जो दरमहा सेवाशुल्क आकरण्यात येतो ते सेवाशुल्काचे दर महानगरपालिका ठराव क्रमांक 88 दिनांक 11/04/2001 पासुन 5 रुपये प्रती दिवस इतका असुन त्यात आजपावेतो वाढ करण्यात आलेला नाही.सदर दरांमध्ये वाढ करण्यात आलेली नसल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्येही उचित वाढ झालेली नाही, परिणामी महानगरपालिकेचे नुकसान होत आलेले आहे.

06) किरकोळ वसुली विभागाचे लेखापरीक्षण करतांना बहिनाबाई उदयान येथील 18x18 मीटर जागा भाडेतत्वावर 9 वर्षाच्या कराराने देण्यात आलेली आहे. सदरच्या जागा भाडयाचे आदेश, करारनामा संचिका व जमा पावत्याची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमितता बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

अ) स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 1231 दिनांक 19/07/2013 तसेच दिनांक 23/01/2014 रोजी मा. आयुक्त यांच्या मान्यतेने सौ. शारदा कमलाकर खडके,रा. 204, विठ्ठल पेठ, जळगाव यांना बहिणाबाई उदयान येथील मोकळी 18x18 चौरस मीटर जागा दर 3 वर्षानी 30% भाडेवाढीसह 9 वर्षाच्या कराराने दिनांक 01/02/2014 पासून भाडेतत्वावर देण्यात आलेली असून त्याकरिता वार्षिक भाडे रुपये 1,32,861/- इतके ठरविण्यात आलेले आहे. सदर जागा भाडे करारनामा दिनांक 29/01/2014 रोजी करण्यात आलेला असून करारनाम्यातील अट क्रमांक 5 मध्ये तसेच आदेशामध्ये सदर जागेचे नियमानुसार होणारे तीमाही कर व फी आगाऊ भरणा करणे आवश्यक असतांना सौ.शारदा कमलाकर खडके यांनी लेखापरिक्षणाच्या कालावधीत आगाऊ भाडे भरणा केलेला नसुन करारनाम्यातील अट क्रमांक 5 चे उल्लंघन केलेले आहे, त्यामुळे महानगरपालिकेला अपेक्षित उत्पन्न विहित मुदतीत प्राप्त झालेले नाही, तसेच याबाबत विभागामार्फत संबंधितांना कोणतीही नोटीस दिलेली नसल्याचे दिसून येते.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 48 दिनांक 01/09/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 22, Hmm No : 48)

155 अपंगासाठी किमान 3% तरतूद असताना सन 2016-2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षात खर्च न केल्याबाबतची अनियमितता

योजना	:	**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	: महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017 - 2018 या आर्थिक वर्षाचे महीला व बालकल्याण विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. जळगाव शहर महानगरपालिका क्षेत्रात सन 2016-2017 व 2017-2018 या वर्षात शासन परिपत्रक, नगरविकास विभाग, क्र.संकीर्ण-2010/प्र.क्र.146/2010, दिनांक 30/10/2010 व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2015/प्र.क्र.118/नवि-20, दिनांक 28/10/2015 अन्वये अपंग व्यकतीसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या 3% निधी नागरी भागातील अपंगांसाठी खर्च करण्याकरिता मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच महीला व बालकल्याण विभाग, महानगरपालिका, जळगांव या विभागाने सन 2016-2017 या आर्थिक वर्षातील सुधारीत अंदाजपत्रकात 2,00,00,000/- व सन 2017-2018 या आर्थिक वर्षातील सुधारीत अंदाजपत्रकात 21,47,716/- इत्यादी रक्कमेची तरतुद करण्यात आलेली होती. परंतु अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी व विकासासाठी वरील शासन निर्णया मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे उपयुक्त योजना प्रभावीरित्या राबविण्यात आलेली दिसुन येत नाही.

अ.क्र.	तपशील	सन 2016 -2017 व 2017-2018 मधील प्रत्यक्ष खर्च
1	अपंगांच्या शालेय शिक्षण / उच्च शिक्षण / खेळांडूकरीता (जिल्हास्तर/ राज्यस्तर/ राष्टीयस्तर/ आंतरराष्टीयस्तर) शिष्यवुत्ती देण्यात यावी	निरंक
2	उत्पनाच्या अटीवर घरकुलांसाठी अर्थसहाय्य देणे.	निरंक
3	अपंगांच्या मागणीनुसार त्यांना उदारनिर्वाह /व्यवसाय / साहित्य खरेदी करण्याकरीता निधी थेट लाभर्थ्याच्या बॅक खातयात (NEFT/RTGS द्वारे) जमा करावा.	निरंक
4	अपंगांना वैदयकीय खर्चाकरीता निधी उपलब्ध करावा.	निंरक
5	नागरी वाहतुक व्यवस्थेमध्ये अपंगांकरीता प्रवासात सवलत देणे व याकरीता होणा-या तोटयाची भरपाई करणे.	निरंक
6	शॉपींग मॉल, मंडया, इत्यादी मध्ये अपंगांना स्टॉल उभारण्याकरीता अर्थ सहाय्य करणे.	निरंक
7	महत्वाच्या स्थानिक बस स्टॉप / डेपोमध्ये व्हिलचेअर उपलब्ध करणे	निरंक
8	सार्वजनिक वाचनालयामध्ये अंध व्यक्तीकरीता ऑडिओ लायब्ररी निर्माण करणे	निरंक
9	महानगरपालिका / नगरपालिकेच्या शाळांमध्ये अपंग विदयार्थ्याकरीता सोयीसुविधा उपलब्ध करणे.	निरंक
10	अपंगांच्या क्रिडा, चित्रकला, हस्तकला इ स्पधा आयोजीत करणे	निरंक

11	अपंगांकरीता व्यायाम शाळा उभारणे	निरंक
12	अपंगांकरीता बचत गटांना अर्थ सहाय्य करणे.	निरंक
13	अपंगाच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे.	निरंक
14	अपंगाकरिता वेगळे भुवन / रात्र निवारा उभारणे	निरंक
15	अपंगाना पेन्शन योजना सुरु करणे	निरंक
16	अपंग बेरोजगारांना भत्ता देणे.	निरंक
17	अपंगांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणा-या योजनांचा प्रचार / प्रसार करणे	निरंक
18	उपरोक्त व्यतिरिक्त तिथल्या स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या महत्वाकांक्षी योजना अंमलात आणणे.	निरंक

वर नमुद अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी व विकासासाठी उपयुक्त योजना प्रभावीरित्या राबविण्यात न आल्याने अपंगांच्या सक्षमीकरणाचा उद्देश सफल झालेला नाही. तसेच शासन निर्णयाचे पालन करण्यांत आले नाही. याबाबतचा खुलासा लेखापरिक्षणास सादर करण्यात आला नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 111 दिनांक 18/12/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 33, Hmm No : 111)

156 महिला व बाल विकासासाठी किमान5% तरतुद असतांना सन2016-2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षात उपयुक्त योजना प्रभावीरित्या न राबविल्यामुळे खर्च न केल्याबाबतची अनियमितता

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017 - 2018 या आर्थिक वर्षाचे महीला व बालकल्याण विभागा लेखापरीक्षण करण्यात आले आहे. . जळगाव शहर महानगरपालिका क्षेत्रात सन 2016-2017 व 2017-2018 या वर्षात महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2005 / प्र.क्र. 255 / 05 / नवि ndash; 20 मंत्रालय, मुंबई दिनांक 8/11/2010 अन्वये महिला व बाल विकासासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या 5% निधी नागरी भागातील महिला व बाल कल्याणासाठी खालील योजना राबविण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

अ.क्र.	तपशील	सन 2016 -2017 व 2017-2018 मधील प्रत्यक्ष खर्च

1	ज्या ठिकाणी अंगणवाडी इमारती भाडयाने आहेत किंवा अयोग्य सार्वजनिक इमारतीमध्ये भरत आहे. त्यासाठी अंगणवाडी केंद्राची इमारत बांधून यामध्ये ICDS योजनेसाठी रु.1/- दरमहा नाममात्र भाडयावर उपलब्ध करुन देणे.	निरंक
2	अंगणवाडी केंद्रातीती मुलांकरीता आवश्यक शैक्षणिक / शैक्षणिक साहित्य खरेदी करणे	निरंक
3	पिण्याच्या पाण्याची व्यवस्था निर्माण करणे व शौचालय बांधकाम करणे.	निरंक
4	0-3 वर्षाच्या मुलांकरीता Creche किंवा Day Care center बांधणे व क्रियान्वित करणे तसेच पाळणाघर चालविणा-या अशासकीय संस्थांना अर्थसहाय्य करणे.	निंरक
5	गरोदर महिलांसाठी तसेच शालेय विदयार्थी व अंगणवाडी विदयार्थी यांची वैदयकीय तपासणी व औषधांपचार करणे	निरंक
6	महिलांसाठी प्रसुतीगुह बांधणे अथवा श्रेणीवाढ करणे अथवा विस्तारीकरण करणे	निरंक
7	मुलींना / महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे.	निरंक
8	काम करणा-या महिलांसाठी वसतिगुह बांधणे	निरंक
9	शिकणा-या मुलींसाठी वसतिगुह बांधणे	निरंक
10	महिंलासाठी समुपदेशक केंद्र चालविणे helpline चालविणे विधी सल्ला केंद्र चालविणे इ.	निरंक
11	BPL खालील मुलींची शाळा गळतीचे प्रमाणे थांबविण्याबाबत प्रोत्साहनपर दैनिक उपस्थितीत भत्ता देणे.	निरंक
12	मुलींच्या सार्वजनिक शाळेत विविध क्रीडा सुविधा निमाण करणे	निरंक

वरील योजना प्रभावीपणे न राबविल्यामुळे महिला व बालकल्याणाच्या सक्षमीकरणाचा उद्देश सफल झालेला नाही व शासन निर्देशांचे पालन करण्यात येत नाही. तसेच या बाबतचा खुलासा लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 112 दिनांक 18/12/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 34, Hmm No : 112)

157 महानगरपालिका जळगाव क्षेत्रात महिला व बाल विकासासाठी उपयुक्त योजना प्रभावीरित्या न राबविल्याबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या दोन आर्थिक वर्षाचे महीला व बालकल्याण विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, यांचेकडील पत्र क्र.बालवि-2011/प्र.क्र.85/का.8, दिनांक 30 मार्च, 2011 नुसार, 74 व्या घटना दुरुस्तीनुसार समाजातील दुर्बल घटकांच्या हिताचे संरक्षण करणे व विशेषत: गरीब व निराश्रीत महिला व बालकांचे संरक्षण व पुनर्वसन करणे हे नागरी स्वराज्य संस्थेचे कर्तव्य आहे. परंतु जळगाव शहर महानगरपालिकेमार्फत सन 2016-2017 व 2017-2018 या दोन आर्थिक वर्षात दुर्बल घटकांसाठी उदा.बाल कामगार, बाल भिक्षेकरी, रस्त्यावरील मुले, झोपडपट्टीत राहणा-या गरीब महीला व किशोरवयीन मुली यांचे पुर्नवसन, प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या कोणत्याही प्रभावी योजना राबविलेल्या नाहीत.

तसेच महीला व बालकल्याण विभाग, महानगरपालिका, जळगांव या विभागाने सन 2016-2017 या आर्थिक वर्षातील सुधारीत अंदाजपत्रकात 2,00,00,000/- व सन 2017-2018 या आर्थिक वर्षातील सुधारीत अंदाजपत्रकात 21,47,716/- इत्यादी रक्कमेची तरतुद करण्यात आलेली होती. परंतु महीला व बालकांच्या विकासाकरीता वरील पत्रातील तरतुदीनुसार खालील प्रमाणे उपयुक्त योजना प्रभावीपणे राबविण्यात आलेल्या दिसुन येत नाही. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे ndash;

अ.क्र.	तपशील	सन 2016 -2017 व 2017-2018 साठीची तरतूद	सन 2016 -2017 व 2017-2018 मधील प्रत्यक्ष खर्च
1	बाल कामगारांची सुटका करणे, त्यांना बालकल्याण समितीसमोर हजर करणे त्यांना विविध बालगृहात प्रवेश देऊन त्यांचे पुनर्वसन करणे. हे करताना धोकादायक (Hazardous) उदयोगात काम करणा-या,बाल कामगारांचा प्राधान्याने बचाव (Rescue) करणे.	तरतूद नाही.	निरंक
2	बाल भिक्षेक-यांना पोलिसांच्या मदतीने बालकल्याण समितीसमोर हजर करणे. त्यांना बाल संस्थामध्ये प्रवेश देऊन त्यांचे पुनर्वसन करणे.	तरतूद नाही	निरंक
3	रस्त्यावरील मुले व घरातून पळून आलेली मुले (Street Childern) यांच्यासाठी रात्रीचे निवारे, विशेष शाळांची व्यवस्था करणे व यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेणे .	तरतूद नाही	निरंक
4	झोपडपट्टीत राहणा-या गरीब महीलांना तसेच 16 वर्षावरील मुलींना विविध प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण देणे. यासाठी आवश्यक प्रशिक्षण शुल्क भरणे किंवा विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे. उदा.संगणक प्रशिक्षण, ब्युटीपार्लर,	तरतूद नाही	निंरक

	कॅटरिंग, बेंकिंग, घरकाम, फिजिओथेरपी, लहान मुलांची व वृध्दांची काळजी, लघुटंकलेखन टायपिंग, स्वागतकार, सेल्सगर्ल इ.		
5	महिलांना संरक्षण देण्यासाठी त्यांना समुपदेशन करणे व यासाठी स्वयंसेवी संस्था, MSW महाविदयालये इ. च्या मदतीने, मोफत समुपदेशन केंद्रे सुरु करणे. या केंद्राप्रमाणे कौटुंबिक हिंसाचार (Domestice Violence Act), कामाच्या ठिकाणी लैगिक शोषण (Sexual Harrasment at workplace) रोखणे, महिलांसाठी हेल्प लाईन्स, FIR दाखल करण्याची पध्दत. इ. बाबत महिलांना प्रशिक्षण व कौटुंबिक सल्ला देणे.	तरतूद नाही.	निरंक
6	स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने सर्व गरजू मुलांना अंगणवाडीत प्रवेश देण्याची मोहिम राबवणे व विशेषत: स्थलांतरीत बांधकाम मजूर (Migratory Construction Workers) यांच्या मुलांना अंगणवाडयात प्रवेश देऊन त्यांना शासकीय सेवेचा लाभ देणे. याशिवाय 0 ते 3 वयोगटातील मुलांच्या मातांना स्तनपान व लहान मुलांची काळजी या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.	तरतूद नाही.	निरंक

वरील योजना प्रभावीपणे न राबविल्यामुळे महिला व बालकल्याणाच्या सक्षमीकरणाचा उद्देश सफल झालेला नाही या बाबतचा खुलासा लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 113 दिनांक 18/12/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 35, Hmm No : 113)

158 महानगर पालिका जळगाव महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत बालवाडी मधील विदयार्थाना पुरविण्यात येणा-या पोषण आहाराची देयके, शिक्षक व मदतनीस यांचे मानधनाची देयके व इतर देयकांची तपासणी केली असता त्यात आढळून आलेली वित्तीय अनियमितते बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या दोन आर्थिक वर्षाचे महीला व बालकल्याण विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. जळगाव शहर महानगरपालिका महीला व बालकल्याण विभाग अंतर्गत मनपा बालवाडीतील विदयार्थ्योकरिता पोषण आहार, शिक्षक व मदतनिस यांचे मानधनाचे देयकांचे लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

अ) पोषण आहाराची देयके :-

सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही वर्षातील काही निवडक महिन्यातील पोषण आहाराची देयके तपासली त्याचा तपशील खालील प्रमाणे

अ.नं.	प्रमाणक क्रमांक व दिनांक	पुरवठादाराचे नाव	प्रमाणक रक्कम
1	3159/2016-2017 दि. 10/3/2017	गुलाब महिला बचत गट ऑक्टोबर 2016 चे देयक	79611/-
2	3160/2016-2017 दि. 10/3/2017	गुलाब महिला बचत गट नोव्हेबर 2016 चे देयक	50636/-
3	927/2017-18 दि.11/07/2017	लोकशाही महिला गृहउदयोग एप्रिल 2017 15 दिवसांचे	39893/-
4	928/2017-18 दि.11/07/2017	लोकशाही महिला गृहउदयोग मार्च 2017	107956/-
5	2846-A/2017-18 दि.15/1/2018	लोकशाही महिला गृहउदयोग फेबुवारी 2017	103471/-
6	2847/2017-18 दि.15/1/2018	लोकशाही महिला गृहउदयोग जुलै 2017	112136/-
7	2848/2017-18 दि.15/1/2018	लोकशाही महिला गृहउदयोग ऑगस्ट 2017	98065/-
8	2849/2017-18 दि.15/1/2018	लोकशाही महिला गृहउदयोग सप्टेबर 2017	89013/-

मनपा बालवाडीतील विदयार्थ्योकरिता पोषण आहार देयकांचे लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाकस 2014 /प्र.क्र. 82 /भाग III / उदयोग 4 मंत्रालय, मुंबई दिनांक 30/10/2015 व दिनांक 01/12/2016 शासननिर्णय प्रकरण 3 मधील 3.3.2 नुसार पुनर्पत्ययी आदेश फक्त एकदाच देण्यातयेईल आणि त्याचे मुल्य आणि संख्या सुरवातीच्या आदेशाच्या 50% किंवा रु.10 कोटी यापैकी जे कमी असेल त्यापर्यन्त देता येईल असे निर्देश आहेत. त्यानुसार सन 2016-17 व 2017-18 मध्ये अनुक्रमे 2015-16 व 2016-17 चे आदेश मुदतवाढ मंजुर करतांना सहा महिने कालावधीचे आदेश देणे आवश्यक असतांना जादा कालावधीत पुरवठा होऊन रक्कमा प्रदान करण्यात आलेल्या असल्याचे निर्दशनास येते. त्यामुळे शासन नियमांचे पालन झालेले

नाही.

02) बालवाडी मधील विदयार्थाना पुरविण्यात येणा-या पोषण आहारचा दर ईनिविदा प्रक्रियानुसार सन 2016-2017 मध्ये प्रति दिन प्रति लाभार्थी आहाराचा दर हा रु. 3.90/- व सन 2017-2018 मध्ये प्रति दिन प्रति लाभार्थी आहाराचा दर हा रु.3.20/- इतका मंजूर करण्यात आलेला आहे. परंतु सन 2017-18 या वर्षाची ईनिविदा प्रकिया ही उशिराने राबविल्याने माहे एप्रिल 2017 ते ऑक्टोबर 2017 या कालावधीत प्रति दिन प्रति लाभार्थी आहाराचा दर हा रु. 3.20/- ऐवजी सन 2016-2017 चा दर रु.3.90/-इतका अदा करण्यात आलेला असुन प्रति दिन प्रति लाभार्थी आहाराचा दर रु.0.70/- या प्रमाणे अतिरिक्त रक्कम प्रदान करण्यात आलेला आहे. त्यामुळे महानगरपालिका जळगाव यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबाबत माहे एप्रिल 2017 ते ऑक्टोबर 2017 मधील देयकांच्या फरकाची रक्कम परिगणीत करण्यात येऊन त्याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी व वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

03) वर नमुद पोषण आहाराची देयके तपासली असता मुळ देयके (Orginal) ऐवजी छायाकिंत प्रती (Zerox copy) आढळून आलेली आहेत. त्यामुळे दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

04) नगर पालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 166 अन्वये सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही वर्षातील देयकावर पेड ॲण्ड कॅन्सलचा (Paid and cancled) शिक्का मारण्यात आलेला नाही. त्यामुळे सदरची देयके पुन्हा खर्च करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

05) सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही वर्षातील बालवाडी खाऊचा रिपोर्ट यांची छायाकिंत प्रती (Zerox copy) लावण्यात आलेल्या आहेत . तसेच त्या छायाकिंत प्रती (Zerox copy) रिपोर्टवरुन पोषण आहाराची देयके तयार करण्यात आलेली आहे. परंतु रिपोर्टवर कोणत्याही जबाबदार अधिकारी अथवा कर्मचारी यांची सही आढळून आलेली नाही. त्यामुळे सदरची देयके योग्य आहे किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

06) सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही वर्षातील देयके हे मा उपआयुक्त यांच्या सहीने पारित करण्यात आलेले आहे. तसेच कार्यालयीन टिपणीवर सुध्दा फक्त मा उपआयुक्त यांची सही आहे. मा आयुक्त यांची मंजुरी नाही. तरी मा उपआयुक्तांना सदरची देयक मंजुर करण्याचे अधिकार आहे किंवा कसे याबाबतचा लेखी खुलासा लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

07) करारनाम्यातील अट व शर्ती क्रमांक 2 नुसार पोषण आहाराचे नमुने पंधरवाडयातून एकदा अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी करुन घेवून तपासणीचा अहवाल या महानगरपालिकेस सादर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील व करारनाम्यातील अट व शर्ती क्रमांक 15 नुसार कार्यालयातील बालवाडयांना आहार पुरविले बाबत अन्न व औषण निरीक्षण कार्यालयाकडून दर्जा बाबतचा अहवाल व बील सादर केल्यानंतरच त्यांची रक्कम बॅकेतील आपल्या बचत खात्यात जमा केले जाईल असे नमुद असताना सन 2016-2017 व 2017-2018 मधील संबधीत पुरवठादारास अदा करण्यात आलेल्या देयकांची तपासणी केली असता पुरवठादाराकडून अन्नाच्या

तपासणीचा अहवाल फक्त माहे एप्रिल 2016, जानेवारी 2017 व फेबुवारी 2017 याच महिन्याचे सादर केले असुन उर्वरीत महिन्याचे अहवाल संबधीत अभिलेख नस्तीमध्ये उपलब्ध नाही तरी देखील संबधीत पुरवठादार यांना रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तसेच पुरविण्यात आलेला आहार हा योग्य आहे किंवा कसे याबाबत त्याचे लेखापरिक्षण पडताळणी करता आली नाही तसेच त्या बाबतचा लेखी खुलासाही लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

ब) शिक्षक व मदतनीस यांचे मानधनाची देयके :-

सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही वर्षातील निवडक महिन्यातील मानधनाची देयके तपासली त्यांचा तपाशील खालील प्रमाणे

अ.नं.	प्रमाणक क्रमांक व दिनांक	पुरवठादाराचे नाव	प्रमाणक रक्कम
1	2501/2016-2017 दि. 03/1/2017	प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ ऑक्टोबर 2016 चे देयक	79611/-
2	2938/2016-2017 दि. 10/2/2017	प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ डिंसेबर 2016 चे देयक	81096/-
3	2844/2017-18 दि. 15/01/2018	प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ नोव्हेंबर 2017 चे देयक	123583/-
4	3152/2017-18 दि. 08/02/2018	प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ डिंसेबर 2017 चे देयक	122904/-
5	3476/2017-18 दि.13/03/2018	प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ जानेवारी 2018 चे देयक	128710/-

शिक्षक व मदतनिस यांचे मानधनाचे देयकांचे लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) वर नमुद शिक्षक व मदतनीस यांचे मानधानाची देयके तपासली असता हजेरी पट देयकासोबत लावण्यात आलेले नाही. तरी देयकाची रक्कम कोणत्या आधारे निश्चित केली त्याचे लेखापरिक्षण पडताळणी करता येत नाही.

02) सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही वर्षातील मानधनाची देयकाची रक्कम प्रशासन अधिकारी शिक्षणमंडळ मनपा जळगाव यांचे नावे अदा करण्यात आलेली आहे. तरी उपरोक्त रक्कम संबधीतांना म्हणजे शिक्षक व मदतनीस यांना कश्या प्रकारे अदा केली त्या बाबतचे तपशील आढळून आलेले नाही.

03) उपरोक्त देयकांसोबत मंजुर कार्यालयीन टिपणी सोबत जोडण्यात आलेली आहे परंतु त्या कार्यालयीन टिपणीत फक्त रक्कम नमुद करण्यात आलेली आहे त्या शिक्षक व मदतनीस यांचे नाव हजर दिवस व प्रती दिवस /प्रती महिना दर व रक्कम यांचा उल्लेख करण्यात आलेला नाही.त्यामुळे अदा करण्यात आलेल्या रकमेच्या परिगणनेबाबत अचूकता पडताळणी करता आली नाही व परिणामी जादा रक्कम अदा झालेली असल्याचे शक्यता नाकारता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 127 दिनांक 03/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 37, Hmm No : 127)

159 मलेरिया विभाग मालपुस्तक नोंदवही मधील औषधी शिल्लक साठा जीवशास्त्रनागरी हिवताप योजना यांनी तपासणी न करणे बाबत व इतर आक्षेपाबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे मलेरिया विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. मलेरिया विभाग औषधी माल पुस्तक नोद्वाही नमुना क्रमांक 116 तपसणी केली असता खालील सन 2016-2017 या आर्थिक वर्षाच्या औषधी साठा तसेच इतर साधनसामग्री शिल्लक दिसून आला आहे तो खालील प्रमाणे.

अनुक्रमांक	औषधाचे नाव	पान क्रमांक	सुरवातीची शिल्लक लिटर/नग	खरेदी	वापर	वर्षा अखेर शिल्लक लिटर/नग
1	अवेट	145	343 लिटर	---	313 लिटर	30 लिटर
2	बी. टी. आय लिक्विड	158	50 लिटर	600 लिटर	240 लिटर	410 लिटर
3	पायरेथ्रर्म	171	32 लिटर	---	32 लिटर	---
4	डेल्टा मिलीथ्रीन	176	11 लीटर	---	11 लीटर	---
5	सायपनोस्थ्रीन	182	--	50 लिटर	15 लिटर	35 लिटर
6	पायरीप्रोक्सीकेन	207	---	100 किलो	45 किलो	55 किलो

7	स्पे पंप शासन नेपसके पंप	184	119 नग	---	----	119 नग
8	स्पे पंप मनपा नेपसके पंप	186	44 नग	----	----	44 नग
9	रिकामे ड्रम	187	103 नग	----	----	103 नग
10	फोगिग मशीन	189	19 नग	06 नग	08 नग	25 नग
11	गप्पी मासे जाळे	191	02 नग	----	----	02 नग

मलेरिया विभाग औषधी माल पुस्तक नोद्वाही नमुना क्रमांक 116 तपसणी केली असता खालील सन 2017-2018 या आर्थिक वर्षाच्या औषधी साठा तसेच इतर साधनसामग्री शिल्लक दिसून आला आहे. तो खालील प्रमाणे

अनुक्रमांक	औषधाचे नाव	पान क्रमांक	सुरवातीची शिल्लक लिटर/नग	खरेदी	वापर	वर्षा अखेर शिल्लक लिटर/नग
1	अवेट	03	30 लिटर	300 लिटर	240 लिटर	90 लिटर
2	बी. टी. आय लिक्विड	12	410 लिटर	---	410 लिटर	---
3	पायरेथ्रर्म	---	---	---	---	---
4	डेल्टा मिलीथ्रीन	---	---	---	---	---
5	सायपनोस्थ्रीन	20	35 लिटर	100 लिटर	67 लिटर	68 लिटर
6	पायरीप्रोक्सीकेन	25	55 किलो	----	55 किलो	----
7	स्पे पंप शासन नेपसके पंप	29	119 नग	---	----	119 नग
8	स्पे पंप मनपा नेपसके पंप	30	44 नग	----	----	44 नग
9	रिकामे ड्रम	32	103 नग	----	----	103 नग
10	फोगिग मशीन	33	25 नग	08 नग	16 नग	24 नग
11	गप्पी मासे जाळे	34	02 नग	----	----	02 नग

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) माल पुस्तक नोदवहीस महाराष्ट्र नगर परिषद लेखा सहिता 2011 नियम 266 ते 269 प्रमाणे सक्षम अधिकारीने आर्थिक वर्ष संपल्या नंतर शिल्लक साठा तपासणी केलेला नाही व त्या बाबतचे प्रमाणपत्र तपासणी करून नोदविले नाही. तसेच प्रत्येक औषधीची व यंत्राची नोंद घेतांना खरेदीचा दिनांक व त्यांची मुळ किंमत नोंदविण्यात आलेली नाही त्यामुळे सदर औषधी व यंत्राचे वापर करणेबाबतची पडताळणी करता येत नसल्याचे लेखापरिक्षणाचे मत आहे.

02) अनुक्रमांक 1 ते 6 औषधी साठा 1 वर्षा जादा कालावधीचा शिल्लक असून मुदत बाह्य झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. मुदबाहय औषधी वापरल्यास नागरीकांचे व प्राण्यांचे आरोग्यास घातक ठरु शकते. तरी सदर औषधी साठा उपयोगात आणला नाही याबाबत विभागाने खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

03) स्प्रे पंप 119 नग शासनाचे व स्प्रे पंप नग 44 मनपाचे असे एकूण स्प्रे पंप पैकी नादुरुस्त शासनाचे 119 स्प्रे पंप व मनपाचे 04 नग नादुरुस्त स्पे पंप यांचे निर्लेखन करुन आलेली रक्कम मनपा खात्यात जमा केली नाही. त्यामुळे मनापाचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे लेखापरिक्षणाचे मत आहे. तरी या बाबत खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

04) रिकामे ड्रम 103 नग या बाबत योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली नाही. रिकामे ड्रम लिलावादारे विक्री केल्यास त्यामधुन मनपास काही प्रमाणात उत्पन्न प्राप्त होऊ शकते तरी या बाबत खुलासा सादर करण्यात आलेला नाही

05) सन 2016-17 मधील माल पुस्तक नोदवहीतील पान क्रमांक 189 वरील नोंदी नुसार एकूण 25 नग फॉगिग मशीन पैकी शासनाचे 5 नग व मनपाचे 12 नग असे एकूण 17 नग नादुरुस्त आहेत. 02 नग फॉगिग मशीन जुने व 06 नग नविन घेतलेले असे एकूण 08 नग फॉगिग मशीन सुरु आहेत.

तसेच सन 2017-2018 मधील माल पुस्तक नोदवहीतील पान क्रमांक 33 नुसार एकूण 24 नग फॉगिग मशीन पैकी शासनाचे 5 नग व मनपाचे 03 नग असे एकूण 10 नग नादुरुस्त आहेत. चालु स्थीतीत असेलेले 08 नग फॉगिग मशीन व 08 नग नविन घेतलेले असे एकूण 16 नग फॉगिग मशीन सुरु आहेत अशी नोंद आढळून आलेली आहे.

तर सन 2016-17 मधील नोंदी नुसार मार्च 2017 अखेर एकूण 25 नग फॉगिग मशीन असुन सन 2017-18 मध्ये नविन 08 नग फॉगिग मशीन घेतल्याने एकूण फॉगिग मशीनची संख्या 33 असणे आवश्यक असतांना मार्च 2018 अखेर 24 फॉगिग मशीन शिल्लक असल्याचे दर्शविण्यात आलेले आहे यास्तव 09 नादुरुस्त फॉगिग मशीनची नोंदी आढळून आलेल्या नाही. त्याबाबत खुलासा लेखापरिक्षणास सादर करण्यात आला नाही. तसेच नादुरुस्त फॉगिग मशीनची दुरुस्ती करण्यात आली अथवा निर्लेखनाची कार्यवाही करण्यात आली या बाबत लेखापरिक्षणास खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

06) गप्पी मासे जाळी 02 नग नादुरुस्त अशी नोंद नोंदवहिमध्ये दिसून येते तरी याबाबत दुरुस्तीची किंवा निर्लेखनाची

कार्यवाही बाबत लेखापरिक्षणास खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 135 दिनांक 08/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 38, Hmm No : 135)

160 भविष्य निर्वाह निधी शिल्लकेचे विवरणपत्र कर्मचाऱ्यांना पाठवून पोहोच न घेतल्याबाबतची अनियमितता

योजना :		**लेखाशीर्ष** : 0		**वसुलपात्र** :	0.00/-
निधी :	महानगरपालिका स्व- निधी	**कलम** : 9ड		**अंतिम अमान्य** :	0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षाचे महानगर पालिका जळगाव यांच्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी शिल्लकेचे विवरणपत्र यांचे लेखापरिक्षण करण्यात आले असुन लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

महानगर पालिका जळगाव यांच्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या दरमहा वेतनातुन भविष्य निर्वाह निधी वर्गणीची रक्कम तसेच कर्जाच्या हप्याची रक्कम कपात करण्यात येत असते व त्याबाबतचे कर्मचारी निहाय भविष्य निर्वाह निधीचे विवरणपत्रमहाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ठ 5 (ख) नुसार लेखाप्रमुख यांनी प्रत्येक आर्थिक वर्षाचे भविष्य निर्वाह निधी खात्याचे विवरणपत्र प्रत्येक कर्मचाऱ्याला पाठवील अशी तरतूद आहे.

परंतु जळगाव शहर महानगरपालिकेने सन 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षात अधिकारी व कर्मचारी यांनी मागणी केली तरच भविष्य निर्वाह निधी शिल्लकेचे विवरणपत्र देवून पोहोच घेण्यात आलेली आहे. उर्वरित कर्मचारी यांना भविष्य निर्वाह निधी शिल्लकेचे विवरणपत्र देण्यात आलेले नाही. त्यामुळे वर्गणीदाराला भविष्य निर्वाह निधीच्या वार्षिक विवरणपत्रातील चुका समजून येत नाहीत व अचूकतेबद्दल शंका निर्माण होते.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ठ 5 (ख) नुसार आस्थापनेवरील प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांना भविष्य निर्वाह निधीच्या खात्याचे विवरणपत्र पाठविणे बंधनकारक आहे. परंतु नियमाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही असे लेखापरिक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 204 दिनांक 01/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 47, Hmm No : 204)

161 भविष्य निर्वाह निधीचे डेबुक, म.न.पा अधिकारी / कर्मचारी यांचे सन 2016-17 व 2017-2018 ची विवरणपत्रे, बृहतपत्रकव भ.नि.नि चे अंतिम प्रदानाची देयके, परतावा देयके व नापरतावा देयके यांच्या अनियमिततेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखा विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे.

जळगाव शहर महानगरपालिके चे सन 2016-2017 या आर्थिक वर्षात कर्मचा-याचे वेतनातून भविष्य निर्वाह निधीच्या कपातीच्या रक्कमा भ.नि.नि खात्यावर जमा करणेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

देय महीना	प्रत्यक्षात कपात केलेली रक्कम	प्रत्यक्ष भरणा दिनांक	प्रत्यक्ष कपात केलेली रक्कम व प्रत्यक्ष खात्यात जमा करण्यात आलेली रक्कम यातील फरक
मार्च 2016	भ.नि.नि रक्कम कपातीचे विवरणपत्र सादर करण्यात आलेली नाही.	----	----
एप्रिल 2016	3722265	रक्कम भ.नि.नि खात्यात जमा करण्यात आलेल्या नाहीत.	---
मे 2016	3668725	रक्कम भ.नि.नि खात्यात जमा करण्यात आलेल्या नाहीत.	---
जून 2016	3564325	रक्कम भ.नि.नि खात्यात जमा करण्यात आलेल्या नाहीत.	----
जुलै 2016	3593730	रक्कम भ.नि.नि खात्यात जमा करण्यात आलेल्या नाहीत.	---

ऑगस्ट 2016	3512875	रक्कम भ.नि.नि खात्यात जमा करण्यात आलेल्या नाहीत.	----
सप्टेंबर 2016	3476675	3482475 दिनांक 16/11/2016	रक्कम रु.5800/- जादा जमा केली
ऑक्टोबर 2016	3447575	3453375 दिनांक 25/11/2016	रक्कम रु.5800/- जादा जमा केली
नोव्हेंबर 2016	3429125	3422825 दिनांक 30/12/2016	रक्कम रु.6300/-कमी जमा केली
डिसेंबर 2016	3456475	3451175 दिनांक 18/02/2017	रक्कम रु.5300/-कमी जमा केली
जानेवारी 2017	3472025	3467225 दिनांक 03/04/2017	रक्कम रु.4800/-कमी जमा केली
फेब्रुवारी 2017	3466325	3460025 दिनांक 12/04/2017	रक्कम रु.6300/-कमी जमा केली

जळगाव शहर महानगरपालिकेचे सन 2017-2018 च्या आर्थिक वर्षात कर्मचा-याचे वेतनातून भविष्य निर्वाह निधीच्या कपातीच्या रक्कम भ.नि.नि खात्यावर जमा करणेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

देय महीना	प्रत्यक्षात कपात केलेली रक्कम	प्रत्यक्ष भरणा दिनांक	प्रत्यक्ष कपात केलेली रक्कम व प्रत्यक्ष खात्यात जमा करण्यात आलेली रक्कम यातील फरक
मार्च 2017	3527325	3535025 दिनांक 09/05/2017	रक्कम रु.7700/- जादा जमा केली
एप्रिल 2017	3508625	3516325 दिनांक 03/07/2017	रक्कम रु.7700/- जादा जमा केली
मे 201	3441825	3468375 दिनांक 29/08/2017	रक्कम रु.26550/- जादा जमा केली
जून 2017	3371585	3400335 दिनांक 12/09/2017	रक्कम रु.28750/- जादा जमा केली
जुलै 2017	3365075	3378825 दिनांक 13/12/2017	रक्कम रु.13750/- जादा जमा केली

ऑगस्ट 2017	3473455	उपरोक्त रक्कम माहे मार्च 2018 पावेतो भ.नि.नि खात्यात जमा करण्यात आलेल्या नाहीत.	--
सप्टेंबर 2017	3524402	उपरोक्त रक्कम माहे मार्च 2018 पावेतो भ.नि.नि खात्यात जमा करण्यात आलेल्या नाहीत.	--
ऑक्टोबर 2017	3493175	उपरोक्त रक्कम माहे मार्च 2018 पावेतो भ.नि.नि खात्यात जमा करण्यात आलेल्या नाहीत.	--
नोव्हेंबर 2017	3451825	उपरोक्त रक्कम माहे मार्च 2018 पावेतो भ.नि.नि खात्यात जमा करण्यात आलेल्या नाहीत.	--
डिसेंबर 2017	3353250	उपरोक्त रक्कम माहे मार्च 2018 पावेतो भ.नि.नि खात्यात जमा करण्यात आलेल्या नाहीत..	--
जानेवारी 2018	3451722	उपरोक्त रक्कम माहे मार्च 2018 पावेतो भ.नि.नि खात्यात जमा करण्यात आलेल्या नाहीत.	--
फेब्रुवारी 2018	सन 2018-19 मध्ये रक्कम कपात करण्यात आलेली आहे.	-----	--

जळगाव शहर महानगरपालिकेच्या सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही आर्थिक वर्षातील महानगरपालिका

जळगाव यांच्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या दरमहा वेतनातुन भविष्य निर्वाह निधीच्या कपात केलेल्या रक्कमा म.न.पा. चे भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा केल्याबाबतचे सन 2016-17 व 2017-18 या दोन्ही वर्षाचे डेबुक, कर्मचारीनिहाय भ.नि.नि. चेविवरणपत्र व भ.नि.निचे अंतिम प्रदानाची देयके, परतावा, नापरतावा देयके इत्यादी बाबींचे लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

अ) भविष्य निर्वाह निधीचे डेबुक :-

01) माहे एप्रिल 2016 तेऑगस्ट 2016 या कालावधीच्या भविष्य निर्वाह निधीच्या कपात केलेल्या रक्कमा म.न.पा. चे भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा करण्यात आलेली नाही. तरी सदरच्या रक्कम जमा केले किंवा कसे या बाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास मागणी करुनही उपलब्ध झाले नाही.

02) माहे सप्टेबर 2016 तेजुलै 2017 या कालावधीचे कर्मचारी यांच्या वेतनातुन प्रत्यक्ष कपात केलेली रक्कम व प्रत्यक्ष म.न.पा यांच्या भ.नि.नि. खात्यात जमा करण्यात आलेली रक्कम या काही महिन्यात कमी तर काही महिन्यात जादा रक्कम जमा करण्यात आलेली आहे. त्यामुळे कर्मचारी तसेच महानगरपालिका, जळगांव यांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे लेखापरिक्षणाचे मत आहे.

03) माहे ऑगस्ट 2017 ते मार्च 2018 पावेतोच्या भ.नि.निच्या कपात करण्यात आलेल्या रक्कमा माहे 31/03/2018 पावतो म.न.पा. च्या भ.नि.निधीच्या खात्यात जमा करण्यात आलेली नाही. त्यामुळे कर्मचारी तसेच महानगरपालिका, जळगांव यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे लेखापरिक्षणाचे मत आहे.

04) भविष्य निर्वाह निधीच्या दरमहा कपातीची रक्कमा उशीराने म.न.पा यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा होत असल्याने महानगरपालिकेस सदरच्या रक्कमा गुंतवणुक करता येत नसुन उपरोक्त रक्कम गुंतवणुक करुन त्यावर मिळणारी व्याजाच्या रक्कमेचेही नुकसान होतआहे. त्यामुळे सदर योजनेचा मूळ उद्देश साध्य होऊ शकत नाही असे लेखापरिक्षणाचे मत आहे.

ब) भविष्य निर्वाह निधीचे कर्मचारी यांचे सन 2016-17 व 2017-18 ची विवरणपत्रे (परिशिष्ट 5 नियम 466 (5) नमुना 98) :-

01) सन 2016-17 व 2017-18 या दोन वर्षाची कर्मचारी निहाय भ.नि.नि. चे विवरणपत्राचे खाते क्रमांक 1 ते 1650, 1651 ते 2450 , 2451 ते 2975 व 2976 ते 3625 इत्यादी रजिस्टरची तपासणी केली असता चारही रजिस्टरमध्ये प्रत्येक कर्मचारी यांच्या सन 2016-17 व 2017-2018 या लेख्या खाली प्रमुख लेखापाल यांची सही घेण्यात आलेली नाही.

02) सन 2016-17 व 2017-18 या कालावधीत जे कर्मचारी सेवानिवृत्त, मयत अथवा स्वेच्छानिवृत्ती घेतली असेल यांचे अंतिम प्रदान करण्यात आलेले आहे त्याच कर्मचारी यांच्या लेख्याखाली प्रमुखलेखापाल यांची सहि आहे. यावरुन

असे स्पष्ट होते की अंतिम प्रदानाच्या वेळीच लेख्याची तपासणी करण्यात येत असते.

03) प्रत्येक कर्मचारी यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली रक्कम व त्यावर दिले जाणारे व्याज याची तपासणी केली जात नाही . त्यामुळे कर्मचारी यांचे भ.नि.निधीचे विवरणपत्र बरोबरआहे याबाबत शंका निर्माण होत आहे. तसेच तपासणी न केल्याने कर्मचारी यांचे तसेच महानगरपालिका जळगाव यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे लेखापरिक्षणाचे मत आहे.

क) भविष्य निर्वाह निधीचे कर्मचारी यांचे सन 2016-17 व 2017-2018 ची नमुना 116 मधील बृहतपत्रक :-

01) जळगाव शहर महानगरपालिकेच्या सन 2016-2017 व 2017- 2018 या दोन्ही आर्थिक वर्षातील महानगरपालिका जळगाव यांच्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या दरमहा वेतनातुन भविष्य निर्वाह निधीची वर्गणीची रक्कम तसेच कर्जाच्या हप्याची रक्कम कपात करण्यात येत असते. व त्याबाबतचे कर्मचारी निहाय भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदारांकरीता महानगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नमुना क्रमांक 99 मध्ये बृहतपत्रक लिखित स्वरुपात ठेवण्यात येतील अशी तरतूद आहे. परंतु कर्मचारी निहाय भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदारांकरीता नमुना क्रमांक 99 मध्ये बृहतपत्रक लिखित स्वरुपात ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे कर्मचारी निहाय भविष्य निर्वाह निधी तपशीला बाबत लेखापिक्षणात पडताळणी करता आली नाही.

ड) भ.नि.नि.चे अंतिम प्रदानाची देयके, परतावा देयके व नापरतावा देयके :-

01) सन 2016-17 व 2017-2018 या कालावधीची भ.नि.नि.चे अंतिम प्रदानाची देयके, परतावा देयके व नापरतावा देयके तपासली असता कोणत्याही देयकासोबत कर्मचारी यांचे भ.नि.निधीचे मागील 3 वर्षाचे विवरणपत्र जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे कर्मचारी यांच्या शिल्लक रक्कमेची पडताळणी करता आली नाही. तसेच शिल्लक रक्कमेवरुन संबधीत कर्मचारी यास नियमाप्रमाणे रक्कम मंजुर करुन अदा करण्यात आली आहे याची सुध्दा पडताळणी करता आलेली नाही.

02) सन 2016-17 व 2017-2018 या कालावधीची भ.नि.नि.चे अंतिम प्रदानाची देयके, परतावा देयके व नापरतावा देयके तपासली असता रक्कम प्रदान करणेबाबत आयुक्तांचे आदेश आढळून आलेले नाही. तसेच कार्यालयीन टिपणी तयार करुन त्यावर मा.उपायुक्त यांची मंजुरी घेण्यात आलेली असुन त्या मंजुरी नुसार रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 205 दिनांक 01/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

162 नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना(DCPS) संदर्भात डेबुक, बृहतपत्रक व विवरणपत्र यांचे लेखापरिक्षण करतांना आढळून आलेले अनियमितते बाबत

योजना	:	**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	: महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखा विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे

नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन येाजनेनुसार (DCPS) महानगर पालिकेच्या सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो / 1005 / 126 / सेवा-4, दिनांक 31/10/2005 व शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो 1006/87/सेवा 4 दिनांक12/01/2007 नुसार दिनांक 01 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आलेली आहे. उपरोक्त शासन निर्णयातील अ.क्र. 5 (ब) नुसार कर्मचारी सेवेत नियुक्त होताच त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु करावी. त्यानुसार उपलब्ध केलेल्या माहितीच्या आधारे दिनांक 01/11/2005 नंतर नियुक्त झालेल्या कर्मचारी / अधिकारी यांना सदरची योजना लागु करण्यात आलेली आहे. नविन अंशदान परिभाषित निवृत्ती येाजनेनुसार (DCPS) सन 2016-2017 या वर्षामध्ये 517 इतकी व सन 2017-2018 मध्ये एकूण 525 इतकी वर्गणीदारांची संख्या आहे.

जळगाव शहर महानगरपालिकेच्या सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही आर्थिक वर्षातील नवीन परिभाषित अंशदान (DCPS) योजनेचे डेबुक, नवीन परिभाषीत अंशदान योजनेची (DCPS) वर्गणी रक्कम तसेच महानगरपालिके मार्फत जमा करण्यात येणारी नवीन परिभाषित अंशदान (DCPS) योजनेची रक्कम इत्यादीचे **लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितताबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.**

अ) नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन येाजना (DCPS) निधीचे डेबुक :-

जळगाव शहर महानगरपालिकेचे सन 2016-2017 च्या आर्थिक वर्षात कर्मचा-याचे वेतनातून नवीन परिभाषित अंशदान (DCPS) निधीच्या वर्गणी कपातीच्या रक्कमा व महानगरपालिका यांच्या हिस्याची रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यावर जमा करणेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

देय महीना	वेतनातुन प्रत्यक्षात कपात केलेली कर्मचारी हिस्सा रक्कम	नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन (DCPS) खात्यावर प्रत्यक्ष भरणा केल्याचा दिनांक व रक्कम

मार्च 2016	850539/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
एप्रिल 2016	841280/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
मे 2016	834087/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
जून 2016	841789/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
जुलै 2016	849246/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
ऑगस्ट 2016	859206/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
सप्टेंबर 2016	881122/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
ऑक्टोबर 2016	878521/-	दिनांक 25/11/2016 रोजी रक्कम रु.878521/- व म.न.पा हिस्सा रक्कम रु.878521/- असे एकूण रक्कम रु.17,57,042/- जमा केली असे.
नोव्हेंबर 2016	871169/-	दिनांक 30/12/2016 रोजी रक्कम रु.871169/- व म.न.पा हिस्सा रक्कम रु.871169/- असे एकूण रक्कम रु.17,42,338/- जमा केली असे.

डिसेंबर 2016	878149/-	दिनांक 20/02/2017 रोजी रक्कम रु.878149/- व म.न.पा हिस्सा रक्कम रु.878149/- असे एकूण रक्कम रु.17,56,298/- जमा केली असे
जानेवारी 2017	884733/-	दिनांक 03/04/2017 रोजी रक्कम रु.884733/- व म.न.पा हिस्सा रक्कम रु.884733/- असे एकूण रक्कम रु.17,69,466/- जमा केली असे
फेब्रुवारी 2017	884807/-	दिनांक 17/04/2017 रोजी रक्कम रु.884707/- व म.न.पा हिस्सा रक्कम रु.884707/- असे एकूण रक्कम रु.17,69,614/- जमा केली असे

जळगाव शहर महानगरपालिकेचे सन 2017-2018 च्या आर्थिक वर्षात कर्मचा-याचे वेतनातून नवीन परिभाषित अंशदान (DCPS) निधीच्या वर्गणी कपातीच्या रक्कमा महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यावर जमा करणेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

देय महीना	वेतनातुन प्रत्यक्षात कपात केलेली कर्मचारी हिस्सा रक्कम	नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन (DCPS) खात्यावर प्रत्यक्ष भरणा केल्याचा दिनांक व रक्कम
मार्च 2017	895929/-	दिनांक 12/05/2017 रोजी रक्कम रु.895929/- व म.न.पा हिस्सा रक्कम रु.895929/- असे एकूण रक्कम 17,91,858/- जमा केली असे
एप्रिल 2017	921723/-	दिनांक 11/09/2017 रोजी रक्कम रु.921723/- व म.न.पा हिस्सा रक्कम रु.921723/- असे एकूण रक्कम 18,43,446/- जमा केली असे
मे 2017	941059/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
जून 2017	946682/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
जुलै 2017	959551/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही

ऑगस्ट 2017	938781/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
सप्टेंबर 2017	1007415/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
ऑक्टोबर 2017	977435/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
नोव्हेंबर 2017	996529/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
डिसेंबर 2017	1003921/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
जानेवारी 2018	998348/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही
फेब्रुवारी 2018	1014426/-	नवीन परिभाषित अंशदान (DCPS) रक्कम महानगरपालिकेच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) खात्यात लेखापरिक्षण कालावधीत जमा करण्यात आलेले नाही

01) माहे मार्च 2016 ते ऑक्टोबर 2016 व एप्रिल 2017 ते फेब्रुवारी 2018 या कालावधीच्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन (DCPS) कपात केलेल्या रक्कमा म.न.पा. चे नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन (DCPS) निधीच्या खात्यात जमा करण्यात आलेले दिसुन येत नाही.

02) माहे मार्च 2016 ते ऑक्टोबर 2016 पावेतोच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) कपात करण्यात आलेल्या रक्कमा माहे 31/03/2017 पावतो व माहे एप्रिल 2017 ते फेब्रुवारी 2018 पावेतोच्या नवीन परिभाषित अंशदान (DCPS) कपात करण्यात आलेल्या रक्कमा माहे 31/03/2017 पावतो म.न.पा. च्या नवीन परिभाषित अंशदान

(DCPS) खात्यात जमा करण्यात आलेली नाही. त्यामुळे कर्मचारी तसेच महानगरपालिका, जळगांव यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे लेखापरिक्षणाचे मत आहे.

ब) नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) कर्मचारी यांचे सन 2016-17 व 2017-18 ची विवरणपत्रे:-

01) नविन अंशदान परिभाषित निवृत्ती येाजनेनुसार(DCPS) महानगर पालिकेच्या सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो/1005/126/सेवा-4, दिनांक 31/10/2005 व शासन निर्णय दिनांक 12/01/2007 नुसार त्यांच्या मुळ वेतन व महागाई भत्यावर 10% व मनपा हिस्सा 10% याप्रमाणे अंशदान निवृत्त वेतन कपात करणे आवश्यक असून याप्रमाणे येणारी रक्कम व त्यावर शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलल्या शासन निर्णयांनुसार तसेच अधिसुचनांनुसार त्या त्या वेळी निश्चित केलेल्या व्याज दरानुसार परिगणना करुन कर्मचा-याच्या दरमहा खात्यात जमा करणे आवश्यक आहे. परंतु त्या संदर्भातील अधिकारी व कर्मचारी यांचे सुरवाती पासुन ते लेखापरिक्षणाच्या कालावधी पावेतो स्वतंत्र अभिलेखे तयार करण्यात आली नाहीत. ते पूर्ण करुन अदयायावत करणे आवश्यक आहे.

02) नविन अंशदान परिभाषित निवृत्ती (DCPS) येाजनेनुसार प्रत्येक कर्मचारीनिहाय स्वतंत्र विवरणपत्रे तयार करण्यात न आल्यामुळे प्रत्येक कर्मचारी यांना यांच्या खात्यात वेतनातुन किती रक्कम कपात करुन जमा करण्यात आलेली आहे. तसेच महानगरपालिकेने त्यांच्या हिस्यामधुन किती रक्क्म खात्यात जमा केली आहे. तसेच दोन्ही रक्कमांवर किती टक्के व्याजाची आकारणी करण्यात आलेली आहे. या बाबत काहीच माहिती उपलब्ध नाही त्यामुळे संबधीत कर्मचारी यांचे तसेच महानगरपालिका जळगाव यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे लेखापरिक्षणाचे मत आहे.

क) नवीन परिभाषित अंशदान निवृत्तवेतन योजना(DCPS) कर्मचारी यांचे सन 2016-17 व 2017-2018 ची बृहतपत्रक :

01) जळगाव शहर महानगरपालिकेच्या सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही आर्थिक वर्षातील महानगर पालिका जळगाव यांच्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या दरमहा वेतनातुन नविन अंशदान परिभाषित निवृत्ती (DCPS) निधीची वर्गणीची रक्कम कपात करण्यात येत असते. व त्याबाबतचे कर्मचारी निहाय बृहतपत्रक लिखित स्वरुपात ठेवण्यात येत असतात. परंतु कर्मचारी निहाय नविन अंशदान परिभाषित निवृत्ती (DCPS) निधीच्या वर्गणीदारांकरीता बृहतपत्रक लिखित स्वरुपात ठेवण्यात आलेले नाही.

ड) महानगरपालिका जळगाव यांचे नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) या खात्यातील रक्कमेची गुंतवणुकी बाबत :-

01) नवीन परिभाषित अंशदान निवृत्तवेतन (DCPS) या योजनेच्या खात्यामध्ये मोठ्या प्रमाणात रकमा

गुंतवणूकीअभावी शिल्लक पडून आहेत. तसेच ज्या रकमा गुंतवणूक करण्यात आलेल्या आहेत त्यांवरील व्याजाचे दर हे अत्यंत कमी प्रमाणात असल्याचे दिसून येते. गुंतवणुक केलेल्या रक्कमांवर मिळणारे व्याज व नवीन परिभाषित अंशदान निवृत्तवेतन (DCPS) या योजनेनुसार कर्मचारी यांच्या रक्कमेवर देण्यात येणारे व्याज यात तफावत अथवा कमी व्याज मिळत असल्यास महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरिता रक्कम गुंतवणुक करतांना जास्त कालावधी करीता रक्कम गुंतवणूक केल्यास व्याजदर अधिक मिळेल तसेच आवश्यकता विचारात घेऊन काही रक्कम अल्प /मध्यम कालावधीकरीता गुंतवणुक करणे व उर्वरीत रक्कम दिर्घ कालावधी करीता गुंतवणूक करणे शक्य होऊ शकेल असे लेखापरिक्षणाचे मत आहे, जेणेकरुन योजनेच्या निधीमध्ये आवश्यक निधीची गरज पूर्ण होऊ शकेल

इ) नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना(DCPS)या खात्यातुन रक्कमेचे अंतिम प्रदान करण्यात आलेली देयके :-

जळगाव शहर महानगरपालिकेच्या सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही आर्थिक वर्षात नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) या खात्यातुन कर्मचारी अथवा कर्मचारी यांच्या वारसास रक्कमेच अंतिम प्रदान करण्यात आले असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे

अ.क्र.	कर्मचारी यांचे नाव व हुददा	**अंतिम प्रदान करण्यात आल्याचे कारण**	प्रमाणक क्रमांक व दिनांक	रक्कम
1	मोनीका छगन गायकवाड, परिचारीका	सेवेतुन राजीनामा दिल्याने	14 / 18-04-2016	1,58,472/-
2	कै लक्ष्मी रामदास बेंडवाल	निधन झाल्याने	03 / 23-09-2016	2,02,567/-
3	श्री महेंद्र भास्कर सोनवणे, वायरमन	सेवेतुन राजीनामा दिल्याने	05 / 03-02-2017	1,21,997/-
4	सुभाष परशुराम गिरी, लिपिक	सेवेतुन राजीनामा दिल्याने	03 / 27-11-2017	39,795/-
5	कै. विजय सदु करोसीया	निधन झाल्याने	04 / 15-01-2018	2,19,961/-
6	श्री सुहास रायभान अभंग, वाहनचालक	नाशिक महानगर पालिका येथे बदली झाल्याने रक्कम वर्ग	05 / 27-03-2018	1,75,879/-

वर नमुद नमुने दाखल अ.क्र. 4 ते 6 ही प्रमाणके तपासली असता असे निर्दशनास येते की उपरोक्त कर्मचारी यांचे नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) यांचे त्या त्या आर्थिक वर्षाचे विवरणपत्र तयार करण्यात आले असुन त्यावर फक्त मुख्य लिपिक यांची सही असुन तपासणी अधिकारी यांची सही घेण्यात आलेली नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 209 दिनांक 03/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 50, Hmm No : 209)

163 निवृत्तीवेतन संबंधी नोंदवहया विहीत नमुन्यात न ठेवलेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखा विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. जळगाव शहर महानगरपालिकेच्या सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही आर्थिक वर्षातील निवृत्ती वेतन धारकांच्या नोंदवहीचे **लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम क्रमांक 466 (5) अन्वये खालील नमुन्यात निवृत्तीवेतन संबंधीचे अभिलेखे ठेवणे आवश्यक आहे.

अ.क्र.	नमुना क्रमांक	नोंदवहीचा तपशील
1	91 (परिशिष्ट 4 ब)	निवृत्तीवेतन नोंदवही
2	92 (परिशिष्ट 4 ट)	निवृत्तीवेतन प्रदान आदेश
3	93 (परिशिष्ट 4 ट)	निवृत्तीवेतन देयक
4	94 (परिशिष्ट 4 ढ)	जिचे निवृत्तीवेतन तिच्या विवाहानंतर किंवा पुर्नर्विवाहानंतर बंद होईल अशा महीला निवृत्तीवेतन धारकांचे सहामाही घोषणापत्र
5	95 (परिशिष्ट 4 प)	निवृत्तीवेतन प्रदान आदेश नोंदवही
6	96 (परिशिष्ट 4 र)	उपदान नोंदवही
7	97 (परिशिष्ट 4 म)	निवृत्तीवेतनाची लेखापरीक्षा नोंदवही

परंतु जळगाव शहर महानगरपालिका येथील लेखा विभागातील सेवानिवृत्ती वेतन संबधीचे वरील प्रमाणे नोंदवहया

विहीत नमुन्यात ठेवण्यात आलेल्या नाहीत.

त्याऐवजी सेवानिवृत्तीवेतन संबंधीची एकच नोंदवही ठेवण्यात आली आहे. सदर नोंदवही ही तपासणी केली असता ती वर नमुद अं.क्र. 1 ते 7 पैकी कोणत्याही विहीत नमुन्यातील नोंदवही नाही. तसेच ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत एकूण 12 कॉलम असुन त्यापैकी 1 ते 7 कॉलमची माहिती भरण्यात आलेली असुन उर्वरीत 8 ते 12 पावेतोची माहिती भरण्यात आलेली नाही. त्यामुळे अभिलेखे परिपूर्ण ठेवण्यात येत नसल्याचे दिसून येते.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 225 दिनांक 08/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 51, Hmm No : 225)

164 सेवानिवृत्ती वेतनाचे प्रदान मनिऑर्डरव्दारे होत असले बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखा विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. जळगाव शहर महानगरपालिकेच्या सन 2016-2017 व 2017-2018 या दोन्ही आर्थिक वर्षातील सेवानिवृत्त कर्मचारी यांचे निवृत्ती वेतन देयकांची तपासणी करण्यात आली.

जळगाव शहर महानगरपालिकेच्या सन 2016-2017 या आर्थिक वर्षातील काही निवडक महिन्यातील सेवानिवृत्ती वेतनाची देयके तपासली असता त्यामध्ये काही सेवानिवृत्ती वेतन धारकांची सेवानिवृत्ती वेतन पोस्टामार्फत मनिऑर्डरव्दारे पाठविण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे -

अ.क्र.	देयकाचा तपशिल	एकूण निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्ती वेतन धारक	मनिऑर्डर रक्कम	कमिशन रक्कम	एकूण रक्कम
1	मे 2016 पेड जुन 2016	62	203463	10174	213637
2	जुन 2016 पेड जुलै 2016	64	190353	9536	199889
3	ऑगस्ट 2016 पेड सप्टेबर 2016	59	190353	9557	199910

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितताबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

01) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक डी.डी.ओ.1005/प्र.क्र.5/कोषा प्रशा.-5, दिनांक 29/08/2005 अन्वये संपूर्ण राज्यातील शासकीय कर्मचा-यांना त्यांच्या मासिक देय वेतन व भत्यांचे प्रदान

राष्ट्रीयकृत बँकेमार्फत करण्याचे धोरण अवलंबिलेले आहे. त्यानुसार जळगाव शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या काही कर्मचा-यांना बँकेमार्फत निवृत्तीवेतनाचे प्रदान करण्यात येते. परंतु काही कर्मचा-यांना मनिऑर्डरव्दारे निवृत्तीवेतनाचे प्रदान करण्यात येत आहे. त्यामुळे शासन नियमाचे उल्लघन होत आहे.

02) जळगाव शहर महानगरपालिकेने वर नमुद शासननिर्णयानुसार थेट बॅकेमार्फत प्रदान न करता मनीऑर्डरद्वारे प्रदान करतांना सेवानिवृत्त कर्मचारी यांचे रक्कमेमधून मनीऑर्डर कमिशनची रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कमा संबधितांना पाठविलेला आहे. कमिशन वजातीमुळे सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांना तेवढया रक्कमा कमी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे सेवानिवृत्त कर्मचारी यांचे आर्थिक नुकसान होत आहे असे लेखापरिक्षणाचे मत आहे.

03) जळगाव शहर महानगरपालिकेच्या सन 2017-2018 या आर्थिक वर्षातील सेवानिवृत्ती वेतनाची देयकांची नस्ती लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 227 दिनांक 08/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 53, Hmm No : 227)

165 घसारा निधी बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगाव शहर महानगरपालिका, सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरिक्षण वेळी घसारा निधीबाबत माहिती घेतली असता महानगरपालिकेने त्यांच्या चल-अचल मालमत्तेचे भविष्यात नूतनीकरण करणेसाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी घसारा निधी ठेवणे व त्यात प्रतिवर्षी अशंदान जमा करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने घसारा निधी ठेवलेला असून रोखवही ची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

01) दिनांक 01.04.2016 रोजी त्यामध्ये रु. 14182.44 इतकी सुरुवातीची शिल्लक असून दिनांक 30.11.2017 पर्यंत व्याजा सह रु. 14943.44 एवढी शिल्लक दिसून येते.रोखवहीत दिनांक 30.11.2017 रोजी खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे. रोखवहीत दिनांक 30.11.2017 रोजी दिनांक 25.07.2017 रोजी बँकेने परस्पर रक्कम खर्ची टाकून खाते बंद केल्याने खर्च व शिल्लक निरंक असे नमूद केलेले आहे.

दिनांक 25.07.2017 रोजी बँकेने परस्पर रक्कम खर्ची टाकून खाते बंद केल्याने खर्च व शिल्लक निरंक.

रु.14943.44 एवढी शिल्लक असताना बँकेने परस्पर रक्कम खर्ची टाकून खाते काय आधारे व का केले बंद केले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.याबाबत बँक ऑफ महाराष्ट्र यांचेशी संपर्क करून रकमेबाबत योग्य ती कार्यवाही करावी. तसेच सदर रकमा परत मिळविणेकरिता आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी.

02) सन 2016-2017 मधील मूळ अर्थसंकल्पात महानगरपालिकेने (वाहन व इमारतसाठी) रक्कम रुपये 200000/- इतके घसारा निधीची तरतूद दर्शवली असुन सुधारित अर्थसंकल्पात ती रु.14100000/ इतकी दर्शवली आहे. तथापी प्रत्यक्षात कोणतेही अंशदान जमा करण्यात आलेले नाही.

03) सन 2017-2018 मधील मूळ अर्थसंकल्पात महानगरपालिकेने (वाहन साठी) रक्कम रुपये 16000/- इतके घसारा निधीची तरतूद दर्शवली असुन सुधारित अर्थसंकल्पात ती रु.23600000/ इतकी दर्शवली आहे. तथापी प्रत्यक्षात कोणतेही अंशदान जमा करण्यात आलेले नाही.

04) अर्थसंकल्पामध्ये घसारा निधीबाबत तरतुद करण्यात येऊनही प्रत्यक्षात निधीमध्ये कोणत्याही रकमा जमा करण्यात आलेल्या नसल्यामुळे भविष्यात वाहनांचे निर्लेखन करण्यात आल्यानंतर नवीन वाहने खरेदी करण्याकरिता निधीची कमतरता भासू शकते, तसेच उपलब्ध निधीमधून वाहन खरेदीकरिता निधी खर्च करण्यात आल्यास अन्य विकास कामांवर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 238 दिनांक 19/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 134, Hmm No : 238)

166 वार्षिक प्रशासन अहवाल तयार न केले बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगाव शहर महानगरपालिका लेखापरीक्षण वेळी सन 2016-2017 व 2017-2018 मधील वार्षिक प्रशासन अहवाल तपासणी साठी मागितला असता उपलब्ध करून देण्यात आला नाही. याबाबत खालील अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

01) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 94(1) या अन्वये आयुक्ताने प्रत्येक एप्रिल महिन्याच्या 1 तारखेनंतर मागील आर्थिक वर्षातील महानगरपालिकेच्या जमा झालेल्या व संवितरित केलेल्या रकमा व वर्षाअखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शवणाऱ्या विवरणपत्रासहित प्रशासनिक अहवाल स्थायी समिती समोर सादर केला पाहिजे, अशी तरतुद आहे. तरी हा अहवाल का सादर करण्यात आला नाही, याबाबत खुलासा करावा. तथापी अशा प्रकारचा प्रशासनिक अहवाल तयार करण्यात आलेला नाही.

02) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 94(2) अन्वये असा अहवाल स्थायी समिती निर्देश देयील त्या नमुन्यात ठेवण्यात यावे अशी तरतुद आहे. तरी याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

03) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 94(3) अन्वये स्थायी समिती कडून अहवालाची तपासणी व त्याचा आढावा घेवून अहवाल व विवरणपत्र याची छापील प्रत प्रत्येक महानगरपालिका सदस्यांना देण्यात यावी. तसेच सदरील विवरणपत्र यांच्या प्रती आयुक्त ठरवतील अशा किमतीस विक्रीसाठी महानगरपालिका कार्यलयात ठेवले पाहिजे. सदर तरतुदीचे सामान्य प्रशासन विभागाकडून पालन झालेले नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 236 दिनांक 19/04/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 136, Hmm No : 236)

167 अनामत /इसारा /सुरक्षा नोंदवहीबाबत.

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव शहर महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. लेखा विभाग महानगरपालिका, जळगांव यांचे लेखापरिक्षण सुरु असुन लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) सुरक्षा अनामत /इसारा रककम नोंदवही राष्ट्रीय लेखा नियमपुस्तीका 2004 अंतर्गत परिशिष्ट 1 मधील जनरल 18 अथवा महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 75 नमुना 54 नुसार प्राप्त झालेल्या रक्कमांची विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही होणे आवश्यक असुन नियम 295 नुसार प्राप्त झालेल्या अनामतीच्या बाबzwj;त नमुना नंबर 24 मधे नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तसेच प्राप्त अनामतीचे प्रकारानुसार स्वंतत्र पृष्ठे ठेवण्यांत आलेली नाही. त्यामुळे इसारा रक्कम, सुरक्षा ठेव इतर ठेवी यांची प्राप्त रक्कम व शिल्लक ठेवी यांची स्वतंत्ररित्या खात्री करता आली नाही.

02) महानगरपालिकेची सुरक्षा व इतर अनामत एकुण रक्कम रुपये 18599713/- इतक्या रक्कमेचे दायित्व दिनांक 31/03/2018 अखेर प्रलंबित असुन, ते कमी करण्यासाठी नियम 299 नुसार तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या अनामत रक्कमा व्यपगत करुन निधीत जमा करण्याची कार्यवाही केलेली नाही. तसेच यामध्ये मुदतठेवी वरील / बॅक खात्यातील प्राप्त व्याजाची रक्कम समाविष्ट आहे. ती उत्पन्नांत जमा घेण्यांत आलेली नाही. त्यामुळे दायित्व वाढत असल्याचे दिसून येते

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 248 दिनांक 03/05/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATRSBM6601 (Ref No : 156, Hmm No : 248)

168 धनादेश पुस्तक साठा नोंदवही विहित नमुन्यात न ठेवणे बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव शहर महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत आहे. जळगाव महानगरपालिकेतील लेखा विभागाचे लेखापरिक्षण प्रगतीत आहे. लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम 80 अन्वये प्राप्त धनादेशाची नोंद पावती पुस्तकाप्रमाणे नमुना क्रमांक 57 मध्ये घ्यावयाची आहे. तथापी प्राप्त धनादेश पुस्तक साठा नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे बॅकेकडून प्राप्त धनादेश पुस्तके व वापर करण्यात आलेले धनादेश पुस्तके व शिल्लक धनादेश पुस्तके यांचा मेळ घेता आलेला नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 251 दिनांक 03/05/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATRSBM6601 (Ref No : 159, Hmm No : 251)

169 महानगरपालिकेने ठेवलेल्या रोखवही व बॅक पासबुक यामधील ताळमेळ अभावी तफावती बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव शहर महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण प्रगतीत असुन. याबाबतमहानगरपालिकेने लेखापरीक्षणास उपलब्ध केलेल्या म न पा रोखनिधीचे विवीध बॅक खाते व रोजकिर्दीची पडताळणी केली असता मनपाकडुन त्या त्या आर्थिक वर्षात शिल्लक रकमांचा तपशीलाचा दरमहा बॅक पासबुक व रोखवहीनुसार ताळमेळ घेण्यांत आलेला नसल्यामुळे वर्षाअखेर बॅक खाते व रोख पुस्तकातील शिल्लक यात खालील तक्तत्यात दर्शविलेप्रमाणे तफावती आढळुन आल्या आहेत.

अ.क्रं.	बॅकेचे नांव	बॅक खाते क्रमांक	रोखवहीनुसार 31/03/2018 ची शिल्लक	पासबुकानुसार 31/03/2018 ची शिल्लक	तफावत
1	इंडियन बॅक	20915869870	13572389.14	28084350.64	14511961.00

2	इंडियन बॅक	20915888113	2207458.70	588783.20	1618675.50
3	इंडियन बॅक	20915869881	9594152.42	10079431.17	485278.75
4	इंडियन बॅक	20915870080	20873371.00	32060664.00	11187293.00
5	इंडियन बॅक	50074852298	1661790.00	2365444.00	703654.00
6	इंडियन बॅक	50074852662	11860.0	10401.00	1459.00
7	इंडियन बॅक	50028041546	164195.00	175420.00	11225.00
8	इंडियन बॅक	50198966032	325000.00	378127.00	53127.00
9	इंडियन बॅक	50036106481	2395798.00	2693669.00	297871.00
10	इंडियन बॅक	50059469110	105000.00	546070.00	441070.00
11	इंडियन बॅक	50179486742	5000.00	423588.00	418588.00
12	इंडियन बॅक	50096656139	1000.00	277.00	723.00
13	इंडियन बॅक	50295289581	600000.00	1295143.00	695143.00
14	इंडियन बॅक	50340647152	2520097.00	4422286.00	1902189.00
15	इंडियन बॅक	50366493098	10271700.00	11472926.00	1201226.00
16	इंडस बॅक	83412	160320461.99	162627361.99	2306900.00
17	ॲक्सीस बॅक	68074	184233	135843	48390
18	स्टेट बॅक	50956	796531	783538	12983
19	युनियन बॅक	14867	699245	704480	5235
20	ॲक्सीस बॅक	05883	179432	160561	18871
21	अलाहाबाद बॅक	47733	478863	1574104	1095241

22	एच डी एफ सी बॅंक	00077	307551	अप्राप्त	-----
23	ॲक्सीस बॅंक	69029	761059	2722342	1961283
24	ओ बी सी बॅंक	00351	677431	अप्राप्त	----
25	अलाहाबाद बॅंक	27433	2738660	2762335	23675
26	अलाहाबाद बॅंक	27568	2578325	2602830	24505
27	अलाहाबाद बॅंक	27513	3563099	3633682	70583
28	अलाहाबाद बॅंक	27353	27154065	28755772	1601707
29	अलाहाबाद बॅंक	27647	149106	151372	2266
30	अलाहाबाद बॅंक	99297	1200	10849	9649
31	अलाहाबाद बॅंक	85442	4800	4807	7
32	अलाहाबाद बॅंक	55019	700000	703816	3816

लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

01) महाराष्ट्र नगरपलिका लेखा संहिता 2011 तसेच नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक 23 जानेवारी 2013 च्या अधिसूचना मधील 395 नुसार दरमहा बॅंक ताळमेंळ घेण्यांत येईल. तसेच प्रत्येक महिनाअखेर रोखवहीत नोंदविलेला जमा व खन्र रक्कमांच्या नोंदी बॅंक पासबुकातील नोंदीबरोबर तुलना करुन शिल्लक रकमेची जुळवणी करुन फरक येत असल्यास त्याबाबतचा ताळमेळ रोखवहीत स्पष्टीकरणासह नोंदविणे आवश्यक आहे. व त्यात न वटलेलेल्या धनादेशाचा तपशील देणे क्रमप्रापत आहे. परंतु म न पा ने दिनांक 31.03.2018 अखेर न वटलेल्या धनादेशाच्या नोंदीचा तपशिल नोंदविलेल्या नाहीत. तसेच तफावतीबाबत ताळमेळ रोखवहीत स्पष्टीकरणासह नमूद केलेले नाही. रोखवहीतील दिनांक 31.03.2018 ला न वटलेले धनादेश कोणत्या लाभार्थ्यास / बॅंकेला दिले आहेत याबाबतचा तपशिल उपलबध झालेला नाही. सदरचे धनादेश तीन महिनेपेक्षा जास्त कालावधी झाल्यास रोख पुस्तकात परत जमा घेतलेल्या नाहीत. त्यामुळे दिनांक 31.03.2018 अखेरची शिल्लकेची पडताळणी करता आलेली नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 277 दिनांक 29/05/2024 अन्वये खुलासा व आवश्यक अभिलेखे मागविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने तसेच आवश्यक अभिलेख उपलब्ध न झाल्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

HCDGSCM8301 (Ref No : 185, Hmm No : 277)

170 वाहन लॉग बुक मधील अनियमितता बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण वेळी काही वाहनांचे लॉग बुक ची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्यात.

01) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 63 नुसार लॉगबूक हे नमुना 49 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. परंतु वाहनांचे लॉगबूक उपरोक्त प्रमाणे विहित नमुन्यात ठेवण्यात आले नाही.

02) वाहनाचे लॉग बुक ची तपासणी केली असता लॉग बुक मधील रकाना क्रमांक २ व ३ मध्ये निघण्याची वेळ व परत येण्याची वेळ नमूद केलेली नाही.उदा. वाहन क्रमांक MH 19 M 433 , MH 19 M 432, MH 19 M 607, MH 19 M 429 , MH 19 M 356, MH 19 M 169 चे लॉग बुक

03) तसेच लॉग बुक मधील रकाना क्रमांक ७ व ८ मध्ये रोजचे किमी नमूद केलेले नाही.तथापि महिना संपल्यानंतर गोषवारा मध्ये सुरुवातीचे किमी व अखेरचे किमी नमूद केलेले आहेत.उदा. MH 19 M 356, MH 19 G 9070

04) वाहन क्रमांक MH 19 G 9070 यामध्ये दिनांक 29.3.2017 रोजी सहा.अभियंता यांनी सकाळी ९ ते सायंकाळी १९ प्रवास दर्शविलेला आहे.एकूण 7 लिटर डिझेल खर्च दर्शविले आहे. तथापि स्वाक्षरी केलेली नाही.

05) वाहन क्रमांक MH 19 M 169 यामध्ये दिनांक 21.4.2016 रोजी मुख्य लेखापरीक्षक यांनी प्रवास दर्शविलेला आहे. एकूण 4 लिटर डिझेल खर्च दर्शविले आहे.तथापि स्वाक्षरी केलेली नाही.

06) वाहन क्रमांक MH 19 M 169 यामध्ये दिनांक 1.4.2017 रोजी एकूण 33 लिटर डिझेल भरल्याचे मनपा पंप साठा नोंदवही वरून दिसून येते. तथापि लॉग बुक मध्ये पृष्ठ क्रमांक 2 वर 35 लिटर डिझेल जमा घेतलेले आहे, त्यामुळे 2 लिटरची तफावत दिसून येते.

07) वाहन क्रमांक MH 19 M 431 यामध्ये दिनांक ६.६.२०१६ रोजी शिल्लक डिझेल १० लिटर होते. दिनांक १.७.२०१६ ते ३१.७.२०१६ वाहन बंद असताना २ लिटर डिझेल वापर दर्शविला आहे. तसेच दिनांक १.८.२०१६ ते ३१.८.२०१६ या कालावधीत एकूण २० लिटर डिझेल घेतलेले आहे. दिनांक ८.८.२०१६ रोजी ९ लिटर व दिनांक २०.८.२०१६रोजी १४ लिटर डिझेल वापर दर्शविला आहे. म्हणजेच दिनांक १.७.२०१६ ते ३१.८.२०१६ या कालावधीत वाहन बंद असताना केवळ दुरुस्तीसाठी २५ लिटर डिझेल वापरलेले आहे. सदर 25 लिटर डिझेल

वापराबाबत जबाबदारी निश्चित करण्यात येऊन वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 81 दिनांक 07/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 103, Hmm No : 81)

171 जळगाव महानगरपालिकेने केलेल्या वाहन दुरुस्ती खर्च बाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे वार्षिक हिशोब पत्रक नुसार वाहन दुरुस्ती साठी सन 2016 - 2017 मध्ये एकूण खर्च रु 3755919/- व 2017-2018 मध्ये एकूण खर्च रु 4412038 /- केलेला आहे. या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण वेळी वाहन दुरुस्तीसाठी केलेल्या खर्चाच्या नस्तीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

(अ) वाहन क्र MH 19 M 9101

प्रमाणक क्र व दिनांक	रक्कम	नाव
३०५/२.५.२०१६	१७९४०	आदर्श वेल्डिंग वर्क्स

01) तीन मक्तेदार यांचेकडून दर मागविलेले आहेत. तथापि दर मागविताना काय पध्दत वापरली याचा कुठेही उल्लेख नाही.

02) मक्तेदार यांचेकडून बंद पाकिटात दर मागविलेले आहेत.परंतु पाकिटावर आवक शिक्का व दिनांक टाकलेला नाही..

03) शहर अभियंता यांनी बंद पाकिटे उघडले आहेत.तथापि दिनांक व वेळ नमूद केलेली नाही.

04) सुप्रीम गॅरेज वेल्डिंग वर्क्स व आदर्श वेल्डिंग वर्क्स यांचे कोटेशन वरील दिनांकात खाडाखोड केलेली आहे.

ब) वाहन क्र MH 19 M 9048

प्रमाणक क्र व दिनांक	रक्कम	नाव
३१८९ /१६.३.२०१७	७७१४०	मे साईनाथ टायर्स ६ नग टायर

01) दोन मक्तेदार यांचेकडून टायर खरेदी बाबत दर मागविलेले आहेत. तथापि दर मागविताना काय पध्दत वापरली याचा कुठेही उल्लेख नाही.तीन मक्तेदार यांचेकडून टायर खरेदी बाबत दर मागविणे आवश्यक होते.तथापि याप्रमाणे

कार्यवाही केली नाही.

02) मक्तेदार यांचेकडून बंद पाकिटात दर मागविलेले आहेत. परंतु पाकिटावर आवक शिक्का व दिनांक टाकलेला नाही.

03) बंद पाकिटे कोणी उघडले हे नमूद नाही, स्वाक्षरी नाही, तसेच केव्हा उघडले आहेत याबाबत दिनांक व वेळ नमूद केलेली नाही.

04) टिपणी मध्ये फायर फायटर वाहनाचे किमी २५७२६ झाल्याचे नमूद केलेले आहे.तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अभिप्राय घेतलेले आहे.तथापि शासन निर्णय नुसार (क्रमांक नमुद करावा) किती किमी झाल्यानंतर टायर बदलणे आवश्यक आहे.याबाबत काहीही नमूद केलेले नाही. तसेच शासन नियमानुसार किती किमी झाल्यानंतर टायर बदलणे आवश्यक आहे, याबाबत काहीही नमूद केलेले नाही. त्यामुळे वाहनाचे टायर विहित धावसंख्या वापरानंतरच बदलविण्यात आलेले असल्याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 83 दिनांक 07/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 105, Hmm No : 83)

172 वाहन घसारा निधीबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण वेळी घसारा निधी बाबत महापालिकेने त्यांच्या चल-अचल मालमत्तेचे नूतनीकरण करणे या उददेशाने घसारा निधी ठेवणे व त्यात प्रतिवर्षी अशंदान जमा करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 198 परिशिष्ट दोन मध्ये घसारा निधी बाबत खालीलप्रमाणे तरतूद केलेली आहे.

अनुक्रमांक	मत्ता	मत्तांचे प्रकार	घसारा रकमेचा दर
६ (क)	वाहने	वाणिज्यिक वाहने (बस,डंपर)	२०%
६ (ख)	वाहने	इतर वाहने	१५%

01) सन 2016-17 मधील अर्थसंकल्पात महानगरपालिकेकडुन रक्कम रुपये 100000/- इतके घसारा निधीची तरतूद

दर्शवली असुन सुधारित अर्थसंकल्पात ती रु.10000 इतकी दर्शवली आहे. तसेच सन 2017-18 मधील अर्थसंकल्पात महानगरपालिकेकडुन रक्कम रुपये 14000000/- इतके घसारा निधीची तरतूद दर्शवली असुन सुधारित अर्थसंकल्पात ती रु.000 इतकी दर्शवली आहे. महानगरपालिकेने सन 2016-17 मध्ये रु.000 आणि सन 2017-18 मध्ये रु 000 अंशदान जमा केलेले आहे. जळगाव महानगरपालिकेने उपलब्ध वाहनांची संख्या लक्षात घेता तरतूद केलेली आहे, परंतु त्याप्रमाणे अशंदान जमा केलेले नाही. त्यामुळे भविष्यात वाहन खरेदी करावयाचे झाल्यास मनपाकडे योग्य त्या निधीची तरतुद उपलब्ध होणार नसल्याने त्या-त्या वेळेच्या मनपा निधीच्या किंवा शासन निधीचा वापर होऊ शकतो व पर्यायाने इतर विकास कामांवरही त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 84 दिनांक 07/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 106, Hmm No : 84)

173 वाहन विमा खाजगी संस्थेकडून घेणे बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016 - 2017 व 2017-2018 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण वेळी वाहनांचे विमा रक्कम भरणा केल्याचे दिसून आले.याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

01) महानगरपालिकेने अधिनस्त असलेल्या वाहनांसाठी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.लि.जळगाव यांचेकडून विमा प्रमाणपत्र घेतलेले आहे.वास्तविक सर्व वाहनांचा विमा, शासन विमा संचालनालय मुंबई याचेकडून घेणे आवश्यक होते.

शासकीय विमा निधी ,विमा संचालनालय यांचे पत्र क्रमांक २३१२ दिनांक १४.२.२०१३ नुसार या कार्यालयाच्या अटी व शर्तीस बांधील राहून सन २००८-०९ मध्ये दि न्यू युनायटेड इंडिया एशोरेन्स कंपनी लि.शाखा कार्यालय यांचेकडे विमा उतरविणेस अनुमती देण्यात आली होती.तथापि मागील 3 वर्षापासून चा वाहन विमा पत्रावरील शासकीय विमा निधीचा ६०% सहविमा सहभाग या कार्यालयाकडे जमा केलेला नाही.तसेच प्रत्येक वर्षी विमापत्राचे नूतनीकरण करताना सहविमा करारावरील रु १००/- च्या मुद्रांक पेपर वरील हमीपत्र भरून दिलेले नाही.त्यामुळे शासनाचे महसुलाचे नुकसान होत आहे.त्यामुळे दि न्यू युनायटेड इंडिया एशोरेन्स कंपनी लि.शाखा कार्यालय जळगाव कडील सहविमा सेवा रद्द करण्यात येत असून दि १५.२.२०१३ पासून वाहनाचा विमा या कार्यालयाकडे संपर्क साधून थेट पद्धतीने उतरविण्यात यावा.असे सूचित करण्यात आलेले होते. तथापि महानगरपालिकेने या बाबीकडे दुर्लक्ष करून स्थानिक विमा कंपनी चे नाव सूचित करणेबाबत विमा संचालनालय यांचेकडे दुरध्वनी वरून विनंती केली असता

विमा संचालनालय यांचे पत्र क्र २३१२ दिनांक २८.३.२०१३ नुसार सन २०१३-१४ या सालात आपल्या सर्व वाहनांच्या विमा पत्रांचे नूतनीकरण युनायटेड इंडिया इन्शोरन्स कंपनी लि.जळगाव या विमा कंपनी कडेच करावे व तसे या संचालनालयाला लेखी कळवावे.असे नमूद केलेले आहे.तथापि युनायटेड इंडिया इन्शोरन्स कंपनी लि.जळगाव यांना विमा संचालनालय मुंबई यांनी प्राधिकृत केलेबाबत चे स्वतंत्र पत्र नाही.तसेच दिनांक २८.३.२०१३ चे पत्रानुसार सन २०१३-१४ या वर्षासाठी वाहन विमा नूतनीकरण करायचे होते.सन 2016-2017 व 2017-2018 या वर्षासाठी याप्रकारचे कोणतेही पत्र घेतलेले नाही.म्हणजेच नियमबाह्य पणे विमा घेतला असल्याचे दिसते.

02) नस्ती मधील टिपणी मध्ये केवळ वाहनाच्या विमा ची मुदत संपणार असल्याने खर्चास मंजुरी मिळावी केवळ असे नमूद असून लिपिक ते उपायुक्त यापैकी कोणीही प्रती वर्षी किती वाहनांचा विमा काढण्यात येतो, एकूण किती रक्कम खर्च होते, त्या वर्षात कोणत्या वाहनाला अपघात झाला किंवा कसे, मागील विमा भरणा मध्ये किती रकमेची सूट मिळणार आहे, याबाबत काहीही नमूद केलेले नाही. त्यामुळे मनपाकडे किती वाहने उपलब्ध आहेत, त्यापैकी किती वाहनांचा विमा काढण्यात येत आहे, विमा रक्कम किती भरणा करणेत येणार आहे, विमा कालावधी किती असणार आहे याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

03) सन २०१६-१७ मध्ये २८ वाहनासाठी दिनांक २५.४.२०१६ रोजी एकूण रु २८३४५३/- वाहन विमा भरणा करण्यात आलेला होता. तथापि सन २०१७-१८ मध्ये त्याच २८ वाहनासाठी दिनांक ११.४.२०१७ रोजी एकूण रु ३०९९७६/- वाहन विमा भरणा करण्यात आलेला आहे. वास्तविक सदर वाहनांचे घसारा रक्कम काढून त्याप्रमाणे विमा रक्कम निश्चित करणे आवश्यक होते.तथापि याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 85 दिनांक 07/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 107, Hmm No : 85)

174 हिस्ट्री सिटमधील नोंदी बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण वेळी वाहन विभागाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्याचे लेखापरिक्षण केले असता महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनाचे हिस्ट्रीसिट ठेवण्यात आले आहेत. त्यापैकी काही निवडक वाहनाचे हिस्ट्री बुकची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

01) वाहन हिस्ट्रीसिटच्या पहिल्या पानावरील वाहनाचा प्रकार पेट्रोल/डिझेल/इंधन टॉकी क्षमता/चेसिस नंबर पीयूसी मुदत, वाहन चालकाचे नाव, विभागाचे नाव, बॅटरी मेक, टायरचे तपशील, विमापत्राची मुदत इत्यादी महत्वपुर्ण नोंदी

घेण्यात आलेल्या नाहीत.

02) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 मधील नियम क्रमांक 64 नुसार नोंदवहीतील प्रत्येक पृष्ठ महानगरपालिकेच्या सामान्य मुद्रेने मोहोरबंद करण्यात येईल ,तसेच नोंदवहीतील एकूण पृष्ठे बाबत शेवटच्या पृष्ठावर प्रमाणित करण्यात येईल.तथापि अधिकारी यांचे प्रमाणित स्वाक्षरीसह वाहन हिस्ट्री शीट प्रमाणित/ गोल शिक्क्याने मुद्रीत करण्यात आलेले नाही.

03) हिस्ट्री सिटमध्ये रकाना क्र.2 मध्ये तारीख नमूद नाही, रकाना क्र.5 मध्ये प्रकरण मंजुरीची तारीख तसेच ठराव क्र. नमूद नाही, रकाना क्र. 7 मध्ये प्रमाणक क्र. व तारीख नमूद नाही, रकाना क्र.9 मध्ये कार्यपूर्ती बाबत संबंधित विभागाचा अहवाल नमूद नाही.

04) शासन निर्णय क्र.विअप्र-2013/प्रक्र 30/2013/विनियमभाग 2 वित्त विभाग दि.17/4/2015 महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, 1965 चे नियम क्र. 69 नुसार शासकीय वाहनांच्या देखभालीसाठी दुरुस्ती खर्चास आखून दिलेली मर्यादा विभाग प्रमुखांसाठी पेट्रोल व डीझेलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी अनुक्रमे रु 50000 वरु. 60000 इतकी आहे. तरी खालील नमूद वाहनांच्या बाबतीत या मर्यादेचे पालन झालेले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे विहित मर्यादेपेक्षा जादा झालेल्या खर्चाबाबत जबाबदारी निश्चित करण्यात येऊन जादा खर्च वसुलीची कार्यवाही करण्यात येऊन वसुलीच्या रकमा मनपा निधीमध्ये जमा करण्यात याव्यात.

अ) 2016-2017

वाहन क्र.(सर्व डीझेल वाहने)	दुरुस्ती खर्च (रु.)	अतरिक्त खर्च (रु.)
MH19M366	79800	19800
MH19M367	141340	81340
MH19M7474	80370	20370
MH19M431	64327	4327
MH19M433	77317	17317
MH19M0607	69215	9215
	एकूण	152369

ब) 2017-18

वाहन क्र.(सर्व डीझेल वाहने)	दुरुस्ती खर्च (रु.)	अतरिक्त खर्च (रु.)

MH19M327 स्किप लोडर	114935	54935
MH19M361	68380	8380
MH19M362	73867	13867
MH19M358	72995	12995
	एकूण	90177

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 137 दिनांक 10/01/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 109, Hmm No : 137)

175 रस्ता अनुदानामधून 10% निधी वाहतुक व्यवस्थेवर करणेबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले.

नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2011/प्र.क्र.74/नवि-16, दिनांक 18/07/2011 अन्वये शासनाकडून प्राप्त होणाऱ्या रस्ता अनुदानामधून 10% निधी वाहतुक पोलीस यांच्याशी सल्ला मसलत करुन ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार शहरातील चौक व रस्त्यांवर वाहतुक नियंत्रण व्यवस्था निर्माण करणे व त्याची देखभाल व दुरुस्ती करणे, रस्त्यावरील लेन मार्किंग निश्चित करण्यासाठी वेगवेगळ्या पट्यांची आखणी करणे, रस्तावर झेब्रा क्रॉसिंग पट्टे मारणे, रस्त्यावर दिशा दर्शक फलक व इतर स्ट्रीट फर्निचर बसविणे, पदपथ व रस्त्यांच्या मध्यभागी दुभाजक निर्माण करणे इत्यादी प्रयोजनासाठी खर्च करणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थंना बंधनकारक करण्यात आलेले आहे. तथापी त्याबाबतचे आवश्यक अभिलेखे मागणी करुनही उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत. त्यामुळे शासन निर्देशानुसार रस्ता अनुदानामधून 10% निधी वरीलप्रमाणे शासन निर्देशानुसार खर्च करण्यात आलेला नसल्याचे व त्यामुळे शासन निर्देशांचे पालन करण्यात आलेले नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.241 दिनांक 23/04/2024 अन्वये खुलासा व आवश्यक अभिलेखे मागविण्यात आले होते. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा तसेच आवश्यक अभिलेखे प्राप्त झालेले नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 112, Hmm No : 241)

176 नव्याने सुरु झालेल्या योजनांबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : शासन निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले. सन 2016-2017 व 2017-2018 मध्ये खालीलप्रमाणे योजना शासनामार्फत नव्याने सुरु करण्यात आलेल्या असून त्याकरिता निधी प्राप्त झालेला असून दिनांक 31/03/2018 अखेर खालीलप्रमाणे रकमा शिल्लक दिसून येतात.

अ. क्र.	योजना	योजना सुरु झाल्याचे वर्ष	प्राप्त अनुदान रक्कम	मनपा हिस्सा	प्राप्त व्याजाची रक्कम	खर्च रक्कम	एकूण शिल्लक रक्कम
1	विशेष रस्ता अनुदान	2016-2017	37500000	0	2270627	0	39770627
2	अमृत पाणीपुरवठा	2016-2017	463220000	62680000	32150160	-2133600	555916560
3	अमृत ग्रीन स्पेस	2016-2017	8384188	0	320707	-276400	8428495
4	सर्वसाधारण रस्ता अनुदान	2017-2018	7500000	0	220862	0	7720862
5	मुलभूत सोई सुविधा	2017-2018	250684932	0	2712579	0	253397511

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) वरील योजनांमध्ये निधी प्राप्त झाला त्याबाबतचे शासन आदेश व त्यामधून कोणती कामे घेण्यात आली होती त्याबाबतचा तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आला नाही. त्यामुळे जमा अनुदान व त्या अनुषंगिक खर्चाचे निकष याबाबत लेखापरीक्षणामध्ये पडताळणी करता आली नाही.

02) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-2016/प्र.क्र.148/नवि-16, दिनांक 23/05/2016 अन्वये विशेष रस्ता अनुदान शिर्षाखाली उपलब्ध झालेल्या निधीचा अ.क्र.8 व 9 नुसार दिनांक 31/03/2018 अखेर खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर उपलब्ध करुन दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात सादर करणे आवश्यक आहे. तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास येते.

03) रोखपुस्तकानुसार सदर योजनांमधून किरकोळ स्वरुपाचा खर्च करण्यात आलेला आहे किंवा कोणताही खर्च करण्यात आलेला नाही, त्यामुळे मोठ्या प्रमाणात निधी शिल्लक दिसून येतो. परिणामी शासनाचा मोठ्या प्रमाणात निधी अडकून पडलेला दिसून येतो. त्यामुळे शासनास इतर विकास कामांवर निधीचा तुटवडा भासण्याची शक्यता

नाकारता येत नाही.

04) अमृत पाणीपुरवठा योजनेचे बँक खाते प्रथम अलाहाबाद बँकेमध्ये काढण्यात आले, त्यानंतर आयसीआयसीआय व इंडस-इंड बँकांमध्ये खाते सुरु करण्यात आले, अशा प्रकारे योजनेचे एकूण तीन खाते सुरु करण्यात आले. तसेच एका खात्यामधून दुसऱ्या खात्यामध्ये रकमा वर्ग करण्यात आलेल्या आहे. एका योजनेकरिता एकच बँक खाते ठेवणे आवश्यक असतांना तीन बँकांमध्ये खाते उघडण्यात आलेले आहे, याबाबत शासन आदेशांची मागणी करण्यात आली असता लेखापरीक्षणास असे आदेश उपलब्ध झाले नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.38 अन्वये कोणतेही नवीन बँक खाते स्थायी समितीच्या मान्यतेचे उघडण्यात यावे असे निर्देश आहेत, तथापी अशा प्रकारे स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली असल्याबाबतचे अभिलेखे/ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे नियमबाह्यपणे कोणतीही सक्षम मान्यता न घेता परस्पर बँक खाते उघडण्यात आलेले असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.99, 101, 102, 103 व 104 दिनांक 30/11/2023 अन्वये खुलासा व आवश्यक अभिलेखे मागविण्यात आले होते. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा तसेच आवश्यक अभिलेखे प्राप्त झालेले नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 113, Hmm No : 104)

177 बांधकामांची नियतकालीक पाहणी

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षण करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 264 अन्वये मोडकळीस आलेली किंवा पडण्याचा संभव असलेली बांधकामे व अशा बांधकामांमुळे त्याच्या शेजारच्या कोणत्याही बांधकामाचा किंवा जागेचा भोगवटा करणाऱ्या किंवा तीत जाणाऱ्या-येणाऱ्यास किंवा जवळून जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही प्रकारे धोका आहे अशा बांधकामाच्या मालकास किंवा भोगवटाधारकास लेखी नोटीस देऊन असे बांधकाम किंवा वस्तु पाडण्यास, मजबूत करण्यास, काढून टाकण्यास किंवा दुरुस्त करण्यास किंवा यापैकी एक किंवा अधिक गोष्टी करण्यास आणि त्यापासून होणाऱ्या धोक्याच्या सर्व कारणांसह प्रतिबंध करण्यास फर्माविता येईल. अशा प्रकारच्या बांधकामांस कुंपण घालणे, ते पाडणे, मजबूत करणे किंवा दुरुस्ती करणे किंवा धोका टाळण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाययोजना करणे यासाठी येणारा खर्च हा बांधकामाच्या मालकाने किंवा भोगवटादाराने करणे आवश्यक आहे. कलम 265 नुसार आयुक्त कोणत्याही इमारतीच्या मालकास लेखी नोटीस देऊन, उपविधींमध्ये विहित करण्यात येईल अशा मुदतीत व रितीने इमारतीची पाहणी करुन घेण्यास सांगू शकेल. पाहणी केल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आंत मालकाने कलम 264 मधील अर्थानुसार काम हाती घेतले पाहिजे आणि अशा दुरुस्ती पूर्ण केल्यानंतर अशा दुरुस्त्या समाधानकारकरित्या केल्याबद्दल जिने अशी पाहणी केली त्या व्यक्तीच्या सहीने एक प्रमाणपत्र तात्काळ आयुक्तास सादर केले पाहिजे. अशी बांधकामे दुरुस्ती करणे, काढून टाकणे,

मजबुत करणे यांवरील खर्च हा आयुक्तांमार्फत करण्यात आला असल्यास असा खर्च मालकांकडून वसुल करण्यात आला पाहिजे. अशा प्रकारच्या बांधकामांची पाहणी ही महानगरपालिकेने समाप्ती प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून किंवा इमारतीच्या भोगवटा करण्यास परवानगी दिल्याच्या दिनांकापासून किंवा तिच्या बांधकाम क्षेत्राच्या किमान 50 टक्के इतक्या क्षेत्राचा प्रत्यक्ष भोगवटा केल्याच्या दिनांकापासून यापैकी जो आधीचा असेल त्या दिनांकापासून तीस वर्षाचा कालावधी समाप्त झाला असेल अशा बांधकामांच्या सुस्थितीबाबाबत महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्यांकडून अशा इमारतींची तपासणी करवून अशा बांधकाम अभियंत्यांने दिलेले बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र आयुक्ताकडे सादर करणेत येईल. असे प्रमाणपत्र तीस वर्षाचा कालावधी समाप्ती झाल्याच्या दिनांकापासून आणि त्यानंतर दहा वर्षांचा कालावधी किंवा त्या इमारतीची स्थिती आणि मालकाने केलेल्या दोषनिवारक दुरुस्त्या लक्षात घेऊन आयुक्त निर्धारित करील असा कमी कालवधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत सादर करण्यात येईल.

वरील तरतुदींनुसार सन 2016-2017 व 2017-2018 या कालावधीमध्ये ज्या इमारती मानवी जिवीतास धोका निर्माण होईल त्यांची माहिती व नोंदवही, अशा इमारतींची तपासणी करुन महानगरपालिकेकडील नोंदणीकृत अभियंतांकडून तपासणी करुन बांधकामांचे सुस्थिती प्रमाणपत्रे व त्यांची नोंदवही लेखापरिक्षणास मागणी करुनही उपलब्ध झाली नाही. त्यामुळे अशा प्रकारची कार्यवाही लेखापरीक्षण कालावधीमध्ये करण्यात आलेली नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. तसेच त्यामुळे अशा प्रकारच्या कार्यवाही करण्यात येत नसल्याने नागरिकांचे जिवीतास हानी पोहचण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याबाबत वरील तरतुदीनुसार महानगरपालिकेने समाप्ती प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून किंवा इमारतीच्या भोगवटा करण्यास परवानगी दिल्याच्या दिनांकापासून किंवा तिच्या बांधकाम क्षेत्राच्या किमान 50 टक्के इतक्या क्षेत्राचा प्रत्यक्ष भोगवटा केल्याच्या दिनांकापासून यापैकी जो आधीचा असेल त्या दिनांकापासून तीस वर्षाचा कालावधी समाप्त झाला असेल अशा बांधकामांच्या सुस्थितीबाबत तपासणी करण्याच्या अनुषंगाने नगररचना विभागाने अशा इमारतींची माहिती कार्यालयीन अभिलेखांवरुन तयार करणे व त्याबाबत उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापी अशा प्रकारची कार्यवाही करण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणादरम्यान निदर्शनास येते.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.144 दिनांक 18/02/2024 अन्वये खुलासा व आवश्यक अभिलेखे मागविण्यात आले होते. तथापी विभागाकडून कोणताही खुलासा तसेच आवश्यक अभिलेखे प्राप्त झालेले नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 130, Hmm No : 144)

178 मोजमाप पुस्तक नोंदवहीबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान बांधकाम विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले. बांधकाम विभागामार्फत सदर कालावधीमध्ये विविध योजनांतर्गत कामे करण्यात आलेली आहेत. बांधकामांची मोजमापे नोंदविण्याकरिता भांडार विभागाकडून मोजमाप पुस्तिकांची छपाई करुन घेण्यात येऊन त्यांचेमार्फत बांधकाम विभागांना मोजमाप पुस्तिका वितरित करण्यात येतात. मोजमाप पुस्तिका प्राप्त झाल्यानंतर

त्यांचे वितरण संबंधित अभियंता यांना मोजमाप पुस्तिका नोंदवहीमध्ये नोंदी घेऊन करण्यात येते. सदर मोजमाप पुस्तक नोंदवहीबाबत खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.63, 137 व 138 खालील नमुना क्र.33 मध्ये मोजमाप पुस्तक नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवहीमध्ये मोजमाप पुस्तिका क्रमांक, देण्यात आलेल्या व्यक्तीचे नांव, दिल्याचा दिनांक, परत केल्याचा दिनांक, शेरा अशा प्रकारे सविस्तर तपशिल नमुद करणे आवश्यक आहे. तथापी बांधकाम विभाग यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली मोजमाप पुस्तिका नोंदवही तपासणी करण्यात आली असता सदर नोंदवही वरील नमुन्यात ठेवण्यात आलेली नसून इतर नमुन्यामध्ये ठेवण्यात आलेली आहे.

2) नोंदवही वापरात आणण्यापूर्वी नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र.64 अन्वये नोंदवहीचे प्रत्येक पृष्ठ महानगरपालिकेच्या सामान्य मुद्रेने मोहोरबंद करणे, तसेच एकूण पृष्ठे विभाग प्रमुखाकडून शेवटच्या पृष्ठावर प्रत्यक्षात पडताळणी करुन प्रमाणित करणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे प्रमाणित करण्यात आलेले नाहीत.

3) भांडार विभागामार्फत सन 2017-2018 मध्ये दिनांक 25/09/2017 रोजी क्र.201 ते 300 अशी 100 पुस्तके छपाई करुन बांधकाम विभागास प्राप्त झालेली आहेत. भांडार विभागाकडून एकत्रितरित्या मोठ्या प्रमाणात मोजमाप पुस्तिका छपाई करुन मिळाल्यानंतर महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.62, व 250 खालील साठा पुस्तक नमुना क्र.21 मध्ये बांधकाम विभागामध्ये पुस्तिका प्राप्त, वापर व शिल्लक साठा इत्यादींबाबत नोंदी घेणे आवश्यक आहे, जेणेकरुन किती मोजमाप पुस्तिका प्राप्त झाल्या, त्यापैकी किती वापरात आहेत व किती शिल्लक आहेत याबाबतचा तपशिल उपलब्ध होऊ शकेल तसेच अनधिकृत वापरात आळा बसू शकेल. तथापी अशा प्रकारे बांधकाम विभागामध्ये स्वतंत्ररित्या मोजमाप पुस्तिकांबाबत साठा पुस्तक ठेवण्यात आलेले नाही. सदर बाब नियमबाह्य असून याद्वारे भविष्यात गंभीर अनियमिता घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.65, दिनांक 01/11/2023 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 140, Hmm No : 65)

179 कार्यादेश नोंदवहीबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान बांधकाम विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले. बांधकाम विभागामार्फत सदर कालावधीमध्ये विविध योजनांतर्गत कामे करण्यात आलेली आहेत. त्यासंबंधीत कार्यादेश नोंदवहीबाबत खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय नमुद करण्यात येत

आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.62 व 120 खालील नमुना क्र.12 मध्ये कार्यादेश नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवहीच्या नमुन्यामध्ये कामाचे नांव, कार्यादेश क्रमांक, कंत्राटदाराचे नांव, अंदाजपत्रकीय रक्कम, निविदा रक्कम, मंजूर निविदा किंमत व दर, काम पूर्ण करण्याचा दिनांक, प्रत्यक्ष काम पूर्णत्वाचा दिनांक, इसारा रक्कम, सुरक्षा ठेव रक्कम अशा प्रकारे सविस्तर तपशिल नमुद करणे आवश्यक आहे. तथापी बांधकाम विभाग यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली कार्यादेश नोंदवही तपासणी करण्यात आली असता त्यामध्ये फक्त कामाचे नांव, कंत्राटदाराचे नांव, अंदाजपत्रकीय रक्कम, कार्यादेशानुसार रक्कम, कामाची मुदत इत्यादी तपशिल नमुद करण्यात आलेला आहे. त्यामुळे कामाचा सविस्तर तपशिल लेखापरीक्षणात तपासणी करता आला नाही.

2) नोंदवही वापरात आणण्यापूर्वी नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र.64 अन्वये नोंदवहीचे प्रत्येक पृष्ठ महानगरपालिकेच्या सामान्य मुद्रेने मोहोरबंद करणे, तसेच एकूण पृष्ठे विभाग प्रमुखाकडून शेवटच्या पृष्ठावर प्रत्यक्षात पडताळणी करुन प्रमाणित करणे आवश्यक आहे, तथापी त्याप्रमाणे प्रमाणित करण्यात आलेले नाहीत.

3) सदर नोंदवहीमध्ये कामाचा तपशिल नोंदवितांना सदरचे काम कोणत्या योजनेमधील आहे याबाबत तपशिल काही कामांखाली नमुद करण्यात आलेले दिसून येत नाही, त्यामुळे काम कोणत्या योजनेमधील आहे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.64, दिनांक 01/11/2023 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 141, Hmm No : 64)

180 स्थावर मालमत्ता/जमिनीची नोंदवही बाबत.

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षण वेळी मिळकत व्यवस्थापन विभागाकडील स्थावर मालमत्ता नोंदवही नमुना नं. 16 नमुना व जमिनीची नोंदवही नोंदवही नमुना नं. 15 लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

01) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 नुसार स्थावर मालमत्ता नोंदवही नमुना नं. 16 व जमिनीची नोंदवही नमुना नं. 15 या नमुन्यात महानगरपालिकेच्या मालकीचे सर्व मालमत्ता यांच्या नोंदी घेण्याबाबत तरतुद आहे. अर्धसमास पत्र क्रमांक 44 दिनांक 28.8.2023, अर्धसमास पत्र क्रमांक 57 दिनांक 5.10.2023, अर्धसमास पत्र क्रमांक 66 दिनांक 1.11.2023 व अर्धसमास पत्र क्रमांक 91 दिनांक 24.11.2024 देउन सदर नोंदवहीची मागणी करण्यात आली होती. तथापि सदर नोंदवही उपलब्ध करण्यात आली नाही.याचाच अर्थ जळगाव शहर महानगरपालिका येथे सदरची नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे महानगरपालिका मालकीच्या मालमत्ता व त्यापासून मिळणा-या

उत्पन्नाबाबत लेखापरिक्षणांस खात्री करता आलेली नाही.

02) मिळकत व्यवस्थापन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेखानुसार मनपाच्या मिळकतींची फक्त एक यादी ठेवण्यात आली असुन त्यानुसार मनपा मालकीच्या 30 मार्केट 38 समाज मंदीर , 50 शाळा, 29 व्यायाम शाळा, 124 कर्मचारी निवासस्थान व इतर 7 निवासस्थान, 4 वाचनालय, 1 यात्री निवास, 9 दवाखाने, 11 घरकुले, 17 बगीचे, 10 स्मशानभुमी, 4 जलतरण तलाव, 1 नाटयगुह, 34 बालवाडी केंद्र, 19 पाण्याच्या टाक्या, 15 अंगणवाडी केंद, 40 मनपा युनीट कार्यालये,, 4 मनपा फायर स्टेशन, 14 इतर मिळकती यांमध्ये घनकचरा डेपो, टीबी सॅनेटोरीयम, रिसोर्स फॅक्टरी, शास्त्री टॉवर, पोलीस स्टेशन, कत्तलखाना, खुल्या जागा इत्यादी, 9 जकात नाके, 69 सार्वजनिक शौचालये, 19 मुता-या अश्या मिळकतींची यादी नमुद आहे. तथापी सदर मिळकती केव्हा व कोणत्या जागेवर बांधण्यात आल्या व मिळकतीं कोण वापरत आहेत. मिळकती भाडयाने दिल्या असल्यास त्यांपासुन मिळणारे उत्पन्न या बाबत लेखापरिक्षणात पडताळणी करता आली नाही.

03) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 मधील नियम 204 नुसार महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्तेच्या सर्व नोंदीची दरवर्षी पडताळणी सक्षम अधिकारी यांनी करावयाची असून पडताळणीचे निष्कर्ष दर्शविणारे प्रमाणपत्र देण्यांत येवून सक्षम अधिकारी हे अदयाक्षरी करतील अशी तरतुद आहे. तथापि जळगाव शहर महानगरपालिका येथे सदरची नोंदवही ठेवलेली नसल्याने लेखासंहितेच्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते. सदरच्या प्रमाणपत्रा अभावी मालमत्तेमध्ये काही विसंगती आहे किंवा कसे या बाबत लेखा परिक्षणांस खात्री करता आलेली नाही. वरील प्रमाणे नोंदवही परिरक्षित करण्यांत येवून महानगरपालिका मालमत्तेबाबत व त्यापासून मिळणा-या उत्पन्नाबाबत नोंदी अद्यावत करण्यात याव्यात, जेणेकरुन महानगरपालिकेकडील सर्व मालमत्तांची माहिती व त्यांच्या अद्यावत किंमती तात्काळ उपलब्ध होऊ शकेल तसेच यामुळे वार्षिक लेख्यांमध्ये यांबाबत अचूक माहिती नमूद करणे शक्य होईल.

04) सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 180 दिनांक 27/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, विभागाकडून जा क्र 3714 दिनांक 20.03.2024 अन्वये खुलासा प्राप्त झालेला असून त्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

आयुक्त कार्यालय जा क्र /आ का /23/2021 दिनांक 08.04.2021 आदेशानुसार मनपा च्या विविध मालमत्तांची व्यवस्थापन योग्य रीतीने व्हावे,त्यातून महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडावी ,त्यांचे व्यवस्थापन एकाच विभागाद्वारे करणे शक्य व्हावे व कामकाज प्रभावीपणे व्हावे या हेतूने सन 2021 पासून मालमत्ता व्यवस्थापन हा विभाग स्वतंत्र करण्यात आला आहे.तसेच नगररचना विभाग व बांधकाम विभाग यांनी मनपाच्या विविध मालमत्तांबाबत असणारी कागदपत्रे ,धारीका इत्यादी मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरित करावी असे आदेशात नमूद केले आहे. उक्त आदेशान्वये सदर कार्यालयाने मालमत्ता व्यवस्थापन विभागात कागदपत्रे ,धारीका इत्यादी हस्तांतरित केलेल्या नाहीत. सन 2021 पासून मालमत्ता व्यवस्थापन विभाग स्थापन झाल्यापासून अद्यापही

मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे नोंदी अद्यावत करण्यात आलेल्या नाहीत.त्यामुळे महानगरपालिका मालकीच्या जंगम व स्थावर मालमत्ता किती आहेत,कोणत्या प्रकारच्या आहेत,त्यांचे संपादनाचे वर्ष कोणते आहे, सद्य:स्थितीत त्यांचे मुल्यांकन किती आहे या बाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आलेली नाही. तसेच यावरुन मिळकत व्यवस्थापन विभाग, बांधकाम विभाग, नगररचना विभाग यांचेमध्ये योग्य तो ताळमेळ नसल्याचेही दिसून येते. महानगरपालिकेच्या मिळकतींची माहिती एकत्रितरित्या उपलब्ध करणेच्या दृष्टीने महानगरपालिकांतर्गत ज्या विभागांकडे अशा प्रकारच्या स्थावर मालमत्ता ताब्यात आहेत अशा सर्व विभाग व मिळकत व्यवस्थापन विभाग यांचेमध्ये योग्य तो ताळमेळ असणे आवश्यक आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.180 दिनांक 27/02/2024 च्या अनुषंगाने विभागाने योग्य व परिपूर्ण खुलासा सादर केलेला नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 123, Hmm No : 180)

181 पाणीपुरवठा विभाग जलशुद्धीकरण केंद्र उमाळा येथील साठा नोंदवही बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे वेळी जलशुद्धीकरण केंद्र उमाळा येथील साठा नोंदवहीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

01) महाराष्ट्र नगरपालिका लेखासहिता 2011 नुसार साठा नोंदवही नमुना नंबर 21 मध्ये ठेवणे आवश्यक असतांना त्या नमुन्यात नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

02) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नुसार साठा नोंदवही नमुना नं. 116 ठेवण्यात आलेली आहे. सदरची नोंदवही तपासली असता दिनांक 7.12.2017 रोजी टी सी एल साठा निरंक आहे. त्यानंतर दिनांक 11.1.2018 रोजी 400 बॅग टी सी एल प्राप्त झालेले आहे.म्हणजेच एक महिन्यापेक्षा जादा कालावधीसाठी टी सी एल पावडर उपलब्ध नव्हती.ही बाब गंभीर आहे. तसेच यापुढे किमान नियमित टी सी एल साठा ठेवणे बाबत कार्यवाही करावी.

03) महाराष्ट्र नगरपालिका लेखासहिता 2011 मधील नियम 266 नुसार महानगरपालिकेच्या साठा नोंदवहीतील शिलकेची सक्षम अधिकारी हे पडताळणी करतील अशी तरतुद आहे. तथापि याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे वेळोवेळी सक्षम अधिकारी यांनी त्यांची जबाबदारी पार पाडलेली नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 181 दिनांक 27/02/2024 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 124, Hmm No : 181)

182 महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई यांचे बाबतआवश्यक माहिती उपलब्ध करणे बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव महानगपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या कालावधीतील पाणी पुरवठा विभागाचे लेखापरीक्षण करतेवेळी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई यांचे कडील सेस रकमेबाबत माहिती उपलब्ध करण्यासाठी अर्धसमास पत्र क्र.197 दिनांक 21/03/2024 दिलेले होते. उपलब्ध केलेल्या संचिकेमध्ये खालीलप्रमाणे माहिती परिपूर्ण स्वरुपात नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे याबाबत लेखापरीक्षणात योग्य ती पडताळणी करता आली नाही.

1) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई यांचे कडील सन 2016-17 ते 2017-18 या कालावधीतील सेस रकमेचे मागणीपत्र.

2) जळगांव शहर महानगरपालिकेने सन 2016-17 ते 2017-18 या कालावधीत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई यांना प्रदान केलेल्या रकमांचा तपशील.

3) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई यांना 31/03/2018 अखेर देणे असलेल्या रकमांचा तपशील.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.197 दिनांक 21/03/2024 अन्वये माहिती मागविण्यात आली होती, तथापी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या संचिकेवरुन तसेच खुलासा करण्यात आलेला नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPRAM6701 (Ref No : 126, Hmm No : 197)

183 परिवहन विभागातील अनियमितता

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षाचे परिवहन विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. सन 2016-2017 व 2017-2018 चे परिवहन उपक्रमाचे रोख पुस्तकाची तपासणी करण्यात आली. लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. लेखापरिक्षण वर्ष-2016-17 व 2017-18 या कालावधीत सदर खात्यात कोणतेही रक्कम जमा झालेली नाही. लेखापरिक्षण कालावधी सदर परिवहन उपक्रम राबविण्यात येत होता किंवा कसे? नसल्यास उपक्रम केव्हापासून बंद

आहे. याबाबत लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत.

2. उपक्रम बंद असल्यास सदर उपक्रमाचे खाते बंद करुन शिल्लक रक्कम या मनपा निधीमध्ये जमा करणे आवश्यक होते. सदर उपक्रमाचे खात्यामध्ये दि.31/03/2018 अखेर रु.3,39,462/- इतकी रक्कम विनावापर पडून आहे. यामधून मनपाचे इतर विकास कामे करता आली असती, असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 79 दिनांक 06/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATVBMM7201 (Ref No : 127, Hmm No : 79)

184 विधी विभागातील देयके व इतर अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

जळगाव महानगरपालिकेचे सन 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षाचे विधी विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. सन 2016-2017 व 2017-2018 चे विधी विभागातील प्रमाणकांची तपासणी करण्यात आली. लेखापरीक्षण करतांना आढळून आलेल्या अनियमितता बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्रमांक 63 अन्वये नमुना 29 मध्ये दावा नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्याने दावे बाबत सद्य:स्थिती / मानधन अदा इत्यादी बाबतची खात्री करण्यात आलेली नाही.

2. लेखा परिक्षण अहवाल 2015-16 या नुसार 991 दावे प्रलंबित होते. त्यामधील 378 दावे निकाली काढलेले आहेत. उर्वरित 613 दावे प्रलंबित आहे. आणि सन-2016-17 व सन 2017-18 या वर्षात किती दावे दाखल झालेले आहेत व निकाली काढण्यात येऊन 2017-18 अखेर किती दावे प्रलंबीत आहे या बाबत अभिलेखे दिले नसल्यामुळे याचा ताळमेळ घेता आलेला नाही.

3. नरेंद्र उत्तम चौधरी आवक जावक क्रं.454, दि.15/04/2017 व प्रमाणक क्रं.145, दि.13/04/2017 रु.360/- या प्रवास देयकावर आतील भागात प्रमुख लेखापाल यांचा शिक्का मारलेला आहे. पण त्यावर स्वाक्षरी केलेली नाही.

4. श्री.देविदास जगताप प्रमाणक नं.2247, दि.27/11/2017 रु.297/- प्रवास भत्ता देयक मंजुर केलेले आहे. प्रवास भत्ता देयक यावर आतील भागात मुख्य लेखा अधिकारी यांचा शिक्का आहे त्यावर त्यांची स्वाक्षरी नाही.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्रमांक 88 दिनांक 08/11/2023 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

185 बांधकाम परवानगी व त्या अनुषंगिक बाबींमधील अनियमितता

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	महानगरपालिका स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 या वर्षाचे लेखापरीक्षणादरम्यान नगररचना विभागाचे लेखापरीक्षण करण्यात आले. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील तरतुदींनुसार नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी देण्यात येत असते. त्या अनुषंगाने अभिलेखे तपासणी करण्यात येत असून लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र.63 नुसार नमुना 38 मध्ये इमारत परवानगी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवहीमध्ये मालकाचे नांव, बांधकामाचे स्वरुप, अर्जाचा दिनांक, परवान्याचा दिनांक, बांधकाम पूर्ण झाल्याचा दिनांक, भोगवट्याचा दिनांक, कर विभागाला माहिती दिल्याचा दिनांक, निर्धारणाचा दिनांक, निर्धारणाची रक्कम इत्यादी माहिती नोंदवून त्यासमोर प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तथापी बांधकाम परवानगी नोंदवही ही महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 75(6) नुसार नमुना 45 मध्ये ठेवण्यात आलेली आहे. सदर नमुन्यामधील माहिती भरतांना रकाना क्र.8 काम पूर्ण झाल्याचा दिनांक, रकाना क्र.9 ताबा घेतल्याचा दिनांक, रकाना क्र.10 कराधान विभागास सूचना दिल्याचा दिनांक, रकाना क्र.11 आकारणीचा दिनांक, रकाना क्र.12 आकारणीची रक्कम इत्यादी माहिती भरण्यात येत नाही. तसेच रकाना क्र.13 शेरा या रकान्यामध्ये प्राधिकृत अभियंता व नगररचना विभागाचे संबंधित प्रभागाचे अभियंता यांची नांवे नमुद करण्यात येत असल्याचे निदर्शनास येते.

2) महानगरपालिका हद्दीमधील चार विभागांच्या स्वतंत्र चार नोंदवह्यांमध्ये ठेवण्यात आलेल्या असून प्रत्येक नोंदवहीमध्ये 1 ते 200 पृष्ठे आहे. तथापी महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र.64 नुसार सदर नोंदवह्या प्रमाणित करण्यात आलेल्या नाहीत.

3) सदर नोंदवह्यांनुसार बांधकाम पूर्ण झाल्याचा दिनांक, कराधान विभागास सूचना दिल्याचा दिनांक, आकारणीचा दिनांक व रक्कम नमुद करण्यात येत नसल्यामुळे परवानगी देण्यात आलेले बांधकाम पूर्ण झाले किंवा कसे, सदर बांधकामाची कर आकारणी करण्यात येऊन वसुली केंव्हापासून करण्यात आली याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.तसेच यामुळे विहित मुदतीमध्ये कर आकारणी न झाल्यास महानगरपालिकेचे नुकसान होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

4) नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेल्या प्रत्येक नोंदींसमोर प्राधिकृत अधिकारी यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक असतांना

त्याप्रमाणे स्वाक्षरी करण्यात आलेल्या नाहीत. पूर्ण वर्ष संपल्यानंतर एकाच ठिकाणी सहा.नगररचनाकार यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. तथापी विभाग प्रमुख या नात्याने सहायक संचालक (नगररचना) यांच्या कुठेही स्वाक्ष़ऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत.

5) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 44 अन्वये विकासकाने बांधकाम परवानगी दिल्यानंतर कलम 45 अन्वये विहित कालावधीमध्ये बांधकाम परवानगी देण्यात येते व अशी देण्यात आलेली परवानगी ही कलम 48 अन्वये एक वर्षांपर्यंत अंमलात राहील व त्यानंतर ती आपोआप संपुष्टात येईल, अशा रितीने एक वर्षांपर्यतचा कालावधी हा तीन वर्षांपर्यंत प्राधिकरणाकडे अर्ज करुन वाढविता येईल, तथापी अशी वाढीव परवानगी देणेपूर्वी जोता पातळीपर्यंत, जोता नसेल तर तळघराचे बांधकाम पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे. तथापी वरीलप्रमाणे ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये काम पूर्ण झाल्याचा दिनांक किंवा मुदतवाढीचा दिनांक नमूद करण्यात आलेला नसल्याने याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता येत नाही. बांधकाम परवानगी नोंदवहीमध्ये नोंदविल्यानुसार खालीलप्रमाणे प्रकरणांची संख्या दिसून येते व सदर प्रकरणांबाबत जोते पातळीपर्यंत किंवा तळघराचे बांधकाम पूर्ण झालेले असल्याबाबत नगररचना विभागामार्फत तपासणी करण्यात आलेली नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. त्यामुळे शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार कार्यवाही करण्यात येत नसल्याने संबंधित अभियंता यांनी त्यांची जबाबदारी पार पाडलेली नसल्याचे निदर्शनास येते.

अ. क्र.	शिवार	प्रकरणांची संख्या		जोते पातळीपर्यंत बांधकाम तपासणी संख्या
		2016-2017	2017-2018	
1	मेहरुण	306	414	0
2	पिंप्राळा	338	365	0
3	खेडी/निमखेडी/आव्हाणे	224	233	0
4	जळगांव	422	432	0

06) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 15 अंतर्गत कलम 253, 254 अन्वये कोणतीही इमारत बांधकामकरिता महानगरपालिका आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तथापी कलम 267 अन्वये वरील कलम 254 अन्वये परवानगी न घेता कोणतेही बेकायदेशिर बांधकाम करण्यात येत असल्याची खात्री झाल्यास अशा बांधकाम करवून घेणाऱ्या व्यक्तीस ताबडतोब थांबवण्यास भाग पाडता येईल, जर असे बेकायदेशिर बांधकाम ताबडतोब थांबवण्यात आले नाही तर अशा व्यक्तीस अशा जागेमधून कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यामार्फत काढून टाकता येईल आणि त्यास त्याच्या परवानगीशिवाय अशा व्यक्तीस त्या जागेत पुन्हा प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करण्याची व्यवस्था करता येईल. याबाबत लेखापरीक्षण

कालावधीमध्ये कार्यवाही करण्यात आलेली असल्याबाबत अभिलेखे ठेवण्यात आलेले नसल्याने अशा बेकादेशिर बांधकामांबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. यामध्ये बांधकाम परवानगी घेतल्यानंतर व प्रत्यक्ष काम पूर्ण करुन भोगवटा प्रमाणपत्र घेण्यात आल्यानंतर किंवा भोगवटा प्रमाणपत्र न घेता वापर सुरु करण्यात आल्यानंतर नजिकच्या कालावधीमध्येही वाढीव बांधकाम करुन त्यामध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही, याबाबतही वेळोवेळी तपासणी होणे व अशा प्रकारे परवानगी न घेता अनधिकृतरित्या वाढीव बांधकामे करण्यात येत असल्यास किंवा आली असल्यास वरीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे, तथापी अशा प्रकारची कार्यवाहीही करण्यात येत नसल्याचे लेखापरीक्षणामध्ये निदर्शनास येते.

सदर विषयाच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.156, दिनांक 30/01/2024 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, तथापी विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नसल्याने वरीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDNBM7201 (Ref No : 143, Hmm No : 156)

186 विकास निधी वापराबाबत

योजना : **लेखाशीर्ष** : 0 **वसुलपात्र** : 0.00/-
निधी : महानगरपालिका स्व- निधी **कलम** : 9ड **अंतिम अमान्य** : 0.00/-

जळगांव महानगरपालिकेचे सन 2016-2017 व 2017-2018 चे लेखापरीक्षणादरम्यान विकास शुल्क खात्याची पडताळणी करण्यात आली. विकास निधी खात्यामध्ये दिनांक 31/03/2018 अखेर खालीलप्रमाणे रकमा शिल्लक आहेत.

अ. क्र.	तपशिल	रक्कम
1	रोखवहीप्रमाणे	20873371
2	रोखवहीमध्ये जमा न करण्यात आलेल्या व्याजाच्या रकमा एकूण	5544135
3	मुदत ठेवीमध्ये गुंतविलेल्या मुळ रकमा	120000000
	एकूण	**146417506**

वरील बाबतीत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

01) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 124 अ ते फ अन्वये कोणत्याही जमिनी वा इमारतीच्या वापर सुरु करण्यावर किंवा तिच्या वापरात बदल करण्यावर किंवा विकास करण्यावर विकास आकार बसविणे, विकास आकार बसविणेकरिता जमिनीचे किंवा इमारतीचे वर्गीकरण/दर/कार्यपद्धती, आकार यांबाबत तरतुद नमुद करण्यात आलेली आहे. कलिम 125ज अन्वये विकास निधी स्वतंत्र खात्यामध्ये जमा करणे व अशा जमा रकमा केवळ या अधिनियमाखालील कोणत्याही योजनेत किंवा परियोजनेत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी राखीव असलेल्या कोणत्याही जमिनीचे संपादन करणे व तिचा विकास करणे याकरिता तसेच सार्वजनिक सुविधा पुरविण्याकरिता करण्यात येईल अशी तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार विकास निधीच्या रकमा स्वतंत्र खात्यात जमा करण्यात येत असून सदर खात्यामध्ये वरीलप्रमाणे रु.14,64,17,506/- इतकी रक्कम शिल्लक आहे. सदर खात्यामधून फक्त मौजे मेहरुण शिवार येथील विकास योजना रस्त्याखालील जागेच्या भूसंपादन प्रस्तावानुसार 50% रक्कम अदा करण्यात आलेली असून वरीलप्रमाणे मोठ्या प्रमाणात निधी खात्यामध्ये शिल्लक आहे.

02) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील प्रकरण सात मधील कलम 125 अन्वये प्रादेशिक योजना, विकास योजना किंवा नगररचना इत्यादीच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असेलली जमिन सक्तीने संपादन करणे, कलम 126 अन्वये योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनांकरिता आवश्यक असेलली जमिन संपादन करणे, कलम 128 अन्वये ज्या प्रयोजनासाठी कोणत्याही योजनेत किवा परियोजनेत जमिन नेमून दिली असेल त्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी जमिनी संपादन करण्याचे राज्य शासनाचे अधिकार, कलम 129 अन्वये निकडीच्या बाबतीत जमिन कब्जात घेणे इत्यादीबाबत तरतुदी नमूद करण्यात आलेल्या आहेत. तथापी यानुसार खात्यामध्ये मोठ्या प्रमाणात रकमा शिल्लक असूनही कोणती जमिन संपादनाची कार्यवाही करण्यात आलेली नाही. जमिन संपादन करुन शहराच्या विकासामध्ये भर घालण्याच्या अनुषंगाने भाजी मार्केट, फळ मार्केट, फेरीवाल्यांकरिता जागा उपलब्ध करुन देणे, नागरिकांना पार्कींगच्या जागा उपलब्ध करुन देणे इत्यादी व अशा प्रकारच्या विविध योजना राबविणे महानगरपालिकेस शक्य होऊ शकेल, तसेच पर्यायाने शहरामध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेली पार्कींग, अतिक्रमण इत्यादींसारख्या समस्यांवरही तोडगा निघू शकेल. तथापी याप्रमाणे संबंधित विभागामार्फत कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याने शहरातील समस्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिसून येते.

